# ''२० व्या शतकातील नवाकाळ वृत्तपत्राचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय योगदान'' (१९२३–२०००)


टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

इतिहास विभाग


तात्त्विक, सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध


संशोधक

उर्मिला सुभाष घोलप

**Prn.02114007306**

मार्गदर्शक

प्राचार्य.डॉ. रघुनाथ धोंडिबा शेळके

एम.ए., एम.फिल, पीएच.डी. (इतिहास)


डिसेंबर २०१९

# प्रतिज्ञापत्रक

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करते की ''**विसाव्या शतकातील नवाकाळ वृत्तपत्राचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय योगदान (१९२३-२०००)**'' हा शोधप्रबंध प्रा.डॉ.रघुनाथ धोंडिबा शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली मी तयार केलेला आहे. या लिखाणासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन साधनांचा योग्य तो श्रेयनिर्देश प्रबंधात केलेला आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या विद्यापीठात पीएच.डी(इतिहास) पदवीसाठी प्रस्तुत शोधप्रबंध सादर करण्यात येत आहे. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही पदवी किंवा पदविकेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : पुणे

**संशोधक**

दिनांक / /२०१९

उर्मिला सुभाष घोलप

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पदव्युत्तर इतिहास विभाग, तात्त्विक, सामाजिकशास्त्रे विद्याशाखा अंतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी घोलप उर्मिला सुभाष यांनी ''**विसाव्या शतकातील नवाकाळ वृत्तपत्राचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय योगदान**'' (१९२३–२०००) या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यू.जी.सी.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरून सदर प्रबंधाचे काम केलेले आहे.

**मार्गदर्शक**

स्थळ : पुणे — प्राचार्य.डॉ. रघुनाथ धोंडिबा शेळके

दिनांक : / /२०१९ — एम.ए., एम.फिल, पीएच.डी. (इतिहास)

# ऋणनिर्देश

पुणे स्थित टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची 'विद्यावाचस्पती' (पीएच.डी.) पदवीसाठी **''२० व्या शतकातील नवाकाळ वृत्तपत्राचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय योगदान''** (१९२३–२०००) पर्यंत शोधप्रबंध सादर करण्याकरिता टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने अनमोल संधी प्राप्त करून दिली. त्याबद्दल मी विद्यापीठाची ऋणी आहे. परमेश्वराच्या कृपेने व अतोनात प्रयत्नांती हा शोधप्रबंध लिहिण्यात आत्मविश्वास निर्माण करण्यात आमच्या कुलदैवत व ग्रामदैवत तसेच जगाचे चालक, पालक, मालक आमचे श्रद्धास्थान 'श्री स्वामी समर्थ', 'गुरूदेव दत्त' यांच्या कृपाशीर्वादाच्या फलस्वरूप हा शोधप्रबंध पूर्ण करू शकले. मी त्यांच्यासमोर नतमस्तक आहे.

प्रस्तुत प्रबंधासाठी माझे मार्गदर्शक डॉ. रघुनाथ धोंडिबा शेळके आणि त्यांच्या सौभाग्यवती प्रा. शळके मॅडम यांनी वेळोवेळी आत्मियतेने व जिव्हाळ्याने मार्गदर्शन केले. त्याबद्दल मी त्यांची मनःपूर्वक ऋणी आहे. सदरचा प्रबंध पूर्ण करण्यासाठी सुभाष बाबुराव कुल महाविद्यालय, केडगाव येथील प्राचार्य डॉ. गोविंदराजे निंबाळकर व इतिहास विभागप्रमुख डॉ. जाधव सर यांनी अनमोल असे मार्गदर्शन केले. प्रा. विकास टकले, प्रा. पिसे सर, छत्रपती कॉलेज श्रीगोंदा.

सदर शोधप्रबंधासाठी लागणारी विविध पुस्तके व 'नवाकाळ'चे वृत्तपत्र फाइल्स (मार्च १९२३ ते डिसेंबर १९९४) विविध मूळ साहित्य उपलब्ध करून देण्यात 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय', संदर्भ विभाग, दादर, मुंबई येथील ग्रंथपाल व कर्मचारी वर्गाची ऋणी आहे. 'नवाकाळ' वृत्तपत्र कार्यालय, गिरगाव, मुंबई, संपादक सौ. जयश्री खाडिलकर–पांडे, इतर सहाय्यक संपादक, पत्रकार, ग्रंथपाल, कर्मचारी वर्ग यांनी वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केले त्यामुळे त्यांची अत्यंत ऋणी आहे.तसेच शासकीय विभागीय ग्रंथालय विश्रामबागवाडा पुणे, यांनी जानेवारी १९९५ ते डिसेंबर २००० चे मूळ साहित्य उपलब्ध करून दिले याबद्दल त्यांची हि मी ऋणी आहे.

सदर शोधप्रबंधासाठी आवश्यक संदर्भ ग्रंथ, वृत्तपत्रे, मासिके, पुस्तके टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे ग्रंथपाल, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे, ग्रंथपाल, केसरी ग्रंथालय, पुणे येथील ग्रंथपाल, अहमदनगर कॉलेज ग्रंथालयाचे ग्रंथपाल, ग्रंथपाल, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, शासकीय प्रादेशिक ग्रंथालय नियतकालिक विभाग, गोखले हॉल, पुणे, ग्रंथपाल या सर्वांनी वेळोवेळी साहित्य उपलब्ध करून दिले, त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. तसेच मुंबई मराठी पत्रकार संघ, स्वातंत्र्यवीर सावरकर ग्रंथालय, लालबाग, मुंबई, पुणे नगर वाचन मंदिर, पुणे येथील

ग्रंथपालांनी सदर शोधप्रबंधास आवश्यक ती पुस्तके, संदर्भ ग्रंथ उपलब्ध करून दिले, त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

व्यक्तिशः 'नवाकाळ'च्या संपादिका सौ. जयश्री खाडिलकर–पांडे यांनी त्यांच्याकडील पुस्तके उपलब्ध करून दिल्याबद्दल व अनमोल असे मार्गदर्शन केल्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

संशोधनाबद्दल आदर बाळगणाऱ्या आणि संशोधकाचा सर्वतोपरी मदत करणाऱ्या, ज्यांच्या मदतीमुळे सातत्याने संशोधन करत राहावे, अशी इच्छा संशोधकाच्या मनात निर्माण होत राहील, असे विविध मान्यवर, ज्यांनी मला आपल्या बहुमोल वेळ देऊन मार्गदर्शन केले, या सर्वांची मी ऋणी आहे. माझे पती विनोदकुमार टेकवडे, तसेच माझे दीर डॉ. नंदकिशोर टेकवडे व आमच्या सर्व कुटुंबाचे या कार्याला हातभार लावल्याबद्दल मी ऋणी आहे.

प्रबंधाचे अक्षरजुळणी सुबकरित्या करून देणारे श्री. चंद्रकांत गुळुंबे, सौ. जान्हवी सचिन चव्हाण मॅडम यांची तसेच मुद्रित तपासून देण्याचे काम श्री. चंद्रकांत गुळुंब यांनी केले, त्याबद्दल मी त्यांचीही ऋणी आहे.

संशोधक

स्थळ, पुणे

उर्मिला सुभाष घोलप

दिनांक: / / २०१९

# अनुक्रमणिका


| अ.क्रमांक | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रतिज्ञापत्रक | |
| २ | प्रमाणपत्र | |
| ३ | ऋणनिर्देश | |
| ४ | संशोधन प्रस्तावना | |
| ५ | प्रस्तावना व वृत्तपत्रांचा उदय | १ ते ४३ |
| ६ | ‘नवाकाळ’ वृत्तपत्राची स्थापना, ध्येय, धोरण व उद्दिष्टे | ४४ ते १०० |
| ७ | ‘नवाकाळ’ वृत्तपत्राचे सामाजिक कार्य | १०१ ते १४८ |
| ८ | ‘नवाकाळ’ वृत्तपत्राचे आर्थिक कार्य | १४९ ते १९६ |
| ९ | ‘नवाकाळ’ वृत्तपत्राचे राजकीय कार्य | १९७ ते २९५ |
| १० | उपसंहार | २९६ ते ३०१ |
| ११ | संदर्भग्रंथ सूची | ३०२ ते ३०६ |
| १२ | परिशिष्टे | |
| १३ | छायाचित्रे | |

# सारांश

वृत्तपत्र स्वातंत्र्य म्हणजे पत्रकाराच्या लेखणीचे व विचारांचे स्वातंत्र्य! पत्रकार सत्य पडताळून बातम्याद्वारे वृत्तपत्रांतून देतात. ते वृत्त पूर्वग्रहदूषित असता कामा नये. घटना आहे तशी दिली पाहिजे. बातमीत स्वतःचे काही आणून बातमी बनवू नये. हे पत्रकाराचे कर्तव्य आहे आणि ते बजावत असताना वृत्तपत्र स्वातंत्र्य महत्त्वाचे आहे.

समाजात घडणाऱ्या घटना बातमी स्वरूपात देणे म्हणजे पत्रकारितेचा पहिला पैलू आहे. त्यातील जनहिताचे प्रश्न समाजासमोर आणून 'बित्तंबातमी' सांगून जनजागृती करणे म्हणजे वृत्तपत्र स्वातंत्र्याचा दुसरा पैलू. वृत्तपत्र स्वातंत्र्याचा तिसरा आणि महत्त्वाचा पैलू म्हणजे पत्रकाराने समाजातील लोकांचे मार्गदर्शन केले पाहिजे.

महाराष्ट्राला पत्रकारितेची महान परंपरा आहे. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात पत्रकारितेचे दोन मुख्य प्रवाह सुरू झाले. आधुनिक ज्ञान म्हणजेच माहिती देऊन जाणते व ज्ञानी बनवावे, हा पत्रकारितेच्या एका प्रवाहाचा मुख्य उद्देश होता. झोपलेल्या लोकांना ब्रिटिश राजवटीची बित्तंबातमी देऊन जागे करावे आणि स्वातंत्र्यातच लोकहित आहे, असे मार्गदर्शन करून त्यांच्या मनावर बिंबवावे, हा पत्रकारितेच्या दुसऱ्या प्रवाहाचा मुख्य उद्देश होता. लोकांना त्यांच्या हिताचे मार्गदर्शन निर्भीडपणे आणि निःस्वार्थीपणे करणे, हा वृत्तपत्र स्वातंत्र्याचा तिसरा पैलू आहे. महाराष्ट्रातील पत्रकारितेच्या परंपरेनुसार हे तिसरे पण अत्यंत महत्त्वाचा पैलू आहे.

मराठी पत्रकारितेला नामवंत धुरिणांचा वारसा आहे. मराठी भाषेत जितकी दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके आहेत, तेवढी इतर भाषेत सापडणे कठीण आहे. एवढी आवड, जिव्हाळा, प्रेम, आत्मियता मराठी वाचक आणि वृत्रपत्रांमध्ये अनेक वर्षांपासून पाहण्यास मिळते. त्यामुळेच ठरावीक वृत्तपत्रांचा एक स्वतंत्र वाचकवर्ग असतो.

मराठी वृत्तपत्राचे जनक 'दर्पणकार' बाळशास्त्री जांभेकरांपासून लोकमान्य टिळकांपर्यंत अनेकांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीचा पाया रचला. देशविदेशातील घडामोडी त्यांच्या विश्लेषणांसह प्रकाशित करून समाजप्रबोधनाचे महान कार्य या धुरिणांच्या हातून घडले आहे. त्यातूनच लोकजागृती होऊन नागरी मूलभूत हक्कांची जाणीव समाजाला होऊन स्वातंत्र्यासाठी चळवळी झाल्या, अनेक सत्याग्रह झाले. ब्रिटिश राजवटीविरुद्ध जनमत तयार होण्यास वृत्तपत्रांची भूमिका

महत्त्वाची होती. म्हणूनच इतिहासात पाहिले तर वेळोवेळी वृत्तपत्रस्वातंत्र्यावर गदा आणणारे कायदे सरकारद्वारा लादले गेले; परंतु महाराष्ट्रातील पत्रकारांनी वेळोवेळी त्यास विरोध करून आपल्या हक्कासाठी ते लढले.

स्वातंत्र्यपूर्व काळात पत्रकारिता एक व्रत मानले जात होते. त्यासाठी मराठी वृत्तपत्रांनी व त्यांच्या संपादकांनी वेळोवेळी सरकारी रोष पत्करून वेळप्रसंगी आर्थिक भुर्दंड सहन करून कारावासही भोगला. त्यांच्या या महान कार्याला विसरता येणार नाही.

'दर्पण', 'केसरी', 'मराठा', 'नवाकाळ' हे त्यातील काही वृत्तपत्रे होत. समाजप्रबोधनाचा वसा घेतलेल्या दैनिकांची परंपरा आजतागायत सुरू आहे. त्यातीलच एक खाडिलकर घराणे. गेल्या चार पिढ्या विसाव्या शतकापासून एकविसाव्या शतकापर्यंत या कुटुंबाने पत्रकारितेत स्वतःची एक स्वतंत्र ओळख निर्माण केली.

काकासाहेब खाडिलकरांनी ७ मार्च १९२३ रोजी 'नवाकाळ'ची स्थापना केली. हे वृत्तपत्र आजतागायत सुरू असून या वृत्तपत्राची शतकपूर्तीकडे वाटचाल सुरू आहे. त्यांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीमध्ये निर्भीड आणि निःस्वार्थी पत्रकारिता म्हणून 'नवाकाळ'ची स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. सुरुवातीपासून 'नवाकाळ'ने अनेक सामाजिक, राजकीय तसेच आर्थिक विषयांवर समाजहिताचे अनेक अग्रलेख लिहून त्याविषयी मार्गदर्शन केले. अनेक वेळा सरकारी रोष पत्करून संपादकांनी कारावासही भोगला. विसाव्या शतकात समाजमनावर स्वतःचा ठसा उमटवला. मराठी वृत्तपत्रसृष्टीच्या कारकीर्दीचा आणि कर्तृत्वाचा आढावा घेताना 'नवाकाळ'चे नाव घेतल्याशिवाय ते पूर्णच होऊ शकत नाही. एवढे उत्तुंग काम पत्रकारितेत 'नवाकाळ'ने करून ठेवले आहे.

पत्रकारितेचा अफाट अनुभव असणाऱ्या काकासाहेबांनी 'नवाकाळ'ची मुहूर्तमेढ रोवली. १९२३ च्या मार्चमध्ये त्यांनी स्वतःचे 'नवाकाळ' हे दैनिक काढले व देशसेवेचे कडकडीत व्रताचरण पुढे स्वतंत्रपणे सुरू केले. जनता हेच वृत्तपत्राचे खरे दैवत, हा ठाम विश्वास असल्यामुळे त्यांनी आपले दैनिक समाजप्रबोधनासाठी वाहून घेतले.

देशभक्त कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर. एक थोर क्रांतिकारक, नाटककार, साहित्यिक, पत्रकार, संपादक अशा विविध रूपात त्यांनी आपले कर्तृत्व महाराष्ट्र भूमीत साकार केले. काकासाहेबांनी लिहिलेली नाटके, वृत्तपत्रातील अग्रलेख खूप गाजले. त्यामुळेच स्वातंत्र्यपूर्व

काळात जनमानसात मोठी क्रांतिज्योत निर्माण होण्यासाठी स्फूर्ती व दिशा मिळाली. टिळकांच्या मार्गदर्शनाखाली क्रांतिकारक कार्य काकासाहेबांच्या हातून घडले. नेपाळला जाऊन तेथे रायफली तयार करण्याचे यंत्र –तंत्र आत्मसात करण्यासाठी त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. मात्र, अथक प्रयत्न करूनही ही योजना सफल होऊ शकली नाही; परंतु त्यांच्या लेखणीमुळे अनेक प्रकारची क्रांतिज्योत जनसामान्यांच्या मनात व हृदयात तेवत ठेवण्याचे कार्य काकासाहेब खाडिलकरांमुळे पूर्णत्वास आले.

काकासाहेबांनी दोन वेळा 'केसरी'च्या संपादकपदाची धुरा सांभाळली. त्यानंतर 'लोकमान्य' वृत्तपत्राचे संपादकपदही भूषविले. 'लोकमान्य'तून बाहेर पडल्यावर स्वतःचे 'नवाकाळ' वृत्तपत्र सुरू केले. पुढे त्यांनी 'स्वाधीन भारत' हे हिंदी वृत्तपत्रसुद्धा सुरू केले. लोकमान्य टिळकांच्या सानिध्यात येण्यापूर्वीपासूनच काकासाहेब स्वतःला प्रथम नाटककार नंतर पत्रकार संबोधत होते. काकासाहेब महान नाटककार होते आणि त्यांच्या प्रत्यक्ष जीवनानेही नाट्याचा कळस गाठला आहे; किंबहुना त्यांचे सारे जीवन नाट्यमय होते. नाटकाचा प्रारंभ आणि शेवट ही दोन टोके नाट्यकलेने जुळवावी तसे त्यांच्या जीवनात अनेक प्रसंग आढळतात. विभूतीपदाला पोचलेल्या लोकमान्यांच्या 'केसरी'त १८९६ साली प्रवेश करताच त्यांचा जो पहिला अग्रलेख प्रसिद्ध झाला, त्यात विभूतीपूजन आहे. त्यांनी 'केसरी'त १९२० साली अखेरचा जो अग्रलेख लिहिला तो लोकमान्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे पुण्यस्मरण करणारा आहे. 'केसरी'त त्यांनी लिहिलेल्या अग्रलेखामुळे लोकमान्यांवर खटला होऊन त्यांना सजा झाली आणि हे शल्य त्यांना बोचत होते. पण नंतर 'नवाकाळ'मध्ये प्रा.न.र.फाटक यांनी लिहिलेल्या अग्रलेखामुळे नाट्याचार्यांना तुरुंगवासाची सजा झाली! 'गुरु ऋणातून मुक्त झालो' असे आनंदाचे उद्गार काढूनच ते तुरुंगात गेले.

लोकमान्य टिळकांना सहा वर्षांची शिक्षा झाली तेव्हा मुंबईतील कामगारांनी जो लढा दिला, त्याविषयी त्यांनी 'सर्वात पुढे मुंबईच का?' अशी लेखमाला लिहिली. ती इतकी प्रभावशाली होती की त्यामुळे जनमानसात समाजप्रबोधनाच्या कामाला गती मिळाली. काकासाहेबांनी देशभक्तीची भावना रोमारोमात भिनणारी आणि वीरवृत्तीचा प्रचार करणारी भाऊबंदकी, किचकवध, मानापमान, सत्त्वपरीक्षा आदी नाटकांचे लेखन केले. या नाटकांतून त्यांनी ब्रिटिश सत्तेवर कोरडे ओढले.

१९२३ साली 'नवाकाळ' वृत्तपत्र सुरू केले. पुढे १९२९ साली राजद्रोहाच्या खटल्यादरम्यान त्यांना तुरुंगवासाबरोबर दोन हजार रुपयांचा दंड झाला. तेव्हा ते म्हणाले की, 'दंडाचा भुर्दंड 'नवाकाळ'वर पडणार नाही. कारण तुरुंगात मी नाटके लिहीन.' या खटल्याचा खर्चही पूर्वीच्या नाटकांच्या उत्पन्नातून देण्यात आला. नाट्यक्षेत्रातील या कार्यामुळेच त्यांच्या जीवनात स्थिरता आली. त्यांच्यात आत्मविश्वास आला. ते ताठ मानेने आणि स्वाभिमानाने जगू शकले.

काकासाहेब खाडिलकरांनी टिळक आणि गांधीजी या दोन महापुरुषांच्या सान्निध्यात देशसेवेचे कार्य केले. त्यांनी वृत्तपत्रीय तसेच वेळप्रसंगी आंदोलनात सहभागी होऊन आंदोलकांमध्ये चळवळीबद्दल उत्साह निर्माण केला, नवचैतन्य जागविले. गांधीपर्व सुरू होण्याआधी ते टिळकांच्या सान्निध्यात होते. टिळकांच्या मृत्युनंतर त्यांच्या जीवनात गांधी आले. त्यांनी आपले एक युगच सुरू केले. त्या क्रांतीची पावले काकासाहेबांनी ओळखली. त्याचा पायरव त्यांच्या कानी पडला आणि ते समजून चुकले की जुना काळ संपला आहे. नवा काळ येत आहे. त्याला आपण पाठमोरे न जाता सामोरे गेले पाहिजे. म्हणूनच काकासाहेबांनी आपल्या वृत्तपत्राचे नाव 'नवाकाळ' असे ठेवले. टिळकांच्या अनुयायांनी तसेच काकासाहेबांनी गांधीजींच्या चळवळीचा व विचारसरणीचा मोकळ्या मनाने स्वीकार केला होता.

'महात्मा गांधी यांनी सुरू केलेली असहकाराची चळवळ म्हणजे लोकमान्य टिळक यांच्या धोरणांचे परिपक्व फळ होय.' याविषयी सर्व विचारी लोकांची एकवाक्यता झालेली आहे. ज्या वृक्षाचे बीजारोपण लोकमान्य टिळक यांनी केले, जो वृक्ष लोकमान्य टिळकांच्या हयातीत वाढीस लागून फलोन्मुख झाला व ज्या वृक्षाचे पूर्ण स्वरूप महात्मा गांधी यांच्या चळवळीमुळे जनतेच्या दृष्टीस पडले त्या वृक्षाच्या सावलीखाली बसून 'नवाकाळ' पत्र रोजचे काम पाहणार आहे, असे 'नवाकाळ'चे धोरण काकासाहेबांनी स्वीकारले होते.

'नवाकाळ'च्या स्थापनेनंतर काकासाहेबांनी गांधीजींच्या विचारसरणीला महत्त्वाचे स्थान दिले. गांधीजींचे विचार महाराष्ट्राच्या सामान्य जनतेला समजावून सांगण्याची जबाबदारी काकासाहेब आपल्या कसलेल्या लेखणीद्वारे कुशलतेने पार पाडीत होते.

गांधीजी तुरुंगात व बाहेर काँग्रेसच्या गोटात फूट अशा स्थितीत गांधीजींच्या राजकारणाविषयी तसेच लोकांची भक्ती टिकवून धरण्याचे काम अतिशय बिकट होते. परंतु

ज्याकरिता काँग्रेसचे कित्येक पुढारी गांधीजींच्या राजकारणाशी तो मुख्य विषय कौन्सिलात जाण्याचा होता. १९२३ मध्ये कायदे मंडळातील खऱ्याखुऱ्या लोकमताला धाब्यावर बसवून मिठाचा कर बिनदिक्कत वाढविल्यामुळे कायदे मंडळातील लढाईच्या परिणामकारकतेबद्दल लोकांचा विश्वास डळमळणे स्वाभाविक होते. हा प्रसंग काकासाहेबांच्या नजरेतून सुटणे शक्य नसल्यामुळे त्यांनी गांधीजींच्या राजकारणासाठी त्याचा उपयोग करून घेतला. १९२३ साली 'नवाकाळ' निघाल्यानंतर पुढील काळात देशात राष्ट्रीय निशाणाचा झगडा सुरू झाला. तो लोकांच्या स्वराज्यविषयक स्वाभिमानाचा दर्शक होता. याशिवाय या वर्षी काँग्रेसमध्ये व काँग्रेसबाहेर जे घडले त्याची माहिती काकासाहेबांच्या १९२३ सालच्या लेखातून आलेली आहे. १९२४ ते १९२९ या पाच वर्षांत महात्मा गांधीजींच्या दुर्दम्य प्रेरणेमुळे हिंदी राजकारणाची चक्रे अतिशय वेगाने फिरू लागली होती. सारा देश त्या वेगाने गजबजून गेला होता आणि जनतेच्या जीवनाची चिरकालीन स्थिरता हादरून तिला स्वराज्यानुकूल आकार धारण करण्याची आवश्यकता वाटू लागली होती. गांधीजींनी कौन्सिलातील राजकारण दास, नेहरु आदी नेत्यांच्या गळ्यात टाकून खादीचा प्रसार, हिंदू-मुस्लिम ऐक्य, अस्पृश्यता निवारण यासारखी कार्ये आपल्या अंगावर घेतली. तुरुंगातून सुटल्यावर थोड्याच अवधीत हिंदू-मुस्लिम एकीसाठी गांधीजींनी दिल्लीत दोन उपवास केले. या उपवासात शक्ती क्षीण झाल्याचा अनुभव येत असताही उरल्या-सुरल्या शक्तीने अर्धा तास चरख्यावर सूत कातण्याचे आपले व्रत त्यांनी सोडले नाही. परंतु या उपवासाच्या पूर्वी महात्मा गांधीजींना आपल्या काही अनुयायांच्या उच्छृंखलपणाचा जो अनुभव आला, त्याबद्दल काकासाहेबांनी प्रकट केलेली मते नोंद घेण्यासारखी आहेत. महात्माजींनी यावेळी नमते घेतले; परंतु आपला मार्ग सोडला नाही. त्यांनी खादी ग्रामोद्योग निर्माण केला. चरख्याचे स्वराज्याच्या चळवळीत महत्त्व काय व त्याविरुद्धचा आक्षेप कितपत आहे, या संबंधाचे १९२४-२५ सालातले लेख पाहिल्यास काकासाहेबांच्या संपादकीय कर्तव्यदक्षतेबद्दल निराळा पुरावा द्यायला नको.

काकासाहेब खाडिलकर हे उत्तम प्रचारक होते आणि त्यांची निष्ठा कडवी होती. गांधींच्या टिळक स्वराज्य फंडासाठी एक कोटी रुपये जमवण्यासाठी भारतात अनेक ठिकाणी प्रयत्न केले गेले. त्यात महाराष्ट्रात खाडिलकरांच्या 'मानापमान' नाटकाचा प्रयोग मुंबईत करण्यात आला होता.

साहित्यात त्यांनी आपली स्वतंत्र अशी ओळख निर्माण केली होती. क्रांतिकारक, देशभक्त, पत्रकार, संपादक, साहित्यिक, नाट्याचार्य अशा अनेक भूमिका त्यांनी एकहाती निभावल्या. मराठी नाट्यसृष्टीचा आणि मराठी वृत्तपत्र व्यवसायाचा विचार करता काकासाहेबांचे स्थान खूप वरचे आहे. १९२९ रोजी राजद्रोहाच्या खटल्यात काकासाहेबांना झालेल्या शिक्षेचे वृत्त ऐकल्यावर खुद्द महात्मा गांधीजींनी 'यंग इंडिया'त ४ एप्रिल १९२९ रोजी लेख लिहून काकासाहेबांचा गौरव केला.

काकासाहेबांच्या तुरुंगवासामुळे महाराष्ट्रभर 'नवाकाळ'ची प्रसिद्धी झाली. काकासाहेबांना झालेल्या शिक्षेमुळे 'नवाकाळ'ची जबाबदारी अर्थात संपादकपद अप्पासाहेब खाडिलकरांना स्वीकारावे लागले. त्यांनीसुद्धा काकासाहेबांप्रमाणेच 'नवाकाळ'ची नीती, ध्येय, उद्देश यात कसलाच फरक न करता पुढे सुरू ठेवली. १९३० तसेच १९४२ च्या आंदोलनात 'नवाकाळ'ने गांधी विचारांना, त्यांच्या आंदोलनाला महत्त्वाचे स्थान दिले. देश स्वातंत्र्यानंतर १९४७ नंतर गांधी हत्येनंतर त्यांनी गांधीजींच्या विचारांची लेखमालाच 'नवाकाळ'मध्ये प्रसिद्ध केली.

महात्माजींचे जीवन म्हणजेच संग्राम आणि संघर्ष. त्यांचा आफ्रिकेतील सत्याग्रह, हिंदुस्थानातील असहकारितेची व कायदेभंगाची चळवळ, चले जावच्या मंत्रामागे त्यांनी उभी केलेली प्रचंड शक्ती हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंग्रामात महत्त्वाची आहे. समाजात अहिंसा, समता, बंधूता, समानता यासारख्या विषयांवर त्यांनी आपल्या प्रवचनाद्वारे जनतेत जागृती निर्माण केली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात हिंदुस्थानात यादवी माजली. पण त्याचबरोबर त्या यादवीपासून वाचवणारा पुढारीही महात्माजींच्या रूपाने देशाला लाभला. स्वातंत्र्य हे साध्य नव्हे, साधन आहे, हे ध्यानी ठेवून स्वातंत्र्याचा लढा देत असताना विधायक शक्ती निर्माण करून त्यांनी त्या प्रवाही केल्या. तसेच स्वातंत्र्योत्तर काळात माजलेले यादवीचे जहर उतरवून वातावरणात विधायक शक्ती तळागाळात पोसल्या जाव्या म्हणून आपले कण कण कर्तृत्व व क्षणक्षण काळ वेचण्यास महात्माजींनी कसूर केली नाही.

महात्माजींनी राष्ट्राला स्वातंत्र्य तर दिलेच, पण त्याचबरोबर हिंदी लोकांना शील दिले आणि नैतिक पातळी वरच्या दर्जाला नेऊन सोडली. स्वतंत्र राष्ट्राचे शीलवान रहिवासी म्हणून हिंदी मनुष्य जगभर मिरवू शकतो.

३० जानेवारी १९४८ ला गांधीजींची हत्या झाली. महात्माजींच्या जाण्याने 'नवाकाळ'ची अपरिमित हानी झाली. त्या वेळी अप्पासाहेबांनी अनेक अग्रलेखांच्या माध्यमातून गांधीजींचे पूर्ण चरित्रच 'नवाकाळ'मध्ये मांडले. 'दिव्य पुरुषाचे देहवसान', 'हरिजनस्वरूप महात्मा', 'राष्ट्राचा आणि मानवाचा आत्मा', 'काँग्रेसस्वरूप महात्मा', 'सत्याग्रहस्वरूप महात्मा', 'चरखामय महात्मा', 'शांतिमय महात्मा', 'हिंदूधर्मस्वरूप महात्मा', 'ज्ञानस्वरूप महात्मा', 'स्त्रियांचा उद्धारक महात्मा', अशी अग्रलेखमालाच 'नवाकाळ'मध्ये लिहिली. गांधीजींच्या भारतातील सुरुवातीच्या कारकीर्दीपासून ते अखेरच्या काळापर्यंत 'नवाकाळ'ने गांधीजींचे नेतृत्व जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे महान कार्य आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून प्रसारित करून एक प्रकारची देशसेवाच केली.

महात्माजींचा 'नवाकाळ'वर एवढा जिव्हाळा होता की, १९३१ साली विलायतेला जाताना 'नवाकाळ' तर माझा आहे, असे उद्‌गार महात्मा गांधी यांनी काढले होते. काकासाहेब खाडिलकरांच्या पत्नी सौ. गौरीबाई यांच्या आजारपणात दोनदा व निधनानंतर एकदा महात्मा गांधी यांनी खाडिलकर कुटुंबाला भेट दिली होती. महात्मा गांधींचे कटिवस्त्र गौरीबाई खाडिलकर, अवंतिकाबाई गोखले यांच्याकडून दिले जात होते. अशा पद्धतीचे गांधीजींचे खाडिलकर कुटुंबावर व 'नवाकाळ'वर स्नेह व जिव्हाळा होता.

स्वातंत्र्य मिळेपर्यंत काही थोडी सरकारधार्जिणे वृत्तपत्रे वगळता भारतीय वृत्तपत्रांनी स्वातंत्र्य प्राप्तीच्या दृष्टीने फार मोलाची कामगिरी केली. राष्ट्रप्रेमाची ज्योत व स्वातंत्र्याची ओढ जनतेत निर्माण करणे, सामाजिक परिवर्तनाची गरज जनतेला पटवून सांगणे, ब्रिटिशांची कूटनीती चव्हाट्यावर मांडणे, स्वातंत्र्य चळवळीसंबंधीच्या बातम्या जनतेला पुरवून त्या लढ्यात सहभागी होण्यास जनसामान्यांना प्रोत्साहन देणे. परकीय सत्ता देशाची किती व कशी आर्थिक पिळवणूक करीत आहे आणि त्यामुळे देशाची स्थिती किती दयनीय झाली आहे, हे लोकांना समजावून सांगणे. ब्रिटिश सत्तेविरुद्ध लोकमत संघटित करणे अशा निरनिराळ्या मार्गांनी स्वातंत्र्य चळवळीला भरीव हातभार भारतातील राष्ट्रवादी वृत्तपत्रांनी लावला. स्वातंत्र्य चळवळीच्या यशाला वृत्तपत्रांचे योगदान निश्चितच मोलाचे व प्रशंसनीय होते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरू झालेले 'केसरी' पाठोपाठ 'नवाकाळ' वृत्तपत्राचे योगदान मोलाचे आहे. वृत्तपत्रांच्या हक्कासाठी त्यांच्या संरक्षणासाठी न्यायसंस्थेकडे वेळोवेळी नवाकाळ'ने दाद

मागितल्याचे दिसून येते. अप्पासाहेबांनी आपल्या लेखनशैलीमुळे 'नवाकाळ' वृत्तपत्र स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात चांगलेच गाजविले.

अप्पासाहेबांनी 'नवाकाळ'चा पाया मजबूत केला. अप्पासाहेब खाडिलकरांनी १९२९ ते १९६८ अशी जवळपास चाळीस वर्षे 'नवाकाळ'ची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. मार्मिक, तर्कशुद्ध आणि उपरोधाचा स्वर असलेले त्यांचे अग्रलेख अतिशय लोकप्रिय असत. वृत्तपत्रांची सरकारकडून होणारी दडपशाही, कुचंबणा याला त्यांनी विरोध दर्शविला होता. पत्रकार संघटनांच्या माध्यमातून पत्रकारांचे प्रश्न सोडविण्यासाठीही त्यांनी प्रयत्न केले होते. १९४२-४३ मध्ये मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्षपद त्यांनी स्वीकारले. १९४४ मध्ये कोल्हापुरातील पत्रकार परिषदेच्या चौथ्या अधिवेशाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या ज्या हिंस्त्र आणि अत्याचारी घटना घडल्या, त्याने सारे भारतवर्षच नव्हे, तर सारे जग हादरून गेले. या अमानुष आणि राक्षसी दंग्याचे खापर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या पुढाऱ्यांवर आणि मुंबईतल्या सर्वसाधारण मराठी जनतेच्या माथ्यावर फोडण्यात आले. मुंबईमधल्या सर्व इंग्रजी आणि गुजराती वृत्तपत्रांनी या दंग्याच्या वाटेल तशा भडक, खऱ्या-खोट्या आणि अतिशयोक्ती बातम्या छापून संयुक्त महाराष्ट्रवाद्यांना आणि मराठी जनतेला झोडपण्याचा नुसता सपाटाच लावला आणि त्यांच्याच छापील प्रचाराचे पडसाद भारतात आणि भारताबाहेर उमटू लागले. या प्रचाराचा प्रत्युत्तर वस्तुतः मराठी वृत्तपत्रांनी द्यावयास हवे होते. पण मुंबईमधील 'नवाकाळ', आचार्य अत्रे यांचा 'मराठा' आणि पुण्यातील 'प्रभात'खेरीज बहुतेक सर्व मराठी वृत्तपत्रांनी याबाबतीत 'कोत्या वृत्ती'चे प्रदर्शन केले.

अप्पासाहेबांचे लेखन नखरेल, ढंगदार, परीटघडीचे नव्हते. पण त्यांची भाषा अस्सल मराठी वळणाची, घाटाची व थाटाची असे. तीत बालबोध संसारी पद्धतीचा डौल खासच होता. त्यांच्या लेखनात उदाहरणे येत ती तशीच असत. 'दिपुष्टी' किंवा टेकणभाजी असे घरगुती शब्द ते सहज वापरत. प्रसंग आलाच तर अत्यंत बोचरे, तिखट, विखारी, तिरकस, विरोधकांना टोमणे मारणारे, त्यांना ओरबाडणारे, उपरोधी लिखाण अप्पासाहेब करू शकत असत. पण ती त्यांची प्रकृती नव्हती. काँग्रेसचा पुरस्कार हे 'नवाकाळ'चे तत्त्व अप्पासाहेबांनी कधी सोडले नाही. पण म्हणून काँग्रेसच्या दोषांवर रामशास्त्री बाण्याने निःस्पृहपणे रोखठोक भाषेत टीका

करण्यात आपल्या काँग्रेस निष्ठेला बाधा येते, असे त्यांनी कधी मानले नाही. काँग्रेसचा प्रचार ज्या जोमाने त्यांनी केला त्याच जोशाने, नेटाने व ईर्षेने मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कारही त्यांनी केला. आचार्य अत्रेंसारखा घणाघाती प्रचार त्यांनी केला नाही. पण समर्पक युक्तिवाद, बुद्धिनिष्ठ चिकित्सा व प्रभावी भाषा वापरून अप्पासाहेबांनी या प्रश्नांची बाजू भक्कम व बिनतोड पद्धतीने मांडली. 'नवाकाळ'वर काँग्रेसधार्जिणे म्हणून अनेक टीकाकारांनी टीका केली; परंतु मराठी माणसाची मराठीच्या अस्मितेसाठी अप्पासाहेबांनी काँग्रेस तसेच सत्ताधाऱ्यांचे कुठलेही हितसंबंध जोपासले नाही. याचा ढळढळीत पुरावा म्हणजे संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे आंदोलन.

अप्पासाहेबांनी ४० वर्षं 'नवाकाळ'चे संपादक म्हणून काम पाहिले. त्यांनी काकासाहेबांचे लिखाण तसेच चरित्र ग्रंथरूपात प्रकाशित केले. अप्पासाहेब खाडिलकरांनी त्यांच्या वयाच्या ६४ व्या वर्षी म्हणजेच १ ऑक्टोबर १९६९ ला आपले चिरंजीव नीळकंठ खाडिलकर यांची संपादक म्हणून नियुक्ती केली. नीळकंठ खाडिलकरांनीही 'नवाकाळ'च्या संपादकपदाची धुरा अतिशय समर्थपणे पेलली. त्यांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीत स्वतःचा आदर्श निर्माण केला. तसेच संदर्भ संपन्न, असे एक ना अनेक अग्रलेख लिहून इतिहास घडवला. ते तिसऱ्या पिढीचे संपादक होते. निळूभाऊंनी 'नवाकाळ'ची आर्थिक अरिष्टातून मुक्तता करून, स्वतःच्या पायावर उभ्या असलेल्या स्वतंत्र बाण्याच्या आणि स्वावलंबी सुसज्ज अशा वृत्तपत्रात 'नवाकाळ'चे रूपांतर केले. सर्वोत्कृष्ट वृत्तांताचे व्होरा पारितोषिक मिळविली. सभांचे वृत्त देण्याची आणि खास मुलाखतीची नवी शैली वृत्तपत्रसृष्टीला निळूभाऊंनी दिली.

'नवाकाळ' हे विविध विचारांचे व्यासपीठ तसेच सामान्य जनतेच्या व्यथांचे प्रतिबिंब 'नवाकाळ'मधून उभे केले. संपादकीय तर वाचकांचे विशेष आकर्षण ठरले. 'नवाकाळ'मधील असा प्रामाणिकपणा आणि स्वतंत्र बाणा, जसे घडले तसे सांगितले, हे वृत्ताचे सूत्र आणि जे मनात तेच लेखनात हे संपादकीयाचे सूत्र यामुळे ध्येयवादी परंपरा कायम राखली गेली. प्रशासन आणि पुढाऱ्यांवर आपल्या अग्रलेखाच्या माध्यमातून आसूड ओढून संपूर्ण मराठी वृत्तपत्रसृष्टीत आणि वाचकवर्गात त्यांनी क्रांती घडवून आणली. महाराष्ट्राची राजकीय, सामाजिक, आर्थिक विचारांची वाटचाल खाडिलकरांनी अनुभवली. त्यामुळेच त्यांच्या लेखणीला वेगळीच धार होती. संपादकपदी आरूढ होण्यापूर्वी 'नवाकाळ'ची आर्थिक स्थिती बिकट होती;

परंतु त्यांच्या अथक परिश्रम–मेहनतीतून त्यांनी ‘नवाकाळ’ला एक स्वतंत्र बाण्याचे, सुसज्ज व स्वावलंबी, स्वाभिमानी दैनिक म्हणून मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले. मराठी वृत्तपत्रसृष्टीत १९९० च्या काळात ‘नवाकाळ’चे अधिराज्य होते. नीळकंठ खाडिलकरांची कारकीर्द मोठ्या प्रमाणात गाजली. ‘अग्रलेखाचा बादशाह’ म्हणून ओळखले जाणारे नीळकंठ खाडिलकर हे दैनिक ‘नवाकाळ’ या वृत्तपत्राचे अनेक वर्षे संपादक होते. ते ‘संध्याकाळ’ या नावाचे सायंदैनिकही प्रकाशित करीत असत.

आचार्य अत्रे यांचा ‘मराठा’ १९७६ साली बंद पडला. ‘सामना’ १९८९ मध्ये आला. त्याआधी १३ वर्षें निव्वळ मराठी म्हणावे, असे एकच वर्तमानपत्र होते. ते म्हणजे ‘नवाकाळ’. घणाघाती, शब्दकळा, सुस्पष्ट विचार या गुणवैशिष्ट्यांनी नीळकंठ खाडिलकरांनी ‘नवाकाळ‘मध्ये लिहिलेले अग्रलेख गाजले. आजही त्याचे महत्त्व कमी झालेले नाही. १९७० च्या दशकापासून त्यांनी गिरणी कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी परिश्रम घेतले. नवाकाळ’चा एक दिवसाचा सात लाख खप हा विक्रम कुणी मोडला नाही. नीळकंठ खाडिलकर हे दैनिक ‘नवाकाळ’चे संपादक होते. त्या काळात त्यांचे नव्या शैलीतील मॅरेथान वृत्तांत व मुलाखती आणि विविध विषयांवरील अग्रलेख यांनी सर्वांना विस्मयचकित केले.

नव्या पिढीतील पत्रकाराने त्यांचा आदर्श घ्यावा, अशीच त्यांची कारकीर्द. सर्वोत्कृष्ट रिपोर्टिंग, सर्वोत्कृष्ट मुलाखती आणि सर्वोत्कृष्ट अग्रलेख हे तीनही गुण त्यांच्या संपादकीय पत्रकारितेत होती. त्या गुणवैशिष्ट्यांवरच त्यांनी ‘नवाकाळ’चे वेगळेपण मराठी वाचकवर्गात निर्माण केले. आपले प्रत्येक लेख वाचनीय व संदर्भसंपन्न होण्यासाठी त्यांचा प्रयत्न असे. प्रामुख्याने अग्रलेखांसाठी स्वतंत्र ओळख हे ‘नवाकाळ’चे एक वैशिष्ट्य आहे. ‘नवाकाळ’चा विशिष्ट असा वाचकवर्ग त्यांनी निर्माण केला.

वाचकांना बित्तंबातमी देऊन जागे केले आणि जनतेच्या हिताचे मार्गदर्शन केले म्हणजे पत्रकाराची कर्तव्य संपत नाहीत. लेखणी निर्भीडपणे व निःस्वार्थीपणे तलवारीसारखे चालविल्याशिवाय सरकार आणि सत्ताधारी वठणीवर येत नाहीत म्हणून लेखणीला तलवार बनविणे आणि लोकहिताला बाधा आणणारे जे जे आहे, त्यावर तलवार चालविणे, हे पत्रकाराचे चौथे आणि सर्वांत महत्त्वाचे कर्तव्य आहे. अशा प्रकारे नीळकंठ खाडिलकरांनी मराठी वृत्तपत्रांच्या परंपरेला २० व्या शतकापर्यंत जागृत ठेवले.

अन्यायाविरुद्ध काम करताना कोणत्याही हितसंबंधांना बळी न पडता वेळप्रसंगी सत्तारूढ पक्षाच्या विरोधात जाऊन आपल्या लेखणीद्वारे व गरज पडल्यास त्यांच्या आंदोलनात सहभागी होऊन काम करण्याची ताकद, धैर्य ज्या संपादकात होते ते म्हणजे नीळकंठ खाडिलकर. गिरणी कामगारांसाठी त्यांनी केलेले काम सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखे आहे. उत्तुंग बुद्धिमत्तेच्या जोरावर अर्थशास्त्र, विज्ञान, समाजशास्त्र, राज्यशास्त्र आदी विषयांतील ज्ञानामुळे व सखोल अभ्यासपूर्ण लेखणीद्वारे विसाव्या शतकातील मराठी पत्रकारितेत त्यांचे योगदान वाखाणण्यासारखे आहे.

२७ वर्षें पत्रकारितेनंतर म्हणजेच मार्च १९९७ मध्ये त्यांनी 'नवाकाळ'ची सूत्रे आपली द्वितीय कन्या सौ. जयश्री खाडिलकर–पांडे यांच्या हाती सुपूर्द केली. त्यांचे दुसरे वृत्तपत्र 'संध्याकाळ'ची जबाबदारी तृतीय कन्या सौ. रोहिणी खाडिलकर यांच्या हाती सोपविली. त्यांची ज्येष्ठ कन्या वासंती खाडिलकर यांच्याकडे 'नवाकाळ'च्या व्यवस्थापनाची जबाबदारी देण्यात आली तसेच 'नवाकाळ'च्या आर्थिक व्यवहाराची जबाबदारी त्यांच्या पत्नी सौ. मंदाकिनी खाडिलकर यांच्या हातात देण्यात आली.

'अग्रलेखांचा बादशाह' ही वाचकवर्गाची प्रतिक्रिया म्हणूनच वाचकवर्गाने दिलेली पदवी मुंबई आणि उपनगरात 'नवाकाळ'चा खप आणि लोकप्रियता वाढ्वणारे झणझणीत लेखणीच्या जोरावर दमदार, कडक आणि जनसामान्यांच्या प्रश्नावर जळजळीत परखडपणे मत व्यक्त करत सत्तारूढ व प्रशासकीय व्यवस्थेला सळो की पळो करून सोडणाऱ्या नीळकंठ खाडिलकरांना लोकमानसाकडून 'अग्रलेखांचा बादशाह' म्हणून संबोधण्यात येते.

स्वतः बुद्धिबळात प्रावीण्य मिळवणारे नीळकंठ खाडिलकरांनी आपल्या तीनही लेकींना त्यात पारंगत केले. त्या त्यांच्या तीनही कन्यांनी भारतीय बुद्धिबळसृष्टीत इतिहास घडविला. सातव्या वर्षापासून बुद्धिबळाच्या पटलावर रमलेल्या जयश्री खाडिलकर–पांडे यांनी वयाच्या १३ व्या वर्षी १९७५ मध्ये भारताची नॅशनल बुद्धिबळ चॅम्पियन होण्याचा मान मिळवला. भारताची पहिली वुमन इंटरनॅशनल मास्टर, पहिली ब्रिटिश कॉमनवेल्थ (महिला) चॅम्पियन ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय संघातून पाच वेळा प्रतिनिधीत्व केले. तसेच 'नवाकाळ'च्या संपादिका आणि जागतिक दर्जाच्या बुद्धिबळपटू म्हणून त्यांची स्वतःची एक स्वतंत्र ओळख आहे.

एक महिला संपादक म्हणून एक स्वाभिमानी, कर्तृत्ववान महिला व कामगार संघटनेतील कार्यामुळे त्यांची प्रतिमा एकविसाव्या शतकात मराठी वृत्तपत्र व्यवसायाला नवी दिशा देणारी आहे. 'नवाकाळ'चे संपादकपद नीळकंठ खाडिलकरांच्या हातून जयश्री खाडिलकर यांच्या हाती आल्यानंतर त्याच जोशाने, त्याच तत्परतेने व त्याच शैलीत त्यांनी 'नवाकाळ'चे कार्य व नीतीमूल्य तसेच उद्देशाला जराही धक्का न लावता आजही ती जपली आहेत. म्हणूनच गिरणी कामगारांच्या प्रश्नाबाबत त्यांची भूमिका अग्रेसर अशी होती, ही त्यांची साक्ष आहे. भांडवलदारी वृत्तपत्रांच्या गर्दीत व आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेट, मोबाइल, सोशल मीडियाच्या स्पर्धेत स्वतंत्र मराठी बाण्याचे वृत्तपत्र यशस्वीरीत्या चालवत आहेत.

## प्रकरण पहिले

# प्रस्तावना व वृत्तपत्रांचा उदय

१.१ प्रस्तावना

१.२ संशोधन विषयाचे महत्व

१.३ संशोधन विषयाचा कालखंड

१.४ संशोधनाची उद्दिष्टे

१.५ संशोधनाची गृहितके

१.६ संशोधनाची व्याप्ती

१.७ संशोधनाच्या मर्यादा

१.८ सहाय्यभूत माहिती संकलन

१.९ संशोधन तंत्र

१.१० संशोधन पद्धती

१.११ शोधप्रबंधाचा आकृतीबंध

१.१२ वृत्तपत्राचा उदय

१.१३ हिंदुस्थानात वृत्तपत्रांचा उदय

१.१४ मुंबईमधील वृत्तपत्रे

१.१५ शासन संस्था आणि वृत्तपत्रे

१.१६ मराठी वृत्तपत्रांचा उदय

१.१७ मुंबई–पुणे–ठाणे येथील वृत्तपत्रे

१.१८ बहुजन समाजाचे वृत्तपत्र

१.१९ शासन आणि वृत्तपत्रे

१.२० राजकीय पत्रकारितेचे युग

१.२१ सारांश

## प्रकरण पहिले

# प्रस्तावना व वृत्तपत्रांचा उदय

### १.१ प्रस्तावना :–

आधुनिक सामाजिक जीवनाचे प्रभावी अंग म्हणून वृत्तपत्रांना महत्त्व प्राप्त झाले आहे. वृत्त म्हणजे वार्ता किंवा बातमी तिचा प्रसार करण्याचे हे प्रभावी साधन आहे. भारतीय राज्यव्यवस्थेत सार्वजनिक जीवनात वृत्तपत्रांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. वृत्तपत्रे लोकशाहीत समाजाचे परिवर्तन आणि लोकमताची जडणघडण करतात.

वृत्तपत्र हे समाजाचा आरसा असतो. प्रचलित समाजजीवन त्यातील धार्मिकता, शिक्षण, अर्थ, राजकारण या विषयांच्या संदर्भात उपयुक्त, बोधप्रद आणि विचारप्रवर्तक लेखन प्रकाशित करून सामाजिक प्रबोधन करणे, ज्ञानाचा प्रचार–प्रसार करणे व त्याद्वारे देशहिताचे विचार जागृत करणे ही वृत्तपत्राची महत्त्वाची कामगिरी आहे. वृत्तपत्रांच्या या कार्यापुढे स्वतंत्र भारतातील समाजव्यवस्था दृढ व बळकट करून खेडोपाडी व उच्चस्तरीय भागातील लोकांना जागृत व कार्यरत ठेवले आहे.

दैनंदिन व्यवहारातील घटना दररोज बातम्यांच्या स्वरूपात प्रसिद्ध करणाऱ्या पत्राला 'वर्तमानपत्र' किंवा 'बातमीपत्र' असे संबोधण्यात येते. या सर्व पत्र प्रकारांना उद्देशून 'दैनिक' हा शब्दप्रयोग रूढ झालेला आहे. सामाजिक जडणघडणीमध्ये वृत्तपत्राची कामगिरी अधिक महत्त्वपूर्ण आहे. वृत्तपत्र हे समाजाचे दर्शन असते. समाजातील आंतरक्रियांचे यथार्थ प्रतिबिंब वृत्तपत्रामध्ये उमटते. भारतात झालेल्या विविध सुधारणा, स्वातंत्र्याचा लढा, भारताची नवीन रचना या कार्यकाळात वृत्तपत्रांनी केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे. भारतीय लोकशाही मजबूत करण्यासाठी आवश्यक त्या व्यवस्थापन मंडळावर प्रभुत्व प्राप्त करून भारतीय वृत्तपत्रांनी आपला वेगळा ठसा उमटविला. समाजात नावाजलेल्या तत्कालीन समाजातील एखाद् दुसऱ्या वृत्तपत्राचा, त्याच्या कार्याचा अभ्यास केल्यास त्या–त्या समाजातील सर्व स्तरातील घटना, ज्ञान प्राप्त होते. जीवन जगताना योग्य वळणाने जाण्याचा मार्ग सुचविते; किंबहुना समाजाला मार्गदर्शन करून दिशा देण्याचे काम वृत्तपत्रे करत असते.

वृत्तपत्रे ही मोठी सामाजिक शक्ती आहे. जनहित आणि जनतेचे स्वातंत्र्य यांची जणू ती रखवालदारच असतात. विविध क्षेत्रात घडलेल्या घटनांची नोंद असते. लोकमताचे नेतृत्व करणे, प्रबोधन करणे, शासन व्यवस्थेवर अंकुश ठेवणे अशा विविध उद्दिष्टांसाठी कार्यरत असणारी ही वृत्तपत्र संस्था असते. अशा विविध उद्देशाने स्थापन झालेले मुंबईमधील 'नवाकाळ' नामक वृत्तपत्र आहे. त्याचा प्रस्तावनेमध्ये स्वातंत्र्ययोद्धा कृष्णाजी ऊर्फ काकासाहेब खाडिलकरांचे कार्य अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. याद्वारे सदर प्रमुख व्यक्तीने परकीय ब्रिटिश सरकारच्या राजवटीत त्यांचा राजकारणातील हस्तक्षेप, समाजाच्या कुचंबणा, अप्रगत हिंदुस्थान यांना योग्य तो न्याय मिळवण्यासाठी या वृत्तपत्रातून प्रवेश केला. सर्व स्तरातील जनतेचे प्रश्न मांडले व सोडविण्याचा प्रयत्न केला. पत्रकारिता करत असताना कोणत्या व कशाद्वारे आपले निश्चित धोरण पार पाडताना संपादक म्हणून त्यांनी केलेले कार्य तपासून पाहणे महत्त्वाचे ठरले आहे.

विसाव्या शतकातील मुंबईतील मराठी वृत्तपत्रांमध्ये एकमेव नावाजलेले असे हे 'नवाकाळ' वृत्तपत्र. या वृत्तपत्राने सामान्यांच्या समस्या, शंकानिरसन करण्याची कामगिरी उत्तम रीतीने पार पाडले आहे. भारताचा स्वातंत्र्यप्राप्तीचा लढा, मुंबईसह महाराष्ट्र चळवळ, गोवा स्वातंत्र्यलढा, मिल कामगारांचे प्रश्न, मुंबईतील गुंडांचे टोळीयुद्ध, १९९० च्या दशकात झालेले बॉम्बस्फोट तसेच जातीय दंगली आदी बाबींवर प्रकाश टाकला. संस्थापक काकासाहेब खाडिलकर हे धडाडीचे पत्रकार, संपादक होते. सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग होता. सर्वसामान्यांच्या प्रश्नांना भिडणारे बातमीपत्र म्हणून हे वृत्तपत्र नावारूपास आले. नव्या पिढीला, वृत्तपत्र व्यावसायिकांना, राजकीय पक्षनेतृत्वाला, सामाजिक कार्यकर्त्यांना दिशादर्शक ठरणारे असे 'नवाकाळ' वृत्तपत्र आहे. सदर वृत्तपत्राचे कार्य मोठ्या प्रमाणात नावाजले गेल्यामुळेच 'नवाकाळ' या वृत्तपत्राचा आढावा घेण्यासाठी हा अभ्यास केला जाणार आहे.

## १.२ संशोधन विषयाचे महत्व :–

आधुनिक सामाजिक जीवनाचे एक प्रभावी अंग म्हणून दैनिक वर्तमानपत्रांना योग्य असे निर्णयाचे भान आहे. वृत्तपत्र हे रोजच्या बातम्या, लोकमत घडवणे, प्रबोधन करणे व समाजाचे नेतृत्व करणे, समाज प्रबोधन करणे व शासन व्यवस्थेवर अंकुश ठेवणे, अशा विविध प्रकारच्या

भूमिका सांभाळत असते. पूर्वीपासून चालविण्यात येत असलेली रोजची वृत्तपत्रे मोजकीच मुंबईत दिसतात. त्यामध्ये विशेष करून 'नवाकाळ' वृत्तपत्राचे नाव अग्रक्रमाने घेण्यात येते. हे वृत्तपत्र दिनांक ७ मार्च १९२३ रोजी काकासाहेब खाडिलकर यांनी सुरू केले. त्यांना स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व करण्यासाठी असे दैनिक आवश्यक होते.

जाती–धर्माच्या भेदातून हिंदू–मुस्लिम बांधवात दंगे झाले. या दंग्यावरील लेखामुळे सदर पत्रास दंडात्मक कार्यवाहीचा खटला भरला गेला. १९२९ मध्ये ब्रिटिश सरकारने त्याच्या विरोधी लेखावरून न्यायालयीन खटला भरला. त्यावरून काकासाहेबांना एक वर्षाची सजाही झाली. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी त्यांनी अशा प्रकारचे ब्रिटिशविरोधी सदर पत्राद्वारे लेखन केले.

खाडिलकर हे टिळक परंपरेतील एक श्रेष्ठ पत्रकार. वैयक्तिक कुचाळकी आणि द्वेष यांनी त्यांची लेखणी कधीच विटाळली नाही. खाडिलकरांचे 'केसरी'तील परराष्ट्रविषयक आणि युद्धविषयक लिखाण फारच गाजले. अशा तऱ्हेचे लिखाण मराठी वृत्तपत्रात फारच कमी पाहण्यास मिळते. पारतंत्र्यात सुरू झालेले हे वृत्तपत्र आता शतकपूर्तीकडे वाटचाल करत आहे. 'जनता हे वृत्तपत्राचे दैवत' असे खाडिलकर मानत होते. 'नवाकाळ'मधील सर्व लेख जनतेचे प्रबोधन करीत असत. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी जनजागृती करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या वृत्तपत्राने केले. काँग्रेसच्या धोरणांबद्दलची मते 'नवाकाळ' मधून मांडण्यात आली. महात्मा गांधी यांची असहकार चळवळ व त्याच्या कार्यक्रमाचा पुरस्कार केला, खादीची चळवळ तसेच दारूबंदीविरुद्ध प्रचार केला. भारत स्वतंत्र झाला; परंतु देशासमोर अनेक प्रश्न आ वासून उभे होते. त्या प्रश्नांचे निराकरण करावयाचे होते. महाराष्ट्र हा मुंबईसह निर्माण करणे तसेच पोर्तुगीजांच्या ताब्यातून गोवा मुक्त करणे यासाठी कार्य केले. तसेच गिरणी कामगार संप व गिरणी कामगारांचे प्रश्न यावर अग्रलेखाद्वारे वाचा फोडून त्यांना न्याय मिळवून देण्याचे कार्य केले. मुंबईतील गँगवॉरची माहिती 'नवाकाळ' वृत्तपत्रातून समाजासमोर आली. 'नवाकाळ'ने मुंबईमध्ये अनेक ठिकाणच्या घडामोडींमध्ये सहभागी होऊन त्या त्या विभागाला विकासात्मक वळण देण्यासाठी कार्य केले. येथील मराठी जनतेचा विकास, त्यांच्या वाटचालीमध्ये 'नवाकाळ'चे स्थान मोलाचे आहे. याचा परिचय जनतेला व्हावा. या हेतूने या विषयाची निवड केली आहे.

## १.३ संशोधन विषयाचा कालखंड :–

सदर शोधप्रबंधाच्या शीर्षकातच त्याच्या कालावधीचा उल्लेख होतो. त्यासाठी १९२३ पासून २000 अशा या कालखंडाची मांडणी प्रस्तुत संशोधनासाठी केलेली आहे.

म्हणजे १९२३ ते २000 (विसाव्या शतकाचा शेवट) अशा या कालखंडाची मांडणी प्रस्तुत शोधप्रबंधासाठी केलेली आहे.

## १.४ संशोधनाची उद्दिष्टे :–

१) मराठी वृत्तपत्रांच्या उदय व विकासाच्या पार्श्वभूमीचा आढावा घेणे.

२) 'नवाकाळ' या वृत्तपत्राच्या इतिहासकालीन अर्थात प्रारंभी, पूर्वीची रूपरेषा मांडणे.

३) स्थापन काळ, 'नवाकाळ'समोरील ध्येयेधोरणानुसार उद्दिष्टांची पूर्तता करणे.

४) वृत्तपत्र चालविण्याचे धाडस करणाऱ्या प्रमुख थोर व्यक्ती कृष्णाजी खाडिलकर यांच्या पत्रकारितेचा व कार्याचा आढावा घेणे.

५) हे वर्तमानपत्र चालविणाऱ्या पुढील संपादक वर्गाच्या कामगिरीचा आढावा घेणे.

६) संपूर्ण विसावे शतकातील पारतंत्र व स्वातंत्र्य या काळामधील उल्लेखनीय असे कार्य सादर करणे.

७) मुंबई व संपूर्ण महाराष्ट्र राज्य, त्यामध्ये प्रगतीपथाकडे वाटचाल करीत असलेल्या समाजासाठी या वृत्तपत्राचे योगदान अभ्यासणे.

## १.५ संशोधनाची गृहितके :–

प्रा. गुड व हॅट यांनी म्हटले आहे की, गृहीत कृत्य म्हणजे असे अनुमान की, जे तंत्र निरीक्षणातून पुढील नवनवीन होत जाणारे संशोधन असते. त्यास योग्य असा मार्ग दाखविते.

१) 'नवाकाळ' या वृत्तपत्राने व्यक्तीशी संबंध येणाऱ्या घटकांना निश्चित स्वरूप दिले आहे.

२) सामान्य जनता, कामगार वर्ग वृत्तपत्राचे केंद्रबिंदू होती.

३) संस्थापकांचे दायित्व आणि संपादक नात्याने काकासाहेब खाडिलकरांचे धोरण हे एकनिष्ठ व सत्यवादी असून त्यांचे वृत्तपत्रातील अग्रलेखामधील लिखाण विचारपूर्वक व सिद्ध केलेल्या

विशिष्ट बैठकीचे होते.

४) 'नवाकाळ' दैनिकाने स्वातंत्र्यचळवळीत ब्रिटिश प्रशासनाच्या विरोधात प्रचार करून प्रबोधनाचे फार मोठे कार्य केले आहे.

५) लोकमान्य टिळकांची विचारसरणी व महात्मा गांधींच्या असहकार चळवळीचा प्रचार केला.

६) आज आधुनिक युगात जनतेचा आवाज सरकारदरबारी पोहोचवून त्यांना त्यांचा हक्क प्राप्त करून दिला.

७) 'नवाकाळ' वृत्तपत्राने मुंबईतील कापड गिरणीमधील मिल कामगारांच्या समस्या सोडविल्या.

८) 'नवाकाळ' हे केवळ वृत्तपत्र म्हणून नव्हे तर प्रबोधनाचे व लोकशिक्षणाचे एक साधन आहे.

## १.६ संशोधनाची व्याप्ती :-

संशोधनाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने संशोधकाने अभ्यासासाठी केवळ महाराष्ट्र-मुंबईमधील 'नवाकाळ' हे वृत्तपत्र निवडले. तसेच सन १९२३ पासून २००० पर्यंतच्या कालावधीमध्ये घडणाऱ्या सामाजिक बदलांचा, आर्थिक जीवनमानाचा तसेच राजकीय कार्य यावर लक्ष केंद्रित केले असून तो या प्रस्तुत शोधप्रबंधाचा विषय आहे. तसेच वृत्तपत्र मालक, चालक यांच्या जीवनकार्याचा व इतर वृत्तपत्राशी संबंध येणाऱ्या व्यक्तींचा आढावा घेण्यात येणार आहे.

## १.७ संशोधनाच्या मर्यादा :-

महाराष्ट्र राज्यात विविध प्रकारची वृत्तपत्रे होऊन गेली; परंतु या सर्व वृत्तपत्रांचा इतिहास पाहता ब्रिटिशकालीन केलेले हे वर्तमानपत्र आजही आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात न डगमगता ताठ मानेने सुरू आहे. 'नवाकाळ'ची ही सर्वांगीण गुणवैशिष्ट्ये संशोधनाच्या दृष्टीने विचार करता निवड करण्यात आलेली आहेत. वर्तमानपत्राच्या प्रारंभापासून ते विसाव्या शतकातील डिसेंबर २००० पर्यंतचा या प्रबंधात विचार केला जाणार आहे. या संशोधनासाठी 'नवाकाळ' वृत्तपत्राचे सुरुवातीपासूनचे अंक साधन म्हणून वापरलेले आहेत. तसेच संबंधित संदर्भ ग्रंथाचा समावेश केला आहे.

## १.८ साहाय्यभूत माहिती संकलन :–

ऐतिहासिक, भौगोलिक माहिती ‘नवाकाळ’ वृत्तपत्राच्या मूळ फाईल्स , संदर्भग्रंथ, इंटरनेट (वेबसाईट्स) इत्यादी.

## १.९ संशोधन तंत्र :–

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करत असताना संशोधनाच्या काही तंत्राचा वापर करण्यात आलेला आहे. यासाठी मूळ विषयाच्या संदर्भासाठी प्राथमिक व दुय्यम साधने, असे विभाजन करून निवडक साहित्याद्वारे सदर प्रबंधाचे विश्लेषण केले आहे. निवडलेल्या साधनांच्या आधारे घटनांची सत्यता तपासण्यात आलेली आहे. प्रस्तुत साधनांच्या आधारे तळटीपा दिलेल्या आहेत. संदर्भग्रंथ, यादी, निवडक छायाचित्रे व योग्य परिशिष्टे दिलेली आहेत.

## १.१० संशोधन पद्धती :–

या शोधप्रबंधाचा इतिहास वर्गात समावेश होत असल्याने त्यास आवश्यक ऐतिहासिक संशोधनाची पद्धतीचा अवलंब केलेला आहे. तसेच संशोधनासाठी उपलब्ध असणाऱ्या संकलित माहितीचे वस्तुनिष्ठ मांडणीतून तसेच मूल्यमापनाने व विश्लेषण करण्याकरिता सदर संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे.

संशोधनासाठी योग्य त्या घटना–बाबींचा समावेश करून वृत्तपत्राचे त्यातील प्रकारानुसार वर्गीकरण, विश्लेषणात्मक मांडणी करण्याचा प्रयत्न केला. वेगवेगळ्या संदर्भग्रंथांचा आधार घेतला गेला आहे. तसेच वर्तमानपत्राचे मूळ अंक व नवाकाळ’च्या संपादकांचे स्वतःचे ग्रंथसाहित्य हेही या संशोधनाच्या शोधप्रबंधात समाविष्ट केले आहे. त्यामधून ‘नवाकाळ’ वृत्तपत्राच्या कार्याचा आढावा घेतला जाणार आहे.

## १.११ शोधप्रबंधाचा आकृतीबंध :–

या ठिकाणी सदर प्रबंधात सहा प्रकरणानुसार मांडणी पुढीलप्रमाणे केलेली आहे व शेवटी संदर्भ ग्रंथसूची व परिशिष्ट आहे.

## प्रकरण विभागणी

| क्रमांक | प्रकरणाचे नाव |
|---|---|
| १. | प्रस्तावना व वृत्तपत्रांचा उदय |
| २. | 'नवाकाळ' वृत्तपत्राची स्थापना, ध्येय, धोरण व उद्दिष्टे |
| ३. | 'नवाकाळ' वृत्तपत्राचे सामाजिक कार्य |
| ४. | 'नवाकाळ' वृत्तपत्राचे आर्थिक कार्य |
| ५. | 'नवाकाळ' वृत्तपत्राचे राजकीय कार्य |
| ६. | उपसंहार |

'नवाकाळ' वृत्तपत्रावर आधारित संपूर्ण संशोधनातून तयार केलेला शोधप्रबंध हा सहा प्रकरणात विभागलेला आहे.

### प्रकरण पहिले

### प्रस्तावना व वृत्तपत्रांचा उदय

या प्रकरणात सुरुवातीला प्रस्तावनेचा समावेश असून त्यात प्रबंधाचे शीर्षक, कार्याचा कालावधी विषयानुरूप महत्त्व, सांगितलेली उद्दिष्टे, गृहीत धरण्यात आलेली गृहितके, संशोधनाची व्यापकता, आवश्यक ती सहाय्यक संकलित माहिती, तंत्र, संशोधन पद्धती, शोधप्रबंधाचा आकृतिबंध, आदी मुद्द्यांवर विस्तृत मांडणी केलेली आहे. शेवटी संशोधनातील निष्कर्ष दिलेले आहेत. भारतात मुद्रणकलेच्या प्रारंभीचा काळ, कलकत्ता येथे वृत्तपत्राचा उदय, मुंबईमधील वृत्तपत्रे, तसेच सरकारी संस्था व वृत्तपत्र अशा स्वरूपात हिंदुस्तानात वृत्तपत्र उदयास आल्याचा कालावधी व विविध प्रांतातील होत गेलेली वृत्तपत्रांची प्रगती, याचा आढावा मांडला आहे. तसेच महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रांचा लोकांसाठी उपयोग, बहुजन समाजाचे वृत्तपत्र, वृत्तपत्रांवर बंदी आणणारा १८६७ मधील इग्रजांचा 'व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट' व राजकीय पत्रकारितेचे युग, त्यावेळी उदयास आलेली वृत्तपत्रे आदी बाबींची चर्चा या प्रकरणात केली आहे.

## प्रकरण दुसरे

## ‘नवाकाळ’ वृत्तपत्राची स्थापना, ध्येय,धोरण व उद्दिष्टे

या प्रकरणात ‘नवाकाळ’ वृत्तपत्राच्या स्थापनेबाबतचा वृत्तांत, तत्पूर्वी ‘नवाकाळ’ वृत्तपत्राचे संस्थापक – संपादक काकासाहेब खाडिलकरांच्या वृत्तपत्र पत्रकारितेला सुरुवात झाली. ‘केसरी’तून त्यांचे संपादकीय कार्य, पुढे ‘लोकमान्य’ वृत्तपत्राचे नेतृत्व यावर चर्चा केलेली आहे. ‘लोकमान्य’ वृत्तपत्रातून बाहेर पडल्यावर खाडिलकर यांनी ’नवाकाळ’ सुरू करण्याची निश्चित योजना, त्याची सुरुवात, त्याचे शीर्षक, त्यासाठी लागणारे आर्थिक बळ, वृत्तपत्र स्थापनेवेळचा संपादक वर्ग, ‘नवाकाळ’चा पहिला अंक व पहिल्या अंकाचे स्वरूप, यावर भाष्य केले आहे. तसेच अंकातील अग्रलेखात ‘भगवद्‌गीतेतील वचन’ व त्याचा अर्थ स्पष्ट केला. ‘नवाकाळ’चा प्रथम प्रकाशित लेख हा स्वतःबद्दलच्या माहितीचा होता. यावरही चर्चा करण्यात आली आहे.

वृत्तपत्र म्हटले की, त्याची ध्येयधोरण, उद्दिष्टे आली. सदर प्रकरणात ‘नवाकाळ’ वृत्तपत्राची मिळालेल्या माहितीद्वारे त्याचा आढावा घेतला आहे. तसेच वृत्तपत्राचे सर्वसामान्य स्वरूप स्पष्ट करण्यात आले आहे. ‘नवाकाळ’ला स्थापनेपासून अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. त्यात मुख्यत्वे करून छपाईयंत्राची अडचण, त्यावर मात करीत काकासाहेबांनी स्वतःचा छापखाना काढण्याचा निर्णय घेतला. यावरही चर्चा केलेली आहे. तसेच त्याची अर्थविषयक परिस्थिती सर्वसाधारण होती. वेळोवेळी कर्ज घ्यावे लागत होते. तरीही ‘नवाकाळ’ची इतरांकडून कोणतीही मदत स्वीकारण्यास विरोधी भूमिका होती. याचाही आढावा घेतला आहे. ‘नवाकाळ’ जाहिरात संदर्भातील मते, त्याचा विक्रमी खप, पुढे त्यातून होत जाणारी प्रगती, अशा माहितीवर चर्चा करण्यात आलेली आहे. हे वृत्तपत्र भारतावर ज्यावेळी परकीय सत्तेचा अंमल होता त्यावेळेस उदयास आले. त्यामुळे साहजिक ब्रिटिशांची करडी नजर त्यांच्यावर होती. यामुळे ‘नवाकाळ’च्या संपादकांवर ब्रिटिशांनी खटले भरून त्यांना दंड व शिक्षासुद्धा झाली. वरील संकटांवर मात करीत स्वतःची जागा घेऊन तेथे वृत्तपत्रासाठी इमारत उभी केली, याचाही आढावा घेतला आहे.

सदर प्रकरणात ‘नवाकाळ’ वृत्तपत्र चालविणारे काकासाहेब यांच्या जीवनविषयक व संपादकीय कार्य यावर चर्चा केलेली आहे. खाडिलकर घराण्यात स्वकर्तृत्वाद्वारे एका पिढीकडून

दुसऱ्या पिढीकडे जाणारे संपादक पद. आज ते चौथ्या पिढीकडे असून यात कुठलाही खंड पडलेला नाही. त्या सर्वांच्या कार्याचा आढावा घेतला आहे.

## प्रकरण तिसरे

## 'नवाकाळ' वृत्तपत्राचे सामाजिक कार्य

यामध्ये समाजजीवनाविषयक चर्चा केली आहे. या सामाजिक कार्यात मुख्यत्वे सुरुवातीच्या काळात दारूबंदीविषयक विचार मांडले आहेत. तसेच प्राचीन वेदपुराणातील विचार, समाजजागृतीसाठी केलेली प्रवचने यावर चर्चा केलेली आहे.

नाटककार म्हणून कार्यरत असलेल्या काकासाहेब खाडिलकरांनी अनेक नाटके लिहिली. त्यांची उपयुक्त माहिती यात घेण्यात आली आहे. वर्तमानपत्राद्वारे यशस्वी कार्य करीत असताना नवनवीन येणारे कायदे, शासनाचे त्यासंबंधीची धोरणे, जाहिराती, पत्रकारिता : कालची व आजची, पत्रकारितेतील गोपनीयता राखणे आदीवृत्तपत्रविषयक प्रश्नांवर मते मांडली.

मुंबईतील गिरणी कामगारांसाठी वेळोवेळी मदत केली. त्यांचे प्रश्न सरकारपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. त्यांना आर्थिक मदत मिळावी यासाठी गिरणी कामगारांना निधी योजना सुरू केली. त्याचाही आढावा घेतला आहे.

'नवाकाळ' हे सामान्य जनतेसाठी असलेले वृत्तपत्र मुंबईतील घरे भाडेतत्त्वावर घेऊन राहणाऱ्यांच्या समस्या, जागेअभावी झोपडपट्टीची निर्मिती झाली. त्यातून जागेचे प्रश्न आले. त्यासाठी शासनास वेळोवेळी सल्ला दिल्याबाबतची चर्चा केली आहे.

व्यवहारिक समाजवादाची व्याख्या 'नवाकाळ'ने जनतेसमोर मांडली. त्यामध्ये प्रॅक्टिकल सोशॅलिझमची मुख्य रूपे, गिरणी कामगार फोरमसाठीचे प्रयत्न येथे नमूद केले आहेत.

मिल कामगारांची थकित देणी, भरपाई सरकारकडून त्यांना मिळवून दिली. यावर चर्चा केली आहे. तसेच मुंबईतील कामगार वर्गाला भेडसावणाऱ्या समस्येच्या निराकरणासाठी भव्य मोर्चा काढला. त्यात त्यांना यशही आले, याचा आढावा घेतला आहे.

'नवाकाळ'ने अनेक अडचणी, समस्यांवर मात करत आपल्या खपाची विक्री वाढवत नेली. त्यामुळे अनेक वेळा दैनिकाला गौरवण्यात आले. भांडवलदारांनी नवनवीन वृत्तपत्रे

काढली; परंतु या स्पर्धेत 'नवाकाळ'चा विक्रम कोणीही मोडू शकला नाही. १९९८ मध्ये भारत देशात 'नवाकाळ'ने प्रथम क्रमांकावर येण्याचा मान पटकाविला. यावरही प्रकाश टाकण्यात आला आहे.

## प्रकरण चौथे

## 'नवाकाळ' वृत्तपत्राचे आर्थिक कार्य

आर्थिक घडामोडीविषयक विवेचन करण्यात आले आहे. चलनविषयक विचार मांडत असताना भारतातील सुवर्णविनिमय पद्धती, परदेशी होणारी सोन्याची निर्यात, त्यातूनच कागदी नोटा व्यवहारात आणल्या गेल्या, रुपयाची होणारी मूल्यकपात यावर चर्चा केलेली आहे. तसेच देशात स्वातंत्र्यपूर्व काळातील बँका, त्यातून उद्योगासाठी मिळणारे वित्त, याचाही आढावा घेतला आहे.

ब्रिटिश शासनव्यवस्थेत आपली अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी अनेक घातक योजना तयार केल्या होत्या. त्यातील मिठावरील कर, हिंदुस्थानचे होणारे आर्थिक शोषण, शहरे आणि खेड्यांची स्थिती यावर भाष्य करण्यात आले. स्वातंत्र्योत्तर काळातील भारताची वाढती लोकसंख्या व तिचे दुष्परिणाम याचा आढावा घेतला आहे. भूमिहीनांचा प्रश्न सोडविण्यासाठी विनोबा भावे यांनी भूदान चळवळ सुरू केली. त्याविषयी या वृत्तपत्रातून आपली मते मांडण्यात आली आहेत.

भारतासमोर अनेक आर्थिक प्रश्न उभे राहिले. त्यात भारतीय जनतेस भेडसावणारी अन्नाची कमतरता. या अन्नटंचाईचे निराकरण करण्यासाठी अन्नविषयक धोरणे, धान्योत्पादन मार्गातील अडचणी, यावर चर्चा केलेली आहे.

ग्रामीण विकासात दर पाच वर्षांनी आखलेल्या योजनेत खेड्यापाड्यांना स्थान, याचा आढावा घेतला आहे. दुष्काळाबाबत चर्चा करताना त्यांच्या निराकरणासाठीचे कार्यक्रम कसे राबविता येतील याचा आढावा घेतला आहे.

१९८० नंतरच्या काळात भारतात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात बळावला होता. तो खाडिलकरांनी या वृत्तपत्राद्वारे चव्हाट्यावर आणला. त्यात मुख्यत्वे करून काळा पैसा, त्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. शेअरबाजारात करोडो रुपयांच्या भ्रष्टचार झाला. त्यातून गरिबांचीच आर्थिक लूट झाली, याची माहिती दिली.

मुंबईची अर्थव्यवस्था ही कापड गिरण्यांवरच अवलंबून होती; परंतु या गिरण्यांत काम करणाऱ्या कामगारांचे आर्थिक शोषण होत होते. कमी पगार, बदली कामगार नाही, ज्यादा कामाचे तास यावरून मुंबईत १९८२ साली ऐतिहासिक संप झाला. त्याची विस्तृत चर्चा केलेली आहे.

## प्रकरण पाचवे

## 'नवाकाळ' वृत्तपत्राचे राजकीय कार्य

राज्यातील, देशातील घडामोडींचा उल्लेख राजकीय प्रकरणात होतो. प्रथम ब्रिटिशांच्या राज्यात 'नवाकाळ'ने समाजप्रबोधनासाठी राजकीय हस्तक्षेपातून लेख लिहिल्याने त्यावर विरोधी कारवाई होऊन त्यांच्यावर खटले भरण्यात आले. प्रसंगी तुरुंगवासाची शिक्षाही झाली. नंतर स्वतंत्र भारतातसुद्धा शासनास सर्तक केल्याने न्यायालयीन सुनावणी झाल्या. त्याबाबत विस्तृत स्पष्टीकरण दिले आहे.

देश स्वातंत्र्यापूर्वी काही घटना नमूद करताना असहकार चळवळ, त्यातील स्वतंत्रतेसाठी 'राष्ट्रीय निशाण आंदोलन' काँग्रेसचा राजकारणातील मतभेद, परकीय वस्तू वापरण्यास विरोध, यावर चर्चा केलेली आहे. तसेच स्वातंत्र्याच्या मागणीचा शपथविधी, पूर्ण स्वराज्याचा ठराव, त्यासाठी मुंबई या ठिकाणी नियोजनपूर्ण कार्यक्रमाची आखणी याचा आढावा घेतला आहे. पुढे महात्मा गांधीजींची दांडी यात्रा, १९४२ ची 'चले जाव चळवळ', या चळवळीतील भीषण अत्याचार, १९४२ साली आंदोलनास आळा घालण्यासाठी वृत्तपत्रांवर निर्बंध घालून दडपशाही केली, यावर चर्चा केलेली आहे. १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. त्याबाबत स्वतंत्र भारताचा सूर्योदय, त्या दिवसाचे स्मरण राहण्यासाठी काकासाहेबांनी तरुणांसाठी विचार मांडले यावरही भाष्य केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अनेक वर्षांपासून धुमसत राहिलेली चळवळ म्हणजे संयुक्त महाराष्ट्र निर्माण करणे. त्याचे उग्र रूप, त्यासाठी झालेली आंदोलने, राज्य पुनर्रचना आयोग, सार्वत्रिक संप, मुंबई केंद्रशासित करण्याचा प्रयत्न, गुजरातची दंगल आणि महाराष्ट्रात मुंबई समाविष्ट होऊन नवे राज्य तयार झाले. तसेच गोवा स्वातंत्र्यसग्राम याचा आढावा घेतला आहे.

१९८० नंतरच्या काळात गँगवॉर सुरू होते. शहरात दहशतीचे वातावरण होते. जे.जे. हत्याकांड, गँगस्टरबद्दल पोलिसांचे धोरण, मुंबईत दहशतवाद्यांनी बॉम्बस्फोट घडवून आणले,

मुबंईतील जातीय दंगली, यावर भाष्य केलेले आहे. तसेच मुंबई महानगपालिकेत त्यावेळी नेमणुकीवर असलेले गो.रा. खैरनार यांच्या बांधकाम विभागात अवैध इमारती कोणालाही न घाबरता पडण्याच्या धोरणाचा आढावा घेतला आहे.

## प्रकरण सहावे

## उपसंहार

या प्रकरणामध्ये अगोदरच्या सर्व प्रकरणामध्ये लिहिलेल्या माहितीचा एकत्रितरीत्या सारांश मांडण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश राजवट त्याविरोधी भारतीयांनी दिलेले लढे, अशा विविध घटकांवर प्रकाश टाकणे, तसेच विविध प्रश्न, त्यावरील निराकरण, समाजातील चांगल्या व वाईट परिणामांचा लेखाजोखा या प्रकरणात घेतलेला आहे.

खाडिलकर कुटुंबातील व्यक्तींनी 'नवाकाळ' वृत्तपत्राची जबाबदारी अतिशय उत्कृष्पणे सांभाळली. त्याच्या माहितीचा गोषवारा सदर प्रकरणात दिलेला आहे. या शोधप्रबंधासाठी ऐतिहासिक पद्धतीद्वारे साध्या सोप्या भाषेतून मुद्देसूद मांडणी करून संशोधनकार्य पूर्ण केले आहे.

पुढील अभ्यासास दिशा मिळावी या हेतूने या प्रबंधातून काही निष्कर्ष निघाले त्याची क्रमानुसार मांडणी केली आहे.

## १.१२ वृत्तपत्रांचा उदय :–

हिंदुस्थानातील वृत्तपत्रांचा उदय १८ व्या शतकात झाला. त्याची सुरुवात मुद्रण कलेने झाली.

**हिंदुस्थानातील मुद्रणकला :–**

''हिंदुस्थानातील मुद्रणकलेचा इतिहास अवलोकन करता देशी भाषांचे टाईप (टंक) पाडून त्यात बायबल छापण्यासाठी हिंदुस्थानात प्रथम आलेल्या मिशनऱ्यांनी अथक प्रयत्न केले होते. हिंदुस्थानातील तत्कालीन राज्यकर्त्यांबरोबर युरोपियन लोकांच्या लढाया सुरू असता दुसऱ्या एका ठिकाणी मिशनरी मंडळींनी आपल्या धर्म प्रचारासाठी देशी भाषांचे अध्ययन एकनिष्ठपणे चालवले होते. हिंदुस्थानातील एतद्देशियांच्या मुलुखावर व त्यांच्या संस्कृतीवर आक्रमण करण्याचा दुहेरी पद्धतशीर प्रयत्न युरोपियन अधिकाऱ्यांनी आणि त्यांच्याशी सहकार्य

करणाऱ्या मिशनऱ्यांनी निरलसपणे चालवलेला होता. प्रारंभीच्या काळात खालील ठिकाणी छापखाने अस्तित्वात होते.

१) श्रीरामपूर (बंगाल) सुप्रसिद्ध डॉ. कॅरे यांनी १८ सप्टेंबर १७९८ रोजी मदनबटी (Madanbatty) कलकत्याजवळ छापखाना घातला. पुढे दोन वर्षांनी हा छापखाना श्रीरामपूरला हलविण्यात आला.

२) सुरत (मुंबई) १८१६ मध्ये छापखाना निघाला. १८२१ मध्ये न्यू टेस्टामेंट गुजराती लिपीत छापण्यात आला.

३) कोट्टयम (त्रावणकोर) येथे १८१६ मध्ये मुद्रणालयाची स्थापना झाली. नंतर मल्याळी भाषेचे टाईप तयार करण्यात आले व १८२४ मध्ये 'मुलांकरता गोष्टी' हे छोटे पुस्तक मल्याळी भाषेत प्रसिद्ध झाले.

४) बल्लारी (कर्नाटक) येथे १८२६ मध्ये छापखान्याची स्थापना झाली व ताबडतोब कानडी भाषेचे टाईप पाडण्यात आले. १८३० मध्ये न्यू टेस्टामेंट कानडी भाषेत निघाले.

५) बंगलोर (म्हैसूर) येथील छापखाण्यात १८४४ मध्ये हे "A Manual Kanarese and English Dictionary" पुस्तक छापण्यात आले.

६) अलाहाबाद (संयुक्त प्रांत) येथे १८४५ मध्ये एक मुद्रणालय स्थापन झाले व हिंदी टाईप पाडण्यात आला. [१]

हिंदुस्थानात मुद्रणकला ही मिशनरीनी धर्मप्रसारासाठी आणली. तसेच सुरुवातीस विविध ठिकाणी छापखानेही काढले.

## १.१३ हिंदुस्थानात वृत्तपत्रांचा उदय :–

प्लासीच्या लढाईनंतर 'ईस्ट इंडिया' कंपनीचा कारभार व वसाहती उत्तरोत्तर वाढत गेल्या. परवाना नसला तरी संपत्तीच्या लोभाने हिंदुस्थानात येणाऱ्या युरोपियनांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली. त्यामुळे पुढील काळात वसाहतीमध्ये एकसंधपणा राहिला नाही. कंपनीच्या हातात सत्ता असल्याने सत्तेत सहभागी होणारे व इतर, अशी वाटणी होऊन काहींच्या मनात असंतोष निर्माण झाला. अशा या कंपनी सत्ताधाऱ्यांविरुद्धची गाऱ्हाणी इतरत्र पोहोचविण्यासाठी वृत्तपत्रांसारखी साधने जवळ करण्यात आली.

''ब्रिटिश अधिकाऱ्यांमध्ये जिज्ञासू वृत्ती अधिक होती. त्याचबरोबर पत्रव्यवसायाची ओळख व महत्त्व पूर्वीपासून माहीत असल्याने भारतात वार्तापत्र सुरू करण्याचे इंग्रज अधिकाऱ्यांकडून प्रथम प्रयत्न झाले.''[२]

''भारतात वृत्तपत्र सुरू करण्याचा पहिला प्रयत्न कलकत्ता येथे सन १७७६ मध्ये कंपनीचा नोकर 'विल्यम्स बोल्टस' यांनी केला होता. मात्र कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा रोष ओढवल्याने त्यास हद्दपार करण्यात आले.''[३]

''भारतात ईस्ट इंडिया कंपनीची पावले राजकीय सत्ता स्थापन करण्याच्या दिशेने पडू लागल्यावर कंपनी सरकारचा कारभार भ्रष्ट व वाम मार्गाने वाटचाल करु लागला. याबाबत कंपनीच्या अधिकाऱ्यांना ताळ्यावर आणण्यासाठी व त्यांच्या कारभाराबाबत जाब विचारण्यासाठी २९ जानेवारी १७८० रोजी 'जेम्स ऑगस्टस हिकी' यांनी 'बेंगाल गॅझेट' (Bengal Gazette) किंवा कलकत्ता जनरल ॲड्व्हर्टायझर (Calcutta General Advertiser) या नावाने इंग्रजी साप्ताहिक सुरू केले. आपल्या वृत्तपत्राचे उद्दिष्ट कथन करताना त्यांनी म्हटले आहे. "A Weekly Political And Commercial Paper Open to all Parties but Influenced by none" [४]

हिकीचे वर्तमानपत्र फार काळ चालले नसले तरी भारतात मात्र पत्रकारितेची खरी सुरुवात होऊन, खऱ्या अर्थाने वृत्तपत्र वाटचालीला चालना मिळाली, हे नजरेआड करून चालणार नाही.

''या पत्रानंतर 'पीटर रीड' व 'बी मेन्सिक' या दोघांनी 'इंडिया गॅझेट' १७८० मधील नोव्हेंबर महिन्यात सुरू केले. नंतर पुढे फेब्रुवारी १७८४ ला 'कलकत्ता गॅझेट' शासनाच्या आश्रयाखाली सुरू झाले. हेच वृत्तपत्र पुढे सरकारी 'राजपत्र' (गॅझेट) म्हणून सुरू राहिले. 'बंगाल जर्नल' फेब्रुवारी १७८५ मध्ये निघाले. त्याच वर्षी एप्रिल महिन्यात 'ओरिएंटल मॅगझीन' किंवा 'कलकत्ता अम्युझमेंट' (The Oriental Magazine or Culcutta Amusement) नावाचे मासिक निघाले आणि पुढे १७८६ साली 'कलकत्ता क्रॉनिकल' निघाले.''[५]

१७८० नंतरच गॅझेटची सुरुवात झाली.

## १.१४ मुंबईमधील वृत्तपत्रे :–

''मुंबईचे पहिले वर्तमानपत्र १७८९ मध्ये 'बॉम्बे हेरॉल्ड' या नावाने प्रसिद्ध झाले. परंतु या पत्राची काही माहिती उपलब्ध नाही. हे पत्र 'बॉम्बे गॅझेट' या पत्रात समाविष्ट झाल्याचा उल्लेख आढळतो. हे 'बॉम्बे गॅझेट' पत्र मि.मॅक्लीन या गृहस्थाने सुरू केले होते. हे साप्ताहिक दर बुधवारी प्रसिद्ध होत असे. हे पत्र १७९०–१९१४ पर्यंत सुरू होते. नंतर दीड वर्षाने १७९२ मध्ये 'बॉम्बे कुरियर' पत्र सुरू झाले. ल्यूक अॅशबर्नर नावाच्या गृहस्थाने हे पत्र सुरू केले.''[६]

अठराव्या शतकात मुंबईमध्ये वर्तमानपत्रे सुरु झाली.

## १.१५ शासन संस्था आणि वृत्तपत्रे :–

''वृत्तपत्रांची सुरुवात झाल्यावर पहिल्या वीस वर्षांच्या काळात संपादक ब्रिटिशांच्या रोषाला बळी पडत असले तरी वृत्तपत्राच्या सर्वस्वी विरोधी धोरण होते, असे म्हणता येणार नाही. गव्हर्नर जनरल व त्याच्या कौन्सिलातील सभासद यांचा कल मायदेशातील ज्या पक्षाकडे असे त्याप्रमाणे त्यांचे वृत्तपत्रांबद्दल धोरण विरोधी वा अनुकूल असे. १७९८ साली लॉर्ड वेलस्ली हा गव्हर्नर जनरल म्हणून हिंदुस्थानात आला. त्याने १७९९ साली अनेक निर्बंध वृत्तपत्रांना लागू केले. दि १३ मे १७९९ रोजी कलकत्त्यात प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रांच्या मार्गदर्शनासाठी व त्यांच्या वागणुकीवर नियमन ठेवण्यासाठी खालील नियम प्रसिद्ध करण्यात आले.

१) वर्तमानपत्राच्या मुद्रकाने आपले नाव पत्रकाच्या शेवटी तळाशी छापावे.

२) सरकारी चिटणीसास पत्राच्या संपादकाने व मालकाने आपले नाव व पत्ता कळवावा.

३) रविवारी पत्र प्रसिद्ध करू नये.

४) सरकारी चिटणीस किंवा त्याने अधिकृत केलेल्या इसमाने तपासल्याशिवाय कोणतेही पत्र प्रसिद्ध करू नये.

५) वरील कोणत्याही नियमांच्या विरुद्ध वर्तन करणाऱ्यास युरोपमधून हद्दपार करण्यात येईल.

यातील चौथ्या नियमाप्रमाणे सेन्सारचे काम करणाऱ्या सरकारी चिटणीसाच्या मार्गदर्शनाखाली खालील नियम करण्यात आले :–

१) कंपनी (सरकार) ची सार्वजनिक पत, वसूल किंवा आर्थिक परिस्थिती याविषयी कोणताही मजकूर प्रसिद्ध करण्याला मनाई करावी.

२) सैन्याची हालचाल, स्टोअर्स किंवा धातू अगर कोणत्याही आरमारी किंवा लष्करी तयारी इत्यादीविषयी कोणताही मजकूर प्रसिद्ध करण्यास मनाई करावी.

३) कंपनीच्या किंवा खाजगी व्यक्तीच्या जहाजाच्या येण्या–जाण्याविषयी कोणतीही बातमी प्रसिद्ध करू नये.

४) सरकार किंवा मुलकी, लष्करी, नाविक, व्यापारी अगर न्यायखात्यातील कोणत्याही अधिकाऱ्यांच्या वागणुकीविषयी मजकूर प्रसिद्ध करण्यावर बंदी असावी.

५) एखाद्या व्यक्तीची कुचाळकी किंवा बेअब्रू करणारा मजकूर प्रसिद्ध होऊ नये.

६) देशी राज्य व कंपनी यामधील लढाई किंवा तह यांच्या शक्याशक्यतेविषयी मजकूर नसावा.

७) (कंपनीच्या) शत्रूला बातमी देणारा किंवा कंपनीच्या मुलखात भीतीदायक वातावरण व अशांतता निर्माण करणारा मजकूर असता कामा नये.

८) देशी राज्यात कंपनीची असणारी पत किंवा वजन यांना धक्का बसवणारा युरोपीय वर्तमानपत्रातील कोणताही मजकूर प्रसिद्ध होऊ न देणे.''७

सरकारी निर्बंधाचे पालन करून कलकत्त्यातील वृत्तपत्रे सुरु झाली होती. वृत्तपत्रविषयक निर्बंध लवकरच (इ.स. १८००) मुंबई व मद्रास प्रांतात लागू करण्यात आले.

''वेलस्लीने घातलेले वृत्तपत्रीय निर्बंध लॉर्ड मिंटोच्या कारकीर्दीतही (१८०५–१८१३) तसेच सुरू ठेवण्यात आले होते; परंतु १८१३ मध्ये लॉर्ड मिंटो जाऊन लॉर्ड हेस्टिंग्ज (१८१३–१८२३) याची गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक झाली. याचे धोरण बरेच उदारमतवादी होते. या धोरणांचा अवलंब त्याने ताबडतोब शिक्षणविषयक सुधारणा करण्यात केला. छापखाण्याविषयी त्याने नवीन नियम केले. हे नियम 'इंडिया गॅझेट', 'टेलिग्राफ','कलकत्ता गॅझेट', 'हरकारु', 'स्टार' आणि ' हिंदुस्थानी' इत्यादी पत्रांना कळविण्यात आले. हे नवीन नियम जारी करण्यात आले होते तरी पूर्वी घातलेले निर्बंधही कायम ठेवण्यात आले; परंतु पूर्वीचे निर्बंध वापरताना नवीन निर्बंधान्वये आवश्यक होईल तेवढ्या सुधारणा करण्याला मुभा ठेवलेली होती. नवीन नियम पुढीलप्रमाणे होते :–

१) सर्व वर्तमानपत्रे, त्यांच्या पुरवण्या व इतर प्रकाशने या सर्वांची प्रूफे छापण्यापूर्वी

तपासणीसाठी मुख्य चिटणीसाकडे पाठविण्यात यावी.

२) नवीन जाहीरपत्रके, जाहिराती व तत्सम अल्पकालीन उपयुक्ततेची पत्रकेही.

३) नवीन प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथाची नावे सरकारकडे कळवण्यात यावीत व मुख्य चिटणीस जरूर तर ग्रंथ तपासणीसाठी मागवून घेईल.''[८]

यानंतरच्या काळातही वर्तमानपत्रावरील निर्बंधाबाबत कंपनी सरकार व मिशनरी लोक यांचा झगडा सतत सुरू होता. शेवटी हेस्टिंग्जच्या कारकीर्दीतच सेन्सॉरशिप १८१८ मध्ये रद्द करण्यात आली. याचे बरेचसे श्रेय मिशनरी लोकांना दिले पाहिजे. सेन्सारशिप रद्द झाल्यावर नवीन नियम तयार केले गेले. हेस्टिंग्ज हा उदार असल्यामुळे या नवीन नियमामागील भूमिका उदारच राहिली.

''खालील गोष्टीविषयक मजकूर प्रसिद्ध करण्यास वर्तमानपत्राच्या संपादकांना बंदी करण्यात येत आहे–

१)डायरेक्टर बोर्डाचा (Court of Directors) ठराव किंवा हिंदुस्थान सरकारशी संबंधित असलेले इंग्लंडमधील अधिकारी यांचे कामकाज, याविषयी दोषारोप करणे किंवा स्थानिक सरकारी राज्यकारभाराची चर्चा, कौन्सिलच्या सभासदांच्या सामाजिक वर्तणुकीवर टीका, सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश व कलकत्याचा बिशप यांच्या सामाजिक वागणुकीवर टीका.

२) देशी लोकांच्या धार्मिक मताबद्दल किंवा धार्मिक आचाराबद्दल देशी लोकांच्या मनात भीती निर्माण करणारी चर्चा.

३) वरील गोष्टीविषयक किंवा हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्तेला किंवा कीर्तीला धक्का पोहोचवू शकणाऱ्या इंग्लिश किंवा इतर वृत्तपत्रांतील मजकुरांचे पुनर्मुद्रण.

४) समाजात दुही माजविणारी वैयक्तिक निंदा किंवा वैयक्तिक टीका.''[९]

''वॉरन हेस्टिंग्जची मुदत संपल्यावर त्याच्या जागी लॉर्ड कनिंगची नेमणूक झाली. पण ब्रिटिश मंत्रिमंडळात परराष्ट्रमंत्र्यांची जागा त्याने स्वीकारल्याने तो येऊ शकला नाही. म्हणून लॉर्ड अम्हर्स्टची गव्हर्नर जनरल (१८२३–१८२८) म्हणून नेमणूक झाली. पण तो हिंदुस्थानात येण्यास सात महिन्यांचा कालावधी लागल्याने त्या अवधीत मुख्य सचिव ॲडम यांच्या गव्हर्नर–जनरलपदाची सूत्रे राहिली. या तात्पुरत्या अधिकाराचा वापर करून ॲडमने वृत्तपत्रांवर निर्बंध

घातले. वृत्तपत्रांना कोणतेही स्वातंत्र्य देण्यास त्याचा सक्त विरोध होता. म्हणून सत्ता हाती आल्यावर तिचा फायदा घेऊन वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करणारा वटहुकूम त्याने ४ एप्रिल १८२३ रोजी काढला.

त्यातील मुद्दे पुढीलप्रमाणे होते :–

१) कोणतेही अनुमती पत्र न काढता कुणा मुद्रकाने किंवा प्रकाशकाने काही लेखन प्रसिद्ध केले तर त्याला दंड किंवा शिक्षा होईल.

२) अनुमती पत्र देण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलला राहील.''[१०]

१८२३ मध्ये तात्पुरत्या स्वरूपात गव्हर्नर जनरलपदाची सूत्रे हाती आलेल्या ॲडमने वृत्तपत्रांवर निर्बंध लादून त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा प्रयत्न केला.

''ॲडमने निर्बंध घातले त्याच्या आधीपासून व नंतरही वृत्तपत्र स्वातंत्र्यासाठी विशेष झगडा करणाऱ्या दोन संपादकांची नोंद घेणे जरूर आहे. हे दोन संपादक म्हणजे 'कलकत्ता जर्नल'चा संपादक जेम्स सिल्क बंकिंगहॅम (१७८६–१८५५) व आधुनिक भारताचा आद्य उद्गाता राजा राममोहन रॉय (१७७२–१८३३) हे होते. सिल्क बंकिंगहॅमप्रमाणेच राजा राममोहन रॉय या भारतीय प्रबोधनाच्या आद्य उद्गात्याने ज्या अनेक चळवळी केल्या, त्यात वृत्तपत्राच्या स्वातंत्र्याचाही पुरस्कार होता. वृत्तपत्रांवर निर्बंध घालणारे वटहुकूम रद्द करून घेण्यासाठी राजा राममोहन रॉय यांनी विशेष प्रयत्न केले. त्यासाठी देशी भाषेत म्हणजे विशेषतः बंगाली व फारसी भाषेत त्यांनी वृत्तपत्रे चालविली. ॲडम याने घातलेल्या निर्बंधांचा देशी भाषेतील वृत्तपत्रांवर होणारा परिणाम लक्षात घेऊन राजा राममोहन रॉय यांनी एक निवेदन तयार केले. सुप्रीम कोर्टाकडे केलेला त्यांचा हा अर्ज फेटाळला गेला. तरीही राजा राममोहन रॉय यांनी आपला प्रयत्न सोडला नाही. सरकारी निर्बंधाविरुद्ध थेट इंग्लंडात बादशहापर्यंत अर्ज पाठवून त्यांनी आपले गाऱ्हाणे पोहाचविले. राजा राममोहन रॉय यांनी आपल्या निवेदनात म्हटले होते की, हिंदी लोकांच्या उन्नतीला देशी वृत्तपत्रांचा फार उपयोग होत आहे; परंतु परवाना घेण्याचा निर्बंध घातल्याने देशी वृत्तपत्रांवर आपत्तीच ओढवली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे यामुळे ज्ञानप्रसाराला आळा बसेल. सरकारी कारभारातील दोष दाखविले जाणार नाहीत, जनतेला आपली गाऱ्हाणी मांडणे अशक्य होईल.''[११]

आधुनिक भारताचा उद्गाता राजा राममोहन रॉय यांनी वृत्तपत्रविषयक निर्बंध

काढण्यासाठी इंग्लंडमध्ये बादशहापर्यंत अर्ज केले. वृत्तपत्र हे लोकांची उन्नती करतात.

''ॲडमचे निर्बंध मुंबई इलाख्यातही लागू करण्याचा आदेश कोर्ट ऑफ डायरेक्टर्सकडून मुंबईच्या गव्हर्नरला देण्यात आला होता. पण मुंबईच्या सुप्रीम कोर्टाकडे १८२६ मध्ये संमतीसाठी ते सादर करण्यात आले. तेव्हाच्या शांततेच्या काळात अशा तऱ्हेच्या निर्बंधाची गरज नाही, असा निकाल न्यायाधीशांनी देऊन परवानगी नाकारली.''[१२]

''मेकॉलेने तयार केलेला कायद्याचा मसुदा तीन ऑगस्ट १८३५ रोजी कौन्सिलमध्ये संमत करण्यात आला. बंगालमध्ये ॲडमने घातलेले निर्बंध मुंबईत रद्द करण्यात आले. मुंबई इलाख्यात प्रचलित असलेले नियमही रद्द करण्यात आले. कंपनीच्या ताब्यातील मुलुखात कोठेही नियम नियतकालिकतून प्रसिद्ध करावयाचे झाल्यास मॅजिस्ट्रेटपुढे मुद्रक व प्रकाशक यांना डिक्लरेशन करणे आवश्यक करण्यात आले. मुद्रणस्थळ किंवा प्रकाशनस्थळात बदल झाल्यास पुन्हा डिक्लरेशन करण्याची कायद्यात तरतूद करण्यात आली. मुद्रक–प्रकाशक बदलल्यासही नवीन डिक्लरेशन करणे आवश्यक झाले. या नियमांच्या भंगाबद्दल जास्तीतजास्त ५००० रुपये दंडाची व दोन वर्षांपर्यंत कैदेची शिक्षा सांगण्यात आली. प्रत्येक नियतकालिकावर मुद्रकाचे व प्रकाशकाचे नाव छापण्याची सक्ती करण्यात आली. तसेच परवाना घेतल्याशिवाय छापखाना अगर वृत्तपत्र सुरू करण्यास मनाई करण्यात आली.''[१३]

१८३५ मध्ये ॲडमचे निर्बंध रद्द झाले. तसेच मुद्रक–प्रकाशकावर परवाना घेतल्याशिवाय वृत्तपत्र सुरू करण्याची मनाई केली गेली.

## १.१६ मराठी वृत्तपत्रांचा उदय :–

''इंग्रजी राजवटीमुळे नावीन्याचा शोध घेणे शक्य झाले होते. देशाच्या इतर भागाप्रमाणे महाराष्ट्रातही सांस्कृतिक प्रबोधनाची लाट निर्माण झाली. प्रबोधनाचे साधन म्हणून हळूहळू वृत्तपत्रे व नियतकालिके पुढे येऊ लागली. मराठी भाषेतील 'मुंबापूर' हे पहिले वृत्तपत्र होय. हे मराठी वृत्तपत्र २० जुलै १८२८ पासून सुरू झाल्याचे स्पष्ट होते; परंतु या वृत्तपत्राचा चालक व संपादक कोण? हे पत्र किती काळ चालले? याचा संदर्भ मिळत नाही. तसेच हे पत्र साप्ताहिक, पाक्षिक की मासिक होते, हेही स्पष्ट होत नाही.''[१४]

'मुंबापूर' हे वर्तमानपत्र मराठीतील पहिले वृत्तपत्र असले तरी 'दर्पण' या वृत्तपत्रापासून

मराठी वृत्तपत्रास एक निश्चित अशी दिशा प्राप्त झाली, असे म्हणता येईल.

'' 'दर्पण' या पत्राचा पहिला अंक शुक्रवार ६ जानेवारी १८३२ रोजी मुंबईतून बाळशास्त्री जांभेकर यांनी प्रसिद्ध केला. हा अंक सुरुवातीला इंग्रजी व मराठी या दोन भाषांत पाक्षिक रूपात प्रसिद्ध होत होता. पुढे ४ मे १८३२ पासून पाक्षिकाचे रूपांतर साप्ताहिकात झाले.''[१५]

''या वृत्तपत्राचे प्रयोजन बाळशास्त्री जांभेकरांनी १२ नोव्हेंबर १८३२ च्या अंकामध्ये स्पष्ट केले आहे. त्यामध्ये त्यांनी आपल्या वृत्तपत्राची उद्दिष्टे कथन केली आहेत. त्यानुसार नव्या ज्ञानाचा, पाश्चात्त्य विद्यांचा, कला व कौशल्य यांचा परिचय व्हावा, त्याद्वारे देशाची समृद्धी आणि लोकांचे कल्याण साधावे. शिवाय मनोरंजन करणे, चालू काळाचे वर्तमान कळविणे असे त्यांनी वृत्तपत्रांचे प्रयोजन असल्याचे म्हटले आहे. ''[१६]

थोडक्यात 'दर्पण' वृत्तपत्राचे प्रथम पाऊल हे अल्पकाळात लोकप्रियता मिळवून देणारे ठरले; परंतु हे वृत्तपत्र काही कारणास्तव सन १८४० मध्ये बंद करावे लागले.

''यानंतर 'मुंबई अखबार' हे मराठी वृत्तपत्र सूर्याजी कृष्णाजी यांनी ४ जुलै १८४० मध्ये सुरू केले. त्यांच्या या 'मुंबई अखबार' वृत्तपत्रांचा उल्लेख करावा लागेल. ''[१७]

'मुंबई अखबार' पत्र फार दिवस चाललेले दिसत नाही. ते लवकरच बंद झाले असावे. 'मुंबई अखबार'नंतर निघालेले 'प्रभाकर' वृत्तपत्र मात्र बरीच वर्षे (सुमारे वीस–एकवीस वर्षे) सुरू होते.

'' 'प्रभाकर' वृत्तपत्र 'दर्पण'चे संपादक बाळशास्त्री जांभेकर यांच्यापेक्षा वयाने कनिष्ट; परंतु शुद्धी चळवळी वगैरे सामाजिक आंदोलनांतील बाळशास्त्री जांभेकर यांचे सहकारी गोविंद विठ्ठल ऊर्फ भाऊ महाजन (कुंटे) यांनी २४ ऑक्टोबर १८४१ रोजी सुरू केले. सुप्रसिद्ध 'लोकहितवादी' (सरदार गोपाळराव हरी देशमुख) यांची 'शतपत्रे' प्रथम 'प्रभाकर'मध्येच प्रसिद्ध झाली. शतपत्रातील मार्मिक व मूलग्राही विवेचन आजही उद्‌बोधक वाटते. इंग्रजी राज्यपद्धतीवर टीका 'प्रभाकर'मध्येच प्रथम सुरू झाली. ''[१८]

'' 'ज्ञानोदय' वृत्तपत्र अहमदनगर येथील अमेरिकन मिशनरींनी सुरू केले. पहिला अंक जून १८४२ मध्ये निघाला. प्रथम मासिक. नंतर सन १८४५ पासून पाक्षिक स्वरूपात ते निघू लागले. सन १८७३ नंतर बारा पाने करण्यात येऊन हे पत्र साप्ताहिक स्वरूपात निघू

लागले. पहिले सहा अंक केवळ मराठीत निघाले. पुढे सन १८६६ पर्यंत इंग्रजी–मराठी लेख येत असत. सन १८६७–७२ पर्यंत शाहूराव कुकडे यांनी केवळ मराठीत 'ज्ञानोदय' काढला. 'ज्ञानोदय'चे पहिले संपादक रे. हेन्री बालंटाइन हे होते. मराठी संपादनाचे काम प्रथम शाहूराव कुकडे यांच्याकडे होते. त्यानंतर अनेक संपादक झाले. त्यात रे. तुकारामजी नाथोजी, श्री. आनंदाराव सांगळे, रे. ना. वा. टिळक, रे. दि. शं. सावरकर, श्री. दे. ना. टिळक यांची नावे प्रमुख आहेत. 'ज्ञानोदय'चा मुख्य उद्देश ख्रिस्ती धर्मप्रसार हाच होता. तरी इतर अनेक विषयांचा त्या अनुषंगाने अन्यही परामर्श घेतला जाई.''[१९]

'' 'ज्ञानप्रकाश' वृत्तपत्र १२ फेब्रुवारी १८४९ पासून सुरू झाले. 'ज्ञानप्रकाश' कृष्णाजी त्रिंबक रानडे यांनी सुरू केले व तेच त्याचे पहिले संपादक होते. 'ज्ञानप्रकाश' प्रथम साप्ताहिक होते. पुढे १८५३ पासून ते द्विसाप्ताहिक झाले. ''[२०]

''कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी 'विचारलहरी' नावाचे साप्ताहिक ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या वाढत्या चळवळीचा यथासांग प्रतिकार करण्यासाठी चालविले होते. 'विचारलहरी' पाक्षिक होते. याचा पहिला अंक शके १७७४ च्या ज्येष्ठ महिन्यात निघाला (जुलै १८५२).''[२१]

'विचारलहरी' वृत्तपत्राचा उद्देश ख्रिस्ती धर्म व विशेषतः त्या धर्माचे मुख्यपत्र 'ज्ञानोदय' यांच्याबरोबर सामना देणे हा होता.

दि. २० नोव्हेंबर १८५२ च्या अंकात जोतिबा फुले याविषयी पुढील मजकूर आढळतोः–

"The Board of education have presented Jotey Govinda Foollay with a showl, in consideration of the great interest he has taken in the establishment of native female schools in poona for the instruction of low caste children."[22]

''मिशनऱ्यांच्या चळवळीला सक्रीय विरोध करणारे विष्णूबुवा ब्रह्मचारी (यांचे मुळनाव विष्णू भिकाजी गोखले असे होते.) यांच्या अनुयायांनी 'वर्तमान दीपिका' नावाचे वृत्तपत्र चालविले होते. त्याचा पहिला अंक ८ एप्रिल १८५३ रोजी वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तावर निघाला.''[२३]

''ख्रिस्ती धर्मप्रसाराच्या लोंढ्याला आवर घालण्याकरिता मुंबईत निघालेले आणखी एक पत्र म्हणजे बापू सदाशिव शेटे यांचे 'सद्धर्मदीपिका' हे होय. हे पाक्षिक हिंदू धर्माचा पक्ष

उचलून धरून ''ख्रिस्ती–मत–तमाचा'' नाश करण्यासाठी जन्माला आले होते. या पत्राचा पहिला अंक श्रावण शुद्ध ११, गुरुवार शके १७७७ (१८५५) रोजी प्रसिद्ध झाला.''[२४]

''१८५४ साली 'हिंदूहितेच्छु' नावाचे वृत्तपत्र सुरू झाले. ''[२५]

''१८५६ साली मुंबईत 'तमांतक' नावाचे वृत्तपत्र सुरू झाले. ''[२६]

## १.१७ मुंबई–पुणे–ठाणे येथील वृत्तपत्रे :–

**इंदुप्रकाश –** ''मुंबईतील सुशिक्षितता जागृत झालेल्या सुधारणा प्रवृत्तीचा अविष्कार करण्यासाठी वृत्तपत्राची आवश्यकता भासू लागल्यामुळे 'इंदुप्रकाश' वृत्तपत्र निघाले. २ जानेवारी १८६२ रोजी या साप्ताहिक पत्राचा पहिला अंक प्रकाशित झाला. 'इंदुप्रकाश' सन १८६२ पासून १९२४ पर्यंत सुरू होते. मध्यंतरी सन १९०२ पासून 'इंदुप्रकाश' दैनिक स्वरूपात येऊ लागला. 'इंदुप्रकाश'मधील मजकूर इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषांत असे. त्यावेळच्या बहुतेक मराठी वृत्तपत्रांचे स्वरूप असेच गंगाजमनी असे. पहिल्या पृष्ठावरील 'इंदुप्रकाश' या मराठी नावाखाली "The Indu prakash or Moonlight, A weekly Journal of Literature Politics, Commerce and News" असे इंग्रजीत छापलेले असे. ब्रीदवाक्य म्हणून एक 'गीति' दिलेले आढळते. ते असेः

**।। गीति ।। चंद्रप्रकाश जैसा तैसा इंदुप्रकाश तोष करी ।**

**प्रति सोमदिनी सायंकाळी हत्ताप पाहताचि हरी ।।१।।**''[२७]

''विष्णुशास्त्री पंडित हे त्याचे संपादक होते. न्या. रानडेही त्यामध्ये लेख लिहीत असत. 'इंदुप्रकाश' पत्र गाजले ते त्याने हिरीरीने केलेल्या विधवा विवाहाच्या पुरस्कारामुळे. तसेच १८९४ च्या ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात पुणे शहरात नागोबा व गणपतीच्या मिरवणुकी मशिदीवरून वाजतगाजत जाऊ नयेत, असा आग्रह मुसलमानांनी धरला होता व त्यांना सरकारी अधिकाऱ्यांनी पाठिंबा दिला होता. या प्रकरणामुळे पुणे व वाई येथे मोठे दंगे झाले. 'इंदुप्रकाश'ने ३ सप्टेंबर ते १९ नोव्हेंबर १८९४ पर्यंत या प्रश्नांवर अग्रलेख व स्फुटे लिहून व त्याबाबत पत्रे प्रसिद्ध करून पाठपुरावा केला. या प्रकरणी 'इंदुप्रकाश'ने सरकारवर कठोर टीकास्त्र चालविले होते.''[२८]

**नेटिव ओपिनियन :-** '' 'इंदुप्रकाश' निघाल्यानंतर रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांनी 'नेटिव ओपिनियन' नावाचे एक साप्ताहिक सन १८६४ च्या आरंभापासून काढले. 'नेटिव ओपिनियन' सुरुवातीस फक्त इंग्रजी भाषेतच निघत असे.''[२९]

**सुबोधपत्रिका :-** ''सन १८७३ मध्ये प्रार्थनासमाजाचे मुखपत्र म्हणून 'सुबोधपत्रिका' सुरू झाले. ४ मे १८७३ रोजी 'सुबोधपत्रिके'चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. नवीन सुशिक्षित सुधारणा इच्छुक मंडळींनी आपल्या मताचा प्रसार करण्यासाठी व आक्षेपांना जरूर तर उत्तर देण्यासाठी स्वतःचे एक मुखपत्र असावे, अशी जरूरी भासू लागली. म्हणूनच हे पत्र निघाले. 'सुबोधपत्रिका'त राजकारणविषयक मजकूर येतच नसे. समाजकारण व त्यातही धर्मकारण हेच 'पत्रिकेचे' क्षेत्र. इंग्रजी मजकूर देण्यात येई व काही दिवस पत्रिकेची गुजराती आवृत्तीही काढण्यात येत असे. 'सुबोधपत्रिका'च्या संपादन कार्यात ज्यांनी विशेष लक्ष घातले, त्यात नारायण महादेव ऊर्फ मामा परमानंद यांचा विशेष उल्लेख प्रथम केला पाहिजे.''[३०]

'सुबोधपत्रिका'त स्त्रीशिक्षण, उच्चशिक्षण, नीतिविषयक चर्चा, राजकीय चळवळ, निरनिराळ्या घडणाऱ्या प्रसंगापासून घेण्यासारखे धडे, असे विषय घेऊन सर्वत्र स्पष्टोक्ती व स्पष्ट विचार आलेले आढळतात.

**ठाणे – अरुणोदय :-** ''अरुणोदय' वृत्तपत्र काशिनाथ विष्णू फडके यांनी सुरू केले. त्याचा पहिला अंक २२ जुलै १८६६ रोजी प्रसिद्ध झाला. सुरुवातीला 'अरुणोदय'चे संपादक म्हणून रघुनाथ शंकरशास्त्री हे होते. १८७७ साली पुनर्विवाह प्रकरणी शास्त्रीबोवांचे नाव त्या पत्रावरून गेले. असे काशिनाथ विष्णू फडके ह्यांच्या मृत्युनंतर प्रसिध्द झालेल्या अरुणोदयातील टिपणात म्हटले होते.''[३१]

'अरुणोदय'मधील' लेख विद्वत्तेपेक्षा, सखोल विवेचनापेक्षा, जहाल राजकीय मतप्रणाली मांडणारे आढळतात. सन १८८५ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसचा जन्म झाला. पण त्याआधी सुमारे २० वर्षे 'अरुणोदय'मध्ये राजकारणावर व परकीय सत्तेच्या उच्चाटनासाठी कसे संघटित प्रयत्न व्हायला पाहिजेत. याविषयीचे विवेचन व मार्गदर्शन वाचले की आजही कौतुक वाटते. 'अरुणोदय'च्या जहाल विचारसरणीची कदर परकीय सत्तेच्या अंमलात मुस्कटदाबीने व्हावी

यात नवल नाही. सन १९११ मध्ये 'अरुणोदय' वृत्तपत्र व छापखाना सरकारी रोषाला बळी पडून बंद पडले.

**हिंदू पंच :–** '' 'हिंदू पंच'चे सुरुवातीचे अंक उपलब्ध नाहीत. पण हे वृत्तपत्र 'सूर्योदय'चे चालक गोपाळ गोविंद दाबके यांनी १८७२ मध्ये सुरू केले.''[३२]

**किरण :–** ''सन १८७७ मध्ये सुरू होऊन एक–दोन वर्षाच्या अल्पावधीत बंद झाले. पुण्यातील 'किरण' वृत्तपत्र उल्लेखनीय आहे. महादेव बल्लाळ नामजोशी यांनी हे पत्र केशवराव साठे व अण्णासाहेब पटवर्धन यांच्या साहाय्याने सुरू केले. 'किरण' या साप्ताहिकाचा पहिला अंक २६ ऑगस्ट १८७७ रोजी प्रसिद्ध केला. 'किरण' वृत्तपत्रात मराठीप्रमाणे इंग्रजीही मजकूर येई. पहिल्याच अंकात त्या काळात परकीय सत्तेच्या अंमलामुळे वृत्तपत्र व्यवसाय करणे कसे नाजूक झाले होते, याविषयी विचार प्रदर्शित केले होते.''[३३]

'' 'किरण' वृत्तपत्र अल्पकाळच टिकले; परंतु या अल्पकाळातही त्याची कामगिरी स्पृहणीय ठरली. ठिकठिकाणच्या बातमीदारांकडून बातमीपत्रे मागवून 'किरण'मध्ये विस्तृतपणे देण्यात येत असत. सन १८७७–७८ मध्ये पडलेला दुष्काळ व सन १८७७ मधील देशी वृत्तपत्रांवर निर्बंध घालणारा कायदा या संबंधाने 'किरण' वृत्तपत्राने सडेतोड टीका केलेली आढळते. दुष्काळासंबंधी सविस्तर हकीकत, दुष्काळाची खरी जबाबदारी कोणावर, याविषयी स्पष्ट विवेचन 'किरण'मध्ये येत होते. यासाठी दुष्काळविषयक जरूर ती आकडेवारी देण्यात येई. आकडे देऊन दुष्काळाचे खरे चित्र दाखविण्याचा 'किरण' चा उपक्रम अभिनव होता. ''[३४]

**पुणे :–** '' 'ज्ञानचक्षु' हे साप्ताहिक पुण्यात गंगाधर गोविंद सापकर यांनी १८६६ साली सुरू केले. वामन बाळकृष्ण रानडे हे त्याचे संपादक होते. त्याचा पहिला अंक बुधवार, तारीख ३ जानेवारी १८६६ रोजी निघाला. तत्कालीन थोर लोकांची माहिती व बडोदा वर्णनाची पत्रे 'ज्ञानचक्षु' पत्रात प्रसिद्ध होत असत. 'विज्ञानसुधा' नावाचे एक पत्र पुण्यात १८६८ साली निघाले. 'जगध्दितेच्छु' हे पत्र रावजी श्रीधर गोंधळेकर यांनी १ मार्च १८६९ रोजी सुरू केले. गोल्या घुबड सहीने प्रसिद्ध होणाऱ्या पत्रामुळे एक वेळ विशेष गाजलेले 'लोक कल्याणेच्छु' पत्र

२८ ऑक्टोबर १८७१ रोजी सुरू झाले. धर्मरक्षणाला प्राधान्य देणारे 'शिवाजी' नावाचे पत्र १८७२ च्या सुमारास पुण्यात सुरू झाले. 'दक्षिणतारा' या नावाचे आणखी एक पत्र ऑक्टोबर १८७४ मध्ये सुरू झाले. या वृत्तपत्राचे संपादक विठ्ठल पांडुरंग ऊर्फ अण्णा सोहनी हे होते. १८८० साली त्या काळी गाजलेले 'पुणे वैभव' सुरू झाले. त्याचे संपादक शंकर विनायक केळकर हे होते. स्त्री शिक्षणविरुद्ध या पत्राचा विशेष कटाक्ष असे. ''[३५]

## १.१८ बहुजन समाजाचे वृत्तपत्र :–

**दिनबंधू –** '' आतापर्यंत ज्या वृत्तपत्रांची माहिती घेतली ती चालविणारे जवळजवळ सर्व लोक नवीन विद्येचा लाभ मिळालेले आणि विशेष म्हणजे हे लोक पांढरपेशा व त्यातही प्रामुख्याने ब्राह्मण वर्गातले होते. बहुतेकांचा दृष्टिकोन स्वच्छ व सर्वसमावेशक असा होता. पण त्यांच्या उद्‌बोधन कार्याला ते ज्या वर्गातून आले होते, त्याच्या मर्यादा आलेल्या होत्या. पांढरपेशा वर्गापलीकडे जो मोठा बहुजन समाज होता व त्याच्याही पल्याड जो दलित व उपेक्षित समाज होता, त्याच्यापर्यंत या पत्रातील विचार पोहोचू शकत नव्हते. एक तर बहुजन समाजात शिक्षणाचा फारसा प्रचार झालेला नव्हता व दलित वर्ग तर सर्वच बाजूनी वंचित व उपेक्षित राहिला होता. शिवाय, पांढरपेशांच्या पुढाकाराने चाललेल्या वृत्तपत्रातील चर्चा या प्रचंड संख्येने असलेल्या लोकांच्या जीवनाला स्पर्श करणाऱ्या नव्हत्या. बहुजन समाजाची सुखदुःखे लक्षात घेऊन त्यांना वाचा फोडणारे वृत्तपत्र काढण्याचा प्रयत्न होऊ शकला नव्हता. पण ज्यावेळी ब्राह्मणादी पांढरपेशा वर्ग जागृत होऊन वृत्तपत्रासारखे नवीन उपक्रम हाती घेत होता, त्याच वेळी बहुजन समाजात त्यांच्या पातळीवरून उद्‌बोधन करण्याच्या उद्देशाने त्यांच्यातीलच महात्मा जोतिबा फुले यांनी आपले कार्य सुरू केले होते. उद्‌बोधनाच्या एका नव्या प्रवाहाचा स्त्रोत समाजातील खालच्या पातळीवर वाहू लागला होता. हा प्रवाह खालच्या थरातून उसळून वर आला आणि त्यातूनच प्रसार आणि प्रचाराचे आधुनिक साधन जे वृत्तपत्र ते आपल्या निराळ्या रंगरुपासह जन्माला आले. बहुजन समाजाच्या चळवळीतून जे वृत्तपत्र उदयाला आले ते म्हणजे 'दिनबंधू' पुण्यात १ जानेवारी १८७७ रोजी कृष्णराव भालेकर (१८५०–१९१०) यांनी 'दिनबंधू' वृत्तपत्र सुरू करून त्याचा पहिला अंक प्रसिद्ध केला. ''[३६]

''नवीन सरकारी कायदेकानून, दुष्काळची आपत्ती इत्यादी अनेक कारणांनी शेतकरी

कर्जबाजारी होऊन त्यांच्या जमिनी मोठ्या प्रमाणात सावकारांच्या घशात जाऊ लागल्या. त्यामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांनी वैतागून महाराष्ट्रात ठिकठिकाणी उठाव केले. दंगली होऊन सावकारांच्या घरावर हल्ले झाले व त्यांची कागदपत्रे जाळण्यात आली. काही सावकारांची नाकेही छाटण्यात आली. या सर्व परिस्थितीची चौकशी होऊन शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी डेक्कन ॲग्रिकल्चरल रिलिफ ॲक्ट संमत करण्यात आला. 'दीनबंधू' पत्राने अर्थातच कायद्याला पाठिंबा दिला होता.''[३७]

## १.१९ शासन आणि वृत्तपत्रे :–

### १८६७ चा कायदा आणि व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट –

''वृत्तपत्रांबाबतचे शासकीय धोरण कधीच अनुकूल राहिले नाही. पण वृत्तपत्रांची वाढ होत गेल्यावर व त्यांचा प्रभाव जाणवू लागल्यावर सरकारने वृत्तपत्राबाबतच्या धोरणात कोणते तंत्र अवलंबावे याविषयी अनेक प्रयोग करण्यात आल्याचे आढळते. हिंदुस्थान सरकारच्या तगाद्यामुळे वृत्तपत्रे उपलब्ध करून देण्याची निकड निर्माण झाल्याने, 'डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन' (शिक्षण अधिकारी) याला त्याबाबत व्यवस्था सुचविण्यास फर्माविण्यात आले. त्या अधिकाऱ्याने 'रिपोर्टर ऑन नेटिव प्रेस ॲड रजिस्ट्रार ऑफ नेटिव पब्लिकेशन्स', असे एक पद निर्माण करण्याची सूचना केली. त्याचवेळी संमत झालेल्या 'दि प्रेस ॲड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट' (१८६७) या कायद्याचे संपूर्ण नाव An Act for the Regulation of printing presses and newspapers, for the preservation of copies printed in British India and for the registration of such books. या कायद्याने पुस्तके व वृत्तपत्रे सरकारकडे येऊ लागल्याने त्यांची व्यवस्था पाहण्यासाठी नवीन अधिकाऱ्याची गरज निर्माण झाली. दोन्ही कामे एकाच अधिकाऱ्याकडे सोपवावी व शिक्षण अधिकाऱ्याच्या हाताखाली त्याने काम करावे, असे सुचविण्यात आले. 'रिपोर्टर ऑन नेटिव प्रेस' असे या अधिकाऱ्याचे पद असून इ.स. १८६८साली जून महिन्यात त्याची नेमणूक करण्यात आली होती. 'रिपोर्टर ऑन नेटिव प्रेस' या अधिकाऱ्याची नेमणूक झाल्यावर सरकार दफ्तरी देशी भाषातील वृत्तपत्रांची नीट नोंद होऊ लागली व वृत्तपत्रातून प्रकट होणारे लोकमत सरकारच्या कानापर्यंत व्यवस्थित पोहोचण्याची सोय झाली. हा अधिकारी वृत्तपत्रांबाबत आपले साप्ताहिक अहवाल सादर

करू लागला व ते दरवर्षीच्या प्रशासकीय अहवालात समाविष्ट होऊन प्रसिद्ध होऊ लागले. जनमताचे वारे कोणत्या दिशेने वाहत आहेत याची नोंद घेण्याची सरकारच्या दृष्टीने व्यवस्था झाली. सरकारला त्यावेळी जनमताची दखल घेण्याची मोठी उत्सुकता वा गरज होती, असे मात्र नाही. पण जनतेला जबाबदार नसलेल्या सरकारलाही लोकमताचा कानोसा काही मर्यादेपर्यंत घेण्याची जरूर असते. सरकारविरुद्ध मताची तार काही एका मर्यादेपलीकडे खेचली जाणार नाही, इतपत खबरदारी घेण्याची गरज अशा सरकारला भासते. सर्वसाधारण जनतेचे जे काही मनोगत होते, ते देशी भाषांतील वृत्तपत्रांतूनच प्रकट होणे शक्य होते. सर्वसाधारण जनता अशिक्षित व अज्ञानी असल्याने आपल्या दुःखाला वा गाऱ्हाण्यांना वाचा फोडण्याची पुरेशी जाणीव तिच्या ठिकाणी अद्याप निर्माण झालेली नव्हती. यामुळे देशी वृत्तपत्रात प्रकट होणारे लोकमताचे पडसाद हेही मर्यादित जनतेचे मतप्रदर्शन होते. अँग्लो–इंडियन वृत्तपत्रे आता सरकारविरोधी राहिलेली नव्हती. १८५७ च्या उठावानंतर व देशी वृत्तपत्रांची वाढ होऊ लागल्यावर त्या वृत्तपत्रांचा सरकारविरोध संपुष्टात आला होता. यामुळे अँग्लो–इंडियन वृत्तपत्रात प्रकट होणारे मत हे येथील जनतेच्या मताचे प्रतिनिधित्व करणारे उरले नव्हते. देशी वृत्तपत्रांद्वाराच लोकांच्या मताचा कानोसा घेणे आवश्यक झाले होते. नवीन इंग्रजी शिक्षण घेऊन पाश्चात्त्य विचारांशी परिचय झालेला नवसुशिक्षित वर्ग जागृत होऊ लागला होता व आपल्या दुरवस्थेची जाणीव झाल्याची खूण हा वर्ग पटवू लागला होता. लोकमत संघटित करून प्रकट करण्याची वृत्तपत्रासारखी साधने तो हाताळू लागला होता. विद्यापीठातून बाहेर पडलेले काही लोक वृत्तपत्राकडे वळले होते. देशी वृत्तपत्रे राजकीय असंतोषाचा उच्चार करू लागली असल्याने 'रिपोर्टर ऑन नेटिव प्रेस' यासारखे पद सरकारला निर्माण करावे लागले. जनतेचे वृत्तपत्रातून प्रकट होणारे मत समजून घेण्याची सरकारने आपल्यापुरती सोय केली. पण देशी वृत्तपत्रांबद्दल सरकारची प्रतिक्रिया व धोरण काय आहे, याची माहिती जनतेला व वृत्तपत्रांना माहीत होण्याचा कोणताच मार्ग नव्हता. कारण 'रिपोर्ट ऑन नेटिव प्रेस' याचे अहवाल जनतेच्या माहितीसाठी प्रसिद्ध केले जात नसत. ते गुप्तच राखले जात. एकमेकांचे मत कळले तर दोघांमध्ये समंजसपणा निर्माण होण्याची शक्यता होती. म्हणूनच 'रिपोर्टर'चे अहवाल जनतेच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्याची मागणी वृत्तपत्रांनी केली. 'इंदुप्रकाश' आणि 'अरुणोदय' या वृत्तपत्रांनी नेटिव प्रेस रिपोर्टरचे वार्षिक अवाहल प्रसिद्ध करण्याची वेळोवेळी

विनंती केली.''[३८]

''या १८६७च्या कायद्याने छापलेल्या प्रत्येक पुस्तकाच्या तीन प्रती सरकारकडे पाठविण्याची सक्ती मुद्रणालयांवर करण्यात आली. छापलेल्या पुस्तकांची यादी दर तिमाहीस तयार करण्याची पद्धतही सुरू झाली. तसेच प्रत्येक पुस्तकावर व वृत्तपत्रावर मुद्रक, प्रकाशक, मुद्रणस्थळ व प्रकाशनस्थळ ही सर्व माहिती छापण्याची सक्ती झाली. छापखाना व वृत्तपत्र चालविण्यासाठी स्थानिक मॅजिस्ट्रेटपुढे तशा उद्देशाची प्रतिज्ञापूर्वक जाहीर घोषणा (डिक्लरेशन) करण्याचा निर्बंध जारी करण्यात आला. मुद्रणाचे व प्रकाशनाचे नाव बदलल्यास नवीन डिक्लरेशन करणे आवश्यक झाले. या निर्बंधांमुळे देशी भाषांतील वृत्तपत्रांची नोंद व्यवस्थितपणे होण्याची सोय झाली; परंतु अप्रत्यक्षपणे या कायद्याने मुद्रणस्वातंत्र्याचे नियमनही झाले. मुद्रक व प्रकाशकाचे नाव छापण्याचे बंधन आल्याने, बेजबाबदार व बेछूट मुद्रण प्रकाशनाला आळा बसण्यास मदत झाली. प्रसिद्ध होणाऱ्या मजकुराची नेमकी जबाबदारी कोणावर पडणार याची नोंद होण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे वृत्तपत्रातील मजकुरावर अप्रत्यक्ष बंधन आले. शिस्त पाळण्याची गरज यामुळे पडू लागली. वृत्तपत्र व्यवसाय हा समाजाला वळण लावणारा जबाबदार व्यवसाय असल्याने सर्वांना एका शिस्तीने बांधण्याचा उपक्रम योग्य होता. असे म्हटले पाहिजे; परंतु या निर्बंधामुळे वृत्तपत्रे सरकारी लहरीला बळी पडण्याची शक्यताही निर्माण झाली. वृत्तपत्रांनी आपले काम जबाबदारीने करावे, अशी अपेक्षा करणे ठीक, पण ती ठरविली जाण्याची सरकारी कर्मचारी व अधिकाऱ्यामार्फतच.''[३९]

''वृत्तपत्र स्वातंत्र्याची कक्षा मर्यादित करणारा आणखी एक निर्बंध लवकरच घालण्यात आला. हा निर्बंध म्हणजे भारतीय दंडसंहितेत (इंडियन पिनल कोड) १८७० साली दुरूस्ती करण्यात आली. राजद्रोहात्मक लेखन व भाषणाबाबत एक नवीन कलम समाविष्ट करण्यात आले. १२४ अ म्हणून ओळखले जाणारे हे ते कलम होय. या दुरूस्तीने शब्द (भाषण) लेखन वा चिन्हे अशा कोणत्याही साधनाने सरकारविषयी अप्रीती निर्माण करणाऱ्यास जन्मठेप व दंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली. ही दुरूस्ती इंडियन पिनल कोड १२४ अ कलम म्हणून समाविष्ट झाली. या कलमाचा त्रास पुढे वृत्तपत्रांना सतत सोसावा लागला. ''[४०]

**देशी पत्रांची मुस्कटदाबी –**

देशी भाषेतील वृत्तपत्रांची संख्या सर्वत्र वाढू लागली होती व त्यातही मुंबई इलाख्यात मराठी वृत्तपत्रांची आघाडी होती. मराठी वृत्तपत्रांनाही सरकारात वाढत असलेल्या विरोधी वृत्तीची जाणीव झाली होती, ती पुढीलप्रमाणेः–

**''नेटिव वर्तमानपत्रावर आणीबाणीचा प्रसंग''**

''इंग्रज सरकारच्या अधिकाऱ्यांचा कटाक्ष एतद्देशीय वर्तमानपत्रांवर फार मोठा आहे. लहानमोठ्या अधिकाऱ्यांच्या प्रत्येक जुलमी कृत्यावर एतद्देशीय वर्तमानपत्रे टीका करतात व जेणेकरून अधिकाऱ्यांची फजिती होते. हे त्यास सहन होईनासे झाले. याच अधिकाऱ्यांच्या पंगतीतील कित्येक इंग्रज वर्तमानपत्रकर्तेही आहेत व ते एतद्देशीय वर्तमानपत्रास इतके स्वातंत्र्य असणे वाजवी नव्हे, अशा आरोळ्या ठोकू लागले आहेत.''[४१]

''एतद्देशीय वर्तमानपत्रांचे स्वातंत्र्य जाणार''

''लॉर्ड नॉर्थबुक यांच्या कारकीर्दीत हिंदुस्थानात पुष्कळ गोष्टी घडल्या. त्यामध्ये एतद्देशीय वर्तमानपत्रांचे स्वातंत्र्य हिरावून घेणे, ही गोष्ट मुख्य होईल, असे दिसते. अधिकाऱ्यांच्या या कृत्याने अलीकडे लोकांत अस्वस्थपणा वाढत चालला आहे; तो वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्याने, सरकारास सर्व गोष्टी अगर लोकांच्या मनाचा अस्वस्थपणा पूर्णपणे कळत आहे व अशा अधिकाऱ्यास टपका देण्याचे साधन एतद्देशीय वर्तमानपत्र हेच आहे.''[४२]

**संघटित प्रयत्न :–** ''देशी वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी करणारा कायदा येत असल्याची कुणकुण अगोदरच लागली असल्याने, संभाव्य आपत्ती टाळण्यासाठी वृत्तपत्रकारांनी एक अभिनव उपक्रम केला. दिल्ली दरबारासाठी व्हाईसरॉय लॉर्ड लिटन यांनी काही वृत्तपत्रकारांनाही बोलविले होते. ही संधी साधून, दिल्लीत जमलेल्या पत्रकारांनी लॉर्ड लिटन यांनी एक मानपत्र देऊन त्यात आजपर्यंत मिळत असलेले आपले स्वातंत्र्य पुढेही कायम राहील, अशी आशा व्यक्त केली होती. वृत्तपत्रांवर येणाऱ्या निर्बंधाची आपल्याला जाणीव असल्याचेही मानपत्रात सूचित करण्यात आले होते.''[४३]

**व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट :–** ''देशी वृत्तपत्राविरुद्ध कारवाई करण्याबाबत बंगालच्या लेफ्टनंट गव्हर्नरचा विशेष आग्रह होता. बंगाली भाषेतील वृत्तपत्रे विशेष सरकारविरोधी असून राजद्रोही लिखाण करण्यात त्यांचा खास पुढाकार असतो, असे बंगालच्या लेफ्टनंट गव्हर्नरचे मत होते. याबाबतीत त्यावेळी बंगाली भाषेत प्रसिद्ध होणाऱ्या 'अमृतबझार पत्रिका' या पत्रावर सरकारचा रोख होता. मद्रासवगळता इतरत्र राजद्रोही लिखाणाचे प्रमाण व तीव्रता वाढली असल्याचे सरकारला आढळून आले होते. व्हॉईसरॉय लॉर्ड लिटन यांनी त्वरित पावले टाकून देशी वृत्तपत्रांना लगाम लावणारा कायदा झटपट संमत करून घेण्यात आला. कायद्याचा मसुदा तयार झाल्यावर, त्यातील महत्त्वाचा भाग तारेने भारतमंत्र्यांना इंग्लंडमध्ये कळवून तो मांडण्यास त्यांच्याकडून परवानगी घेण्यात आली. मसुदा कौन्सिलमध्ये मांडून विधेयक एका दिवसात संमत करून घेण्यात आले व देशी भाषेतील वृत्तपत्रांची गळचेपी करणारा कायदा दिनांक १४ मार्च १८७८ रोजी अस्तित्वात आला. ''पौर्वात्य भाषांतील प्रकाशनावर अधिक चांगले नियत्रंण ठेवण्यासाठी कायदा'' (An Act for the Better Control of publications in oriental languages) १८७८, असे या कायद्याचे अधिकृत नामाभिधान होते. विधेयक मांडताना लॉर्ड लिटन यांनी खेद प्रकट केला. थोडक्यात स्वातंत्र्याचा अतिरेक अपायकारक ठरतो म्हणून वेळोवेळी निर्बंध घालणे अपरिहार्य ठरते, असे लिटनचे म्हणणे होते.''[४४]

''१४ मार्च १८७८ रोजी मद्रास खेरीज इतरत्र कायदा अंमलात आला. कायद्याचा उद्देश राजद्रोहात्मक लिखाणाला प्रतिबंध करण्याचा आहे. त्याबद्दल शिक्षा करण्याचा हेतू नाही. शिक्षण आणि उद्‌बोधन सार्वत्रिक झाले की अशा निर्बंधाची गरज उरणार नाही. असा दिलासा कायदा अंमलात आणताना देण्यात आला होता. कायद्याने तीन प्रकारच्या गुन्ह्यांना प्रतिबंध करण्याचा उद्देश होता. ते गुन्हे असे (१) ब्रिटिश हिंदुस्थानातील प्रस्थापित सरकारविरोधी अप्रीती निर्माण करणे (२) निरनिराळ्या वंशाच्या, जातीच्या, धर्माच्या व जमातींच्या लोकांमध्ये परस्पराविरुद्ध द्वेषभाव पसरविणे व (३) सरकारी नोकरांना वृत्तपत्रद्वारा धाकदपटशा दाखवून त्यांच्याकडून महत्त्वाच्या वस्तू काढून घेणे इत्यादी या कायद्याने, वृत्तपत्राच्या मुद्रकांवर व प्रकाशकांवर अमुक प्रकारचा मजकूर प्रसिद्ध करणार नाही. असे आश्वासन देण्याचे बंधन घालण्याचा अधिकार जिल्हा मॅजिस्ट्रेट किंवा पोलीस कमिशनरला दिला होता. जामिन मागणे, जरूर तर तो जप्त करणे, आक्षेपार्ह मुद्रित जप्त करणे, असे अधिकारही अधिकाऱ्यांना देण्यात आले

होते. तसेच सरकारच्या कारवाईविरुद्ध कोर्टाकडे धाव घेण्याची मोकळीक मुद्रक वा प्रकाशकाला ठेवलेली नव्हती. कायद्याने आक्षेपार्ह ठरवलेल्या गोष्टीबाबत कायद्यात जी उपाययोजना सुचविली होती, ती अशी–वृत्तपत्राच्या मुद्रकाकडून व प्रकाशकाकडून जामिन घेणे, जामिन भरल्यावर लेखी बॉण्ड लिहून देऊन आक्षेपार्ह मजकूर न छापण्याचे आश्वासन दिले तर जामिनाची रक्कम परत द्यावयाची किंवा मुद्रक व प्रकाशकाने सरकार नेमेल त्या अधिकाऱ्याने तपासून संमत केल्याखेरीज कोणताही मजकूर न छापण्याची लेखी ग्वाही दिली पाहिजे, अशी कायद्यात तरतूद होती. तसे अधिकारही जिल्हा मॅजिस्ट्रेटला दिले होते. यानंतर ही वृत्तपत्राकडून मर्यादेचे उल्लंघन झाले तर छापखाना जप्त करण्याचा मुद्रक–प्रकाशकांना शिक्षा करण्याचा अधिकार सरकारने आपल्याकडे घेतला होता. कायद्याखाली कोणतीही कारवाई करण्यापूर्वी व्हॉइसरॉयची आगाऊ स्पष्ट परवानगी घेण्याचे बंधन मात्र स्थानिक सरकारांवर घालण्यात आले होते. कायदा करताना त्या वेळच्या भारतमंत्र्यांची परवानगी घेतली होती. पण कायदा संमत झाला तेव्हा लॉर्ड कॅनब्रूक हे नवे भारतमंत्री अधिकारावर आले होते. त्यांनी वृत्तपत्रांवरील निर्बंधाच्या कायद्याला नाखुशीनेच संमती दिली. त्यांच्या सल्लागार कौन्सिलातील तीन सदस्यांनी विरोधच व्यक्त केला. पार्लमेंटमधील विरोधी पक्षनेते, उदारमतवादी ब्रिटिश मुत्सद्दी ग्लॅडस्टन यांना हा कायदा पसंत नव्हता. या कायद्याखाली जे खटले होतील, त्यांची माहिती भारतमंत्र्याकडे पाठवून ती पार्लमेंटला सादर करावी, असा एक ठराव पार्लमेंटमध्ये मांडण्यात आला होता, पण तो संमत झाला नाही.'' [४५]

या कायद्याची आवश्यकता पटविण्यासाठी देशी भाषेतील १५० वृत्तपत्रांतील लिखाणाचे नमुने सरकारकडून प्रसिद्ध करण्यात आले होते. त्यात मुंबई इलाख्यातील १९ पत्रांतून ३९ वेचे घेण्यात आले होते. 'किरण', 'इंदुप्रकाश', 'अरुणोदय', 'शुभसूचक', 'ज्ञानप्रकाश', 'नेटिव ओपिनियन', इत्यादी मराठी वृत्तपत्रातील उतारे अधिक होते. यावरून मराठी वृत्तपत्रांतील लेखन अधिक कडक व त्यावर सरकारचा विशेष कटाक्ष होता. देशी वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करणारा कायदा करण्याचा विचार प्रथम पुढे आला, तो बंगाली वृत्तपत्रातील लिखाणामुळे पण मराठी वृत्तपत्रातील लेखनही सरकारच्या डोळ्यांत सलू लागले होते. मराठी वृत्तपत्रातील जे उतारे सरकारने आक्षेपार्ह लेखनाचे नमुने म्हणून निवडले होते, त्यात पुण्याच्या 'ज्ञानप्रकाश' वृत्तपत्रातील एक उतारा होता. हा उतारा एतद्देशीय संस्थानांतून नेमलेले पोलिटिकल ऑफिसर्स

प्रसंगविशेषी आपल्या ताब्यातील संस्थानिकांशी जबरदस्तीने वागतात, हे स्पष्ट करणारा होता. सरकारने आक्षेपार्ह मानलेला उतारा तसा नव्हता. हे 'ज्ञानप्रकाश'ने आपल्या १८ एप्रिल १८७८ च्या अंकात सरकारच्या इंग्रजी भाषांतराचा मराठीत तर्जुमा उद्‌धृत करून दाखवून दिले होते.

हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्तेचे एका उताऱ्यात पुढीलप्रमाणे वर्णन केले होतेः–

''हिंदुस्थानातील इंग्लिश सत्ता ही देखण्या; परंतु छिनाल स्त्रीप्रमाणे आहे. तिचे सौंदर्य आकर्षक व मोहक आहे. पण ती अत्यंत लबाड, फसवी व निष्ठूर आहे. सर्वजण तिच्या प्रेमपाशात सापडतात. एकदा ती एकावर प्रेमकटाक्ष टाकील, तर दुसऱ्याच क्षणाला दुसऱ्या एखाद्याला घायाळ करील आणि अखेर त्यांचे आपसात भांडण जुंपते. सर्व हिंदी संस्थानिक तिच्या आकर्षणाला बळी पडले. नंतर तिने मध्यमवर्गीयांना मोहिनी घातली व नेसत्या वस्त्राखेरीज त्याचे सर्व काही हिरावून घेतले.''[४६]

या कायद्याविरुद्ध आवाज उठविण्यासाठी एखादी परिषद (कॉन्फरन्स) व्हावी, असे प्रतिपादन माधव बल्लाळ नामजोशी यांनी आपल्या 'किरण' वृत्तपत्रातून लक्ष वेधले होते. ते असेः–

''वर्तमानपत्रांचे कायद्याने अस्तित्व धोक्यात आले आहे, तर यापुढे वर्तमानपत्रे कोणत्या रीतीने चालवावयाची, यासंबंधाने आपली स्वतंत्रता कोणत्या रीतीने परत मिळवावयाची, या दोन्ही गोष्टींचा विचार करणे अत्यावश्यक असल्यामुळे पत्रकर्त्यांनी स्वतः जमून विचार केला पाहिजे. यासाठी यावेळी एकत्र जमून आपल्या हक्कांचा विचार करण्यास आम्हापैकी सर्वांनी स्वतः एकत्र जमण्यास आळस करू नये, अशी आमची सूचना आहे.''[४७]

''वृत्तपत्र संपादकांची एक सभा मुंबईत २९ मार्च १८७८ रोजी फ्रामजी कावसजी इन्स्टिट्यूटच्या सभागृहात झाली. 'इंदुप्रकाश'च्या इंग्रजी विभागाचे संपादक जनार्दन सुंदरजी कीर्तीकर हे परिषदेच्या अध्यक्षस्थानी होते. परिषदेस 'मराठ्यांची' संख्या जास्त होती. सार्वजनिक काका गणेश वासुदेव जोशी, रा. ब. सदाशिव, बल्लाळ गोवंडे व विनायक रामचंद्र पटवर्धन हे उपस्थित होते. 'रास्त गोफ्तार', 'सत्यमित्र', 'मुंबई समाचार' या गुजराती वृत्तपत्रांचे पारशी संपादक 'आर्यप्रकाश' आणि 'स्वदेशमित्र' या वृत्तपत्राचे संपादक, 'ज्ञानप्रकाश'चे संपादक सीताराम हरी, 'नेटिव ओपिनियन'च्या इंग्रजी विभागाचे संपादक नारायण महादेव परांजपे इत्यादी वर्तमानकर्ते उपस्थित होते, याशिवाय जीजीभाई,

फिरोजशहा मेहता, कावसजी जहांगीर, काशिनाथ त्रिंबक तेलंग इत्यादी व्यक्तीही उपस्थित होत्या. परिषद प्रत्यक्ष भरली तेव्हा 'व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट' संमत झालेला असल्यामुळे परिषदेतून फारसे काही निष्पन्न झाले नाही. संपादकांनी एकत्र येऊन वृत्तपत्रांची होत असलेली गळचेपी थांबविण्यासाठी संघटित प्रयत्न करावेत याबद्दल मात्र परिषदेत एकमत झाले. कायद्याविरुद्ध वातावरण तयार करण्यासाठी पत्रकारांनी केलेले संघटित प्रयत्न कौतुकास्पद असले तरी सरकारने त्यांची काही दखल घेतल्याचे आढळत नाही.'' [४८]

१८८० साली इंग्लंडमध्ये सत्तांतर होऊन ग्लॅडस्टन यांच्या नेतृत्वाखाली उदारमतवादी (लिबरल) पक्षाचे सरकार अधिकारावर आले. विरोधी पक्षात असताना ग्लॅडस्टन यांनी मुस्कटदाबीच्या कायद्याला विरोध केला होता. यामुळे अधिकारावर येताच त्यांनी त्याबाबत हालचाल केली. हिंदुस्थानात लॉर्ड लिटन यांची 'लिटनशाही' कारकीर्द संपुष्टात आली. लॉर्ड रिपन हे नवे व्हाईसरॉस झाले. मुस्कुटदाबीचा कायदा रद्द करण्याच्या सूचना असल्याने नवे व्हाईसरॉय लॉर्ड रिपन यांनी ७ डिसेंबर १८८१ रोजी कायदा रद्द करणारे विधेयक मांडून ते तडकाफडकी संमत करून घेतले आणि देशी वृत्तपत्राबाबत आकसाने पक्षपात करणारा कायदा रद्द झाला. भारतीय वृत्तपत्रांच्या इतिहासातील एक पर्व त्याबरोबर संपले.

## १.२० राजकीय पत्रकारितेचे युग :–

**मराठा :–** ''इंग्रजी व मराठी मजकूर एकाच वृत्तपत्रात देण्याची प्रथा मोडून एक संपूर्ण इंग्रजी वृत्तपत्र काढण्याच्या संकल्पाप्रमाणे 'मराठा' हे निव्वळ इंग्रजी मजकूर देणारे वृत्तपत्र 'केसरी'च्या आधी दोन दिवस म्हणजे रविवार ता. २ जानेवारी १८८१ रोजी सुरू झाले. 'मराठा'ची संपादकीय जबाबदारी सुरुवातीला टिळकांवर सोपविण्यात आली होती. अर्थात, संपादकाचे नाव वृत्तपत्रावर छापण्याची त्यावेळी सक्ती नसल्याने 'मराठा' वृत्तपत्रावरही टिळकांचे नाव नव्हते. 'मराठा'च्या दर्शनी पृष्ठावर "The Maratha with which is incorporated the Deccan star" असा मजकूर पहिल्या अंकापासून असे. 'मराठा' वृत्तपत्र सुरू ठेवण्याचे कारण एवढेच की, लोकांच्या राष्ट्रीय भावनेला इंग्रजीतूनही तोंड फोडणे आवश्यक होते. राजकीय विचार स्वकीयांना 'केसरी'तून सांगितला जात असे. पण हा विचार आणि मनोगत इंग्रज राज्यकर्त्यांच्या कानी पोचविण्यासाठी व परप्रांतातील लोकांपुढे मांडण्यासाठी इंग्रजी भाषेचा

आश्रय घेणे अपरिहार्य होते. मराठीत खूप लिहिले, तरी त्याचे भाषांतर सरकार–दरबारी वाचले जाईल याची शाश्वती कोण देणार? आपले मदतगार व हितचिंतक इंग्लंडातही आहेत, त्यांना आपल्या गोष्टी खुलासेवार व मार्मिकपणे कशा कळविता येणार? ही कामे सुलभतेने, सातत्याने होण्यासाठी म्हणूनच इंग्रजी भाषेत स्वतंत्र वृत्तपत्र काढण्यात आले. चालकांनी पत्राचा हेतू असा सांगितला होता, ""Our true primary duty will be to interpret, petition and instruct and advocacy may be said to form the second part of our real work."[४९]

**केसरी :–** ४ जानेवारी १८८१ रोजी 'केसरी'चा पहिला अंक निघाला. 'केसरी'चे संपादक गोपाळ गणेश आगरकर होते. पहिल्या पानावर 'केसरी' वृत्तपत्र काढण्याचा उद्देश स्पष्ट करणारा लेख होता. पण त्या लेखाला मथळा नव्हता. मुंबई इलाख्यात व खुद्द पुण्यात तीन–चार वृत्तपत्रे सुरू असता आणखी एक वृत्तपत्र काढण्याची काय जरूरी आहे, असा प्रश्न वाचकांना पडेल म्हणून पहिल्याच पानावर 'वृत्तपत्राचा उद्देश' जनतेला कळविला होता, तो पुढीलप्रमाणे :–

''वर्तमानपत्रकर्त्यांस आपणावरची जबाबदारी पुरतेपणी कळू लागली आहे किंवा लोकसुधारणेस आपल्या परिश्रमांनी केवढे साहाय्य होणारे आहे, याविषयी त्यांचा पक्का समज झाला आहे, असे सामान्यतः पाहता आढळणार नाही. दोन–चार नामांकित वर्तमानपत्रांखेरीज बाकीच्यांची जर स्थिती पाहिली, तर वर्तमानपत्र म्हणजे जागोजागच्या बातम्या प्रसिद्ध करण्याचे साधन यापलीकडे वरील शब्दाचा अर्थ वृत्तपत्रकर्त्यांच्या मनात कधी येत असेल, असे वाटत नाही. अलिकडे तर लहानसहान गावांतून सुद्धा वर्तमानपत्रे निघू लागली आहेत. छापखाना घालणे व पत्र काढणे, हा एक व्यापारच बनल्याने ज्यास विद्येचा विशेष संस्कार नाही, अशा मंडळीच्या हातीच वरील दोन मौलिक साधने पडलेली आढळतात... पण याच उद्योगात वरच्यापेक्षा चांगली मंडळी असता लोककल्याणाचा मार्ग जास्त खुला होणार आहे, हे उघड आहे.''[५०]

थोडक्यात जहाल राष्ट्रवादी चळवळीचे मुखपत्र म्हणून लोकमान्य टिळक यांनी 'केसरी'ला आकार दिला. टिळकांची पत्रकारिता त्यांच्या राजकीय नेतृत्वाचा आणि व्यक्तिमत्त्वाचाच एक अविभाज्य भाग होती. हिंदु–मुस्लिम दंगली, दुष्काळ, प्लेगची साथ, वंगभंगाची चळवळ, अशा महत्त्वाच्या घटनांप्रसंगी टिळकांनी केलेले लेखन मराठी वृत्तपत्रांच्या

इतिहासात अजरामर ठरले आहे. आक्रमक व धारदार शैलीतील त्यांचे अग्रलेख राजकीय जागृतीचे साधनच बनले होते.

**सुधारक :–** '' 'केसरी' सोडल्यानंतर सर्व जुळवाजुळव करून एक वर्षाने आगरकरांनी आपले 'सुधारक' वृत्तपत्र सुरू केले. 'सुधारक'चा पहिला अंक १५ ऑक्टोबर १८८८ रोजी दसऱ्याच्या मुहूर्तावर प्रकाशित करण्यात आला. सुरुवातीच्या काळात 'सुधारक' वृत्तपत्रात इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांमधून मजकूर प्रसिद्ध होई.''[५१]

''आगरकरांचा 'सुधारक' काढण्याचा हेतू उघडउघड आपल्या समाजव्यवस्थेतील दोष दाखवून तो दूर करण्याचे मार्ग सांगण्याचा होता. हे कार्य अप्रिय ठरणारे असले तरी पथ्यकारक असल्यामुळे ते कार्य व्रतस्थ वृत्तीने करण्यास 'सुधारक' सज्ज झाला होता. लोकाग्रणींनी तरी हे अप्रिय पण हितकारक कार्य करण्यास पुढे सरसावले पाहिजे, असे त्यांना वाटत होते. स्त्रियांच्या उन्नतीविषयी आगरकरांनी पुष्कळ लेखन केले. 'स्वयंवर', 'प्रियाराधन', 'वल्लभोपासना' यापासून 'निराकरण अथवा घटस्फोट'पर्यंतच्या विषयांवर हे लेख होते. 'मनुष्यतेचे ऐहिक सुखसंवर्धन' आगरकरांना अभिप्रेत होते. त्यामुळे 'प्रियाराधन'सारखे लेख जसे त्यानी लिहिले त्याप्रमाणे 'सणांचा व खेळांचा ऱ्हास' या विषयावरही त्यांनी लिहिले. समाज सुसंस्कृत होण्यासाठी केवळ मूठभर लोक नव्हे, तर सर्व समाज तसा झाला पाहिजे. म्हणून खऱ्या ज्ञानोपासनेची इष्टता पटवून देण्यासाठी 'ज्ञान' व 'वाचन' असे निबंध त्यांनी लिहिले. त्यांच्या रसिक वृत्तीचा अविष्कार 'कवी, काव्य, काव्यरति' अशा लेखांत आढळतो. आगरकरांनी समाजसुधारणेवर भर दिला, पण चोहोअंगांनी समाज सुधारला पाहिजे, याचे त्यांना भान होते. यामुळे 'सुधारका'त एकांगीपणा नव्हता. परकी सत्तेने कसे दुःख निर्माण होत आहे याची जाणीव त्यांना होती. म्हणून आर्थिक जीवन संपन्न झाले पाहिजे, राजकीय हक्क अधिक मिळविले पाहिजेत, शिक्षणाची संधी अधिकाधिक लोकांना मिळाली पाहिजे, असे प्रतिपादन करणारे त्यांनी अनेक लेख लिहिले. 'इंग्रजी राज्याची उलट बाजू अथवा आमचे घोर दारिद्र्य', 'हिंदुस्थानास क्षय लागला', 'वाचाल तर चकीत व्हाल', 'हिंदुस्थानातील अन्नानदशेचे दुष्परिणाम', 'भांडवल गेले, व्यापार गेला!' 'राष्ट्रसभा बंद ठेवता कामा नये', 'हिंदुस्थानचे राज्य कोणासाठी?' 'लोकशिक्षणावर गदा', 'अनाथांचा वाली कोणी

नाही', असे आर्थिक व राजकीय विषयांवरचे आगरकरांचे कितीतरी लेख दाखवता येतील. प्लेग प्रकरणीच्या जुलुमाचा समाचार त्यांनी 'आडदांडांना कायदा शिकवा' या लेखात घेऊन सरकारवर टीकेची झोड उठवली. ''[५२]

**करमणूक :–** '' 'केसरी'चे अनुकरण किंवा त्यापुढेही जाऊन जहाल राजकारणाचा पुरस्कार करणारी अनेक पत्रे निघाली व गाजली. पण या सर्वसाधारण प्रवाहाला अपवाद ठरावे व आपल्या निराळ्या स्वरूपामुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरावे, असे पत्र याच काळात सुरू झाले व दीर्घकाळ टिकले. जहाल राजकारणात चौफेर गाजावाजा होत असताना, कौटुंबिक स्वरूपाचे आणि सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करणारे 'करमणूक' पत्र होय. मराठीतील नामवंत श्रेष्ठ कादंबरीकार हरी नारायण आपटे हे 'करमणूक'चे संपादक होते. हे साप्ताहिक २५ ऑक्टोबर १८९० ला सुरू झाले.''[५३]

**काळ :–** '' 'केसरी'च्या आणि टिळकांच्या पंरपरेत पूर्णपणे बसणारे आणि एका अर्थाने ती परंपरा आणखी पुढे नेणारे असे 'काळ' वृत्तपत्र होते. 'काळ' वृत्तपत्र सुरू झाले तो काळ राजकीय चळवळीला व वृत्तपत्रांना बराच प्रतिकूल होता. पण शिवरामपंतांवर जे शैक्षणिक व अन्य संस्कार झाले होते, त्यामुळे त्यांनी तशाही प्रतिकूल परिस्थितीत वृत्तपत्र काढण्याचे धाडस केले. 'केसरी'च्या एक फेब्रुवारी १८९८ च्या अंकात त्यांनी आपल्या वृत्तपत्राची जाहिरात प्रकाशित केली. धार्मिक, सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक आणि वाङ्मयीन विषयांची निःपक्षपाताने व निर्भयपणे पूर्ण चर्चा करणारे साप्ताहिक वर्षप्रतिपदेपासून सुरू होणार असल्याचे जाहिरातीत म्हटले होते. वृत्तपत्राचे नाव 'काळ' (The Times) असे होते.''[५४]

''२५ मार्च १८९८ रोजी 'काळ' वृत्तपत्र सुरू झाले व शुक्रवार हा त्यांचा प्रसिद्धीचा वार होता. लोकांत दृढमूल व रूढ झालेल्या कित्येक राजकीय कल्पनांच्या उच्छेदासाठी काळाचा जन्म आहे.''[५५]

'काळ' वृत्तपत्र सुरू झाल्यावर सुरुवातीला वैदिक धर्माचे महत्त्व, जातिभेद, सुधारक–दुर्धारक यांच्यातील कलह, ख्रिश्चन मिशनऱ्यांचे बाटविण्याचे उद्योग इत्यादी विषय शिवरामपंतांनी आवडीने हाताळल्याचे आढळते. पतित परावर्तनावर त्यांचा विशेष कटाक्ष होता.

नेमस्तांची प्रत्यक्ष काही कृती न करता नुसती तोंडपाटीलकी करण्याची वृत्ती त्यांच्या टीकेचा विषय होत असे.

**भाला :–** ''भास्कर बळवंत भोपटकर यांनी ५ एप्रिल १९०५ रोजी 'भाला'चा पहिला अंक प्रकाशित केला. भोपटकर टिळकांचे भक्त असले, तरी त्यांचा भर राजकारणापेक्षा धर्मकारणावर जास्त होता. ''नरकाचा दरबार'' या लेखाकरिता भोपटकर यांना राजद्रोहाच्या आरोपाखाली सहा महिन्यांची शिक्षा झाली. त्यांच्या तुरुंगवासाच्या काळात त्यांचे बंधू लक्ष्मण बळवंत ऊर्फ अण्णासाहेब भोपटकर यांनी 'भाला' चालविले. सरकारी दडपशाहीमुळे नोव्हेंबर १९१० मध्ये 'भाला' बंद पडले. १९२५ साली पुन्हा 'भाला' सुरू करण्यात आले. विरोधकांची खिल्ली उडविणे, हाच 'भाला'कारांचा छंद होता. १९३५ पर्यंत हे वृत्तपत्र चालले. ''[५६]

**राष्ट्रमत :–** ''राष्ट्रीय पक्षाला महाराष्ट्रातही महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. पण राष्ट्रीय पक्षाचे मुंबईत एकही पत्र नव्हते व महाराष्ट्रात त्या पक्षाचे एकही दैनिक नव्हते. यामुळे असे एखादे पत्र मुंबईत सुरू करण्याचा विचार सुरू झाला व टिळकांनीही त्याला संमती दिली. 'राष्ट्र मत' दैनिकाचा पहिला अंक २९ जून १९०८ रोजी प्रसिद्ध झाला. वृत्तपत्र निघण्यापूर्वीपासूनच त्याबद्दल जनतेत विशेष कुतूहल असल्याने सुरुवातीपासूनच त्याला लोकप्रियता लाभली. सीताराम केशव दामले हे 'राष्ट्रमत'चे संपादक होते. ''[५७]

**संदेश :–** ''या काळातले, एक सर्वस्वी नवा जमाना सुरू करणारे पत्र म्हणजे अच्युत बळवंत कोल्हटकर यांचे 'संदेश' पत्र होय. मुंबईत निघालेले हे दैनिक तसे मतपत्रच असलेले व प्रामुख्याने लो. टिळकांच्या राजकारणाचा पुरस्कार करणे हे त्याचे उद्दिष्ट होते.
'संदेश' दैनिकाचा पहिला अंक संक्रांतीच्या दिवशी म्हणजे १४ जानेवारी १९१५ रोजी प्रसिद्ध झाला.''[५८]

**लोकमान्य :–** ''टिळक यांच्या निधनानंतर १९२१ मध्ये मुंबई येथे 'लोकमान्य' दैनिक सुरू झाले. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर हे त्याचे पहिले संपादक होते. मात्र १९२३

साली मतभेदामुळे खाडिलकरांनी संपादकपद सोडले. त्यानंतर रा.ना. मंडलिक, बा.गं. खेर, ल.ब. भोपटकर यांनी संपादकपद सांभाळले. पण १९२५ मध्ये ते बंद पडले. १९३५ मध्ये पुन्हा 'लोकमान्य' सुरू झाले. पां. वा. गाडगीळ त्याचे काही काळ संपादक होते. ''[५९]

## १.२१ सारांश :–

भारतामध्ये १९व्या शतकात ज्या अनेक घडामोडी झाल्या, त्यात वृत्तपत्रे बाल्यावस्थेत होती. जी चार पानी साप्ताहिकाच्या स्वरूपात होती, जी उदयाला आली ती अल्पकाळातच बंद पडली. मराठी वृत्तपत्रांची सुरुवात झाली आणि त्यानंतरच्या तीस वर्षांची जी वाटचाल पाहिली तर त्यात ज्ञानप्रसार आणि ख्रिस्तधर्मप्रसार व त्याची प्रतिक्रिया म्हणून हिंदूधर्माच्या बाजूने झालेले संरक्षणात्मक प्रयत्न या दोन प्रेरणा प्रमुख होत्या. १८४० ते १८६० या वीस वर्षांच्या काळात हिंदू समाजरचनेत हजारो वर्षांच्या परंपरेने दृढत्व पावलेली व समाजाच्या दृष्टीने अनिष्ट प्रथेस आळा घालण्याचा प्रयत्न केला. १८५० साली धर्मांतर करणाऱ्यांना व वडिलोपार्जित संपत्तीचे भागीदार बनविणारा कायदा सर्व हिंदुस्थानभर लागू करण्यात आला. १८५३ सालापासून रेल्वे सुरू झाली आणि जातिभेदाच्या भीतीला धक्के बसू लागले. १८५६ साली विधवा विवाहाचा कायदा पास झाला. १८५७ साली मुंबई विद्यापीठाची स्थापना झाल्यावर पाश्चात्त्य विद्येच्या अधिक अभ्यासाला चालना मिळाली. शिक्षण कनिष्ठातल्या कनिष्ठापर्यंत पोचविण्याची तत्वतः तरी व्यवस्था झाली. सामाजिक प्रश्नाचे रण हे प्रामुख्याने पांढरपेशापुरतेच यांच्या सामाजिक व अन्य प्रश्नांची जाणीवही फारशी झाल्याची आढळत नाही. पण प्रस्थापित पांढरपेशा म्हणजे ब्राह्मण वर्गाविरुद्ध बंड करून उठवणारा एक तिसरा प्रवाह बहुजन समाजातून याच काळात पुढे आला. हा प्रवाह महात्मा फुले यांनी प्रवर्तित केला. या कालखंडात राजकारणापेक्षा प्रामुख्याने आणि सामाजिक विषयावरच नियतकालिकात भर देण्यात येत असे. इग्रजांशी संबंध ठेवणे दैवी तर आहेच, पण ते हितकारकही आहे. इग्रज सरकारविषयी आदर आणि इमानदारपणा त्यात दिसत असे. तरीही क्वचित प्रसंगी त्यात टीकात्मक भूमिकाही घेण्यात येई.

दुसऱ्या कालखंडात म्हणजे १८८०नंतर वृत्तपत्रांच्या भूमिकेत बदल झालेला आढळतो. त्यावेळी सामाजिक सुधारणांचा आग्रह मागे पडून राजकरणाला जे महत्त्व येऊ लागले होते.

त्याचे चित्रण व प्रतिबिंब आपल्याला पाहावयास मिळते. सुशिक्षित हिंदू आणि इंग्रज अधिकारी यांच्यात पूर्वी वसत असलेले संबंध दुरावत चालले होते. भारतीय जनतेला इंग्रज सरकारच्या धोरणाविषयी संशय वाटू लागला होता. या पाव शतकात वृत्तपत्रांना राजकीय संस्थांचे स्वरूप प्राप्त होऊ लागले. ती थोडीफार निर्भय बनली आणि त्यांच्या टीकास्त्रांच्या टप्प्यातून लहानसहान घटनाही सुटेनाशा झाल्या.

इंग्रजांच्या रोषास ज्या वृत्तपत्रांना सामोरे जावे लागले त्यामध्ये 'केसरी', 'काळ', 'संदेश', 'भाला' यासारख्या वृत्तपत्रांचा समावेश होतो. त्यात आणखी एक वृत्तपत्र म्हणजे 'नवाकाळ'ला सुद्धा इंग्रजांच्या अन्यायी वागणुकीला सामोरे जावे लागले. त्याचे संपादक काकासाहेब खाडिलकर यांनी 'केसरी', 'लोकमान्य' या दैनिकांचे संपादकपदी कार्यही केले होते; परंतु काही कारणाने त्यांना त्यातून बाहेर पडावे लागले. आपले स्वतःचेच एखादे दैनिक सुरू करावे. या निर्णयातून हे वृत्तपत्र सुरू करण्याची प्रेरणा मिळाली. १९२० मध्ये टिळकांचे निधन झाले होते. म.गांधींचा राजकीय कार्यक्षेत्रात प्रवेश झालेला होताच. टिळक गुरूस्थानी तर महात्मा गांधींच्या विचारांचा प्रचार या दोन्हींचा समन्वय साधण्याचा प्रयत्न काकासाहेब खाडिलकरांनी आपल्या वृत्तपत्रातून केला.

## प्रकरण पहिले

### तळटीपा :–


१) कानडे, रा.गो. ''मराठी नियतकालिकांचा इतिहास'', १८३२–१९३७, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस, मुंबई, १९३७, पृष्ठ –३०४.

२) लेले, रा.के. ''मराठी वृत्तपत्राचा इतिहास'' कॉटिनेंटल प्रकाशन, विजयानगर पुणे, तृतीयावृत्ती, २००९, पृष्ठ –२२.

३) कित्ता, पृष्ठ –२२.

४) कित्ता, पृष्ठ –२४.

५) जोशी, वि.कृ. व लेले, रा.के. ''वृत्तपत्रांचा इतिहास'' खंड–१, वासुदेव विष्णु भट, मुंबई, १९५१, पृष्ठ –९१.

६) कित्ता– पृष्ठ –९३.

७) जोशी, वि.कृ. व लेले, रा. के. ''वृत्तपत्रांचा इतिहास'' खंड–१, वासुदेव विष्णुभट, मुंबई, १९५१, पृष्ठ –११८.

८) कित्ता– पृष्ठ –१३१.

९) कित्ता– पृष्ठ –१३५.

१०) देशपांडे, प्र.न. ''अर्वाचीन भारतः इ सन. १७१३ ते १९५३'', कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४, पृष्ठ–२१४.

११) लेले, रा.के. ''मराठी वृत्तपत्रांचा इतिहास'', कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे १९८४, पृष्ठ –३३.

12) Margarita Berns, "The Indian Press" George Allen and unwin, London, 1940, P-230.

१३) लेले, रा.के. ''मराठी वृत्तपत्रांचा इतिहास'', कॉटिनेंटल प्रकाशन पुणे, १९८४ पृष्ठ –३३.

१४) कित्ता– पृष्ठ – ५८.

१५) दर्पण, ६ जानेवारी १८३२.

१६) दर्पण, १२ नोव्हेंबर १८३२.

१७) मुंबई अखबार, ३ जुलै १८४०.

१८) जोशी, वि. कृ. आणि लेले, रा.के. ''वृत्तपत्रांचा इतिहास, '' खंड–१, वासुदेव विष्णुभट, मुंबई १९५१, पृष्ठ–३००.

१९) ज्ञानोदय, जून १८४२.

२०) ज्ञानप्रकाश, १२ फेब्रुवारी १८४९.

२१) विचारलहरी, जुलै १८५२

२२) पूना ऑब्झर्वर, २० नोव्हेंबर १८५२.

२३) जोशी वि.कृ. आणि लेले रा. के. ''वृत्तपत्रांचा इतिहास'', खंड–१, वासुदेव विष्णू भट, मुंबई , १९५१, पृष्ठ – ३१६.

२४) सध्दर्मदीपिका, सप्टेंबर १८५५.

२५) ज्ञानप्रकाश, २६ एप्रिल १८५८.

२६) लेले, रा. के. ''मराठी वृत्तपत्रांचा इतिहास'' कॉटिनेंटल प्रकाशन पुणे, १९८४, पृष्ठ–१२९–१३०.

२७) इंदुप्रकाश, २ जानेवारी १८६२.

२८) लेले रा.के., ''मराठी वृत्तपत्रांचा इतिहास'', कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४,पृष्ठ–१५३.

२९) नेटीव ओपिनियन, ४ जानेवारी १८६४.

३०) ज्ञानोदय, १५ मे १८७३.

३१) अरुणोदय, रविवार. १३ मार्च १९०४.

३२) विविध ज्ञानविस्तार, जून १८७२, मलपृष्ठ क्र. २.

३३) किरण, २६ ऑगस्ट १८७७, प्रस्तावना.

३४) किरण, २४ मार्च १८७८.

३५) लेले रा.के.,''मराठी वृत्तपत्रांचा इतिहास'', कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४, पृष्ठ–२१४.

३६) कित्ता, पृष्ठ– २०२.

३७) दीनबंधू, २४ नोव्हेंबर १८७९.

३८)	लेले रा.के., ''मराठी वृत्तपत्रांचा इतिहास'', कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४, पृष्ठ– २४५–२४७.

३९)	कित्ता, पृष्ठ– २५१.

४०)	कित्ता, पृष्ठ– २५२.

४१)	कित्ता, पृष्ठ– २५५.

४२)	कित्ता, पृष्ठ– २५५.

४३)	कित्ता, पृष्ठ– २५६.

४४)	कित्ता, पृष्ठ– २६३.

४५)	कित्ता, पृष्ठ– २६४.

४६)	कित्ता, पृष्ठ– २६४.

४७)	कित्ता, पृष्ठ– २६०.

४८)	कित्ता, पृष्ठ– २६०–२६१.

४९)	कित्ता, पृष्ठ– ३०२–३०३.

५०)	कित्ता, पृष्ठ– २८०–२८२.

५१)	कित्ता, पृष्ठ– ३०८.

५२)	कित्ता, पृष्ठ– ३२३.

५३)	कित्ता, पृष्ठ– ४५३–५५.

५४)	कित्ता, पृष्ठ– ४६०–६१.

५५)	कित्ता, पृष्ठ– ४६२.

५६)	कित्ता, पृष्ठ– ४८४.

५७)	कित्ता, पृष्ठ– ५०१.

५८)	कित्ता, पृष्ठ– ५३६.

५९)	कित्ता, पृष्ठ– ६४८.

# प्रकरण दुसरे

## 'नवाकाळ' वृत्तपत्राची स्थापना, ध्येय, धोरण व उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ 'नवाकाळ' चे संस्थापक काकासाहेब खाडिलकरांच्या पत्रकारितेचा प्रारंभ

२.३ 'नवाकाळ' वृत्तपत्राची स्थापना

२.४ 'नवाकाळ' वृत्तपत्राचा पहिला अंक

२.५ 'नवाकाळ' वृत्तपत्राचे ध्येय

२.६ नवाकाळ वृत्तपत्राचे धोरण

२.७ 'नवाकाळ' वृत्तपत्राची उद्दिष्टे

२.८ 'नवाकाळ' वृत्तपत्राची वाटचाल

२.९ 'नवाकाळ' वृत्तपत्रावरील राजद्रोही खटले

२.१० संस्थापक-संपादक काकासाहेब खाडिलकर

२.११ 'नवाकाळ' वृत्तपत्राचे दुसरे संपादक यशवंत कृष्णाजी खाडिलकर

२.१२ 'नवाकाळ' वृत्तपत्राचे तिसरे संपादक नीळकंठ खाडिलकर

२.१३ सारांश

# प्रकरण दुसरे

# 'नवाकाळ' वृत्तपत्राची स्थापना, ध्येय, धोरण व उद्दिष्टे

## २.१ प्रस्तावना :–

प्रस्तुत प्रकरणात 'नवाकाळ' वृत्तपत्राची स्थापना होत असताना त्याची ध्येय, धोरण व उद्दिष्टे मांडली गेली. त्याची विस्तृत माहिती या प्रकरणात मांडत आहोत. तसेच 'नवाकाळ'च्या संपादकांच्या कार्याचा आढावा थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

'नवाकाळ' चालक, संपादक कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी 'लोकमान्य' दैनिकाशी असलेले संबंध तोडल्यानंतर आपले स्वतःचे वृत्तपत्र सुरू करण्याचा निर्णय घेऊन त्यानुसार आपल्या कार्याच्या दिशेने वाटचाल सुरु केली. जुना झालेला काळ गेला आहे आणि पुढे येणारा नवीन काळ येत आहे या नवीन काळाची सुरुवात आपल्या दैनिकाने करूया म्हणून आपल्या दैनिकाचे नामकरण त्यांनी 'नवाकाळ' म्हणून केले. त्यानुसार 'नवाकाळ' हे दैनिक वृत्तपत्र फाल्गुन वैद्य ५ शके १८४४ म्हणजे बुधवार, ७ मार्च १९२३ रोजी रंगपंचमीच्या दिवशी सुरू केले. या वृत्तपत्रांचे अंक गिरगाव, मुंबई 'नवाकाळ' ऑफिसात प्रसिद्ध केले जात असे.

'नवाकाळ' या वृत्तपत्राची स्थापना करत असताना काकासाहेब खाडिलकर यांच्यासमोर काही ध्येयं होती. लोकमान्य टिळकांवर त्यांची अनन्य भक्ती होती. लोकमान्य टिळकांच्या विचारसरणीचे ते एकनिष्ठ पाईक होते. लोकमान्यांच्या पश्चात नव्या परिस्थितीत महात्मा गांधींचे राजकारण हे आपल्या गुरूच्या विचारांची पुढील पायरी आहे, असे ते म्हणत. त्याबरोबर यापुढे कोणाचीही ताबेदारी पत्कराची नाही, हा निर्णयही त्यांनी घेतला. त्यातूनच 'नवाकाळ' निर्मितीची वाटचाल सुरू झाली.

काकासाहेबांच्या पत्रकारितेचा प्रारंभ हा केसरीतून झाला त्याचा प्रथम वृत्तांत मांडला आहे.

## २.२ 'नवाकाळ' चे संस्थापक काकासाहेब खाडिलकरांच्या पत्रकारितेचा प्रारंभ :-

'नवाकाळ' वृत्तपत्राची स्थापना होण्यापूर्वी काकासाहेब खाडिलकरांनी लोकमान्य टिळकांच्या सानिध्यात 'केसरी' वृत्तपत्रामधून कार्य केले. त्याचे 'केसरी' तील अग्रलेख मोठया प्रमाणात गाजले. सन १९०८ साली टिळकांवर ज्या अग्रलेखांमुळे राजद्रोहाचा खटला भरला. ते अग्रलेख खाडिलकरांनीच लिहिलेले होते. परंतु संपादक या नात्याने लोकमान्य टिळकांनी त्याची सर्वस्वी जबाबदारी स्वतःवर घेतली. काकासाहेब खाडिलकरांचे केसरीतील पदार्पण हे त्याच्या एल.एल.बी. च्या अभ्यास काळात झाले.

**काकासाहेबांचा 'केसरी'त प्रवेश :-**

काकासाहेबांनी 'केसरी'तील प्रवेशाबाबतची माहिती 'खाडिलकरांनी ॐकाराची उपासना' या ग्रंथात कथन केली होती.

''संसाराचे काळजीखाली मन खचून गेल्यावर जी स्वप्ने पडतात ती सूचक असतात. काळजीचे ओझे मनाला असह्य वाटू लागले म्हणजे आत्म्याची शक्ति जागी होते. 'असे कर' म्हणून स्वप्नामार्फत अर्धवट मार्ग दाखविते. सेंकड एल.एल.बी टर्म संपल्यावर पुढे काय करावयाचे ह्याची मला काळजी लागली होती. परिक्षेला बसण्या इतपत अभ्यास झालेला नव्हता. कोठे लिहिण्याची सोय होईल काय ह्या विवंचनेत मी होतो, ही विवंचना सुरू झाल्यानंतर स्वप्नांत 'केसरी' ही अक्षरे दोनदा स्पष्ट दिसली. जागेपणीही लय लाविला असतांना तोच प्रकार स्पष्टपणे अनुभवास आला. पुढे दे. नारायण बापूजी कानिटकर ह्यांची व माझी गाठ श्री. गणपतराव पागे ह्याचे मार्फत पडली. त्यावेळी मी लिहिलेले 'सवाई माधवराव' हे नाटक आणि श्री. गोळ्यांनी लिहिलेल्या 'ब्राम्हण व त्याची विद्या' ह्या पुस्तकावरील माझी टीका 'विविधज्ञान विस्तार' ह्या मासिकांतून प्रसिध्द झाली होती. हे मासिक दे. नारायण बापूजी कानिटकर ह्याच्या वाचण्यात येत असे माझे दोनही लेख त्याच्या वाचनांत आलेले होते. माझा अभ्यास झालेला नाही असे शेवटची टर्म भरीत असतांना मी म्हटल्यावरून त्यांनी 'केसरी'चे नाव सुचविले.

पुढचे टर्मचे दिवस पुरे होताच शुक्रवारी मुंबई सोडून शनिवारी सकाळी पुण्यास गेलो. जातक्षणी दे. नारायण बापूजी कानिटकर ह्यांना भेटलो, दोन प्रहरी लो. टिळकांना भेटून काय ते सांगतो, असे उत्तर आले. मी संध्याकाळी पुन्हा भेटावयास गेली तेव्हा मला 'लो. टिळकांकडे उद्या घेऊन जातो' असे दे. कानिटकरांनी सांगितले. मी कोण आहे आणि माझे लेख कसे आहेत, ह्याविषयी दे. कानिटकरांनी सर्व काही सांगावयाचे होते ते सांगून टाकलेले होते. म्हणून रविवारी गाठ पडली असतांना एकदम 'केसरी'साठी अग्रलेख लिहिण्यास लो. टिळकांनी मला सांगितले. तो विषय 'राष्ट्रीय महोत्सवांची आवश्यकता' हा होता. श्री. गणपती महोत्सवाला आरंभ होण्यास १८९६ साली दोन आठवड्याचा अवधी होता. मला विषय देताना कशा तऱ्हेने लिहिला असता त्यांना तो पसंत पडेल हे सांगून अमूक अमूक पुस्तकातून त्याची माहिती आलेली आहे हेहि मला सांगून टाकले!

रविवार दिवस माहिती गोळा करण्यात मी घालविला आणि सोमवारी सकाळी अग्रलेख लिहून टाकला. माझा तो लेख माझे मित्र रा. वामनराव पटवर्धन व रा. गणपतराव अभ्यंकर ह्यांना वाचावयास दिला, त्यांनी पसंत केल्यावर लो. टिळक यांचेकडे तो लेख घेऊन गेलो. लो. टिळकांनी वाचून पाहिला आणि प्रुर्फ तपासण्याकरिता तुम्हास येण्याची आवश्यकता नाही, मीच प्रुर्फ तपासून देतो, असे मला सांगितले.''[१]

अशाप्रकारे काकासाहेबांचा 'केसरी'त प्रवेश झाला. अगोदर लेख लिहिण्याचा अनुभव असल्यामुळे टिळकांनी त्यांना अग्रलेख लिहिण्यास सांगितले. तसे काकासाहेबांनी मेहनतीने लेख लिहिला.

''दुसरे दिवशी म्हणजे ता. १ सप्टेंबर १८९६ रोजी काकासाहेबांचा हा पहिला लेख अग्रलेख म्हणून टिळकांनी प्रसिध्द केला. पहिल्याच लेखाला अग्रलेखाचा असा मान मिळाला.

केवढा यशस्वी आरंभ ! या लेखाचा विषय 'राष्ट्रीय महोत्सवांची आवश्यकता' असा होता. राष्ट्रीयवृत्तीचा लेखक केसरीकरांचे मार्गदर्शन व राष्ट्रीयमहोत्सव हा विषय सर्वच उद्दीपक! लेख फारच सुंदर उतरला. टिळकांना तो अग्रलेख म्हणून छापण्याइतका पसंत पडला यातच त्याचे वैशिष्टय आहे. या लेखापासूनच ते 'केसरी'च्या संपादक वर्गात दाखल झाले. जन्मापासून पारतंत्र्याचा तिटकारा त्यांचे अंगी बाणला होता. आपल्या सारख्या सुशिक्षिताच्या

जीवनाला जे वळण लागावे, शिक्षणाचे ज्या तऱ्हेने देशकार्यात पर्यवसान व्हावे असे त्यांना वाटत असे तसेच विधिघटनेने घडून आले.''[२]

अशाप्रकारे वकिलीच्या परिक्षेस बाजूस सारून ही मातृभूमीच्या सेवेची मिळालेली संधी त्यांनी शूरवृत्तीने स्विकारली.

**काकासाहेबांचे केसरीतील अग्रलेख :–**

''१८९६ च्या एक सप्टेंबरला काकासाहेबांचा केसरीत प्रवेश झाला. काकासाहेबांकडून टिळकांनी जो पहिला लेख लिहून घेतला तो एक सप्टेंबरच्या अंकात अग्रलेख म्हणूनच टिळकांनी छापला. पहिल्याच लेखाचा असा अग्रलेखाचा मान टिळकांकडून दिला जावा ही काकासाहेबांच्या दृष्टीने भाग्याचीच बाब म्हटली पाहिजे. त्या लेखाचा विषय 'राष्ट्रीय महोत्सवाची आवश्यकता' हा होता व त्याच मथळ्याने तो प्रसिध्द झाला. १९०२ साली काकासाहेबांची 'गनिमी काव्याचे युध्द' ही लेखमाला प्रसिध्द झाली आणि त्याच वर्षी काकासाहेब नेपाळात गेले. ते १९०५ साली परत आले. १८९७ साली टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखाली ज्या लेखांवरून शिक्षा झाली, त्यात काकासाहेबांनी लिहिलेला 'विभूतिपूजा'हा लेख व 'स्फुट सूचना' या सदरात शिवाजी उत्सवाचा खाडिलकरांनीच लिहिलेला अहवाल यांनाही महत्वाचे स्थान होते. पुढे १९०८च्या खटल्याच्या वेळीही, आक्षेपार्ह लेखात काकासाहेबांच्या लेखाचा अंतर्भाव होता. महत्वाचे लेख काकासाहेबांच्या हातचे होते. १८९७ची शिक्षा झाल्यावर आणि सुटून आल्यावरही जवळजवळ अकरा महिन्यांनी टिळकांनी आपले नाव पुन्हा संपादक म्हणून घालीपर्यंत म्हणजे ४ जुलै १८९९ पर्यंत न. चिं. केळकर यांच्या नावेच 'केसरी' निघत असला. तरी संपादकीय अग्रलेख खाडिलकरच लिहित असत. टिळक तुरुंगात गेले तेव्हा खाडिलकर व केळकर यांना 'केसरी' संस्थेत येऊन जेमतेम वर्ष झाले असेल. पण ४ जुलै १८९९ च्या अंकात 'पुनश्च हरिः ओम' हा मंत्रोच्चार करताना 'बेमालूम सांधा जुळविला' अशी खास शाबासकी टिळकांनी खाडिलकरांना दिली होती. त्यावेळी खाडिलकर अवघे सत्तावीस वर्षाचे होते. टिळकांना झालेल्या शिक्षेविषयी खाडिलकरांवरच लिहिण्याचा प्रसंग आला. लोकांत सरकारविषयी 'अप्रीती' उत्पन्न करण्याचा आरोप टिळकांवर ठेवण्यात आला

होता. तरुण खाडिलकरांनी प्रगल्भ अनुभवी संपादकाला शोभेल, अशारीतीने ती जबाबदारी पार पाडली.''[३]

केसरीतील संपादकीय कार्य पार पाडत असताना काकासाहेबांचा लोकमान्य टिळकाप्रमाणेच कणखरपणा दिसून येतो.

काकासाहेबांचे 'केसरी'तील लोकमान्य टिळकांच्या राजद्रोह खटल्यास कारणीभुत झालेले लेख काकासाहेबांनी 'केसरी'त जे लेख लिहिले त्यावरून लोकमान्य टिळकांच्यावर राजद्रोही खटला भरण्यात आला त्या लेखाबद्दल थोडक्यात विवेचन मांडले आहे.

''१९०८ साली लो. टिळकांवर राजद्रोहाचा जो खटला झाला. त्यात आठ लेख सरकार तर्फे आक्षेपार्ह म्हणून सादर करण्यात आले होते. त्या लेखापैकी तीन टिळकांचे व पुढील पाच खाडिलकरांचे होते ते असे–

१) दुहेरी इषारा (केसरी, १९ मे १९०८)
२) बॉम्बगोळ्यांचा खरा अर्थ (केसरी, २६ मे १९०८)
३) बॉम्बगोळ्यांचे रहस्य (केसरी, २ जून १९०८)
४) हे उपाय टिकाऊ नाहीत (केसरी, ९ जून १९०८)
५) स्फुट सूचना (केसरी, ९ जून १९०८)

स्फुट सुचनेत म्हटले होते की,'द्रारिद्र्य , दुष्काळ व द्रव्यशोष' या तीन 'द' कारांचा दपटशा मार्ग लागलेला. यातून राष्ट्राचे डोके वर उचलण्याचा यथाशक्ती प्रयत्न करू लागले की, इंग्रजी राज्यपध्दतीच्या वरवंटयाने डोके ठेचलेच! अशास्थितीत हिंदुस्थानात आता बॉम्ब पक्ष व गुप्त मंडळ्या उद्भवल्या ही गोष्ट शोचनीय असली तरी बिलकूल आश्चर्याची नाही.''[४]

काकासाहेबांनी लिहिलेले लेख ऐवढे प्रखर होते की ब्रिटिशांना त्या लेखावर विचार करण्यास भाग पाडले गेले. आणि त्यातून लो. टिळकांवर राजद्रोहाचा खटला निर्माण झाला.

''१९०८ च्या मध्यांत टिळक सरकारच्या रोषाला बळी पडले. त्यांना सहा वर्षाची शिक्षा ठोठावून सरकारने त्यांची मंडालेस रवानगी केली. यावेळी केसरीचे संपादकत्व प्रत्यक्षपणे काकासाहेबांकडे आले. ते सुमारे दीड वर्षेच त्यांनी मोठया खबरदारीच्या धडाडीने चालविले.

१८९७ साली टिळकांना शिक्षा झाली तेव्हा लोकांमध्ये राजकीय जागृती व संवेदना अगदीच कमी असल्याने त्यांचा क्षोम मनांतल्या मनांतच राहिला. १९०८ साली वरील दोन्ही गुण बरेच बळावले असल्यामुळे मुंबई शहरी टिळकांच्या शिक्षेनिमित्त मजुरांनी दंगे केले.काकासाहेबांच्या मननशील विचारप्रवृत्तीला हा एक चांगला विषय सापडला व दंग्याचे वातावरण शांत झाल्यावर 'सर्वातपुढे मुंबईच का?' या मथळ्याची लेखमाला त्यांनी लिहिली. या लेखमालेने 'गनिमी काव्याच्या लढाई' प्रमाणेच लोकांना सहसा न उमगणाऱ्या विचारांचे दर्शन घडविले. समाजातील शेतकरी, कामगार, कारकून, व्यापारी इत्यादि भिन्न भिन्न विभागांच्या जीवनाची मीमांसा करुन या लेखमालेने देशांतील राजकीय विचाराला नवे ज्ञान पुरविले. तिकडे युरोपांत मुंबईतल्या दंग्याची बातमी ऐकून रशियात सोव्हिएत राज्यव्यवस्था अंमलात आणणाऱ्या लेनिनने टिळकांच्या पुढारीपणाचे कौतुक गाईले असे म्हणतात.''[५]

थोडक्यात काकासाहेबांच्या अग्रलेखामुळे सर्वच समाजवर्गासाठी योग्य दिशा मिळाली राजकीय विचाराला नवे ज्ञान पुरविले.

**काकासाहेबांचे लोकमान्य दैनिकाचे नेतृत्व :–**

लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर १९२० साली केसरी–मराठयाच्या व्यवस्थेत काकासाहेबांना स्थान नाही असे दिसून आल्यावर मुंबईतील 'लोकमान्य' या दैनिकची संपादकीय धुरा दोन वर्षे अंगावर वाहिली.

'केसरी' कचेरीतून जसे एकदा काकासाहेब तडकाफडकी बाहेर पडले होते, अगदी तसेच आता 'लोकमान्य' दैनिकाच्या कचेरीतून बाहेर पडले आणि स्वतःचे नवीन वृत्तपत्र काढण्याचा निर्णय घेऊन १९२३ च्या मार्च मध्ये त्यांनी स्वतःचे 'नवाकाळ' हे दैनिक काढले व देशसेवेचे कडकडीत व्रताचरण पुढे स्वतंत्रपणे चालू केले.

## २.३ 'नवाकाळ' वृत्तपत्राची स्थापना :–

''कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर हयांनी 'लोकमान्य' दैनिकाशी असलेला आपला संबंध एका सपाटयासरशी तोडला आणि ते बाहेर पडले हा निर्णय त्यांनी तडकाफडकी घेतला हे खरे असले तरी, कधी तरी असा प्रसंग येणार असल्याचा विचार

त्यांच्या मनात रेंगाळत असला पाहिजे. त्यांच्या मानी स्वभावाला दुसऱ्यांच्या ताबेदारीत फार काळ राहणे पटणारे नव्हते. यापूर्वी स्वाभिमान दुखावला जाताच 'केसरी' तून ते दोनदा बाहेर पडले होते, यामुळे 'लोकमान्य' तून तेवढयात तडफेने ते बाहेर पडू शकले. जम बसवून नवी जबाबदारी पेलण्याच्या दृष्टीने आसन सुस्थिर करीत असतानाच ते काढून घेतले जाण्याचा वा हवे तसे वळविले जाण्याचा प्रसंग काकासाहेबांच्यावर आला. पूर्वीचा अनुभव पदरी असल्यामुळे यावेळी दुसऱ्यांची ताबेदारी कायमची तोडून, खो-खो च्या खेळातला भिडू यापुढे व्हावयाचे नाही असे त्यांनी मनोमन निश्चित केले होते असे दिसते. नव्या परिस्थितीत राजकारणाबद्दलही त्यांनी विचार करुन आपला निर्णय पक्का केला होता. 'राजकारणात महात्मा गांधी ही नवी शक्ती प्रविष्ट होत आहे, तिचे स्वागत आपण केलेच पाहिजे'; हे खुद्द लोकमान्यांनी त्यांच्यापाशी काढलेले उद्गार राजकीय भूमिकेबाबतच्या त्यांच्या निर्णयाला पोषक ठरले. लो. टिळकांवर त्यांची अनन्य भक्ती होती. लोकमान्यांच्या विचारसरणीचे ते एकनिष्ठ पाईक होते. लोकमान्यांच्या पश्चात, नव्या परिस्थितीत महात्मा गांधीनी राजकारण हे आपल्या गुरुच्या विचारांची पुढली पायरी आहे. त्याबाबत नसत्या शंकाकुशंका काढीत बसणे अप्रस्तुत होय, असा त्यांच्या बुध्दीचा पक्का निर्णय झालेला होता. हा निर्णय अंमलात आणावयाचा तर जुन्या सहकाऱ्यांपासून स्वतंत्र असे व्यासपीठ आपल्यासाठी उभे करणे हाच निर्वेध मार्ग होता. 'लोकमान्य' दैनिकात आपल्या बुध्दीच्या निर्णयाप्रमाणे त्यांनी लेखन केले. पण ती भूमिका निर्वेधपणे चालविणे अशक्य होणार असल्याचे दिसताच त्यांनी पत्र सोडले आणि त्याचबरोबर यापुढे कोणाचीही ताबेदारी पत्कारावयाची नाही हा निर्णयही त्यांनी घेतला. 'लोकमान्य' चा संबंध तोडल्यावर यामुळेच आपण काय करावयाचे याबाबत ते चटकन निर्णय करु शकले. एक प्रकारे त्यासाठी त्यांच्या मनाची तयारी अगोदरपासूनच होऊ लागली होती. वेळ येताच त्यांनी आपली दिशा सहज धरली. टिळक गेले आणि गांधी आले. त्यांनी आपले असे एक युगच सुरु केले. त्या क्रांतीची पावले काकासाहेबांनी ओळखली, तिची पायरव त्यांच्या कानी पडली, आणि ते समजून चुकले की जुना काळ संपला आहे, नवा काळ येत आहे, त्याला आपण पाठमोरे न होता सामोरे गेले पाहिजे. म्हणूनच 'नवाकाळ' हे पत्रनाम घेऊनच काकासाहेब पुढे सरसावले. शिवरामपंत परांजपे हयांचा 'काळ' कधीच मागे पडला. आता 'नवाकाळ' पुढे आला आहे; त्याच मार्गाने पुढे गेले पाहिजे. अगदी निश्चिंत मनाने व मनात कोणताही संभ्रम न राहता

काकासाहेबांनी गांधीजीचा मार्ग पत्करला. पण आपल्या मूळपीठाचे गुणधर्म जसेच्या तसे कायम राखूनच ते मार्गक्रमण करु लागले, महाराष्ट्रात शंकरराव देव, काकासाहेब कालेलकर आदी मंडळी गांधीच्या विचारांशी जेवढी समरस झाली. तेवढे काकासाहेब समरस झाले असे म्हणता येणार नाही. गांधीचे नेतृत्व त्यांनी मानले. तरी गांधीवादाशी ते कधीच तध्द्रुप झाले नाहीत. गांधीवादाचे कर्मकांड त्यांनी स्विकारले नाही. टिळकांचे तत्वज्ञान आणि गांधीचे तत्त्वज्ञान हयात काही मूलभूत फरक आहे. पण म्हणून हे दोन्ही विचार पूर्ण विरोधी होते असे नव्हे. काकासाहेबांना संपूर्ण गांधीवादी म्हणता येणार नाही. पण ते गांधी संवादी मात्र खास होते.''[६]

थोडक्यात लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर काकासाहेबांनी नवीन काळानुसार वृत्तपत्राचे नामकरण करून 'नवाकाळ' सुरु केला.

''काकासाहेबांच्यावर 'लोकमान्य' सोडण्यास लावून नवी आपत्ती आणण्यात असाच काही ईश्वरी संकेत दिसतो. त्या भावनोद्रेकाच्या आवेशात त्यांनी आपल्या जीवनांतून 'लोकमान्य' वृत्तपत्रास दूर केले. त्याच भावनेच्या उर्मीसरशी त्यांच्या मनापुढे 'नवाकाळ' ची कल्पना उभी केली. ज्या वाणीने त्यांनी आपण 'लोकमान्य' सोडला असे जाहिर केले त्याच वाणीतून त्याच वेळी 'नवाकाळ' ही अक्षरे ही उच्चारली.'मी माझे स्वतंत्र 'नवाकाळ' नामक दैनिक काढीन' असे सांगून काकासाहेब 'लोकमान्य' कचेरीतून बाहेर आल्यावर काकासाहेबांना साहजिकच बरेच प्रश्न सोडवयाचे होते. एक तर काळ बदलला होता. काकांचा हा निर्णय अवघड परिस्थितीत घेतला गेला होता. स्वपक्षीयांत मतभेद तीव्र झाले होते. लोकमान्यांचे बरोबर काम करताना कोणत्याही कार्यास पक्षाचे बल संपूर्णतेने मिळे, तशी स्थिती आता उरली नव्हती. या काळात कार्यांपेक्षा मतभेदाच्या वाग्युध्दांत बरीच शक्ती खर्ची पडत होती. स्वपक्षातील मतभेदामुळे उत्पन्न झालेल्या अडचणी लक्षात घेऊन लेखन करावे लागत असे.

दुसरे, काकांनी आपल्या त्यागी वृत्तीमुळे संपतीसंग्रह कधीच केलेला नव्हता. लोकमान्यांत त्यांना आरंभापासून दरमहा पाचशे रुपये पगार ठरला होता. तरी ते त्या पत्राच्या प्राथमिक अवस्थेकडे पाहून फक्त तीनशे रुपये घेत असत. दैनिक पत्राच्या नित्याच्या दंगलीत, 'द्रौपदी' नंतर दुसरे नाटक लिहावयास त्यांना स्वस्थता मिळाली नाही. थोरल्या बंधुच्या मृत्युनंतर सर्वच कुटुंबाच्या योग क्षेमाचा बोजाहि त्यांचेच शिरावर होता. अशा अडचणीच्या

आर्थिक कोंडीत स्वतःच्या जबाबदारीवर नव्या दैनिकाची उभारणी ते आपल्या आत्मविश्वास कार्यनिष्ठ, उद्योगप्रियता व चिकाटी या गुणांच्या बळावर करणार होते.''[७]

काकासाहेब खाडिलकरांनी 'नवाकाळ' वृत्तपत्र काढण्याची भावना ऐवढी तीव्र होती की कितीही आर्थिक अडचणी आल्यातरी त्यास सामोरे जाण्याची तयारी त्यांची होती.

**वृत्तपत्राचे शीर्षक 'नवाकाळ'** :–

काकासाहेब खाडिलकरांनी आपल्या पत्रास 'नवाकाळ' हे शीर्षक दिल्याचे स्पष्टीकरण न. र. फाटक यांनी दिले ते पुढील –

''आज ना उद्या, 'लोकमान्य' पत्र सोडावे लागणार या जाणिवेणे काकासाहेबांच्या अंतरंगात विचारांची जी ओढाताण चालली होती. तिच्या परिणामी 'नवाकाळ' हे नाव आधीच स्फुरलेले होते व योग्य वेळ येताच ते चटकन उच्चारले गेले. 'नवाकाळ' शब्दात एकार, उकार, रफार, जोडाक्षरे, वेलांटी यांचा अभाव आहे. त्यामुळे दर्शनी मोठया आकाराच्या अक्षरांचा ब्लॉक करायला सोपा असाही एक खुलासा प्रसिध्द असल्याचे काकासाहेबांचे प्रदीर्घ काळ सहकारी असलेले न. र. फाटक यांनी म्हटले आहे.''[८]

वृत्तपत्रास योग्य असे शीर्षक दिले गेले आहे.

**'लंडन टाइम्स' चा आदर्श** :–

'लंडन टाइम्स' हे काकासाहेब खाडिलकरांचे आदर्श दैनिक होते. त्याचाही 'नवाकाळ' हे नाव देण्याशी संबंध होता.

'' 'नवाकाळ' साठी घ्यावयाच्या वृत्तपत्रात पहिला मान 'लंडन टाइम्स' ला होता. 'नवाकाळ' मधील अग्रलेखाच्या मथळयावरचे जे चित्र असते, ते 'लंडन टाइम्स' च्या धर्तीचे असते. त्याचप्रमाणे पत्राच्या पानावर उजवीकडे सुरुवातीस अग्रलेख टाकण्याचा प्रयासहि खाडिलकारांनी 'लंडन टाइम्स' मधून उचलला होता. त्या दैनिकांत बातम्यांची पाने ठरलेली असतात. तशीच ठराविक जागी ठराविक बातम्या देण्याची प्रथा खाडिलकरांनी 'नवाकाळ' मध्ये अंमलात आणली.''[९]

अशाप्रकारे 'लंडन टाइम्स' हा त्यांचा सर्व प्रकारे आदर्श होता.

**'नवाकाळ' वृत्तपत्रासाठी आर्थिक मदतीचा आधार :-**

''मुंबईसारख्या ठिकाणी हाती साधनसामुग्री काहीच नसतां दैनिक वर्तमानपत्र चालू करणे ही गोष्ट सोपी नव्हती. यासाठी सर्व साधनांची जुळवाजुळव करण्यास त्यांनी ताबडतोब सुरुवात केली व अत्यंत परिश्रम घेतले. तथापि त्यांचे शब्द खाली पडू नयेत म्हणून 'आपणास आम्ही सर्व तऱ्हेची मदत करु' अशी आश्वासने त्याच्याकडे सर्व बाजुनी येत होती. डॉ. नानासाहेब देशमुख व श्री. वासूकाका जोशी यांचा काकासाहेबांना सर्वोतोपरी आधार होता, काही धनिक गृहस्थ काकासाहेबांच्यासाठी स्वतंत्रपणे दैनिक काढून देण्यास तयार होते. म्हणून त्यांनी आपल्या हितचिंतकाकडून इतक्यापुरती अवश्य ती मदत घ्यावयाचे ठरविले.

यं.दे. शेखदार यांचा 'इंदुप्रकाश' छापखाना गिरगाव रोडवर होता व त्यात 'इंदुप्रकाश' दैनिकांसाठी काम करणारी बहुतेक सर्व मंडळी थोडया थोडया प्रमाणात 'नवाकाळ' वर्तमानपत्रासाठी ही काम करु लागली. किती तरी माणसांनी मदत करावी. तेव्हा एक कार्य होते. अशी बरीच मंडळी काकासाहेबांना 'इंदुप्रकाश' मध्ये मिळाली. वर्तमानपत्राचे विक्रेत श्री. बागवे हे मुंबईच्या विक्रीची उत्कृष्ट व्यवस्था करण्यास उभे होतेच.''[१०]

'नवाकाळ' वृत्तपत्राची सुरुवात करण्यासाठी छापखान्यापासून ते वृत्तपत्राच्या विक्रीपर्यंत अनेकांनी मदतीचा हात पुढे केला होता.

**'नवाकाळ' वृत्तपत्राचे स्थापनेवेळेचे संपादक मंडळ :-**

वृत्तपत्र सुरु करावयाचे तर संपादक मंडळ हवे! त्यानुसार काकासाहेब खाडिलकरांनी सुध्दा आपल्या 'नवाकाळ' वृत्तपत्रासाठी संपादक मंडळ निर्माण केले.

''संपादक मंडळीत पहिल्या प्रथम अधिक मंडळी नव्हती. स्वतः काकासाहेब, लोकमान्यातून त्यांचे बरोबरचं नोकरी सोडून आलेले त्यांचे पुतणे श्री. नाना खाडिलकर या दोघांवरच मुख्यतः सर्व लेखनाचा भार होता. आप्पाराव कुलकर्णी हे मुंबई शहराचे बातमीदार म्हणून करीत.''[११]

| संपादक मंडळ |
|---|
| संपादक – श्री. काकासाहेब खाडिलकर |
| मुख्यउपसंपादक – श्री. नाना खाडिलकर |
| बातमीदार – श्री. आप्पाराव कुळकर्णी |

असे 'नवाकाळ' वृत्तपत्राचे पहिल्या प्रथमचे मोजके तीन व्यक्तीचेच संपादक मंडळ होते.

## २.४ 'नवाकाळ' वृत्तपत्राचा पहिला अंक :–

काकासाहेब खाडिलकरांना लवकरात लवकर 'नवाकाळ' वृत्तपत्राचा पहिला अंक जनतेसमोर आणावयाचा होता. तशी त्याची जोरात तयारी ही चालू होती.

''शक्य तितक्या लौकर 'नवाकाळ' सुरु झालाच पाहिजे, असा काकासाहेबांचा कटाक्ष होता. त्यामुळे वरील तऱ्हेचे वर्तमानपत्राची जुळणी चालविली असताचं त्यांनी श्री. गुर्जर ज्योतिषी यांस ते सुरु करण्यास उत्तम दिवस कोणता याची विचारणा केली. त्यांनी पंचांग पाहून सुमारे ३/४ महिन्यांनी उत्तम मुहूर्त असल्याचे सांगितले. त्यावर 'मला या आठ दिवसात माझे वर्तमानपत्र सुरु करावयाचे आहे. या आठ दिवसात कोणता चांगला दिवस आहे ते सांगा.' असे काकासाहेबांनी सांगितल्यावर शके १८४४ फाल्गुन वैद्य ५ बुधवार ता. ७.३.१९२३ हा सुमुहूर्त श्री यांनी काढून दिला.

'नवाकाळ' आकर्षक व्हावा यासाठी काकासाहेबांनी आपल्या सहकाऱ्याच्या मदतीने खुप श्रम घेतले व शेवटी ता. ६–३–२३ रोजी रात्री योग्यवेळी सर्व मजकूर तयार झाला. पण छापणारे मशीन काम बरोबर देईना त्यासाठी काकासाहेब बराच वेळपर्यंत मशीन समोर दुरुस्तीच्या सूचना करीत उभे होते''[१२]

'नवाकाळ' वृत्तपत्रासाठी मुहूर्त काढला परंतु तांत्रिक अडचणी समोर आल्या.

''बराच वेळ झटापट आणि खटपट केल्यानंतर मशीन एकदाचे दुरुस्त होऊन पहिला अंक ७ मार्च १९२३ रोजी रंगपंचमीच्या दिवशी बाहेर पडला.''[१३]

अशाप्रकारे अनेक अडचणींवर मात करत 'नवाकाळ' वृत्तपत्राचा प्रकाशित झाला.

**'नवाकाळ' वृत्तपत्राच्या पहिल्या अंकाचे स्वरुप :–**

'नवाकाळ' वृत्तपत्राच्या पहिल्या अंकाचे स्वरुपाचे विवेचन येथे थोडक्यात मांडले आहे.

''पत्राच्या नावाखाली 'सोमवारखेरीज करुन दररोज प्रसिध्द होतो' या टीपेखेरीज महाभारतातील पुढील श्लोक होता.

**कालो वा कारणं राज्ञो राजा वा कालकारणम् ।**

**इति ते संशयो माभूद्राजा कालस्य कारणम् ।।**

पहिल्या पानावर सर्व जाहिराती होत्या पान दोनवर सबर्बन जिल्हा परिषद पहिले अधिवेशन, काँग्रेस वर्किंग कमिटीचा दौरा, महाराष्ट्रातील चळवळ, पुणे येथील गांधी आठवडा, मुंबईच्या बातम्या, इ. मजकूर होता. पान तीनवरही सर्व जाहिराती होत्या, पान चारवर हिंदी राजकारण कौन्सिल ऑफ स्टेट, लेजिस्लेटिव्ह असेंब्ली ना. शास्त्री यांचा ठराव पास झाला, मुंबई कायदे कौन्सिलची बैठक असा मजकूर होता. पान पाच हे अग्रलेख होता. शिवाय तुर्कांचे धोरण, मवाळ व मीठ, दे कोंडा वेंकट्अपय्या इ. मजकूर होता. पान सहा व आठवर पुन्हा जाहिराती होत्या, पुस्तक परिक्षण, पुण्याची खबरबात, हरिभाऊ आपटे यांची पुण्यतिथी, बाजारभाव, शेअर बाजार इत्यादी मजकुराने सात पान व्यापले होते. पत्राच्या शेवटी पुढील प्रमाणे प्रेस लाईन होती.

'हे पत्र रा.अनंत गणेश शेकदार यांनी गिरगांव रोड, घर नं. ३८८ येथे इंदुप्रकाश छापखान्यात छापले व रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर संपादक 'नवाकाळ' यांनी गिरगांव रोड नं. ३८८ येथे 'नवाकाळ' ऑफिसात प्रसिध्द केले.

फुटकळ अंकांची किंमत एक आणा होती.

'लोकमान्य' पत्राप्रमाणेच 'नवाकाळ' दैनिकातील पहिला अग्रलेख 'स्वतः संबंधाने' याच मथळयाचा होता अग्रलेखावरती 'न मे भक्तः प्रणश्यति' हे वचन होते. अग्रलेखाच्या मथळयाखाली

**'संतांची उच्छिष्टे बोलतां उत्तरे ।**

**काय म्यां पामरें जाणावें हे ।।**

हे तुकारामाचे वचन होते.''[१४]

थोडक्यात अतिशय सुरेख व विविधतेचा समावेश असलेला असा 'नवाकाळ' वृत्तपत्राचा पहिला अंक होता.

**'नमे भक्तः प्रणश्यति 'नवाकाळ' अग्रलेखावरील गीतावचन –**

काकासाहेब खाडिलकरांनी 'नवाकाळ' वृत्तपत्रातील अग्रलेखावरील गीतावचन नमुद केले होते. ते नमुद करण्यामागचा उद्देश पुढील.

''देशातील बहुसंख्य लोकांची जी राष्ट्रीय सभा तिच्या मतांच्या पुर्णतया पाठ पुरावा करावयाचा हे लोकमान्य टिळकांच्या वेळेपासूनचे धोरण गांधी युगातील राष्ट्रीय सभेच्या मताचा प्रचार दणदणीत पुरस्कार करण्याचे धोरणाशी अगदी तंतोतंत जुळणारेच होते. 'लोकमान्य' पत्राच्या अग्रलेखावर त्यांनी 'मामनुस्मर युध्दच' असे गीतेतील वचन लोकमान्यांना उद्देशूनच घातले होते. लोकमान्यांवरील आत्यतिक निष्ठेमुळे त्यांच्या स्मरणार्थ काढलेल्या दैनिकाला 'लोकमान्य' हे नाव दिले होते. आता स्वतःच्या मालकीचे स्वतंत्र दैनिक काढले तरी त्यांच्या अंतःकरणातील लोकामन्यांवरील व्यक्ति तितकीच जागृत होती. म्हणून त्यांनी आत्मविश्वासाने 'नवाकाळ' हे नवे नाव देऊन काढलेल्या नव्या दैनिकाच्या अग्रलेखावर 'नमे भक्तः प्रणश्यति' असे गीतावचन उद्‌धृत केले. 'लोकमान्यांचा खरा भक्त आहे तो कधीच नाश पावत नाही,' असेच त्यांना आपल्या विरोधकांना सांगावयाचे होते. 'राजा कालस्य कारणम्' हा 'नवाकाळ' च्या मथळयाखालील श्लोक निवडण्यांतही त्यांनी स्वतःची निष्ठा व कालाचे औचित्य दाखविले आहे.''[१५]

**'नवाकाळ' चा पहिला अग्रलेख :–** 'नवाकाळ' च्या पहिल्या अंकातील पहिला अग्रलेखच मुळी त्यांनी 'स्वतः संबंधाने' या शीर्षकाने लिहिला असून महाराष्ट्रीयजनतेपुढे आपले हृदय खुले केले आहे. त्यात सर्व गोष्टी संगतवार खुलाशाने सांगितल्या असल्यामुळे तो सर्व लेखच येथे देणे अधिक उपयुक्त दिसते.

**''स्वतः संबंधाने**

**संतांची उच्छिष्टे बोलतां उत्तरे ।**

**काय म्यां पामरें जाणवें हें ।।**

तुकाराम..

वाचकाचा व रा. खाडिलकर यांच्या लेखाचा आज नव्या स्वरुपात पुनः परिचय होत आहे. हा परिचय जरी असला तरी १८९६ सालापासून रा. खाडिलकर याच्या लेखाचे धोरण वाचकास माहित असल्यामुळे धोरणासंबंधाने नवी ओळख करुन देण्याची जरुरी नाही. लो. बाळ गंगाधर टिळक याचे शिष्यत्व स्वेच्छेने व आनंदाने स्वीकारुन ज्या मताचा अंगिकार रा. खाडिलकर यांनी केला. ती मते आज जशीच्या तशी कायम आहेत. लो. टिळक यांनी आपल्या विचारसरणीला जे वळण लावले. ते वळण म्हणजे सद्गुरुचा मोठा प्रसाद होय, असा रा. खाडिलकर याचा दृढ विश्वास असून गेली दोन वर्षे 'लोकमान्य' पत्राचे संपादक या नात्याने सांप्रतच्या नव्या काळात त्यांनी धोरण स्विकारले होते. तेच धोरण नव्या पत्राच्या रुपाने आजपासून वाचकापुढे मांडण्यात येत आहे. मा. गांधी यांनी सुरु केलेली असहकारितेची चळवळ म्हणजे लो. टिळक यांच्या धोरणाचे परिपक्व फळ होय. या विषयी सर्व विचारी लोकाची एकवाक्यता झालेली आहे. ज्या वृक्षाचे बीजारोपण लो. टिळक यांनी केले, जो वृक्ष लो. टिळक याच्या हयातीतच वाढीस लागून फलोन्मुख झाला व ज्या वृक्षाचे पूर्ण स्वरुप महात्मा गांधी याच्या चळवळीमुळे जनतेच्या दृष्टीस पडले, त्या वृक्षाच्या सावली खाली बसून 'नवाकाळ' आपले रोजचे काम करणार आहे. 'नवाकाळ' पत्राचे धोरणासंबंधाने वाचकास इतके सांगितल्यावर 'लोकमान्य' पत्राशी आपला असलेला संबध रा. खाडिलकर यांना का सोडावा लागला, याविषयी थोडासा खुलासा करणे जरूर आहे. दोन वर्षापूर्वी डॉ.भडकमकर यांनी 'लोकमान्य' पत्र काढण्यासंबंधाचा पुढारीपणा स्वतःकडे घेऊन जेव्हा जुळवाजुळव केली.

त्यावेळी 'लोकमान्य' पत्राचे मॅनेजिंग एजट्स रा.खाडिलकर व डायरेक्टर मंडळीतील प्रमुख चालक यांची एकजूट होती. कॉंगेसचा पक्ष व कौन्सिलचा पक्ष असे मतभेद होऊ लागल्यावर मूळची जूट कायम राहिली नाही. मॅनेजिंग एजन्टमधील डॉ.भडकमकर यांचा पुढारीपणा नाहीसा होऊन कौन्सिलवाल्या पक्षाचे रा. मंडलिक मॅनेजिंग एजन्टच्या तर्फेचे एक्स ऑफिशिओ डायरेक्टर झाले आणि खुद्द डायरेक्टराचे बोर्डात आपल्या बाजूचे मताधिक्य नाही, असा अनुभव रा. खाडिलकर यांना आला. मॅनेजिंग एजन्टस म्हणजे रोजचे कामकाज पाहणारे एक तऱ्हेचे मालकच होते. मालक भिन्न मताचा व नोकर असलेला संपादक भिन्न मताचा ही स्थिती रोजच्या कामकाजात अडचणीची होते. इतकेच नव्हे, तर उभयतासही अत्यंत त्रास व मानसिक क्लेश देणारी झाल्यावाचून रहात नाही. मॅनेजिंग एजन्टच्या तर्फेचा कारभार डॉ. भडकमकर यांचे हातून निघून गेल्यामुळे डळमळीत झालेले रा. खाडिलकर यांचे आसन, डायरेक्टराच्या बोर्डातहि आपल्या बाजूनेच नेहमी मताधिक्य होईल, असा अनुभव रा. खाडिलकर यांना न आल्यामुळे, नेहमीच डळमळीत राहणार असे रा. खाडिलकर यांना वाटले व त्यांनी लगेच 'लोकमान्य' पत्राशी आपला असलेला संबंध सोडून दिला. अशा प्रकारच्या परिस्थितीमुळे संपादक या नात्याच्या काळात पुण्यास रा . खाडिलकर यांना पूर्वी दोन वेळा खो मिळालेला होता. तो खो पुण्याहून मुंबईस आल्यावरहि तिसऱ्यांदा आपल्या सभोवती घिरटया घालीत आहे असे पाहून, असल्या खोटया डावातील मानसिक क्लेश टाळण्याकरिता स्वतःचे स्वतंत्र आसन 'नवाकाळ' पत्राच्या रुपाने घालण्याचा निश्चय रा.खाडिलकर यांनी केला आणि इष्टमित्राच्या मदतीमुळे 'नवाकाळ' पत्राचे द्वारे आपले विचार वाचकापुढे मांडण्याची संधी रा. खाडिलकर यांना मिळाली. संपादक व लेखक या नात्याने आपल्या आयुष्यातील शेवटच्या पायरीवर उभे राहून आजपासून आम्ही लो. टिळक व मा. गांधी यांचेच विचार आपल्या वेडयावाकडया पध्दतीने बोलून दाखविणार आहोत. ते बोल म्हणजे सद्‌गुरुची व संतांची उच्छिष्टे होत. ते आमच्या वाचकास माहित असल्यामुळे पुर्वीच्या स्वरुपातील आमचे लेख ज्याप्रमाणे महाराष्ट्र ातील वाचकांनी थोडक्यात घेतले. तसेच 'नवाकाळ'तील लेख वाचक गोड करुन घेतील असा 'नवाकाळ' पत्रास भरवसा वाटत आहे.''[१६]

काकासाहेब खाडिलकरांनी 'लोकमान्य' वृत्तपत्राप्रमाणे 'नवाकाळ' वृत्तपत्रात सुध्दा 'स्वतः संबंधाने' या शीर्षकाने अग्रलेख प्रकाशित केला. 'केसरी' 'लोकमान्य' या पत्रातील

कार्य व त्यातून त्यांना काही कारणामुळे बाहेर पडावे लागले. त्यातूनच त्यांना 'नवाकाळ' वृत्तपत्र काढण्याची शक्ती प्राप्त झाली.

## २.५ 'नवाकाळ' वृत्तपत्राचे ध्येय :–

काकासाहेब खाडिलकरांना 'नवाकाळ' वृत्तपत्र काढत असताना त्यांच्यासमोर काही ध्येय होते ते येथे नमुद केले आहे.

''नवाकाळ' वृत्तपत्र काकासाहेबांनी देशसेवेसाठी काढले. कॉंग्रेसचे राजकारण सर्वतोपरी उचलून धरुन ते यशस्वी करणे हे त्यांचे ध्येय निश्चित होते. 'नवाकाळ'ची संपादकीय जबाबदारी पार पाडताना ते या विषयाकडेच सर्व लक्ष पुरवीत. या काळात कॉंग्रेसमध्ये फेर–नाफेर, कौन्सिल प्रवेश, कौन्सिल बहिष्कार, स्वराज्यपक्ष, कॉंग्रेसपक्ष असे अनेक पक्षोपक्ष माजले असल्यामुळे काकासाहेबांना जनतेला मार्ग दाखविण्याचे बाबतीत फार दक्ष रहावे लागे.

राजकारणांत नव्या नव्या घडामोडी सारख्या सुरु होत्या. दासबाबूंचा कौन्सिल प्रवेशाचा ठराव गया कॉंग्रेसने संमत न केल्यामुळे त्यांनी कॉंग्रेसच्या अध्यक्षत्वाचाच राजीनामा दिला. आणि मग इतर अनेकांचे राजीनामे ही आले. यासाठी मुंबईला ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची बैठक झाली. काकासाहेब सभेस हजर होते. येथे गयेच्या कॉंग्रेस विरुध्द ठरावा पास झाला. त्यामुळे दिल्लीस मौ. आझाद यांचे अध्यक्षतेखाली कॉंग्रेसचे खास अधिवेशन भरले. त्यासही श्री. गंगाधरराव देशपांडे यांच्यासह काकासाहेब हजर होते. धार्मिकतेची अगर सदसद्विवेक बुध्दीची अडचण न वाटेल त्यांनी निवडणूकी लढविण्यास हरकत नाही असे तेथे ठरले व मोतीलालजीच्या स्वराज्य पक्षाने निवडणूकी जिंकून सरकारशी जोरदार लढत दिली. तितक्यात महात्माजी अपेंडिसायटिसच्या ऑपरेशनमुळे तुरुंगातून सुटले व त्यांनी नाफेर पदास खादी व राष्ट्रीय शिक्षणाचा विधायक कार्यक्रम सांगून कौन्सिल पक्षास आपले राजकारण स्वेच्छेने खेळण्यास वाव करुन दिला. पण मंत्रिपदे स्विकारण्यासंबंधात या पक्षातील लोकांत मतभेद झाले.

या सर्व घडामोडीत काकासाहेब महात्माजींच्या विचाराशी सहमत असल्यामुळे कॉंग्रेसच्या राजकरणाला उठाव देताना त्यांनी 'नवाकाळ' मधून महात्माजीचे तत्त्वज्ञान जोरदारपणे लोकांपुढे मांडले.''[१७]

जनजागृती, जनतेचे हित ज्यांचा आवाज सरकारपर्यत पोहचविता येत नाही, 'त्यांना ज्यांना न्याय मिळवता येत नाही त्यांना 'नवाकाळ' मधून आवाज उठविता येत असे' अशा स्वरूपाचे ध्येय 'नवाकाळ' ची होती.

**'नवाकाळ'वृत्तपत्रांचे सर्वसाधारण स्वरुप :–**

'नवाकाळ' वृत्तपत्र सुरु करतानाच काकासाहेब खाडिलकरांनी वृत्तपत्रांचे सर्व साधारणपणे स्वरुप ठरविले होते.

१९२३ साली रंगपंचमीस काकासाहेबांचा 'नवाकाळ' सुरु झाला. तेव्हा त्यांनी मनांत कल्पिलेल्या वृत्तपत्रातील सुधारणा ते पत्र स्वतःच्या मालकीचेच असल्याने विनयासे करिता आल्या व त्या त्यांनी धडाडीने करुन दाखविल्या.

'' 'लंडन टाइम्स' शिवाय आणखी देशी, विलायती मासिके, वृत्तपत्रे पुष्कळच 'नवाकाळ' वाचण्यानेकरिता घेतली जात असत. ती सर्व चालून त्यातून आपल्या उपयोगाचा मजकूर बिनचूक निवडून काढण्याची खाडिलकरांची मार्मिक दृष्टि आश्चर्यकारक होती. जो मजकूर इष्ट असेल त्यावर पेन्सीलने खूण करावयाची आणि त्या मजकुराची यादी विषयवार, तारीखवार वहीत टिपून ठेवण्याची अशी त्यांची सवय होती. वृत्तपत्र म्हटले की, त्यात फक्त बातम्याच द्याव्या आणि राजकारणच लिहिले जावे अशी त्यांची दृष्टि नव्हती. वृत्तपत्राच्या द्वारे ज्ञानाच्या स्वतंत्र विषयांच्या साधकबाधक विवेचनाला वाव असावा. याचा पाठ कदाचित त्यांनी टिळकांपासून घेतला असावा. केसरीत ऐतिहासिक संशोधनाचे नानाविवाद आणि धार्मिक, तत्वज्ञानपर विवेचनांचे लेखनेवेळी झालेले आहेत. खाडिलकरांनी 'नवाकाळ' मधून अशा तऱ्हेच्या ज्ञानसंवर्धक लेखनाची विपूल अवकाश ठेवलेला होता.

१९२४ सालापासून दैनिकातून चालू घडामोडीची चित्रे देण्याची पध्दत सुरु झाली. खाडिलकरांनी यापुढे चित्राखेरीज दैनिकाचा निर्वाह नाही, असे लक्षात घेऊन १९२५ च्या मार्च

– एप्रिलपासून विविध विषय सचित्र देण्याला प्रारंभ केला. यावेळी त्यांची पैशाची स्थिती समाधानकारक नव्हती तरी सुध्दा त्यांनी सुमारे ६००० रुपये खर्चून चित्रे तयार करण्याची यंत्रे खरेदी केली. प्रत्येक दिवशी कोणते ना कोणते निश्चित विषयांचे सदर (ferture) असावे. असाहि त्यांनी नियम अस्तित्वात आणला. आठवडयांतून दोनदा (बुधवारी – रविवारी) लघुकथा, गुरुवारी ग्रंथ–ग्रंथकार, 'शुक्रवारी व्यायाम व खेळ', मंगळवारी–शनिवारी देखील अशीच उपयुक्त विषयाची सदरे होती. त्याशिवाय 'इतिहास – ऐतिहासिक' 'शेती–शेतकरी' इत्यादी प्रासंगिक सदरे असतच. प्रत्येक सदराकरिता त्या त्या विषयाची सचित्र मासिके घेऊन त्यातील किंवा स्वतंत्र चित्रे देण्याचा 'नवाकाळ' मध्ये धडाका सुरु झाला. गाम– झिस्कोच्या कुस्तीची चित्रे देण्यात हिंदी मल्लाच्या विजयांचा उत्साह असला तर इजिप्तमधील ''तूतानखामेन'' या अतिप्राचीन राजाच्या खणून उजेडात आणलेल्या समाधीची चित्रे देण्यामागे मानवी संस्कृतीच्या प्राचीन वैभवाचे ज्ञान पुरविण्याचा हेतु होता. अन्य देशांतील प्राचीन संस्कृतीच्या अवशेषात भारतीय वैदिक संस्कृतीशी जुळणारे धागेदोरे दिसल्यास त्यावर तुलनात्मक दृष्क्षिेप करण्याला खाडिलकर चुकत नसत. यासंबधात एखादे उदाहरण दिल्यास अनाठायी होणार नाही. एकदा त्यांच्या वाचण्यामध्ये विश्वकिरण याची माहिती आली. त्या दिवसात खाडिलकर योगविषयाचे वाचन–मनन करीत होते. मनुष्य अतिशय गाढ झाोपेत असला म्हणजे त्याचा आत्मा हृदयांपासून लीन होतो व थकवा झाडून नव्या शक्ती उत्त्पन्नतेने जागृत होतो या वर्णनाशी विश्वकिरणांचे काही व्यापार जुळणारे वाटल्यावरून शास्त्र विषयात त्यांनी यासंबंधाची चर्चा समाविष्ट केली होती.''[१८]

अशाप्रकारे 'नवाकाळ' वृत्तपत्राचे स्वरुप स्पष्ट करत असतांना काकासाहेब खाडिलकरांनी प्रत्यक्षपणे त्याचा कृतीयुक्ती अभ्यास केला. तसेच वाचकांच्या बुध्दी व हृदयाचाही विचार केला. त्याप्रमाणे आपल्या वृत्तपत्राची मांडणी करत गेले आणि स्वराज्यप्राप्तीच्या दिशेने जनतेची वाटचाल सुरु केली.

## २.६ 'नवाकाळ'वृत्तपत्राचे धोरण :–

काकासाहेबांनी आपल्या वृत्तपत्राचे धोरण ठरविताना लोकमान्य टिळकांचा आदर्श समोर ठेवला गुरूच्या आज्ञे नुसार कार्य करताना त्यात कोणत्याही स्वरूपाचा बदल केला

नाही. पुढे ‘लोकमान्य’ पात्राच्या संपादक पदावर असताना जे धोरण स्वीकारले ते तसेच ‘नवाकाळ’ पत्रात सुद्धा मांडले गेले. यातूनच ‘नवाकाळ’ वृत्तपत्राचे धोरण स्पष्ट केले गेले.

‘‘दैनिकांत बातम्यांना महत्व मिळणे अपरिहार्य असते व नव्या परिस्थितीत महायुध्दाने लोकांचे बातम्यांविषयीचे औत्सुक्य वाढले होते. संपादकीय लेखनाचे महत्व कमी झालेले नसले तरी बातम्यांना निश्चितपणे प्राधान्य देणे आवश्यक होते. खाडिलकर ‘लोकमान्य’ दैनिकही अल्पावधीत यशस्वी करु शकले. ते त्यांना या गरजेची नीट जाणीव असल्यामुळेच बातम्यांवर त्यांचा कटाक्ष असे. वाचकाला समजेल अशा स्वरुपात व शब्दात बातमी आली पाहिजे व बातम्या देताना त्याची साखळी बांधली गेली पाहिजे, दुवा तुटल्यामुळे कोणतीही बातमी तुटक अशी वाचकाला वाटता कामा नये, असा त्यांचा आग्रह असे. दररोजच्या जीवनातील निरनिराळया प्रश्नांच्या बाबतीत आपला वाचक बहुश्रुत राहील आणि विविध माहिती त्याला मिळत राहील अशी खबरदारी पत्राकाराने घेतली पाहिजे, असे त्यांचे धोरण असे. या धोरणानुसारच आपल्या ‘नवाकाळ’ पत्रात काकासाहेबांनी अनेक सदरे सुरु केली. मांडणी व सजावट याबद्दलच्या त्यांच्या दक्षतेचा उल्लेख मागे केलाच आहे. साप्ताहिकातील अग्रलेखापेक्षा दैनिकातील अग्रलेख निराळा असतो, हयाचे काकासाहेबांना भान होते. अग्रलेखाच्या मथळयाविषयी त्यांचा विषेश कटाक्ष असे. दैनिक वृत्तपत्र वाचक सकाळी नोकरी–उद्योगाला लागण्या पूर्वी वाचत असतो. मथळा वाचूनच वाचक वाचण्याच्या मजकुराची निवड करतो. म्हणून मथळा विषयसूचक असला पाहिजे. तसाच तो सुटसुटीत व आकर्षक वाटला पाहिजे, असे ते म्हणत. अग्रलेखात जो विषय हाताळावयाचा त्याला प्रारंभीच हात घातला पाहिजे. त्याची उभारणी प्रमाणबध्द व डौलदार असावी, असे त्यांचे मत होते. अनेक मुद्दे मांडण्याऐवजी एकच एक मुद्दा ठसठशीत रीतीने मांडण्याची त्यांची पध्दत होती. उपमा, दृष्टान्त इत्यादींनी पोषक असे गौण मुद्दे सजविण्याला त्यांचा विरोध नव्हता. उपमा दृष्टान्ताच्या व गौण मुद्यांच्या गर्दीत मुख्य मुद्दा दृष्टिआड मात्र होता कामा नये, अशी खबरदारी घेण्याचे त्यांचे धोरण असे. अग्रलेखातील प्रतिपादनात मुख्य मुद्दयावर पुनः पुन्हा येऊन तो वाचकांच्या गळी पूर्णपणे उतरविणे म्हणजे त्याच मुद्दाचे ‘हॅमरिंग’ करणे हे त्यांना महत्वाचे वाटत असे. दैनिकातील अग्रलेख हा पाच–सात मिनिटे वाचकांना उद्देशून केलेल्या वक्तव्याप्रमाणे असल्याने तो भापण वजा असावा. बोलताना जसे आपण परिच्छेद पाडीत नाही, त्याप्रमाणे अग्रलेखात परिच्छेद

पाडणे काकासाहेबांना मान्य नसे. त्यांच्या अग्रलेखाच्या शेवटी बहुधा प्रश्नचिन्ह असे. वाचकाला उद्देशून विशिष्ट युक्तिवाद केल्यावर वाचकाचे एकंदर विषयाशी मतैक्य असल्याबद्दलचा विश्वास शेवटच्या प्रश्नाच्या रुपाने व्यक्त करण्यात येत असतो. सूचक प्रश्नात अनुकूल उत्तर अपेक्षित असते. अशा दृष्टिमुळेच १९२९ साली काकासाहेबांना शिक्षा झाली, तेव्हा अग्रलेखाच्या शेवटचे प्रश्नचिन्ह कायम ठेवण्यास त्यांनी बजावले होते. त्यांचे चिरंजीव अप्पासाहेब खाडिलकरांनी ती पध्दत कायम ठेवली होती. अग्रलेखाची भाषा, विषयानुरुप असण्यावरही त्यांना कटाक्ष असे. भाषेचा अव्यवस्थितपणा किंवा गलथानपण त्यांना जराही सहन होत नसे. त्यांची स्वतःची भाषा कणखर व कमावलेली होती.

वर्तमान पत्रांतून वादविवाद करण्यास किंवा टीकाकरांना उत्तरे देण्यास काकासाहेब तयार नसत. वर्तमानपत्रातील जागा वैयक्तिक वादविवादांसाठी किंवा उखळयापाखळ्या काढण्याकरिता वापरणे हा दुरुपयोग आहे, असे ते मानत असत. यामुळेच तात्यासाहेब केळकरांचे 'गतगोष्टी' हे आत्मवृत्त प्रसिध्द झाले. तेव्हा त्याला 'नवाकाळ' मधून उत्तर देण्यास त्यांनी सक्त मनाई केली.''[१९]

थोडक्यात काकासाहेब खाडिलकरांचे 'नवाकाळ' वृत्तपत्र हे वाचक वर्गाची अपेक्षासमोर ठेवून काढले. तसेच अग्रलेखावर विशेष भर दिला. अशा पध्दतीचे धोरण 'नवाकाळ' वृत्तपत्राचे होते.

## २.७ 'नवाकाळ' वृत्तपत्राची उद्दिष्टे :-

'नवाकाळ' वृत्तपत्राची उद्दिष्टे मांडताना लोकांच्या उपयोगी येणारे विविध महत्वपूर्ण माहितीचा समावेश केला. अचूक माहिती मथळ्यातूनच मार्गदर्शन व्हावे असे अग्रलेख लोकांना उद्देशून होते. सामान्य जनतेसाठी वृत्तपत्रे काढणे हा त्यांचा उद्देश होता. याचे धोरण जनहित असले तरीही स्वराज्य प्राप्तीसाठी समाजात भावना निर्माण व्हावी यासाठी ते वृत्तपत्र प्रयत्न करत होते.

''वृत्तपत्र हे विविध लोकोपयोगी विषयांची माहिती पुरविणारे असले पाहिजे, हयाची काकासाहेबांना जाणीव होती. साधन–सामुग्रीच्या व पैशाच्या अडचणी होत्या, तरी आपले पत्र 'पुर्णपत्र' व्हावे अशी काकासाहेबांची जिद्द होती.

जनता हेच वृत्तपत्राचे खरे दैवत, हा आदर्श ठाम समोर असल्यामुळे दैनिकाचा केवळ प्राणच अशा ज्या बातम्या त्यांच्याबाबत विशेष दक्षता घेण्यात येत असे.''[२०]

''आपले वृत्तपत्र हे जनतेच्या बाजूचे, जनतेच्या हिताचे व स्वराज्यासाठी आहे हा विवेक त्यांनी दक्षतेने आपल्या संपादकीच जीवनांत सतत दृष्टीपुढे ठेविला होता.

वृत्तपत्राचे लेखन वकिली कौशल्याने लिहिले जावे असे ते निश्चितपणे समजवून चालत. त्यामुळे वाचकांचा आपल्या पक्षाविषयी कधीही बुध्दिभेद होता कामा नये. असा त्यांचा आग्रह असे.''[२१]

''विषय कोणत्या वर्गासाठी लिहावयाचा त्या वाचक वर्गाची ज्ञानाची उंची विचारांत घेऊन त्यांचे लेखन केले पाहिजे अशी त्यांची शिकवण होती.

आपणास या जनतेला जागृत करुन, स्वःहितासाठी दक्ष बनवावयाची आहे. यावर लक्ष ठेवून लेखकाने आपल्या विषयाची मांडणी व प्रस्ताव सोप्या व जोरदार भाषेत केला पाहिजे असा त्यांचा आग्रह असे.''[२२]

थोडक्यात काकासाहेब खाडिलकरांनी 'नवाकाळ' वृत्तपत्राचे उद्दिष्ट्ये मांडताना सर्वसामान्य जनतेचा विचार केला असल्याचे दिसून येते.

## २.८ 'नवाकाळ' वृत्तपत्राची वाटचाल :–

### 'नवाकाळ' समोर छपाई यंत्राची अडचण :–

'' 'नवाकाळ' असा सुरु झाला व त्याची चिमूकली कचेरी 'इंदूप्रकाश' कचेरीतच एका कोपऱ्यात सजविली गेली हे खरे ! पण 'नवाकाळ' सारखे काकासाहेबांचे दैनिक म्हणजे लहानसहान गोष्ट थोडीच होती ? वर्तमानपत्र सर्व तऱ्हेने उत्तम हवे व त्याचा खप सर्वात अधिक व्हावा असे असले तर त्यासाठी इतर सर्व साधने ही अधिक कार्यक्षम व मोठया प्रमाणावर

हवीत. 'नवाकाळ' सुरु झाल्याबरोबर अशा तहेच्या अडचणी एक एक अधिकाधिक स्पष्ट होऊ लागल्या. 'इंदूप्रकाश' ची यंत्रे जुनी होती त्यात 'इंदूप्रकाश' वर्तमानपत्र रोज छापले जातच होते. त्यात आता दुसरे हे 'नवाकाळ' दैनिक निघाले. जुने यंत्र अधिक काम देईना. म्हणून चित्रशाळेतून एक छपाईचे यंत्र आणनून तेही बसविले. पण यामुळे ही फारशी सुधारणा होत आहे असे दिसेना इकडे आपल्या उपसंपादकांना सूचना देणे वगैरे कामे काकासाहेबांना करावी लागत. तशीच 'नवाकाळ' च्या व्यवस्था खात्यावरही त्यांना नजर ठेवावी लागे. ते दिवसभर या कामावर असता आणखी मशीन पुढेही त्यांना वरेचवर उभे राहून छपाई वेळेवर होत का नाही हे ही पहावे लागे. अंक वेळेवर न निघाला ती लगेच विक्रीवर परिणाम होई. या सर्वातून बाहेर निघण्यास एकच मार्ग होता आणि तो म्हणजे आपला स्वतःचा छापखाना काढणे हा होय.''[२३]

जुन्या छपाई यंत्रामुळे येणाऱ्या अडचणीतून बाहेर पडण्यासाठी स्वतःचा छापखाना काढण्याचे काकासाहेबांनी ठरविले आणि तसा प्रयत्न सुरु केला.

**'नवाकाळ' चा स्वतःचा छापखाना :–**

''स्वतःचा छापखाना काढावयाचा म्हणजे पुन्हा एक मोठा आर्थिक बोजा उचलावयाचा असा त्याचा अर्थ होता. काकासाहेब कोणतीही गोष्ट करीत ती त्यासंबंधाचा साधकबाधक सर्व विचार करुन करीत. एकदा असे पाऊल टाकले म्हणजे ते कधीही मागे घेत नसत. यासाठी जरुर त्या देह–कष्टाची, धाडसी, त्यागाची अगर इतर अडचणी सोसण्याची त्यांची केव्हाही तयारी असे. यास कामासाठी आता अधिक कर्ज काढावे लागणार होते. पण त्याला त्यांची तयारी होती. त्यांनी आपल्या मित्र मंडळीशी या संबंधात विचार विनिमय करुन इंदुप्रकाशच्या जागेत स्वतःचा 'दत्तात्रेय छापखाना' काढण्याचे ठरविले. छपाईची यंत्रे व थोडी इतर सामुग्री अगोदर चित्रशाळेतून आणलेली होतीच. त्यात जरुर ती आणखी भर घालून इंदुप्रकाशच्या जागेतच एका बाजूस ही सर्व मांडण्यात आली व 'दत्तात्रेय छापखाना' सुरु झाला ता. २३–१–१९२४ रोजी या छापखान्यात कामास सुरुवात होऊन गुरुवार, ता. २४–१–१९२४ चा 'नवाकाळ' अंक स्वतःच्या छापखान्यातून बाहेर पडला. १९२५ च्या नोव्हेंबर च्या दोन तारखेस 'दत्तात्रेय छापखाना' व 'नवाकाळ' यांना खटावमकानजी वाडीत प्रशस्त व सोईस्कर जागा

मिळाली व त्याच वाडीत काकासाहेबांना राहण्यासही चांगली जागा मिळाल्यामुळे आपल्या वृत्तपत्राच्या कामावर देखरेख करणे त्यांना सोईचे झाले.''[२४]

'नवाकाळ' वृत्तपत्राचा स्वतःचा छापखाना सुरु झाला व त्यातून अंक बाहेर पडू लागले. हे 'नवाकाळ' साठी यशाचे पहिले पाऊल होते.

'नवाकाळ' चे धोरण आपल्यामताप्रमाणे हे तसे निश्चित करण्यात आता काकासाहेबांना कोणतीच अडचण नव्हती. संपादकीय विभागासाठी चांगली मंडळी जमली होती. परंतु वृत्तपत्रास नेहमीच आर्थिक  संकटाना तोंड द्यावे लागत असे.

**'नवाकाळ' वृत्तपत्राची आर्थिक स्थिती :–**

'' 'नवाकाळ' दैनिक चालवावयाचे म्हणजे त्यासाठी पैसा फारच मोठया प्रमाणावर नेहमी लागे व यासाठी त्यांना वेळोवेळी कर्ज ही काढावे लागे. प्रसंग पडेल त्यावेळी जरूर तितके कर्ज काढावयाचे व ठरल्याप्रमाणे ते परत फेडावयाचे असे त्यांचे कटाक्षाने धोरण असे. हया बाबतीत चाल ढकल होऊ नये याबद्दल ते फार दक्ष असत या काळात  एका प्रसंगी सौ. काकूंचे दागिने विकूनही त्यावेळी त्यांनी कर्ज फेड केली. अशारितीने अतिशय शिस्तीने व पत राखून आर्थिक व्यवस्था ते करीत असतानाही कोणाकडून तरी पैसा कसातरी मिळवावा असे धोरण त्यांनी ठेवले नाही.''[२५]

''एका दैनिकाचे संपादक किंवा 'नवाकाळ' चे मालक असताना त्यांना कचेरीत लांबून यावे लागत होते, तरी कधी व्हिक्टोरियासाठी पैसे खर्च केले नाहीत. घरगुती व वैयक्तिक खर्च मर्यादित ठेवला तरी 'नवाकाळ' साठी आवश्यक वाटणारा खर्च त्यांनी सुरुवातीस व नंतर प्रसंग पडला तेव्हा कर्ज काढूनही केला.''[२६]

अशाप्रकारे 'नवाकाळ' वृत्तपत्र चालविताना काकासाहेब स्वतः सुध्दा पैशाची काटकसर केल्याचे स्पष्ट होते.

थोडक्यात 'नवाकाळ' वृत्तपत्र चालविताना त्यामध्ये काही बदल करताना पैशाची उणीव जाणवत असे. 'नवाकाळ' ची आर्थिक स्थिती मजबूत नव्हती तरीही सरकारी नोकर वर्ग

यांची साथ तसेच वेळ प्रसंग कर्ज काढून त्याची वेळेवर परत फेड करुन काकासाहेबांनी 'नवाकाळ' वृत्तपत्र यशस्वीपणे चालविले.

**'नवाकाळ' वृत्तपत्राचा अर्थसहाय्य घेण्यास नकार :–**

'नवाकाळ' वृत्तपत्र सुरु करण्यापासून त्यास आर्थिक अडचणी होत्या. पुढे ती तशीच चालू राहिली परंतु अर्थसहाय्य घेण्यास विरोध होताच.

'काकासाहेबांच्या विषयी राजकीय नेत्याच्या आठवणी' या सदरामध्ये दे. गंगाधरराव देशपांडे, बेळगांव यांनी आपल्या आठवणीत 'नवाकाळ' वृत्तपत्रासाठी पंडितजींनी देऊ केलेली आर्थिक मदत नाकरल्याचा आलेला अनुभव कथन केला.

''दे. गंगाधरराव देशपांडे, बेळगांव:–

'पंडितजीचे द्रव्यसहाय नाकारले'

१९२४ च्या बेळगांव कॉंग्रेसमध्ये कॉंग्रेसमधील स्वराज्य पक्षाला मान्यता मिळाली व त्या पक्षाचे नेतृत्व पं. मोतीलालजीच्याकडे आले. काही काळानंतर स्वराज्य पक्षात मतभेद उत्पन्न झाले. महाराष्ट्रातील प्रसिध्द वर्तमानपत्र केसरी चे संपादक कै. तात्यासाहेब केळकर मोतीलालजींच्या पक्षाच्या विरोधी पक्षात प्रमुख होते. त्यामुळे आपल्या बाजूचे एक मराठी पत्र असावे असे पंडितजींना वाटले तसे वजनदार दुसरे पत्र काकासाहेब खाडिलकरांचे 'नवाकाळ' आहे. हे पंडितजीना कळल्यानंतर काकासाहेबांची भेट घेण्याचे त्यांनी ठरविले व त्यांचा मुक्काम मुंबईत असताना त्यांनी काकासाहेबांना अमुक दिवशी भेटण्यास कळविले. माझी व पंडितजीची ओळख असल्यामुळे मी पंडितजीच्या भेटीच्या वेळी, त्यांचेबरोबर असावे असे काकासाहेबांना वाटून मला त्यांनी बोलाविले व त्याप्रमाणे काकासाहेब व मी मिळून पंडितजीच्या भेटीला गेलो. पंडितजी त्या मुक्कामात टाटाच्याकडे राहिले होते. काकासाहेबांची व पंडितजीची रीतीप्रमाणे ओळख झाल्यानंतर कॉंग्रेसच्या संमतीने स्थापन झालेल्या स्वराज्य पक्षास काकासाहेबांचा पाठिंबा असावा असे पंडितजींनी आपले म्हणणे मांडले त्याला काकांनी आपली संमती दिली व तेच काम काका करीत आहेत असे मी म्हटले. पुढे बोलता बोलता पंडितजींनी पत्राला काही द्रव्य सहाय्य पाहिजे की काय अशी पृच्छा केली. त्यावेळी पंडितजीनी काकासाहेबांस

देण्याकरिता दहा हजार रुपयांचा चेक तयार ठेवला होता. पण काकांनी त्यांची मदत नाकारी आणि त्यांचे आभार मानले. काकांनी जेव्हा चेक घेण्याचे नाकारले त्यावेळी चेकची रक्कम वाढविण्याचे पंडितजीनी सुचविले. चेक कमीचा आहे असे वाटल्यावरुन काकांनी तो नाकारला अशी पंडितजीची कल्पना झाली असावी. पण काकांनी 'मी तुमचेच काम करीत आहे व पुढेही करीन, त्याला पैसे काय करावयाचे आहेत? असे म्हणून त्या प्रश्नाचा निकाल लावला.

त्या वेळच्या बोलण्यावरुन काकांना चांगले द्रव्यसहाय्य मिळाले असते, यात शंकाच नाही. पण कोणाकडून द्रव्य घेऊन त्याच्या मिंधेपणात कार्य करावे हे काकाच्या स्वभावातच नव्हते.''[२७]

अशाप्रकारे अनेक वेळा 'नवाकाळ' वृत्तपत्र अडचणीत आले परंतु काकासाहेबांनी कधीही कोणाकडून मदत स्विकारली नाही, आर्थिक मदतीस नकार देत गेले.

**'नवाकाळ' वृत्तपत्राचा जाहिरातीबाबबत दृष्टिकोन :–**

'नवाकाळ' वृत्तपत्र जाहिरातीबाबत विशेष दृष्टिकोन ठेवून होते. जनतेच्या हिताच्या दृष्टीने 'नवाकाळ' मधून जाहिराती दिल्या जात

''१९२५ साली दसऱ्याच्या मुहूर्तावर 'नवाकळ' ची साप्ताहिक आवृत्ती निघू लागली. या आवृत्तीच्या पहिल्या अंकाच्या वेळी, काकासाहेब वृत्तपत्राच्या मांडणीबाबत किती दक्ष असत ते लक्षात घेण्यासारखे आहे. अंकात एक पानभर जाहिरात घेण्यात येऊन तिला अग्रलेखाच्या पानावर जागा देण्यात आली. काकासाहेबांच्या लक्षात ही गोष्ट येताच, त्यांनी छपाई थांबवून जाहिरातीची जागा बदलली. काकासाहेबांचा राग, जाहिरातीने त्या पानाच्या देखाव्याची शोभा घालविली, यामुळे होता सामान्यतः मजकुरापेक्षा जाहिरातीला अधिक महत्व मिळणार नाही. याबाबत काकासाहेब विशेष दक्ष असत एक मोठी जाहिरात ही यामुळे त्यांनी एकदा नाकारली होती. जाहिरातीत अयोग्य मजकूर दिसला तरीही ते रागावत,व अशा जाहिराती न घेण्याबद्दल ते व्यवस्थापकाला बजावीत.''[२८]

काकासाहेब जाहिरातींबाबत अत्यंत दक्ष होते. जाहिरातींच्या अल्प दराने तर सर्वांना 'नवाकाळ' आपलासा वाटत असे

'' 'नवाकाळ' वर्तमानपत्र छापण्यासाठी काकासाहेबांनी आपला स्वतःचा छापखाना 'दत्तात्रय प्रिंटिंग प्रेस' काढला होता काकासाहेबांच्या जीवन स्वजनहितार्थ वाहिलेला असे 'नवाकाळ' व 'दत्तात्रय छापखाना' या दोन ठिकाणी कोणीही स्वकीयाने यावे व स्वशक्त्यनुसार दहा रुपयांपासून पांचशे रुपयांपर्यंत द्रव्यार्जन करावे अशी मी सोय केली आहे असे काकासाहेब म्हणत. 'नवाकाळ' सुरू झाल्यावर सर्व नाटक कंपन्यांना आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे असे वाटे. त्यांच्याकडील जाहिरातींबद्दल काकासाहेबांचे धोरण अत्यंत आपलेपणाचे असे.''[२९]

थोडक्यात 'नवाकाळ ' वृत्तपत्र कोणत्याही प्रकारच्या जाहिराती देऊन पैसा कमविणे हे धोरण ठेवले नाही. तर जाहिरात ही जन हितार्थ हिताची हवी असे त्यांना वाटते असे अशाच जाहिरातीचा समावेश काकासाहेबांनी आपल्या वृत्तपत्रात केला.

**'नवाकाळ' वृत्तपत्राचा खप :–**

'' 'नवाकाळ' पत्राची बाजारात दुसऱ्या एका तऱ्हेने पत फार मोठी असे. 'नवाकाळ' च्यासाठी विविध जातीचा माल बाजारातून विकत आणावा लागे व तो नित्य हजारो रुपयांनी असे या व अशा सर्व 'नवाकाळ' च्या व्यवहारात 'नवाकाळ' अत्यंत चोख व सरळ असे. यामुळे कागदवाले, टाइपवाले व इतर–व्यापारी 'नवाकाळ' ला फार मानीत. आदराने अशी ही मंडळी म्हणजे 'नवाकाळ' च्या चालत्या बोलत्या जाहिरातीच झाल्यामुळे 'नवाकाळ' चा खप वाढण्यास व 'नवाकाळ' ला मोठमोठया कंपन्याच्या जाहिराती मिळण्यास त्यांचा प्रत्यक्ष उपयोग होत असे.''[३०]

'नवाकाळ' व्यावहारिकतेमुळे अनेक व्यापारीवर्ग 'नवाकाळ' ला जोडला गेला आणि या व्यापारी वर्गानेच 'नवाकाळ' वृत्तपत्राची जाहिरात केली.

'नवाकाळ' वृत्तपत्र जरी हालाखीत सुरु झाले. तरी अनेक संकटांना तोंड देत हळूहळू प्रगती पथाकडे वाटचाल करु लागले.

**‘नवाकाळ’ वृत्तपत्राची प्रगती :–**

‘‘ ‘नवाकाळ’ चा हा संसार आदर्श करावयाचा असा काकांच्या मनाचा आग्रह असल्याने त्याकरिता जरुर ते मनुष्यबळ व साधन सामुग्री त्यांनी अत्यंत तत्परतेने व प्रयत्नाने मिळविली. ‘नवाकाळ’ सुरु करण्याचा निश्चय केल्याबरोबरच त्यांनी आपले पुतणे नाना यांना लोकमान्यांतून या नव्या पत्राच्या व्यवस्थेत घेतलेच होते. ‘इंदुप्रकाश’चे पूर्वीचे बातमीदार श्री. अप्पाराव कुलकर्णी यांनाही त्यांनी प्रारंभीच आपणाकडे घेतले. ‘नवाकाळ’ चे पहिले काही दिवस काकासाहेब संपादक, नाना मुख्य उपसंपादक व अप्पाराव कुलकर्णी संपादकीय मदतनीस एवढाच संच होता.

थोडया दिवसांतच लोकमान्यातील काकांचे जुने स्नेही श्री. गणपतरराव पागे व संपादक वर्गापैकी श्री. राऊत व श्री. ताम्हणकर ‘नवाकाळ’ कचेरीत दाखल झाले. काकासाहेबांनी श्री. पुरोहित व श्री. महाशब्दे या नव्या होतकरु तरुणांना आपल्याकडे नेमून घेतले. श्री. धुरंधर ही एल. एल. बी. तरुण गांधी–तत्त्वज्ञानाने आकर्षित झालेले व घरी सुस्थिती असल्याने हौसेने लेखल व्यवसायात पडू इच्छिणारे होते. काकासाहेबांनी त्यांचे गुण लक्षात येताच त्यांना नवाकाळात वाव देण्याचे ठरवले व त्यांच्या वैशिष्ट्य पूर्ण लेखनामुळे ते संपादक वर्गात लवकरचं पुढे आले. ‘फेरिश्ता’ सदर त्यांच्या रोचक भाषेमुळे लोकप्रिय झाले.

विविध विषयांच्या अभ्यासात तरबेज व हौशी तरुण जोडण्यात काकांचे कौशल्य श्री. नरहरपंत फाटक यासारख्या भिन्नपक्षांतील विद्वान तरुणास जवळ केले यात दिसून येते. श्री. फाटक ‘इंदुप्रकाश’ च्या संपादकीय कामावर होते. त्यावेळी प्रारंभी ‘नवाकाळ’त ही ग्रंथपरीक्षण वगैरे त्यांच्या विद्वतेला साजेशी सदरे लिहिण्याचे काम त्यांना देण्यात आले. नंतर ’इंदुप्रकाश’ बंद पडला त्यावेळी त्यांनी  कै. गो. कृ. गोखले यांचे चरित्र लिहिण्यास घेतले होते. ते पुरे झाल्यानंतर काकासाहेबांनी त्यांस आपल्याकडे बोलावून घेतले. काकासाहेबांचे व त्यांचे राजकीय मतांत कितपत जमेल अशी बलवान शंका इतरांना वाटत असे. काकांचे उदार  धोरण व फाटकांची अनुरुपवृत्ति यामुळे त्या उभयतांचे सहकार्य उत्त्तमच जमले व एकमेकांची मने समजल्यामुळे पुढे प्रेमादर वाढून श्री. फाटक काकासाहेबांचे खास सल्लागार झाले. ते ‘नवाकाळ’ मध्ये कायमचे आले व काकाचे वृत्तपत्र व्यवसायांत प्रमुख सहकारी झाले.

चांगला छापखाना व चांगली संपादकीय मंडळी जुळविता जुळविता ‘नवाकाळ’ अधिकाधिक आकर्षक करण्याचे काकासाहेबांचे प्रयत्न चालू होते. ‘नवाकाळ’ लोकांना आवडावा व त्याचा प्रसार अधिकाधिक व्हावा ही त्यांची इच्छा होती. यासाठी विविध लोकांच्या आवडीची विविध सदरे त्यांनी सुरु केली. विविध शिरोलेख, विविध चित्रे, विविध बातम्या त्याच्या पत्रात येऊ लागल्या. या सर्वांसाठी त्यांनी सढळ हाताने खर्च करून जरुरी ती सर्व साधन सामुग्री आणविली. आठ्वडयातून काही वेळा गोष्टी घालणे व क्रिकेटच्या सामन्या सारख्या लोकरंजक घटनांची लालित्यपूर्ण रितीने विस्तृत माहिती पुरविणे इत्यादि अद्यावत साधनांच्या द्वाराही ते जनतेची मने काबीज करीत होते. ज्ञानाचा प्रसार व्हावा. लोकजागृती व्हावी व त्यायोगे जनता स्वराज्य संपादनात योग्य व्हावी असा त्यांचा सततचा प्रयत्न होता.’’[३१]

अशा पध्दतीने काकासाहेबांनी हळूहळू ‘नवाकाळ’ वृत्तपत्राची प्रगती केली आणि पुढे आठवडयाचा ‘नवाकाळ’ सुरु केला.

‘‘ ‘नवाकाळ’ वर्तमानपत्र अधिकाधिक फायदेशीर कसे होईल. याकडे काकासाहेब सुक्ष्मपणे पाहात व यासाठी ते सांगतील त्या योजना अंमलात आणण्यास चुकत नसत. ‘नवाकाळ’ चालू असताच त्याच्यासाठी झालेल्या दैनिक कामाचा फायदा घेऊन त्यांनी आठवडयाच्या ‘नवाकाळ’ची योजना सुमारे वर्षभरातच म्हणजे ता. २८–९–२५ पासून दसऱ्याच्या मुहूर्तावर अंमलात आणली. यामुळे खेडोपाडयांतील लोकांची ‘नवाकाळ’ ला सेवा करता आली. हा मोठा फायदा झाला.’’[३२]

थोडक्यात काकासाहेबांनी ‘नवाकाळ’ वृत्तपत्र तुटपुंज्या संपादक वर्गाने सुरु केला. त्यात नव्याने अनेक सहकारी सामील झाले. श्री. न. र. फाटक सारखे विद्वान सहकारी म्हणून मिळाले. पुढे आठवडयाचा ‘नवाकाळ’ सुरु होऊन त्याची प्रगती सुरु झाली.

## २.९ 'नवाकाळ' वृत्तपत्रावरील राजद्रोही खटले :–

'नवाकाळ' व आठवडयाचा 'नवाकाळ' अत्यंत व्यवस्थित पध्दतीने चालले होते. या पुढील सुधारणांचे विचार काकांच्या मनात उद्‌भवत होते तो 'नवाकाळ' दैनिकांवर फौजदारी फिर्यादीचे गंडांतर आले.

### 'नवाकाळ' वरील पहिला खटला :–

''१९२६ याली 'नवाकाळ' वर फिर्याद होण्याचा पहिला प्रसंग सोलापूरच्या दंग्याच्या बातमीमुळे आला. सोलापूरच्या बातमीदाराने त्यावेळचे सोलापूरचे डी.एस.पी. डंकन मॅग्डोनाल्ड यांचे विरुध्द काही आक्षेपार्ह तार पाठविली. रात्रपाळीच्या संपादकाने ती खळबळ जनक बातमी जशीच्या तशी छापण्यास दिली व ती दुसरे दिवशीच्या अंकात भडकपणाने प्रसिध्द झाली. हा मजकूर नजरेस येतास काकांना या बातमीचा परिणाम चटकन लक्षात आला. कल्पनेप्रमाणे खटलाही झाला. सदर साहेबांनी अब्रुनुकसानीची फिर्याद गुदरली. तेव्हा कार्हीना दिलगिरी प्रदर्शित करुन मोकळे होण्याचा सल्ला काकांसाहेबांना दिला पण त्यांच्या मनोवृत्तीला हा सल्ला मुळीच पटणे शक्य नव्हते. ही बातमी ज्या संपादकाने छापण्यास दिली. त्यालाही पण त्यांनी दोष दिला नाही. लोकमान्याच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे सार्वजनिक हितास अनुसरुन त्यांनी खटला शेवटपर्यंत लढवला . खर्च केला व जबर दंड ही सोसला.''[३३]

अशाप्रकारे 'नवाकाळ' वरील पहिला खटला १९२६ झाला. त्याची सर्वस्वी जबाबदारी काकासाहेबांनी आपणावर घेतली. पुढे १९२९ मध्ये सुध्दा अग्रलेखावरुन 'नवाकाळ' खटला भरला गेला.

### 'नवाकाळ 'वृतापत्रावरील दुसरा खटला :–

''यानंतर मात्र 'नवाकाळ' वर जो सरकारी प्रहार झाला त्याने काकासाहेबांची तुरुंगात रवानगी केली. हा खटला झाला तो ९ फेब्रुवारी १९२९ च्या अंकातील अग्रलेखाबदल. 'मुंबईचे दंगे व बोल्शेव्हिक बिल' असा त्या लेखाचा मथळा होता. १९२९ च्या प्रारंभी, १८९३

नंतर छत्तीस वर्षानी मुंबईला हिंदु मुसलमानांचा दंगा उद्भवला. पठाण मुले पळवितात या भुमिकेवरुन प्रथम तरी पठाण विरुध्द हिंदु–मुसलमान असे त्या झगडयाचे स्वरुप होते. पुढे त्याला हिंदु–मुसलमान दंग्याचे रुप आले. मुंबईत असा दंगा चालू असता दडपशाहीच्या नव्या कायद्याची चर्चा मध्यवर्ती असेंब्लीत आली. गृहखाते सांभाळणाऱ्या अधिकाऱ्याने नव्या कायद्याची उपयुक्तता सिध्द करण्यासाठी रशियातील बोल्शेव्हिक पक्षाचा व राज्यतंत्राचा त्यावेळी चर्चेत वारंवार उल्लेख केला होता. साप साप म्हणून भुई धोपटण्याचा हा प्रकार असल्याने त्याबाबत अग्रलेख लिहिण्यात आला. तो लेख स्वतः काकासाहेबांनी लिहिलेला नव्हता. लेख लिहिला होता. त्यांचे सहकारी न. र. फाटक यांनी पण लेखात राजद्रोह शिरण्याची शक्यता असल्याने लेख जपून लिहिण्याची सूचना काकासाहेबांनी केली होती. लेख लिहिल्यावरही काकासाहेब व फाटक हयांनी एकत्र बसून लेखाचे बारकाईने वाचन करुन आक्षेपार्ह ठरवण्याचा संभव असलेली वाक्ये काढून टाकली होती. एवढी खबरदारी घेतली होती तरी नोकरशाहीच्या डोळ्यात तो खुपलाच.

लेख प्रसिध्द झाल्यानंतर तो आक्षेपार्ह ठरवून राजद्रोहाच्या आरोपावरून १५ मार्च १९२९ रोजी म्हणजे लेख प्रसिध्द झाल्यानंतर सव्वा महिन्याने काकासाहेबांना अटक करण्यात आली. पुढे झालेल्या झडतीत लेखाचे हस्तलिखित व कच्ची मुद्रिते तुकडयातुकडयाच्या स्वरुपात मिळाली. तुकडे एकत्र जुळवून लेख सलग करण्यात आला. त्या हस्तलिखितावरुन काकासाहेबांना विचारुन लेखकाचा छडा लावण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला. पण काकासाहेबांनी 'मी तोंडाने सांगितलेला मजकूर दुसऱ्याने लिहून काढला' असे सांगून सर्व जबाबदारी स्वतःकडे घेतली. न. र. फाटक यांनाही पोलीस कचेरीत बोलावून घेतले. चौकशी करण्यासाठी फाटक यांनाही लेखाचे हस्ताक्षर आपले पण विचार काकासाहेबांचे असे सांगितल्याने प्रत्यक्ष लेख लिहिणाऱ्याला शोधून खटल्यात गुंतविण्याचा नाद पोलिसांनी सोडला असावा.

खटला हायकोर्टात चालून काकासाहेबांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवण्यात आला. खटल्याचा निकाल २६ मार्च १९२९ रोजी लागून काकासाहेबांना एक वर्षाची साधी कैद व दोन हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली. या खटल्यात ९ फेब्रुवारी १९२९ चा अग्रलेख

व त्यानंतर चार दिवसांनी प्रसिध्द झालेली संकीर्ण समालोचनातील काही स्फुटे हयांचा आधार राजद्रोहाचा आरोप शाबित करण्यासाठी घेतला होता. शिक्षा जाहीर झाल्यावर काकासाहेबांची साबरमतीच्या तुरुंगात रवानगी करण्यात आली.''[३४]

अशाप्रकारे 'नवाकाळ' वृत्तपत्राच्या पहिला खटल्याप्रमाणे याही खटल्यात काकासाहेबांनी स्वतःवर लेखाची जबाबदारी घेऊन लोकमान्य टिळकांचा आदर्श पुढे चालविला.

**'नवाकाळ' वृत्तपत्राची जागा व इमारत :–**

'नवाकाळ' वृत्तपत्राने स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी कठोर असे परिश्रम केले. त्या परिश्रमाचे फळ म्हणजे 'नवाकाळ' महाराष्ट्रात गाजलाच पण पुढे त्याने आपली जागा, इमारत उभी करुन तेथून 'नवाकाळ' प्रकाशित होऊ लागला आणि सर्वांच्या घरोघरी पोहचला.

'' 'नवाकाळ' पत्राचा संसार प्रथम थाटला तो 'इंदुप्रकाश' छापखान्याच्या एका कोपऱ्यात स्वतःचा छापखानाही 'नवाकाळ' ने तेथेच उभारला. पुढे १९२५ च्या नोव्हेंबर मध्ये छापखाना व पत्राची कचेरी यासाठी खटाव मकनजीवाडीत प्रशस्त व सोयीस्कर जागा मिळाली. त्याच वाडीत काकासाहेबांना राहण्यासाठीही जागा मिळाल्याने अधिक सोय झाली. पुढे १९३१ साली स्वतःच्या जागेत 'नवाकाळ' चे स्थलान्तर करण्यात आले. गिरगाव रस्त्याच्या कांदेवाडी नाक्यावर प्रशस्त दुमजली इमारत विकत घेऊन तिच्या विस्तीर्ण अंगणात नवे बांधकाम करुन तेथे छापखान्याची व्यवस्था करण्यात आली. मुळ इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर त्यांनी आपला स्वतःचा संसार हालवला. पण नव्या जागेत आल्यावर पत्राचा खप घसरु लागला. १९३० ला गांधीजीची दांडीयात्रा, मिठाचा सत्याग्रह, इत्यादी घटनांमुळे ते वर्ष धामधुमीचे गेले 'नवाकाळ 'चळवळीत आघाडीवर असल्याने, त्याचा खप वाढत गेला आणि त्या भरवशावरच स्वतंत्र इमारत खरेदी करण्याचे धाडस काकासाहेबांनी केले. पण धाडस अंगाशीच आले. १९३१ च्या मार्च महिन्यात गांधी–आयर्विन करार झाल्याने उत्सुकता वाढविणाऱ्या बातम्या कमी झाल्या. यामुळेच सर्व वृतापत्रांना त्याची झळ सोसावी लागली आणि 'नवाकाळ' पत्रही त्याला अपवाद नव्हते. खप घसरला आणि नव्या इमारतीसाठी कर्ज घ्यावे लागले होते. यामुळे अडचणीची परिस्थिती निर्माण झाली व पाच सहा वर्षे तिचा त्रास झाला. राजकीय दृष्ट्या पडता काळ असल्याने परिस्थिती सुधारली नाही. यामुळे १९३८ साली 'नवाकाळ' वाडी विकून

टाकण्यात आली. वाडीची जागा मोक्याची असल्याने कर्ज फिटून वर बऱ्यापैकी शिल्लक राहील. अशी किफायतशीर किंमत मिळाली. १९३९ च्या जानेवारीत दुसरी जागा खरेदी करण्यात येऊन तेथून 'नवाकाळ' प्रसिध्द होऊ लागला.''[३५]

'नवाकाळ' वृत्तपत्राने १९२३ साली दुसऱ्याच्या छापखान्यात एका कोपऱ्यात पहिला अंक काढून वृत्तपत्र सुरु केले. अनेक अडचणींना तोंड देत आपले अस्तित्व टिकविण्यासाठी स्वतःच्या मालकीची जागा, इमारत स्थापन केली. त्यातून 'नवाकाळ' प्रसिध्द होऊ लागला. विसावे शतक संपले एकविसावे शतक चालू आहे. पण 'नवाकाळ' आजही मोठया ताठ मानेने प्रकाशित होत आहे.

## २.१० संस्थापक-संपादक काकासाहेब खाडिलकर :-

काकासाहेब खाडिलकर हे नवाकाळ वृत्तपत्राचे शिल्पकार त्यांच्या अखंड परिश्रमातून 'नवाकाळ' वृत्तपत्र महाराष्ट्र विशेषतः मुंबई भागातील मुंबई जनतेचे मुखपत्र असा लौखिक प्राप्त झाला होता. काकासाहेबांच्या बालपण शिक्षण व्यक्तिमत्वाची जडण-घडण होत वृत्तपत्र क्षेत्राकडे वाटचालीचा थोडक्यात आढावा मांडला आहे.

काकासाहेब खाडिलकरांचे वंशज हे सह्याद्रीच्या पश्चिम खोऱ्यातील देवगड तालुक्यातील नारिंग्रे गावचे होते. कोकणातील निसर्गरम्य भाग हा समुद्राच्या खाडीने वेढलेला होता म्हणून त्यांचे आडनाव खाडिलकर पडले. पुढे पेशवाईच्या काळात ही मंडळी देशावर आली काकासाहेबांचे आजोबा यांनी कोल्हापूरच्या रेसिडेन्सीत संस्थांनी कामगिरीवर होते. काकासाहेबांच्या वडील त्रिवर्ग कारभाऱ्यापर्यंतच्या मनाला चढले होते. परंतु अल्पकाळात त्यांचे निधन झाले. 'वडिलांच्या मृत्यूनंतर थोडया दिवसांनी (म्हणजे कार्तिक व अष्मी शके १८५७ ता. २३-११-१८७२ रोजी काकांचा जन्म झाला.'

काकांचे मराठी शिक्षण विष्णूच्या घाटावरील प्रसिद्ध दादा छापखाने यांच्या शाळेत झाले. अनेक सवंगडी त्यांना होते. कृष्णा नदीवर अंघोळ करणे, आटयापाटया, हुतूतू असे अनेक खेळ खेळत हायस्कुल चे शिक्षण सांगलीत पूर्ण झाल्यावर काकांचा विवाह सोहळा पार पडला. पुढे लग्नानंतर काकासाहेब पुण्यात उच्च शिक्षणासाठी आले. काका सन १८८९ साली

मॅट्रिक पास झाले. पुढील शिक्षणासाठी त्यांना पुण्यास जावे लागले. कॉलेजच्या भव्य कल्पना, पुण्याची कीर्ती, चिपळूणकर, टिळक यांनी स्थापलेल्या तेथील नव्या संस्था, रानडे,भांडारकर वगैरे महान व्यक्ती या सर्वांच्या ओढीने त्यांचे मन आतुरले होते. पुण्यामध्ये फर्ग्युसन कॉलेजमध्ये काकांनी आपले नाव दाखल केले आणि सांगलीचा वाडा म्हणजे सांगलीकर विद्यार्थ्यांच्या रेसिडेन्सीमध्ये काका व त्यांचा स्नेहवर्ग राहत. पुण्यात सहकारी मित्रांच्या सानिध्यात राहूनच त्यांच्या मनात देशसेवेचे बीज रोवले गेले. पुढे काकासाहेब वकील व्हावे या उद्देशाने मुंबईस एल .एल. बी  अभ्यास करीता गेले. त्यावेळी देशाची राजकीय उन्नती साधू पाहणारी राष्ट्रीय सभा नवीनच सुरु होऊन कार्य करत होती. त्यातूनच त्यांच्या मनाला त्यांत उत्कटरित्याने देशसेवेचीच ओढ लागली होती आणि शेवटी देशसेवा करण्याचा निश्चय केला. त्यातूनच त्यांना केसरी कडे जाण्याचा मार्ग सापडला.

**काकासाहेबांच्या 'केसरी' वृत्तपत्रातील संपादकीय कार्य :–**

''१९०५ साली काकासाहेब नेपाळातून महाराष्ट्रात परत आले. त्याच सुमारास वंगभंगाविरोधी चळवळ सुरू झालो. त्यातून पुढे दहशतवादी गुप्त चळवळीला प्रारंभ होऊन बॉम्ब गोळे उडू लागले. काकासाहेबांनी त्या संबंधी जे लेख लिहिले तेच पुढे १९०८ साली टिळकांवर भरलेल्या खटल्याला कारणीभुत झाले. टिळकांना शिक्षा झाल्यावर, काकासाहेबांचे नाव संपादक म्हणून 'केसरी'वर आले व १९०९ अखेरपर्यंत ते कायम राहिले. पुढे केळकर व खाडिलकर यांचे मतभेद होऊन, १९१० साली खाडिलकर 'केसरी' संस्थेतून बाहेर पडले. टिळक सुटून येईपर्यंत, त्यांचा मग 'केसरी'शी संबंध राहिला नाही. टिळक परत आल्यावर खाडिलकर परत 'केसरी'कडे आले, पण त्याचे नाव पुन्हा 'केसरी'वर आले ते केळकर विलायतला जावयाला निघाले तेव्हा मार्च १९१८ ते जून १९२० पर्यंत, खाडिलकरांचे नाव 'केसरी' वर राहीले. १० ऑगस्ट १९२० रोजी त्यांचा 'केसरी'तील शेवटचा लेख प्रसिध्द झाला आणि त्यानंतर काकासाहेब व 'केसरी' यांची कायमची फारकत झाली. यानंतर 'लोकमान्य' दैनिकांचे संपादक सांभाळून पुढे त्यांना 'नवाकाळ' हे आपले स्वत'चे दैनिक सुरू केले.''[३६]

लोकमान्य टिळकांच्या शिक्षेनंतर काकासाहेबांचे संपादकपद संपुष्टात आले. आणि टिळक सुटून परत आल्यावरच काकासाहेब केसरीत दाखल झाले. परंतु टिळकांच्या निधनाने काकासाहेबांचा केसरीशी संबंध कायमचा संपला.

**काकासाहेबांचे 'लोकमान्य' वृत्तपत्रातील संपादकीय कार्य :-**

''लो. टिळकांच्या मृत्यूनंतर 'केसरी'ची जी नवी व्यवस्था, केळकर प्रभूत्तीनी केली. तीत कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकरांना स्थान नव्हते. त्यामुळे 'केसरी'तून ते बाहेर पडले होते. पत्राच्या खटपटीत असलेले गंगाधरराव देशपांडे व चित्रशाळेचे वासुकाका जोशी, ह्यांनी पत्राचे संपादक म्हणून काकासाहेब खाडिलकरांचे नाव सुचवत सर्वांनी त्या सूचनेला एकमुखाने मान्यता दिली. 'लोकमान्य' दैनिक काढण्याच्या वाटाघाटीत स्वतः काकासाहेबही होतेच. शिवाय लोकमान्यांचे स्मारक म्हणून निघणाऱ्या पत्राचे संपादकपद नाकारणेही खाडिलकरांना शक्य नव्हते. यामुळे काकासाहेबांनी ती जबाबदारी पत्करण्याचे मान्य केले. पत्राचे संपादकीय धोरण त्यांच्याच अखत्यारित राहावे असेही ठरले.

'लोकमान्य' दैनिकाच्या व्यवस्थेत इतरांचा हात असला तरी प्रत्यक्ष कामाची धुरा खाडिलकरांना संपादकपद स्विकारल्यामुळे आपल्या खांद्यावरच घ्यावी लागली. त्यांना दैनिकाचा अनुभव नव्हता. पण एकदा जबाबदारी स्विकारल्यानंतर ती पार पाडण्यात कसूर करण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. पहिला अंक काढताना, अग्रलेखापासून तो इतर साऱ्या मजकुराबाबत त्यांनाच विशेष परिश्रम करावे लागले. अंक प्रत्यक्ष छापून बाहेर पडेपर्यंत फारच सायास पडले, अंक छापणारे यंत्र बंद पडले. वीज मिळाली नाही यामुळे हाताने यंत्र फिरवून अंक छापावा लागला. अंक निघेपर्यंत, काकासाहेब यंत्राशी ठामपणे राहिले होते.

'लोकमान्य' दैनिकाचा पहिला अंक चैत्र शुध्द प्रतिपदेला म्हणजे गुढीपाडव्याला ९ एप्रिल १९२१ रोजी बाहेर पडला. पत्रावर शिरोभागी घालण्यासाठी पुढील श्लोक काकासाहेबांनी रचला होता-

**देशोध्दारे प्रविण टिळक सुचरित ध्यायते तध्दरेण्य ।**

**उद्दीप्त राष्ट्रभक्त्या जनपदहृदय यस्य कारनिवासैः ।।**

**बध्दकांक्षः स्वराज्ये परिणतवचसा भारतो यस्यजातः ।।**

**दृश्यो गीता रहस्ये विमलयतु गुरुःनोधियो लोकमान्यः ।।**

अग्रलेखावरील ब्रीदवाक्य म्हणून 'मामनुस्मर युध्दच' हा चरण काकासाहेबांनी निवडला होता पहिल्या अंकात, 'स्वतःसंबंधाने'या मथळ्यांचा अग्रलेख लिहून काकासाहेबांनी आपल्या पत्राचे धोरण स्पष्ट केले होते. कै. बाळ गंगाधर टिळक यांना गुरुस्थानी मानणाऱ्या मंडळीना मुंबईस टिळक पक्षाचे रोजचे वर्तमानपत्र असावे अशी उत्कट इच्छा असल्यामुळे व टिळकांच्या राजकीय चळवळीचा आत्मा स्वराज्य असल्याने पत्राचे धोरण त्यापेक्षा निराळे असण्याची शक्यताच नव्हती.''[३७]

काकासाहेबांनी 'लोकमान्य' वृत्तपत्रांचे कार्य आपल्या संपादकीय कारकीर्दीमध्ये उत्कृष्टरित्या पार पाडले. परंतु त्यांच्यावर 'केसरी'तून जसा सुटण्याचा प्रसंग आला तसाच प्रसंग 'लोकमान्य'वृत्तपत्रांत सुध्दा आला.

काकासाहेबांचा 'लोकमान्य' कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाच्या सभेत वाद झाला, त्या वादावरून त्यांनी 'लोकमान्य' पद सोडण्याचा निर्णय घेतला. आणि क्षणात 'लोकमान्य' वृत्तपत्र सोडले. ते वृत्तपत्र सोडतानाच स्वतःचे वृत्तपत्र 'नवाकाळ' काढत आहे असे ठामपणे सांगून त्यानुसार लगेच काकासाहेब 'नवाकाळ' वृत्तपत्र काढण्याच्या तयारी लागले.

**काकासाहेबांचे 'नवाकाळ' वृत्तपत्राचे संस्थापक– संपादकीय कार्य :–**

''काकासाहेबांनी 'आयुष्याच्या शेवटच्या पायरीवर' उभे असताना म्हणजे पन्नाशीच्या सुमारास 'नवाकाळ' पत्र सुरु केले. ज्या वयात मनुष्य साधारणतः निवृत्तीचा विचार करू लागून त्या दृष्टीची आखणी करीत असतो. त्यावेळी त्यांनी 'नवाकाळ' पत्राचा नवा व्यवसाय सुरू केला आणि त्या कामी आपल्या सर्व शक्ती तरुणाच्या उत्साहाने व धडाडीने खर्ची घातल्या. 'नवाकाळ'च्या पूर्वतयारीच्या काळात व 'नवाकाळ'च्या दररोजच्या कामकाजाची घडी नीट बसेपर्यंत त्यांनी अविश्रांत मेहनत घेतली नवाकाळसाठी छापखान्याची तरतुद करणे, ज्यासाठी यंत्राची व इतर व्यवस्था करणे वगैरे गोष्टी ज्यापूर्वी त्यांना कधी कराव्या लागल्या नव्हत्या त्या त्यांनी आयुष्याच्या उतरंडीला लागल्यावर सुरू केल्या आणि धडाडीच्या पण अडाखेवंद धोरणाने त्यात यश मिळविले. 'नवाकाळ'चा पहिला अंक रंगपचमीला प्रसिध्द झाला. त्यांच्या

आदल्या दिवशीची रात्र काकासाहेबांनी श्री. वासुकाका जोशी वगैरेच्यासह छापखान्यात जागून काढली. यंत्राची लहर रात्रीच्यावेळी बिघडली होती ती ताळ्यावर आल्यावर 'नवाकाळ'च्या पहिल्या अंकाची छपाई बऱ्याच उशीरा सकाळी सुरू झाली आणि ९ वाजण्याच्या सुमारास 'नवाकाळ'चा अंक घेऊन काकासाहेब घरी परत आले. त्यानंतर एकूण व्यवस्था नीट लागेपर्यंत शारीरिक काबाडकष्ट तर होतेच पण त्याचबरोबर मानसिक विवंचनाहि होत्या. 'केसरी'त आणि लोकमान्यात ज्या साह्यक शक्ति होत्या त्या 'नवाकाळ'च्या बाबतीत प्रतिकूल ठरल्या होत्या आणि एक प्रकारच्या संघटित विरोधाला तोंड द्यावे लागत होते. अशा प्रतिकुल परिस्थितीत त्यांनी धडाडीने 'नवाकाळ' साठी जास्तीत जास्त काबाडकष्ट उपसले आणि अतिश्रमाचा त्यांच्या प्रकृतीवर कायम स्वरूपाचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. वृत्तपत्रीय दैनिक व्यवसायाच्या सुमारे दहा वर्षांच्या काबाडकष्टानी त्यांना दहा वर्षांनी अधिक म्हातारे केले.''[३८]

काकासाहेब 'नवाकाळ' वृत्तपत्रासाठी अतिशय कठोर परिश्रम घेतले व आपल्या स्वतंत्र वृत्तपत्राने समाजात एक वेगळे स्थान निर्माण केले. काकासाहेबांचे कार्य 'नवाकाळ' वृत्तपत्रामधून जोमाने सुरू झाले होते. आपल्या लेखामधून समाजजागृती करीत तसेच काही लेख ब्रिटिशाविरोधी ही असत. त्यामुळे ब्रिटिश सरकारची त्यांच्यावर करडी नजर होती.

''१९२० नंतर सरकारने दडपशाहीचे जे सत्र सुरू केले होते त्याची झळ 'नवाकाळ'लाही लागली. काही तरी खुसपट काढून जामीन मागावयाचा व तो पुढे फालतू कारणाने जप्त करावयाचा असा त्यावेळी सरकारचा खाक्या होता. वर पुन्हा नवीन जामिनाचे शुल्ककाष्ठ मागे लावून द्यावयाचे असा एकंदर प्रकार होता.''[३९]

त्यातुनच वृत्तपत्रावर ब्रिटिशांची दडपशाही सुरु झाली.

**काकासाहेबांचा राजद्रोहाच्या खटल्यावेळचा कणखरपणा :–**

''काकासाहेबांना १९२९ साली राजद्रोहाचा खटला होऊन एक वर्षाची शिक्षा झाली. त्यावेळी त्यांच्या कणखर धोरणांचे प्रत्यंतर आले. खटला भरण्यात आल्यावर जास्तीत जास्त शिक्षेचा अंदाज मनाशी बांधून त्यांनी त्या दृष्टीनी मनाची तयारी व व्यवसायाची व्यवस्था शांत चित्ताने केली व नित्यक्रम कणखरपणाने सुरु ठेवले. तुरुंगवासाच्या संकटाविषयी घरांत

चुकूनही कधी ते शब्द बोलले नाहीत. खटल्याच्या निकालाचा दिवस उजाडला आणि घरातील मंडळीनी किमानपक्षी जपून संभाळून रहा काळजी करू नका असे काही ते सांगतील अशी अपेक्षा करण्यात येत होती. जेवण उरकून जणू काही नित्याप्रमाणे बाहेर जावयास त्यांनी कपडे चढविले. परत किती दिवसांनी येणार कोण जावे असे घरांतील प्रत्येकाला वाटत होते, पण त्यांनी स्वतः भावना विवेशता दाखविली नाही आणि बाकीच्यानाहि तशी संधी त्यांनी दिली नाही. कपडे चढवून ते घरातून बाहेर पडू लागले. तेवढयात त्यांना देवाला नमस्कार करून जाण्यास सुचविण्यात आले. मिनिटभर ते विमनस्क झाल्यासारखे झाले. पण तेवढ्यात स्वतःला सावरून सुचनेचा स्विकार करून देवाला त्यांनी नमस्कार केला आणि मागे वळूनहि न पाहता त्यांनी रस्ता धरला तो रस्ता तुरुंगाकडे जात होता.''[४०]

अशाप्रकारे काकासाहेब 'नवाकाळ' वृत्तपत्रावर झालेल्या खटल्यानुसार तुरुंगात शिक्षा भोगण्यासाठी स्वतःहून गेल्याचे दिसून येते.

**महात्मा गांधीकडून काकासाहेबांचा गौरव :–**

काकासाहेबांच्या शिक्षेची वार्ता ऐकल्यावर खुद्द मा. गांधीनी 'यंग इंडिया' दि. ४ एप्रिल १९२९ रोजी लेख लिहून काकासाहेबांचा पुढीलप्रमाणे गौरव केला होता–

'नवाकाळ'चे अभियोजन

'' 'नवाकाळ' च्या श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांच्या विरुध्दच्या खटल्याचे शीर्षक अभियोजन असे मी दिले आहे. पण वस्तुतः हे अभियोजन (प्रॉसिक्युशन) नव्हे हा निव्वळ छळ (परसिक्युशज) आहे! जनविरोधी सरकारच्या राज्यात जेथे बराचसा विरोध दडपून टाकला जातो तेथे स्पष्टवक्त्या पत्रकाराला छळ हा सोसावाच लागतो. श्री. खाडिलकर आपल्याला जे रुचेल ते परखडपणे बोलण्याला कचरत नाहीत. खेरीज ते एक प्रभावी लोकप्रिय लेखक आहेत. स्पष्टोक्तीमुळे मिळालेल्या लोकप्रियतेसाठी त्यांनी जबर किंमत मोजली आहे. मी त्यांचे अभिनंदन करतो.

'मला माहीत आहे की, ते तत्वचिंतक आहेत. एकदा ते मला म्हणाले होते की, वृत्तपत्रीय साहसा खातर त्यांना अधून मधून जे दंड भरावे लागत. त्याची पूर्ती ते अनेक वेळा

नाटक लिहून करीत. आपल्या मतानुसार, कर्जबाजारी न होता, आपल्या वृत्तपत्रामार्फत लोक प्रबोधन करण्यात ते समाधान मानतात. त्यांची योग्यता, त्यांची एकनिष्ठा, देशासाठी त्यांनी केलेला त्याग यामुळे त्यांच्याबद्दल मला वाटत असलेला आदर, त्यांनी ज्या अनासक्त बुध्दीने आपल्या (वृत्तपत्रीय) साहसाची हकीकत मला सांगितली, त्यामुळे द्विगुणित झाला आहे. माझ्या मते वकिलाला फी देण्यासाठी त्यांनी जर पैसा नासला नसता तर बरे झाले असते. इतर सरकारी संस्थाप्रमाणेच न्यायालये देखील संकटप्रसंगी सरकारचे रक्षण करण्यासाठी निर्माण केली गेली आहेत. याचा प्रत्यक्षात अनंत वेळा अनुभव आला आहे लोक स्वातंत्र्याचे रक्षण जेव्हा सरकारला विरोधून करायची वेळ येते तेव्हा न्यायालये किती हतबल आहेत हे आपणाला जाणवते. म्हणून त्यांच्यापासून जितके दूर राहता येईल तेवढे चांगले.''[४१]

अशापध्दतीने महात्मा गांधीनी काकासाहेब खाडिलकरांचा गौरव केला.

'' 'केसरी'त त्यांनी लिहिलेल्या अग्रलेखामुळे लोकमान्यांवर खटला होऊन त्यांना सजा झाली आणि हे शल्य त्यांना बोचत होते. पण नंतर 'नवाकाळ' मध्ये प्रा. न.र. फाटक यांनी लिहिलेल्या अग्रलेखामुळे नाटयाचार्यांना सजा झाली !

'गुरु ऋणातून मुक्त झालो' असे आनंदाचे अश्रु काढूनच ते तुरुंगात गेले.''[४२]

काकासाहेब तुरुंगात गेले ते त्याच्या गुरुऋणातून मुक्त होण्यासाठी असे दिसून येते.

**काकासाहेब खाडिलकरांचा तुरुंगातील अनुभव :–**

सन १९२९ मध्ये ९ फेब्रुवारी १९२९च्या 'नवाकाळ' च्या अंकातील 'मुंबईचे दंगे आणि बोल्शेव्हिल बिल' नावाच्या अग्रेलाखात राजद्रोह घडल्याच्या आरोपावरून श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांस तारीख १४ फेब्रुवारी १९२९ रोजी अटक करण्यात आले व त्यांना एक वर्षाची साध्या कैदेची व दोन हजार रूपये दंडाची शिक्षा ठोठावली. पुढे आठवडाभर मुंबईच्या तुरुंगात त्यास ठेवून नंतर साबरमती जेलमध्ये त्यांची रवानगी करण्यात आली. त्यांचा साबरमती जेलमध्ये अनुभव ता. १९ जानेवारी १९३० च्या 'नवाकाळ' वृत्तपत्रातून प्रकाशित केला गेला.

''काकासाहेब खाडिलकरांनी साबरमती जेलमध्ये गेल्यावर साध्या कैदीची शिक्षा असतांहि काम मागून घेतले सुताच्या धाग्याचे गुंडे किंवा चेंडूप्रमाणे गोळे करण्याचे काम त्यास

मिळाले होते. व या कामाबद्दलच त्यांना दोन महिने दहा दिवसांची सूट मिळून ते ता. १७ जानेवारी १९३० रोजी कारागृहातून मुक्त झाले. मुंबईहून साबरमतीस नेतांना त्यांच्या बाबतीत जो निंद्य अनुदारपणा सरकारी अंमलदारांनी दाखविला तसाच अतुदारपणा सुटकेच्या वेळीही घडला! श्री. खाडिलकर अटक वेळीप्रमाणे ता. १३–१४ ला सुटतील या अपेक्षेने काही मंडळी अहमदाबादेस गेली होती ती. ता. १७ रोजी तुरुंगाबाहेर १० पर्यंत बसली होती. त्या दिवशीचे कैदी सोडण्यात आले आणि आता श्री. खाडिलकरांची सुटका होत नाही अशा निराशेने ती परत गेल्यावर एकदम त्यांना सोडले. सुदैवाने तुरुंगाबाहेर श्री. खाडिलकर यांस आपले सामान नेण्याला हेलकरी मिळाला म्हणून ठीक झाले. नाही तर ऐन दोन प्रहरी आपल्या सामानाचे ओझे स्वतःच वाहून उन्हात रखडत त्यांच्यावर इष्ट स्थळी जाण्याचा प्रसंग ओढवला होता. तुरुंगात गेल्यापासून श्री. खाडिलकरांचे वजन सारखे खालावत होते. अन्नपाण्याच्या बाबतीत तुरुंगांच्या अधिकाऱ्यांनी कोणत्याहि प्रकारच्या सवलती त्यास दिल्या नव्हत्या. पहिले काही महिने त्यास दूध दिले जात असे. पुढे म्हशी आटल्याच्या सबबीवर दूध बंद झाले व सुटकेपर्यंत सरकारला दुभत्या म्हशी मिळाल्या नाहीत ! निःसत्व अन्नामुळे त्यांचे खालावलेले वजन कैदेच्या मुदतीत केव्हाच भरून निघाले नाही. तुरुंगातून सुटतेवेळी त्यांचे वजन मुळापेक्षा १५ पौंडानी कमी म्हणजे ११० पौंड भरले. यावरून त्याच्या अशक्तपणाची कल्पना येईल. अशा स्थितीतहि त्यांना त्याचे सामानसुमान घेऊन तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी त्यांस तुरुंगाबाहेर सोडून दिले यावरून अमलदारांचा मनोवृत्तीचा सहजच उलगडा होतो.

अन्नपाण्याची माहिती वर आली आहे. वस्त्र पांघारण्याची हकीकत अशीच उव्देगजनक आहे. आरंभी श्री.खाडिलकरांना घरचे अंथरून पांघरून वापरण्याला परवानगी होती, पुढे दुधाप्रमाणेच घरच्या अंथरूणपांघरूणाच्या उपयोगाची सवलत रद्द करण्यात आली. अन्नवस्त्रासंबंधातल्या अपमानकारक कुचवणुकीपेक्षांहि अधिक तीव्र ताप कैद्याच्या मनाला होत असतो हा अनुभव प्रसिध्दच आहे. तुरुंगामध्ये मनोवृत्तीची जी हिंसा चाललेली असते ती बाकीच्या हालअपेष्टांहून जास्त भयंकर असते. श्री. खाडिलकरांना कैदेत मानसिक स्वरूपाच्या त्रास सुरुवातीस अतिशय सोसावा लागला. त्यांना ज्या वार्डात ठेवले होते. त्यांच्या वरांड्यात ते दिवसभर फेऱ्या घालीत असत व त्यांची बेरीज सहा–सात मैलाइतकी भरे, तुरुंगातले शुष्क अन्न अंगी लागण्याकरिता ते सकाळी थोडा नमस्कार–जोराचा व्यायाम करीत, परंतु त्याहीपेक्षा

जास्त उपकारक व्यायामवरील फेऱ्यांचा होता. संध्याकाळी खोलीत कोंडले म्हणजे प्रथम प्रथम त्यांच्या मनोवृत्ति विलक्षण प्रक्षुब्ध होत. आपणास कोंडून ठेवीत आहेत, आपण कैदेत आहो, या अनुभवाची जाणीव त्यांना असह्य वाटत असे. प्रक्षुब्ध मनोवृत्तीचाहा उद्रेग दाबण्याकरिता ते रामनामाच्या भजनांचा उपाय करीत असत. व या उपायाने वरील उद्रेक व चिंतनाला एक प्रकारची प्रसन्नता लाभून त्यांना चिंतनास त्या त्या वेळी अवश्य वाटणारा विषय त्यांच्या अतत्रक्षूसमोर उभा राहण्याला उशीर लागत नसे. यानंतर ते लेखनादि व्यवसाय करीत असत. संगीत, सावित्री हे नाटक त्यांनी अशाच रितीने पुरे केले या नाटकांस तुरुंगाचा त्रास मनाला होत असता त्या अनुभवाचे चित्र त्यांनी रेखाटलेले नाही. या अनुभवाचे शब्दचित्र रेखाटण्यासाठी त्यांनी दुसरे एक पौराणिक नाटक 'संगीत देवकी' नावाचे लिहिण्याचा संकल्प केला. त्यांना वृत्तपत्रे, मासिके किंवा देशव्यवहाराचे वक्तव्य वाचण्यास मुळीच मिळत नव्हते. धार्मिक ग्रंथ मिळत असत. ज्ञानेश्वरी, गीतारहस्य व भागवतपुराण जवळ असल्याने त्यांचा त्यांनी तुलनात्मक रीतीने सूक्ष्म अभ्यास केला. नाटयलेखन, ग्रंथवाचन या खेरीज चिंतनाला आणखी एक विषय अगाथाने सापडला होता व तो म्हणजे तुरुगांतील येणाऱ्या नव्या नव्या कैद्यांच्या गुन्हांच्या कारणांचा विचार हा होय. बाहेर पोटभर अन्न मिळत नाही. म्हणून गुन्हे करण्याकडे लोक वळतात. तुरुंगात पोटभर तरी अन्न मिळते अशा करता लोकांनी गुन्हेगार बनण्याइतकी देशाची आर्थिक स्थिती हलाखीची आहे, असे प्रस्तुत निरीक्षणात त्यांच्या निदर्शनास आले.''[४३]

थोडक्यात तुरुंगात काकासाहेबांना पुरेसे अन्न दिले जात नव्हते. घरचे अंथरूण पांघरून घेण्यास मनाई करण्यात आली. एकूण काकासाहेबांना तुरुंगात शारीरिक, मानसिक त्रास सहन करावा लागला व देशाच्या आर्थिक स्थितीमुळे सुध्दा काही लोक गुन्हे करून तुरुंगात उदरनिर्वाहासाठी येतात हा बोध त्यांना तुरुंगात झाला.

**काकासाहेबांचे सुटकेनंतरचे कार्य :–**

काकासाहेबांना नऊ महिने तुरुंगात रहावे लागले. १७ जानेवारी १९३० रोजी काकासाहेबांची साबरमतीच्या तुरुंगातून सूटका झाली. परंतु 'नवाकाळ'च्या संपादकत्वाची धुरा मात्र पुन्हा त्यांनी आपल्या खाद्यांवर घेतली नाही.

''१९३० साली काकासाहेब संपादक पदावरून निवृत्त झाले आणि त्यानंतर त्यांनी 'नवाकाळ' मध्ये कोणतेच लिखाण लिहिले नाही पण १९४४ साली अचानकपणे त्यांनी वीस–पंचवीस ओळीचा मजकूर 'नवाकाळ'मध्ये छापण्यासाठी दिला आणि तो शेवटचा मजकूर म्हणजे एका तात्विक ग्रंथावरील अभिप्राय होता! हा ग्रंथ त्यांच्या कुणा खास मित्राचाही नव्हता, मग अचानक त्यांनी अभिप्राय का लिहून दिला? विचार केल्यावर असे वाटते की त्यांनी ही दोन टोके ही जुळविली!

काकासाहेबांनी लोकमान्यांच्या सुचनेवरून नेपाळला जाऊन कौलांचा कारखाना काढला आणि त्या आवरणाखाली पिस्तुलांचा कारखाना काढण्याचा त्यांचा घाट होता. क्रांतीचे हे प्रत्यक्ष पाऊल होते. अखेरच्या निवृत्तीच्या काळात त्यांनी जे तत्वज्ञानावर ग्रंथ लिहिले त्यातील खाडिलकरांचा रुद्र या ग्रंथात ते म्हणतात 'रुद्र म्हणजे क्रांती' रशियन क्रांतीचे उदाहरण देऊन त्यांनी क्रांतीची वैचारिक मीमांसा या ग्रंथात केली आहे.''[४४]

काकासाहेब खाडिलकरांनी तुरुंगातून आल्यावर 'नवाकाळ' साठी लिखाण केले नाही परंतु त्यांनी तत्वज्ञानावर आधारित ग्रंथ लिहून त्यातून क्रांती मशाल तेवत ठेवली.

**'स्वाधीन भारत' हिंदी दैनिक वृत्तपत्राची सुरुवात :–**

सन १९३० मध्ये काकासाहेब खाडिलकर तुरुंगातून बाहेर आल्यावर संपादकीय लेखन केले नाही. परंतु 'नवाकाळ' वृत्तपत्रावर प्रत्यक्ष लक्ष ठेवत तुरुंगात जाण्यापूर्वीपासून 'नवाकाळ' वृत्तपत्रास इंग्रजी वृत्तपत्राची जोड हवी असे वाटत होते.

तेवढयात काकासाहेब तुरुंगात गेले. सुटून आल्यावर परिस्थितीच्या नव्या वळणानुरूप त्यांच्या या कल्पनांना जरा मुरड पडून त्यांनी याच कार्यासाठी आपले एक नवे हिंदी दैनिकच काढण्याचे ठरविले. आता इमारत मोठी होती. छापखाना पुरेसा होता. छपाईसाठी डबल फि टर मिळताच काकासाहेबांनी आपले स्वतःचे नवे हिंदी दैनिक पत्र काढण्याचे ठरवून त्याची पुढीलप्रमाणे तारीख ४–६–१९३० च्या 'नवाकाळ' मध्ये जाहिरात दिली.

''स्वाधीन भारत–
मुंबई से राष्ट्रीयहिंदी दैनिक
आगामी सात एप्रिल सोमवार से प्रकाशित होगा.

प्रधान संपादक – निंरजन शर्मा अजित
सं. संपादक – क. काशीप्रसादसिंह वर्मा

बंबई संद्वेश राजनैतिक और व्यापार प्रमुख केंद्र से एक उच्च कोटी को राष्ट्रीय हिंदी दैनिक पत्र की आवश्यकता बहुत दिन से अनुभव जा रही थी। और विशेषतः महात्माजी के राष्ट्रीय महासंग्राम के समय इस रणभूमी मे इसका अभाव बहुत ही खटकता था। इस अभाव की पूर्ती के लिये राष्ट्रीय यज्ञ में भाग लेनेवाले हिंदी भाषा भाषियों तथा राष्ट्रभाषाप्रेमी जनता को शुध्द राष्ट्रीयसंदेश सुना कर उन्हें कर्तव्य पथपर अगेसर करने के लिये यह आयोजन किया है।

संचालक – कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
नवाकाळ ऑफिस, मुंबई .''[४५]

काकासाहेबांच्या मनातील जोरदार राष्ट्रकार्याची ऊर्मि या हिंदी जाहिरातीत प्रतीत होत असल्यामुळे ही जाहिरात सहेतुकपणे येथे संपुर्णपणे उदघृत केली आहे. काकासाहेबांनी संपादक म्हणून जरी काम सोडले होते तरी संचालकाचे काम करीत ते राष्ट्रीय रणभूमीवर उभेच होते. स्वतः हातात शस्त्र घेऊन ते लढाईत पडत नसले तरी लढवय्यांच्या कार्याला जुंपलेल्या मंडळीना संचालना देण्याचे काम ते करीतच होते. सुदर्शन चक्रधारी कृष्ण जरी ते राहिले नाहीत तरी पार्थ सारथी कृष्ण म्हणून ते स्थावर अधिष्ठित होते. लोकजागृतीच्या पवित्र कार्याचे सूत्रचालकत्व त्यांच्या हातात होतेच.

**काकासाहेबांचे सांय–दैनिक 'संध्याकाळ' वृत्तपत्र :–**

''यावेळी दुसरे महायुध्द चालू झाले. लढाई कलाकलाने वाढत होती. नव्या घडामोडी होत होत्या. 'नवाकाळ' चा खप वाढत होता. प्रांतिक स्वायत्ततेखाली कॉग्रेसने अधिकारग्रहण केल्याने मुंबईप्रांतातही कॉग्रेसमंत्रिमंडळ झाले व त्यांनी लागलीच कॉग्रेसचा महत्त्वाचा दारुबंदीचा कार्यक्रम अंमलात आणण्याचे ठरविले. या सरकारी धोरणास पोषक अशी वर्तमान पत्रे निरनिराळ्या भाषेत निघून या विषयाचा त्या त्या विशिष्ट लोकांत प्रचार होणे जरूर होते. या दृष्टीने 'नवाकाळ' ने आपले 'संध्याकाळ' नामक संध्याकाळचे दैनिक काढले व त्यात

कॉंग्रेसच्या धोरणाचा पाठपुरावा व प्रचार धडाक्याने सुरु केला. 'नवाकाळ'ला स्वतंत्र रीतीनेच आपला अंक सायंकाळीही निघावा असे वाटत होते. ही गरज ''संध्याकाळ' ने पुरी केली.''[४६]

अशाप्रकारे काकासाहेबांनी दुसऱ्या महायुध्दाच्या दरम्यान 'संध्याकाळ' वृत्तपत्र सुरू केले.

या वृत्तपत्राची नेमके तारीख, केव्हा व कोणत्या वर्षी सुरू झाले याबाबत सांगणे अडचणी आहेत.

''संध्याकाळ' पत्रावरील वर्ष आणि अंक यांचा मेळ घालता हे पत्र १९३४च्या मे मध्ये सुरू झाले असे दिसते. शुक्रवार ता. २४ जुलै १९८१ च्या अंकावर वर्ष ४७ अंक १०८ अशी नोंद आहे व बुधवार ता. ३ मार्च १९८२ च्या अंकावर वर्ष ४७ अंक २९३ अशी नोंद आहे. यावरून पत्र १९३४ साली केव्हा तरी सुरू झाले असावे, हे स्पष्ट होते. परंतु 'नवाकाळ' पत्रात काकासाहेब खाडिलकर यांचे एक जेष्ठ सहकारी म्हणून जवळजवळ सुरुवातीपासून वावरलेले न. र. फ ाटक ह्यांनी आपल्या 'नाट्याचार्य कृ.प्र. खाडिलकर' या ग्रंथात पत्र १९३९ मध्ये सुरू केले असे म्हटले आहे त्यांचे नेमके शब्द असे आहेत '१९४५ मध्ये थांबले ते दुसरे जागतिक महायुध्द १९३९ मध्ये पेटले होते. युध्दाच्या रम्य वार्ता साऱ्या दिवसभर कानी येत राहाव्या, अशी प्रखर उत्सुकता त्याकाळी आबाल –वृध्दामध्ये जगभर संचारली होती. ती ध्यानी घेऊन काकासाहेबांनी 'संध्याकाळ'चे दैनिक 'संध्याकाळ' याच नावाने सुरु केले.

पत्राच्या दर्शनी पानावर गायत्री मंत्र आणि अग्रलेखाच्या मथळ्यावर 'तमसो मा ज्योतिर्गमय' हे वैदिक प्रार्थनावाक्य असे. आता ही दोन्ही छापली जात नाहीत. सरकारी 'प्रेस इन इंडिया' या वृत्तपत्रांच्या ग्रंथातही पत्र १९३९ साली निघाल्याचा उल्लेख आढळतो.''[४७]

अशाप्रकारे 'संध्याकाळ' निघाल्यामुळे 'नवाकाळ' काढल्यावर काकासाहेबांच्या मनात त्याच्या उत्कर्षाबद्दल ज्या कल्पना होत्या त्यातील सायंपत्राची कल्पना सफल झाली. 'नवाकाळ' सायंकाळी 'संध्याकाळ'च्या रुपाने लोकांच्या उत्सुक हातांत पडू लागला. ही उत्सुकता दुसरे महायुध्द सुरू झाल्याने त्यावेळी सारखी वाढत होती.

काकासाहेब खाडिलकरांची वृद्धपकाळातील कालक्रमणा :–

''काकाची आता शारीरिक व मानसिक स्थिती पूर्ण निवृत्तीची होती. यापुढे ते जगले ते मरणाच्या पूर्ण तयारीनेच! तारुण्यात व वृध्दावस्थेत त्यांनी आपल्या क्रांतिवृत्तीचा चांगली कामे करण्याकडे उपयोग केला होता. क्रांति अनुभवून पुढच्या मार्गाकडे त्यांनी आपली दृष्टि लावली होती. मरणाशी दृष्टि भिडली होती. त्यांनी आपला दैनंदिन जीवनक्रम जरी यथापूर्व चालविला होता तरी

**ॐ त्र्यम्बकं यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनम् ।**

**उर्वारुकमिव बन्धनान् मृत्योर्मुक्षीय मामृतात् ॥**

'या मृत्यूच्या जबड्यातून आम्हांस मुक्त कर आम्ही मेलो तरी आम्ही अमृत व्हावे, जगतांना अमृत आमच्यात आहे, गेल्यावर ते अखंड रहावे,' अशी ते रोज प्रार्थना करीत असत. तेवढाच विचार त्यांच्या मनांत आता राहिला होता असे वाटे. त्यामुळे लौकिक व्यवहारांत पूर्ण निर्लेपतेने ते वागत. त्यानी षड्रिपूशी व्यक्ति गत लढाई पूर्णतया जिंकली होती तसेच राष्ट्राच्या स्वातंत्र्य युध्दात यश प्राप्त झाले होते. राष्ट्र स्वतंत्र झाले होते.

सन १९४७ ऑगस्ट १५ रोजी भारतमाता पारतंत्र्यातून मुक्त होऊन त्या शुभदिनी स्वतंत्र झाली. ज्यासाठी काकांनी सर्व जन्मभर विरोधी शक्तीशी लढा दिला होता ते स्वातंत्र्य आज प्राप्त झाले. लढा यशस्वी झाला. आपल्या नेत्रांनी भारतवर्ष स्वतंत्र झालेले त्यांनी पाहिले. साहजिक ते मनाच्या सुखदुःखातील आनंदमय स्थितीत होते. 'आज माझी माता स्वतंत्र झाली. भारत स्वतंत्र झाला' असे समाधानपूर्ण उद्गार त्यांनी काढले.''[४८]

काकासाहेबांनी विद्यार्थीदशेपासूनच स्वातंत्र्यासाठी लढा पुकारला होता. त्याचे यश त्याच्या वृध्दपकाळात त्यांना मिळाले. देश स्वतंत्र झाला होता.

''काका कालक्रमणा करीत असता एक अघटित घटना दिल्लीस घडली. ३०–१–४८ रोजी दिल्लीस प्रार्थनेच्या स्थळी म. गांधी यांचा अमानुष वध करण्यांत आला. हे अघोर कृत्य कल्पनातीत होते. काकासाहेबांसारख्या वरहीचा कृत्याचा परिणाम झाला. म. गांधीच्या

जीवनाबद्दल काकांचे विचार अनेक वेळा त्यांनी आपल्या प्रवचनामध्ये सांगितले. ते काकांनी 'याज्ञावल्वय– मैत्रेयी संवाद' या उपनिषत्प्रकरणाच्या विवेचनात त्यांनी १९४७ साली नमूद केले आहेत.''[४९]

'महात्मा गांधीजीचा मृत्यु' ही घटना काकासाहेबांवर मोठा आघात करणारी होती.

''१ ऑगस्ट १९४८ रोजी लोकमान्य पुण्यतिथी निमित्त त्यांचे मुंबईच्या नभोवाणीवर भाषण व्हावे अशी सूचना श्री. फाटक यांचे मार्फत आली. त्या दिवशी काकांनी आपल्या गुरुची पुण्यस्मृती असल्याने तसे भाषण करण्याचे कबूल केले.''[५०]

लोकमान्याच्या पुण्यतिथीला नभोवाणीवर भाषण करण्याइतकी शक्ति त्यांना वाटत होती. इतके काय पण त्यानंतरही शेवटच्या क्षणापर्यंत त्यांचा दैनंदिन कार्यक्रम नित्याप्रमाणे चालला होता. अशा थोर काकासाहेब खाडिलकरांचे देहावसान दिनांक २६ ऑगस्ट १९४८ रोजी झाले.

काकासाहेब खाडिलकरांचा जन्म भारत स्वतंत्र करण्यासाठी होता. देश पारतंत्र्यातून मुक्त झाला. तसा त्यांनी आपला आत्मा देहातून मुक्त केला.

काकासाहेबांच्या देहवसानाची बातमी 'नवाकाळ' वृत्तपत्रातून प्रकाशित केली गेली.

## २.११ 'नवाकाळ' वृत्तपत्राचे दुसरे संपादक यशवंत कृष्णाजी खाडिलकर :–

नाटयाचार्य खाडिलकर यांनी ७ मार्च १९२३ रोजी दैनिक 'नवाकाळ'ची स्थापना केली. त्यांनी 'नवाकाळ' धडाडीने यशस्वी केली. ब्रिटीश सरकारने त्यांच्यावर 'नवाकाळ'मधील अग्रलेख आणि टिका टिप्पणी याबद्दल राजद्रोहाचा खटला (९ फेब्रुवारी, १९२९) भरला. त्यामुळे काकासाहेबांना तुरुंगात जावे लागले. त्यांनी जातानाच मनोमन ठरवून 'नवाकाळ'चे संपादक पद सोडले. मार्च १९२९ साली त्याचं जेष्ठ पुत्र यशवंत कृष्णाजी उर्फ अप्पासाहेब खाडिलकर संपादक झाले.

**अप्पासाहेब खाडिलकरांचे 'नवाकाळ'वृत्तपत्रात पर्दापण :–**

''काकासाहेबांना अटक होऊन त्यांची जामिनावर सुटका झाल्यावर संपादकपद कोणाकडे जावे असा प्रश्न साहजिकचे उपस्थित झाला. काकासाहेबांचे जेष्ठ चिरंजीव यशवंत कृष्ण ऊर्फ अप्पासाहेब खाडिलकर अहमदाबादच्या गुजरात राष्ट्रीय विद्यापीठाची वाङ्मय विशारद ही पदवी घेऊन १९२७ साली परत आले होते. आल्यानंतर मुंबईच्या नॅशनल मेडिकल कॉलेजमध्ये ते दाखल झाले होते. परंतु काकासाहेबांवर खटला सुरु झाल्याने अप्पासाहेब 'नवाकाळ'च्या सेवेत सामील झाले. साहजिकच 'नवाकाळ'चे संपादक पद त्यांच्याकडे १९२९ साली गेले व ते पुढे त्यांच्याकडे कायम राहिले. कारण काकासाहेबांनी तुरुंगात जाताना संपादकपदाची धुरा जी एकदा खाली ठेवली ती सुटून आल्यावर ही आपल्याकडे घेतली नाही.''[५१]

अशाप्रकारे चळवळीचे आणि पत्रकारितेचं बालकडू त्यांना घरातच मिळालं. वडिलांच्या देखरेखीखालीलच अप्पासाहेबांची पत्रकारिता सुरु झाली.

**अप्पासाहेब खाडिलकरांचे संपादकीय कार्ये :–**

'' 'नवाकाळ'चे दुसरे संपादक यशवंत कृष्णाजी उर्फ अप्पासाहेब खाडिलकर हे होत. १९२९ साली काकासाहेबांना शिक्षा झाली आणि 'नवाकाळ'ची संपादकीय धुरा अप्पासाहेबांच्या खांद्यावर आली. काकासाहेब सुटून आल्यावर ही त्यांनी संपादक पद पुन्हा आपल्या हाती घेतले नाही. त्यांनी एक प्रकारे निवृत्ती स्विकारली. पण ते हयात असे पर्यंत म्हणजे १९४८ पर्यंत त्यांची 'नवाकाळ' वर सक्त नजर असे सर्व कारभार त्यांच्या करडया शिस्तीतच चाले. अप्पासाहेब संपादक असले तरी काकासाहेबांची आज्ञा ओलांडावयाची नाही, की त्यांची चौकट मोडून वा चाकोरी सोडून चालावयाचे नाही. ही अप्पासाहेबांची वृत्ती 'नवाकाळ' च्या संपादनातही कायम राहिली. १९६९ साली 'नवाकाळ' पत्राचे संपादक पद अप्पासाहेबांचे चिरंजीव निळुभाऊ यांनी आपल्याकडे घेईपर्यंत म्हणजे जवळ जवळ ४० वर्षे अप्पासाहेब संपादक होते व ११ मार्च १९७९ रोजी मृत्यू होईपर्यंत अप्पासाहेब 'नवाकाळ'शी संबंधित राहिले. तरुण वयातच संपादकाची खुर्ची मिळाली. तरी काकासाहेबांच्या करडया शिस्तीप्रमाणे अप्पासाहेबांना एजंटला अंक मोजून देण्यापासून तो अग्रलेख लिहिण्यापर्यंतच्या सर्व

लहानमोठया कामांची उमेदवारी करुनच दैनिकच्या निर्मितीचा अनुभव घ्यावा लागला. वयाच्या २४ व्या वर्षी त्यांच्या शिरावर ही जबाबदारी येऊन पडली. पण जिद्दीने व शिस्तीने अप्पासाहेबांनी ती पार पाडली. काकासाहेबांच्या उग्र व मनस्वी तापट, रागीट व्यक्तिमत्त्वामुळे अप्पासाहेबांचे व्यक्तिमत्त्व दबल्यासारखे वाटले, तरी आपला असा निराळा ठसा त्यांनी उमटविलाच. काकासाहेबांच्या पश्चात 'नवाकाळ' ला अनेक आघात सहन करावे लागले. 'नवाकाळ'कडून भारी रक्कमांचे जामीन घेण्यात येऊन ते जप्त करण्यात आले. नवनव्या व भांडवलदारी वृत्तपत्रांच्या स्पर्धामुळे 'नवाकाळ'पत्र चालविणे मुश्किल होऊ लागले. पण घेतलेले व्रत अप्पासाहेबांनी एक प्रकारे स्थितप्रज्ञाच्या वृत्तीने चालू ठेवले. मदतीच्या आमिषाला ते कधीच बळी पडले नाहीत. अगदी अनाहूत आलेली मदत न घेण्याचा कणखरपणा काकासाहेबांनी दाखविला होता. तेवढयाच कणखर वृत्तीचा बाणेदारपणा अप्पासाहेबांनी दाखविला, हलाखीची स्थिती आली, तरी त्यांनी स्वाभिमान गुंडाळून ठेवला नाही की पत्र बंद करण्याचा विचार केला नाही. काकासाहेबांनी घालून दिलेली चाकोरी आणि हाती दिलेला निष्ठेचा वारसा अप्पासाहेबांनी कधीच हातचा जाऊ दिला नाही. अप्पासाहेबांचे संपादन कर्तृव्य असे तत्वनिष्ठ व कणखर असले, तरी जुन्या पठडीतलेच होते. त्यांच्या अभ्यासाचा ग्रंथ म्हणजे महाभारत त्यातले संदर्भ त्याच्या लेखात प्रामुख्याने येत असत.''[५२]

अशाप्रकारे काकासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली अप्पासाहेबांची संपादकीय कारकीर्द चालू झाली होती.

''स्वातंत्र्योत्तर काळात मुंबईत नवनव्या भांडवलदारी वृत्तपत्रांचा उदय झाला. स्पर्धा वाढली. त्यामुळे 'नवाकाळ'ला आर्थिक संकटचा मुकाबला करावा लागला. अप्पासाहेबांनी हे सारे सहन करीत 'नवाकाळ'निष्ठेने चालू ठेवला. हे करताना वृत्तपत्रीय स्वातंत्र्य आणि ते टिकविण्यासाठी लागणारा स्वाभिमान कधी ढळू दिला नाही. कॉंग्रेसच्या विचारांचा पुरस्कार हे 'नवाकाळ'चे प्रथमपासूनचे धोरण होते. अप्पासाहेबांनी त्यात बदल केला नाही. असे असतानाही कॉंग्रेसच्या ज्या गोष्टी पटणाऱ्या नव्हत्या त्यावर टीका करताना कणखरपणे कॉंग्रेसच्या धोरणास विरोध करुन ठाम आणि निर्धारपूर्वक महाराष्ट्राची बाजू मांडली होती. पत्रकारितेवर अप्पासाहेबांची किती प्रखर निष्ठा होती. हे त्यांनी परिषदेचे अध्यक्ष म्हणून

कोल्हापूरात केलेल्या भाषणावरुन दिसते. ते म्हणतात. 'लोककार्य साधण्याची श्रध्दा हे या पेशाचे शिर आहे. धर्म मार्गही उजवी बाजू आहे. आणि मार्गदर्शन तेज दिसणे ही या व्यवसायाची प्रतिष्ठा आहे.' त्या काळात साहित्यिक आणि पत्रकार यांच्यातील वाद ही चव्हाटयावर आले होते. त्याचाही संदर्भ अप्पासाहेबांनी आपल्या भाषणात दिला ते म्हणाले 'पत्रकार आणि साहित्यिक हे सहोदर आहेत तशीच चिकित्सा मांडली तर साहित्यिक हे पत्रकरांचे अग्रज नसून अनुज आहेत.' असा कोटीक्रम करता येईल बहुतेक प्रख्यात साहित्यिकांची पहिली श्री वृत्तपत्रात लिहिलेली असते आणि त्यादृष्टीने मनुष्याच्या ठिकाणी प्रथम पत्रकार प्रकट होतो आणि मग साहित्यिक डोके वर काढतो असे त्याचं सांगणं होतं.''[५३]

अप्पासाहेब खाडिलकरांनी १९२९ ते १९६८ अशी जवळपास चाळीत वर्षे त्यांनी 'नवाकाळ'ची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. मार्मिक, तर्क शुध्द आणि उपरोधाचा स्वर असलेले त्यांचे अग्रलेख अतिशय लोकप्रिय असत. वृत्तपत्रांची सरकारकडून होणारी दडपशाही, कुचंबणा याला त्यांनी विरोध दर्शविला होता. पत्रकार संघटनांच्या माध्यमातून पत्रकरांचे प्रश्न सोडविण्यासाठीही त्यांनी प्रयत्न केले होते. १९४२–४३ मध्ये मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्षपद त्यांनी सांभाळले १९४४ मध्ये कोल्हापूरातील पत्रकार परिषदेच्या चौथ्या अधिवेशनाचे अध्यक्षपदही त्यांनी भुषविले होते.

अप्पासाहेब खाडिलकरांनी त्याच्या वयाच्या ६४ व्या वर्षी १ ऑक्टोबर १९६९ रोजी दसरा सणाच्या दिवशी मोठया आनंदाने संपादकपद सोडले आणि नीळकंठ खाडिलकरांचे नाव संपादक, मुद्रक आणि प्रकाशक म्हणून जाहीर केले.

अप्पासाहेब खाडिलकर साहित्यिक ही होते. त्यांनी 'संसारशकट' (१९३१) 'सदानंद' (१९३४) 'आजकाल' १९३६ या तत्कालीन समाज स्थितीचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या देखील लिहिलेल्या होत्या. साहित्य आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात आपल्या नावाचा दबदबा निर्माण करणाऱ्या अप्पासाहेबांचे ११ मार्च १९७९ मध्ये निधन झाले.

## २.१२ ‘नवाकाळ’ वृत्तपत्राचे तिसरे संपादक नीळकंठ खाडिलकर :–

अप्पासाहेब खाडिलकरांनी त्याच्या वयाच्या ६४ व्या वर्षी १ ऑक्टोबर १९६९ रोजी दसरा सणाच्या दिवशी मोठया आनंदाने संपादकपद सोडले आणि नीळकंठ खाडिलकराचे नांव संपादक मुद्रक आणि प्रकाशक म्हणून जाहीर केले. नीळकंठ खाडिलकरांची कारकीर्द मोठया प्रमाणात गाजली. ‘अग्रलेखांचा बादशाह’ म्हणून ओळखले जाणारे नीळकंठ खाडिलकर हे दैनिक ‘नवाकाळ’या वृत्तपत्राचे अनेक वर्षे संपादक होते. ते ‘संध्याकाळ’ या नावाचे सायं दैनिकही काढत असत.

**नीळकंठ खाडिलकरांचे कार्य :–**

नीळकंठ खाडिलकरांच्या कार्याचा येथे थोडक्यात आढावा मांडण्यात आला आहे.

‘‘शालेय शिक्षण चिकित्सह समूह शिरोळकर हायस्कूलमध्ये झाले. आंतरशालेय वक्तृत्त्व स्पर्धेत पहिले पारितोषिक विल्सन कॉलेजातून मिळाले. संपूर्ण अर्थशास्त्र हा विषय घेऊन पदवीधर मुंबई विद्यापीठाचे बुध्दिबळ चॅम्पियन झाले. विल्सन कॉलेजात बेस्ट स्टुडंट ॲवॉर्ड मिळाले. अर्थशास्त्र शिकणारे फेलो म्हणून नेमणूक झाली. ते १९५५ साली पदवीधर झाले. त्यावेळी दैनिक ‘नवाकाळ’ची आर्थिक स्थिती पूर्णपणे बिघडली होती. ‘नवाकाळ’दोन चार महिन्यात बंद पडणार असे पत्रकार म्हणत होते. अशावेळी नीळकंठ खाडिलकर विल्सन कॉलेजात फेलोशिप सोडून ‘नवाकाळ’ ऑफिसात आले. लोकप्रियतेचा असा चमत्कार केला की, ‘नवाकाळ’हे महाराष्ट्रातील कोणत्याही वृत्तपत्रापेक्षा अधिक खपाचे दैनिक आहे असे भारतीय प्रेस रजिस्ट्ररच्या अहवालात करण्यात आले. एबीसी या वृत्तपापत्राचे खप निश्चित करणाऱ्या संस्थेच्या प्रमाणपत्रांनी तेच दाखविले. ए ॲन्ड एम (ॲडव्हर्टायझिंग ॲण्ड मार्केटींग) या प्रतिष्ठेच्या मासिकाने लिहिले की, ‘नवाकाळ’ची खपातील वाढ अद्वित्तीय व अनुपम आहे.

‘नवाकाळ’च्या खपवाढीचा जगन्नाथाचा रथ थांबविताच येत नाही. ‘नवाकाळ’ची प्रगती ‘फ्रॉम फ्लॉप टू टॉप’ म्हणजे संपूर्ण अपयशातून शिखरापर्यंत झाली. एक हजार खपापासून साडेतीन लाखांवर खप आला. एबीसी प्रमाणपत्रांनी हा चमत्कार सिध्द केला.

'नवाकाळ'चा एक दिवसाचा सात लाख खप हा विक्रम कुणी मोडला नाही. दैनिक 'नवाकाळ'चे संपादक होते. या काळात त्यांचे नव्या शैलीतील मॅरेथान वृत्तांत व मुलाखती आणि विविध विषयांवरील अग्रलेख यांनी सर्वांना विस्मयचकित केले.

त्यांनी सोविएत  रशियाचा १९८३ साली एक पंधरवडा दौरा केला. परत आल्यावर त्यांनी लिहिले की मार्क्सने समाजवाद्यांचे कल्पनारम्य स्वप्न (युटोपिया) फेटाळले आणि स्वतःचे प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणे मिळेल हे मार्क्सवादी स्वप्न (युटोपिया) पाहिले. पण माणूस गणितात बसत नाही. काम, कोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे षडःविकार माणसात अंगभूत आहेत. यामुळे मार्क्सचे अंतिम उद्दिष्ट हे स्वराज्य राहील. यावेळी त्यांनी 'प्रॉक्टिकल सोशॅलिझम' ही स्वतःची विचारसरणी सादर केली. त्याबद्दल पाच मॅरेथॉन वृत्तांत (प्रदीर्घ) अग्रलेख लिहिले. विख्यात पत्र पंडित पां. वा. गाडगीळ यांना लिहिले की, मार्क्सवादावरची ही पहिली ओरिजिनल टीका आहे. मला मान्य आहे. मी स्वतः प्रथम प्रचार करीत फिरेन.

शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांना ही विचार सरणी अत्यंत आवडली. त्यांनी जाहीर केले की, यापुढे 'प्रॉक्टिकल सोशॅलिझम'ही शिवसेनेची विचारसरणी असेल. शिवसेनेच्या शिवाजीपार्कवरील दसरा मेळाव्यात 'प्रॉक्टिकल सोशॅलिझम'चे अग्रलेख छापलेले पन्नास हजार अंक देण्यात आले.

यानंतर 'प्रॉक्टिकल सोशॅलिझम' फ्रण्टतर्फे उद्ध्वस्त गिरणी कामगारांचे प्रचंड आंदोलन करण्यात आले. मुख्यमंत्री ना. शंकरराव चव्हाण यांच्या पाठिंब्यामुळे आणि आंदोलनामुळे गिरणी कामगारांना नऊ कोटी रुपये मिळवून देण्यात आले. खाडिलकरांनी 'अहिंसक अचानक आंदोलन' हा आंदोलनाचा नवा प्रकार आणला. या मार्गाने नाभिक, चर्मकार व धोबी यांचे ही आंदोलन चालवून, त्यांचे प्रश्न सोडविले.

त्यांनी श्री. दि. वी. उर्फ बंडोपंत गोखले यांच्यासह शर्थ केली. अभिरुप विधानसभा/लोकसभा यांचे कार्यक्रम करुन उत्पन्न मिळवित बंद पडलेल्या मुंबई मराठी पत्रकार संघाचे पुनरुजीवन केले. बंद पडलेल्या मराठी पत्रकार परिषदेचे मुंबईत ना यशवंतराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत अधिवेशन भरविले. ते मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष आणि विश्वस्त झाले. मराठी भाषेसाठी झटले. महाराष्ट्र माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी परिक्षेत

प्रथम विद्यार्थी/ विद्यार्थीनी याच्यांसाठी १० हजार रुपयांचे बक्षिस ठेवले. कोणत्याही एका विषयासाठी एवढे पारितोषिक यामुळे लाखो विद्यार्थी/विद्यार्थीनी यांच्यात मराठी भाषेचा मान वाढला. मराठी भाषा द्वितीय विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही आणखी १० हजारची तीन बक्षिसे (५+३+२) ठेवली.

बुध्दिबळ या खेळाच्या क्षेत्रात त्यांनी फार मोठी कामगिरी केली. त्यांनी देशात महिलांचे बुध्दिबळ सुरु केले. त्यांच्या तीन कन्या वासंती, जयश्री व रोहिणी यांना बुध्दिबळ शिकविले. त्या तिघीही त्यांच्या वयाच्या १३ व्या वर्षी महिला चॅम्पियन झाल्या. सतत सात वर्षे राष्ट्रीय चॅम्पियन राहिल्या. तिघा बहिणीनी चार बुध्दिबळ ऑलिम्पिक मध्ये भारताचे प्रतिनिधत्त्व केले हा जागतिक विक्रम आहे. महिला बुध्दिबळात भारताचे नाव जागतिक पातळीवर नेले.

रोहिणी खाडिलकरांनी अनेक पुरुष खेळाडूंचा पराभव केला. यामुळे सनसनाटी गाजली आणि राष्ट्रीय अंजिक्यपद स्पर्धेत स्त्रियांना मज्जाव करण्याचा ठराव अखिल भारतीय बुध्दिबळ फेडरेशनने केला. लगेच खाडिलकरांनी न्यायालयात व जागतिक बुध्दिबळ संघटनेकडे दाद मागतिली. जागतिक बुध्दिबळ फेडरेशनने निर्णय दिला की, स्त्रियांना राष्ट्रीय बुध्दिबळ स्पर्धात पुरुषांबरोबर खेळण्याचा हक्क आहे आणि जर नाकारला तर भारतीय बुध्दिबळसंघटनेची संलग्नता रद्द होईल ,न्यायालयानेही तसाच निर्णय दिला.

भारतात महिलांचे बुध्दिबळ सुरु केले आणि महिलांना पुरुषांसमवेत स्पर्धेत भाग घेण्याचा हक्क मिळवून दिला. यामुळे अनेक मुली व स्त्रिया विविध स्पर्धात पुरुषांबरोबर भाग घेत आहेत. बुध्दिबळाच्या प्रचारासाठी गिरगाव चेस सर्कल चालविले. एकापेक्षा एक गाजलेली ३६ पुस्तके लिहिली. तरुणांना स्फूर्ती व हिंमत मिळावी या हेतूने आदर्श उभे केले. ‘राजे शिवाजी’ हे पुस्तक तीन लाख विकले गेले. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, महात्मा गांधी, श्रीराम, श्रीकृष्ण, आदि सर्वच पुस्तके पन्नास हजाराहून अधिक विकली गेली. ’लेखननामा’, ’अग्रलेखांचे बादशहा’, ’बादशाही अग्रलेख’, ’शूरा मी वंदिले’, ’माझा  मऱ्हाठाचि बोलु कौतुके’ असे अग्रलेखांचे पाच संग्रह आहेत. ‘प्रतापराव’ हे नाटक

प्रसिध्द झाले. मुख्य म्हणजे नियती या मराठी–इंग्रजी–हिंदी–गुजराती अशा चार भाषांतील पुस्तकांत स्वतःचे ‘नीळकंठी तत्त्वज्ञान’ मांडले. बाबा महाराज सातारकर यांनी अभिप्राय दिला की, लेखक नीळकंठ खाडिलकर ‘नियती’ मुळे दर्शनकार झाले आहेत. ’भेळ’ या पुस्तकात तीन उत्तम कविताही आहेत. कल्पकता म्हणजे ’खिशात मावणारे व खिशाला परवडणारे’ अशी जाहिरात करुन खास पुस्तके लिहिली.

पत्रकाराला माहितीचा उगम न सांगण्याचा हक्क आहे असे म्हणत सेशन्स न्यायालयात न्यायमूर्ती कुटिन्हो यांच्यासमोर संघर्ष केला.

नीळकंठ खाडिलकरांची भाषा साधी, सोपी आणि प्रवाही आहे. डौलदार व नाटयपूर्ण आहे. हास्य रसाचाही शिडकाव असतो विख्यात लेखिका सौ. विजया वाड एकदा कौतुकाने म्हणाल्या ज्ञानोबा,विनोबा आणि निळोबा यांनी मराठी भाषेच अमृत केले. अर्थात आचार्य अत्रे यांना कधीच विसरता येणार नाही.

ना. सुशीलकुमार शिंदे यांनी सारांशरुप गौरव केला की, अजोड अग्रलेख लिहिलेचं. पण स्वतःची ‘प्रॉक्टिकल सोशॅलिझम’ ही राजकीय विचारसरणी आणि स्वतःचे ’नीळकंठी तत्त्वज्ञान’ मांडणारे स्वतंत्र्यानंतरचे एकमेव पत्रकार आहेत.’’[५४]

अशा या अग्रलेखाच्या बादशहाचे निधन दिनांक २२ नोव्हेंबर २०१९ मध्ये झाले.

**’नवाकाळ’ वृत्तपत्राच्या संपादकाचे संपादकीय कार्यकाळ :–**

| | नवाकाळ संपादक | कार्यकाळ |
|---|---|---|
| १ | कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर(काकासाहेब खाडिलकर) | ७ मार्च १९२३ - मार्च १९२९ |
| २ | यशवंत कृष्णाजी खाडिलकर(अप्पासाहेब खाडिलकर) | मार्च १९२९–१९६९ |
| ३ | नीळकंठ यशवंत खाडिलकर(अग्रलेखांचा बादशाह) | १ ऑक्टोबर १९६९–१९९७ |
| ४ | सौ.जयश्री नीळकंठ खाडिलकर–पांडे | १९९७– आजपर्यंत |

## २.१३ सारांश :–

मराठी माणसांनी सुरु केलेली जी थोडी वृत्तपत्रे आज मुंबईत आहेत. त्यात प्रामुख्यानं 'नवाकाळ'चा उल्लेख करता येईल. नाटयाचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी ७ मार्च १९२३ रोजी 'नवाकाळ'ची मुहूर्तमेढ रोवली. या वृत्तपत्रातील लेखनाबदल १९२९ साली संपादक या नात्याने खाडिलकर यांच्याविरुध्द राजद्रोहाचा खटला होऊन त्यांना एक वर्षाची शिक्षा झाली. त्यांच्या पश्चात त्यांचे चिरंजीव यशवंत कृष्णाजी खाडिलकर मार्च १९२९ संपादक झाले. त्यानंतर १ ऑक्टोबर १९६९ नीळकंठ खाडिलकर नंतर त्यांच्या कन्या जयश्री खाडिलकर–पांडे या सन १९९७ पासून 'नवाकाळ'ची जबाबदारी सांभाळत आहेत. नीळकंठ खाडिलकर यांनी १९८० नंतरच्या दशकात 'नवाकाळ'हे दैनिक मुंबईत अफाट लोकप्रिय केले. 'अग्रलेखांचा बादशाह' म्हणून ते नावाजले. १९९० च्या दशकात त्याचा खप तीन लाखांवर गेला होता.

आता शतकपूर्तीकडे 'नवाकाळ'ची वाटचाल सुरु आहे. खाडिलकर कुटुंबाची चौथी पिढी आज 'नवाकाळ'ची जबाबदारी अंगावर घेऊन ती समर्थपणे पार पाडताना दिसत आहे.

## प्रकरण दुसरे

### तळटीपा:-

१) खाडिलकर य.कृ., 'खाडिलकर-स्मरणी', श्री दत्तात्रय प्रिंटिंग प्रेस प्रकाशन, मुंबई, १९४९, पृष्ठ -२४,२६.

२) खाडिलकर,का.ह.,'देशभक्त कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांचे चरित्र', चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे, १९४९, पृष्ठ - ३७,३८.

३) लेले रा.के., 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४. पृष्ठ - ६७३.

४) कित्ता- पृष्ठ- ६७७.

५) खाडिलकर य.कृ., 'खाडिलकरांचा लेखसंग्रह - भाग पहिला', श्री दत्तात्रय प्रिटिंग प्रेस, मुंबई, १९४९, पृष्ठ ६७.

६) लेले रा.के., 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४, पृष्ठ - ६६१,६६२,६६३.

७) खाडिलकर,का.ह.,'देशभक्त कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांचे चरित्र', चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे, १९४९, पृष्ठ - २२६,२२७.

८) फाटक न.र., 'नाट्याचार्य कृ.प्र. खाडिलकर', मौज प्रकाशनगृह, मुंबई, १९७३,पृष्ठ - १००.

९) नवाकाळ, ३१ ऑगस्ट १९४८.

१०) खाडिलकर,का.ह.,'देशभक्त कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांचे चरित्र', चित्रशाळा प्रेस प्रकाशन-पुणे,१९४९, पृष्ठ - २३३ ,२३४.

११) कित्ता- पृष्ठ - २३४.

१२) कित्ता- पृष्ठ - २३४.

१३) लेले रा.के., 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४. पृष्ठ - ६६४.

१४) कित्ता- पृष्ठ - ६६४.

१५) खाडिलकर,का.ह.,'देशभक्त कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांचे चरित्र', चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे, १९४९, पृष्ठ – २२८,२२९.

१६) खाडिलकर य.कृ., 'खाडिलकरांचा लेखसंग्रह – भाग दुसरा', श्री दत्तात्रय प्रिंटिंग प्रेस, मुंबई, १९४९, पृष्ठ – २०२,२०३,२०४.

१७) खाडिलकर,का.ह.,'देशभक्त कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांचे चरित्र', चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे, १९४९, पृष्ठ – २४३–२४४.

१८) नवाकाळ, ३१ ऑगस्ट १९४८.

१९) लेले रा.के., 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४. पृष्ठ – ६७८,६७९.

२०) कित्ता– पृष्ठ – ६६६.

२१) खाडिलकर,का.ह.,'देशभक्त कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांचे चरित्र', चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे, १९४९, पृष्ठ –२८४.

२२) कित्ता– पृष्ठ – २८६.

२३) कित्ता– पृष्ठ – २३४,२३५.

२४) कित्ता– पृष्ठ – २३५,२३६.

२५) कित्ता– पृष्ठ – २४३.

२६) खाडिलकर य.कृ., 'खाडिलकर–स्मरणी', श्री दत्तात्रय प्रिंटिंग प्रेस प्रकाशन, मुंबई,१९४९, पृष्ठ –१४५.

२७) खाडिलकर य.कृ., 'खाडिलकर–स्मरणी', श्री दत्तात्रय प्रिंटिंग प्रेस प्रकाशन, मुंबई, १९४९, पृष्ठ –३४१,३४२.

२८) लेले रा.के., 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४, पृष्ठ – ६६६,६६७.

२९) खाडिलकर,का.ह.,'देशभक्त कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांचे चरित्र', चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे, १९४९, पृष्ठ – २५२.

३०) कित्ता– पृष्ठ – २४२.

३१) कित्ता– पृष्ठ –३३८,३४०.

३२) कित्ता– पृष्ठ – ३४२.

३३) खाडिलकर,का.ह.,‘देशभक्त कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांचे चरित्र’, चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे, १९४९, पृष्ठ – २४८,२४९.

३४) लेले रा.के., ‘मराठी वृत्तपत्रांचा इतिहास’, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४, पृष्ठ – ६६९,६७०.

३५) कित्ता– पृष्ठ – ६६७,६६८.

३६) कित्ता– पृष्ठ – ६७५.

३७) कित्ता– पृष्ठ – ६४८,६४९.

३८) खाडिलकर य.कृ., ‘खाडिलकर–स्मरणी’, श्री दत्तात्रय प्रिंटिंग प्रेस प्रकाशन, मुंबई, १९४९, पृष्ठ – ९४,९५.

३९) लेले रा.के., ‘मराठी वृत्तपत्रांचा इतिहास’, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे,१९८४, पृष्ठ – ६६८.

४०) खाडिलकर य.कृ., ‘खाडिलकर–स्मरणी’, श्री दत्तात्रय प्रिंटिंग प्रेस प्रकाशन, मुंबई, १९४९, पृष्ठ – ९५,९६.

४१) लेले रा.के., ‘मराठी वृत्तपत्रांचा इतिहास’, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४, पृष्ठ – ६७०,६७१.

४२) खाडिलकर नी.य.,‘नाट्याचार्यांची नाट्यकला’,नवाकाळ प्रेस प्रकाशन,मुंबई,१९७३, पृष्ठ – १०,११.

४३) नवाकाळ, १९ जानेवारी १९३०.

४४) खाडिलकर नी.य., ‘नाट्याचार्यांची नाट्यकला’, नवाकाळ प्रेस प्रकाशन, मुंबई, १९७३, पृष्ठ –११.

४५) नवाकाळ, ४ जून १९३०.

४६) खाडिलकर,का.ह.,‘देशभक्त कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांचे चरित्र’, चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे, १९४९, पृष्ठ – ३२९,३३०.

४७) लेले रा.के., 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४, पृष्ठ – ६८५.

४८) खाडिलकर,का.ह.,'देशभक्त कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांचे चरित्र', चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे, १९४९, पृष्ठ – ३४३,३४४.

४९) कित्ता– पृष्ठ – ३४५.

५०) कित्ता– पृष्ठ– ३४७.

५१) लेले रा.के., 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४, पृष्ठ – ६७०.

५२) कित्ता– पृष्ठ – ६८१,६८२.

५३) www.aisiakshare.com/node/4773

५४) http://www.abmpp.in/नवाकाळ25E

# प्रकरण तिसरे

## ‘नवाकाळ’ वृत्तपत्राचे सामाजिक कार्य

३.१ प्रस्तावना

३.२ दारुबंदीबाबत ‘नवाकाळ’ वृत्तपत्राचे विचार

३.३ काकासाहेब खाडिलकरांचे वैदिक धर्माविषयी मत

३.४ गांधीजी आणि अस्पृश्य समाज यांच्याविषयी काकासाहेबांचे प्रवचनातून विचार प्रकट

३.५ काकासाहेब खाडिलकरांची नाटके

३.६ वृत्तपत्रे आणि ‘नवाकाळ’

३.७ ‘नवाकाळ’ ची कामगारांसाठी निधी योजना

३.८ भाडेकरू समस्या

३.९ झोपडपट्टी पुर्नवसन

३.१० प्रॅक्टिकल सोशॅलिझम

३.११ ‘नवाकाळ’ वृत्तपत्राची भरारी

३.१२ सारांश

# प्रकरण तिसरे

# 'नवाकाळ' वृत्तपत्राचे सामाजिक कार्य

## ३.१ प्रस्तावना :–

वृत्तपत्रे हे विविध लोकोपयोगी विषयांची माहिती पुरविणारे असले पाहिजेत. समाजात समाजप्रबोधन करण्याचे ते एक माध्यम आहे.

काकासाहेब खाडिलकर यांनी नव्या काळात अर्थात नवीन येणाऱ्या पुढील काळात समाजातील होणाऱ्या बदलाचा स्वीकार करून समाजाबरोबर चालण्यासाठी 'नवाकाळ' वृत्तपत्राची स्थापना केली. समाजातील दोष काय आहेत ते आपल्या लिखाणाद्वारे मांडून त्यावर मार्गदर्शन करणे तसेच समाजपरिवर्तन, जनजागृती करणे, जनतेचे मतपरिवर्तन  करणे, याला जास्त महत्त्व 'नवाकाळ'च्या सर्वच संपादकांनी दिले. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर या दोन्ही काळात समाजातील जुन्या विचारांना एक नवी दिशा देण्यासाठी व त्यातील दोष दूर करण्यासाठी आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजातील अनेक प्रश्न अग्रलेखाद्वारे वृत्तपत्रामधून मांडले.

सदर प्रकरणात 'नवाकाळ' वृत्तपत्राने सामाजिक कार्याचा आढावा घेताना दारूबंदी, वैदिक धर्म, समाजप्रबोधनासाठी केलेली काकासाहेब खाडिलकरांची प्रवचने, नाटके, समाजपरिवर्तनाचे माध्यम वृत्तपत्र या वृत्तपत्राबाबत 'नवाकाळ'ची भूमिका, गिरणी कामगारांचे प्रश्न, भाडेकरू समस्या, मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसन आदी प्रश्नांवर समाजाला व शासनाला जागरूक केले. 'नवाकाळ'ची संकल्पना 'प्रॅक्टिकल सोशॅलिझम' या अशा विविध महत्त्वपूर्ण बाबींचा आढावा घेण्यात येत आहे.

## ३.२ दारुबंदीबाबत 'नवाकाळ' वृत्तपत्राचे विचार :–

स्वातंत्र्यपुर्वकाळात ब्रिटीश राज्यकर्त्यांनी भारतीय लोकांना मादक द्रव्याच्या आहारी लावले होते. त्यामागील त्याचा स्वार्थी हेतु होता. त्याला या मादक द्रव्याच्या उत्पादनातून आपली तिजोरी भरण्यास मदत होत होती. त्यासाठी त्यांनी या मादकद्रव्ये निर्माण  करणाऱ्या पिक उत्पादनास पाठिंबा दिला. त्यातूनच स्वातंत्र्यपुर्व काळात भांग, अफू ही द्रव्ये निर्माण

करण्यासाठी काही शेतकरी तशा वनस्पतीची लागवड करीत असत. तसेच ताडाच्या झाडापासून माडी किंवा काजूच्या किंवा मोहाच्याफुलापासून मदय निर्माण करणे हे उद्योग चरितार्थाचे साधन म्हणून लोक करीत असत. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी हिंदुस्थानात अशी द्रव्ये राज्याच्या उत्पन्नाचे ते एक साधन केले. वर्षाला पाच ते सहा कोटी उत्पन्नाची त्यातून सोय झाली.

अशा या मद्यपानाचे सेवन सर्वसामान्य जनता करू लागल्याने ते कर्जबाजारी झाले. मुंबई सारख्या शहरात गिरणी कामगारांचा मोठया संख्येने समोवश दिसतो. त्यातूनच त्यांच्यावर कर्जाचा बोजा वाढत गेला. याच विषयावर असलेल्या दिनांक ३ जून १९२३ च्या 'मद्यपान व कर्ज' या लेखात काकासाहेब खाडिलकर म्हणतात,

''मुंबई शहर व या आसपासचे चार जिल्हे धरून एकंदर वस्ती ४५ लाखांची आहे, सिंध शिवाय मुंबई इलाख्याच्या इतर जिल्हयांची वस्ती १ कोटी १५ लाखाची आहे. १ कोटी १५ लाखांच्या वस्तीने जितकी दारू पिऊन टाकली त्यापेक्षा पावणेदोन पटीने अधिक दारू मुंबई शहराच्या पंचक्रोशीतील ४५ लाखांच्या वस्तीने पिऊन टाकली असे 'लेबर गॅझिट' या मे महिन्याच्या अंकात प्रसिध्द झाले आहे. मुंबई शहराचा परिणाम ज्या जिल्ह्यांवर होत नाही तेथील मनुष्यापेक्षा चौपट पाचपट दारू मुंबईचा मजूर पितो, असा हा अंदाज आहे. घरभाडे फार असल्यामुळे रहायला जागा मिळत नाही. उघड्या हवेत फिरून करमणूक करता येत नाही. आणि कोंदड जागेत गुदमरल्यासारखे राहिल्याने संसारातील इतर आनंद घेता येत नाहीत. यामुळे दारू पिण्याकडे मुंबईची प्रवृत्ती अधिक दिसून येते असे लेबर गॅझिटचे म्हणणे आहे. आपल्या एकंदर खर्चीतील दहावा भाग तरी मुंबईच्या गिरणीतील मजूर दारू पिण्याकडे खर्च करतो, असा हिशोब तीन हजार कुटुंबाचे जमाखर्च तपासून 'लेबर गॅझिट' ने काढला आहे. मुंबईच्या मजुराला दरमहा सरासरीने ४० पासून ५० रूपये पर्यंत मजुरी पडते म्हणजे प्रत्येक मजूर दर महा ५ रूपये दारू पिण्याकडे खर्च करतो. दारू पिण्याच्या या व्यसनामुळे मुंबईतील गिरण्यांच्या मजुरांची कुंटुबे कर्जबाजारी झाली आहेत. पण हे कर्ज दारुमुळे होते असे दाखविण्यापेक्षा लग्नकार्याच्या व प्रेतसंस्काराच्या फाजील खर्चामुळे मजुरांची कुटुंबे कर्जबाजारी होतात, असे दाखविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ५ असामीचे एक कुटुंब घेतले आणि एक पिढी ३० वर्षाची समजली तर ३० वर्षांत ५ लग्ने व ५ मृत्यू होतात. प्रत्येक लग्नाचा खर्च

२१४ रूपये येतो आणि प्रत्येक मृत्यूचा खर्च ३५ रूपये येतो. ३० वर्षांच्या एका पिढीतील या ५ लग्नांचा व ५ मृत्यूचा खर्च १२४५ रूपये येऊन दरसाल ४२ रूपये पडतात. सणवार व श्राध्दे मिळून १८ रूपये खर्च होऊन, सालाच्या नित्य खर्चात नैमित्तिक खर्चाचा बोजा ६० रूपयांचा होतो. हया ६० रूपयांच्या बोजामुळे मजुरांचे कुटुंब कर्जबारी होते असे सुचविण्यात आले आहे. ५ असामीच्या कुटुंबाकरीता वर्षास १८ रुपये सणवाराचा खर्च म्हणून जर खर्च करता आला नाही व लग्न कार्याला जर २०० रूपये खर्च करता आले नाहीत तर संसारात विशेष सुख ते कोणते शिल्लक राहते? रोज राबण्याकरीताच मजूर जन्मास आला आहे. अशी जर कोणाची समजुत असेल तर ती साफ चुकीची आहे. २०० रुपयातच ज्यांना लग्नकार्य आटपून घेता येते, ते लोक अत्यंत काटकसरीने वागणारे आहेत असेच मानले पाहिजे. बायकोठया पायमोज्याच्या जोडीवरजे इंग्रज प्रसंगविशेषी २०० रुपयेहि खर्च करितात, त्यांनी तरी निदान लग्नकार्याच्या २०० रुपयेहि खर्चाला नावे ठेवणे योग्य नाही. नैमित्तिक खर्च दरमहा अवघा ५ रूपये येतो. आणि मद्यपानाचा खर्चहि दरमहा ५ रूपये येतो, तेव्हा दारूपिण्याची जी दुष्ट सवय इंग्रजांनी लोकांना लावली आहे ती सवय जर मोडून टाकण्यात येईल तर लोकांचे कर्ज नाहीसे होणार नाही काय?''[१]

थोडक्यात मद्यपानाची जी सवय इंग्रजांनी हिंदुस्थानातील जनतेस लावली त्यातून अनेक कुटुंब उदध्वस्त झाली. कर्जबाजारी झाली. तरीही इंग्रज म्हणतात ही जनतेची अवस्था लग्नकार्य व प्रेतसंस्कारच्या खर्चामुळे झाली. दारूपिण्याची वाईट सवय बंद झाली पाहिजे असे मत वरील लेखातून व्यक्त केले गेले.

काकासाहेब खाडिलकर यांनी गांधीजींच्या मद्यपान प्रतिबंध कार्यक्रमाबाबत व विचाराबाबत 'मद्यपान प्रतिबंध व महात्माजी' या लेखातून मद्यपान प्रतिबंधविषयक विचारांचे विवेचन 'नवाकाळ' वृत्तपत्रातून दिनांक २८ मार्च १९२५ रोजी मांडले आहे.

''मद्रास शहरांतील गोखले हॉलमध्ये मद्यपान प्रतिबंधाची चळवळ करणाऱ्या मद्रासेतील स्वयंसेवकाची एक सभा ता. २४ मार्च रोजी मिसेस बेझंट यांच्या अध्यक्षतेखाली भरून महात्माजींचे मद्यपान प्रतिबंधावर मननीय भाषण झाले. बॅरिस्टरीच्या अभ्यासाकरता महात्माजी विलायतेस गेले त्यावेळी महात्माजींच्या परमपूज्य मातेने त्याच्याकरवी ज्या तीन पवित्र शपथा

घेवविल्या त्या शपथांत अपेयपान न करण्याची एक शपथ होती. महात्माजींच्या मनातील मद्यपान प्रतिबंधाच्या कल्पनेला येथूनच सुरुवात झाली. गेल्या ३० वर्षातील मद्यपान प्रतिबंधाच्या चळवळीचे इंग्लंड, दक्षिण अफ्रिका व हिंदुस्थान तीनही ठिकाणी महात्माजींना जे विलक्षण अनुभव आले त्यावरून आपल्या मातेने घेवविलेल्या पवित्र शपथेचे महत्त्व महात्माजींना आता पूर्ण पटले आहे. तीस वर्षांच्या या अनुभवावरून महात्माजींचे असेही ठाम मत बनले आहे की, खालच्या वर्गातील बहुजन समाजात मद्यपान प्रतिबंधाविषयीचे नुसता उपदेश करून काही एक उपयोग होत नाही. नुकत्याच संपविलेल्या काठेवाडच्या दौऱ्यांत महात्माजींना असा अनुभव आला आहे की, खालच्या वर्गातील लोकांचे दारूपिण्याचे व्यसन बंद पाडावयाचे असल्यास त्यांच्या डोळ्यासमोर दारू न येईल आणि खटपट करूनहि त्यांना दारू न मिळेल असा बंदोबस्त झाला पाहिजे आणि तसा बंदोबस्त झाला नाही तोपर्यंत या लोकांचे दारूचे व्यसन नुसत्या उपदेशाचे सुटणे अशक्य आहे.''[२]

थोडक्यात मद्यपान विरोधी भूमिका बजावत असताना काकासाहेब खाडिलकर यांनी महात्मा गांधीजीच्या मद्यपान नियत्रंण भूमिकेत पाठिंबा दिला. गांधीजीच्या समाजभिमुख ज्या योजना होत्या त्यामध्ये त्यांनी मद्यपानास प्रतिबंध केला होता. तशी जनजागृती केली. ब्रिटिश सरकारला त्या बाबत विरोधही केला.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात विविध धोरणे आखण्यात आली त्यामध्ये दारुबंदीवर मोठयाप्रमाणात धोरणे, करून त्यानुसार विविध ठिकाणावरून अहवाल मागविले. महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात दारूबंदीसाठी आवाज उठविला. या दारूबंदीबाबत 'नवाकाळ'चे संपादक आप्पासाहेब खाडिलकर यांनी मुंबईत झालेल्या दारुबंदीबाबत दि. ३१ जानेवारी १९५३ च्या 'नवाकाळ' वृत्तपत्रात 'पुन्हा दारू सुरू करण्याचे नाव हि नको' या लेखात दारुबंदीविषयक पुढील विवेचन केले आहे –

''भारत सरकारचे अर्थमंत्री ना. चिंतामणराव देशमुख यांनी मुंबई राज्यांतील आणि विशेषतः महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणासाठी मध्यवर्ती सरकारने दारु सुरू करून दुष्काळसाठी लागणारा पैसा उभा करावा असे पर्यायाने सुचविले आहे. दुःखावर डागणी द्यावी अशा प्रकारच्या या सुचनेवर मुंबईसरकारचे मंत्री ना. भाऊसाहेब हिरे यांनी दारुबंदीच्या

धोरणात कसलाच फरक होणार नाही असे सडेतोड उत्तर दिले आहे, आणि पुन्हा दारू सुरू करण्याचे नाव हि काढू नका, असेच पर्यायाने केवळ ना. देशमुखानाच नव्हे तर सर्व टीकाकारांना बजावले आहे. मुंबई राज्यावर दुष्काळाचे मोठेच संकट आले आहे. ना. हिरे यांनी आपल्या मुलाखतीत सांगितल्याप्रमाणे मुंबई राज्यातील सुमारे ६५ लाख लोक या दुष्काळाने पाच कोटी रूपये खर्च करण्याचे योजिले आहे आणि दुष्काळपिडिताचे दुःख हरण करण्यासाठी कितीही पैसा खर्च करावा लागला तरी तो करण्याचा मुंबई सरकारचा निर्धार आहे.

दुष्काळामुळे आधीच होरपळणाऱ्या मुंबई राज्याला दारू विकून दुष्काळासाठी पैसे मिळविण्याचा हा उपदेश वर्मी लागावा आणि थिल्लर योजनांवर करोडो रूपयांचे दिवे ओवाळणाऱ्या मध्य सरकारला भरपूर मदत देता येत नसेल तर निदान शील विक्री करण्याचा उपदेश करून डागण्या तरी देऊ नका असे मुंबई सरकारला वाटावे यात नवल नाही.

दारूबंदी हे मुंबई राज्याचे शील :-

मुंबई राज्यसरकारला दारुबंदी शीलासारखी असून दुष्काळात अब्रू विकणे आणि दारु विकणे हे दोन्ही मुंबई सरकारला व मुंबइतील जनतेला सारखेच आहे. दारुबंदीत प्रांतिक स्वायत्ततेच्या काळात मुंबई सरकारने पुढाकार घेतला आणि मुंबई प्रथम कोरडी केली. स्वातंत्र्यात संपुर्ण दारुबंदी करण्यात मुंबई सरकारने अग्रेसत्व पत्करले आणि मुंबईच्या बरोबर मध्यप्रदेश व मद्रासने दारुबंदी पत्करून एक प्रकारे मुंबईच्या नेतृत्वाखाली दक्षिण भारतच जसा काही कोरडा झाला. दारु म्हणताच ज्यांच्या मस्तकाला तिडिक जात असे ते भारताचे असंतोषाचे जनक लो. टिळक व भारतपिते महात्माजी यांनी आपल्या जीवनातील बरीचशी शक्ति दारुच्या व्यसनाशी झगडण्यात घालविली. स्वातंत्र्यात दारुची हकालपट्टी करण्याच्या त्यांच्या विचारसरणीची छाप जनमनावर एवढी आहे की भारताच्या घटनेतही दारुबंदीला स्थान मिळाले आहे. दारु सुरू करण्याची गोष्ट काढताच मुंबईचे माजी मुख्यप्रधान श्री. बाबासाहेब खेर यांचा संताप होत असे. आणि दारू सुरू करण्यापेक्षा अधिकार, अधिकारवर्ग खाली ठेवणे पसंत करणारे श्री. मोरारजी देसाई हे मुंबईचे मुख्यप्रधान आहेत. मुंबई राज्याची आजची नैतिक प्रतिष्ठ दारुबंदीवर उभारलेली आहे आणि मुंबई व मद्रास ही दारुबंदीच्या आघाडीवरचा अजिंक्य जोडी आहे. दारुबंदी दूर झाली तर दुष्काळाशी झगडण्यासाठी सात कोटी रूपये मुंबई

सरकारला मिळतील असे श्री. देशमुख सुचवितात. दारुचे एक रुपये उत्पन्न सरकारला व्हावयास दारुबाजाने दारू प्यावी लागते. बत्तीस कोट रुपयांची दारू लोकांनी पिऊन आठ कोट रूपये दुष्काळाला द्यावेत असे म्हणण्यातीलच हा भाग आहे. मुंबईत दारुबंदी जर नसती तर गेल्या तीन वर्षात १०० कोटी रूपये लोकांचे दारुत गेले असते असा हिशोब आहे. शंभर कोटी रुपये दारुत अशारीतीने घालविलेली जनता आजच्या इतपत तरी दुष्काळाशी झगडण्यास समर्थ झाली असती काय,? असा प्रश्न आठ कोटी रुपयांचे तुणतुणे वाजविणारांना कोणीही विचारील. पैसे कमी म्हटले की, जो तो दारुबंदीकडे बोट दाखवितो, आणि मुंबई सरकारवर तोंडसुख घेतो किंवा उपदेशांचा वर्षाव करतो. या सर्व टीकाकारांना एकदाच आणि कायमचे बजावण्याची जरूरी होती, की मुंबईराज्याने दारुबंदी सुरू केली ती एक बेगडी किंवा उसनी नसून,निष्ठापूर्वक व उघड्या डोळ्यांनी सुरु केली आहे. दारूबंदी हे मुंबई सरकारचे व जनतेचे शील आहे. शील गेले की त्या पाठोपाठ इभ्रत, प्रतिष्ठा, भरभराट किंबहुना जीवनाधारच नाहीसा होतो.

मुंबई सरकार व जनता आपले शील बाजारांत मांडून त्याचा आठ दहा कोटीसाठी लिलाव पुकारावयास तयार नाही. ना. हिरे यांच्या मुखाने श्री. देशमुख यांच्या उपदेशाच्या निमित्ताने मुंबई सरकारने ही गोष्ट स्पष्ट केली ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे.''[३]

थोडक्यात मुंबईत दारुबंदी झाली तरी दुष्काळ निवारण करण्यासाठी दारु विक्रीने सरकारच्या उत्पन्नात भर पडून त्यातून दुष्काळाग्रस्तांना मदत होईल अशी राजकीय नेत्यांची मते या लेखातून स्पष्ट केली गेली.

दारूच्या उत्पन्नातून येणारा पैसा दुकानदारांच्या हाती जातो. दारूवर आकारलेल्या करांच्या रुपाने सरकारला पैसा मिळतो. पण दारुमुळे असंख्य घरे उध्वस्त झाली. संसार उघडे पडले. त्यातूनच 'दारुबंदी' चा निर्णय झाला यावर 'नवाकाळ' वृत्तपत्रातून आप्पासाहेब खाडिलकरांनी 'गरिबांच्या संसारासाठी दारुबंदी' या लेखातून 'दारुबंदी' का झाली त्याची कारणे सांगितले आहे.

''गरिबांच्या संसारासाठी – दारूच्या आधीन गेलेल्याच्या संसाराची वाताहात होते ही काही कल्पित कथा नाही. दारु सर्रास मिळत होती तेव्हा दारूबाजांच्या घरचे तमाशे रस्तोरस्ती

पहावयास मिळत असत. एका घाणेरडया व शरीराची खराबी करणाऱ्या वस्तूसाठी शेकडो–हजारो कुटुंबाची होणारी राख रांगोळी थांबविण्याकरितांच महात्माजीनी दारुबंदी हा निष्ठेचा विषय बनविला व म्हणूनच दारू व इतर मादक द्रव्ये हयांची हकालपट्टी करण्याचे ध्येय घटनेत घालण्यात आले. गरिबांच्या संसाराची काळजी ज्यांना वाटते अशा सर्वांनी दारू बंदीला पाठिंबा देऊन दारुबंदी यशस्वी करावयास झटले पाहिजे.फॅशनपंडित, तथाकथित अर्थपंडित व चोरून दारु तयार करणारे व विकणारे हितसंबंधी लोक हयांच्या बडबडीला कोणीही आपली बुध्दि विकता कामा नये.''[४]

अर्थात दारुने गरिबांचे संसार उध्वस्त होतात. महात्मा गांधीजींच्या दारुबंदी निर्णयविषयक विचार मांडले.

दारुच्या उत्पन्नातून सरकारची तिजोरी भरण्यासाठी काँग्रेस श्रेष्ठीचे प्रयत्न दि. ५ जून १९६७ च्या 'नवाकाळ' वृत्तपत्रातून 'दारुबंदीस घटनात्मक मंत्राग्नी तरी द्या' या अग्रलेखातून सविस्तररित्या आप्पासाहेब खाडिलकर म्हणतात,

''भारतात आता दारुबंदीची धडगत उरलेली नाही व दारुबंदीचा एक प्रकारचा अंत्यविधी सांप्रत सुरू असल्यासारखे वातावरण आहे. सार्वत्रिक निवडणुकीपूर्वीच दारुबंदीस गरगर लागली होती व दारुबंदी घोंगडीवर काढून तिच्या सूत धरले होते. सार्वत्रिक निवडणुकीनी कॉग्रेस राजकारण निम्मा भारतात संपुष्टात आणले आणि कॉग्रेसच्या या राज्यांत दारुबंदी उठविण्याचे मंत्र जपण्यात आले होते. तेथे काँग्रेसत्तेर सरकारे येताच दारुबंदी उठविण्याचा कार्यक्रम झटपट उरकण्यात आला. ज्या कॉग्रेस राज्यांनी पुढाकार दारूबंदीबाबत घेतलेला होता त्या राज्यातही दारुबंदी मोडण्याचा घोशा मांडला आहे. व दारुबंदी जिवंत ठेवण्यासाठी संजीवनी मंत्र जपण्यात आता अर्थ नाही असे केंद्रीय राज्यकर्त्यांनी ठरविले आहे असे सांगितले जाते. श्री.मुरारजी–भाई देसाई हे दारुबंदीचे कट्टे पुरस्कर्ते होत. सत्तारुढ येण्यापूर्वी दारुबंदी परिषदांचे अध्यक्षस्थानही त्यांनी पत्करले होते व दारुबंदी उठविण्यात येऊ लागली तर त्याविरुध्द सत्याग्रहाचा आश्रय करावा असे त्यांनी पूर्वी सांगितले होते. पण आता राज्य सरकारांना दारूबंदीची पाहिजे तशी विल्हेवाट लावावयाची असेल तर त्याआड न येण्याचा हट्ट त्यांनीही सोडला आहे. म्हणजे दारुबंदीचे सोहेर आता खुद्द मुरारजीभाई देसाईही पाळणार

नाहीत. केंद्र मंत्र्यांना दारुबंदीची आस्था पूर्वीही फारशी नसावी पण आज ती आस्था बध्दमूल होण्याचे काही कारणच दिसत नाही. घोंगडीवर निघालेली दारुबंदी आता शेवटचे श्वास घेत आहे, तिला खांदा देण्यासाठी डोक्याला पंचा गुंडाळून सर्वजण जय्यत तयार आहेत. दारुबंदीला भडाग्नी द्यावा की मंत्राग्नी द्यावा याबद्दल काहीसा उहापोह सुरु आहे. पण 'कंठगतो प्राणः' तोपर्यंत उपचार करून मृत्यूच्या दाढेतून दारुबंदी सोडविण्यासाठी धडपड चालू आहे. असे मात्र नाही. तोंडात तुळशीपत्र घातलेले आहे, गंगाजल घातले आहे, शेवटची उचकी लागली की पुढचे क्रियाकर्मातर उरकावयाचे आहे. कॉंग्रेसेत्तर सरकारांनी दारुबंदीला भडाग्नी दिलाच आहे. दारुबंदीची अडचण व घाण किती दिवस ठेवावयाची, दारुबंदी फुंकून मोकळे होऊ या अशी कॉंग्रेस राज्यांनाही वाटत आहे. पण कॉंग्रेस श्रेष्ठी 'अंत्यविधीची घाई नको व दारुबंदीला मंत्राग्नी तरी द्या,' असे काकुळतीला येऊन सांगत आहेत.''[६]

थोडक्यात स्वांतत्र्य प्राप्तीनंतर सरकारने दारुबंदीचा निर्णय घेतला तो महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात सर्वत्र गाजला. या दारुबंदीसाठी मुंबई सर्वात पुढे होती. परंतु दारुबंदीमुळे सरकारच्या तिजोरीत दारु उत्पन्नातून येणाऱ्या कराचा भरणा होत नव्हता. दारूच्या उत्पन्नातून मोठ्या प्रमाणात कर सरकारास प्राप्त होत होता तो दारुबंदीमुळे मिळणे अशक्य झाले. त्यातून आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे या कारणामुळे दारूवरील बंदी उठवली गेली.

## ३.३ काकासाहेब खाडिलकरांचे वैदिक धर्माविषयी मत :-

''काकासाहेब खाडिलकरांनी साबरमती काठच्या सरकारी आश्रमात असतांना ज्ञानेश्वरींची पारायणे केली. ती वाचीत असता त्यांना असे आढळून आले की ज्ञानेश्वरीसारखा अमोल ग्रंथ निर्माण करण्याच्या अगोदर ज्ञानेश्वर महाराजांनी प्रत्यक्ष उपनिषदांचे व षड्ग्रंथाचे परिशीलन केलेले असले पाहिजे. हे लक्षात आल्यावर त्यांनी स्वतः या ग्रंथाचा अभ्यास तुरुंगाबाहेर आल्यावर सुरू केला. त्यात योगवासिष्ठा सारख्या प्रचंड ग्रंथाचा त्यांनी सातत्याने अभ्यास पुरा केला. यानंतर त्याचे लक्ष रुद्राकडे गेले. रुद्र हे उपनिषद असून सर्व नित्यनैमित्तिक खटाटोपातून मुक्त झालेल्या संन्याशांनीही त्याचे पठण करावे अशी माहिती त्यांना उपनिषदांत आढळली. तेव्हा त्यांनी रुद्राची संथा घेण्यास आरंभ केला. सकाळी संथा व दुपारी भाषांतराची व तद्‌विषयक कल्पनेसंबंधी संशोधनात्मक पुस्तके वाचावयाची, असा काकासाहेबांचा नित्यक्रम

असे. रुद्रामागून पुरुषसुक्त व ऐतरेय, ईशावास्य, तैत्तरीय वगैरे उपनिषदे तसेच बुध्दारण्यकांतील याज्ञवल्क्य मैत्रेयी संवाद, संध्यावंदन, त्रिंसुपर्ण, ॐकारोपासना वगैरे वैदिक वाङ्मयातील प्रकरणांचा त्यांनी एकामागून एक असा खोल अभ्यास केला.

वैदिक वाङ्मयाची त्यांना अत्यंत गोडी लागून या जगदुव्दारक तत्वज्ञानाचा प्रचार करणे हेच त्यांनी आपले जीवनकार्य ठरविले. दत्ताचे मंदिरात सांगलीस त्याचे पहिले प्रवचन झाले. या त्याच्या कार्याचा प्रथमारंभीचा ॐकार होता. जीवनाचे रोजचे तत्वज्ञान त्यांच्या दृष्टीने भिन्न नव्हते. तत्वज्ञानांची बैठक आपल्या सर्व तऱ्हेच्या व्यापारांना यशस्वी करते ही त्यांची श्रध्दायुक्त विचारसरणी होती. ज्ञानेश्वरी, उपनिषदे इ. वेदान्त विषयावर जरी त्यांची प्रवचने चालत तरी ती समजावून सांगताना चालू राजकारणांतील घडामोडीची उदाहरणे ते आपल्या प्रभावी भाषाशैलीने देत असत.''[६]

काकासाहेब खाडिलकर यांनी रुद्रावरील जी प्रवचने केली ती 'नवाकाळ' वृत्तपत्रातून प्रकाशित करण्यात आली होती. त्याबाबत दिनांक २३ एप्रिल १९३६ च्या 'नवाकाळ' वृत्तपत्रामध्ये 'कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांची रुद्रावरील प्रवचने' या लेखातून माहिती प्रकाशित केली गेली.

सोलापुरास मुक्काम असताना श्री. कुंजविहारी यांच्या व्याख्यानमालेत श्रीगणपतीचे दैवालयात श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांची 'रुद्रा' वर अकरा प्रवचने झाली.

'प्रवचन पहिले'

''या प्रवचनात काकासाहेब खाडिलकर म्हणतात,'भारतीय तत्वज्ञानाचा एकसुत्रीपणा'– आपल्या वैदिक तत्वज्ञानाची जी वाढ झालेली आहे तीत एकसूत्रीपणा दिसून येतो ही गोष्ट आपण संहिता, ब्राम्हण उपनिषदे, यांचा अभ्यास करू लागलो तर आपल्या ध्यानात आल्याशिवाय रहात नाही. मोठमोठ्या ऋषीपासून तो ज्ञानदेवापर्यंत सर्वांनी हे सूत्र पाळलेले आढळून येईल. मूळ तत्व संहितेत त्यावरचा विस्तार उपनिषदात उपनिषदावर झालेल्या भाष्यांतून त्याच तत्वांचा वल! संहितेतील मंत्राचा यज्ञाकडेच उपयोग केला जात असे. यज्ञयाग मागे रडल्यावर त्याचा कोणी अर्थ करीत नसत. सायनाचार्यांनी तीनहि वेदांच्या संहितावर भाष्य

लिहिली आहेत. संहितेतील मंत्राचे विवेचन करण्यास हरकत नसल्याचे त्यांनीच दाखवून दिले आहे. संहितेचे मंत्र नुसते पठण करण्यापेक्षा त्याचा अर्थ समजून घेणे हे जास्त इष्ट आहे. अशी संपादलेलीच विद्या प्राप्ती होते असे उपनिषदाचे सांगणे आहे. समजून कार्य केले तरच त्यात वीर्य व शक्ती निर्माण होत असते.

उपनिषदे १०८ आहेत. त्यात पहिली दहा फार जूनी समजली जातात. त्यानंतरची पाच सात बरीच जुनी मानण्यात येतात. अशा बऱ्याच जुन्या असलेल्या जाबाल उपनिषदात संन्यास केव्हा घ्यावा याचा निर्णय आहे. ज्यावेळी खरोखरच उपरति होईल. नको हा संसार असे वाटेल त्यावेळी संन्यास घ्यावा असे त्या उपनिषदांत सांगितले आहे. संन्यास मार्गीयाच्या हया महत्वाच्या उपनिषदात 'रुद्रा'चा विनियोग जप करण्याकडे करावा अशी स्पष्ट आज्ञा आहे.

'रुद्राचे स्वरूप व महत्त्व' – योगाभ्यास करणारांना धारणा ध्यान समाधी या एकापेक्षा एक वरच्या अवस्थांत जावयाचे असते. तेव्हा त्यांनी कोणत्या जपाचा आधार घ्यावा, असा प्रश्न 'जाबाल' उपनिषदात विचारला गेला असतांना 'रुद्राचा' असे उत्तर देण्यात आले आहे. रुद्राचे मंत्र होमाकरता आहेत. पण त्यांची रचना अशी आहे की ते अर्थ समजत म्हणतांच त्याचा परिणाम धारणा–ध्यान–समाधीस असुकाल असा होतो. रुद्र हा वैदिक तात्विकाच्या सारांशाचा लहानसा ग्रंथ आहे. त्याच्या होमाकडे कसा विनियोग करावा इत्यादी भागाचे विवेचन हया प्रवचनातून करण्याचे योजिलेले नाही.फक्त तत्वज्ञानाच्या दृष्टीने विचार येथे केलेला आहे. ''[७]

थोडक्यात काकासाहेब खाडिलकर ज्ञानेश्वरीच्या पारायणातून उपनिषद, षड्ग्रंथासारख्या वैदिक वाङ्मय प्रकरणाच्या अभ्यासाकडे वळले. आणि रुद्रासारख्या उपनिषदवर प्रवचने सुरु केली. वैदिक तत्वज्ञानावर प्रवचने करत असताना समाजातील उदाहरणे देणे हे त्यांचे वैशिष्टये दिसून येते.

पुढे काकासाहेब खाडिलकरांनी वैदिक वाङ्मय विषयक 'ईशावास्योपनिषदावर ' ही प्रवचने करण्यास सुरुवात केली.

काकासाहेब खाडिलकरांचे श्रीगणेशोत्सवाच्या कार्यक्रमात 'ईशावास्योपनिषदावर जे पहिले प्रवचन झाले. ते दि. २२ सप्टेंबर १९३६ च्या 'नवाकाळ' वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात आले. त्याचा सारांश पुढीलप्रमाणे,

''हया उपनिषदाचे नाव ईशावास्योपनिषद आहे. ईशांपनिषदाहि याला म्हणतात. कारण या उपनिषदाचा प्रारंभ ईशावस्थ असा आहे. उपनिषदाच्या मालिकेत या उपनिषदाचा क्रम पहिला लागतो. याचे कारण हे उपनिषद सर्वात प्राचीन आहे. असे समजण्याचे कारण नाही. छादोग्य किंवा बृहदारण्यक ही याहून प्राचीन आहेत असे काहीचे म्हणणे आहे. त्याची भाषा व विचारसरणी संहितेतील मंत्राना अधिक धरून आहे. परंतु या उपनिषदाला पहिले स्थान देण्याचे कारण संहितेच्या अध्यायांत याचा समावेश केला आहे. इतर उपनिषदे जशी संहितेच्या बाहेरची आहेत तसे हे नसून शुक्ल यजुर्वेदाचा शेवटचा अध्याय संहितेचा भाग म्हणूनच या उपनिषदाला अधिक मान आहे.''[८]

थोडक्यात काकासाहेबांचे उपनिषदावरील गहन अध्ययन दिसून येते. प्राचीन अशा ईशावास्थोपनिषदावरील प्रवचनातून त्याच्या वैदिक वाङ्मय अभ्यासाविषयीची आत्मीयता समजते.

## ३.४ गांधीजी आणि अस्पृश्य समाज यांच्याविषयी काकासाहेबांचे प्रवचनातून विचार प्रकट :–

महात्मा गांधींजीनी अस्पृश्यता, भेदभाव यासही विरोध केला. यासाठी त्यांनी वेळोवेळी या अस्पृश्यांना न्याय मिळण्यासाठी उपोषणे केली. काकासाहेब खाडिलकरांनी आपल्या प्रवचनातून महात्मा गांधीच्या अस्पृश्य समाजविषयक कार्याचा पुरस्कार केला.

''ता. ८ मे १९३३ रोजी महात्मा गांधीनी तुरुंगात हरिजनांच्या सेवेसाठी आत्मशुध्दयर्थ २१ दिवसांचा उपवास सुरु केला होता. त्या प्रसंगाच्या अनुरोधाने काकासाहेबांनी आपल्या एका प्रवचनात म. गांधीचे तत्वज्ञान इतके सुस्पष्ट, उद्‌बोधक व तन्मयतेने मांडिले की त्यांची स्मृती त्या काळच्या श्रोत्यांना कायमचीच राहिली आहे. महात्माजीचे हे उपोषण चालू झाल्याबरोबर सरकारला अशी धास्ती बसली की या उपोषणाने

गांधीजीना मृत्यु येईल पण त्यांची पुण्याई इतकी अल्प नव्हती त्यांचा संकल्प पुरा झाला. उपोषण निर्विधपणे पार पडले. पण सरकारने गांधीजीना सोडून दिले. सुटल्याबरोबर पुण्यास सर्व काँग्रेस कार्यकर्त्यांनी सभा भरविण्यात आली. परिषदेत काँग्रेसने सामुदायिक कायदेभंग बंद करावा व त्याऐवजी वैयक्तिक कायदेभंग सुरू करून त्यांचे मार्गदर्शन महात्मार्जीनी करावे असे ठरले. काकासाहेबांनी आपल्या प्रवचनात या सर्व घटनांची सांगोपांग चर्चा केली व यामागील भव्य व तेजस्वी तत्वज्ञान श्रोत्याच्या पुढे मांडले. काकासाहेबांनी प्रवचने सर्वस्या लोकजागृतीसाठीच होती. ते लोकांत असूनही बाहयविषयापासून निवृत्त अशा मुनिवंशसारखे होते.''[९]

अशाप्रकारे काकासाहेब आपल्या प्रवचनातून वैदिक वाङ्मय नव्हे तर म. गांधीचे तत्वज्ञान, त्याचे कार्य, हरिजन, अस्पृश्य समाजबांधवासाठी केलेला २१ दिवसांचा उपवास यावर प्रवचन करून समाज जागृती करण्याचे कार्य केले.

## ३.५ काकासाहेब खाडिलकरांची नाटके :–

काकासाहेब खाडिलकरांच्या 'मानापमान' नाटकाची सुरुवात याविषयीची माहिति पुढील:–

''१९१० साली 'केसरी' वरील काकासाहेबांचे संपादक म्हणून असलेलं नाव तात्यासाहेब केळकर आणि विध्दांस यांनी काकासाहेबांना कसलीही कल्पना न देताच बदललं आणि प्रूफ वाचताना केळकरांचे नाव संपादक म्हणून आल्याच समजताच काकासाहेब अत्यंत संतापले आणि तडकाफडकी 'केसरी'तून निघून गेले. ते बाहेर पडले तेव्हा त्यांनी 'केसरी' सोडला होता!

दुसऱ्या दिवशी सकाळी थोडा वेळ घराबाहेर जाऊन त्यांनी वहया व पेन्सिली आणल्या आणि संगीत 'मानापमान' नाटक लिहिण्यास सुरुवात केली!''[१०]

**कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांच्या नाटयकलेचे रसग्रहण व मूल्यमापन 'नवाकाळ' वृत्तपत्रातून प्रकाशित :–**

नाटयाचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या संगीत 'मानापमान' नाटकच्या पहिल्या प्रयोगाला १२ मार्च १९८६ रोजी पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त १२ मार्च १९८६ च्या 'नवाकाळ' वृत्तपत्रात 'मानापमान'ची 'अवीट माधुरी' हा अग्रलेख प्रसिध्द झाला. 'नाटयाचार्याची नाटयकला' हा नाटयाचार्याच्या नाटयकलेचे रसग्रहण व मूल्यमापन करणारा नीळकंठ खाडिलकरांचा ग्रंथ १९७२ साली प्रसिध्द झाला. त्याची झलक या अग्रलेखात दिसली.

''सुविख्यात संगीत 'मानापमान' या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाला आज १२ मार्च १९८६ रोजी ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. 'मानापमान'ची माधुरी आज ७५ वर्षानंतर ही अवीट आहे. 'मानापमान' हे नाटयाचार्य काकासाहेब खाडिलकर यांचे पहिले संगीत नाटक. त्यापूर्वी 'कीचकवध', 'बायकांचे बंड' 'भाऊबंदकी' अशा गद्य नाटकांद्वारे नाट्याचार्य खाडिलकरांनी लोकप्रियतेचे शिखरच जिंकले होते. 'कीचकवध' या गद्य नाटकाने मराठी रंगभूमीवर प्रथमच संगीत नाटकांवर मात केली होती. महाराष्ट्र नाटक मंडळीचे श्री. दत्तोपंत देशपांडे यांनी आपल्या आठवणीत म्हटले आहे की, ''कीचकवधाचे प्रयोग सहा महिने सतत चालले होते. या काळात संगीत नाटक मंडळ्यांना आपले मुक्काम हलवावे लागले!'' 'कीचकवध' नाटक ज्या वर्षी झळकले त्याच वर्षी 'बायकांचे बंड' हे नाटयाचार्यांचे चौथे मूळ गद्य नाटकही अत्यंत लोकप्रिय झाले लोक कोटी करून म्हणू लागले की, ''संगीताचे बंड बायकाच्या बंडाने मांडले'' गंमत म्हणजे कालांतराने ''बायकांचे बंड'' हे नाटक संगीत स्वरुपात रंगभुमीवर आले! यानंतर 'भाऊबंदकी' नाटकाच्या यशाने लोकप्रियतेचा आणखीच विक्रम केला. नाट्याचार्य खाडिलकर गद्य रंगभूमीवर सुर्याप्रमाणे तळपत, होते त्याचवेळी संगीत रंगभूमीवर बालगंधर्वाच्या रूपाने नवीन चंद्रमा रसिकांना मोहवीत होता. किर्लोस्कर नाटक मंडळीचे सर्वश्रेष्ठ नायक नट भाऊराव कोल्हटकर यांचे १९०१ साली निधन झाले होते. किर्लोस्कर नाटक मंडळींचा जणू प्राणच गेला. पण त्यांच्या जागी बालगंधर्व आले. १९०६ साली मिरजेच्या मुक्कामात

'शाकुंतल'मध्ये गंधर्वांनी शकुंतलेची भूमिका करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. भाऊरावांच्या वेळेपासूनचे किर्लोस्कर नाटक मंडळींचे मॅनेजर श्री. शंकरराव मुजुमदार अगदी उत्स्फूर्तपणाने म्हणाले की, 'भाऊरावांबरोबरच अस्तंगत झालेले किर्लोस्कर मंडळींचे सौभाग्य आज तिला परत लाभले आहे!'

कीर्तीच्या शिखरावर असलेले असे नाट्याचार्य व असे बालगंधर्व यांची मराठी रंगभूमीवर संगीत 'मानापमान' नाटकाने युती झाली. तो सोनियाचा दिवस म्हणजे १२ मार्च १९११! किर्लोस्कर मंडळींचे मालक नानासाहेब जोगळेकर हे धैर्यधर, बालगंधर्व भामिनी आणि गणपतराव बोडस लक्ष्मीधर, अशा अनुपम नटसंचात 'मानापमान'चा पहिला प्रयोग झाला आणि संगीत रंगभूमीवर क्रांतीच झाली. साक्या दिंडे यांचे संगीत भरजरी रागदारी गायकीचे वरदान रंगभूमीला लाभले.

या नाटकाच्या नांदीतच खाडिलकरांनी म्हटले आहे की, 'पंचशरे गद्यवरे वरा जी झाली। नाट्यकला कविकृष्णा माला घाली।' या आत्मप्रशंसेचा अर्थ असा की, पाच गद्य नाटकांचे बाण सोडल्यानंतर नाट्यकला वश झाली असून तिने कवी कृष्णाला म्हणजेच नाटककार कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांना माला घातली आहे. नाट्यकलेची पुष्पमाला धारण करणाऱ्या नाट्याचार्यांनी या नांदीत पुढे म्हटले आहे –

ऐशा या समयाला । प्रेमरसे कवि नटला
गात असे कवनाला । संगीती नवलीला
ऐकाया लोलुप अति । सभा बैसली

संगीताला रौद्रभीषण संघर्ष मानवत नाही म्हणून संगीत 'मानापमान' नाटकात हलकाफुलका आणि एक प्रकारे रूसव्या–फुगव्याचा पेच निर्माण करून अथपासून इतीपर्यंत प्रसन्नता खेळविली आहे. अशा या अत्यंत प्रसन्न नाट्यकृतीत शृंगाररस खेळता ठेवला आहे. शृंगाररसाला उठाव देणारा लक्ष्मीधरी हास्यरस यांची योजना शालूंच्या किनारीप्रमाणे केली आहे. 'मानापमान'मधील शृंगार हा कामभावना उत्तेजित करणारा आषुक–माषुकांचा लंपटपणा नाही, तर आनंदलहरी निर्माण करणारा, वीरपुरुषाचा आणि विजयी दुनियेचा उदात्त पातळीवरील शृंगार आहे. 'मानापमान'च्या चौथ्या अंकात असे पद आहे–

प्रेमभावे जीव जगिया नटला, एकचि रस प्याला ।

नसती भिन्न रस हे, शृंगार राजा नवदल त्याला ।।

'मानापमान' ची भूमिका ही अशी प्रेममय आहे !

१२ मार्च १९११ साली 'मानापमान'चा पहिला प्रयोग मुंबईत दुपारी झाला तेव्हा रसिकांच्या उत्कंठेचा पेला काठोकाठ भरला होता. 'ऐकाया लोलुप अति सभा बैसली' हे नाटयाचार्यांनी आगाऊच केलेले वर्णन अक्षरशः सार्थ ठरले होते. या खाडिलकरांच्या नाटकात बालगंधर्वांना पाहण्यासाठी पुणे, मिरज, कोल्हापूर, हुबळी अशा ठिकठिकाणांहून लोक आले होते. खाडिलकरांची लेखणी, बालगंधर्वांची भामिनी, नानासाहेब जोगळेकर धैर्यधर, गणपतराव बोडस लक्ष्मीधर असा कलावंतांचा संच आणि गोविंदराव टेंबे यांनी रागदारी संगीताच्या भरजरी घड्या उलगडून ठेवणीतल्या चिजा शोधून त्यांच्या बंदिशीत लपेटलेली पदे असा हा अतिमनोहर त्रिवेणी संगम होता! 'मानापमान'च्या पहिल्याच प्रयोगावर लोक इतके निहायत खूष झाले की, पुढच्या प्रयोगाचे तिकीट मिळणे दोन दोन आठवडे मुष्किल झाले !

या प्रयोगाचे वर्णन कितीही केले तरी थोडेच वाटेल असा हा संगम होता. पण एकाच वाक्यात अत्यंत मार्मिक वर्णन प्रा. ना. सी.फडके यांनी केले आहे. ते म्हणतात, 'मानापमानचा पहिला प्रयोग पाहताच खात्री पटली की, या नाटकाचा शेवटचा प्रयोग कधीच होणार नाही.'

७५ वर्षे उलटली अजूनही 'मानापमाना'चे प्रयोग होतच आहेत. याच आठवडयात नव्या नटसंचाने 'मानापमान' रंगभूमीवर आणले आहे. नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टस तर्फे उद्या 'मानापमान'च्या अमृतमहोत्सवाचा कार्यक्रम आहे. शेवटचा प्रयोग कधीच होणार नाही हे खरे ठरलेले आपण पाहतच आहोत!

नाट्याचार्य खाडिलकरांनी आपल्या संगीत 'मेनका' नाटकात बालगंधर्वांची खुबीदारपणे अशी प्रशंसा केली आहे की, 'दि ग्रेटेस्ट ट्रिब्यूट' असेच म्हटले पाहिजे. 'मेनके'च्या पहिल्या अंकातच मेनका विश्वमित्राला म्हणते, ''विधात्याने सर्व देवांच्या देखत मला सांगितले की, तुझ्यासारखी सुंदर मूर्ती माझ्या हातून पुनः घडणे शक्य नाही!'' विधात्याने मेनकेला नव्हे तर खाडिलकरांनी बालगंधर्वाला दिलेला हा ग्रेटेस्ट ट्रिब्यूट होता! बालगंधर्वांची मेनकादेखील हे

वाक्य अशा लज्जतीत उच्चारत असे की जणू बालगंधर्वानाच विधात्याने तसे सांगितले होते. 'मानापमान' चा शेवटचा प्रयोग कधी होणार नाही आणि बालगंधर्वाच्या 'मानापमान' सारखे 'मानापमान' ही पुनः कधी पाहावयास मिळणार नाही.''[११]

काकासाहेबांनी आपल्या पहिल्याच संगीत 'मानापमान' नाटकात अलौकिक यश मिळविले. रंगभूमीवर आल्यानंतर सहा महिन्यात कंपनीत ५६ हजारांचे उत्पन्न मिळून मालक नानासाहेब जोगळेकर यांना जणू तीन चांदांची सरदारकीच मिळाली.

असे हे संगीत 'मानापमान' नाटक पंचाहस्तर वर्षे पुर्ण करुन यश संपादन करत होते. त्यावर नीळकंठ खाडिलकरांनी 'नाट्याचार्याची नाटयकला' हा ग्रंथ ही १९७२ साली प्रसिध्द केला.

**काकासाहेब खाडिलकांच्या नाटकाची उपयुक्त माहिती**[१२]

नाटयलेखन काळ– १८९३ ते १९३६,    (८ संगीत  व ७ गद्य नाटके.)

| नाटकाचे नाव | लेखन | प्रकाशन काल | प्रकाशन पदार्पणाचा रंगभूमीवर कार्यक्रम | प्रकार | |
|---|---|---|---|---|---|
| १) सवाई माधवरावाचा मृत्यू | १८९३ | १९०६ | १७–२–१९०६ | गद्य | ऐतिहासिक |
| २) कांचनगडची मोहना | १८९७ | १८९८ | २४–१२–१९०१ | गद्य | काल्पनिक |
| ३) कीचकवध | १९०६ | १९०७ | २२–२–१९०७ | गद्य | पौराणिक |
| ४) बायकांचे बंड (नंतर १९३५ साठी संगीत) | | १९०७ (गद्य) १९३५(संगीत) | १४–५–१९०७ | गद्य | पौराणिक |
| ५) भाऊबंदकी | १९०९ | १९०९ | १८–९–१९०९ | गद्य | ऐतिहासिक |
| ६) प्रेमध्वज | १९१० | १९११ | २४–१२–१९१० | गद्य | काल्पनिक |
| ७) मानापमान | १९१० | १९११ | १२–३–१९११ | संगीत | काल्पनिक |
| ८) विद्याहरण | १९१३ | १९१३ | ३१–५–१९१३ | संगीत | पौराणिक |
| ९) सत्वपरिक्षा | १९१४ | १९१४ | २०–९–१९१४ | गद्य | पौराणिक |
| १०) स्वयंवर | १९१६ | १९१६ | १०–१२–१९१६ | संगीत | पौराणिक |
| ११) द्रौपदी | १९२० | १९२० | १२–१२–१९२० | संगीत | पौराणिक |
| १२) मेनका | १९२६ | १९२६ | २२–४–१९२६ | संगीत | पौराणिक |
| १३) सवतीमत्सर | | | १९–११–१९२७ | गद्य | पौराणिक |
| १४) सावित्री | १९३० | १९३३ | ६–३–१९३३ | संगीत | पौराणिक |
| १५) त्रिदंडी संन्यास | १९३६ | १९४३ | ४–४–१९३६ | संगीत | पौराणिक |

## ३.६ वृत्तपत्रे आणि 'नवाकाळ' :–

### साखळी वृत्तपत्रांकडून मतस्वातंत्र्यावर निर्बंध :–

'साखळी वृत्तपत्रे' म्हणजे एखाद्या उद्योगपतीने अनेक वृत्तपत्रे साखळी पध्दतीने चालविले. त्यावर स्वतःच अंकुश ठेवणे अशी वृत्तपत्रे विशिष्ट गटासाठीच काम करतात.

याबाबत दि. १८फेब्रुवारी १९६३ रोजी च्या 'नवाकाळ' वृत्तपत्रातून 'साखळी वृत्तपत्रांकडून मत स्वातंत्र्याची अपेक्षा करू नका.' या मथळ्याची बातमी प्रकाशित करण्यात आली.

''वृत्तपत्रांच्या बाबतीत भारत संरक्षण कायद्याचे निर्बंध रद्द करण्यास पंतप्रधानांनी आज साफ नकार दर्शविला. प्रेस इन्सिटयूट ऑफ इंडिया या संस्थेच्यावतीने झालेल्या परिसंवादात बोलताना ते म्हणाले, 'वृत्तपत्रांपुरते हे निर्बंध रद्द करणे फार कठीण आहे. सामान्य माणसांवर घालण्यात आलेले निर्बंध वृत्तपत्रांना का लागू करू नयेत हे मला समजत नाही. वृत्तपत्रे म्हणजे काही असाधारण नागरिक नव्हेत आणि केवळ ज्या त्या वृत्तपत्राच्या प्रोप्रायटरला अथवा संपादकाला काही निर्बंध आवडत नाहीत म्हणून ते रद्द करावेत असे म्हणणेही ठीक नव्हे.

साखळी पत्रे आणि मक्तेदारी पत्रे यांच्या वाढीवर हल्ला चढवून श्री. नेहरू म्हणाले, 'जेथे जेथे साखळीपत्रे अथवा मक्तेदारी असलेली पत्रे आहेत तेथे खऱ्या अर्थाने वृत्तपत्रीय स्वातंत्र्य अस्तित्वात राहूच शकत नाही. एखादा बडा उद्योगपति जेव्हा वृत्तपत्राच्या क्षेत्रात मक्तेदार बनतो. अथवा साखळी पत्रे चालवितो तेव्हा स्वतंत्र संपादकाला जे आणि जशा प्रकारचे मत स्वातंत्र्य असते तशा प्रकारचे मत स्वातंत्र्य तो आपल्या पत्रांना देऊच शकत नाही. जनतेनेहि अशा पत्रांकडून तशा स्वातंत्र्याची अपेक्षा करूच नये. वृत्तपत्र हे जेव्हा एखाद्या गटाची मते बोलून दाखविण्याचे साधन बनते तेव्हा खऱ्या अर्थाने ते स्वतंत्र वृत्तपत्र या नावाला पात्र राहत नाही. भारतात वाचकांची संख्या अफाट आहे. म्हणून येथे साखळी पत्रांची वाढ होऊ द्यावी हेही म्हणणे योग्य नव्हे. ही वाढ जर अनिष्टच असेल तर प्रोत्साहन कसे देता येईल?''[१३]

थोडक्यात अशा साखळी वृत्तपत्राकडून मतस्वातंत्र्य मिळत नाही. संपादकावर निर्बंध येतात. एखाद्या गटाचे साधन म्हणूनही वृत्तपत्रे काम करतात. स्वतंत्र वृत्तपत्र म्हणून नावाला पात्र राहत नाही.

यावर पंडित नेहरूनी अशा वृत्तपत्र धंद्यातील मक्तेदारीवर टीका करून कायद्याचे निर्बंध रद्द करण्यास नकार दिला.

**'पत्रकारिताः कालची व आजची' यविषयी नलिकंठ खाडिलकरांचे विचार :–**

वृत्तपत्राविषयक विचार 'नवाकाळ' वृत्तपत्रातून सांगताना 'पत्रकारिताः कालची व आजची' या विषयावर संपादक नीळकंठ खाडिलकर यांनी दिलेली व्याख्याने गाजली आहेत. त्या व्यासंगी व्याख्यानातील विचारसरणीची झलक ९ जुलै १९८६ च्या 'नवाकाळ' अंकातील ''वॉच डॉग नव्हे, बॉस डॉग' या अग्रलेखात दिसते.

''कलकत्यात राजकीय नेते आणि पत्रकार यांचा एक रंजक परिसंवाद नुकताच झाला. जवळजवळ सात हजार लोक या परिसवांदासाठी उपस्थित होते. ' पत्रकारांपेक्षाही राजकीय नेते अधिक बेजबाबदार आहेत' असा विषय परिसंवादासाठी होता. वादविवादात राजकीय नेते वरचढ ठरल्याचा निर्णय अखेर सूत्रसंचालकांनी दिला. प्रसिध्द पत्रकार खुशवंत सिंग यांनी परिसंवादात अपेक्षेप्रमाणे धमाल उडविली, ते म्हणाले की, ''वेश्या व्यवसायापेक्षा खालच्या पातळीवर फक्त तीनच व्यवसाय असून राजकारण, पत्रकारिता आणि वकिली. हे ते तीन व्यवसाय आहेत! या तीनही प्रांतात मी आहे!'' अर्थात याचा अर्थ एवढाच की, खुशवंत सिंग यांनी आपला व्यवसाय कोणत्या वृत्तीने केला ते त्यांच्या उद्‌गारावरून दिसून आले!

श्री निखिल चक्रवर्ती यांनी असा दावा केला की, ''राजकीय नेते ही वृत्तपत्रीय प्रसिध्दीचीच निर्मिती आहे. वृत्तपत्रे राजकीय नेत्यांना प्रसिध्दी देऊन महत्त्व प्राप्त करून देतात.'' हा दावा खरा नाही. जर वृत्तपत्रीय प्रसिध्दीमुळे राजकीय नेतेपद निर्माण होत असते तर संपादकांनी इतरांना नेतेपद मिळविण्याचा चान्सच दिला नसता! पण ज्यांच्या हातात मोठमोठया खपाची वृत्तपत्रे असतात आणि स्वतःचीच छायाचित्रे छापण्यात ज्यांना कसलीच दिक्कत वाटत नाही. अशा संपादकांना साधी महापालिकेची निवडूक सुध्दा जिंकता येत नाही.

मग राज्याच्या किंवा देशाच्या नेतृत्वाचे नावच नको! मूठभर भांडवलदारांच्या खिशातील पत्राकरिता प्रसार करू शकते. पण प्रभाव पाडू शकत नाही. कारण दोनचार पुंजीपतीच्या खिशातून डरकाळ्या ठोकणाऱ्यांना लोकांनी मनोमन ओळखलेले असते. कृष्ण मेनन विरुध्द आचार्य कृपलानी यांच्यातील मुंबईच्या लोकसभा निवडणुकीच्या सामन्यात कृपालानींच्या बाजूने संपादकच नव्हे तर शेटजीसुध्दा सक्रिय प्रचाराला उतरले होते. पण कृपलानीचा पराभव करून कृष्ण मेनन निवडून आले. सर्वात विदारक उदाहरण इंदिरा गांधीचे आहे. शहा कमिशनचे कामकाज म्हणजे इंदिराजीवर अपूर्व चिखलफेक होती आणि जवळजवळ सर्वच वृत्तपत्रांत दोनदोन पाने भरून हा चिखल अनेक दिवस दररोज उडविला जात होता. एवढी बदनामी आजवर कुणाही राजकीय नेत्याची केलेली नाही.

पत्रकारितेवरील आणि राजकीय नेत्यावरील लोकांचा विश्वास उडत चालला आहे. याचे कारण हेच आहे की, बडया भांडवलदारांच्या हातात अर्थकारण आणि त्यामागोमाग राजकारण व पत्रकारिता गेली आहे. कलकत्याच्या परिसंवादात फक्त मनोरंजन करण्याची पाळी यामुळेच आली!

जेव्हा देश परतंत्र होता तेव्हा वृत्तपत्रे स्वतंत्र होती. पण जेव्हा देश स्वतंत्र झाला तेव्हा वृत्तपत्रे परतंत्र झाली! पूर्वी संपादकांमुळे वृत्तपत्राला महत्त्व येत असे. आता मोठया खपाच्या वृत्तपत्रामुळे पुंजीपती ज्या कुणाला संपादक म्हणून ठेवतात. त्याला महत्त्व येते. संपादक हा समाजाच्या 'वॉच-डॉग' होता पण आज शेठजीच्या इशाऱ्याप्रमाणे बेताल भुंकणारा 'बॉस-डॉग' झाला आहे. संपादकाला पूर्वीच्या काळी समाजाच्या मार्गदर्शनासाठी बोलवीत. आता संपादकाला पार्टीसाठी बोलवितात, वैचारिक भावनासाठी पूर्वी आग्रहाने नेत तर आता मनोरंजनासाठी नेले जाते. कलकत्त्याच्या परिसंवादाप्रमाणे!''[१४]

अर्थात आजची पत्रकारिता बडया भांडवलशाही, राजकारणी लोकांच्या हातातील खेळणे झाले आहे. त्यामुळे ते सांगतील ते वृत्तपत्रातून छापून येते. आज स्वातंत्र्यात वृत्तपत्रे पारतंत्र्यात गेली परंतु पारंत्र्यात वृत्तपत्रे स्वतंत्र होती.

**पत्रकाराचा माहिती गुप्त ठेवण्याचा विशेष हक्क :–**

'वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या बातमीचा उगम कोणता? कुणी दिला व कोठून मिळाली या प्रश्नाचे उत्तर नाकारण्याचा पत्रकाराला हक्क आहे.' मुंबई हायकोर्टाने पत्रकारांचा हा विशेष हक्क अमान्य केला होता.

''१९७२ सालच्या कृष्णा देसाई खटल्यात सुध्दा हा हक्क अमान्य केला होता. पण त्यावेळी असे म्हटले होते की, पुरावा कायद्यात वकिल, डॉक्टर, धर्मोपदेशक यांचा अपवाद असून त्यांना अनुक्रमे अशिलाने, वकिलाने आणि कबुली देणाऱ्या जे सांगितले ते गुप्त राखण्याचा हक्क दिला आहे. पण पत्रकारांना असा कोणताही हक्क हवा असे मानले तरी कायद्याची त्याला मान्यता नाही. पत्रकार इतरांच्या हक्कासाठी झगडतात, पण त्यांनी पत्रकारितेच्या कायदेशीर हक्कासाठी संघर्ष केलेला नाही हे किती उचित आहे! या परिस्थितीत माहितीचा उगम सांगितलाच पाहिजे असा मी निर्णय देतो. या निकालाविरुध्द आम्ही मुंबई हायकोर्टात अपील आहे. पण या मुद्यामुळे कृष्णा देसाई खटला लांबणीवर पडणे अटळ होऊन विरोधी वकिल ॲड. राम जेठमलानी यांनी माहितीचा उगम विचारणारा प्रश्न मागे घेतला. अर्थातच पत्रकाराच्या विशेष हक्काचा प्रश्न अनिश्चित राहिला आणि आजतागायत अनिश्चित आहे.''[१५]

अशाप्रकारे हायकोर्टाने पत्रकारांचा माहिती गुप्त ठेवण्याचा हक्क अमान्य केला.

पत्रकारांना माहितीच्या बाबतीत गुप्तता बाळगणे यासाठी खास हक्क हवा यावर नीळकंठ खाडिलकर 'खास हक्क कशासाठी?' या लेखात उत्तर देतात.–

''पत्रकाराला हा खास हक्क कशासाठी आवश्यक आहे? पत्रकाराचे कर्तव्य वाचकांना सत्य माहिती आणि मार्गदर्शन करणे हे आहे. लोकशाहीत नागरिकांना माहिती देण्याचा हक्क आहे म्हणून नागरिकांना माहिती देणाऱ्याचे पत्रकाराचे कर्तव्य आहे. पत्रकाराला माहिती मिळवायची असेल तर माहिती देणाऱ्याचे नाव त्याने गुप्त ठेवले पाहिजे. जर माहिती देणाऱ्याचे नाव पत्रकार सांगतील तर माहिती देण्यास लोक तयार होणार नाहीत. माहिती देण्याचे नाव

जाहीर करणे म्हणजे माहिती सांगण्याची शक्यता नाहीशी करणे! म्हणून पत्रकाराला माहितीचा उगम गुप्त ठेवण्याचा हक्क असला पाहिजे.''[१६]

अशाप्रकारे नीळकंठ खाडिलकरांनी माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्याबाबत खास हक्क असावा. हे योग्यच आहे. कारण गोपनीय माहिती देणाऱ्याचे नाव सांगितले तर तो माहिती देणारच नाही.

## ३.७ 'नवाकाळ' ची कामगारांसाठी निधी योजना :–

वृत्तपत्र फक्त लेखन कार्य करत नव्हते. तर प्रत्यक्ष कृती करत हे गिरणी कामगारांच्या सहाय्यक निधी योजनेद्वारे दिसून येते. त्याबाबत 'नवाकाळ' वृत्तपत्रामधून दि. ६ मे १९५८ ला 'नवाकाळ' तर्फेच्या निधीत म्यु. मजदुर युनियनची देणगी' या लेखातून माहिती सादर केली ती पुढीलप्रमाणेः–

''प्रिमियर ऑटोमोबाईल कामगार गेले सुमारे तीन आठवडे संपावर असून, हा संप मिटण्याची लक्षणे अद्याप नाहीत, आणि संपावर असलेल्या कामगारांच्या हालअपेष्टा दिवसानुदिवस वाढेत जाणाऱ्या आहेत. गरजू कामगारांना यावेळी आर्थिक सहाय्याची जरूरी आहे हे उघड असून असे सहाय्य देण्याची ज्या संघटनांची व व्यक्तींची इच्छा असेल त्यांना सुकरतेने ते करता यावे म्हणून 'नवाकाळ' तर्फे प्रिमियर ऑटोमोबाईल संप कामगार सहाय्यक निधी सुरू करण्यात येत आहे. या निधीस रक्कमा देणारांना पावती देण्यात येईल आणि देणग्यांची नावनिशीसह पोच 'नवाकाळ' मध्ये जाहीर करण्यात येईल. त्याचप्रमाणे जबाबदार संघटनेमार्फत संपवाल्या गरजू कामगारांना मदत मिळेल अशी व्यवस्था करण्यात येईल.

या निधीस 'नवाकाळ' तर्फे ५१रु ची देणगी जाहीर करण्यात आली असून म्यु. मजदूर युनियनने २५१ रूची पहिली देगणी दिली आहे. हे जाहीर करतांना आम्हांस आनंद होत आहे.

संपादक,
नवाकाळ ''[१७]

थोडक्यात मुंबईमध्ये जे कामगारांचे संप चालू होते. त्यामुळे कामगार व त्यांच्या कुटूंबावर उपासमारी सुरू होती. त्याच्या हालअपेष्टा दूर करण्यासाठी 'नवाकाळ' वृत्तपत्राने

'प्रिमियर ऑटोमोबाईल संप कामगार सहाय्यक निधी' अशी योजना सुरू करून त्या निधीस देणगी देणाऱ्यास पावती देणे. तसेच देणग्याची नावासह पोच 'नवाकाळ'मध्ये जाहीर करण्यात येणार होती.

## ३.८ भाडेकरू समस्या :-

मुंबईमध्ये गिरणी उद्योग, मोठमोठे उद्योगधंदे यासाठी जो कामगारवर्ग होता तो मुंबईबाहेरचा होता. त्यांच्या राहण्याच्या प्रश्न मुंबईमध्ये मोठया प्रमाणात भेडसावत होता. श्रीमंत शेटजी लोकांनी मुंबईत मोठमोठया चाळी बांधल्या तसेच गिरणी मालकांनीही मोठ्या प्रमाणात कामगाराच्या राहण्यासाठी चाळी बांधल्या. तेथे अनेक कामगार भाडे तत्वावर राहात होते. हे कामगार छोट्या गाळ्यांमध्ये वीस-पंचवीस जण राहात असत. या कामगारांना पुढेपुढे या चाळीतील जुन्या खोल्या घाण, पाणी प्रश्न आदि प्रश्नांना सामोरे जावे लागत तसेच गाळ्याचे वाढते भाडे या कामगारांना परवडणे अशक्य झाले. भाडेकरुच्या समस्यावर 'नवाकाळ' वृत्तपत्रातून लेख प्रकाशित करण्यात आले. दि. ७ मार्च १९६७ च्या 'नवाकाळ' वृत्तपत्राने 'गृहनिर्माण मंडळाच्या सर्व चाळींना सरकारचे भाडे नियंत्रण कायदा लागू करणे अत्यावश्यक' हा लेख प्रकाशित झाला.

''महाराष्ट्र हौसिंग बोर्डाच्या मालकांच्या ज्या अनेक कॉलनी आहेत त्या कॉलनीत ६० हजार गाळे असून हे सर्व बांधकाम मुंबई उपनगरमध्ये आहे. या गाळ्यामधील भाडेकरूनी आपल्या तक्रारी रीतसर दूर करून घेण्याकरीता स्थानिक संघटना स्थापन केल्या आहेत. आणि या सर्व संघटनेचे एक मुख्य फेडरेशन बनविले असून या फेडरेशनच्या वतीने फेडरेशनचे अध्यक्ष डॉ. सामंत हे या भांडेकरूच्या सर्व तक्रारी दूर करण्यात सहाय्य करतात.

डॉ. सामंत आता महाराष्ट्र विधान सभेवर निवडून आल्यामुळे त्यांच्या बाबतीत अनेक आकांक्षा भाडेकरूत निर्माण झाल्या आहेत. डॉ. सामंत यांनी प्रथम वरील भाडेकरूच्या हितासाठी विधानसभेत ठराव आणून महाराष्ट्र सरकारचा भाडेकरू कायदा हा हौसिंग बोर्डाच्या भाडेकरुंना लागू होईल असे प्रयत्न करावे. महाराष्ट्र हौसिंग बोर्डाच्या सभासदापैकी काही सभासद विधानसभेत आमदार म्हणून निवडून आले आहेत. त्यावेळी डॉ. सामंत यांनी वरील ठराव विधानसभेत मांडण्याकरीता सहाय्य घ्यावे.

महाराष्ट्र हौसिंग बोर्डापुढे मुंबई भाडेकरू संघाचे सॉलि. एन.पी. सामंत यांनी वरील बाजू अनेकवेळा मांडली आहे. सरकारने प्रथम आपला कायदा आपल्या भाडेकरूंना लागू करून त्याची नीट अंमलबजावणी करावी. त्यामुळे खाजगी घरमालकांनाही भाडेकरू कायद्याचे योग्य पालन करणे भाग पडेल. जर तसे न केल्यास सरकार त्यांना या बाबतीत जबाबदार धरून त्यांच्यावर कायदेशीर उपाययोजना करण्यात समर्थ ठरले.

तरी वरील योजनेची अंमलबजावणी डॉ. सामंत यांनी सर्व आमदारांच्या सहाय्याने विधानसभेत करावी अशी बोर्डाच्या भाडेकरूची त्यांना विनंती आहे.''[१८]

मुंबईत मोठा प्रश्न घरांचा आहे. भाडेकरू संघाने गृहहीनांना जागा देण्यासाठी आंदोलनाचा मार्ग स्विकारला. त्याबाबत 'नवाकाळ' वृत्तपत्रातून दि. १४ मार्च १९६७ रोजी ''दहा लाख गृहहीनांना जागा मिळविण्यासाठी यापुढे आंदोलनाशिवाय दुसरा मार्ग राहिलेला नाही. मुं. भाडेकरू संघाच्या नेतृत्वाखाली एकत्र येण्याचे आवाहन.'' हा या मथळ्याची बातमी प्रकाशित झाली.

''मुंबईत सर्व तऱ्हेच्या चळवळी, आंदोलने मोठया प्रमाणात होतात. पण सध्याचा अधिक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे घरांचा याबाबतीत मात्र राजकीय पक्ष किंवा सामाजिक नेते पुढाकार घेऊन हा प्रश्न सोडविण्याकडे भाडेकरूना सहाय्य करीत नाहीत अशी वस्तुस्थिती आहे. बृहमुंबईत वाढत्या लोकसंख्येप्रमाणेच उद्योगधंद्याचा झपाटयाने वाढ होत आहे. परंतु नगरपालिका, सरकारी नोकर, रेल्वे, पोर्टट्रस्ट, पोस्ट टेलिग्राम इत्यादीचे कर्मचारी तसेच औद्योगिक कामगार, मध्यमवर्गीय इत्यादीच्या जागेचा यक्ष प्रश्न सोडविण्याचा जे जे प्रयत्न करीत आहेत त्याचे प्रयत्न अपुरे पडत असल्यामुळे याबाबतीत गंभीर निराशाजनक परिस्थिती नजरेस येत आहे.

या गरजू भाडेकरूनी जागा मिळविण्यासाठी जे जे प्रयत्न केले त्याची माहिती व अर्जाच्या नकला मुंबई भाडेकरू संघाच्या कचेरीत सादर केल्या असून भाडेकरू संघाने भरीव पाऊल उचलावे अशी विनंती करीत आहेत.

अशा गरजू लोकांची शहरातली संख्या अंदाजे १० लाख असावी हे लोक जागेसाठी कुठे ना कुठे प्रयत्न करीत आहेत, पण त्यांच्या प्रयत्नाला योग्य फळ लाभत नसल्यामुळे त्यांना निश्चित मार्ग सापडत नाही. त्यांना संघाने स्पष्ट आदेश दिला आहे की 'अर्ज विनंत्यानी' हा प्रश्न सुटणार नाही. भाडेकरूंनी सामुदायिक आंदोलनासाठी सज्ज असले पाहिजे.

भाडेकरूंच्या दयनीय परिस्थितीचे संघाला पूर्ण जाणीव झाली असून संघाच्या कार्यकारी मंडळापुढे हा प्रश्न अनेक वेळा चर्चिला गेला आहे. सर्व संघनेत्यानी तो हातळण्याचा एकमुखी निर्णय घेतला आहे. याबाबतीत भाडेकरूनी पूर्णपणे साथ दिली व पुढील दोन तीन महिन्यात या प्रश्नाला चालना मिळाली तर महाराष्ट्र सरकार व केंद्र सरकारला लक्ष देणे भाग पडेल.

तेव्हा अशा गृहहीन भाडेकरूंनी संघाच्या नेतृत्वाखाली एकत्र यावे असे कळकळीचे आवाहन भाडेकरूना संघाने केले आहे.''[१९]

थोडक्यात ब्रिटीशांनी मुंबईत जे उद्योगधंदे सुरू केले होते त्यात मुख्यतः कापडगिरणी होती. या उद्योगधंद्याना लागणारा कामगारवर्ग हा मुंबई बाहेरचा होता. त्यामुळे साहजिकच त्यांच्या राहण्याचा प्रश्न समोर येत असे. पारंत्र्यात काही अंशी राहण्याच्या सोयी झाल्या. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात वाढते उद्योगधंदे, व्यापार, सरकारी कर्मचारी, मध्यम वर्गीय समाज आदी मुळे मुंबईत लोकसंख्या झपाटयाने वाढली. त्यामुळे त्यांच्या राहण्याचा प्रश्न समोर येऊ लागला. पूर्वीच्या जून्या चाळी, तेथील वातावरण, पाणी, लाईट, अस्वच्छता आदि प्रश्न समोर येऊ लागले. या भाडेकरूच्या समस्याचे निराकण करणे, लाखो गृहहीन लोकांना घरे उपलब्ध करून देणे आदि समस्याचे निराकरण करण्यासाठी भाडेकरू संघाने कार्य हाती घेतले. 'नवाकाळ' वृत्तपत्राने ही आपल्या लेखातून वेळोवेळी या भाडेकरू समस्यावर प्रकाश टाकण्याचे कार्य केले. मुंबईतील या जुन्या चाळीच्या समस्या आजही भेडसावताना दिसून येत आहे.

## ३.९ झोपडपट्टी पुर्नवसन :–

### मुंबईच्या समस्या व वाढती लोकसंख्या :–

जानेवारी १९७१ मध्ये त्यावेळचे मुंबई महापालिका कमीशनर डॉ. म. न. देसाई यांनी मुंबईतील समस्यावर व वस्तस्थितीवर आपले मत व्यक्त करताना म्हटले आहे. की, मुंबईतील

परिस्थिती दिवसे न दिवस बिकट होऊ लागली आहे. महापालिका कर्मचारी वर्गावर भ्रष्टाचार तसेच कामातील अकार्यक्षमता यावर टीका होत आहे. त्यावर ते कामगाराची बाजू व तसेच फक्त कामगारच जबाबदार नाही तर मुळ समस्यवरही त्यानी चर्चा केली. लोकसंख्या वाढ व त्यांचा बोजा मुंबईवर पडत आहे. त्यामुळे खूप गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. ते म्हणजे रोजगार, बेकारी, राहणीमान व घरे. त्याकाळी मुंबईच्या फुटपाथवर सुमारे एक लाख लोक रहात होते. त्याचप्रमाणे अनाधिकृत फेरीवाले झोपडपट्टीत आठ–दहा लाख लोक राहत. या सर्वांना नागरी सोयी उपलब्ध नव्हते. वाहनांना तसेच लोकांनाही दळणवळणाच्या सुविधा अपूऱ्या पडत पाणी पुरेसे मिळत नव्हते. तर स्वच्छतेचाही प्रश्न उपस्थित होता. 'नवाकाळ' ने या प्रश्नावर एक अग्रलेख प्रसिध्द केला 'मुंबईच्या व्यथा, कर्मकथा आणि त्यावरचे भयंकर उपचार' या शीर्षकाखाली त्यांनी मुंबईतील प्रश्नांवर प्रकाश टाकून त्यावरील उपायही सुचवले ते म्हणतात,

''मुंबईत रोजगारच्या निमित्ताने अनेक लोक अनेक राज्यातून येत आहेत जिथे मोकळी जागा दिसेल तेथे झोपडपट्टी वाढवून किंवा रस्त्यावर राहून आपला संसार थाटत आहेत. ही परिस्थिती सुधारवायची असेल तर मुंबईत नव्या लोकांचा लोढा थांबवला पाहिजे पण भारतीय घटनेप्रमाणे कोणासही उदरनिर्वाहा करता कुठेही जाता येते.'' पण मुंबईतील अशा परिस्थितीत राहणीमान, आरोग्य, स्वच्छता व पाणी समस्या आहेत असे मुंबई महानगरपालिका कमीशनर डॉ. देसाई यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर 'नवाकाळ' ने आपल्या अग्रलेखातून त्या समस्या समाजापुढे मांडल्या व त्यावरील उपाय पुढील प्रमाणे मांडले. ते म्हणतात, ''देशातील गरिबी हटवली पाहिजे. व बेकारी दूर झाली पाहिजे. ज्या परराज्यांतून जे लोक कामधंद्यासाठी मुंबईत येत आहेत त्या राज्यात किंवा इतर शहरांचा विकास करून उद्योगधंदे कारखानदारी विखरून टाकावी ज्यायोगे मुंबईकडे येणाऱ्या लोकांना त्यांच्याच शहरात कामधंदा मिळून मुंबईचा तसेच इतर शहरांचा विकास होईल.''[२०]

अशा प्रकारे 'नवाकाळ' ने या लेखातून मुंबईच्या समस्या व इतर भागाचा विकास यावर आपले विचार मांडले.

**झोपडपट्टीवासीयांसाठी 'नवाकाळ'ची आठ कलमी योजना :–**

मुंबईतील झोपडपट्टीच्या प्रश्नावर 'नवाकाळ' वृत्तपत्राने लेख प्रकाशित करून सरकार जनतेला झोपडपट्ट्वासीयांच्या समस्याची जाणीव करून दिली.

ॲन्टॉप हिलवरील झोपडया पाडण्यात आल्या. त्याठिकाणी गृहनिर्माण मंत्री ना. सुब्रमण्यम यांना लोकांनी घेराव घातला. लाठीमार झाला. संजय गांधी नगरातील झोपडपट्ट्या विख्यांत सिने अभिनेत्री शबाना आझामी, चित्रपट निर्माते आनंद आदीनी बेमुदत उपोषण केले. मुंबईत १९७६पूर्वीच्या ज्या झोपडया आहेत त्या झोपडयात २८ लाख लोक राहतात. मे १९८० पर्यंत १२ लाख आणखी लोक झोपडयात राहू लागले. वेगाने हिशोब केला तर ५० लाख लोक झोपडपट्टीत राहत होते. या झोपडपट्टीवासीयांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत होत्या परंतु यासाठी सरकारकडे कोणतेही धोरण नव्हते मुंबईचा विनाश तर होत आहेच पण मराठी माणूस अधिकाधिक अल्पसंख्य होत आहेत. या प्रश्नावर सर्वांगीण योजनेची आवश्यकता होती ती 'नवाकाळ'वृत्तपत्राचे संपादक नीळकंठ खाडिलकरांनी 'आठ कलमी योजना' सरकारकडे पुर्वी ही सादर केली होती ती पुन्हाही नवीन मुख्यमंत्री मा.ना. शंकरराव चव्हाण यांनाही सादर केली. या योजनेबाबत दिनांक १८ मे १९८६ च्या 'सरकारला काही धोरण नाही!' अग्रलेखातून सादर केली.

''**आठ कलमी योजना :–**

मुंबईची समस्या खऱ्या अर्थाने सांगता येईल अशी ही योजना आम्ही पूर्वीच सादर केली ती पुनः मांडत आहोतः–

१) बृहन्मुंबईतील सर्व जमिनीचे राष्ट्रीयकरण करावे.

२) महाराष्ट्र सरकारने एक खोलीचे आणि दोन खोल्यांचे गाळे असलेल्या पाच–सहा मजली हजारो इमारती बांधाव्यात एका खोलीसाठी पंधरा हजार रुपये आणि दोन खोल्यांसाठी वीस हजार रूपये झोपडीवासियांकडून आगाऊ घेऊन त्यांना या जागा द्याव्यात. अशाप्रकारे एकेक गालिच्छ झोपडपट्टी नाहीशी करता येईल आणि त्यामुळे रिकाम्या झालेल्या जमिनीवरही अशाच इमारती बांधता येतील.

३) अशाप्रकारे सरकारने दिलेला कोणताही गाळा पुनश्च विकण्यास मनाई करावी आणि गाळा सोडून जायचा असेल तर खरेदीच्या किंमतीतच सरकारला परत केला पाहिजे, अशी कायद्यात तरतूद करावी.

४) महाराष्ट्र सरकारने आज मुंबईत रहात असलेल्या प्रत्येक नागरिकाला ओळखपत्र उर्फ अंतर्गत पासपोर्ट द्यावा. त्यात नागरिकाचे नाव, जन्मदिन, पत्ता, छायाचित्रे, त्याचे शालेय व अन्य शिक्षण कुठे, केव्हा झाले, मुंबईत केव्हा पासून निवास, रोजगार आदि माहिती असावी. तीन सरकारी कर्मचारी आणि पाच स्थानिक कार्यकर्ते अशा अनेक पथकांनी विविध भागात जाऊन ही कामगिरी कसोशीने पार पाडावी.

यानंतर ही सर्व माहिती कॉम्प्युटरमध्ये समाविष्ट करून ओळखपत्र योजनेचे खास खाते विसर्जित करावे. यामुळे कुणाला नव्याने ओळखपत्र दिले जाणार नाही आणि लांचलुचपतीची शक्यताच रहाणार नाही. १९७६ च्या झोपडयांच्या गणतीची माहिती कॉम्प्युटरमध्ये संग्रहीत करावी अशी एक शिफारस अजित केरकर कमिटीच्या अहवालात आहे. पोलिसांनी किंवा महापालिका वॉर्ड अधिकाऱ्याने मागताक्षणी ओळखपत्र दाखविलेच पाहिजे आणि सदैव जवळ बाळगलेच पाहिजे असा कायदा करावा. खोटे ओळखपत्र बाळगण्यास किमान दोन वर्षे तुरुंगवासाची शिक्षा मुक्रर करावी.

५) ओळखपत्र नसताना बेकायदा झोपडी बांधून किंवा अन्य बांधकाम करून रहाणाऱ्याला तीन महिने तुरुंगवास व नंतर हद्दपारी ही सजा मुक्रर करावी.

६) सरकार, निमसरकारी संस्था मुंबई महापालिका यांच्या तर्फे दिली जाणारी कोणतीही सुविधा किंवा कोणताही परवानाफक्त ओळखपत्र धारकालाच देण्यात आला पाहिजे.

७) आज मुंबईत जे लोक रहात आहेत त्यांना किमान जीवनावश्यक सुविधा प्राप्त होईपर्यंत म्हणजे पंधरा वर्षेपर्यंत ५व्या नि ६ व्या कलमाचा अंमल राहील.

८) महाराष्ट्रातून यापुढे जी मराठी माणसे मुंबईत स्थायिक होण्यास किंवा कायम निवासासाठी अपरिहार्यपणे येतील त्यांच्यासाठी काही जमीन राखून ठेवावी व सरकारने आवश्यकप्रमाणे तेथे गाळे बांधावेत.''[२१]

थोडक्यात 'नवाकाळ' वृत्तपत्राचे संपादक नीळकंठ खाडिलकरांनी जी झोपडपट्टीवासियांसाठी आठ कलमी योजना सरकारकडे सादर केली होती त्याची अंमलबजावणी आज काही प्रमाणात झाल्याचे मुंबईत दिसून येत आहे. या योजनेमुळे झोपडपट्ट्या उठवून कमी जागेत हजारो लोकांना घरे उपलब्ध होत आहेत. लोकांना ओळखपत्र दिल्याने त्याचा मुंबईतील निवास, रोजगार आदिची माहिती प्राप्त होते. नीळकंठ खाडिलकरांची ही योजना मुंबईतील झोपडपट्टीवासियांसाठी अतिशय चांगली आहे.

**झोपडपट्टी पुर्नवसन योजना :-**

१९९५ मध्ये युती शासनाच्या काळात झोपडपट्टी पुर्नवसन योजना तयार करण्यात आली.

पुर्नवसन या योजनेत १९९५ पर्यंत ज्या झोपडया झाल्या त्यांना शासन पक्की घरे बांधून देणार या योजनेसाठी अफझुलपूरकर कमिटीने असे म्हटले होते, की ज्या झोपडपट्टीवासियांना मोफत घरे दयायची त्यांची पात्रता ठरविण्यात गेले तर अनेक अडचणी निर्माण होतील तेव्हा १९९५ पर्यंत ज्या झोपडपट्ट्या झाल्या त्यांना पात्र ठरवावे.

'नवाकाळ' ने आपल्या अग्रलेखात याविषयी आपले मत व्यक्त केले. ''जे मोडक्या चाळीत वर्षानुवर्षे राहिले त्यांचा विचार करा! आजवर जे घुसले व बेकायदा राहिले त्यांना अधिकृत मोफत घर!'' या शीर्षकाखाली 'नवाकाळ' ने आपली बाजू मांडताना ते म्हणतात,

आजपर्यंत जे परप्रांतिय आले त्यांनी झोपडया बांधल्या त्यांना मोफत घरे मिळणार आहेत. पण जे गिरणीकामगार संयुक्त महाराष्ट्रासाठी, मुंबईसाठी झूंज दिली अशा गिरणीकामगारांच्या चाळी आज मोडकळीस आल्या आहेत. त्यांचा प्रश्न उपस्थित केला. पुढे आपल्या अग्रलेखात त्यांनी

'प्रथम झोपडया उभारण्यारांचा बिमोड करा.' 'मराठी माणसावर धडधडीत अन्याय नको' या प्रमुख मथळ्याखाली ते पुढे म्हणतात,

''मुंबईतील मराठी माणसांवर संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर फार अन्याय झालेला आहे! त्यांची स्वतःच्याच घरात सतत उपेक्षा झाली आहे! जो मराठी माणूस वर्षानुवर्षे मुंबईत

आहे. तो कुठेतरी एका खोलीत जीव धरून राहिला! पण समुद्राची लाट यावी त्याप्रमाणे गेल्या काही वर्षात काळ्या पैशाची लाट आली आणि मराठी माणूस उपनगरात फेकला गेला! रोज रेल्वेला लोंबकळत राहिला! दरम्यान मराठी गिरणीकामगारांची बरबादी  झाली. आणि लोक कोकणात व इतर काही गावी गेले! ते बेकायदा तंबू ठोकून राहणारे नव्हते! त्याचवेळी इतर कुणीही राहण्यासाठी मुंबईत घुसले ते आता अधिकृत मोफत घराचे धनी होणार आहेत! त्यामुळे मराठी माणसांची जी दैना झाली त्यावर शिक्कामोर्तब होईल! याचा विचार केला असता कुणाही मराठी माणसांच्या अंतःकरणात वेदना निर्माण होईल! नेहमीच आरामात जगणाऱ्या अफझुलपूरकर कमिटीला हा द्रव फुटणार नाही! पण शिवशाहीत मराठी माणसावरील अन्यायाची सर्वप्रथम दाद घेतलीच पाहिजे! त्याचा फार गांभिर्याने विचार करण्यात आला तरच या भव्य योजनेला न्यायाचा पाया मिळेल! मराठी माणसावरील अन्यायाच्या पायावर भव्य योजना उभी करू नये असे आमचे पुनश्चः एकदा कळकळीचे आवाहन आहे.''[२२]

अतिशय मनापासून संपादकाने आपल्या मराठी बांधवांसाठी जे मुंबईचे नागरिक आहेत त्यांनी स्वातंत्र्यापूर्वी पासून मुंबईचे रहिवासी आहेत. ज्या गिरणी कामगारांनी स्वातंत्र्यासाठी तसेच संयुक्त महाराष्ट्र निर्मीती पर्यंत आपले  योगदान दिले त्या मराठीमाणसांसाठी न्यायहक्काची लढाई 'नवाकाळ' ने आपल्या लेखा मार्गे सुरु केली.

## ३.१० प्रॅक्टिकल सोशॅलिझम :–

'प्रॅक्टिकल सोशॅलिझम' ही विचारसरणी १९८३ सालच्या उत्तरार्धात दैनिक 'नवाकाळ' मधून लोकांसमोर सादर केली. प्रथम आठ अग्रलेख (रविवार १७ जुलै ते रविवार २४ जुलै १९८३) लिहिले. त्यानंतर पाच प्रदीर्घ अग्रलेखातून (रविवार २८ ऑगस्ट ते १ सप्टेंबर १९८३) 'प्रॅक्टकिल सोशॅलिझम' ची विचारधारा कार्यक्रमासकट मांडण्यात आली 'प्रॅक्टकिल सोशॅलिझम' म्हणजे भारताच्या वैशिष्टयपूर्ण भूमीत आणि परिस्थितीत रूजेल आणि उगवेल असा समाजवाद! उत्तुंग भारतीय नेत्यांकडून प्रेरणा घेत मांडलेला हा अस्सल भारतीय विचार आहे हा समाजवाद व्यवहारात उतरविता येऊन ९९ टक्के लोकांचे हित साधील आणि फक्त १ टक्का लोकांच्या स्वार्थी हितसंबंधाचे निर्मूलन करील.

''भारतातील लोकशाही समाजवादाच्या वाटचालीत नेमके उलटे घडले आहे. फक्त १ टक्का लोकांचे जास्तीत जास्त हित साधले असून त्यांची हुकूमशाही प्रस्थापित झाली आहे. ९९ टक्के लोकांना वाढत्या किंमतीच्या चरकातून पिळून काढून हा एक टक्का वर्ग संपत्तीच्या आणि सत्तेच्या डोंगरावर उभा आहे. असे का झाले? कारण लोकशाही समाजवाद हा डोक्यावर उभे राहण्याचा प्रकार आहे. लोकशाहीतून मंदगतीने इंचाइंचाने समाजवाद येत नाही तर लोकशाहीतून भांडवलशाही, भांडवलशाहीतून काळ्या पैशांचा भ्रष्टाचार, भ्रष्टाचारातून भांडवलदार–नोकरशाही–सत्ताधारी–बुध्दीमंत–धर्मांध–गुंड स्मगलर यांची घातक युती,या युतीतून लुटारू टोळ्यांचा हैदोस आणि त्यातून एक टक्का वर्गाची हुकूमशाही निर्माण होते. लोकशाहीही उरत नाही आणि समाजवादही दिसत नाही. भारतात तसेच घडले आहे. प्रॅक्टिकल सोशॅलिझम डोक्यावर उभ्या असलेल्या लोकशाही समाजवादाला उलटे फिरवून पायावर उभे करीत आहे. प्रथम समाजवाद आणि त्यासमवेत संसदीय लोकशाही हेच 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम'चे मूलभूत उद्दिष्ट आहे. समाजवाद घटनेद्वारेच अपरिवर्तनीय स्वरुपात अंमलात आणून त्यासमवेत संसदीय लोकशाही राबविली पाहिजे, कारण तसे घडविले नाही तर लोकशाही ही एक टक्का वर्गाची हुकूमशाही बनते.[२३]

**प्रॅक्टीकल सॅशिलझमची मूलभूत धारणा :–**

१) ''समाजवादाची घटनेव्दारा अपरिवर्तनीय प्रस्थापना आणि त्यासमवेत ससंदीय लोकशाही हा 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' विचारधारणेचा पाया आहे. त्याशिवाय राजकीय, आर्थिक आणि सामाजिक समानता निर्माण होऊच शकत नाही. लोकशाही समाजवाद म्हणजे डोक्यावर उभे राहाणे! म्हणून त्याला उलटे फिरवून पायावर उभे केले पाहिजे. म्हणजेच समाजवादाची प्रस्थापना व त्यासमवेत संसदीय लोकशाही हाच मार्ग आहे.

२) अन्न–वस्त्र–निवारा–शिक्षण–कामधंदा–औषधोपचार यांची हमी जन्मतःच देणारा विचार म्हणजे 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' अशी हमी ज्या समाजात नाही त्या समाजात व्यक्तीचे स्वातंत्र्य व व्यक्तीचे मूलभूत हक्क बहुसंख्य जनतेच्या

दृष्टीने कागदावर रहातात आणि सत्तासंपत्ती असलेला एक टक्का वर्ग इतरांच्या शोषणासाठी मूलभूत हक्कांचा वापर करतो.

३) प्रॅक्टिकल सोशॅलिझम निखळ राष्ट्रवादी आहे. राष्ट्राची अभंगता, अखंडता याविरोधी फुटीर शक्तीना कठोरपणे नेस्तनाबूत केले पाहिजे असे मानणारा आहे.

- **'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' चा किमान कार्यक्रम –**

१) मक्तेदार औद्योगिक घराण्याचे उद्योगधद्यांतील सामान तत्काळ ताब्यात घेतले जाईल.

२) कुणाही व्यक्तीला एकापेक्षा अधिक औद्योगिक कंपन्याचे संचालक होण्यास बंदी केली जाईल. यामुळे मक्तेदारी निर्मितीच्या मुळावरच घाव पडेल.

३) सर्व शहरी जमिनीचे राष्ट्रीकरण केले जाईल. मोकळ्या जमिनीवर गरीब व मध्यमवर्गीय यांच्यासाठी गाळे बांधले जातील.

४) स्वतः आणि स्वतःचे कुटुंबीय यांच्यामार्फत जे कोणताही कामधंदा करतात त्यांना शासन जास्तीत जास्त सोयी सवलती देईल. यामुळे खाजगी प्रेरणेचा देशाला लाभ होईल आणि कुणाचेच शोषण होणार नाही.

५) धर्म हा घरापुरता आणि प्रार्थना स्थळांपुरताच मर्यादित केला जाईल.

६) समान नागरी कायदा अंमलात आणला जाईल.

७) शेतीविषयक सिलींग कायद्यातील पळवाटा बुजवून कायद्याची कठोर अंमलबजावणी केली जाईल आणि अतिरिक्त जमीन भूमिहीन शेतमजुरांना देण्यात येईल.

८) जीवनावश्यक अशा दहा वस्तू एकाच भावाने जनतेला पाच वर्षे पुरविल्या जातील. त्यासाठी त्या वस्तूंचे वाटप सरकार ताब्यात घेईल.

९) गुन्हेगाराला शासन झालेच पाहिजे या तत्वावर कायद्याची फेरचना केली जाईल.

१०) एक लाख रुपयांहून अधिक करविषयक थकबाकीची वसुली स्थगित करण्याचे तसेच बेकायदा कामे रितसर करण्याचे मंत्र्यांना व लोकप्रतिनिधींना असलेले डिस्क्रीशनरी म्हणजे स्वतःच्या विवेकबुध्दीने' अंतिम निर्णय घेण्याचे खास अधिकार (म्हणजे पैसे खाण्याचे अधिकार) रद्द केले जातील.

११) राष्ट्राची अखंडता अभंगता याविरोधी फुटीर शक्तीला नेस्तनाबुत केले जाईल.

१२) सर्वप्रथम दहावी पर्यंतचे शिक्षण मोफत व सक्तीचे केले जाईल.

हा किमान सुस्पष्ट कार्यक्रम अंमलात आणल्यास समाजवादाची मुहूर्तमेढ होईल. किमान कार्यक्रमासाठीच आणि त्यावरच जनतेची एकजुट बांधल्यामुळे–

१) नावापुरता समाजवाद सांगणारे बाजूला सरतील.

२) सैद्धांतिकवाद माजवून फाटाफूट करता येणार नाही आणि

३) किमान कार्मक्रम हाच हिरो बनून, सबगोलकारी व्यक्तिनिष्ठ राजकारणाला सुस्पष्ट पर्याय लोकांसमोर येईल.

हा कार्यक्रम सर्वकष नव्हे, अधिक तपशीलवार कार्यक्रम 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' या ग्रंथात यापूर्वीत दिला आहे. पण भारतात क्रांतिकारक बदल घडवून आणील आणि ९९ टक्क्यांचे राजकारण सुरु करील, असा हा कार्यक्रम आहे. त्यासाठी एवढाच कार्यक्रम मांडणारी आणि त्याचाच प्रचार करणारी एकच एक आघाडी स्थापन करावी, अशा आघाडीला प्रचंड पाठिंबा मिळेल. गोलमाल पाच दहा पक्षांच्या आघाडीला काहीच अर्थ नसून निश्चितपणे नेमके काय करणार ते सांगणारी आघाडी हाच आजचा ताबडतोबीचा तोडगा आहे. त्यातून प्रथम समाजवाद आणि त्यासमवेत संसदीय लोकशाही हे उद्दिष्ट साकार होऊ लागेल.''[२४]

थोडक्यात नीळकंठ खाडिलकर यांनी 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' अर्थात 'व्यवहारी समाजवाद' ही संकल्पना मांडून त्याद्वारे भारतातील लोकशाहीत एक टक्का लोकांचे हित साधले गेले असून ९९ टक्के लोक गरिबी, महागाई, अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, नोकरी इत्यादी गरजासाठी धडपडत आहे. हा भेदभाव दूर करण्यासाठी 'प्रॅक्टीकल सोशॉलिझम' कार्यक्रम भारतात अंमलात आणावा हे नीलकठं खाडिलकरांनी सांगितले आहे.

- **'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' आणि गिरणी कामगार –**

पूर्वीपासून नीळकंठ खाडिलकर गिरणीकामगारांचा प्रश्न मांडत आले होते. डॉ. दत्ता सामंत यांनी गिरणीकामगारांचा प्रदीर्घ संप केला त्याची बातमी 'नवाकाळ' मध्ये येत होती. गिरणी कामगारांत काय सुरू आहे हे समजावून घ्यावयाचे असेल तर 'नवाकाळ' शिवाय गत्यंतर नाही अशी परिस्थिती त्याकाळात होती.

'प्रॅक्टीकल सोशॅलिझम'द्वारे 'नवाकाळ' मधून खालील गिरणी कामगारांच्या मागण्या मांडण्यात आल्या होत्या

**''प्रॅक्टीकल सोशॅलिझम' ची सुस्पष्ट मागणी :–**

१) सर्व संपपूर्व गिरणी कामगारांना संपपूर्व हक्कांसह पुन्हा पूर्ववत कामावर घ्या.

२) जे निवृत्त झालेले आहेत किंवा ज्यांना यापुढे काम करण्याची इच्छा नाही त्यांची बुडविलेली सर्वच्या सर्व कायदेशीर देणी त्यांना त्वरित देऊन त्यांचा हिशोब पूर्ण करा.

३) आणि बंद गिरण्या चालू करा किंवा सरकारला देऊन टाका आणि सरकारने एका आजारी गिरणीबरोबर त्याच मालकाची फायद्यातील गिरणी किंवा कारखाना घेतला पाहिजे.या मागण्या प्रमुख आहेत.''[२५]

हा सर्व वृत्तांत 'गिरणीकामगार आणि प्रॅक्टीकल सोशॅलिझम' २ सप्टेंबर १९८६ च्या 'नवाकाळ' मध्ये आला आहे. सुस्पष्ट निश्चत मागणी असलेला कार्यक्रम हे .'प्रॅक्टीकल सोशॅलिझम'चे तत्वच आहे. वैशिष्ट्यच आहे.

**'प्रॅक्टीकल सोशॅलिझम गिरणीकामगार फोरम' :–**

'प्रॅक्टीकल सोशॅलिझम गिरणीकामगार फोरम' ची स्थापना मनोहर नरे यांनी केली. या संघटनेचा उद्देश गिरणीकामगार प्रश्न सोडविणे हा होता. त्यासाठी या संघटनेने गिरणी कामगारांचे हक्क त्यांना मिळवून दिले. गिरणीकामगारांचा फंड मिळवून दिला. त्यांना कामावर रूजू करून घेणे, त्यांची भरपाई देणे आदि गिरणी कामगारांचे प्रश्न सोडविण्याचे काम 'प्रॅक्टीकल सोशॅलिझाम गिरणी कामगार फोरम' करत होते. त्याबाबतची माहिती वेळोवेळी 'नवाकाळ' वृत्तपत्रातून प्रकाशित होत असे. तसेच 'नवाकाळ'चे संपादक नीळकंठ खाडिलकर यांनी या संघटनेच्या माध्यमातून गिरणी कामगारांसाठी मोलाची कामगिरी केली.

**गिरणी कामगारांच्या कायदेशीर थकित देणीबाबत नीळकंठ खाडिलकरांची यशस्वी कामगिरी पुढील:–**

''गिरणी कामागारांना खूष खबर भरपाई सकट कायदेशीर देणी द्या असे गिरणी मालकांना बोलवून मुख्यमंत्री सांगणार नीळकंठ खाडिलकरांची ५० मिनिटांची आनंदमय उपयुक्त चर्चा – महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना शंकरराव चव्हाण यांनी सांगितले की, गिरणी मालकांना तातडीने बोलावून घेऊन गिरणीकामगारांची थकविलेली कायदेशीर देणी नुकसान भरपाईसह द्यावी असे त्यांना मी सांगणार आहे.

श्रीनिवास गिरणीबाबत उद्या उच्च पातळीवरील बैठक घेऊन या प्रकरणांचा सांगोपांग विचार करण्याचेही मुख्यमंत्र्यांनी ठरविले असून जास्तीत जास्त कामगार घेण्याच्या दृष्टीने शर्थ करण्याचा ते प्रयत्न करणार आहेत. प्रॉव्हिडंट फंडाची थकबाकी देऊन टाकण्यास संबंधिताला सांगण्याचे आदेश मुख्यमंत्र्यानी दिले आहेत. मुख्यमंत्र्यानी सांगितले की, कामगारांना त्यांची फंडाची रक्कम मिळाली पाहिजे हे महत्वाचे आहे. म्हणून अकारण खटले करण्यात अर्थ नाही ते तुम्हाला पटेलच पण जर संबंधित कुचराई करतील तर तत्काळ कडक कारवाई सुरू करण्याचे आदेश मी दिले आहेत.''[२६]

थोडक्यात 'नवाकाळ'चे संपादक नीळकंठ खाडिलकरांनी गिरणी कामगारांसाठी योग्य न्याय मिळवून देण्यासाठी जे प्रयत्न सुरू केले होते. त्यास यश येत होते. मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी सुध्दा नीळकंठ खाडिलकरांशी चर्चा करून गिरणी कामगारांची कायदेशीर देणी देण्याचे आश्वासन दिले.

''गिरणी कामगाराचा महान विजय! मुख्यमंत्र्यानी गिरणी मालकांना आजच बोलविले! देणी देण्यासाठी ! –

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. शंकरराव चव्हाण यांनी जो शब्द दिला होता तो अवघ्या तीन दिवसांत त्यांनी खरा केला आहे! दोन लाख गिरणी कामगारांनचा महान विजय झाला आहे!

मुख्यमंत्री ना. शंकरराव चव्हाण यांनी शुक्रवारी रात्री ४५ मिनिटे 'नवाकाळ'चे संपादक नीळकंठ खाडिलकर यांच्याशी चर्चा करताना मान्य केले होते की, गिरणी मालकांना बोलावून

घेऊन गिरणी कामगारांची कायदेशीर देणी देऊन टाकण्यास त्यांना बजावतो. त्यानुसार ना. शंकरराव चव्हाण यांनी उद्या बुधवारी दुपारी ३ वाजता गिरणी मालक संघाचे अध्यक्ष सुधीर ठाकरसी आणि उपाध्यक्ष नसली एम. वाडीया तसेच गिरणीचे एक संचालक एन.एस. दिवेकर यांना कायदेशीर देणी देण्याबाबत बैठकीसाठी बोलविले आहे! गिरणीमालकांनी, गिरणीकामगारांची देणी द्या असे सांगण्यासाठी बैठकीत बोलविणारे पहिले मुख्यमंत्री म्हणजे ना. शंकरराव चव्हाण असे मान्य केले पाहिजे. कायदेशीर देणी किती आहेत ते निश्चित करण्याऱ्या कोतवाल कमिटीच्या सर्व सदस्यांनाही निमंत्रित केले आहे. त्यात मनोहर कोतवाल – भाई भोसले – जी. एल. रेडी हे आहेत.''[२७]

अर्थात नीळकंठ खाडिलकरांशी जी मुख्यमंत्र्याची चर्चा झाली ती अवघ्या तीन दिवसांत खरी झाली. गिरणीमालकांची बैठक बोलावून गिरणीकामगारांची कायदेशीर देणी देण्याचे नमूद केले.

''प्रॅक्टीकल सोशॅलिझम फोरमचा विक्रम! सर्व गिरणीमालक पळाले! गिरणीमालक संघाच्या ऑफिसातच क्रांतिकारक ठराव! – 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम गिरणीकामगार फोरम' ने आज गिरणी कामगार आंदोलनातील विक्रम केला! मुंबईचे सर्व अतिरथी महारथी गिरणीमालक आज गिरणीमालक संघाच्या ऑफिसात बैठकीसाठी ' एअरकण्डिशण्ड' हॉलमध्ये बसले आणि 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम फोरम' च्या बिनोच्या पथकाने गिरणीमालक संघाच्या ऑफिसात घुसून कबजा घेतला! मागोमाग आणखी तीन पथके घोषणा देत गेली. परिणामी गिरणीमालक चहा–बिस्किटे–काजू–५०१ सिगारेटचे टीन आदि टाकून मागील चोर दरवाजाने इमारतीच्या पिछाडीने पसार झाले!

तेव्हा 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' चा फलक फडकवून गिरणीमालकांच्या बैठकीच्या एअरकण्डिशण्ड सभागृहातच गिरणीकामगारांनी बैठक घेतली आणि चार क्रांतिकारक ठराव घोषणांच्या प्रचंड जल्लोषात संमत केले! गिरणीमालक संघाच्या ऑफिसातच सर्व खाजगी गिरण्यांच्या राष्ट्रीयकरणाचा तसेच भरपाईसकट सर्व कायदेशीर देणी देण्याचा ठराव करून 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' च्या कार्यकर्त्यांनी व कामगारांनी इतिहासच घडविला ! हक्काची देणी

न मिळाल्याने ज्यांची अमानुष उपासमार सुरू आहे. त्या कामगारांनी बिस्किटालाही हात लावला नाही! यामुळे नंतर आलेले पोलिस अधिकारीही थक्क झाले.

पोलिस अधिकाऱ्यांनी दोनशेहून अधिक आंदोलकांना अटक केली, पण व्हॅनची वाट न पाहता सर्वजण चालत पोलिस स्टेशनवर गेले. तेथे आंदोलकांनी सवाल विचारला की, ''तुम्ही कायदेशीर देणी बुडविणाऱ्यांना पकडले पाहिजे! देणी मागण्यासाठी आलेल्यांना कसे पकडता?'' यामुळे निरुत्तर होऊन अखेर सर्वांना मोकळे करण्यात आले.

सारा फोर्ट भाग आंदोलकांनी घोषणांनी निनादून टाकला आणि दोन लाख गिरणीकामगारांच्या प्रश्नाची हजारो लोकांना जाणिव करून दिली.

गिरणीमालक पळाल्यामुळे गिरणीकामगार त्यांच्या जागांवर स्थानापन्न झाले आणि नवीन गिरणीमालक संघ स्थापन करण्यात आला! मनोहर नरे अध्यक्ष आणि सुरेश नगर्सेकर उपाध्यक्ष अशी निवड करताच कामगारांनी आनंदाचा जल्लोष केला. या नव्या गिरणीमालक संघाने भरपाई सकट कायदेशीर देणी ताबडतोब देऊन टाका आणि पूर्वीचे कामगार पुनः कामावर घ्या असा आदेश गिरणीमालकासाठी जाहीर केला.

**चार क्रांतिकारक ठराव :-**

गिरणीमालक संघाच्या आफिसातील गिरणी मालकाच्या बैठकीच्या सभागृहातच गिरणीकामगारांनी जे क्रांतिकारक ठराव केले ते असे-

१) मुंबईच्या सर्व खाजगी गिरण्याचे १ मे १९८७ या कामगार दिनापासून राष्ट्रीयकरण करावे.

२) मुख्यमंत्री शंकरराव चव्हाणांच्या आदेशाचे तंतोतंत पालन करून कोतवाल कमिटीनूसार सर्व कायदेशीर देणी अधिक भरपाई पुढील आठवडयात गिरणीमालकांनी दिली पाहिजेत.

३) बंद असलेली श्रीनिवास गिरणी १ मे रोजी पूर्वीच्या सर्व कामगारांसह आणि ज्यांना भरपाईसह हिशोब हवा त्यांना हिशोब देऊन सुरू करण्यात यावे.

४) गिरण्यांच्या जमिनीवर सरकारी ऑफिसांसाठी इमारती बांधून त्यांच्या कोटयावधी रूपयांच्या भाडयातून सर्व गिरणीधंदा पध्दतशीरपणे सुसज्ज करावा.[२८]

थोडक्यात 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम फोरम' च्या माध्यमातून जो मोर्चा काढला तो अहिंसक असा होता. गिरणीकामगारांनी गिरणीमालक संघाच्या ऑफिसाचा ताबा घेऊन नविन गिरणीमालक संघ स्थापन करून कायदेशीर देणी देऊन कामगारांना पुन्हा कामावर घेण्याचे गिरणीमालकांना आदेश देण्यात आले.

**'प्रॅक्टीकल सोशॅलिझम फोरम' चा यशस्वी मोर्चा :–**

'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' ने गिरणीकामगार, माथाडी कामगार, आगरी सेना यांचा एकत्रित मोर्चा काढला. त्यांनी आपल्या मागण्या मान्य व्हाव्यात यासाठी अपूर्व असा प्रचंड मोर्चा दिनांक १७ जुलै १९८७ रोजी मुंबईत काढला होता. बोरीबंदर ते चर्चगेटपर्यंत या मोर्चामुळे वाहतुक बंद पडली होती. पण कोणता अनुचित प्रकार घडला नाही. याबाबत 'नवाकाळ' वृत्तपत्राने 'अपूर्व मोर्चा प्रचंड यशस्वी! शंकरराव प्रसन्न झाले' या मथळ्याने दि.१८ जुलै १९८७ रोजी बातमी प्रकाशित केली.

''आज माथाडी कामगार, गिरणीकामगार आणि आगरी सेना यांचा अपुर्व मोर्चा निघून तीन शक्तीच्या अफाट सामर्थ्याचे दर्शन झाले! महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. शंकरराव चव्हाण यांनी अधिकाऱ्याच्या ताफ्यासह एक तास मोर्चाच्या नेत्याशी चर्चा केली. आणि प्रसन्न झालेल्या शंकराने एकामागोमाग एक मागण्या मान्य केल्या.

संपग्रस्त गिरणीकामगारांच्या केसीसचा झटपट तीन महिन्यात निकाल व्हावा यासाठी स्पेशल कोर्ट नेमण्याचे निःसंदिग्धपणे मान्य केले! यामुळे मगरूर गिरणीमालकांना जबरदस्त धक्का बसणार आहे!''[२९]

अर्थात 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' चे कार्य फक्त गिरणी कामगारांपुरते नव्हते तर इतर क्षेत्रातील कामगारांसाठी सुध्दा होते. मोर्चानंतर अनेकांची भाषणे झाली. त्यामधील नीळकंठ खाडिलकरांचे भाषण पुढील–

''नीळकंठ खाडिलकरांनी चर्चेची फलनिष्पत्ती टाळ्याच्या कडकडाटात सांगितली. ते म्हणाले की, वसंतदादा शंकररावाबद्दल, शालिनीताई वसंतदादाबद्दल, रामराव आदिक शरद पवारांबद्दल आणि पाटील निलंगेकर आणखी कुणाबद्दल काय बोलतात त्या बातम्यांनी वृत्तपत्रे भरून जातात! (हंशा) पण या राजकारणाचा लोकांशी काय संबंध? उध्वस्त गिरणीकामगारांचे काय? बेघर माथाडी कामगारांचे काय? प्रकल्पग्रस्त आगरी समाजाचे काय? त्यांच्याबद्दल कुणी बोलतही नाही! असल्या सुभेदारी राजकारणाचा सुभेदारांखेरीज कोणाला फायदा? म्हणून हा विराट मोर्चा इशारा देत आहे की, शोषित व उपेक्षित कामगारवर्ग व दुर्बल समाज हाच यापुढे राजकारण ठरविल, मुख्यमंत्री कोण व्हावा व राहावा ते ठरविल आणि राजकारण जर त्यांच्यासाठी नसले तर उग्र संघर्ष करील!''[३०]

थोडक्यात 'प्रॅक्टीकल सोशॅलिझम' ची चळवळ उभी करून गिरणी कामगार, माथाडी कामगार आणि आगरी सेना यांना एकत्र आणण्याचे ऐतिहासिक काम नीळकंठ खाडिलकर यांनी केले. मुंबईमध्ये आजवर कधीही झाला नाही असा अभूतपूर्व मोर्चा निघाला. त्याचे खरे श्रेय नीळकंठ खाडिलकरांनाच आहे.

## ३.११ 'नवाकाळ' वृत्तपत्राची भरारी :–

### 'नवाकाळ' वृत्तपत्राचा गौरव :–

सन १९२३ साली काकासाहेब खाडिलकरांनी 'नवाकाळ' वृत्तपत्र स्थापन केले. त्यांची भरारी आज उंचावत आहे. 'नवाकाळ' वृत्तपत्राने नव्या 'प्लामाग स्टीरीओ रोटरी' यंत्र आपल्या छापखान्यात बसविली होती. त्यांच्या उद्‌घाटनासाठी अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये श्री. यशवंतराव चव्हाण, एसेम जोशी, डॉ. श्रीपाद डांगे आदि मान्यवरांचा समावेश होता.

'नवाकाळ' वाचकांची संख्या वाढत चालली होती. 'नवाकाळ'ची गुणवत्ता वाढल्याने संघटना कौशल्य हवे असा सल्ला श्री. यशवंतराव चव्हाण यांनी दिला. याबाबत विस्तृत विवेचन दिनांक १७ मे १९६७ रोजी 'चव्हाण–डांगे–जोशी त्रिमूर्तीचा 'नवाकाळ'ला आशीर्वाद' या मथळ्याच्या बातमीद्वारे प्रकाशित करण्यात आले.

''दैनिक 'नवाकाळ' ही महाराष्ट्राला स्वातंत्र्याच्या लढयात मिळालेली देणगी आहे ते आमचे श्रध्दास्थान आहे. सामान्य माणसाचा आवाज उठविण्याचे कै. काकासाहेबांपासून चालत आलेले कार्य 'नवाकाळ' ने असेच पुढे चालू ठेवावे ही आमची इच्छा आहे. 'नवाकाळ' खऱ्या अर्थाने जनतेची गाऱ्हाणी मांडण्याचे चौक ठरेल असा मला विश्वास आहे.'' असे उद्‌गार भारताचे गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी आज 'नवाकाळ' च्या नव्या 'प्लामाग स्टीरीओ रोटरी' यंत्राचे उद्‌घाटनानिमित्त झालेल्या समारंभात भाषण करताना काढले.

ना. चव्हाण पुढे म्हणाले 'नवाकाळ' हे महाराष्ट्रात देशभक्तीची ईषा निर्माण करण्याचे पीठ आहे. सामान्य जनतेच्या सुख दुःखाशी समरस होण्याचा धर्म पाळणारा दैनिक 'नवाकाळ' आहे. वृत्तपत्रांचा वाचक वर्ग आज वाढला आहे. केवळ संख्येने नव्हे तर गुणाने वाढला आहे. वृत्तपत्रांची जी यंत्रणा असते त्यात आता आधुनिकतेची नि संघटनेची गरज आहे. आप्पासाहेबांनी सांगितले की वाचक हाच खरा मालक आहे ते अगदी खरे आहे.

एसेम जोशी म्हणतात, ''नवाकाळ' ची परंपरा फार मोठी आहे. लोकशाही स्थिर करण्यासाठी समाजाला जागृत करण्याचे काम यापुढे ही 'नवाकाळ' ला करावयाचे आहे. स्वातंत्र्याच्या लढ्यात जे कार्य 'नवाकाळ' ने केले तेच कार्य नवसमाज निर्मितीसाठी ही 'नवाकाळ' करेल असा मला विश्वास वाटतो.

जे वृत्तपत्र समाजवादाचा पुरस्कार करते ते भांडवदाराचे नव्हे. कॉ. श्रीपाद डांगे यांचे 'नवाकाळ' विषयक विचार – वृत्तपत्र भांडवलदाराची आहे किंवा नाही हे त्याने त्या वृत्तपत्रांमध्ये भांडवल किती घातले आहे यावरून ठरत नाही. 'नवाकाळ' ने भांडवल मशिनमध्ये घातले म्हणून ते भांडवलदारी ठरत नाही. तसा आमचा पंचवीस लाखांचा प्रेस दिल्लीमध्ये आहे, परंतु त्या प्रेसमध्ये कम्युनिस्ट प्रचार साहित्य छापले जाते. तेव्हा वृत्तपत्र भांडवलदारी धोरणाचा पुरस्कार करते काय यावर ते वृत्तपत्र भांडवलदारी आहे किंवा नाही हे अवलंबून आहे, 'नवाकाळ' हे भांडवलदारी धोरणाचा कधीच पुरस्कार करणार नाही. याबद्दल मला खात्री आहे.''[३१]

अर्थात पारंतत्र्यात सुरू झालेले 'नवाकाळ' वृत्तपत्र आजही मोठया हिंमतीने समाजासाठी, देशासाठी महानकार्य करताना दिसून येत आहे. भांडवलशाहीस विरोध तर

लोकशाहीचा पुरस्कार 'नवाकाळ' वृत्तपत्राने केला. अनेक मान्यवर नेते समाजसुधारक सर्वसामान्य जनता 'नवाकाळ' वृत्तपत्राचा गौरव करत आहे.

**'नवाकाळ' वृत्तपत्राचा वाढता खप :-**

वाचकांच्या आशिर्वादामुळे 'नवाकाळ'चा खप मुंबईतच नव्हे तर संपुर्ण महाराष्ट्रात आज सर्वाधिक होत चालला होता मुंबईतील स्टॉलवर भांडवलशाही वृत्तपत्रांचा पराभव उघडा होत होता. वृत्तपत्राच्या खपाबाबत विविध वृत्तपत्रांचे खप जाहीर करणारा एबीसीचा एक ताजा अहवाल तयार झाला होता. त्यामध्ये लोकसत्तेने आपल्या खपाची आकडेवारीही एबीसीसाठी सादर केली होती. परंतु 'नवाकाळ' वृत्तपत्राने या खपाच्या आकडेवारीस कधीच मागे टाकले. 'नवाकाळ' वृत्तपत्रांचा खप वाढला याबाबत दि. ३ मे १९९२ रोजी २५ जिल्हयांत फक्त १७ हजार खप' लेखाद्वारे माहिती सादर केली.

''लोकसत्तेचे एक वर्षापूर्वीचे जानेवारी जूनचे एबीसी प्रमाणपत्र पहा (प्रमाणपत्र क्रमांक ८५/२४) या प्रमाणपत्रावरून स्पष्ट होते की, मुंबईच्या लोकसत्तेचा खप बृहमुंबई आणि ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग हे कोकणचे चार जिल्हे वगळता महाराष्ट्राच्या अन्य २५ जिल्हयांत एकूण फक्त १९२१३ आहे म्हणजे एका जिल्हयात एक हजारही खप नाही! अशी ही 'स्टेट लेव्हल' लोकसत्ता ना नॅशनल ना स्टेट,फक्त मुंबई-कोकणपुरता आहे!

लोकसत्तेचा एबीसी प्रमाणपत्रातील खप कोल्हापूर जिल्हयात फक्त १५७३ दाखविला आहे. कोल्हापुरचा 'पुढारी' 'सत्यवादी' यापुढे हा खप नगण्य आहे. सातारा जिल्हयात कराड ३३५, सातारा ६७५, यासह २२३१ खप आहे. म्हणजे सातारा जिल्हयांच्या 'ऐक्य'च्या खपापुढे केविलवाणा आहे. नांदेड जिल्हा ४५८, औरंगाबाद जिल्हा ७८५, मराठवाडयाच्या अन्य जिल्हयात ९८९! गोवा राज्यात ९००! बेळगावात व कर्नाटकात ९१०!

अशी ही 'नॅशनल लेव्हल' आणि स्टेट लेव्हल! जास्तीत जास्त पानांची रद्दी आणि जवळजवळ १०० गाडयातून रोजचे वितरण, एजंटांवर बक्षिसांची खैरात असा लक्षावधी रुपयांचा अफाट खर्च करूनही ही भांडवलशाहीची स्थिती आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' वरील खर्च तर डोळे फाटावेत असा आहे पण तरीही 'टाइम्स ऑफ इंडियाची' प्रचंड साधनसामुग्री हाताशी असूनही

या वृत्तपत्राचा खप कधीही सर्वाधिक झाला नाही. 'नवाकाळ'ने 'महाराष्ट्र टाइम्स' वर बृहन्मुंबईत ८० हजार अधिक खपाने केव्हाच मात केली. मागोमाग संपुर्ण महाराष्ट्र राज्यातील खपातही मागे टाकले.''[३२]

अर्थात 'नवाकाळ' वृत्तपत्राने 'लोकसत्ता', 'महाराष्ट्र टाइम्स', आदि भांडवलशाही वृत्तपत्रास मुंबई तसेच संपूर्ण महाराष्ट्रातही मागे टाकल्याचे स्पष्ट होते. या भांडवलशाही वृत्तपत्राकडे प्रचंड साधनसामुग्री, पैसा असून 'नवाकाळ' खप त्यांच्या पुढे गेला.

'नवाकाळ' वृत्तपत्रावर टीका करताना 'नवाकाळ'फक्त सलूनमध्ये दिसतो? या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी 'तुमची हजामत करायला सलूनमध्ये असतो!' या लेखाद्‌वारे'नवाकाळ' वृत्तपत्राने दिले ते पुढील 'नवाकाळ' चा स्टॉल, स्टॉलवर दिसणारा सर्वाधिक खप कमी करणे. जस जसे अशक्य झाले तसतसा भांडवलशाही खालील पत्रकारांनी व बुध्दिमंतानी वेगळाच पवित्रा काढला. ते म्हणाले की, 'नवाकाळ' सामान्य लोकांतच खपतो. सामान्य जनतेच्या वस्तीतच दिसतो.

यावर आमचा जबाब आहे की, ''सामान्यजनच नव्हे तर तुम्हीही 'नवाकाळ' वाचता! फरक इतकाच की सामान्य माणूस ऐटीत 'नवाकाळ' उघडून वाचतात! तुम्ही चोरून वाचता! ड्रायव्हर विकत घेऊन वाचतो तुम्ही त्याच्याकडून घेऊन फुकट वाचता!

'नवाकाळ' सलूनमध्ये दिसलाच पाहिजे कारण 'नवाकाळ'चे काम हजामत करण्याचे आहे! भांडवलदार, व्यापारी, भष्ट्र सत्ताधारी, नोकरशहा, समगलर, गुंड व गॅंगस्टर यांच्या एक टक्का वर्गाने काळ्या पैशाच्या हत्याराने समाजाला पिळले आहे व वेठीस धरले आहे.

आम्ही न्हावी आहोत व साबुहून ढोंगाची व सोंगाची गुळगुळीत हजामत या बुळबुळीत बुध्दिमंताची करतो.''[३३]

'नवाकाळ'चा खप इतर वृत्तपत्रांच्या तुलनेने वाढत चालला होता. तशी टीका वाढतच होती. त्यास 'नवाकाळ' वृत्तपत्राने हजर जबाबीने उत्तर दिले.

**भांडवलशाही वृत्तपत्रांचा ‘नवाकाळ’ कडून पराभव :–**

सुप्रसिध्द पत्रकार नारायणराव आठवले यांनी ‘नवाकाळ’ वृत्तपत्र भांडवलशाही वृत्तपत्रांचा शब्दांच्या सामर्थ्याने पराभव करते हे आपल्या भाषणामध्ये म्हणतात त्यांचा वृत्तांत ‘केवळ शब्द सामर्थ्याने शेठजी वृत्तपत्रांचा ‘नवाकाळ’ने पराभव केला! नारायण आठवले’ या मथळ्याने दिनांक १५ ऑगस्ट १९९३ रोजी प्रकाशित केला.

‘‘नवाकाळ’चे संपादक नीळकंठ खाडिलकर यांना काल एका समारंभात आचार्य अत्रे पुरस्कार देण्यात आला. तेव्हा आझाद मैदानावरील कॉंग्रेसचे भव्य सभागृह ही श्रोत्यांच्या गर्दीपुढे अपुरे पडले.

यावेळी सुप्रसिध्द पत्रकार नारायणराव आठवले म्हणाले की, स.का. पाटील यांचा पराभव मुंबईत होऊच शकत नाही. असे पूर्वी वातावरण होते. त्यावेळी जॉर्ज फर्नांडीस स.का. पाटील यांच्या विरुध्द उभे राहिले. तुम्ही पाटलांचा पराभव करू शकता. अशी त्यांनी पोस्टर लावली आणि खरोखरीच पाटलांचा पराभव ही अशक्य वाटणारी गोष्ट करून दाखविली. त्याहून मोठा चमत्कार नीळकंठ खाडिलकर यांनी घडविला. त्यांनी भांडवलशाही वृत्तपत्रांवर मात करतो असे आगाऊ जाहीर करून शेठजींच्या वृत्तपत्रांवर खपात सपशेल मागे टाकले. यामुळे स्वतंत्रपणे चालविल्या जाणाऱ्या मराठी वृत्तपत्रांना नवा हुरूप आला असून मराठी वृत्तपत्र सृष्टीतील फार मोठे बदल होतील.

‘नवाकाळ’ रात्रीच उपलब्ध होतो. मध्यरात्री ‘नवाकाळ’च्या अग्रलेखांची वाट पहाणारे शेकडो वाचक मी पाहिले आहेत. त्यांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीत जो खपाचा विक्रम केला तो शब्दकोडयाच्या साहाय्याने केला नाही. आमच्या स्पर्धेत भाग घेऊन आकर्षक इनामे मिळवा असलाही प्रकार केला नाही. निव्वळ शब्दांच्या सामर्थ्यावर मिळविलेला हा विजय आम्ही डोळ्यांनी पाहिला! जिद्द, ध्यास आणि अभ्यास या गुणांवर त्यांनी ही कामगिरी केली. आचार्य अत्रे यांच्या प्रचंड देहात जेवढे गुण व कर्तृत्व खाडिलकरांच्या लहान देहात भरले असे मी कोणत्याही अतिशय्योक्ती शिवाय म्हणतो.’’[३४]

पत्रकार नारायण आठवले यांनी 'नवाकाळ'च्या वाढत्या खपाबाबत म्हटले की, कोणत्या युक्त्या, बक्षिसे न देता केवळ शब्दसामर्थ्यावर 'नवाकाळ' ने भांडवलशाही वृत्तपत्रावर मात केली. नीळकंठ खाडिलकरांनी भांडवलशाही वृत्तपत्रावर मात करण्याची जिज्ञासा पुर्ण केल्याचे दिसते.

**'नवाकाळ'वृत्तपत्राचा भारतात पहिला क्रमांक :–**

'नवाकाळ' वृत्तपत्राने भारतात सर्व भाषिक वृत्तपत्रात पहिला क्रमांक मिळविला. दि. ३० ऑगस्ट १९९८ च्या ''मराठी माणसांची छातीफुगावी असा 'नवाकाळ'चा संपुर्ण भारतात विक्रम! लाल किल्ल्यावर भगवा' या लेखातून माहिती प्रकाशित केली ती पुढीलप्रमाणे –

''लक्षावधी मराठी वाचकांना व विक्रेत्यांना अमर्याद अभिमान वाटावा अशी घोषणा भारत सरकारने केली आहे! संपूर्ण महाराष्ट्रात १ कोटी वाचकवर्ग असलेल्या दैनिक 'नवाकाळ' चा संपुर्ण भारतात पहिला क्रमांक जाहीर झाला आहे!!!

बडे भांडवलदार अशोक जैन यांचा मुंबईतील व दिल्लीतील इंग्रजी 'टाईम्स ऑफ इंडिया' बिर्ला शेटजीचा दिल्लीतील इंग्रजी 'हिंदुस्तान टाईम्स' आणि 'अमृत बाजार पत्रिका' या इंग्रजी दैनिकाच्या साखळीतील बंगाली 'आनंद बाजार पत्रिका' ही वृत्तपत्रे वगळल्यावर मुंबईच्या 'नवाकाळ'चा खपात भारतात सर्वोच्च क्रमांक जाहीर झाला आहे! मराठी मालकीच्या, मराठी संपादकाच्या आणि मराठी वाचकवर्गाच्या दैनिक 'नवाकाळ'ने अटकेपारच नव्हे तर संपूर्ण भारतात सर्व भाषिक वृत्तपत्रांत पहिला क्रमांक पटकाविला आहे! १७० वर्षाच्या मराठी पत्रकारितेत हा विक्रम अपूर्व आहे! वृत्तपत्रांच्या इतिहासातील हे सोनेरी पान आहे! दैनिक 'नवाकाळ'ने महाराष्ट्राचा डौलात फडकविलेला हा भगवा ध्वजच आहे! तथापि आम्हाला याबद्दल किंचित अहंकार नाही! आम्ही खरोखरीच निमित्तमात्र आहोत! १ कोटी मराठी वाचकवर्गाने आणि मराठी, विक्रेत्यांनी मराठी माणसाचा लाल किल्ल्यावर फडकविलेला हा भगवा ध्वज आहे!! 'नवाकाळ' चार पानी होता तेव्हाचा हा विक्रम! आज 'नवाकाळ' आठ पानांचा आहे!!

मुंबईतील अन्य भांडवलदारी मराठी दैनिकांची साधने 'नवाकाळ' पेक्षा शंभर पटीनेच नव्हे तर त्याहून अधिक आहेत! तथापि अत्यल्प साधने असतानाहि मराठी माणसाच्या लेखणीने भांडवलदारांवर आणि काळ्यापैशावर केलेली ही मात आहे! मराठी माणसांची तलवार ही दिल्लीच्या रत्नजडित वैभवाची मिजास मिरविणाऱ्या मोगली शहेनशहापेक्षा श्रेष्ठ ठरली! मराठी माणसाची विविध क्षेत्रात पिछेहाट होत आहे आणि पुंजीपतीचे लाचार बुध्दिमंत मोठमोठयाने रडत ताजमहालमध्ये आणि ओबेरायमध्ये परिसंवाद घेत आहेत! दूरदर्शनचे कॅमेरे त्यांच्यावर रोखले जात आहेत! पण अखेर तलवार व लेखणी ही स्वतंत्र निर्भीड मराठी माणसाचीच! संपूर्ण महाराष्ट्राची छाती अभिमानाने फुगली ती याचसाठी !!!

आश्चर्य म्हणजे 'नवाकाळ' मुळे तथाकथित बुध्दिमंत आणि विचारवंत यांच्या कपडयाची इस्त्री बिघडते! पण अनेकदा वाचावाच लागतो 'नवाकाळ' अशावेळी पुंजीपती आणि त्यांचे अश्रित बुद्धिमंत व विचारवंत आपल्या आलिशान कारच्या ड्रायव्हरकडून 'नवाकाळ' मागून घेतात! मग 'टाईम्स ऑफ इंडिया' त 'नवाकाळ' आत धरून 'टाईम्स' उघडतात आणि 'नवाकाळ' वाचतात! कधी कधी त्यांच्याच साखळीतील 'महाराष्ट्र टाईम्स' व 'लोकसत्ता' वाचतात आणि त्यात 'नवाकाळ' टाकून वाचतात! ५० हाय! ('हायॅफाय' मधील हाय नव्हे)या दोनही वृत्तपत्रांचे नावही पहिल्या पन्नासात नाही! ही सारी घोषणा भारत सरकारने राज्यसभेत लेखी केली! आयएनएसने सदर उत्तरही आपल्या सदस्यांना पाठविले आहे !''[३५]

इतिहासात मराठयांनी अटकेपार आपला भगवाफडकविला होता. परंतु 'नवाकाळ'या मराठी वृत्तपत्राने तर संपुर्ण भारतावरच आपला भगवा फडकविण्याचे दिसून येते. १७० वर्षाच्या काळातील मराठी पत्रकारितील हा अदभूत असा विक्रम आहे. अनेक भांडवलशाही वृत्तपत्रे, राजकीय पाठबळ असलेले वृत्तपत्रे अशा विविध प्रकारच्या वृत्तपत्रावर मात करून 'नवाकाळ' वृत्तपत्राने आपल्या धारदार लेखणीद्वारे भारतात प्रथम क्रमांक मिळविला.

## ३.१२ सारांश

विसावे शतक हे सुरू झाले ते ब्रिटिश सत्तेच्या अंमलाखाली. परकीय सत्ता म्हटले की त्यांच्याकडून समाजाचे शोषणच होणार. ब्रिशिट राजवटीच्या काळात समाज बळी पडला तो मादक द्रव्याच्या व्यसनाला. अफू, भांग अशा वनस्पती उत्पादनाचा आग्रह ही सत्ता धरू लागली. त्यातून समाज दारूच्या व्यसनाला लागला. दारूबंदीसाठी महात्मा गांधी यांनी अथक प्रयत्न सुरू ठेवले. काकासाहेब खाडिलकरांनी सुद्धा आपल्या अग्रलेखातून दारूबंदीसाठी समाजप्रबोधन केले. स्वातंत्र्योत्तर काळातसुद्धा असेच प्रयत्न 'नवाकाळ' वृत्तपत्राचे सुरूच राहिले. पुढे काकासाहेब खाडिलकरांनी आपल्या प्रवचनातून वैदिक धर्मासारख्या विषयावर समाजप्रबोधन केले. गांधीजींचे विचारसुद्धा आपल्या प्रवचनातून मांडले. काकासाहेब खाडिलकरांनी समाजवर्गासाठी नाटके लिहून ते रंगभूमीवर गाजविलीसुद्धा.

'नवाकाळ' वृत्तपत्राने वृत्तपत्राच्या हक्कासाठी सतत प्रयत्न केले. गिरणी कामगारांसाठी निधी योजना सुरू केली. मुंबईतील घरांच्या समस्येबाबत वेळोवेळी शासनास भाडेकंरुच्या समस्या निदर्शनास आणल्या. झोपडपट्टी पुनर्वसनासाठी प्रयत्न केले.

प्रॅक्टिकल सोशॅलिझम ही तर 'नवाकाळ' वृत्तपत्राचीच संकल्पना. त्याच्या माध्यमातून भांडवलशाहीविरोधी भूमिका घेतली. गिरणी कामगार, माथाडी कामगार, आगरी सेना यांना त्यांचे हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला. 'नवाकाळ' वृत्तपत्राचे कार्य एवढे मोठे होते की त्याचा १९९८ साली भारतात पहिला क्रमांक आला.

## प्रकरण तिसरे

### तळटीपा:–

१) नवाकाळ, ३ जून १९२३.

२) नवाकाळ, २८ मार्च १९२५.

३) नवाकाळ, ३१ जानेवारी १९५३.

४) नवाकाळ, १४ एप्रिल १९५३.

५) नवाकाळ, ५ जून १९६७.

६) खाडिलकर, का.ह., 'देशभक्त कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांचे चरित्र', चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे, १९४९, पृष्ठ – ३१०,३११.

७) नवाकाळ, २३एप्रिल १९३६.

८) नवाकाळ,२२सप्टेंबर १९३६.

९) खाडिलकर, का.ह., 'देशभक्त कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांचे चरित्र', चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे, १९४९, पृष्ठ – ३११,३१२.

१०) खाडिलकर नी.य., 'नाट्याचार्यांची नाट्यकला', नवाकाळ प्रेस प्रकाशन, मुंबई, १९७३,पृष्ठ – ७२.

११) नवाकाळ,१२ मार्च १९८६.

१२) खाडिलकर नी.य., 'नाट्याचार्यांची नाट्यकला', नवाकाळ प्रेस प्रकाशन, मुंबई, १९७३, पृष्ठ – १६५.

१३) नवाकाळ,१८ फेब्रुवारी १९६३.

१४) नवाकाळ,९ जुलै १९८६.

१५) नवाकाळ,१७ नोव्हेंबर १९८७.

१६) नवाकाळ,१७ नोव्हेंबर १९८७.

१७) नवाकाळ,६ मे १९५८.

१८) नवाकाळ,७ मार्च १९६७.

१९) नवाकाळ,१४ मार्च १९६७.

२०) नवाकाळ,२४ जानेवारी १९७१.

२१) नवाकाळ,१८ मे १९८६.

२२) नवाकाळ २७ जुलै १९९५.

२३) खाडिलकर नी.य., ‘एक टक्का विरुद्ध ९९ टक्के’ (प्रॅक्टिकल सोशॅलिझम – भाग २), संबोधी प्रकाशन, मुंबई, १९८६, पृष्ठ – २४,२५.

२४) कित्ता . पृष्ठ – ३४,३६.

२५) नगर्सेकर सुरेश, ‘गिरणी कामगार आणि प्रॅक्टिकल सोशॅलिझम’,दैनिक नवाकाळ प्रकाशन, मुंबई, १९८६, पृष्ठ – ३.

२६) नवाकाळ,२७ फेब्रुवारी १९८७.

२७) नवाकाळ,९एप्रिल १९८७.

२८) नवाकाळ,२१ एप्रिल १९८७.

२९) नवाकाळ,१८ जुलै १९८७.

३०) नवाकाळ,१८ जुलै १९८७.

३१) नवाकाळ,१७ मे १९६७.

३२) नवाकाळ,३ मे १९९२.

३३) नवाकाळ,३ मे १९९२.

३४) नवाकाळ,१५ ऑगस्ट १९९३.

३५) नवाकाळ,३० ऑगस्ट १९९८.

# प्रकरण चौथे

# 'नवाकाळ' वृत्तपत्राचे आर्थिक कार्य

४.१ प्रस्तावना
४.२ चलन

४.३ स्वातंत्र्यपूर्व हिंदुस्तानातील बँका व उदयोगधंदे

४.४ मिठावरील करविषयक नवाकाळ वृत्तपत्राचे विचार

४.५ ब्रिटीशांकडून हिंदुस्थानचे आर्थिक शोषण

४.६ ब्रिटीश राज्यातील शहरे व खेडीपाडी

४.७ भारताची लोक संख्या वाढ

४.८ दुष्काळ

४.९ अन्नटंचाई व अन्नविषयक धोरण

४.१० ग्रामीण विकास

४.११ भूदान चळवळविषयी 'नवाकाळ' चे विचार

४.१२ भ्रष्टाचार विरोधी 'नवाकाळ'ची भूमिका

४.१३ मुंबई गिरणी कामगारांच्या चळवळी

४.१४ सारांश

# प्रकरण चौथे

# ‘नवाकाळ’ वृत्तपत्राचे आर्थिक कार्य

## ४.१ प्रस्तावना :–

भारतीय अर्थव्यवस्था तीन कालखंडात विभागता येते. १७ व्या शतकापर्यंतचा काळ, स्वातंत्र्यपूर्व ब्रिटिशांच्या राजवटीचा कालखंड आणि स्वातंत्र्योत्तर कालखंड होय.

भारत देश सोन्याने समृद्ध होता ते सोने ब्रिटिशांनी आपल्या देशात नेण्यासाठी चलन पद्धतीत बदल करून सोन्याची लूट केली. हिंदुस्थानचे आर्थिक शोषण केले. कच्चा माल आपल्या देशात नेऊन त्याच्या पक्कामालाच्या विक्रीसाठी हिंदुस्थानास एक मोठी बाजारपेठ बनविली. या ब्रिटिशांच्या धोरणावर ‘नवाकाळ’ वृत्तपत्र वेळोवेळी आपल्या अग्रलेखांतून, बातम्यांतून समाजासमोर मांडत.

स्वातंत्र्यपूर्व तसेच स्वातंत्र्योत्तर कालखंडात औद्योगिक क्षेत्रातील कामगारांच्या प्रश्नावर नेहमीच आपली अग्रेसर भूमिका ‘नवाकाळ’ने बजावली. लोकसंख्या वाढ, अन्नटंचाई, महागाई, दुष्काळ तसेच भ्रष्टाचार यासारखे गंभीर विषय व त्यामुळे उद्‌भवणाऱ्या गंभीर समस्या ‘नवाकाळ’ वृत्तपत्राने समाजासमोर मांडल्या. अनेक वेळा आर्थिक विषयावर अग्रलेख लिहून सरकारचे लक्ष वेधले.

सदर प्रकरणात आर्थिक कार्याचा आढावा घेताना स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळ या दोन भागातील विविध आर्थिक बाबींचा समावेश केला आहे.

## ४.२ चलन :–

### भारतातील सुवर्णविनिमय पध्दती :–

‘‘भारतात १९०८ च्या सुमारास सुवर्ण विनिमय पध्दती अस्तित्वात आली. भारतीय चलनात रुपये आणि कागदी चलन यांचा समावेश झालेला होता. अंतर्गत व्यवहारात सोन्याचा वापर नव्हता. आंतरराष्ट्रीय व्यवहारात भारतीय रुपयाला एक शिलिंग चार पेन्स या दराने

स्टर्लिंग चलन दिले जात होते. स्टर्लिंगचे रूपांतर सोन्यात केले जाई; म्हणजे भारतीय रुपयाचे रूपांतर अप्रत्यक्षरीत्या सोन्यात केल्यासारखे होते. भारतीय चलनाचे सुवर्णात रूपांतर करणे सुलभ व्हावे म्हणून लंडनमध्ये निरनिराळे निधी ठेवण्यात आलेले होते. भारतात सोन्याची आयात होऊ द्यावयाची नाही, भारतीय चलनाला आधारभूत असलेले सोने इंग्लंडमध्ये न्यावयाचे व त्या सोन्याचा उपयोग इंग्लंडचे उद्योगधंदे आणि व्यापार यांच्या वाढीसाठी होऊ द्यावयाचा, असे ब्रिटिश सरकारचे धोरण होते. सुवर्णविनिमय पध्दती १९१७ पर्यंत सुरळीपणे चालू होती. पहिले महायुध्द सुरू होताच चांदीची किंमत वाढली आणि परिणामी रुपयाचे मूल्यही वाढले. सरकारला एक रुपया–एक शिलिंग चार पेन्स हा विनिमय दर स्थिर ठेवणे कठीण होऊ लागले. १९२० च्या फेब्रुवारीत तर हा दर एक रुपया–दोन शिलिंग अकरा पेन्स झाला. त्यामुळे सुवर्णविनिमय पध्दती ढासळली.''[१]

'नवाकाळ' वृत्तपत्रातून काकासाहेब खाडिलकरांनी दिनांक २९ मे १९२५ रोजीच्या 'सोन्याचे नाणे' या अग्रलेखात सोन्याच्या नाण्याचं महत्त्व सांगितलं ते पुढीलप्रमाणे–

''इंग्लंडात सांप्रत कागदी नोटांबरोबरच सोन्याचे नाणे सुरू झाले आहे. हिंदुस्थानात रुपया व सरकारी नोटा सुरू आहेत. त्याऐवजी इंग्लंडप्रमाणे सोन्याचे नाणे हिंदुस्थानात ताबडतोब सुरू करा, असे सर पुरुषोत्तमदास सुरदास व मुंबईचे हिंदी व्यापारी मंडळ यांचे म्हणणे आहे. मुंबईच्या टांकसाळीत सोन्याचे नाणे पाडण्यात येत नाही. एक रुपयाला एक शिलिंग सहा पेन्स हा हुंडणावळीचा भाव कायम आला. जितके रुपये टांकसाळीत नेऊन दिले, त्यातील त्या मानाने सोन्याची नाणी पाडून दिली पाहिजेत, एरव्ही व्यवहाराला लागणारा रुपयांचा किंवा पैशांचा पुरवठा होणार नाही, असे व्यापारी मंडळाचे म्हणणे आहे. इंग्लंडात रुपयाचे नाणे सर्रास सुरू झाल्यामुळे इतक्या पैशाला इतके औंस निव्वळ सोने असा सरकारी तिजोरीचा भाव मुक्रर झाला आहे. कागदी नोट आणि सोने यांचा भाव मुक्रर झाला आहे, त्याप्रमाणे शिलिंग रुपये यांच्या हुंडणावळीचा भाव सरकारने मुक्रर केल्यानंतर टांकसाळीत इतक्या रुपया एक सॉव्हरिन, असा भाव मुक्रर करून सोन्याचे नाणे पाडून देण्यास सुरुवात झाल्यावर दागिन्यांना व इतर पदार्थांना जरूर तेवढेच सोने व्यापारी इंग्लंडातून हिंदुस्थानात आणतील आणि इंग्लंडातून हिंदुस्थानात ते बाकी राहिलेले पैसे आणावयाचे त्याऐवजी हिंदुस्थानच्या टांकसाळीतूनच रुपयाची नाणी घेण्याचा प्रघात पडेल. आता असे समजू की,

हिंदुस्थानातून युरोपकडे गेलेला माल आणि युरोप खंडातून हिंदुस्थानकडे आलेला माल हयांच्या किंमतीची सलगी करिता, हिंदुस्थानात शंभर कोट रुपये मिळावयास पाहिजे. या शंभर कोटी खंडणीच्या स्वरूपाने जे चाळीस कोट रुपये हिंदुस्थानातून इंग्लंडकडे विनामोबदल्याशिवाय जातात, ते सरकारकडे पाठवीत असते. सदर रुपये सरकारकडे पाठविले असता त्यांच्याऐवजी माल विकणाऱ्या लोकांच्या हातावर हल्ली रुपये किंवा कागदी नोटा ठेवण्यात येतात. त्यांच्याऐवजी सोन्याचीच नाणी व्यापारी मागतील हे उघड आहे. शिवाय बाकी राहिलेल्या पन्नास कोटींचे स्वतः सोने न आणविता दागिन्यांच्या व पदार्थांच्या मागणीप्रमाणे सोन्याच्या चीपा आणवून बाकीचे पाच–पंचवीस कोट रुपये सोन्याच्या नाण्यात आमच्या हवाली करा. अशीही व्यापाऱ्यांची टांकसाळीस मागणी होईल. म्हणजे सरकारला सोन्याच्या नाण्याच्या टांकसाळीकरिता दरसाल अतिशय सोने खरेदी करावे लागेल आणि ठरावीक मर्यादेच्या खाली हुंडणावळीचा भाव आल्यास सोन्याच्या नाणे आणीत सरकारचे नुकसान होईल. एक शिलिंग सहा पेन्स म्हणजे एक रुपया, असा हुंडणावळीचा भाव जर कायद्याने कायम केला आणि प्रत्यक्ष व्यापाराचे व्यवहारात एक रुपयाला एक शिलिंग चार पेन्स मिळू लागले तर कसे? दर रुपयामागे दोन पेन्स कमी हेतील आणि दोन पेन्सचे तितकेच सोने कमी आल्यामुळे एक शिलिंग सहा पेन्सच्या भावाला अनुसरून तेरा किंवा साडेतेरा रुपयाला एक सॉव्हरिन हिंदुस्थानच्या टांकसाळीतून देणे सरकारला नुकसानीचे होऊन बसेल. या नुकसानीच्या तक्रारीसंबंधाने व्यापारी मंडळाचे असे म्हणणे आहे की, सोन्याचेच नाणे मुख्य करून टाका आणि रुपयांत व्यवहार न चालता सोन्याच्या नाण्यातच व्यवहार ठेवण्याचा कायदा पास करा. सोन्याचे नाणे सुरू करण्यास सांप्रत फार अनुकूल वेळ आहे. सोन्याचे नाणे एकदा सुरू झाले म्हणजे रुपयाची किंमत व सोन्याची किंमत यांच्यातील चलविचलीमुळे हुंडणावळीच्या भावात जो फरक पडतो, तो फरक पडण्याचे कारणच पडणार नाही. कागदी नोटांच्या योग्य व्यवहाराकरिता जी सोन्याची शिल्लक सांप्रत विलायतेस नेऊन ठेवली आहे. ती शिल्लक हिंदुस्थांनात आणली म्हणजे सोन्याच्या नाण्याची टांकसाळ हिंदुस्थांनात सुरू करण्यात मुळीच अडचण पडणार नाही. सोन्याची गंगाजळी इंग्लंडातून हिंदुस्थांनात कशी आणावयाची? अडचण आहे ती येथेच आहे. हिंदुस्थानची सोन्याची गंगाजळी विलायतेस बँकेमध्ये ठेवून त्या गंगाजळीच्या पतीवर विलायत सरकार करोडो रुपयांचा व्यवहार करीत

असते. या व्यवहारातील फायदा सोडण्यास विलायत सरकार कसे तयार होतात?''[२]

थोडक्यात इंग्लंडप्रमाणे हिंदुस्थांनात रुपया व सरकारी नोटांऐवजी सोन्याची नाणी चलनात सुरू करावी.

## भारतातून परदेशी सोन्याची निर्यात :–

''इंग्लंडमध्ये सोन्याची किंमत एकसारखी वाढत होती. अशा परिस्थितीत सोन्याच्या व्यवहारात भरमसाट नफा मिळण्याची शक्यता निर्माण झाली. भारतातील सोने विकणारे व्यापारी कमी भावात सोने खरेदी करून ते इंग्लंडला पाठवून भरमसाट फायदा मिळवू लागले. या काळात भारताची निर्यात घटून ती आयातीपेक्षा कमी झाली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराचा ताळेबंद भारताला प्रतिकूल झाला. तूट भरून काढण्यासाठी सोने मोठ्या प्रमाणावर परदेशी जाऊ लागले.''[३]

हिंदुस्थानातील सोने मोठ्या प्रमाणात परदेशी जाऊ लागले. तसेच ब्रिटिशांचा माल खरेदी करणे असा डाव ब्रिटिशांचा होता तो 'नवाकाळ' वृत्तपत्राने दिनांक २७ सप्टेंबर १९३१ च्या 'सोन्याचा दुरंगी डाव' या अग्रलेखातून मांडला.

''हिंदुस्थानातील सोन्याच्या परराष्ट्रीय व्यवहारावर केवळ ब्रिटिश सत्तेचे जु लादून आणि हिंदी रुपयाला ब्रिटिश पौंडाचा फास चढवून, ब्रिटिश नोकरशाहीला दोन डाव साधावयाचे आहेत. रोडावलेल्या ब्रिटिश तिजोरीची हिंदुस्थानातील सुवर्णाने भर करावयाची हा पहिला डाव आणि इतर राष्ट्रांच्या दृष्टीने हिंदी रुपयाची सोन्याच्या हिशोबाने किंमत उतरवून फक्त ब्रिटिश माल घेणेच किंमतीचे मानाने हिंदुस्थानाला हितावह असेल अशी व्यामोहाची परिस्थिती उत्पन्न करणे हा दुसरा डाव. यापैकी पहिला डाव हिंदुस्थानातील तज्ञ पुढाऱ्यांनी आणि त्यांच्यामार्फत बहुजन समाजाने ओळखला असून त्याचा सार्वत्रिक जोराचा निषेध होत आहे. संकटे ही केव्हा केव्हा उपयोगी होत असतात. तसाच प्रकार लाट साहेबांच्या ७ व्या ऑर्डिनन्सचे बाबतीत आला आहे. लाट साहेबांनी ६ वे ऑर्डिनन्स काढले आणि सुवर्णविक्रीच्या कायदेशीर सक्तीपासून सरकारच्या चलनी व्यवहाराला तात्पुरते मुक्त केले. त्या वेळी बडे लाट लॉर्ड विलिंग्डन व फडणवीस सर जॉर्ज शुस्टर यांच्या पुढे फक्त हिंदुस्थानच्या कल्याणाचीच दृष्टी होती; परंतु मध्यंतरी स्टेट सेक्रेटरीच्या व्हाईटहॉलची सासू सिमल्यातील सुनेच्या जारीने बोकांडी बसली

आणि तिच्या जाचामुळे सिमल्याच्या सुनेला सातवे ऑर्डिनन्स जाहीर करावे लागले! ब्रिटिश सत्ताधारी, ब्रिटिश व्यापारी व ब्रिटिश भांडवलवाले यांच्या तंत्राने हिंदुस्थानातील सुवर्णाची हालचाल कशी होईल, या काळजी व्यतिरिक्त सातव्या ऑर्डिनन्सचा दुसरा कोणताही हेतू दिसत नाही. व्हाईटहॉलच्या सासूच्या जुलमांविरुध्द कोणत्याही कोर्टात फिर्याद चालणार नाही किंवा कोणताही कायदेशीर इलाज करता येणार नाही. अशी जाहीर घोषणा या ऑर्डिनन्सच्या एका कलमात करण्यात आली आहे. सुवर्णाच्या खरेदी–विक्रीचा व्यवहार ब्रिटिशांच्या हितसंबंधाची जपणूक करणाऱ्याच्याच नेमका हाती कसा राहील, याची व्यवस्थित तरतूद या आर्डिनन्सने केली आहे. मुंबई–कलकत्त्याच्या एतद्देशीय व्यापारी संस्थांनी हिंदी सोन्याच्या लुटीची चिथावणी देणाऱ्या या ऑर्डिनन्सचा तीव्र निषेध केला असून, असल्या तीव्र निषेधाचे संदेश सिमल्यास व्हाईटहॉलकडे रवाना झाले आहेत. ''[४]

थोडक्यात परदेशी सोने पाठविणे व ब्रिटिशांचा माल खरेदी करणे यासाठी सातवे ऑर्डिनन्स जाहीर करून त्यातून सोन्याच्या खरेदी–विक्रीचा व्यवहार ब्रिटिशांच्या हाती कसा राहील, याचीच तरतूद केली होती.

**कागदी नोटांचा चलनात समावेश :–**

दुसऱ्या महायुध्द काळात नाण्याऐवजी कागदी नोटा चलनात आणल्या; परंतु हिंदुस्थानातील जनतेने नाण्यास महत्त्व दिले. त्याचा संचय करू लागले. त्यातून त्या नाण्याची लूट होऊ लागली याबाबतची माहिती 'नवाकाळ' वृत्तपत्राने दिनांक २ ऑगस्ट १९४० च्या 'हिंदुस्थानांतील चलनाची परिस्थिती' या अग्रलेखात मांडली.

''मे महिन्यात हॉलंड–बेल्जियमवर धडाडीचे आक्रमण करून जर्मन सैन्य उत्तरेस फ्रेंच किनाऱ्यावर येऊन टाकले आणि दक्षिणेस पॅरिसच्या रोखाने इतक्या झपाट्याने गेले की जगात प्रलयकाळच ओढवला आहे. सुमेरू आणि आल्पस् आंदोलित होत आहेत. नक्षत्रांचा सडा होत आहे आणि समुद्रांनी आपल्या बैठका सोडल्या आहेत, असेच जणू काय झाले आहे, अशी लोकांची भयभीत स्थिती पाहून वाटत होते. विशेषतः प्रलयकालाच्या आखुडणाऱ्या अस्मानाचे प्रतिबिंब ज्यांच्या हातात पैसा विपुलतेने मिळत असतो. त्यांच्या नेत्रात पडलेले दिसत होते. कागदापेक्षा नाणे बरे, कागद अनित्य, नाणे नित्य, कागद हा देह, नाणे हा आत्मा अशा कल्पनेने कागदाचा त्याग हा देह, नाणे हा आत्मा अशा कल्पनेने कागदाचा त्याग आणि

नाण्यांचा संग्रह या लोकांनी केला. काही लोकांनी हा संग्रह पेट्यामध्येच ठेवला तर काही लोकांनी तो जमिनीत पुरला; परंतु नाण्यांची ही हालचाल त्यांच्या पातळीवर असलेल्या लोकांच्या नजरेत आली आणि भूमिगत द्रव्य हे या दिवसांत सुरक्षित नसते, असा अनुभव त्यांनी संग्राहकांना लवकरच आणून दिला. आग्र्यामध्ये एका धनिकाने बँकेतून आपले पैसे काढले, नाण्यामध्ये त्याचे रूपांतर केले व इतर दागदागिन्यासह रात्रीच्या वेळी आपल्या घराच्या परसात ते पुरले. एक रात्रही या गोष्टीला उलटली नाही तोच चोरांच्या हातात ती सर्व संपत्ती गेली. दुसऱ्या एका इसमाने आपली पोस्टल सर्टिफिकेट वठविली व त्या पैशांचे नाणे जमा केले आणि ते जमिनीत पुरण्याचा त्याचा संकल्प होता. परंतु तो संकल्प अंमलात येण्यापूर्वीच दरोडेखोरांनी त्याला निष्कांचन करून टाकले. उत्तर हिंदुस्थानात असा अनुभव मे व जून महिन्यात अनेक वेळा आला. नाणे आणि नोटा यांचा दर्जा साधारणपणे समान असतो. किंबहुना नाण्याला रुपेरी नोटा असेही म्हणतात. दोघांच्या मूल्याचा आधार स्वयंभू नसून त्यावर जो शिक्का व सही असते, तोच होय. त्या शिक्क्याला व सहीला लोक जोपर्यंत मान्यता देतात व व्यवहारात त्याचा उपयोग करण्यास तयार असतात, तोपर्यंतच त्याला 'चलन' ही संज्ञा प्राप्त होते. चलन म्हणजे सोय आणि चलनाचा प्राण पत होय. पतच जर गेली तर नोटा काय आणि नाणे काय दोन्ही निरुपयोगी होतात. ''[५]

थोडक्यात नाणे अथवा नोटा यावरील सही व शिक्क्याला लोक जोपर्यंत मान्यता देतील तोपर्यंत ते चलन असेल. या चलनाचा व्यवहारात उपयोग करावा. नाण्याचा संचय झाला तर त्यावर प्रथम टोळधाड पडेल, असे मत 'नवाकाळ' वृत्तपत्राने मांडले.

**रुपयाची मूल्यकपात :-**

''पौंडाचे १९४९ मध्ये अवमूल्यन झाले. भारताचे हितसंबंध स्टर्लिंग देशांशी निगडित असल्याने भारतालाही रुपयाचे अवमूल्यन करणे भाग पडले. ब्रिटनने १८ सप्टेंबर १९४९ पौंडाचे ३०.५ टक्क्यांनी अवमूल्यन केले. दोन दिवसांनी भारताने रुपयाचे तेवढ्याच प्रमाणात अवमूल्यन केले. त्यामुळे रुपया व स्टर्लिंग यामधील विनिमय दर कायम राहिला. या अवमूल्यनाचा भारताला फारसा फायदा झाला नाही. त्यामुळे रुपयाचे पुनर्मूल्यन करण्याची मागणी अनेक अर्थशास्त्रज्ञांनी केली होती.''[६]

सन १९४९ मध्ये पौंडाचे अवमूल्यन झाल्याने रुपयाची ही मूल्यकपात करण्यात आली.

याबाबत ‘नवाकाळ’ वृत्तपत्राने दिनांक, २२ सप्टेंबर १९४९ च्या ‘रुपयाची मूल्यकपात आणि तिचे परिणाम’ या अग्रलेखात पुढील विवेचन केले.

‘‘ब्रिटिश पौंडाची मूल्यकपात झाल्यावर हिंदी रुपयाचीही मूल्यकपात का करावी लागली यासंबंधी हिंदी अर्थमंत्र्यांच्या कचेरीने एका पत्रकाद्वारे मंगळवारी खुलासा केला आहे. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी मंगळवार रात्रीच्या आपल्या नभोवाणीवरील भाषणात त्याचा अधिक स्पष्ट खुलासा केला असून, रुपयाच्या मूल्यकपातीच्या परिणामी हिंदी जनतेच्या राहणीच्या निर्देशांकात यत्किंचितही फरक पडणार नाही, असा दिलासा दिला आहे. हिंदी रुपयाच्या मूल्यकपातीची बातमी ऐकताच अनेक तथाकथित तज्ज्ञांनी हिंदी सरकारच्या या निर्णयावर टीका केली आहे. काहींच्या मते हिंदी सरकारला रुपयाची डॉलरच्या प्रमाणात किंमत कमी करण्याची काही आवश्यकता नव्हती तर दुसऱ्यांच्या मते रुपयाची किंमत पौंड व रुपया यांच्यातील दर कायम राहील अशा प्रकारे कमी करण्याची जरूरी नव्हती. ती अधिक कमी केली असती तरी चालले असते. पाकिस्तानने डॉलरच्या प्रमाणात आपल्या रुपयाची किंमत कमी केली नाही. इतकेच नव्हे तर ब्रिटिश स्टर्लिंग व हिंदी रुपया यांच्या प्रमाणात ती अधिक वाढविली. पाकिस्तानच्या या उलट्या धोरणामुळे पहिल्या प्रकारच्या आक्षेपकांच्या टीकेला अधिक धार यावी यात आश्चर्य नाही. पं. जवाहरलाल नेहरू यांनी आपल्या भाषणात म्हटल्याप्रमाणे रुपयाची मूल्यकपात ही अत्यंत महत्त्वाची घटना असून तिच्या आवश्यकतेचे व इष्टनिष्ठतेचे स्वरूप हिंदी जनतेने समजून घेणे अगत्याचे आहे.

रुपयाच्या मूल्यकपातीचा अर्थ समजून घेण्यासाठी ब्रिटनने पौंडाची मूल्यकपात का केली आणि सर्वसाधारणतः राष्ट्र आपल्या चलनाची मूल्यकपात करण्याला का प्रवृत्त होतात यासंबंधाचा विचार होणे अपरिहार्य आहे. चलन दुर्लभ (डॉलर) गटातून माल आयात करण्याखेरीज ब्रिटनला गत्यंतर नाही आणि ती आयात इतक्या मोठ्या प्रमाणात करावी लागते की, मार्शल योजनेप्रमाणे मिळणारे सगळे डॉलर खाऊनही ब्रिटनच्या अमेरिकेकडील निर्यातीहून ती आयात किती तरी अधिक होते. त्या प्रमाणात ब्रिटनचा माल चलन दुर्लभ गटात खपत नाही आणि ब्रिटनचे त्या गटातील राष्ट्रांच्या व्यापाराचे प्रमाण व्यस्त पडते. ब्रिटनच्या डॉलर तुटीचे हे कारण अधिक विस्तार करून सांगण्याचे प्रयोजन नाही. भारताची अमेरिका आणि इतर चलन दुर्लभ देश यांच्या संबंधात ब्रिटनइतकी बिकट परिस्थिती नाही. पण ब्रिटनप्रमाणेच मार्शल

योजनेतील सर्वच राष्ट्रांची परिस्थिती तशी असल्यामुळे त्या सर्वच राष्ट्रांनी आपापल्या चलनाची किंमत डॉलरच्या प्रमाणात कमी केलेली आहे. हिंदची निर्यात अमेरिकेत विशेष जात नसली तरी या सर्व राष्ट्रांशी भारताची निर्यात बऱ्याच प्रमाणात आहे. भारताने डॉलरच्या प्रमाणात रुपयाची किंमत कमी केली नसती तर वरील सर्वच राष्ट्रातील भारताचा निर्यात व्यापार सर्वस्वी संपुष्टात आला असता आणि त्यामुळे भारताचे आयात–निर्यातीचे प्रमाण सध्या आहे. त्याहूनही किती तरी अधिक व्यस्त झाले असते आणि या आयात–निर्यातीच्या परिणामी भारतावर व्यापारी दिवाळखोरीचा प्रसंग ओढवला असता. जी स्थिती आज अमेरिकेच्या संबंधात ब्रिटनची घडते तीच उद्या मार्शल योजनेतील सर्व राष्ट्रांच्या संबंधात भारताची दृष्टीस पडली असती. ब्रिटिश पौंडाची मूल्यकपात होताच रुपयाचीही मूल्यकपात का करावी लागली ते यावरून स्पष्ट होणारे आहे. ''[७]

थोडक्यात रुपयाची मूल्यकपात झाली त्यावर अनेकांनी टीका केली परंतु भारताची निर्यात अनेक राष्ट्रांशी होती ती सर्वस्वी संपुष्टात आली असती. तसेच आयात–निर्यात प्रमाणात अधिक व्यस्तता आली असती.

## ४.३ स्वातंत्र्यपूर्व हिंदुस्तानातील बँका व उदयोगधंदे :–

हिंदुस्थानात स्वातंत्रपूर्व काळात बँका होत्या. परंतु त्यांचे देशांतल्या उद्योगधंद्यांना हवे तेवढे साहय होत नव्हते. परदेशी बँकाही हिंदुस्थानात होत्या परंतु त्या परकीय उद्योगधंद्यांनाच भांडवल पुरवित होत्या. त्यामुळे हिंदुस्थानात उद्योगधंद्यात वाढ होत नव्हती. हिंदुस्थानचा व्यापार उद्योगधंदे वाढीस लागावे यासाठी 'नवाकाळ' वृत्तपत्राने दिनांक २३ मार्च १९२३ च्या 'हिंदुस्थानातील बँका व उद्योगधंदे' या अग्रलेखातून विचार मांडले.

''देशातल्या उद्योगधंद्याना मदत करता यावी हा एक बँक स्थापना करण्यातला हेतु असतो. हिंदुस्थानात निवळ हिंदी अशा एकूण ६५ बँका आहेत, राष्ट्र राष्ट्रात आर्थिक देवघेवीचा व्यवहार करणाऱ्या परदेशी भांडवलावर उभारलेल्या बँका एकंदर १७ आहेत. शिवाय इंपीरियल बँक ऑफ इंडिया वेगळी बँक आहेच व तिच्यातच पूर्वीच्या प्रांतिक बँकांचा समावेश झाला आहे. इंपीरियल बँकेचे भांडवल १९२१ साली ५ कोटी, ६२ लाख २४०० रुपये होते. त्यावर्षी रिझर्व फंडाची रक्कम ४,१४,५४,000/– एवढी होती. लोकांच्या खासगी व सार्वजनिक ठेवी

हिशोबांनी घेतल्यास त्यांच्या रक्कमा अनुक्रमे ६५,७७,९९००० व ६,८०,०१,००० अशा सांगता येईल. १९२० च्या मानाने हे आकडे कमी आहेत. हिंदुस्थानांतल्या परदेशी बँकांचे पूर्ण भरणा झालेले भांडवल व रिझर्व फंड या दोन्हीची बेरीज १९२१ साली एक अब्ज बारा कोटी रुपये होते आणि त्यांच्याकडील ठेवी आणि रोख शिल्लक रक्कमा पाहून गेल्यास तो आकडा सात कोटी पन्नास लाख पौंड एवढा आढळतो. हा ठेवीचा आकडा निवळ या कंपन्यामार्फत होणाऱ्या व्यवहाराचा आहे. परदेशी भांडवलाच्या एक्चेंज बँकेचा हा व्यवहार लक्षात घेतल्यास त्यांच्याद्वारे चालणाऱ्या आर्थिक घडामोडी समोर इंपीरियल बँकेचाही पाड लागत नाही.मग दुसऱ्या छोटया छोटया हिंदी बँकांची गोष्ट्च बोलायला नको  या साऱ्या ६५ बँकांचे भांडवल १९२१ साली १३ कोटी ४० लाख असून त्यांतील ठेवीची रक्कम ८० कोटी १६ लाख होती. या तिन्ही प्रकारच्या बँकांचे १९१२ सालचे आकडे १९२१ सालच्या आकडयाशा तोलून पाहिल्यास त्यांचा सांपत्तिक  व्यवहार या दहावर्षात १३५ टक्कयांनी वाढला आहे. असे दिसून येते. यंदा इंपिरीयल बँकेचा हिस्सा शेकडा ३२ टक्के परदेशी बँकेचा ३३ टक्के  व बाकीच्या ६५ बँकेचा मिळून ३५ टक्के वाढला आहे . हिंदुस्थानात या सर्व बँकाच्या  हिशोबाची रमारमी करणारे सात निकाल – खाते 'प्रियरिंग हैमेस' आहेत. १९२० साली या निकालखानांच्या कारभारांतला आर्थिक व्यवहाराचा आकडा शिखरास पोचला होता. पण दुसऱ्याच वर्षी तो शेकडा २० टक्कयांनी ऱ्हास पावल्याचे आढळून आले. वरील सर्व वृताांत पाहून वाचकांना हिंदुस्थानातल्या बॅकांची स्थिती लक्षात आली असेलच. परदेशी व्यवहार करणाऱ्या एक्सेंच बँका अर्थातच सर्वस्वी युरोपियन लोकसंख्या देखरेखीखाली चालल्या आहेत. त्या सर्वात संपन्न आहेत. त्यांचा उपयोग हिंदुस्थान देशाच्या उद्योगधंद्यांना फारसा होत नाही. या बँकाची मदत परदेशाच्या व्यापारी कंपन्यांना अतिशय होते परदेशी कंपन्यांना मदत देऊन जर शिल्लक राहिली तर त्यांच्या व्यवस्थापकांची दृष्टि हिंदी उद्योगधंद्यांच्या गरजांकडे वळते. त्यामुळे हिंदुस्थानचा सर्व व्यापार युरोपियनांच्या हातात जाऊन हिंदी व्यापाऱ्याला किंवा उद्योगधंद्यांना डोके वर  काढण्याला अवकाशच मिळत नाही. अलीकडे या विषयाकडे हिंदी तज्ज्ञांचे लक्ष वेधले असून परदेशांशी व्यवहार करणाऱ्या व्यापारी वर्गाला व देशी उद्योगधंद्याला मदत करणाऱ्या  निर्भेळ हिंदी एक्सेंज बँकेची आवश्यकता ते जोराने प्रतिपादन करु लागले आहेत. हिंदुस्थानांत नवे उद्योग धंदे निर्माण करण्याला सवड अतिशय आहे, पण भांडवलाच्या भरपूर

ओलाव्या खेरीज हिंदी व्यापार किंवा उद्योगधंदे मूळ धरल्यास असमर्थ आहेत. प्रत्येक धंद्यासाठी स्वतंत्र भांडवल उभे करणे जितके आवश्यक आहे तितकेच किंबहुना त्याहून जास्त महत्त्व ते धंदे चालू ठेवणाऱ्या बँकेच्या भांडवलाला द्यावे लागते. हिंदी उद्योगधंद्यांना पाठबळ देण्याच्या इरादाने टाटा बँक अस्तित्त्वात आली. पण तिने आपला अवतार हेतु मुळीच सिध्दीस नेला नाही. या बँकेची व्यवस्था तज्ञ व निषुण युरोपियनांच्या हातात आहे. हिंदी उद्योगधंद्यांना यशाशक्ति साह्य केल्याचे व करीत असल्याचे श्रेय फक्त एकाच बँकेला देता येईल. सेंट्रल बँक ऑफ इंडिया या संस्थेने ते कार्य उत्तमप्रकारे बजावले आहे. हया बँकेच्या तोडीच्या दुसऱ्या बँका उभारणे कठीण आहे. या बाबतीत एक उपाय सुचविता येईल. ६५ बँका सारख्या तुटपुंज्या भांडवलच्या बँका भाराभर देशात असण्यापेक्षा त्याचे एकीकरण होऊन जर भरपूर भांडवलाच्या थोडया बँकाच राहिल्या तर त्यांच्या हातून हिंदी उद्योगधंद्यांना निर्माण करण्याचे व उर्जितावस्थेस नेण्याचे इष्ट कार्य पुष्कळ अंशी सिध्दीस जाईल. 'दसकी लकडी, एकका बोजा' हाच न्याय येथे ही लागू पडतो.''[८]

थोडक्यात हिंदुस्थानातील निव्वळ हिंदी बँका ६५ असून त्यांच्यात एकीकरण जर झाले तर हिंदुस्थानातील उद्योगधंद्याना भांडवल मोठयाप्रमाणात उपलब्ध होईल. या बँकातील 'सेंट्रल बँक ऑफ इंडिया' चे साहय दिसून येते. असा अभिप्राय काकासाहेबांनी मांडला.

## ४.४ मिठावरील करविषयक 'नवाकाळ' वृत्तपत्राचे विचार :–

हिंदुस्थान सरकारच्या बजेटात पाच–सहा कोटींची येणारी तूट भरून काढण्याकरिता मिठावरील कर सव्वा रुपयांच्या ऐवजी अडीच रुपये करण्यात आला होता. पण ही पाच–सहा कोटींची तूट खऱ्या स्वरूपाच नसून लष्करी खर्चात इंचकेप कमिटीच्या शिफारसीप्रमाणे पाच–सहा कोटींची काटकसर होणारी असल्यामुळे तूट भरून निघणारी होती. इंचकेप कमिटीच्या शिफारसीपैकी दहा कोटींची काटकसर अद्याप अंमलात यावयाची होती. ती सर्व काटकसर जर अंमलात आली तर पाच कोटींची शिल्लक राहण्याचा संभव होता. अशा स्थितीत गरिबांची पूर्णपणे गांजणूक करणारा मिठावरील कर बसविण्याचे काहीच कारण नाही. मिठावरचा कर गोरगरिबांना अत्यंत जाचक होणार असून सदर कराच्या बोजामुळे लोकांत असंतोष अधिक माजणार होता.

अंदाजपत्रकात जी खर्चाची वाढ दाखल करण्यात आली होती, तीच कमाल राखण्याचा सरकारचा इरादा होता. त्यात काटकसर करण्याची सरकारी अधिकाऱ्यांची इच्छा नाही. तेव्हा तूट भरून काढण्याकरिता वाढविण्यात आलेला मिठावरील कर मंजूर करण्यासाठी सरकारने असेंब्लीने पुढे  प्रस्ताव मांडला.

सन १९२३ मध्ये सुद्धा मिठावरील कर वाढीस दिल्लीच्या असेंब्लीने संमती दिली नाही. याबाबत काकासाहेब खाडिलकर यांनी आपल्या नवाकाळ वृत्तपत्रातून दि. २२ मार्च १९२३ च्या 'मिठावरील कर नापास झाला' या अग्रलेखातून विवेचन केले आहे –

''दिल्लीच्या असेंब्लीने मिठावरील कराविरुद्ध आपले मत दिले. मंगळवारी सायंकाळी मते घेता सरकारच्या व तिची ४४ मते पडली व विरुद्ध ५९ मते पडली. गेल्या वर्षी मिठावरील करास असेंब्लीने संमती दिली नाही, हे योग्य झाले. पण यंदा तसे करू नये, अशी विनंती सरकारतर्फे सभासदांना करण्यात आली. धान्याच्या किंमती उतरत आहेत, तेव्हा मिठावरील कर अधिक वाढला तरी लोकांना सहज सोसेल, असे सरकारतर्फे म्हणणे पडले. धान्याच्या किंमती उतरत आहेत, तेव्हा लोकांचे पगार कमी करा, धान्याच्या किंमती उतरत आहेत तेव्हा मिठावरील कर अधिक वाढवा, धान्याच्या किंमती उतरत आहेत तेव्हा लष्करी खर्च कमी करू नका, अशा तऱ्हेची ही विचारसरणी आहे. दुष्काळात जर लोक कसाबसा आपला जीव वाचवू शकतात, तर सुकाळातही झाडपाला खाऊनच त्यांनी का राहू नये? व शिल्लक राहिलेले पैसे सरकारच्या तिजोरीत का भरू नयेत? कसेबसे जिवंत राहून सरकारच्या तिजोरीची भर करणे, म्हणजे इहलोकीचे सर्व सुख होय किंवा परलोकचा मोक्ष होय, अशी तर सरकारची कल्पना नाही ना? अडचणीच्या वेळी लोक अर्धपोटी राहू शकतात किंवा वस्त्रप्रावरणाशिवाय दिवस कंठू शकतात. म्हणून त्यांनी नेहमीच तसे राहण्यास राजी व्हावे, हा न्याय कोठला? लोकांनी आपल्या लग्नकार्याचा खर्च कमी करावा आणि सरकारच्या तिजोरीची भरती करावी, अशी विचारसरणी पूर्वी एका काळी लोकशाहीने प्रचलित केली होती. आज धान्याचे भाव उतरल्या बरोबर रोजच्या खर्चात होणारी बचत सामान्य लोकांनी सरकारास दिली पाहिजे व गिरण्यांतील मजुरांनी गिरणीवाल्यांना दिली पाहिजे, अशी मागणी पुढे आली आहे. एक आपत्ती टळू लागली. दुसरे क्लेश सोसलेच पाहिजेत, असे लोकांना सांगण्याचा नोकरशाहीचा कटाक्ष आहे. चुलीतून बाहेर निघाला तर वैलात पडण्यास का भीतोस, म्हणून नोकरशाही लोकांना

विचारीत आहे. इन्फ्लूएंझामध्ये जिवंत राहणाऱ्यांनी प्लेगला बळी पडण्यास कसूर करू नये, असा, नोकरशाहीचा हा उपदेश आहे. अन्नवस्त्राशिवाय कसेबसे जिवंत राहणे एवढेच काय ते आयुष्यातील मुख्य काम आहे, अशी नोकरशाहीची समजूत झालेली दिसते! नोकरशाहीचे बडे अधिकारी मोटारीशिवाय, बगीच्याच्या बंगल्याशिवाय, नोकराचाकराच्या ताड्याशिवाय, पक्वान्नाच्या रेलचेलीशिवाय, शिक्षणाच्या व करमणुकीच्या सोयीशिवाय सहज जिवंत राहू शकतील. तडफडून मरतील अशातला भाग मुळीच नाही. मग त्यांना तरी एवढाले मोठे मोठे पगार कशाला पाहिजेत ? धान्यांच्या किंमती थोडयाश्या कमी होत चालल्या आहेत. त्यामुळे सामान्य लोकांचे दुःख थोडेसे हलके होऊ लागले आहेत आणि लोकांची राहणी चैनीची होण्याला यापुढे सुरुवात व्हावयाची आहे. अशातील भाग मुळीच नाही.

नासर मालकम देले यांनी असेंब्लीमध्ये असे सांगितले की, मिठावरील कर बसविल्याशिाय सरकारला गत्यंतरच नाही. म्हणून सरकार असला कर बसविण्यास उद्युक्त झाले आहे. गत्यंतर नसायला काय झाले? लष्करातील खर्च निम्म्याहून कमी करा म्हणजे आपोआप जबर करांना फाटा देण्यास सवड सापडेल. फाजील लष्करी खर्चाची हौस आणि बायकांची दागिन्यांची हौस, या दोनही गोष्टी समाजाचे स्वास्थ्य बिघडविण्यास सारख्याच कारणीभूत होत असतात. शांतता व सुव्यवस्था राहावी, एवढ्याकरिता लष्कराची जरूरी आहे. त्याचप्रमाणे संसार सौंदर्याच्या सुखाने आच्छादलेला असावा, एवढ्याकरिता दागिन्यांची व सजावटीची जरूरी आहे. पण सर्वात आपण वरिष्ठ आहो, असे दाखविण्याची महत्त्वाकांक्षा ज्या वेळी सत्ताधारी पुरुषांत उत्पन्न होते, त्या वेळी लष्करी सत्तेच्या डामडौलावर व फाजील वाढीवर अतोनात पैसा खर्च करून उधळ्या नटवीच्या पायरीला सत्ताधारी लोक पोचतात. जरूरी आणि फाजीलपणा यातील भेद त्यांना समजेनासा होतो. म्हणतील तेथे लष्करी लोक, पाहिजे तेव्हा पाहिजे तितके, सदा उभे राहिले पाहिजेत, अशी महत्त्वाकांक्षा धरण्यात आणि इच्छेस येईल तितक्यांदा रोज नवे नवे शालू नेसून आपल्या सौंदर्यावर इतकी श्रीमंती आपण मिळवू शकतो म्हणून प्रदर्शन करणाऱ्या नटवीच्या चंचल लहरीत फरक तो कोणता आहे? इंग्लंडातील न्यायमूर्ती मॅकार्डी यांनी इंग्लंडातील बायकांच्या फाजील पोषाखाची किंमत दुकानदारांना नवऱ्यानी देण्याची जरूरी नाही, असे जसे ठरविले आहे, तसेच दिल्लीच्या असेंब्लीतील मवाळांनी देखील लष्करी शक्तीच्या फाजील थाटामाटाकरिता आपले मीठ अधिक तोडून

घेण्याचे नाकारले आहे, हे चांगले झाले. इंग्लंडातील कॅ. नॅश हे बाईलवेडे होऊन बायकोच्या पोषाखाचे पायी लाखो रुपयांची आपली इस्टेट धुळीस मिळविण्यास तयार झाले, पण अखेर त्यांना देखील बायकांचा नाद सोडून द्यावा लागला. इंग्लंडातील हौशी नवऱ्याचा बाईलवेडेपणास जशी सीमा आहे, तशीच सीमा नोकरशाहीच्या नादी लागलेल्या मवाळाच्या आळशीपणालाही आहे. नखशिखांत अळणी झाल्यावर नोकरशाहीच्या नादात तरी सुख कोठले राहणार? असेंब्लीने मिठावरील कर नापास केला आहे. पण लाटसाहेब स्वतःच्या हिमतीवर हा कर बसवितात किंवा कसे, हे आता पाहणे आहे''[९]

असेंब्लीमध्ये मिठावरील कर नापास झाल्यावर सरकारने स्टेट कौन्सिलमध्ये मिठावरील करांचे बिल पास करून घेतले.

## ४.५ ब्रिटीशांकडून हिंदुस्थानचे आर्थिक शोषण :–

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीशांनी चालविलेले आर्थिक शोषण हे मोठया प्रमाणात होते ब्रिटिश हिंदुस्थानावर साम्राज्य प्रस्थापित केल्यावर एक प्रकार लुटारुंची भूमिका सुरु केली. याबाबत हिंदुस्थानात कोणीही आवाज करु शकत नव्हते. कारण देश पारतंत्र्यात होता. ब्रिटीशांचा गुलाम होता. परंतु 'नवाकाळ' वृतापत्राने दिनांक १० जाने १९२६ रोजी 'हिंदुस्थानचे लुटारु' या अग्रलेखातून ब्रिटीशांच्या आर्थिक शोषणाबाबतचा वृत्तांत मांडला.

''हिंदुस्थानची बाजारपेठ म्हणजे ब्रिटीश साम्राज्यातील गोऱ्या व्यापाऱ्यांना चरण्याचे कुरण अशी भावना ब्रिटिश साम्राज्यातील सव गोऱ्या व्यापाऱ्यांची होऊन बसली असून, या भावनेचीच तरफदारी इंग्लंडमधील व साम्राज्यांतील वृत्तपत्रे आणि नियत कालिके सांप्रत जोराजोराने करीत आहेत. ब्रिटीश सनदी नोकरांनाच हिंदुस्थानांतील मोठमोठया हुद्यांच्या जागांवर नेमले जाईल. याविषयी व्हाईट हॉलमधील मुत्सद्यांनी हमी दिली पाहिजे, अशा आशयाचा आग्रह 'डेली टिलीग्राफ' पत्रांतून वांरवार करण्यात येत असतो. 'नाईटींग सेंचरी' मासिकात सर रेजिनाल्ड क्रॅडॉक यांनी अशाच विचारसरणीचा एक लेख लिहिला आहे. या लेखांत सर रेजिनाल्ड यांनी ब्रिटीश व्यापाराची तरफदारी करण्याकरिता हिंदुस्थानपुढे एक लबाडीचे आमिष धरले आहे. हिंदुस्थानचे ब्रिटीश मालाला जास्त सवलती द्याव्या म्हणजे ब्रिटीश तिजोरीत पुष्कळ पैसे साठतील आणि मग हिंदुस्थानला ब्रिटीश लष्कराकरता दरसाल कराव्या

लागत असलेल्या खर्चापैकी अर्धा खर्च ब्रिटीश सरकार सोंसू लागेल. असे सर रेजिनाल्ड क्रॅडॉक यांना इतके जाहीर आश्वासन आपल्यातर्फे देण्याचा अधिकार ब्रिटीश सरकारने दिला आहे की, नाही हा एक वादग्रस्त प्रश्न आहे ! आणि यदाकदाचित सर रेजिनाल्ड ब्रिटीश सरकारने दिलेल्या अधिकाराला अनुसरुनच वरील प्रकारचे जाहीर आश्वासन देत आहेत असे धरुन चालले तरी हे आश्वासनही लुटारु वृत्तीचे आहे असे म्हणणे भाग आहे. कारण ब्रिटिश लष्कराचा इतका मोठा खर्च हिंदुस्थानाने सोसावा ही वस्तुस्थितीय मुळी अन्यायाची आहे. कोणतेही स्वतंत्र सरकार इतरत्रच्या उपयोगाकरीता असला पांढरा हत्ती पोसण्यास तयार झाले नसते. मग आज कित्येक वर्षे चालू असलेला अन्याय बंद करण्यासाठी ब्रिटीश व्यापाऱ्यांना लाच देणे म्हणजे अगोदरच चालत आलेल्या अन्यायालाच जास्त प्रोत्साहन देण्यासारखे नाही काय? ब्रिटीश सरकार लष्करासाठी दरसाल अंदमासे १० लक्ष पौंड जास्त खर्च करु शकेल असाहि सर रेजिनाल्ड क्रॅडॉक यांचा अंदाज आहे. हिंदुस्थानांतील व्यापाराचा सर्व मक्ता आम्हांला देऊन आमच्या खिशांत कोटयावधी रुपये कोंबा म्हणजे त्यांतल्या मूठभर पैसा आम्ही हिंदुस्थानच्या तोंडावर फेकू असा सर रेजिनाल्ड यांचा भोळा कोटिकन आहे. हिंदुस्थानातील इंग्रजी लुटारुंच्या विचारसरणीचा हा मासला झाला. परंतु इंग्रजी लुटारुंचे अनुकरण करुन हिंदुस्थानातील व्यापारीपेठेच्या कुरणात मनसोक्त चरण्याची तयारी साम्रज्यातील इतर गोऱ्या वसाहतीनीही चालविली आहे, असे 'फायनेन्शल न्यूज' पत्राच्या लेखांवरुनही सिध्द होण्यासारखे आहे. हिंदुस्थानातील कानडाच्या मोटारीची तरफदारी करताना हे पत्र म्हणते 'कानडा देशाच्या परराष्ट्रीय व्यापाराची उन्नती करण्याचा प्रयत्न करीत असताना पुढे मागे लवकरच हिंदुस्थान सरकारशीही या बाबतीत वाटाघाट करावी लागेल असे दिसते. कानडा देशाने बारीक सारीक सवलती हिंदुस्थानाला दिल्या तर कानडाच्या व्यापाराला भरीव फायदा होण्याचा संभव आहे. कानडातून हिंदुस्थानात निर्गत होणारा मुख्य माल म्हणजे मोटारी होत. महायुध्दाच्या पूर्वी हिंदुस्थान सरकारने कानडाच्या मोटारीवर ५ टक्के कर ठेवला होता. १९१६ साली हा कर ७।। टक्के करण्यात आला आणि १९२२ साली तर या कराची मदार ३० टक्कयांवर चढली. कानडांच्या मोटारीवरील हिंदुस्थानात बसविण्यात आलेल्या या वाढत्या कराचा विचार केला म्हणजे हिंदुस्थानात यापुढे वसाहतीच्या मालाला भरीव सवलतीचे हक्क मिळविणे अगत्याचे होउन बसले आहे. असे म्हणणे प्राप्त होते.' इंग्लंड व साम्राज्यांतील इतर

वसाहती यांच्या हिंदुस्थानची लूट करण्याच्या वरील प्रकारच्या विचारसरणीचा विचार केला म्हणजे हिंदी जनतेने आपल्या आर्थिक हितसंबंधाची सुत्रे अत्यंत तातडीने आपल्या हाती मिळविणे किती अगत्याचे आहे, याचे महत्त्व लक्षात भरल्याखेरीज राहात नाही. हिंदी जनतेने या बाबतीत जलदीने यश मिळविले नाही तर साम्राज्यातील ही लुटारु भूते हिंदी जनतेच्या मानगुटीवर कायमची बसून राहण्यास का कमी करतील?''[१०]

अशाप्रकारे ब्रिटीश हिंदुस्थानची आर्थिक लुट करत होते. वेगवेगळया माध्यमातून कर वसुली करत कराचा मोठा बोजा हिंदुस्थानातील व्यापारी शेतकऱ्यांवर लादून लष्करावरचा खर्च त्यातूनच भागवत.

## ४.६ ब्रिटीश राज्यातील शहरे व खेडीपाडी :–

लॉर्ड डार्विन हे पुढील पाच वर्षांसाठी हिंदुस्थानमध्ये नवे लाटसाहेब म्हणून येणार होते. परंतु हिंदुस्थानच्या धोरणाबाबत ते काहीच बोलले नाही. पाच वर्षांनी बोलू, असे ते सांगत. इंग्लंडमधील खेड्याची स्थिती तीच हिंदुस्थानच्या खेड्याची होती. याबाबत काकासाहेब खाडिलकरांनी 'शहरे आणि खेडीपाडी' या अग्रलेखातून दि. १९ जानेवारी १९२६ रोजी वृत्तांत सादर करून लॉर्ड डार्विन यांना एक प्रकारच्या सूचनाच केल्या.

''नव्या लाटसाहेबांनी हिंदुस्थानात येण्यापूर्वी लॉर्ड डार्विन असे नाव धारण केले असून सांप्रत इंग्लंडात त्यांना मेजवान्या सुरू आहेत. इंग्लंडातील शेतकी खात्याचे प्रमुख या नात्याने त्यांनी चांगली कामगिरी बजावली, अशी त्यांची स्तुतिसुमने या मेजवान्यांच्या प्रसंगी साहजिकपणे गाण्यात येत आहेत. हिंदुस्थानातील आपल्या कारकिर्दीच्या धोरणासंबंधाने मात्र लॉर्ड डार्विन काही बोलत नाहीत. आजच बोलण्यापेक्षा पाच वर्षांनी बोलण्याची खरी वेळ येईल, असे सांगून लॉर्ड डार्विन वेळ मारून नेत आहेत. इंग्लंडात शेतीकडे व खेड्यापाड्याकडे मुसद्यांचे लक्ष सांप्रत अधिक लागले असून इंग्लंडच्या धर्तीवर हिंदुस्थानात पुढील पाच वर्षांत लॉर्ड डार्विन शेतीकडे व खेड्यापाड्याकडे लक्ष देतील आणि इतर राजकीय प्रश्न आजच्याप्रमाणेच धाब्यावर बसविण्यात येतील, असे म्हणण्यास हरकत नाही. शेतीच्या सुधारणेसंबंधाने विचार करताना इंग्लंडला कच्चा माल पुरविणारे हिंदुस्थानावरील इंग्रजी साम्राज्य आहे, हे विसरता कामा नये. कापूस हिंदुस्थानात चांगल्या प्रकारचा उत्पन्न करावा आणि इजिप्तप्रमाणे सिंधू

नदीच्या सक्करच्या कालव्याखालील जमिनीत लांब धाग्याच्या कापसाची पेरणी होऊन इंग्लंडला अमेरिकेच्या कापसाच्या जाचातून मुक्त करावे, अशा प्रकारच्याच गोष्टीकडे लॉर्ड डार्विन यांचे लक्ष पुढील पाच वर्षांत वेधून राहील, यात संशय नाही. असल्या उपायांनी इंग्रजी भांडवलशाहीचे मोठे कल्याण होईल हे खरे, पण शेतकरी वर्गाची दैना त्यामुळे हिंदुस्थानभर दूर होईल अशी आशा करणे व्यर्थ होय. शेतीचा धंदा नाईलजास्तव करावयाचा आणि शक्य त्या रीतीने शहरात जाऊन मोलमजुरी करून संसार चालवावयाचा अशी शेतकऱ्यांची स्थिती असल्यामुळे शेतीकडे शेतकऱ्यांचे, शेतावर राबणाऱ्या मजुरांचे किंवा शेतकीवर अवलंबून असलेल्या मध्यम वर्गाचे मुळीच लक्ष लागत नाही. शहरात धडपडत जाऊन पडणे भाग पडते. आणि तेथे काही नसाधले तर शेतीकडे पाहावयाचे अशी आज हिंदुस्थानची स्थिती आहे! इंग्लंडची देखील हीच स्थिती आहे. आणि याच स्थितीमुळे देशातील बुद्धी, पराक्रम व पैसा शेतीच्या कामाकडे भरपूर खर्च होत नाही! मोठमोठ्या शहरांतून मजुरांना राहावयाला जागा मिळत नाही. गलिच्छ कोठड्यांत कोंडमारा करून घ्यावा लागतो. आणि रोगराईला बळी पडावे लागते! ही स्थिती नाहीशी व्हावी म्हणून इंग्लंडात मुख्यमंत्री मि. बाल्डविन यांनी सर्व इंग्लंडभर खेड्यापाड्यापासून शहरापर्यंत विजेची शक्ती अल्पदराने सर्व लोकांना पुरविणारे सरकारी एक खाते काढण्याचे योजिले असून, या खात्याच्या व्यवहाराला कायदेशीर स्वरूप देण्याकरिता पार्लमेंट सभेपुढे सरकारी बील लवकर येणार आहे. लहानसहान कारागिरीत तरबेज असलेल्या लोकांना खेड्यापाड्यात हल्ली राहावयासच मिळत नाही. लहानशा कोठडीत दोन–चार यंत्रे घेऊन काम करणाऱ्यांना देखील शहरातच जाऊन राहणे भाग पडते! यंत्रे चालविणारी वाफेची किंवा वीजेची शक्ती शहरात मिळू शकते. खेड्यात मिळत नाही यामुळे यंत्रापेक्षा स्वतःच्या कौशल्यावर व कारागिरीवर अवलंबून राहून आपल्या स्वतःच्या करामतीने संसार चालविणाऱ्यांना आपल्या चिमुकल्या कारखान्याकरिताही शहराचा रस्ता पकडावा लागतो! खेड्यापाड्यातच शहराप्रमाणे वीजेची शक्ती जर स्वस्त दराने मिळाली तर स्वतःच्या घरात व मुबलक जागेत काम करीत राहून, आपल्या शेताकडेही लक्ष देऊन, फावल्या वेळात कलाकौशल्याचा उद्योग करून आपला माल स्वस्त विकता येणे कारागिरांना शक्य आहे. हिंदुस्थानात खेड्यापाड्यातील लोक पूर्वी असाच दुहेरी उद्योग करीत असत. शहरातील वाफेच्या किंवा वीजेच्या शक्तीवर सूत काढणे, कापड विणणे किंवा संसाराचे इतर जिन्नस

तयार करणे ज्यावेळी अवलंबून नव्हते त्यावेळी शेती आणि उद्योगधंदे यांचा मिलाप आपोआप होत असे आणि खेडीपाडी सुसंपन्न स्थितीत दिसत असत. मजुरांच्या चळवळीमुळे म्हणा सोशलिस्ट मतांच्या प्रभावामुळे म्हणा किंवा बोल्शेव्हिकांच्या राज्यक्रांतीमुळे म्हणा खेड्यापाड्यातील वस्ती कायम टिकून खेड्यापाड्यांना पुन्हा टवटवीत करणे इंग्रजी मुत्सद्यांना आज अगत्याचे वाटू लागले आहे. वीजेच्या शक्तीचा उपयोग करण्याच्या कामी अमेरिकेसारख्या राष्ट्रापुढे इंग्लंड आज फार मागासलेले दिसते. अमेरिकेत दरमाणशी वीजेची शक्ती जितकी खर्च झाल्याचा हिशोब निघतो त्याच्या निम्मीदेखील शक्ती इंग्लंडात दरमाणशी खर्च झाल्याचा हिशोब निघत नाही! सरकारी कायद्याच्या जोरावर जर वीज उत्पन्न करण्याचा मोठा कारखाना काढता आला आणि हल्लीचे कारखाने जर त्या कारखान्यातच सरकारी कायद्यामुळे सामील झाले तर खेड्यापाड्यापर्यंत सवंग वीजेची शक्ती पोहोचविता येईल आणि शहरातली वस्ती हटून खेडोपाडी अधिक टुमदार दिसतीलअसा मि. बाल्डविन आपल्या पक्षातर्फेच वीजेच्या शक्तीचे धोरण आज इंग्लंडपुढे ठेवीत आहेत.''[११]

अशा प्रकारे काकासाहेबांनी हिंदुस्थानात लॉर्ड डार्विन यांनी खेडोपाडी वीजेची इतर सुविधांची व्यवस्था केल्यास खेड्यातील शेतकरी, कारागीर यांना त्यांच्या कलाकौशल्याने व्यवसाय करता येईल. शेती करता येईल. सुसंपन्न अशी खेडी निर्माण होतील आणि शहरातील राहणे, गलिच्छ वस्ती, रोगराई, तुटपुंजी मजुरी या संकटांना मजुरांना तोंड द्यावे लागणार नाही.

## ४.७ भारताची लोक संख्या वाढ :–

''इ. स. १९२१–५१ या तीन दशकांत भारताची लोकसंख्या जलद गतीने वाढली. १९५१ नंतरची वाढ ही सामान्यतः स्फोटकच मानली जाते. मृत्युदरातील घटीच्या तुलनेत जन्मदरातील घट उशीराने सुरु झाल्यामुळे लोकसंख्येतील ही अफाट वाढ घडून आलेली आहे. युध्दसमाप्ती, दुष्काळ व रोगांच्या साथीचे नियंत्रण अन्नधान्योत्पादनाच्या तसेच वाटपाच्या योग्य पध्दतीचा अवलंब हयांमुळे १९२१–५१ च्या दरम्यान मृत्युदर कमी झाला व लोकसंख्या वेगाने वाढू लागली. मलेरियाचे निर्मूलन व नियंत्रण, इतर प्राणघातक रोगांपासून संरक्षणाच्या सोयी व रोग प्रतिबंधक आरोग्य सुविधामध्ये वाढ हयांमुळे १९५१ नंतर मृत्युदर झपाटयाने खाली आला. हया उलट जन्मदरांतील घट नुकतीच १९७० नंतर सुरु झाली. त्यामुळे १९५१–८१ दरम्यान

लोकसंख्या स्फोटक वेगाने वाढली असे सामान्यतः म्हटले जाते. विशेष करुन १९७१–८१ मधील कुटुंबनियोजनाच्या भरीव कार्यानंतरही जेव्हा १९८१ च्या जनगणनेने लोकसंख्येची अनपेक्षित वाढ नोंदविली. तेव्हा लोकसंख्या शास्त्रज्ञांना ती काहीशी धक्कादायक वाटली.''[१२]

**लोकसंख्या वाढीचे हिंदुस्थानवरील दुष्परिणाम :–**

आज जी लोकसंख्यावाढीची समस्या जाणवत आहे ती स्वातंत्र्यपूर्वकाळात त्याचे विधान केले गेले. 'नवाकाळ' वृतपत्राने ही या लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम काय होतील यांचे वक्तव्य 'भुभाराचा बागुलबुवा' या अग्रलेखातून दिनांक १० ऑक्टोबर १९३९ रोजी केले होते.

''गेल्या वर्षी हिंदुस्थान सरकारचे पब्लिक हेल्थ कमिशनर यांनी १९३६ चा आरोग्याचा अहवाल जाहीर करताना विचारभूमिकेवर एक मोठा बॉम्ब फेकला आणि त्याच्या स्फोटामुळे अनेक अर्थशास्त्रज्ञ हिंदुस्थानच्या भवितव्याविषयी चिंतीत झाले ! १९४१ साली हिंदुस्थानची लोकसंख्या ४० कोटी जवळ जाईल असा अंदाज काढला आहे ! ४० कोटी हा आकडा प्रचंड वाटतो. तो पाहून अर्थशास्त्रज्ञांचे डोके गरगरा फिरु लागते. हा भयानक आकडा कल्पनारम्य होण्यासाठी एकाच्या डोक्यावर दुसरा याप्रमाणे ४० कोटी लोक उभे केले तर २ लक्ष मैलांचा मानवी स्तंभ निर्माण होईल अशी ते कल्पना करतात एवरेस्ट शिखराच्या ४० हजारपट ही उंची झाली. कित्येक अर्थशास्त्रज्ञ आपल्या कल्पनेच्या भूमिकेवर या ४० कोटी लोकांना खांद्याला खांदा लावून उभे करतात व मुंबई ते लंडनपर्यंत हिंदी माणसांच्या अशा सहा रांगा मनाच्या चक्षूंनी पाहतात ! ४० कोटी लोकसंख्या म्हणजे बेसुमार भूभार झाला आहे असे ते म्हणतात. भूभार हा पुराणांतील शब्द आहे आणि हल्लीचे अर्थशास्त्रज्ञ डेन्सिटी ऑफ पॉप्युलेशन अशी विदग्ध भाषा वापरतात. ४० कोटी हिंदुस्थानात निर्माण झाले खरे, परंतु ज्या भूमिवर ते उभे आहेत त्या भूमीमध्ये या लोकांच्या पोटांतील वैश्वानराला शांत करण्याइतके अन्न आहे काय? लोकसंख्येचा सुकाळ, आणि अन्नाचा दुष्काळ अशी परिस्थिती या वाढीमुळे निर्माण होईल अशी त्यांना भिती वाटते. इतर राष्ट्रांवर प्राणहानीचे संकट आले आहे. तर हिंदुस्थानांत प्राणवाढीची आपत्ती ओढवत आहे. युरोपच्या लोकांपुढे आज मरणाची भिती उभी राहिली आहे. हिंदुस्थानातील लोकांपुढे जन्माची भीती उभी राहिली आहे. हिंदुस्थानांत मृत्युच्या प्रमाणापेक्षा

प्रसूतीचे प्रमाण बरेच मोठे असून दरसाल २० ते ३० लाख संख्येची भर पडत आहे. परंतु अन्न प्रसवणारी जमीन काही वाढत नाही. दहा वर्षात सरासरी तीन कोटीची भर पडून १९४१ साली हिंदुस्थानची लोकसंख्या ३८–३९ कोटी होईल असे प्रो. ज्ञानचंद यांचे म्हणणे आहे. हिंदुस्थान सरकारचे शेतकी खात्याचे आकडे देऊन ९ कोटी ३० लक्ष एकर पडीत जमीन लागवडीखाली आणता येई ही भ्रामक कल्पना आहे. असा त्यांनी इशारा दिला आहे. लोकसंख्येची बेफाम वाढ हे जरी दारिद्र्याचे एकमेव कारण नसले तरी हिंदुस्थानच्या उद्धाराच्या मार्गातील ती मोठी तोड आहे.''[१३]

थोडक्यात लोकसंख्यावाढीची भविष्यवाणीच केल्यामुळे सर्वांना मोठा धक्का बसला. वाढत्या लोकसंख्याला भूभाग पुरेल का? या वाढत्या लोकसंख्याला अन्नधान्य पुरविणे आदी समस्येला सामोरे जावे लागणार आहे. सत्य परिस्थितीवर आपले विचार नवाकाळ वृत्तपत्राने मांडले.

## ४.८ दुष्काळ :–

''दुष्काळ म्हणजे एकूण अन्नधान्याच्या प्रदीर्घ तीव्रतम तुटवडयामुळे उध्दभवणारी परिस्थिती ज्यामध्ये मोठया आणि प्रमाणावर उपासमार बहुसंख्य लोकांची कृशता व श्रीणता आणि लोकसंख्येच्या मृत्यूमानात मोठया प्रमाणावर वृध्दी होते. एकोणिसाव्या शतकाच्या अगोदर दुष्काळ निसर्गनिर्मित असत आणि सर्व लोकांची सरसकट उपासमार होऊन मनुष्य, गुरेढोरे व वित्त यांची हानी होत असे पण आधुनिक काळात दुष्काळामुळे श्रीमंतापेक्षा गरीब लोकांचीच जास्त हानी होते. दुष्काळात किंमती वाढतात, बेकारी फैलावते आणि बाजारात धान्य असूनही केवळ गरिबीमुळे बहुजनांना धान्य मिळत नाही. अर्थातच श्रीमंताना दुष्काळाची विशेष झळ पोहोचत नाही.

भारतात पडणाऱ्या दुष्काळांची विविध कारणे आहेत उदाहरणार्थ या देशातील बेभरवशी पाऊस व हवामान, जंगले तोडणे पूर व अवर्षण यांचा शेतीवर अनिष्ट परिणाम होतो. देश कृषिप्रधान असूनही उत्पादनाची पध्दत मागासलेलीच आहे. त्याचप्रमाणे वाहतुकीची साधने अपुरी असल्याने धान्य वितरण प्रादेशिक जरूरीनुसार होत नाही. लोकसंख्या झपाटयाने वाढत गेल्याने शेतीवरील लोकसंख्येचा ताण वाढला आहे. ''[१४]

**दुष्काळ निवारण बलसंवर्धन राष्ट्रीय सप्ताह योजना :–**

'नवाकाळ' वृत्तपत्राने या दुष्काळ निवारणाबाबत वेळोवेळी समाज जागृती करण्याचे कार्य केलेले दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदुस्थानातील जनतेस दुष्काळाला सामोरे जावे लागेलच परंतु स्वातंत्र्योत्तर काळात सुध्दा या दुष्काळास सर्वसामान्य जनतेस सामोरे जात होती. त्यासाठीच्या काय उपाय योजना असाव्यात याबाबत दिनांक ४ एप्रिल १९५३ च्या 'बलसंवर्धक राष्ट्रीय सप्ताह' लेखात 'नवाकाळ' वृत्तपत्राने राष्ट्रीय सप्ताहात सुरू झालेल्या दुष्काळ निवारण कार्यक्रमास योग्य असे मार्गदर्शन केले.

''दरवर्षीप्रमाणे ता ६ ते १३ एप्रिल हा 'राष्ट्रीय सप्ताह' म्हणून साजरा होत असून, यंदा त्याला 'राष्ट्रबलसंवर्धन' असे विशेष स्वरूप प्राप्त होत असल्याचे दिसत आहे. जालियनवाला बागेच्या अत्याचाराच्या स्मरणार्थ राष्ट्रीय सप्ताह महात्माजींनी भारतात सुरु केला आणि अशा प्रकारचे परकी सत्तेचे अत्याचार भारतात होणार नाहीत इतके भारताचे बळ वाढावे म्हणून महात्माजींनी विधायक कार्यावर या सप्ताहात कटाक्ष ठेवला होता. खादी, सुत कताई, अस्पृश्यता निवारण अशा निरनिराळ्या बाबींसाठी राष्ट्रीय सप्ताहाचा एक एक दिवस योजला जात असे आणि एक प्रकारच्या विधायक महोत्सवाचे स्वरूप या राष्ट्रीय सप्ताह हा परकीय सत्तेच्या अत्याचारांच्या निषेधार्थ खरा, पण केवळ सभा–निदर्शनानी खरा निषेध होत नाही तर स्वबलसंवर्धनाने खराखुरा निषेध साधतो हे लक्षात घेऊन महात्माजींनी केवळ निषेधात्मक बोलके स्वरूप या सप्ताहाला येऊ न देता विधायक शक्तीच्या संवर्धनाचे स्वरूप या आठवडयाला दिले. भारत स्वतंत्र झाल्यावर परिस्थिती पालटली आहे आणि अर्थातच त्या प्रमाणात राष्ट्रीय सप्ताहाच्या स्वरूपांतही कायापालट व्हावा हे स्वाभाविक आहे. विधेयक वृत्तीची जोपासना करणे एवढेच आता राष्ट्रीय सप्ताहाचे कार्य राहिलेले नसून राष्ट्रापुढे जी महान कार्य आहेत त्यावर शक्ती केंद्रित करून त्या कार्याला जोराची चालना देण्याचे कार्य राष्ट्रीय सप्ताहात जनतेकडून अपेक्षित आहे. त्याच दृष्टीने महाराष्ट्रात राष्ट्रीय सप्ताहामध्ये दुष्काळ निवारण स्वरूप ह्यास मिळावे, दारूबंदीला नवी चालना देण्याची हाक मुंबई राज्याने द्यावी व पंचवार्षिक योजनेचा प्रचार या सप्ताहात करण्यावर भारतात भर देण्यात यावा हे स्वाभाविक आहे.

**दुष्काळ निवारण कार्याचे आवाहन :–**

पंचवार्षिक योजनेचा प्रचार राष्ट्रीय सप्ताहात व्हावा ही भारतव्यापी सूचना असून तिची अंमलबजावणी सर्वत्र होईलच, खादीचाही बराचसा साठा पडून राहिलेला असून त्याचा उठाव राष्ट्रीय सप्ताहात व्हावयास पाहिजे. शिवाय प्रादेशिक स्वरूपाच्या दोन गोष्टी मुंबईराज्यासमोर प्रामुख्याने असून तिकडे राष्ट्रीय सप्ताहात लोकांचे लक्ष वेधले पाहिजे यात संशय नाही. महाराष्ट्र कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री देवकीनंदन नारायण यांनी दुष्काळ निवारणाच्या कामाचे महत्त्व व तातडी लक्षात घेऊन कार्यकर्त्यांनी त्याकामी आपल्या शक्ती केंद्रित कराव्यात अशी विनंती केली असून ती अत्यंत योग्य अशी आहे. मुंबई राज्यात, गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्र सर्वत्रच दुष्काळाने जबडा उघडला असून महाराष्ट्रावर या दुष्काळाचा विशेष परिणाम होत आहे. याबाबतीत आपल्याकडून जे शक्य ते सर्व सरकारकडून होत आहे पण लोकांचे सहाय्य नसेल तर केवळ सरकारी प्रयत्नांनी काम भागणार नाही. मुंबईला राज्यपालांची 'दुष्काळ –निवारण समिती' आहे आणि पुण्याला 'महाराष्ट्र दुष्काळ निवारण समिती' आहे. दोन्ही कमिट्यांवर प्रतिष्ठित लोक आहेत पण लोकांच्या भावना हलवून दुष्काळाबाबत त्यांना जागृत करण्याइतका उत्साह कुठेही नाही. पुण्याची कमिटी तर सरकारच्या कृतीतील कुसळे शोधण्यातच इतिकर्तव्यता आहे असे दिसते. दुष्काळी कामे चालू आहेत तेथे कामगारांना साध्य करण्याकरिता स्वयंसेवक सेवकांचीही जरूर आहे. दुष्काळाबाबत बोलकी सहानभुती पुष्कळ आहे आणि या संधीचा उपयोग स्वतःच्या निवडणुकी साधून घेण्यासाठीही लब्धप्रतिष्ठित लोक करीत असतात पण असल्या गोष्टींनी दुष्काळग्रस्तांचे कार्य होणार नसून तन–मन–धन करून झिजण्यास लोक पुढे आले पाहिजेत. ही जरुरी लक्षात घेऊनच महाराष्ट्र कॉंग्रेसच्या अध्यक्षांनी राष्ट्रीय सप्ताहात हे काम हाती घेण्याची समाजसेवकांनी विनंती केली आहे आणि महाराष्ट्र प्रदेश कमिटीनेही दुष्काळ निवारणाचे कार्यास अग्रमान देण्याचा ठराव केला आहे. प्रांताध्यक्षांच्या या आव्हानाचा मान महाराष्ट्रातील सार्वजनिक कार्यकर्ते ठेवतील अशी आम्हास खात्री आहे.''[१५]

थोडक्यात राष्ट्रीय सप्ताहामध्ये दुष्काळ निवारण कार्यक्रम हाती घेताना कोणतेही राजकारण, चढाओढ न ठेवता, सर्वसामान्य जनतेसही सहभागी करून सर्व समाजसेवक

कार्यकर्ते यांनी दुष्काळ निवारणवरील योजना तयार कराव्यात असा मार्गदर्शनपर सल्ला 'नवाकाळ' वृत्तपत्राने केल्याचे दिसून येते.

## ४.९ अन्नटंचाई व अन्नविषयक धोरण :-

''कृषिप्रधान भारताला अन्नसमस्येत गेली अनेक दशके तोंड द्यावे लागत आहे.अन्न समस्येचा विचार करताना प्रामुख्याने गहू, तांदूळ व कडधान्य यांना प्राधान्य द्यावे लागेल. कारण लोकांच्या एकूण अन्नावरील खर्चातील जवळजवळ ८५ टक्के खर्च या धान्यावर होतो. वाढत्या लोकसंख्येचा शेतीवर पडणारा ताण, वारंवार पडणारी अवर्षणे, अनियमित पाऊसपाणी आणि वनस्पतीवरील रोगांनी होणारी हानी यामुळे कृषी उत्पादनाची पातळी नेहमी खाली राहिली आहे. उत्पादन वितरण आणि किंमतींची पातळी ही अन्नसमस्येची विविध अंगे म्हणता येतील.''[१६]

अन्नविषयक धोरणाबाबत 'नवाकाळ'वृत्तपत्राने आपल्या अग्रलेखातून सुध्दा माहिती सादर केली आहे. दिनांक ३ डिसेंबर १९५० च्या 'अन्नाचा तुटवडा कसा भरून काढायचा?' या अग्रलेखात संरक्षणाच्या प्रश्नाऐवजी अन्नप्रश्नास अधिक महत्व द्यावे असे नमूद केले आहे ते पुढील-

''संरक्षणाच्या प्रश्नापेक्षाही अन्नाचा प्रश्न अधिक निकडीचा आहे असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही. संरक्षणाच्या प्रश्नाला विशेष तीव्र स्वरूपात सामना देण्याची वेळ भारतावर आज आलेली आहे असे म्हणता यावयाचे नाही आणि समजा तशी अधिक मोठी संकट अन्नतुटवडंयाच्या स्वरुपात भारतापुढे आजच्या घटकेस उभे आहे. महायुध्दात निर्माण झालेले हे अन्न संकट मागे हटण्याची जरासुध्दा उमेद दिसत नाही. कोणत्याही नैसर्गिक आपत्ती वाचून वर्ष दोन वर्ष गेली आणि देशाच्या सर्व भागात यावी तशी पिके आली तरच संकट मागे पाय घेऊ लागेल. अशी दोन वर्ष सुगीची गेली तर एखादे धरणही तोपर्यंत पुरे होत आले असेल आणि लाखो एकर शेत जमीन चांगली भिजवून त्यामधून अधिक धान्य आपल्या झोळीत पडू लागेल.पण ही आशा व अपेक्षा सफल होत नाही तोवर काय करायचे? श्री मनुशी यांनी थोडया दिवसापूर्वी लोकसभेत सांगितल्याप्रमाणे तीन प्रदेश वगळल्यास भारताच्या इतर सगळ्या

प्रदेशात अन्नधान्याचा तुटवडा जाणवत आहे. सगळ्यात आर्त बिहारची आहे. गंगेने व त्यांच्या सोबतीच्या नद्यांनी संपन्न असा हा प्रदेश आहे पण आधी त्या नद्यांच्या पुरांनीच कहर केला व मग अवर्षणाचा तडाखा बसला. उत्तर प्रदेशात थोडया प्रमाणावर तसेच झाले. मद्रासकडील हाकाटी बरेच दिवसांपासून कानी पडतच होती, तर तशाच कहाण्या नागपुर वऱ्हाडच्या भागातून गेल्या काही आठवडयात येत आहेत. सरकारी दुकानात धान्य नाही. खुलाबाजार फक्त धनिकांनाच परवडणारा; अशा दारूण स्थितीत कारकून मास्तर वगैरे मध्यमवर्ग आणि गरीब मजूर वर्ग कसे दिवस काढीत असेल याची कल्पनाच करवत नाही.''[१७]

थोडक्यात भारताच्या कोणत्या ना कोणत्या भागात अन्नटंचाई दिसून येते. त्याची कारणे वेगवेगळी आहेत. अतिवृष्टी, पाण्याचा साठा, धरणे नाहीत, दुष्काळ अशा विविध मार्गाने अन्नटंचाई जाणवते. त्यावर वेळीच उपाय योजना केल्या जाव्यात आणि गरीब मध्यमवर्गीय जनतेची उपासमार टाळावी असा बोध या लेखातून व्यक्त केला आहे.

**मुंबई सरकारचे अन्नधान्यविषयक धोरण :–**

मुंबई सरकारने १९५१ साली अन्नधान्य विषयक धोरण केले होते. त्यावर 'नवाकाळ' वृत्तपत्राने मुंबई सरकारचे अन्नधान्य विषयक धोरण हा लेख दिनांक १४ मार्च १९५१ रोजी लिहिला.

''मुंबई सरकारने मुंबई राज्यातील एकंदर अन्नधान्य परिस्थिती आणि भारत सरकारकडून मिळणारे अन्नधान्याचे सहाय्य या हिशोबात दर माणसी दररोज नऊ औंस धान्य मिळावे असा दंडक काढला आहे. ही अंत्यल्प जबाबदारी मुंबई सरकारला समाधानकारकपणे पार पडणे अनेक प्रसंगी अशक्यप्राय होते असा काही भागातील लोकांचा अनुभव आहे. या धोरणाचा दुसरा भाग असा की मुंबई सरकारने मुंबई राज्यात वाटप पध्दतीत समाविष्ट असलेल्या अन्नधान्याची खाजगी विक्री कायद्याने बंद केली आहे. शेतकऱ्यांनी स्वतःच्या गरजेपुरते धान्य स्वतःची ठेऊन उरलेले धान्य सरकारला नियंत्रित भावात सुपूर्द करावे अशी सरकारची अपेक्षा आहे. पण प्रत्यक्षात सरकारच्या एतद्विषयक अपेक्षा पूर्ण होत नसल्याचे आढळून आले आहे. मुंबई सरकारच्या अन्नधान्यसंबंधीच्या प्रसिध्द झालेल्या आकडेवारीनुसार शेतकरी शेतात पिकलेल्या अन्नधान्यापैकी स्वतःच्या गरजा पुरून उरलेल्या धान्यापैकी बराच

कमी वाटा सरकारला देतात असे आढळून आले आहे. अर्थात शेतकऱ्यांपाशी  उरलेले हे धान्य कोठे जात असावे ! असा यासंबंधात सहाजिकच प्रश्न उद्‌भवतो. ज्याअर्थी काळ्या बाजारात आजही तशी ऐपत असणाऱ्यांना नियंत्रित दरापेक्षा अधिक भावात धान्य मिळू शकते त्याअर्थी ते धान्य काळ्याबाजारात जात असावे असे अनुमान अपरिहार्यपणे काढावे लागते. वाटपासंबंधीच्या कायद्याची अधिक कडक अंमलबजावणी करण्यात यावी असे यासंबधात सरकार विरोधी पक्षाकडून सुचविण्यात येत आहे.पण ही सूचना अव्यवहार्थ आहे.  सरकारची वाटप पध्दती आणि त्यासंबंधीची अंमलबजावणी निर्दोष आहे असे प्रशस्तीपत्र मुंबई सरकारला अनेक नि:पक्षपाती निरीक्षकांनी दिले आहे. अर्थात मुंबई सरकारच्या कारभारात दोष आहे असे समजण्याचे कारण नाही. दोष आहे तो धोरण जात आहे आणि सदोष धोरणाच्या परिणामी निर्माण झालेल्या उणिवांचे खापर राज्यकारभाराच्या सदोषतेवर फोडण्यात येते इतकेच याबाबतीत म्हणता येण्यासारखे आहे.''[१८]

थोडक्यात मुंबई सरकारच्या धोरणात समान अन्नवाटप दिसून येते. शेतकऱ्यांनी आपल्या जवळ गरजेपुरते धान्य ठेवून इतर सरकारकडे जमा करावे. काळ्या बाजारात देऊ नये. अनेकांनी या धोरणाविषयी निर्दोषता दर्शविली त्याचबरोबर दोषही व्यक्त केले असे विधान या लेखात मांडले.

## ४.१० ग्रामीण विकास :–

''सर्व जगभर शहरांचा सतत विकास होत असून सुध्दा जागतिक लोकसंख्येपैकी ग्रामीण भागात राहणाऱ्यांचे प्रमाण १९५० मध्ये एकूण ७९ टक्के पेक्षा थोडे अधिकच होते भारतात १९६१ मध्ये ८२ टक्के लोक ग्रामीण भागात राहत होते. तर १९७१ मध्ये प्रमाण ८०.१ टक्के होते. सहाजिकच आर्थिक नियोजनाद्वारे राष्ट्रीय विकास साधण्यासाठी ग्रामीण विकास अत्यंत आवश्यक ठरतो आणि म्हणूनच ग्रामीण समस्यांचे स्वरूप नीटपणे समजावून घेऊन त्या सोडविण्याचे कसोशीने प्रयत्न करावे लागतात. कुठल्याही राष्ट्रात ग्रामीण समाज उल्लेखनीय कामगिरी बजावित असतो. अन्नधान्य व इतर कच्चामाल यांचे उत्पादन ग्रामीण भागातच होत असते आणि या बाबतीतील शहरांची गरज ग्रामीण उत्पादनातूनच भागविली जाते. शिवाय शहरांतील औद्योगिक व्यवसायांना श्रमिक पुरविण्याची जबाबदारीही ग्रामीण भागच पार पाडतात.

राष्ट्रांची नैसर्गिक साधनसंपत्ती बव्हंशी मराठी ग्रामीण प्रदेशातच उपलब्ध होते आणि बहुसंख्य लोकांची वस्ती ही तेथे असते.''[१९]

**पंचवार्षिक योजनेतील खेडी :–**

'नवाकाळ' वृत्तपत्राने सुद्धा आपल्या अग्रलेखात पंचवार्षिक योजनांमध्ये ग्रामीण विकासा वर भर देऊन त्याचा कच्चा मसुदा तयार केले; परंतु प्रत्यक्षात योजनेत शहरी विकासावर भर दिला. याबाबत 'शहरी स्वार्थ विरुद्ध ग्रामीण विकास' हा अग्रलेख दिनांक ३ एप्रिल १९५६ रोजी प्रकाशित केला.

''भारत सरकारचे किंवा प्रांत सरकारांचे ग्रामीण विकासाकडे दुर्लक्ष आहे, असे कोणी म्हणू शकणार नाही. पण ग्रामीण हिताला व प्रश्नांना प्राधान्य देऊनच भारताचा कारभार चाललेला आहे, असेही कोणी म्हणू शकणार नाही. पहिल्या पंचवार्षिक योजनेचा कच्चा खर्डा तयार झाला त्यावेळी ही योजना खेड्यातील लोकांना कामधंदा व अन्न–वस्त्र देण्याऐवजी डॉलर्स पैदा करण्यावर नजर ठेवून आखण्यात आली आहे, असा ठपका आचार्य विनोबाजी यांनी ठेवला होता. आणि नंतर भारताची अन्नधान्याची गरज भागविण्याच्या उद्दिष्टाचा पेहराव या योजनेला चढविण्यात आला हे सुप्रसिद्ध आहे. दुसरी पंचवार्षिक योजना अन्नधान्याचे ग्रामीण उत्पन्न वाढविण्यावर व खेड्यांचा विकास घडवून आणण्यावर कटाक्ष ठेवत आहे, असे ना. पंतांनी दिल्लीच्या शेतकी मेळाव्यात भाषण करताना सांगितले आहे. पण ही दुसरी पंचवार्षिक योजना पोलादाचे कारखाने व भारतातील उद्योगधंद्यांना लागणाऱ्या यंत्रसामग्रीचे उत्पादन यांना अग्रस्थान देत आहे, हे विसरून चालणार नाही. भारताचे औद्योगिकरण अटळ व अपरिहार्य आहे आणि या औद्योगिकरणासाठी यंत्रसामग्री परदेशातून आणण्याची जरूरी पडता कामा नये, अशी इर्षा भारतीय योजनाकारांची आहे. हे उद्दिष्ट साधत असताना ग्रामीण विकासासाठी दानधर्म करून औदार्याचे श्रेय घेण्यास नियोजन करण्याची हरकत नाही. विणकरांसमोर भाषण करताना आचार्य विनोबाजी भावे यांनी नुकताच या बाबतीत प्रकाश टाकला आहे. हातमाग हा भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे आणि या धंद्यासाठी गिरण्यांवर अवलंबून न राहता अंबर चरख्याच्या प्रसाराच्याद्वारे हातसुताचा भरपूर पुरवठा होईल अशी व्यवस्था करणे हे सत्ताधाऱ्यांचे कर्तव्य आहे. पण अंबर चरख्यावरचा खर्च म्हणजे भिकारटाकारांसाठी दानधर्म असेच मानून त्याबाबतीत हात बेताबेतानेच मोकळा सुटत आहे.

भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा हातमागांचा हा कणा बळकट व्हावा म्हणून साड्या–धोतरांचे उत्पादन हातमागांसाठी राखून ठेवा, अशी अजीजी श्री राजगोपालाचारी यांनी केली तर त्यांची टर उद्योगमंत्री ना. कृष्णमाचारी यांनी उडविण्यास कमी केले नाही आणि आगामी पंचवार्षिक योजनेत हातमागाचे जे उत्पादन गृहीत धरले आहे ते जर सफल होत नाही असे दिसले तर हातमागांसाठी राखून ठेवलेला घास गिरण्यांना चरण्याचे आश्वासन उद्योगपतींना यापूर्वीच देऊन ठेवण्यात आलेले आहे. हातमाग व हातसुताचा धंदा खेड्यापाड्याची अर्थव्यवस्था मजबूत ठेवण्यासाठी राखून ठेवला पाहिजे. त्याचप्रमाणे पाटबंधाऱ्याच्या पाण्याची तरतूद शेतीच्या प्रत्येक इंच जमिनीसाठी झाली पाहिजे, ही भारताची प्राथमिक गरज आहे. दळणवळणासाठी रस्ते नसलेली असंख्य खेडी आहेत. ग्रामीण उद्धारासाठी या गोष्टी प्रथम झाल्या पाहिजेत पण पोलादी कारखाने, यंत्रोत्पादन आणि विजेचे व कोळशाचे उत्पादन यावर दुसरी पंचवार्षिक योजना कटाक्ष ठेवीत आहे. प्रथम औद्योगिकरण नंतर जमेल तसा ग्रामीण उद्धार, असा आजचा अनुक्रम आहे.''[२०]

थोडक्यात पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत ग्रामीण विकासाऐवजी शहरी विकास, औद्योगिकरण यावर भर दिला; परंतु खेड्याचा विकास, खेड्यातील व्यवसाय यावर लक्ष न दिल्याचे या लेखातून विचार व्यक्त केले गेले.

## ४.११ भूदान चळवळविषयी 'नवाकाळ' चे विचार :–

भूदान–भूमिहीनांचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने भूदानाचा प्रयोग १९५१ पासून सुरू झाला. सर्वोदयी विचारसरणीनुसार भूदान हा भूमी प्रश्नावरील एक महत्त्वाचा उपाय आहे, असे मानले गेले.

भूदानाचा उगम १९५१ मध्ये तेलंगणात उद्‌भवलेल्या स्फोटक परिस्थितीशी व आचार्य विनोबा भावे यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाशी निगडित आहे.

आचार्य विनोबा भावे यांच्या वर्धा ते हैदराबाद पायी यात्रेबाबत 'नवाकाळ' वृत्तपत्रामधून दिनांक ६ एप्रिल १९५१ रोजी 'श्री विनोबांची सर्वोदयी हैदराबाद–यात्रा' हा लेख प्रकाशित झाला होता.

''हैदराबाद येथे या आठवड्याअखेर सर्वोदय संमेलन भरत असून त्यांची तयारी अशी हैदराबाद येथे सुरू आहे. त्याचप्रमाणे वर्ध्यापासून हैदराबादपर्यंत पायी प्रवास करीत असलेले श्री.

विनोबांनी हे या संमेलनाची प्राणप्रतिष्ठाच मंत्रासारख्या आपल्या दिव्यवाणीने करीत आहेत, असे म्हणण्यास प्रत्ययास नाही. हैदराबादचे संमेलनास कोणते प्रश्न येणार याची यादी सर्वसेवासंघाच्या सेक्रेटरींनी कार्यकर्त्यांकडे पाठविली असून 'हरिजन'च्या ताज्या अंकात श्री किशोरीलाल मश्रुवाला यांनी ती प्रश्नावली आपल्या उत्तरासह प्रसिद्ध केली आहे. सर्वोदय संमेलनापुढे जे विविध प्रश्न आहेत, त्यांचा विचार हैदराबादच्या वाटेवर असलेले सर्वोदयाचे पांथस्थ करीत असतील आणि संमेलनात त्यांचे विचार व्यक्त होतीलच. श्री. विनोबा हैदराबादचा प्रवास दररोज सुमारे पंधरा–वीस मैल याप्रमाणे करीत असून सुमारे तीन आठवड्यांच्या त्यांच्या प्रवासात चाळीस–पन्नास लहान–मोठी गावे व तेथील विविध प्रश्न त्यांच्या नजरेखालून जात आहेत. अतिविचाराने बुद्धि गिरक्या खाऊ लागते व अखेर भ्रम लागते असा थोरामोठ्यांचा अनुभव आहे. पण ज्यावेळी दररोजच्या व्यवहारातील अनुभवांची बैठक विचारांना लाभते, त्यावेळी बुद्धीभ्रमण न पावता अधिक प्रखर आणि मूलगामी होऊन तिचा प्रभाव दररोजच्या व्यवहारात पडू लागतो. श्री. विनोबाजींच्या सर्वोदय संमेलनास पोहोचण्यापूर्वी अनेक खेडेगावांनी व त्यांच्या दररोजच्या जीवनस्पर्शी प्रश्नाशी साक्षात संबंध येत आहे आणि निरीक्षण–परीक्षणातून सर्वोदयाचे स्मरण आणि शक्ती घेऊन ते हैदराबादला जात आहेत. श्री. विनोबांच्या या हैदराबाद यात्रेची तुलना महात्माजींच्या दांडी–यात्रेशी होते ती पुष्कळ अंशी यथार्थ अशीच आहे. ज्यांना घराच्या पुढच्या दारातून परसदारात जाण्यास किंवा खालच्या मजल्यावरून वरच्या मजल्यावर वाहन लागते अशा आरामप्रिय खुशालचेंडूना श्री. विनोबांनी पायी यात्रा त्यांच्या उपहासास पात्र व्हावी हे स्वाभाविकच आहे. पण या यात्रेतील विनोबांची भाषणे वाचताना सर्वोदयांचे विचारधन आणि सामर्थ्य या यात्रेतून ते संकलित व संवर्धित करीत आहेत, असेच सर्वसामान्य लोकांना वाटल्यावाचून राहणार नाही.

श्री.विनोबांच्या हैदराबादच्या मार्गावरील भाषणात स्वराज्यानंतर रामराज्य प्रस्थापित होण्याकरिता आणखी एक लढा द्यावा लागेल, अशी घोषणा आहे. त्याचप्रमाणे खेड्यांना स्वावलंबनाचे मार्गदर्शन त्यांनी केलेले आहे आणि हे दोनही प्रश्न भारताला अत्यंत जिव्हाळ्याचे आहेत. स्वराज्य आले आणि सत्तांतर झाले. पण गोरगरिबांचे दुःख कायमच राहिले हा अनुभव श्री. विनोबा आपल्या दौऱ्यात घेत आहेत. लोक हवालदिल आहेत आणि सोसाव्या लागणाऱ्या यातनांविषयी त्रस्त आहेत. वस्तुतः स्वराज्यात यातना सोसाव्या लागल्या तरी त्या धैर्याने सोसण्याची वृत्ती लोकांनी दाखविली पाहिजे. ती दिसत नाही याचे कारण लोकांना राज्य आपले

झाले आहे, असे वाटत नाही. स्वराज्याच्या योगाने आलेली सत्ता खेडोपाड्यापर्यंत विकेंद्रित झाली पाहिजे, असे महात्माजी म्हणत असत. सरकारी नोकरांना आपण जनतेचे नोकर आहोत, असे वाटले पाहिजे आणि त्याच्या आस्थेने ते आपले रक्षक आहेत, असे लोकांना वाटले पाहिजे. पण विद्यमान स्वराज्यात लोकशाहीऐवजी नोकरशाही सर्वत्र प्रभावी आहे, असे दिसून येते. सरकार निर्णय घेत आणि त्याची अंमलबजावणी नोकरांच्या हाती असते. हे नोकर सरकारशी सहमतही नसल्यामुळे आणि एकरूपही नसल्यामुळे सरकारी योजनांचा चुथडा होऊन जातो व जाच लोकांना सोसावा लागतो. दारूबंदी, अन्नवृद्धी मोहीम, त्याच्या बाबतीत जी ढिलाई आढळून येते, त्याचप्रमाणे दिल्लीच्या लोकसभेत जी प्रकरणे गाजत आहेत, त्यावरून या नोकरशाहीच्या सामर्थ्याची कल्पना येईल. सरकारी योजना तयार होतानाही भ्रामक सल्ला देऊन मार्गदर्शन करीत असतात. सरकारी योजना अंमलात असताना तिला नोकरशाही विकृत स्वरूप देत असते आणि सरकारी योजनांची फळे अपेक्षेपेक्षा निराळ्याच स्वरूपात लोकांपर्यंत पोहोचत असतात! लोकमान्य टिळकांनी सरकार आणि नोकरशाही यांच्यात फरक केला. आज तसाच फरक करण्याची वेळ आली आहे आणि नोकरशाहीचे प्राबल्य सोडून गोरगरीबांच्या रामराज्याची प्रस्थापना करण्याची वेळ आली आहे. श्री. विनोबा ज्या वेळी राम राज्यासाठी पुन्हा लढा द्यावा लागेल, असे म्हणतात त्या वेळी त्यातून वरील प्रकारचा अर्थ संभवतो, असे म्हणण्यास हरकत नाही.''[२१]

थोडक्यात विनोबा भावे यांनी वर्धा ते हैदराबाद पायी प्रवास करून लोकांचे जीवनस्पर्शी प्रश्न जाणून घेतले. लोकांना योग्य न्याय मिळवून देण्याचे काम विनोबाजींनी हाती घेतल्याचे दिसून येते.

पुढे तेलंगणातील जिल्ह्यातून पदयात्रा करीत असता एका खेड्यातील हरिजनांनी जमिनीच्या स्वरूपात त्यांना मदत दिली जावी, अशी याचना विनोबांकडे केली. विनोबांनी त्याच गावातील भूमिहिनांना योग्य न्याय देण्याचे आवाहन केले. त्याला प्रतिसाद देऊन एका भूमिपतीने विनोबांना काही जमीन देऊ केली, हीच भूदानाची सुरुवात होय.

आचार्य विनोबा भावे यांनी जी भूदान चळवळ सुरू केली होती, त्यामध्ये त्यांनी गरजू गरीब लोकांना जमिनी मिळवून दिल्या. त्यांनी हे कार्य प्रथम तेलंगणात सुरू केले. त्याबाबत दिनांक ३ जून १९५१ रोजी नवाकाळ वृत्तपत्रामधून 'आचार्यांच्या तेलंगणातील कार्याचे महत्त्व'

हा लेख प्रकाशित झाला होता. त्यामध्ये कार्याचा उल्लेख सांगतात–

''आ.विनोबाजी भावे यांनी तेलंगणात चालविलेल्या कार्याविषयी कम्युनिस्टास काय वाटते हे समजणे मनोरंजक व बोधप्रद होईल. एका अर्थाने कम्युनिस्टाचेच कार्य आ. विनोबांच्या हातून तेलंगणात चालू आहे. कोणाच्या हातून का होईना गरजू व पिळल्या जाणाऱ्या गरिबांना जमीन मिळत आहे. याचे कम्युनिस्टांना खरोखर समाधानच वाटायला हवे. स्वतः आ. विनोबाच सांगत आहेत की, साम्यवाद्यांनी–कम्युनिस्टानी हिंसेचा, अत्याचाराचा मार्ग टाकून द्यावा म्हणजे मीही साम्यवादी होऊन त्यांच्याबरोबरीने कार्य करीन म्हणजे एक हिंसा वगळली तर साम्यवाद्यांच्या तत्त्वज्ञानात दूषणीय व टाकाऊ असे आ.विनोबांना काही दिसत नाही. पण आ. विनोबांच्या कार्याबद्दल साम्यवाद्यांना काय वाटते हे समजावे कसे? जे स्वतःला वाटते ते बोलून दाखवायला साम्यवादी स्वतंत्र कोठे आहेत? वरिष्ठांनी ती चाकोरी घालून दिली त्या चाकोरीतच चालत राहणे आणि वरिष्ठांनी शिकवलेली भाषा पोपटासारखी उच्चारीत राहणे आपल्याकडे काहीही करण्यास साम्यवादी मोकळे नाहीत.

आ. विनोबा भावे गरिबांसाठी जमिनी मिळवीत आहेत, त्याविषयीचे समाधान व्यक्त करण्याऐवजी आचार्यांकडून साम्यवाद्यांच्या कार्यपद्धतीची व निष्ठेची जी सडेतोड चिकित्सा केली जात आहे तिचा राग तेवढा साम्यवादी आपल्या मनात धुमसत ठेवतील, यात शंका नाही. साम्यवादी भारतात दुही वाजवीत आहेत. साम्यवाद्यांनी सो. रशियाची गुलामगिरी पत्करलेली आहे, अशा शब्दांत आचार्यांनी साम्यवाद्यांची केलेली चिकित्सा त्यांना खपणे शक्य नाही. तेलंगणात साम्यवाद्यांबद्दल असे उघडपणे व निर्भीडपणे आजवर कोणी बोलत नव्हता.

अत्याचाराच्या जोरावर साम्यवाद्यांनी खेड्यापाड्यातील लोकांवर वचक बसविला. जमीनवाल्यांच्या जमिनी जबरदस्तीने लुटून त्या गरीब शेतकऱ्यांस वाटल्या त्यामुळे साम्यवादी हे आपले खरे हितकर्ते आहेत, असे गरिबांच्या मनाने घेतले आणि सरकारी रीतीने साम्यवाद्यांच्या बंदोबस्तासाठी जे कडक उपाय योजले गेले त्यांचा परिणाम साम्यवाद्यांविषयीचा गरिबांच्या मनातील ओढा वाढण्याकडेच होणे स्वाभाविक आहे. परंतु तेलंगणामधील गरीब शेतकऱ्यांच्या मनावरील भ्रमाचा हा पडदा दूर करायचे काम आचार्य विनोबा यांच्या हातून प्रभावीपणाने सुरू आहे. साम्यवाद्यांच्या मार्गातील धोके व त्यापासून देशाची हानि होण्याचा संभव आचार्य तेलंगणाच्या लोकांच्या लक्षात आणून देत आहेत आणि हिंसेचा उपयोग न करता केवळ

समुपदेशाने, प्रेमाने आचार्य जमीनवाल्यांच्या जमिनी मिळवून त्या गरिबांना देववीत आहेत, हया गोष्टीमुळे आचार्यांच्या उपदेशाला व शिकवणीचा लोकांच्या मनावर परिणाम होत आहे. साम्यवाद्यांची नुसती चिकित्साच आचार्यांकडून ऐकावी लागत नाही, तर कोणत्याही गडबड गोंधळावाचून, अत्याचारावाचून, खून–मारामारीवाचून आपल्याला जमिनी मिळत आहेत, तुरुंगात अडकून पडण्याची पाळी कोणावरही यायचे कारण नाही, असे पाहिल्यावर साम्यवाद्यांच्या मार्गावरील भीतीयुक्त भक्तीतून मोकळे होऊन तेलंगणचे लोक आचार्यांचे अनुयायी बनले तर नवल नाही.''[२२]

थोडक्यात विनोबाजींनी भूमिहीनांना भूदान करून महान असे कार्य केले आहे.

## ४.१२ भ्रष्टाचार विरोधी 'नवाकाळ'ची भूमिका :–

भारताची अर्थव्यवस्था ढासळत चालली आहे ती भ्रष्टाचार, काळा पैसा (Black Money) मुळेच होय. याच बेहिशेबी काळ्या पैशांच्या मुद्यावर 'नवाकाळ' वृत्तपत्राने दिनांक १८ जाने. १९८१ रोजी 'सुपाने समुद्र कितीसा हटेल', अशा शीर्षकाखाली लहानसा पण अभ्यासू लेख लिहिला.

''फेब्रुवारी १९८१ साली बेहिशेबी काळा पैसा बाहेर काढण्यासठी राष्ट्रपतींनी एक अध्यादेश काढला. त्याची तीन महिन्यांची मुदत होती. योजना अशी होती की, दहा वर्ष मुदतीचे हे रोखे दहा हजार रुपये किंमतीचे असतील व मुदत संपल्यानंतर ते धारण करणाऱ्यांना त्यांचे प्रत्येक बारा हजार रुपये मिळतील. वाट्टेल त्या मर्यादेपर्यंत हे रोखे घेण्याची मुभा असून ते कोणत्याही प्रकारच्या करयंत्रणेपासून मुक्त असतील. दडवलेला पैसा अशा प्रकारे बाहेर काढण्याचा सरकारचा हा दुसरा प्रयत्न आहे. १९७५ साली एक प्रयत्न करून पाहिला तेव्हा सरकारला २५२ कोटी रुपये कर उत्पन्न मिळाले. काळा पैसा पांढरा करताना त्यातला फार मोठा भाग आयकर संपत्तीकर वगैरेसाठी खर्ची पडत असे. पण यावेळी असे काही होणार नाही. उलट दहा वर्षांनंतर तो पांढरा होणार हे प्रलोभन आहे. त्यामुळे १९७५ सालापेक्षा अधिक पैसा सरळ व्यवहारात उतरेल, अशी सरकार अपेक्षा करीत आहे. अशा पार्श्वभूमीवर कितीही आशावादी असले तरी अशी अर्थव्यवस्था व विरोधी पक्षनेत्यांच्या प्रतिक्रिया तशा नाहीत. उलट

अशा योजनेमुळे काळा पैसा वाढेल असेच म्हटले आहे. आजवरचा अनुभव पाहता ते खोटे आहे, असे म्हणता येणार नाही. पुढे 'नवाकाळ'ने आर्थिक विश्लेषण करताना असे म्हटले आहे की, १९७५ साली १५ हजार कोटी इतका काळा पैसा समांतर अर्थव्यवस्थेत होता. आता पाच वर्षांनी म्हणजे १९८१ साली दहा हजार कोटींनी तो वाढून २५ हजार कोटी रुपये इतका झाला आहे. त्या वेळी आणीबाणी असल्याने ६८९ कोटी रुपये काळ्याचे पांढरे झाले. आता आणीबाणीचा इंगा नाही तेव्हा इतके तरी होण्यात गुंतविले जातात की नाही कोणास ठाऊक! २५ हजार कोटी रुपयांची समांतर अर्थव्यवस्था निर्माण करणारा हा समुद्र निर्माण होतो कसा? या समुद्राची फक्त भरतीच असते आणि ओहोटी नसते हे कसे काय?

बेकायदा व्यवहार आणि करचुकवेपणा यातून काळ्या पैशांची निर्मिती होते. उदाहरण म्हणजे एखाद्या फर्निचरवाल्याकडून १०० रुपयाची खुर्ची आणली, पण त्याची पावती घेतली नाही तर त्या शंभर रुपयांवरील विक्रीकर व्यापारी चुकवू शकतो. तेवढ्या अल्प प्रमाणातही तो पैसा काळा बनतो.

काळा पैसा आणि चलनवाढ ही हातात हात घालून चालतात. या दोहोंत कार्यकारण भाव असतो. काळ्या पैशांपुढे चलनवाढीला पोषण मिळते आणि चलनवाढीमुळे काळ्या पैशाला पुन्हा भरती येते. लाचलुचपतीची जी मिरासदारी वाढली आहे ती काळ्या पैशांमुळे राजकारण्यांना आणि अधिकाऱ्यांना द्यावी लागणारी लाच पांढऱ्या पावलांनी थोडीच देण्यात येते? काळ्या पैशाचा विनियोग उधळपट्टीतच होतो. चैनीच्या वस्तूंची, अजीवनावश्यक वस्तूंची खरेदी काळ्या पैशांतून होते. ७९–८० सालात आपल्या देशाचा विकासाचा वेग उंचावला. पण काळा पैसा मात्र दुणावला! वांछू कमिटीत ६८–६९ साली व्यवहारात गुंतलेला जो काळा पैसा ७ हजार कोटींचा वाटला तोच आज १२ वर्षांनंतर २५ हजार कोटींवर गेला असल्याचे अर्थतज्ज्ञांना वाटते आहे. काळा पैसा सोन्यात व चांदीत गुंतवून अडकवून टाकण्यात येतो. त्यामुळे सोन्या–चांदीचे भाव वाढतात. जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन वाढत नाही. याचा अर्थ गेल्या तीस वर्षांत नियोजन असून नियोजनशून्य राहिलेली अशी आपली अर्थव्यवस्था आहे.''[२३]

थोडक्यात 'काळा पैसा' व्यवहारात आणण्यासाठी सरकार प्रयत्न करीत आहे. परंतु त्याचे नियोजन होत नाही. हा विचार 'नवाकाळ' ने आपल्या लेखाद्वारे मांडला.

**हर्षद मेहताच्या शेअर बाजारातील भ्रष्टाचाराविषयी :–**

१९९२ मध्ये शेअर बाजारात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार करणारा हर्षद मेहता सर्वांच्या चर्चेचा विषय झाला होता. हर्षद मेहताने शेअर बाजारात अब्जावधी रुपयांचा भ्रष्टाचार केला होता. दि. २४ मे १९९२ रोजी 'नवाकाळ' वृत्तपत्राने 'हर्षद मेहता' हा अग्रलेख प्रकाशित केला. तो अग्रलेख केवळ हर्षद मेहताच्या काळ्या कृत्यावर प्रकाशझोत टाकणारा नसून या देशातील ९९ टक्के वर्ग १ टक्का वर्गाच्या पिळवणुकीने कसा अंधारात फेकला गेला आहे, यावर प्रकाश टाकणारा आहे.

''अवघ्या ३७ वर्षांच्या हर्षद मेहताने शेअर बाजारात अठरा महिन्यांत एकच धमाल उडवून दिली. हर्षद मेहता असामान्य बुद्धिमान व कल्पक असून त्याने बड्या बँकांच्या उच्च अधिकाऱ्यांना मूर्ख बनविले, असे सांगण्यात आले. पण हर्षद मेहता असामान्य बुद्धिमान आणि बँकांचे अन्य अधिकारीही मूर्ख नाहीत. बडे उद्योगपती, राजकीय नेते, बँक अधिकारी, शेअर मार्केटमधील दलाल सर्वांची तुंबडी भरेल आणि सर्व जण स्वार्थासाठी साथ देतील, असा धंदा हर्षद मेहताने राजरोस केला. पण अखेर हा धंदा हवा भरून फुगा फुगविण्याचा होता. १८ महिन्यांनंतर फुगा फुटला आहे... ...

हर्षत मेहता १८ महिने हा धंदा करीत होता. संपूर्ण भारतात बोलबाला झाला होता. करोडो रुपयांची उलथापालथ होत होती. तरीही अर्थमंत्री मनमोहन सिंग, बँकेचे गव्हर्नर, युनिट ट्रस्टचे अध्यक्ष, स्टेट बँकेतील नोकरशाहीतील अधिकारी यांना कसलाच पत्ता नव्हता व आता एकाएकी रहस्याचा स्फोट झाला, असे थोडेच आहे? सारे संगनमताने चालले होते. पण सारे कृत्रिम होते आणि यामुळे फुटले! वास्तविक अर्थमंत्री मनमोहन सिंग आणि रिझर्व्ह बँकेचे सर्व वरिष्ठ अधिकारी यांनी तत्काळ राजीनामे द्यायला हवे आहेत. त्याऐवजी रिझर्व्ह बँक कराडच्या बँकेपासून काही बँकांच्या अधिकाऱ्यांचा राजीनामा घेत आहे!...

जीणे हराम होत आहे गरिबांचे आणि मध्यमवर्गीयांचे! ६१ कोटी रुपयांची वीज दरवाढ झाली म्हणून महापालिकेत निदर्शने करण्यात आली. चपला फेकण्यात आल्या. म्हणजे वीज दरवाढ लादली गेलीच. पण विरोधी पक्षावर प्रसिद्धीचा प्रकाशही पडला. आज शेअर्सचे भाव घसरले असले तरी हर्षद मेहताकडे ८०० कोटी रुपयांची संपत्ती आहे, असे जाहीर झाले आहे. त्याच्याशी संगनमत केलेल्यांकडे त्याहून अधिक संपत्ती जमा झालेली असणार! ''[२४]

थोडक्यात हर्षद मेहता सारख्या तरुणाने भारतीय अर्थवेवस्थेला काळीमा फासली त्याने शेअर्स बाजारात करोडो रुपयांची उलथापालथं करून भ्रष्टाचार केला.

**१ टक्का कडून ९९ टक्क्यांचे शोषण :–**

हर्षद मेहताच्या कोटयावधी रुपयांच्या भष्टचारी कृत्यावर 'नवाकाळ' वृत्तपत्राने प्रकाश टाकला तसेच देशात १ टक्का विरुध्द ९९ टक्के अशी देशाची विभागणी झालेली आहे. असे नीळकंठ खाडिलकर सांगतात. हा एक टक्का वर्ग कशा स्वरुपात एकवटला आहे आणि ९९ टक्के जनतेचे शोषण कशास्वरुपात करत आहे. हे हर्षद मेहताच्या प्रकरणातील 'सिमेंट कॉक्रीटने पक्की केलेली दोस्ती' या 'नवाकाळ' वृत्तापत्राच्या लेखातून दिनांक ३० ऑगस्ट १९९२ रोजी विवेचन मांडले.

''या देशात १ टक्के विरुध्द ९९ टक्के अशी विभागणी असून १ टक्का वर्ग ९९ टक्के जनतेला, चरकातून ऊस पिळावा त्याप्रमाणे पिळत आहे असे आम्ही जनतेला दीर्घकाळ मांडत आलो आहोत. सत्ताधारी, नोकरशहा, उद्योगपती, व्यापारी, बिल्डर व स्मगलर, बुध्दीमंत व विचारवंत या १ टक्का वर्गाची अभेद्य एकजूट आहे. हर्षद मेहताने ही गोष्ट नुसती ओळखली नाही. तर वापरली प्रथम सत्ताधारी पाहुया अर्थमंत्री मनमोहनसिंग इतके बहकले की, सरकारच्या मुक्त अर्थव्यस्थेच्या धोरणाने बाजारात तेजी आली असे सांगू लागले, हे कसे घडले? आता नोकरशाहीचे काय झाले. ते बघूया. रिझर्व्ह बँक ही 'बँकांची बँक' आहे. रिझर्व्ह बँकेचे सर्व बँकांवर नियत्रंण आहे. पण काही गैर चालले आहे असा त्यांना दीर्घकाळ संशय ही आला नाही. जेव्हा संशय आला तेव्हाही त्यांनी बँकांना फक्त पत्रे पाठविली ! केंद्रीय अर्थखात्यातील सर्वोच्च अधिकाऱ्यांनी तर अर्थमंत्रालयातच हर्षद मेहताची भेट अर्थसंकल्पापूर्वी घेतली ! कशासाठी तर हर्षद मेहताकडे 'उत्तम कल्पना' आहेत असे त्यांना कृष्णमूर्तीना सांगितले. कृष्णमूर्ती कोण होते? ते तेव्हा नियोजन मंडळाचे सदस्य होते. कृष्णमूर्तीच्या अमेरिकेत स्थायिक झालेल्या मुलांना पैशाची गरज होती. हर्षद मेहताला ही गुप्त गोष्ट त्याचा दिल्लीतील प्रतिनिधी खंडेलवाल याने सांगितली. हर्षद मेहताने आपल्या मुलाखतीत सांगितले आहे की, खंडेलवालने मला कृष्णमूर्तीच्या बेटयांची गरज सांगितली मी खंडेलवालला, देऊन टाक ! कृष्णमूर्तीच्या बेटयांना जितकी गरज आहे तितकी रक्कम देऊन टाक ! तेव्हा

खंडेलवालने ३२ लाख रुपये देऊन टाकले! हर्षद मेहताने मुलाखतीत पुढे सांगितले की, खंडेलवालने किती पैसे दिले ते मला माहित नाही. असल्या गोष्टीसाठी मला वेळ नाही ! 'स्वाभाविक आहे. कृष्णमूर्ती अनेक असणार ! या एक टक्का वर्गाची एकजूट भक्कम असते. कारण ती पैशाच्या सिमेंट कॉक्रीटने बांधलेली असते ! आता उद्योगपतीकडे वळू या. टाटाचे शेअर्स, धिरुभाई अंबानीच्या रिलायन्सचे शेअर्स असे बडया–बडया उद्योगपतीचे शेअर्स भराभर वर जाऊ लागले. यामुळे उद्योगपती हर्षद मेहताची भेट घेऊन आपल्या शेअर्सचे भाव वाढवून देण्याची हर्षद मेहताला विनंती करु लागले. हर्षद मेहता एखाद्या शेअरची खरेदी करु लागला की, सर्वजण त्या शेअरची खरेदी करण्यासाठी धावू लागले. अशी 'सायकॉलॉजी' तयार झाली होती. ही 'सायकॉलॉजी' शेअर बाजारची हालचाल पानभर देणाऱ्या बडया भांडवलदारांच्या वृतापत्रांनी तयार केली होती. आता स्मगलरचा एकजुटीतील सहभाग पहा. हर्षद एक कारकून होता. तरीही हर्षद मेहताला पहिले भांडवल दाऊदने दिले असा आरोप आहे. म्हणजे एक टक्का वर्गाचे सर्कल पूर्ण झाले !''[२५]

थोडक्यात हर्षद मेहता सारख्या एक टक्का वर्गाने सर्व सामान्य ९९ टक्के वर्गाचा पैसे लुटला परंतु या एक टक्का वर्गाची एकजूट असल्याने ९९ टक्के वर्गाची पिळवणूक होत आहे.

## ४.१३ मुंबई गिरणी कामगारांच्या चळवळी :–

मुंबईची खरी ओळख म्हणजे इथला कापड उद्योग, कापड गिरण्या, कामगारांच्या वस्त्या व त्यांच्या चाळी त्यांच्या वस्त्यातील सांस्कृतिक कार्यक्रम होय पण ती संस्कृती सध्याच्या काळात लोप झाली आहे. पुढील पिढीला ती दंतकथा वाटेल कारण गिरण्या बंद पडल्या काही कामगार मुंबई सोडून गेले आणि गिरण्यांच्या जमिनीवर टोलेजंग इमारती शॉपिंग मॉल निर्माण झाले. वाढलेल्या लोकसंख्येसाठी नवीन इमारती तसेच नवीन उपनगरे विकसित झाली. त्यांच्या सोयीसाठी रस्ते,रेल्वे,मेट्रो रेल,मोनो रेल, मोठं मोठे उडाणपूल निर्माण झाले. अनेक जुन्या इमारती झोपडया पाडून नवनवीन सोसायटया उभ्या राहिल्या त्यात जुन्या मुंबईतील अनेक जुन्या वास्तूची ओळख पुसून गेली. मुंबई म्हंटले तर गिरणगाव अशी तिची ओळख कुलाब्या पासून लालबाग परळ दादर इथे कामगारांच्या वस्त्या होत्या. १९८२ च्या संपानंतर कामगारांची वाताहत झाली सुमारे एक दशकाहून अधिक काळ मुंबईत कामगार

चळवळींचे अधिराज्य होते. देशाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय वाटचालीत ह्या कामगार चळवळींनी विशेष महत्व प्राप्त करून दिले.

**कामगारांच्या वस्त्या : –**

पहिल्या महायुद्धाचा प्रारंभ होईपर्यंत मुंबईचा विकास हा इंग्लंडशी निगडित होता. व्यापार आणि सूत, कापड गिरण्या हीच मुंबईतील रोजगाराची साधने होती. इथल्या कापड उद्योगामुळेच हे शहर नावारूपाला आले. 'बॉम्बे स्पिनिंग मिल' ही १८५१मध्ये कानसजी नानाभाई दावर या पारशी उद्योजकाने पहिली गिरणी चालू केली. अठराव्या शतकात सुरु झालेल्या कापड गिरण्या विसाव्या शतकापर्यंत त्यांचा विस्तार वाढला. त्यासाठी लागणारे कामगार त्यांच्या राहण्यासाठी घरे सरकारच्या मदतीने गिरणीमालकानी 'बॉम्बे इम्प्रुव्हमेंट ॲक्ट' खाली कामगारांसाठी घर बांधायला सुरुवात केली. देशाच्या कानाकोपऱ्यातून प्रामुख्याने कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तरप्रदेश अनेक भागातून कामगार मुंबईत आले होते. १९५७ सालातल्या कामगारांच्या संख्ये पैकी ५५ टक्के कामगार हे गिरणी कामगार होते. त्यांची संख्या कमी होत १९८२च्या संपामुळे एक लाख वीस हजार कामगार बेकार झाले तर १९९१ मध्ये तर फक्त जेमतेम ऐंशी हजार उरले.

**कामगार चळवळीची सुरवात व पार्श्वभूमी : –**

कामगारांच्या शोषणाविरुद्ध तसेच त्यांचे न्याय हक्क मिळवण्यासाठी इसवी सन १८९० मध्ये मुंबईत ना. म. लोखंडे यांनी 'बॉम्बे हँड्स असोसिएशन' या नावाने संस्था स्थापन केली ती भारतातील पहिली कामगार संघटना मानली जाते. लोकमान्य टिळकांना जेव्हा १९०८ साली सहा वर्षांची शिक्षा झाली त्यावेळी मुंबईच्या कामगारांनी सहा दिवस अभूतपूर्व संप केला होता अनेक स्तरांतून कामगारांना पाठिंबा मिळाला होता. कामगारांच्या पाठीशी कोणतीही राजकीय शक्ती व मार्गदर्शन नसतानाही त्यांनी जो लढा दिला त्याबद्दल त्या वेळेचे 'केसरी' वृत्तपत्राचे संपादक कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर हे प्रेरित होऊन त्यांनी केसरीत 'सर्वात पुढे मुंबईच का?' ही लेखमाला लिहिली.

**कामगार चळवळींना प्रारंभ : –**

दोन महायुद्धांच्या दरम्यान सर्व युरोप व भांडवलशाही वर्ग हा आर्थिक मंदीमुळे त्रस्त झाला होता. सर्वत्र आर्थिक व राजकीय असंतोषाचा काळ होता. ह्याच दरम्यान अनेक कामगार चळवळी व संघटना उदयास आल्या कामगारांच्या हितासाठी काही संस्थाही निर्माण झाल्या. मुंबईमधील 'कामगार हितवर्धक सभा', 'सोशल सर्व्हिस लीग' बंगालमधील 'कामगारांचे मिशन' ह्या सारख्या संघटना निर्माण झाल्या परंतु त्या सर्व संघटना 'कामगार संघ' (ट्रेड युनियन) नव्हत्या. पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात छोटे संप वारंवार झाले. त्याच दरम्यान १९२०साली 'ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस'(आयटक) ह्या अखिल भारतीय पातळीवरच्या पहिल्या कामगार संघटनेची स्थापना लो. मा. टिळक व लाला लजपतराय यांच्या पुढाकाराने आयटक ची सुरुवात व वाटचाल सुरु झाली १९२५ साली ना.म. जोशी यांनी 'बॉम्बे टेक्स्टाईल लेबर युनियन' ची स्थापना केली. त्या पाठोपाठ कामगार पक्षाने १ मे १९२८ रोजी मुंबईत पहिल्यांदाच १ मे दिन साजरा केला. १९२० नंतरच्या काळात कामगारवर्गात कम्युनिस्टांच्या नेतृत्वाचा प्रभाव अधिक होता. १९२५ डिसेंबर ला कानपुर येथे कम्युनिस्ट पक्षाची स्थापना होऊन त्यांनी 'मुंबई गिरण कामगार युनियन' (लाल बावटा) या कामगार संघटनेची स्थापना झाली. संघटनेत श्रीपाद अमृत डांगे या कामगार नेत्याचे वर्चस्व व प्रभाव कामगार वर्गात मोठा होता. त्याच साली १९२८ ला त्यांनी कामगारांचा ६ महिन्यांचा यशस्वी संप घडवून आणला त्या संपास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ही पाठिंबा दिला.

१९४० पर्यंत कामगार वर्गात कम्युनिस्ट प्रणित (लाला बावटा) युनियन चे वर्चस्व होते. पुढे १९३८ साली काँग्रेसच्या गं .द. आंबेकर ह्या गांधीवादी नेत्याने 'राष्ट्रीय गिरणी कामगार संघ ' ह्या कामगार संघटनेची स्थापना केली. नंतर कांग्रेसच्याच स. का .पाटील ह्यांनी मुंबई प्रांतिक काँग्रेसच्या वतीने १९४५ साली 'बॉम्बे मिल मजदूर युनियन' काढली. पुढे दोन्ही संघटना एकत्रित करून 'राष्ट्रीय मिल मजदूर संघ' ह्या नावाने तिची स्थापन केली. १९४६ मध्ये विधिमंडळ निवडणुकीत काँग्रेसच्या घवघवीत यशानंतर काँग्रेसने आयटक संघटनेत फूट पडून 'राष्ट्रीय मजदूर काँग्रेस' म्हणजे इंटक ची स्थापना केली. व ३ मे १९४७ ला तिच्याशी 'राष्ट्रीय मिल मजदूर संघ' संलग्न झाला. १९४७ च्या भारताच्या स्वातंत्र्यानंतर कामगार वर्ग काँग्रेस

पक्षाकडे आकर्षित झाला होता. त्याचा परिणामी कामगार संघटनेतील कामगारातही झाला होता. परंतु त्यात देशाच्या विभागणीच्या वेळी व अस्थिर गुंतागुंतीच्या काळात कामगार मंत्री गुलझारीलाल  नंदा यांनी 'बॉम्बे इंडस्ट्रियल रिलेशन्स ॲक्ट' ची घोषणा केली. औदयोगिक कामगार क्षेत्रात नवीनच कायदा मुंबई औद्योगिक संबंध कायदा (बी.आर.आय)काँग्रेस पुरस्कृत सरकारने कामगार विरोधी व कारखानदारांच्या फायद्याचा कायदा कामगारांवर लादला. हा कायदा इतका जाचक होता की जर एखाद्या परिस्थितीमध्ये १०० टक्के कामगार प्रस्थापित प्रातिनिधिक संघटनेच्या विरोधात गेले तरी प्रत्यक्षात कायद्याने दुसऱ्या युनियनला ती मान्यता मिळणे अतिशय जिकरीचे होईल. त्यामुळेच पुढील काळात ह्याच कायद्यामुळे  कामगारांचे अतोनात नुकसान झाले.

स्वातंत्र्यानंतर काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या समाजवाद्यांनी स्वतःची 'मिल मजदूर सभा' स्थापन केली व १९५० साली अशोक मेहताच्या नेतृत्वाखाली बासष्ट दिवसांचा संप बोनसच्या निमित्ताने करण्यात  आला असला तरी परंतु कामगारांचे प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार कोणत्या संघटनेला असावा हे होते. कायद्याने हा हक्क इंटकच्या 'राष्ट्रीय मिल मजदूर संघ' ला दिला होता. तर मिल मजदूर सभा चे असे म्हणणे होते की बहुसंख्य कामगारांचा पाठिंबा आम्हाला असल्यामुळे प्रतिनिधित्वाची अधिकार आपणास मिळाला पाहिजे ही मागणी मान्य न झाल्यामुळे त्यावेळी चालू असलेल्या बोनसच्या मागणीवर मिल मजदूर सभेने दोन महिन्यांहून अधिक काळ संप चालवला होता.  मुंबईतील कापड गिरण्या बंद होत्या, संपात पुढाऱ्यांना अटक करून सर्वत्र १४४ कलम लागू केले. तसेच गोळीबार व लाठीहल्ला झाला, काही कामगार बळी गेले कामगारांनी बिनशर्त संप मागे घेतला. स्वातंत्र्यानंतर काही वर्षातच कामगारांना आपल्याच देशात आपल्याच सरकारच्या ह्या कामगार विरोधी वागणुकीमुळे द्वेषाची भावना निर्माण झाली.

### १९८२ च्या ऐतिहासिक संपाची पार्श्वभूमी : –

संपापूर्वी म्हणजे १९८१च्या बोनसवरून जी अधिकृत कामगार युनियन 'राष्ट्रीय मिल मजदूर संघ' बद्दल कामगार वर्गात एक अविश्वासाची भावना निर्माण झाली कारण कामगारांना २० टक्के बोनस मिळवून देऊ असे आश्वासन देऊनही फक्त ८ ते १७ टक्के वर

गिरणी मालकांशी तडजोड केल्याने कामगार वर्ग मिळणाऱ्या बोनसविषयी संतुष्ट नव्हता. कुठल्याच संघटनेवर कामगारांचा विश्वास राहिला नव्हता. 'राष्ट्रीय मिल मजदूर संघ' ही आपल्यावर लादलेली संघटना आहे. अशी भावना त्यांच्यात निर्माण झाली अनेक कामगार निकराचा लढा देण्यासाठी खंबीर नेतृत्व शोधात होते. एक मोठा कामगार वर्ग शिवसेनेकडे आशेने पाहत होता कारण गिरणगावात शिवसेनेचे चांगले वर्चस्व होते. १नोव्हेंबर १९८१रोजी शिवसेना प्रमुख बाळासाहेबांनी बंदच आव्हान केलं ते यशस्वी झाले. पुढे १५नोव्हेंबर पर्यंत मागण्या मान्य न झाल्यास संपावर जाण्याचे आक्रमक पाऊल टाकण्याचे कामगारांना आश्वासन ही दिले होते. हा प्रश्न राजकीय पातळीवर सोडवण्यासाठी त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री अंतुले ह्यांच्याशी चर्चा करून संप न करण्याचा निर्णय घेतला परंतु कामगारांच्या मोठ्या गटाने त्यास विरोध केला.

**डॉ दत्ता सामंत यांचा संप : –**

कोणतीही प्रभावी संघटना आपली वाली राहिली नसल्याची भावना कामगारांत रुजली या सर्व पार्श्वभूमीवर त्यांच्या दृष्टिकोनातून इतर उद्योगांमधील कामगारांचे पगार वाढण्यामागे इंटकच्या डॉ सामंत यांचे योगदान मोठे होते. एक प्रामाणिक व लढाऊ नेता म्हणून त्यांची प्रतिमा निर्माण झाली होती. इंटकशी संबंधित असूनही आणीबाणीत तुरुंगवास घडल्याने त्यांचे व्यक्तीमत्व कामगार आपला भावी नेता म्हणून पाहत होते. विविध नेतृत्वाची पारख करूनच नंतर कामगारांनी त्यांच्या नेतृत्वाची निवड केली. डॉ सामंत ह्यांच्या मते सध्याची परिस्थिती संप करण्याची नाही असे त्यांचे मत असतानाही कामगारांनी त्यांना संपाचे नेतृत्व स्विकारण्यास भाग पाडले होते. १८जानेवारी १९८२ ला मुंबईत डॉ सामंत यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील ६५ गिरण्यात अडीच लाख कामगारांनी संप सुरु झाला. मुंबईत सर्वत्र शुकशुकाट, भोंगे बंद, यंत्र बंद, मुख्यमंत्री अंतुले यांनी ह्या प्रश्नाचा तोडगा काढण्यासाठी त्रिपक्षीय समिती नेमली पण वादग्रस्त सिमेंट प्रकरणामुळे त्यांचे मुख्यमंत्री पद जाऊन बाबासाहेब भोसले नवे मुख्यमंत्री झाले.

**राजकीय नेत्यांचे धोरण :–**

''१८ जानेवारी १९८२ रोजी मुंबईतील सुमारे अडीच लाख कामगार संपावर गेले व मुंबईत सर्वत्र शुकशुकाट झाला. भोंगे बंद, वर्दळ बंद, यंत्र बंद. दरम्यान, अंतुले यांनी या समस्येवर तोडगा काढण्यासाठी एक त्रिपक्षीय समिती नेमली होती. पण वादग्रस्त सिमेंट प्रकरणामुळे त्यांनाच पायउतार व्हावं लागलं व बाळासाहेब भोसले मुख्यमंत्रीपदी आरूढ झाले. बीआयआर कायद्यानुसार सरकार फक्त रा.मि.म. संघसारख्या मान्यताप्राप्त संघटनेशीच बोलणी करेल, अशी भूमिका त्यांनी घेतली. डॉ. दत्ता सामंतांशी बोलणी करण्यास सरकार राजी नव्हतं. याउलट सामंत यांनी तर बीआयआर कायदा रद्दबातल ठरवण्याची मागणी पुढे रेटलेली होती. संपाचा काळ वाढत जाऊ लागला, तेव्हा व्ही.पी. सिंग यांनी मध्यस्थी करण्याचे प्रयत्न केले.

पण दरम्यान, रा.मि.म. संघाचे नेते वसंतराव होशिंग व भाई भोसले दिल्लीला जाऊन पंतप्रधान इंदिरा गांधींना भेटून आल्यावर सर्व ठप्पच झालं. डॉ. दत्ता सामंतांशी बोलणी न करण्याचे संकेत स्पष्टपणे दिले गेले.''

अशा या ऐतिहासिक संपाचा वृत्तांत व राजकीय नेत्यांचे धोरण 'नवाकाळ' वृत्तपत्रामधून दि. २३ फेब्रुवारी १९८२ रोजी 'बाबासाहेब, या निर्धाराला सलाम तरी करा', हा अग्रलेख प्रकाशित झाला. त्यात नीळकंठ खाडिलकरांनी पुढील विवेचन सादर केले–

''अडीच लाख गिरणी कामगारांच्या १८ जानेवारी रोजी सुरू झालेल्या संपाला एक महिना उलटून गेला तरी अद्याप कोंडी फुटण्याच्या दिशेने एकही पाऊल पडलेले नाही एकूण बासष्ट गिरण्यांपैकी सात गिरण्यांत बोनसच्या प्रश्नावर ऑक्टोबरमध्ये संप सुरू झाला असून त्या संपाला चार महिने होऊन गेले आहेत. कापड गिरणी धंदा मुंबईतील आद्य उद्योगधंदा असून असा निर्धारी संप गेल्या शंभर वर्षांच्या इतिहासात झालेला नाही. ही गोष्ट निर्विवादपणे मान्य केली पाहिजे. कॉ. श्रीपाद डांगे हे चाळीस वर्षे गिरणी कामगार क्षेत्रात जबरदस्त प्रभावाने वावरले. ज्यांच्या शब्दावरही संप सुरू होत असे आणि शब्दासरशी संप संपत असे, अशा कॉ. श्रीपाद डांगे यांनाही एवढा प्रभावी संप करता आला नाही! आज दोन–चार गिरण्या सुरू आहेत, असा दावा सरकारतर्फेही करण्यात येत आहे. तो निव्वळ बेशरम खोटेपणा असून कुठल्याही गिरणीत कामगार रूजू झालेला नाही. महाराष्ट्र सरकारच्या मंत्र्यांना

आमचे आव्हान आहे की, हिम्मत असेल तर त्यांनी स्वतः वार्ताहरांना नेऊन त्यांच्या प्रचाराप्रमाणे सुरू असलेल्या चार गिरण्या दाखवाव्यात आणि गिरण्या सुरू नाहीत, असे दिसले तर राजीनामा द्यावा! डॉ. दत्ता सामंत हे या अद्वितीय संपाचे नेते असले तरी गिरणी कामगार क्षेत्रातील यापूर्वीच्या नेत्याप्रमाणे ते गिरणी विभागात सकाळ–दुपार संचार करीत नाहीत. ते नव्यानेच गिरणी कामगारांचे नेतृत्व करीत असल्याने त्यांच्याजवळ गिरण्यांचा संप चालविण्यासाठी आवश्यक तितकी संघटना नाही. किंबहुना ते महाराष्ट्राच्या दौऱ्यावरही जाऊन येत असून संपाचा किल्ला जसाच्या तसा अभेद्य आहे. अत्यंत आश्चर्याची बाब अशी की, बोनसच्या प्रश्नावर जे गिरणी कामगार चार महिन्यांहून अधिक काळ संपावर आहेत त्यांनी मिळेल तेवढा बोनसही घेतलेला नाही आणि पगारही घेतलेला नाही! संपकाळातील चार महिन्यांचा पगारही नाही आणि तरीही गिरणीवर ते फिरकत नाहीत. राष्ट्रीय मिल मजदूर संघाची संघटना, सरकारचे पोलीस आणि गिरणी मालकांची धमकावणी या कशालाही ते दाद देत नाहीत. मुख्यमंत्री ना. बाबासाहेब भोसले यांच्या आवाहनाचा त्यांच्यावर काहीही परिणाम झालेला नाही. गिरणी कामगारांचा मनातच असंतोष आहे. त्यांनीच पोलादी निर्धार केला आहे. आणि डॉ. दत्ता सामंत यांना बोलावून घेऊन त्यांच्यावर श्रद्धापूर्वक नेतृत्व सोपविले आहे. दिवंगत कै. गं.द. आंबेकर काय किंवा कॉ. श्रीपाद डांगे काय, त्यांनी गिरणी कामगारांचे क्षेत्र हीच आपली कर्मभूमी आणि रंगभूमी केली होती. ते वर्षानुवर्षे गिरणी कामगारांसाठी त्यागपूर्वक झगडले होते आणि झटले होते. याउलट डॉ. दत्ता सामंतांनी इतरत्र लढाया लढविल्या, मर्दुमकी गाजविली आणि गिरणी कामगार क्षेत्रात तपश्चर्या करण्यापूर्वीच इतरत्रच्या कार्यामुळे त्यांना गिरणी कामगारांनी नेतृत्व दिले आहे. गिरणी कामगारांनी स्वतः ठरवून चालविलेल्या या निर्धारी संपाबद्दल डॉ. दत्ता सामंत यांनीही जाहीरपणे सांगितले की, 'मी इतके संप लढविले, पण असा पोलादी संप पहिलाच!' डॉ. दत्ता सामंत जे म्हणाले ते अक्षरशः खरे आहे. संपाच्या आजच्या सम्राटानेही ज्याला मानाचा मुजरा जाहीरपणे केला असा हा ऐतिहासिक संप आहे.''[२६]

**संपाची कारणे व वाटचाल : –**

संपाची कारणे अनेक होती त्यातील मुख्य कारण म्हणजे अन्य उद्योग धंद्यांच्या तुलनेत गिरणी कामगारांचे वेतन खूप कमी होते. तसेच वर्षानुवर्ष बदली कामगार म्हणून काम

करणारा कामगार कायमस्वरूपी होत नव्हते. कुठलीही मान्यताप्राप्त युनियन त्यांचे प्रश्न सोडवत नव्हती तसेच १९४७ च्या 'बॉम्बे इंडस्ट्रियल ॲक्ट'(बी.आर.आय) या कायद्याला कामगारांचा विरोध होता. तसेच त्यावेळच्या राजकीय व आर्थिक अस्थिर वातावरणामुळे कामगारांनी संपात उडी घेतली परंतु (बी.आर.आय) कायद्यानुसार सरकार फक्त आर.एम.एस (राष्ट्रीय मिल मजदूर संघ)सारख्या मान्यताप्राप्त संघटनेशीच बोलणी करेल अशी भूमिका सरकारची होती तर डॉ. दत्ता सामंतांनी बनवलेली 'महाराष्ट्र गिरणी कामगार युनियन' मान्यताप्राप्त नव्हती. त्यामुळे त्यांच्याशी वाटाघाटी करण्यास गिरणीमालक संघ तथा राजकीय पुढारी तयार नव्हते. याउलट डॉ सामंतांनी तर (बी.आर.आय) हा कायदाच रद्द करण्याची मागणी केली होती. त्यामुळे संपाचा काळ वाढत जाऊ लागला. कामगार वर्ग सरकारी उदासीनतेमुळे भरडला गेला. संपामुळे कामगारांना पगार नसल्यामुळे उपासमारीला सामोरे जावे लागले. संप काळात कामगारांना महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी मदत म्हणून ग्रामीण भागातून अन्नधान्य मुंबईत कामगारांसाठी येत होते. पुढे १६ सप्टेंबर १९८२ ला डॉ.दत्ता सामंत यांनी दीड लाख कामगारांचा मोर्चा विधानसभेवर नेला. परंतु सरकारच्या ताठर भूमिकेमुळे संप चिघळला. संप फोडण्यासाठी साम,दाम,दंड,भेद या नीतीचा वापर मालक वर्गाकडून करण्यात आला. परंतु संप मागे घेण्यात आला नाही. अखेर एक वर्षानंतर संप चिघळला कामगारांची अन्नअन्न दशा सुरु झाली १९८२ चा संप हा कामगारांच्या स्वयंस्फूर्तीने सुरु झाला परंतु १९८३ जानेवारी महिना उलटूनच इंदिरा गांधीच्या सरकारने निष्ठुरता कायम ठेवली डॉ सामंतांनीही संप मागे घेतला नाही. अनेक राजकीय व सामाजिक संघटनांनी हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला. १९८४ ते १९८५ या काळात वस्त्रोद्योग अडचणीच्या काळात चालला होता. ज्या गिरणी मालकांनी वेळोवेळी आपल्या मिल मध्ये आधुनिकीकरण केले त्या गिरण्या टिकल्या मात्र ज्या मालकांनी नफा इतरत्र वळवले त्या गिरण्यांची  वाताहत झाली. त्यात कामगारांचे संप उद्भवल्यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या गिरणी मालकांनी हळूहळू यंत्राचे भाग सुटे करून गिरण्या मुंबई बाहेर हलवण्याचा प्रयत्न सुरु केला त्यातून मालकवर्गाने गिरणीतील अतिरिक्त जमीन विकून त्यातून बिनव्याजी भांडवल उभारू व आधुनिकीकरण करून गिरण्या पुढे चालू ठेवू अशी मागणी करण्यात आली. त्यास कामगार संघटनेचा विरोध होता. भांडवलाअभावी मुंबईतील १० गिरण्या १९८७ ला बंद पडल्या.

**१२ वर्षांनंतर गिरणी कामगारांची अवस्था :–**

पुढे १२ वर्षांनंतर या संपाचे पडसाद काय उमटले? गिरणी कामगारांची अवस्था काय झाली? तसेच 'नवाकाळ' वृत्तपत्राने गिरणी कामगारांसाठी केलेले सहकार्य यावर दि. ३० ऑक्टोबर १९९४ रोजीच्या 'नवाकाळ' वृत्तपत्रात 'गिरणी मालक करोडो कमावत आहेत! गिरणी कामगार कवड्या मोजत आहेत' हा अग्रलेख प्रकाशित झाला. त्यात नीळकंठ खाडिलकर म्हणतात–

'व्हॉट ए फॉल वॉज देअर, माय कंट्रीमेन'

''अद्‌भूत आश्चर्य असे की, डरकाळी फोडणाऱ्या व नरडी घोटणाऱ्या सिंहाचा ससा झाला आहे आणि वाघाची शेळी झाली आहे!!! ज्या गिरणी कामगारांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यापासून संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनापर्यंत सर्व लढाया शौर्याने व बहादुरीने लढविल्या, त्या गिरणी कामगारांनी या अन्यायाविरुद्ध कसलाही आवाज उठविला नाही! उद्या सोमवारी ते बोनस घेतील व त्यांना सावकार गराडा घालतील! ज्या खटाव मिलच्या जमिनीचे कोट्यवधी रुपयांचे सौदे होत आहेत, त्या खटाव मिलचे कामगारही कायद्यानुसारच किमान सव्वाआठ टक्के बोनस गुमानपणे घेणार आहेत! तिथे गिरणी मालक करोडो रुपये कमावत आहेत व कमावणार आहेत. तिथे गिरणी कामगार कवड्या मोजत आहेत! जिथे गिरणी मालक हिरे–मोती वेचत आहेत तिथे गिरणी कामगार भेसळीच्या धान्यातील खडे निवडीत आहेत! सारे कसे शांत शांत चालले आहे!

१९८० साली खाजगी गिरण्या ६० होत्या आणि गिरण कामगार २ लाख ४० हजार होते! आज चौदा वर्षांनंतर खाजगी गिरण्या फक्त १८ आहेत आणि कामगार फक्त ८० हजार आहेत! गिरणी कामगारांची एवढी प्रचंड कपात झाली आहे की, पानिपतच्या लढाईतही अशी हानी झाली नाही! अनेक गिरणी कामगारांनी स्वतःला जाळून घेतले! कित्येक गावी परतले! कित्येक रस्त्यावर आले! या भयंकर वाताहतीचे वास्तव वर्णन जरी केले तरी पाषाणालाही पाझर फुटेल. पहाडाला कंप सुटेल आणि तेजस्वी सूर्यही उदास होईल! शब्दप्रभू शेक्सपियरला शरण जाऊन आम्ही इतकेच म्हणतो की, what a fall was there, my countryment ! केवढा हा भयानक अधःपात झाला, माझ्या देशबांधवांनो!

**१९४६ साली रक्ताचे पाट वाहिले :–**

लोकमान्य टिळकांना १९०८ साली मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ती दावर यांनी सहा वर्षांची शिक्षा ठोठावली, तेव्हा कोणत्याही नेत्याने कसलाही आदेश न देता हजारो गिरणी कामगार गिरण्यांतून स्वयंस्फूर्तीने बाहेर पडले होते आणि त्यांनी लोकमान्य टिळकांना झालेल्या शिक्षेचा धिक्कार केला होता! भारतातील हा पहिला राजकीय संप आणि गिरणी कामगारांचा लढवय्या इतिहासातील सर्वात गौरवशाली पान! १९४६ साली मुंबापुरीच्या सागरातील नाविक दलाने बंड पुकारले आणि या बंडाने स्वातंत्र्यसूर्याचा पहिला किरण भारतावर पसरला! त्यावेळी २२ फेब्रुवारी १९४६ रोजी झुंजार गिरणी कामगार नाविक बंडाला पाठिंबा देण्यासाठी संप पुकारून रस्त्यावर उतरला! ब्रिटिशांनी रस्त्यात मशिनगन आणल्या. लॉरीतून सशस्त्र सैनिक दुतर्फा गोळ्या झाडत गेले.

तेव्हाचे हे भीषण वृत्त पहा, 'रस्तोरस्ती कामगारांचे रक्त वाहत होते. डिलाईल रोडला कामगारांनी साडेतीन दिवस शंभर सशस्त्र सैनिकांशी सरळसरळ सामना चालविला होता. सैनिकांना चार वेळा धूम ठोकावी लागली. चार सैनिकांनी आपले गणवेश फेकून पळ काढला. मग ब्रिटिश लष्कराची लॉरी आली. त्यांनी गोळ्या घातल्या, पण कामगारांनी दगडांनी प्रतिकार केला. या तीन दिवसांत २५० लोक ठार झाले, असे अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आले!'

**गिरणी कामगार थकला व लढायचे विसरला**

गिरणी कामगारांनी कम्युनिस्टांच्या व डाव्यांच्या नेतृत्वाखाली अनेक उग्र लढे लढविले तथापि नंतर त्यांचे नेतृत्व सोडून १८ जानेवारी १९८२ रोजी डॉ. दत्ता सामंत यांच्या नेतृत्वाखाली गिरणी कामगारांनी संप सुरू केला! जवळजवळ एक वर्षानंतर हा संप मोडून पडला. पण अद्याप मागे घेतलेला नाही. सर्वात प्रदीर्घ काळ चाललेल्या संपाचा रेकॉर्ड गिनीज बुकसाठी झाला. पण या संपानंतर गिरणी कामगार कमालीचा थकला व खचला! त्यांच्यातील लढण्याचे त्राणच नाहीसे झाले! त्याची ईर्षाच लुप्त झाली! तो दीनवाणा झाला!

संपानंतर गिरणी कामगारांची २७ कोटी रुपयांची थकबाकी होती! पण गिरणी मालक खचलेल्या गिरणी कामगारांना एक पैसाही द्यायला तयार नव्हते! प्रॉव्हिडंट फंडही बुडवून खंत करीत होते. या वेळी आम्ही 'प्रॅक्टिकल सोशॅलिझम फ्रंटतर्फे' गिरणी कामगारांसाठी 'अचानक अहिंसक तंत्रा'चा लढा केला. गिरणी मालकांची वार्षिक सर्वसाधारण सभा प्रथमतःच

उधळली! तेव्हा शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री होते. त्यांनी 'प्रॅक्टिकल सोशॅलिझम फ्रंट'च्या मागणीनुसार गिरणी कामगारांची थकबाकी नक्की करण्यासाठी कोतवाल कमिटी नेमली. कोतवाल कमिटीने २७ कोटींची थकबाकी अधिकृतरीत्या जाहीर केल्यावर त्यापैकी १० कोटींची थकबाकी गिरणी कामगारांना देण्यात आली! ...

...त्याविरुद्ध जंगी लढा करणे आवश्यक होते. पण गिरणी कामगार उद्ध्वस्त झाला होता. कुणी आत्महत्या करीत होते! कुणी उपाशीपोटी काबाडकष्ट करीत क्षयाने मरत होते! गिरणी कामगार लढ्याचे नावही घेत नव्हता! जीव वाचवत होता आणि आला दिवस जगत होता! गिरणी कामगार लढायचेच विसरला आणि चोरांनी त्याची जी लुटालुट केली ती लुटालुट आजतागायत सुरू आहे! त्याला आज कुणी वाली नाही. महाभारतीय युद्धानंतर ज्याप्रमाणे मुडद्यांच्या मांसाचे लचके तोडण्यासाठी गिधाडे आकाशात जमतात, त्याप्रमाणे कोट्यवधी रुपयांच्या जमिनींचे लचके तोडण्यासाठी सत्ताधारी, मतलबी युनियन नेते, गँगस्टर आणि गिरणी मालक आकाशात घिरट्या घालत आहेत! गिधाडांची मेजवानी सुरू आहे! गिरणी कामगार मिळेल तो पगार व बोनस मुकाट्याने घेऊन न बोलता घरी जात आहे! काढून टाकले की, खोली विकून गावी जात आहे! गिरणी कामगार लढायचे विसरला आणि त्याची धूळधाण झाली! आणखी काही वर्षांत जिथे गिरण्या होत्या तिथे गिरण्यांच्या धुरांड्यापेक्षा किती तरी अधिक उंच गगनचुंबी इमारती होतील! सिंगापूर नव्हे 'झिंगापूर' सर्वप्रथम गिरणगावात उभारले जाईल आणि गिरणी कामगार दिसेनासा होईल! मराठी माणसे मोजता येतील इतकी कमी राहतील!

**लढायचे विसरले की, चोरांनी लुटलेच !**

आम्हाला महाभारतातील महापराक्रमी महाधनुर्धारी अर्जुनाची अखेरची दुर्दशा गिरणी कामगारांच्या विलक्षण विनाशामुळे आठवते! महाभारतीय युद्धानंतर आणि कृष्णाच्या मृत्युनंतर कृष्णाच्या स्त्रियांना संरक्षण देत अर्जुन चालला होता. मध्येच अर्जुनाला चोरट्यांनी गाठले. ज्याला युद्धात कधी पराजय माहीत नव्हता, ज्याच्या बाणांनी अग्निप्रलय उसळत असे आणि आकाश दुभंगत असे, त्या अर्जुनाने आपल्या धनुष्यावर बाण चढविला. पण त्याला मंत्र आठवेना! शत्रूला लोळविणारा बाण सोडताच येईना! अर्जुन लढायचे विसरला होता! यामुळे चोरट्यांनी अर्जुनाला घेरून बेदम बडविले! कृष्णाच्या स्त्रियाही पळवून नेल्या! ज्याच्यासारखा धनुर्धारी या विश्वात कर्णाखेरीज अन्य झाला नाही त्या अर्जुनाची दुर्दशा आणि ज्या गिरणी

कामगारांनी गोळ्यांचा वर्षाव करणाऱ्या ब्रिटिश लष्कराला १९४६ साली पळविले व मशीनगनसमोर छाती उघडी केली. त्या गिरणी कामगारांची आजची दुर्दशा, यात केवढे साम्य आहे! अर्जुनाला व गिरणी कामगारांना चोरांनी लुटले! लढायचे विसरले की, चोरांनी लुटलेच व गुंडांनी पळविलेच! मग कृष्णसखा अर्जुन असो, नाहीत स्वातंत्र्याच्या, संयुक्त महाराष्ट्राच्या व कामगार आंदोलनाच्या भारतीय युद्धात पराक्रमाचे विक्रम करीत वीजिगिषू लढवय्या गिरणी कामगार असो!''[२७]

थोडक्यात गिरणी उद्योग सुरू झाल्यापासून कामगार वर्गात अनेक संप आंदोलने करण्यात आली त्यांची कारणे अनेक होती बोनस,वेतन, कामगारांचे हक्क तसेच पुढे गिरण्यांच्या चाळीचा प्रश्न व बंद पडलेल्या गिरण्यांच्या सुरू करण्यासाठी संघर्ष करावे लागले. न्यायालयीन खटले लढावे लागले. तसेच सरकारला गिरण्यांच्या जमिनीत कामगारांसाठी घरे बांधून देण्यास भाग पाडले. अशा अनेक संघर्षातून मुंबईतील कामगार गेल्या दीड दशकापासून ना.म.लोखंडे यांच्यापासून ते श्रीपाद अमृत डांगे, डॉ.सामंत, दत्ता इस्वलकर अशा अनेक भिन्न कालखंडातील भिन्न विचार प्रवाहातील कामगार पुढाऱ्यांनी कामगारांच्या कल्याणासाठी आपले आयुष्य खर्ची केले त्यात कामगारांचा ध्येय निर्धार मजबूत होता. १९८२ या संपात कामगार वर्ग आर्थिक अडचणीमुळे पिचला हा वर्ग अशिक्षित होता पण तो कष्टाळू होता. नंतर अनेक कामगारांनी टॅक्सी चालवली, फळे भाजीपाला विकला, वडापाव विकला ज्यांना शेती होती ते आपल्या गावी गेले. तंत्रज्ञानाच्या आधुनिक युगात शिक्षित कामगारांच्या पुढच्या पिढीला सुद्धा न्यायालयीन डावपेचात मालक वर्ग व शासकीय यंत्रणा फसवणूक करते हे लक्षात येत नाही. म्हणूनच कामगारांचा संघर्ष अजूनही चालूच आहे.

## ४.१४ सारांश –

'नवाकाळ' वृत्तपत्राने स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील आर्थिक प्रश्नावरील उपाययोजना आपल्या अग्रलेखातून, बातम्यांद्वारे मांडल्या. त्यातूनच विसाव्या शतकातील आर्थिक परिस्थितीचे स्वरूप लक्षात येते.

आर्थिक म्हटले की अर्थ, चलन आलेच. या चलनविषयक होणाऱ्या बदलाची कारणे, सोन्याची लूट, रुपयाची मूल्यकपात आदींवर चर्चा आपल्या अग्रलेखातून केली. तसेच स्वातंत्र्यपूर्व काळातील बँका व उद्योगधंदे यांचे स्वरूप समजते. इंग्रजांनी आपल्या स्वार्थासाठी

मिठावर कर लादले. हिंदुस्थानचे आर्थिक शोषण केले. इंग्रज राजवटीतील शहरे व खेडी यांच्या परिस्थितीचा अंदाज येतो. याबाबतचे अग्रलेख 'नवाकाळ' वृत्तपत्राने प्रकाशित केले.

भारताची वाढती लोकसंख्या व त्यातून निर्माण होणारे परिणाम आपल्या अग्रलेखातून 'नवाकाळ' वृत्तपत्राने मांडले. अन्नटंचाई व अन्नविषयक धोरणे, विनोबा भावे यांनी सुरू केलेली भूदान चळवळीचा वृत्तांत, दुष्काळविषयक धोरणे, ग्रामीण विकास आदी विषयांवर सविस्तर माहिती समजते.

भारतासमोरील संकट, जे आज आहे ते म्हणजे भ्रष्टाचार. यालासुद्धा आळा घालण्याचा प्रयत्न 'नवाकाळ' वृत्तपत्राने केला. विविध स्तरातील भ्रष्टाचार, त्याविषयीची माहिती तसेच भ्रष्टाचार पसरण्याची कारणे सांगितली. भ्रष्टाचार हा सर्वसामान्यांकडून होत नसून १ टक्का श्रीमंत वर्गाकडून होतो. कारण करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करण्यासाठी सर्वसामान्य जनतेकडे एवढी रक्कम नसते. असे ठामपणे 'नवाकाळ'चे संपादक नीळकंठ खाडिलकर सांगत. मुंबईतील गिरणी कामगार व त्याचा १९८२ चा ऐतिहासिक संप याविषयीचा इतिवृत्तांत सादर केला. गिरणी कामगारांची दयनीय स्थिती, त्यातून बाहेर पडण्यासाठी, त्यांच्या हक्कासाठी 'नवाकाळ' वृत्तपत्र प्रयत्न करत होते.

# प्रकरण चौथे

## तळटीपा:–

१) मराठी विश्वकोश खंड – ५,अर्थशास्त्र चलन (अर्थशास्त्र) पृष्ठ – ७२०.

२) नवाकाळ, २९ मे १९२५.

३) मराठी विश्वकोश खंड –५, अर्थशास्त्र चलन (अर्थशास्त्र) पृष्ठ – ७२०.

४) नवाकाळ, २७ सप्टेंबर १९३१.

५) नवाकाळ, २ ऑगस्ट १९४०.

६) मराठी विश्वकोश खंड –५, अर्थशास्त्र चलन (अर्थशास्त्र) पृष्ठ – ७२०.

७) नवाकाळ, २२ सप्टेंबर १९४९.

८) नवाकाळ, २३ मार्च १९२३.

९) नवाकाळ, दि. २२ मार्च १९२३.

१०) नवाकाळ १० जानेवारी १९२६.

११) नवाकाळ १९ जानेवारी १९२६.

१२) मराठी विश्वकोश खंड – १५, लोकसंख्या (अर्थशास्त्र) पृष्ठ – ७४४.

१३) नवाकाळ, १० ऑक्टोबर १९३९.

१४) मराठी विश्वकोश खंड – ७, दुष्काळ (अर्थशास्त्र) पृष्ठ – ८३३.

१५) नवाकाळ, ४ एप्रिल १९५३.

१६) मराठी विश्वकोश खंड – १, अन्नविषयक धोरण (अर्थशास्त्र) पृष्ठ – २६२.

१७) नवाकाळ, ३ डिसेंबर १९५०.

१८) नवाकाळ, १४ मार्च १९५१.

१९) मराठी विश्वकोश खंड – १, अन्नविषयक धोरण (अर्थशास्त्र) पृष्ठ – २६२.

२०) नवाकाळ,, ३ एप्रिल १९५६.

२१) नवाकाळ, ६ एप्रिल १९५१.

२२) नवाकाळ,३ जून १९५१.

२३) नवाकाळ, १८ जानेवारी १९५१.

२४) नवाकाळ, २४ मे १९९२.

२५) नवाकाळ, ३० अगॉस्ट १९९२.

२६) नवाकाळ, २३ फेब्रुवारी १९८२.

२७) नवाकाळ, ३० नोव्हेंबर १९९४.

# प्रकरण पाचवे

# ‘नवाकाळ’ वृत्तपत्राचे राजकीय कार्य

५.१ प्रस्तावना

५.२ ‘नवाकाळ’वरील अब्रुनुकसानीचा खटला

५.३ राजद्रोहाचा खटला

५.४ ‘नवाकाळ’ वृत्तपत्राच्या श्री. दत्तात्रय छापखान्यावर ‘प्रेस ऑर्डिनन्स’ची जामिनकी

५.५ अंदमान तुरुंगातील कैद्यांच्या जीवनविषयक लेखावरुन ‘नवाकाळ’वर खटला

५.६ कृष्णा देसाई खून खटल्यात ‘नवाकाळ’ वृत्तपत्रास कोर्टाचे समन्स व वृत्तपत्र नीतीचा प्रश्न

५.७ श्रीकृष्ण आयोगावरून ’नवाकाळ’ वृत्तपत्रावर खटला

५.८ ‘भ्रष्टाचार निर्मूलन’ विषयक मुलाखतीवरून ’नवाकाळ’ वृत्तपत्रावर खटला

५.९ ‘असहकार–चळवळ’

५.१० पुर्ण स्वराज्याचा ठराव

५.१२ स्वातंत्र्याचा अरुणोदय

५.१३ संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि ’नवाकाळ’

५.१४ गोवा मुक्ती चळवळ

५.१५ मुंबईतील गँगस्टरची दहशत

५.१६ ‘डॅशिंग खैरनार खळबळजनक जीवनकहानी’ नवाकाळ वृत्तपत्रातून प्रकाशित मुलाखत

५.१७ सारांश

# प्रकरण पाचवे

# 'नवाकाळ' वृत्तपत्राचे राजकीय कार्य

## ५.१ प्रस्तावना :-

विसावे शतक हा कालखंड भारताच्या इतिहासातील एक वैशिष्ट्यपूर्ण टप्पा होय. हे शतक म्हणजे स्वातंत्र्यपूर्व राष्ट्रवादाचा, स्वातंत्र्य आंदोलनाचा व स्वातंत्र्योत्तर भारतासमोर येणारी अनेक संकटे व त्यावर मात करत आधुनिकीकरणाचा पुरस्कार करत आहे.

विसाव्या शतकातील राजकीय कार्याचा आढावा घेत असताना त्याची पार्श्वभूमी समजावून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे 'नवाकाळ' वृत्तपत्राचे कार्य हे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर या दोन कालखंडात विभागलेले दिसून येते.

सन १९२३ मध्ये 'नवाकाळ' वृत्तपत्राची स्थापना झाली. त्या वेळी देश पारतंत्र्यात होता. त्यातूनच 'नवाकाळ'च्या राजकीय कार्याला महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर काकासाहेबांनी नव्या परिस्थितीत राजकारणातील बदलांचा स्वीकार केला. महात्मा गांधींचे राजकारण हे लोकमान्य टिळकांच्या विचारांची पुढची पायरी, असा काकासाहेबांच्या बुद्धीचा पक्का निर्णय झाला होता. 'नवाकाळ' वृत्तपत्रातून असहकार चळवळ, पूर्ण स्वराज्य ठराव, १९४२ ची 'चले जाव चळवळ', स्वातंत्र्यप्राप्ती आदी घडामोडींवर राजकीय बातम्या, अग्रलेख प्रसिद्ध केले.

बित्तंबातमी चव्हाट्यावर आणणे, मार्गदर्शन करणे आणि लोकहितासाठी लढणे, लेखणी निर्भीडपणे व निःस्वार्थीपणे तलवारीसारखी चालवणे हे मूल्य डोळ्यांसमोर ठेवूनच 'नवाकाळ' वृत्तपत्राने विसाव्या शतकात राजकीय प्रश्न हाताळले. संयुक्त महाराष्ट्र, गोवा मुक्ती चळवळ, मुंबईतील गँगस्टर व दहशत आदी घटनांचा आपल्या वृत्तपत्रात अग्रलेख, बातम्यांद्वारे समावेश केला गेला. 'नवाकाळ' वृत्तपत्रांच्या कणखरपणामुळे व स्वतंत्र विचारसरणीमुळे स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांच्या रोषास बळी पडून राजद्रोही खटले भरले गेले. तसेच स्वातंत्र्योत्तर काळातसुद्धा स्पष्टवक्तेपणा, सत्यता समाजासमोर मांडली गेली. त्या वेळीसुद्धा 'नवाकाळ'वर अनेक वेळा खटले भरले गेले.

अशा विविध राजकीय घटनांचा, घडामोडींचा आढावा प्रस्तुत प्रकरणात मांडला आहे.

## ५.२ 'नवाकाळ'वरील अब्रुनुकसानीचा खटला :-

''१९२६ साली, सोलापुरास झालेल्या हिंदू-मुसलमानांच्या दंग्याच्या संदर्भात तेथील बातमीदारांची तार ''नवाकाळ'मध्ये प्रसिध्द झाली. तारेत तेथील गोऱ्या पोलीस सुपरिन्टेन्डेन्ट ची मुसलमानांना फूस आहे. कारण त्याची रखेली मुसलमान आहे, अशा आशयाचाही मजकूर होता. त्यावरून सोलापूरचे पोलीस सुपरिन्टेन्डेन्ट मॅक्डोनल्ड यांनी 'नवाकाळ'वर अब्रुनुकसानीची फिर्याद केली. या खटल्यात काकासाहेबांना ७५० रु. दंड भरावा लागला.''[१]

'' 'नवाकाळ'वर फिर्याद होण्याचा पहिला प्रसंग सोलापूरच्या दंग्याच्या बातमीमुळे आला. सोलापूरच्या बातमीदाराने त्यावेळचे सोलापूरचे डी.एम.पी. डंकन मॅक्डोनाल्ड यांचेविरुध्द काही आक्षेपार्ह तार पाठविली. रात्रपाळीच्या संपादकाने ती खळबळ उडवणारी बातमी जशीच्या तशी छापण्यास दिली व ती दुसरे दिवशीच्या अंकात भडकपणाने प्रसिध्द झाली. हा मजकूर नजरेस येताच काकांना या बातमीचा परिणाम चटकन लक्षात आला. कल्पनेप्रमाणे खटलाही झाला. सदर साहेबांनी अब्रुनुकसानीची फिर्याद गुदरली. तेव्हा काहींनी दिलगिरी प्रदर्शित करून मोकळे होण्याचा सल्ला काकासाहेबांना दिला. पण त्यांच्या मनोवृत्तीला हा सल्ला मुळीच पटणे शक्य नव्हते. ही बातमी ज्या संपादकाने छापण्यास दिली, त्यालाही पण त्यांनी दोष दिला नाही. लोकमान्यांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे सार्वजनिक हितास अनुसरून त्यांनी खटला शेवटपर्यंत लढवला. खर्च केला व जबर दंडही सोसला. वृत्तपत्र व्यवसायाचा अंगीकार केलेल्या मनुष्यावर असले प्रसंग येणारच. त्याबद्दल त्याचे मन तयारच होते. सोलापूरचे तेव्हाचे नगराध्यक्ष डॉ. मुळे वगैरे मंडळींनी काकासाहेबांस या वेळी फार मदत केली.''[२]

थोडक्यात काकासाहेब खाडिलकरावरील अब्रुनुकसानीच्या खटल्याचा निकाल लागुन त्यांना दंड भरावा लागला परंतु त्यांनी बातमी छापणाऱ्या संपादकाचे नाव न सांगता सर्व आरोप स्वतःवर घेतले.

## ५.३ राजद्रोहाचा खटला :-

'नवाकाळ' वृत्तपत्रावर अब्रुनुकसानीचा खटला झाल्यानंतर पुढे सन १९२९ मध्ये राजद्रोहाचा खटला झाला.

''हा खटला झाला तो ९ फेब्रुवारी १९२९ च्या अंकातील अग्रलेखाबद्दल 'मुंबईचे दंगे व बोल्शेव्हिक बिल' असा त्या लेखाचा मथळा होता. १९२९ च्या प्रारंभी, १८९३ नंतर छत्तीस वर्षांनी मुंबईला हिंदू–मुसलमानांचा दंगा उद्‌भवला. पठाण मुले पळवितात या भूमिकेवरून प्रथम तरी पठाण विरुध्द हिंदू–मुसलमान असे त्या झगड्याचे स्वरूप होते. पुढे त्याला हिंदू–मुसलमान दंग्याचे रूप आले. मुंबईत असा दंगा चालू असता, दडपशाहीच्या नव्या कायद्याची चर्चा मध्यवर्ती असेंब्लीत झाली. गृहखाते सांभाळणाऱ्या अधिकाऱ्याने नव्या कायद्याची उपयुक्तता सिध्द करण्यासाठी रशियातील बोल्शेव्हिक पक्षाचा व राजतंत्राचा त्या वेळी चर्चेत वारंवार उल्लेख केला होता. साप साप म्हणून भुई धोपटण्याचा हा प्रकार असल्याने त्याबाबत अग्रलेख लिहिण्यात आला. तो लेख स्वतः काकासाहेबांनी लिहिलेला नव्हता. लेख लिहिला होता त्यांचे सहकारी न.र. फाटक यांनी पण लेखात राजद्रोह शिरण्याची शक्यता असल्याने लेख जपून लिहिण्याची सूचना काकासाहेबांनी केली होती. लेख लिहिल्यावरही काकासाहेब व फाटक यांनी एकत्र बसून लेखाचे बारकाईने वाचन करून आक्षेपार्ह ठरण्याचा संभव असलेली वाक्ये काढून टाकली होती. एवढी खबरदारी घेतली, तरी नोकरशाहीच्या डोळ्यांत तो खुपलाच.''[३]

'' 'मुंबईतील दंगे व बोल्शेव्हिक बिल' हा अग्रलेख व त्या दिवशीची एक–दोन स्फुटे आक्षेपार्ह आहेत, असे ठरवून सरकारने काकासाहेबांच्या वर खटला भरला व ता. १४ फेब्रुवारी १९२९ रोजी काकासाहेबांचे वर राजद्रोहाच्या आरोपाचे पकड वॉरंट घेऊन डे.पो.क. पेटीगारा हे आले व त्यांनी काकासाहेबांना पकडून नेले.''[४]

श्री. बाळासाहेब खेर यांच्या 'मणिलाल खेर' सॉलिसिटरामार्फत श्री. जी.एन. ठाकोर यांनी हायकोर्टापुढे अर्ज करून काकासाहेबांच्या खटल्याची तहकुबी मिळविली. यांनी या खटल्यात व नंतरही वेळोवेळी अत्यंत आपलेपणाने काकासाहेबास विनावेतन मदत केली. वास्तविक मॅजिस्ट्रेटसाहेबांपुढे रीतसर दुसरे दिवशी प्रारंभीचा खटला सुरू झाला होता व ज्या १२४ अ व १५३ या दोन कलमाखाली काकासाहेबांवर आरोप ठेवण्यात आले होते. त्या कलमांखाली हे मॅजिस्ट्रेट साहेबच या खटल्याचा पूर्ण निकाल देऊ शकत होते. पण खटला हायकोर्टात ज्युरीपुढे चालणेच अधिक जनहिताचे आहे, असा काकासाहेबांचा आग्रह पडल्याने तसा अर्ज हायकोर्टाचे न्यायाधीश न्या. भू. पाटकर यांच्यापुढे केल्यावर काकासाहेबांचा खटला

सेशन कमिट व्हावा असा त्यांनी निकाल दिला व त्याप्रमाणे मॅजिस्ट्रेटने कब्जा सेशन कमिट केला.

''हायकोर्टात ता. २६ मार्च १९२९ रोजी कब्जा सुनावणीस मि. ब्लॅकवेल हे न्यायाधीश असून त्यांचे मदतीस कॉमन ज्युरी होती. काकासाहेबांच्या तर्फे अॅ. भुलाभाई देसाई काम करीत होते व सरकारतर्फे अॅ. ज. कांगा खटला चालवीत होते. 'नवाकाळ'चा आक्षिप्त अग्रलेख व २/३ स्फुटे व इतर रिपोर्टस पुरावा म्हणून दाखल करण्यात आले. अॅ. भुलाभाई यांना आपली बाजू उत्तम तऱ्हेने लढविली. खटला ऐकण्यास कोर्टात भयंकर गर्दी झाली होती. खटल्याच्या दुसऱ्या दिवशी वकिलांच्या तक्रारी व न्यायाधीशांनी ज्युरीला कब्जा समजावून सांगणे वगैरे महत्वाची कामे होती व खटल्याचा निकालही लगेच लागण्याचा संभव होता.''[५]

अशा प्रकारे काकासाहेबांनी आपला खटला मॅजिस्ट्रेटसमोर न चालविता हायकोर्टात ज्युरींपुढे चालवणे अधिक जनहिताचे असल्याकारणाने तसा अर्ज हायकोर्टाकडे केला होता. खटल्यादरम्यान 'नवाकाळ'चे अग्रलेख व स्फुटे, इतर रिपोर्ट्स, पुरावे म्हणून कोर्टात दाखल केले गेले.

''ता. २७ मार्च १९२९ या दिवशी सरकारतर्फे सरकारी वकिलाने आपली बाजू सजवून मांडल्यावर श्री. भुलाभाईंनी आपली बाजू इतकी कौशल्यपूर्ण रंगविली की ज्युरीवर त्याचा जोराचा परिणाम होत आहे, असे सर्व ऐकणाऱ्यांना वाटू लागले. जज्जसाहेब मात्र शांत बसले होते. ज्युरीवर परिणाम झाला आहे याची त्यांना होती.

अॅड. भुलाभाईंचे भाषण संपल्यावर न्या. मू. ब्लॅकवेल यांनी ज्युरीस खटला समजावून सांगण्यास सुरुवात करून आक्षिप्त लेख कसकसे राजद्रोही आहेत व एक एक लेख न होता सगळ्या मिळवून लेखांचा मथितार्थ व जनमनावरील परिणाम कसा विचारात घ्यावयास पाहिजे, याचे खूप विस्ताराने व बारकाईने विवेचन केले. त्याच्या बोलण्याची धाटणी व प्रतिपादनातील अट्टाहास पाहून कोर्टातील प्रेक्षकांची मने भीतीने व्याप्त होऊ लागली. अॅ. नरिमन, बाळासाहेब खेर, श्री. कोठारी, दादासाहेब करंदीकर, काकासाहेब गाडगीळ, तरुणांचे पुढारी श्री. मेहेरअली असे अनेक पुढारी व काकासाहेबांबद्दल आदर असणारा फार मोठा जमाव कोर्टामध्ये होता. ब्लॅकवेल साहेबांचे ज्युरीस उद्देशूनचे वक्तव्य ऐकून काकासाहेबांना ते मोठी शिक्षा सुनावणार याबद्दल कोणास शंका राहिली नव्हती.

ज्युरी विचार करण्यासाठी बाहेर गेली. काम चालू असता काकासाहेबांना वकिलांचे जवळ बसण्यास परवानगी देण्यात आली होती. आता निकाल जवळ आल्याकारणाने त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात बसण्यास सांगण्यात आले. त्याप्रमाणे ते तेथे उठून जाऊन बसले. वातावरण अत्यंत गंभीर होते. ज्युरीची मंडळी विचारविनिमय करून परत आली. त्यांना त्यांचे मत विचारण्यात आले. त्यांच्यात दोन मते झाली होती. बहुमताचा निकाल 'दोषी' असा होता. ते जज्जांना कळविण्यात आला. ज्युरीचे मत ऐकल्याबरोबर जज्जसाहेबांनी आपला निकाल जाहीर केला. 'एक वर्ष साधी कैद व दोन हजार रुपये दंड' ही शिक्षा जाहीर करून ते झटकन आपल्या चेंबरमध्ये निघून गेले. शिक्षा अपेक्षेपेक्षा कमी झाल्याने सर्वांचे मन एकदा हलके झाल्याप्रमाणे झाले व त्या अर्थाचे उद्‌गार कोर्टात सर्व बाजूंनी निघून त्यांनीच काकासाहेबांचे अभिनंदन केले. 'दोन हजार रुपयांचा दंड मी 'नवाकाळ'वर पडू देत नाही. तुरुंगात मी नाटक लिहीन' असे काकासाहेबांनी आपल्या स्नेह्याजवळ उद्‌गार काढले. कैदेची गोष्ट अर्थातच निराळी होती. काकासाहेबांचे वय त्यावेळी सुमारे ५८ वर्षांचे होते. अशा उतारवयात खुनशी परकीय सरकारच्या तुरुंगातील एक वर्ष म्हणजे ती फार मोठी खडतर शिक्षा होती.[६]

थोडक्यात काकासाहेब खाडिलकरांनी लिहिलेले अग्रलेख हे राजद्रोही ठरविण्यात आले व त्यांना एक वर्षाची साधी कैद व दोन हजार रुपये दंड करण्यात आला. उतारवयात काकासाहेबांना तुरुंगात जाण्याची वेळ आली.

'नवाकाळ'वरील खटल्याचा निकाल दि. २७ मार्च १९२९ रोजी संध्याकाळी ७ वाजता लागला. ज्युरीच्या ६ वि. ३ अशा बहुमताने श्री. खाडिलकर हे दोषी आहेत, असा निकाल दिला. ज्युरीचा हा निर्णय मान्य करून सेशन जज्ज ब्लॅकवेल यांनी एक वर्ष साधी कैद व दोन हजार रु. दंड अशी शिक्षा फर्मावली. लगेच पोलिसांनी श्री. खाडिलकरांना डॉकमधून खाली नेले.

'नवाकाळ' वृत्तपत्राच्या खटल्याच्या निकालादिवशी काकासाहेब खाडिलकरांनी कोर्टासमोर दिलेली जबानी पुढीलप्रमाणे–

''श्री. खाडिलकर – माझ्यावर ठेवण्यात आलेला आरोप मला कबूल नाही. हा लेख लिहिण्यात सरकारबद्दल द्वेष, तिरस्कार किंवा अप्रीती उत्पन्न करावी, असा माझा मुळीच हेतू

नव्हता. हा लेख लिहिण्यात 'बोल्शेव्हिक मते व मुंबईचे दंगे' यांचा संबंध जोडण्यातील हेवाभास दाखविणे हा माझा हेतू होता. हा लेख लिहीत असताना माझ्यापुढे ता. ६ फेब्रुवारीचा 'टाईम्स ऑफ इंडिया' चा अंक, बोल्शेव्हिक बिल असेंब्लीमध्ये सिलेक्ट कमिटीकडे सोपविण्यात आले. त्यावेळच्या कामाचा तारेने आलेला सारांश आणि ता. ७ व ता. ८ रोजी मुंबईच्या दंग्याबद्दल विलायतेहून तारेने आलेली ब्रिटिश वर्तमानपत्रांची मते होती. मी आता 'टाईम्स ऑफ इंडिया'च्या ता. ६ फेब्रुवारीच्या अंकातील अग्रलेखाकडे वळतो, पण तसे करण्यात माझ्या लेखाचे समर्थन करण्याचा हेतू नसून त्याबद्दलचा खुलासा करण्याचा आहे.''[७]

जज्ज, ॲडव्होकेट जनरल, ॲडव्होकेट देसाई यांचे भाषण झाल्यावर श्री. खाडिलकरांनी पुन्हा जबानी देण्यास सुरुवात केली. ती अशी–

''श्री. खाडिलकर – (आपली जबानी पुढे देताना) या लेखात 'टाईम्स ऑफ इंडिया'ने 'बोल्शेव्हिक मते व मुंबईचे दंगे' यांचा संबंध जोडण्याच्या बाबतीत दिलेली कारणे थोडक्यात अशी सांगता येतील. जो कोणी दंग्याचा फायदा आपली मते पसरविण्यासाठी करतो तो प्रत्यक्ष नसला तरी अप्रत्यक्षरीतीने त्या दंग्याच्या मुळाशी असतो. अधिक स्पष्ट व सुटसुटीतपणे ही गोष्ट सांगण्यासाठी त्यांनी त्या लेखाचा पहिला प्यारा वाचून दाखविला. तो प्यारा असा–

'टाईम्स ऑफ इंडिया'चा लेख

''सोमवारी लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्ये पब्लिक सेफ्टी बिल मांडताना मि. क्रेशर यांनी कम्युनिस्टांच्या प्रचारामुळे उत्पन्न झालेल्या औद्योगिक अस्वस्थतेचा विस्ताराने उल्लेख केला. असे करण्यास त्यांना सबळ कारण आहे. कारण त्यांनी म्हटल्याप्रमाणे अस्वस्थतेची निर्मिती हे कम्युनिस्टांच्या कार्याचे महत्वाचे व भयंकर स्वरूप आहे आणि 'तुम्हाला धरताही येत नाही, सोडताही येत नाही. तुम्ही त्याचा समाचार घेऊ दिला पाहिजे' या शब्दांत त्या कम्युनिस्ट मतावरील बाजू थोडक्यात मांडली आहे. या विधानाची छाननी मुंबईत विशेषतः झाली पाहिजे. डिसेंबर व जानेवारीमध्ये येथे जे दंगे झाले त्यावरून मुंबईत वाटेल ते करावे, अशी मुंबईवर कम्युनिस्टांची छाप पडली आहे, हे अगदी स्पष्ट झाले आहे. गव्हर्नर सोहबांकडे गेलेल्या डेप्युटेशन वरून ही गोष्ट लोकांच्या लक्षात आल्याचे दिसून येते आणि गेल्या काही दिवसांत घडलेल्या गोष्टीकडे पाहिल्यावर एखाद्या शांकेतालाही कम्युनिस्टांची चळवळ बेलगामी चालू देणे इष्ट वाटणार नाही. कोणी असे म्हणतील की, मुले पळविण्याची हूल व त्यानंतरची

रानटीपणाची कृत्ये व कम्युनिस्ट मते यांचा काही संबंध नाही. पण अशा तऱ्हेने उडवाउडवणीचे नकार कोणाचे समाधान करणार नाहीत. जमीन चांगली तयार असून दंग्याचे बी रुजण्यास योग्य आहे, असे पाहिल्यावर कम्युनिस्ट या नाही त्या कारणाचा फायदा घेऊन दंगे उत्पन्न करण्यास मागे-पुढे पाहणार नाहीत. कारण जितकी आपण अस्वस्थता उत्पन्न करू तितक्या प्रमाणात प्रचलित सामाजिक व आर्थिक घडी तसेच चालू राज्यव्यवस्था खिळखिळी करता येईल हे त्यांना माहीत आहे. गेले काही दिवस मुंबईत चाललेल्या जाती-जातीतील यादवीच्या-पठाणांच्या निर्दयपणाच्या छळाचा यापेक्षा निराळा अर्थ नाही-मुळाशी कम्युनिस्ट आहेत असे म्हणण्यास आपल्याजवळ पुरावा नाही. पण ते अप्रत्यक्षपणे या दंग्याला जबाबदार आहेत, असे समजण्यास अशक्य असे काही नाही. कारण अप्रत्यक्षपणे जाती-जातीतील मत्सरास चेतवून आणि बेकायदेशीर अस्वस्थता उत्पन्न करून त्यांनी अशा तऱ्हेच्या कृत्यास मजूरवर्गाला तयार केले असे दाखविता येण्यासारखे आहे.''[८]

थोडक्यात काकासाहेब खाडिलकरांनी कोर्टासमोरच्या जबानीद्वारे त्याच्यावरील आरोप अमान्य असल्याचे सांगून लेखाद्वारे सरकारबद्दल द्वेष, अप्रीती निर्माण करण्याचा उद्देश नसल्याचे स्पष्ट केले. त्यासाठी त्यांनी लेख लिहिताना टाइम्स ऑफ इंडियाचा अंक, बोल्शेविक बिलाचा असेंब्लीमध्ये आलेला सारांश आदी लेखाचा पुरावा घेतला होता.

**श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचेवरील राजद्रोहाच्या खटल्यास कारणीभूत झालेला लेख**

'मुंबईचे दंगे व बोल्शेव्हिक बिल' दि. ९ फेब्रुवारी १९२९ रोजी 'नवाकाळ' वृत्तपत्रातून प्रसिध्द झाला होता तो पुढीलप्रमाणे-

''ता. ७ रोजी दिल्लीस असेंब्लीमध्ये बोल्शेव्हिक बिल ६१ विरुध्द ५० अशा बहुमताने सिलेक्ट कमिटीकडे सोपविण्याचा ठराव पास झाला. या ठरावाला बहुमत मिळण्यासाठी नोकरशाहीच्या घटकांनी ज्या गोष्टीचा फायदा घेतला, त्यात मुंबईच्या दंग्याची प्रामुख्याने गणना करावी लागते. येथील दंग्याचे निमित्त करून पठाण लोक मुले पळवितात, अशा अर्थाची हुल असून गिरणी कामगारांत अलीकडे बरेच दिवस पसरलेला असंतोष हा त्या अफवेला पडलाच तर एक प्रकारे केवळ पार्श्वभूमीसारखा उपयोगी पडणारा आहे. परंतु नोकरशाहीच्या सभासदांनी असेंब्लीत कम्युनिस्टांची हिंदुस्थानातील कारखाने व मुंबईतील दंगे याचा संबंध जोडून आपल्या बाजूला बरीच मते ओढली. कम्युनिस्टांच्या तत्त्वाची असेंब्लीत जी चर्चा झाली

ती लक्षात घेतली किंवा या तत्त्वाचा प्रसार थांबविण्याकरिता प्रत्यक्ष जी कलमे आहेत, त्यांचा विचार केला तरी मुंबईतील दंगे हे कम्युनिस्टांच्या कारस्थानाचे फळ कसे ठरते, याचा पत्ता लागत नाही. कम्युनिस्ट हे भांडवलशाहीचे कट्टर शत्रू समजले जातात. पठाणांनी मुले पळविण्याच्या हुलीचा व भांडवलशाहीचा साहजिकच काही संबंध नाही. शिवाय पठाण हे किरकोळ सावकारी करणारे असले तरी त्याचा भांडवलशाहीमध्ये अंतर्भाव होत नाही. मग त्याच्याविरुध्द सुरू झालेल्या दंग्याचे कम्युनिस्टाच्या कारस्थानाशी नाते कसे जोडले जाते, हे एक फक्त नोकरशाहीलाच ठाऊक! देशातल्या मजूर वर्गात स्वस्थितीविषयी निःसंशय असंतोष आहे आणि त्याची कारणे पं. मालवीय व सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास यांनी आपल्या भाषणात उत्कृष्टरीतीने दाखविली आहेत. देशाचे दारिद्र्य दिवसानुदिवस वाढत आहे. या कारणाला हिंदी कारखानदाराच्या बाजूने ब्लॅकेटसाहेबांनी ठरविलेल्या हुंडणावळीच्या भावाची भर पडली आणि अप्रत्यक्षपणे या भावाने कारखानदार मालकाच्या बरकतीस खोडा लागून कामगारांची आर्थिक प्रगती अडकवून धरली गेली. कामगारांच्या असंतोषात जर बोल्शेव्हिकाचे भूत दिसत असेल तर त्याला गाडण्यास उपयोगी पडणारा मंत्र शोधण्यासाठी पुढाऱ्यांना एकत्र बोलावून उभयपक्षी दिलसफाईने या प्रश्नाची साधकबाधक चर्चा होऊ द्या, असे आवाहन सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास यांनी नोकरशाहीला केले होते. पं. मालवीय यांनी लोकांच्या सर्वसामान्य दैनेचा जास्त तपशीलवार विचार आपल्या भाषणात केला असून मजूर आणि शेतकरी यांच्या असंतोषाचे मूळ नोकरशाहीच्या कारभाराशी नेऊन भिडविले आहे. परंतु नोकरशाहीला आपल्या कारभारात सुधारणा करावयाची नसून त्या कारभारात फेरफार घडवून आणण्यासाठी उत्पन्न झालेल्या चळवळी नव्या नावाखाली नव्या साधनांच्या सहाय्याने झोडपून काढावयाच्या आहेत. मजूर व शेतकऱ्याच्या असंतोषाला नोकरशाहीने कम्युनिस्टांच्या कारस्थानाचा अवतार असे नाव दिले असून तिला अगदी ऐनवेळी पूर्वी जणू काय योजेनाच केल्याप्रमाणे मुंबईचे दंगे आपली पोळी भाजून घेण्याला उपयोगी पडले आहेत. जेव्हा जेव्हा विवेचनात अडवणुकीचा प्रश्न आला तेव्हा तेव्हा मुंबईच्या 'सध्याच्या परिस्थितीकडे पाहा' अशा अर्थाचे उद्गार नोकरशाहीच्या लोकांनी व त्याच्या पुरस्कर्त्यांनी बेधडक काढले. मि. क्रेशर, सर डेनिस ब्रे, सर डार्सी लिंडमे यांनी कितीही कंठशोष केला तरी 'बोल्शेव्हिकाच्या मतप्रसाराशी सध्याच्या परिस्थितीचा साक्षात संबंध बिलकूल नाही' या लोकपक्षातील पुढाऱ्यांच्या ठाम

सिंध्दान्ताविरुध्द वरच्यापैकी कोणालाही संयुक्तिक मुद्दा मांडता आलेला नाही. उलट उत्तर न देता या दंग्याकडे बोट दाखविण्याचा नोकरशाहीच्या लोकांनी सपाटा ठेवल्यामुळे; बोल्शेव्हिक बिल असेंब्लीत निघायला व मुंबईत दंग्याची आग भडकायला एकच गाठ पडली तेव्हा या चमत्कारपूर्ण योगायोगाच्या मुळाशी बोल्शेव्हिक बिलाचे पाठीराखे तर नसतील ना, हा संशय फोफावण्यास जागा झाली आहे. बोल्शेव्हिक मताच्या वर्चस्वाखाली भावी काळात केव्हा तरी चार–पाच पिढ्यानंतर हिंदी राष्ट्र जाण्याच्या शक्यतेचे भय आज येथील ब्रिटिश राज्यकर्त्यांचे धाबे दणाणून सोडीत आहे. त्या शक्यतेची कारणे उत्पन्न होण्यापूर्वीच उपटून काढण्यासाठी बोल्शेव्हिक बिलाचा जन्म आहे आणि बिलाच्या आवश्यकतेचा पुरावा काय तर असेंब्लीत बिल निघण्याच्या सुमारास मुंबईस सुरू झालेले दंगे, द्राविडी प्राणायामाने देखील सिध्द न होऊ शकणारा हा बादरायण संबंध पाहिला म्हणजे, मि. फेरार प्रवृत्ति मंडळीने हिंदी लोकमतामागे असलेल्या बुध्दिमत्तेची थट्टा चालविली होती की, त्याच्या समजुतीप्रमाणे का होईना देशात उत्पन्न झालेल्या बोल्शेव्हिक मतप्रसाराच्या भयंकर परिस्थितीची ते गंभीर व अंतःकरणपूर्वक चर्चा करीत होते, हेच कळेनासे होते. आयत्या वेळच्या दंग्याच्या उत्पत्तीचा संबंध त्याच्या बुध्दिवादाचे अनुकरण करून जोडण्यास काय हरकत आहे? हिंदुस्थानातल्या ब्रिटिश नोकरशाहीची अनियंत्रित सत्ता पुढे देखील अबाधित राहावी यासाठी तळमळणाऱ्या लंडन टाईम्स, डेलीमेल वगैरे पत्राच्या संपादकांना तर मुंबईचे दंगे ही एक अमृतसिध्दियोगाची पर्वणीच वाटत आहे. या दोन्ही पत्रांनी मुंबईच्या दंग्याकडे सायमन कमिशनचे लक्ष वेधले असून असे दंगे जेथे घडतात तेथले लोक स्वराज्याला अपात्र आहेत, अशी इशारत कमिशनला दिली आहे. कोलंबस व मुंबईस झालेल्या दंग्यात मजूर वर्गाचा अंशतः संबंध आहे. यावरून मास्कोच्या मदतीने सार्वजनिक संपाची दंग्याच्या रूपात हिंदी मजुरांनी रंगीत तालीम चालविली आहे, असा अभिप्राय लंडन टाईम्सने ठोकून दिला असून मजूर पक्षात नेमस्त व जहाल असे भेद पाडण्याचा प्रयत्न केला आहे. डेलीमेल पत्राला हिंदुस्थानातल्या ब्रिटिश भांडवलाची काळजी पडली असून हिंदी पुढाऱ्यांना राज्यकारभारात जे हक्क द्यावयाचे असतील ते हक्क बहाल करताना इंडियन गव्हर्नमेंट सिक्युरिटीची व्यवस्था ते ठेवतील असा बंदोबस्त करावा, असे सायमन कमिशनला मोठ्या कळकळीने सुचविले आहे. वस्तुतः जो कोणी मुंबईतील दंग्याची निर्विकार बुध्दीने छाननी करील, त्याला स्वच्छ दिसेल की, दंग्यात कामगारांचा जो संबंध आला तो रोजगाराच्या

नात्याचा नसून मुले पळवून नेण्याच्या भीतीने क्षोभलेले मुलांचे पालक या दृष्टीचा संबंध आहे; परंतु ज्यांनी येन केन प्रकारे हिंदी चळवळ ठेचण्याकरिता बुध्दिपुरःसर आपल्या सारासारतेला सोडचिठ्ठी दिली आहे, त्याच्यापासून वरच्यासारख्या निर्विकार तारतम्यांची अपेक्षा कशी धरता येईल? दंग्यात मजूर होते या बातमीतल्या मजूर शब्दावर दृष्टी खिळून बोल्शेव्हिकांच्या बागुलबुवाने त्याच्या मेंदूचा कब्जा घेतल्याप्रामणे 'हा घ्या बोल्शेव्हिकाच्या मतप्रचाराचा पुरावा' अशा आरोळ्या इकडे असेंब्लीत मि. क्रेशर व त्याच्या मताची री ओढणारे यांनी ठोकल्या, तर तिकडे लंडन टाईम्स, डेलमेल यांनी 'बोल्शेव्हिकच्या कारवाईची रंगीत तालीम सुरू केली.', 'हिंदी जनता स्वराज्याला नालायक आहे', 'हिंदुस्थानातले ब्रिटिश भांडवल बुडण्याच्या पथास लागले, त्याला तारण्याची तजवीस करा,' अशा अर्थाच्या किंकाळ्यांनी ब्रिटिश जनता भेदरून सोडण्याला प्रारंभ केला! बोल्शेव्हिक बिल ४ महिन्यामागे असेंब्लीत आले होते आणि तेव्हा हिंदुस्थानात किंवा सिलोनात दंग्याचे स्वप्न देखील नव्हते, चार महिन्यांमागे बिल आणले, यावरून तेव्हाच नोकरशाहीशी बिलाच्या समर्थनाकरिता भक्कम पुरावा होता, हे उघड आहे. मग आयत्या वेळच्या दंग्याचा फायदा नोकरशाहीने का घ्यावा? चार महिन्यांपूर्वी नोकरशाहीचे चालले नाही, मुंबईच्या दंग्याचा आश्रय घेतला. आता बिल पुढे सरकले, मग प्रेताच्या टाळूवरील लोणी चाटून खाण्यासारख्या पध्दतीने या दंग्याचा फायदा घेणाऱ्या या बिलाच्याच माथ्यावर दंग्याच्या उत्पत्तीचे खापर का फोडू नये? दंग्याच्या बातम्यांनी मनावर पडलेल्या ताणामुळे असेंब्लीतील बऱ्याच लोकनियुक्त सभासदांचा बुध्दिभेद मि.क्रेशर प्रभृतींना करता आला व या एकाच गोष्टीवरून नोकरशाहीकडे झुकलेल्या बहुमताचा उलगडा होण्यास हरकत नाही. एका शहराच्या स्थानिक दंग्यावरून एकदम सगळ्या देशाच्या राज्यकारभाराची तपासणी करून सुधारणा सुचविण्यासाठी नेमलेल्या कमिशनकडे धाव घेणे यासारखा बुध्दिचा दुरुपयोग कोणता असणार? पण हा अत्याचार लंडन टाईम्स, डेलीमेल या एरवी विचारी व भारदस्त समजल्या जाणाऱ्या विलायती पत्रांनी केला आहे! यावरून त्याची दानत व हिंदुस्थानविषयी भावना सहज ध्यानात येते. हिंदुस्थानात जबाबदार राज्यपध्दती सुरू व्हावी अशी निर्मळ इच्छा असेल तो कोणीही डेलीमेल, लंडन टाईम्सप्रमाणे निमित्ताला टेकल्यासारखा या इच्छेला न शोभणारी भलतीच हाकाटी करणार नाही. मि.क्रेशर याचे बोल्शेव्हिक बिल तर बोलून चालून हिंदी चळवळीचा गळा आवळण्याचा फास आहे आणि सायमन कमिशनपासून कसलीच प्राप्ती

होणार नाही, अशी हिंदी पुढाऱ्यांची खात्री झालेली आहे. बोल्शेव्हिक बिल, विलायती वृत्तपत्रे आणि सायमन कमिशन यांचे एकंदर मेथकूट सिध्द–साधकाच्या टोळीसारखे असल्यावर त्यांनी या दंग्याचा फायदा घ्यावा, यात आश्चर्य कसले? ''[९]

थोडक्यात असंतोषाच्या सार्वत्रिक वावटळीत कामगारांचे संप सुरू झाल्यामुळे सरकारने उग्र स्वरूप धारण करून संपाला पायबंद घालण्यासाठी 'पब्लिक सेफ्टी बील' मध्यवर्ती कायदे मंडळात आणले. अर्थात यामुळे कामगार लोक अधिकच प्रक्षुब्ध झाले. हिंदू–मुसलमानांचे दंगे, पठाण मुले पळवितात, या गैरसमजातून मुंबईत दंगे माजले व ते चिघळत चालले. सरकार त्यास आटोक्यात आणू शकले नाही.

काकासाहेब खाडिलकर यांच्यावर राजद्रोहाच्या गुन्ह्यावरून एक वर्षाची साधी कैद व दोन हजार रुपये दंड आणि दंड न दिल्यास आणखी तीन महिने कैद याप्रमाणे शिक्षा फर्माविली. काकासाहेब तुरुंगात गेले. 'नवाकाळ'चे संपादकपद काकासाहेबांचे चिरंजीव यशवंत कृष्णाजी खाडिलकर यांच्याकडे आले. काकासाहेब तुरुंगात गेल्यामुळे 'नवाकाळ' वृत्तपत्रावर आलेले गंडांतर काकासाहेबांच्या पुण्याईने तारले जाईल असे यशवंत कृष्णाजी खाडिलकर हे दि. २८ मार्च १९२९ च्या ' 'नवाकाळ'वरील गंडांतर' या अग्रलेखात सांगतात–

''काल रोजी रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांस ज्यूरीचा सहाविरुध्द तीन याप्रमाणे ते दोषी असल्याचा निकाल पडल्यावरून न्या. मू. ब्लॅकवेल यांनी एक वर्षाची साधी कैद व दोन हजार रुपये दंड आणि दंड न दिल्यास आणखी तीन महिन्यांची कैद याप्रमाणे शिक्षा फर्मावली. रा. खाडिलकरांना ता. १४ फेब्रुवारी रोजी राजद्रोहाच्या आरोपावरून पकडण्यात आले, त्यानंतरच्या उलाढाली पूर्वी वेळोवेळी वाचकांपुढे येऊन गेल्याच आहेत. जामीन आणि खटला सेशन कमिट करून घेणे या दोन्ही गोष्टीत रा. खाडिलकरांना यश आले. सदर परंपरेला सरकारतर्फे स्पेशल ज्यूरीचा अर्ज मंजूर झाला. तेव्हा पहिला अपशकून घडला. त्यांना पकडण्याची बाब जितकी अनपेक्षित होती तितका पुढचा परिणाम अनपेक्षित नव्हता. ता. २६ रोजी हायकोर्टात खटला सुरू झाल्यानंतर त्याला जो रागरंग चढत होता, त्यावरून खटल्याच्या निकालाचा अंदाज करणे फारसे अवघड नव्हते. अखेरीस ज्युरीचा बहुमतानुसार न्यायमूर्तींनी निकाल दिला व रा. खाडिलकरांच्या प्रत्यक्ष साहचर्याला तूर्त 'नवाकाळ' अंतरला आहे. पाच वर्षांमागे रा. खाडिलकरांनी 'नवाकाळ' पत्र सुरू केल्यापासून त्यावर अनेक लहान मोठी संकटे

आली, परंतु या शिक्षेसारखे जबरदस्त संकट यापूर्वी त्यावर कोसळले नव्हते. आताच्या संकटाने 'नवाकाळ'शी संबंध असणाऱ्यांच्या वृत्ती सर्व स्तंभित झाल्याच पाहिजेत, असे त्याचे गंभीर स्वरूप आहे. रा. खाडिलकरांच्या आजच्या वयोमानाकडे पाहता त्यांची फक्त एक वर्षाची साध्या कैदेची शिक्षा देखील बरीच कडक आहे, ही गोष्ट कोणासही नाकबूल करता येणार नाही. परंतु त्यातल्या त्यात सार्वजनिक आयुष्यामध्ये संकटाच्या वेळी जे त्यामध्ये भाग घेणाऱ्यांना समाधानाचे स्थान लागते ते रा. खाडिलकरांनाही लाभले ही गोष्ट येथे कृतज्ञतापूर्वक नमूद करणे अवश्य आहे. याप्रसंगी लोकांनी त्यांच्याविषयी अत्यंत कळकळीची, सहानुभूती दाखविणे शक्य होते, तशी त्यांनी ती दाखविण्यास कसूर होऊ दिली नाही. सगळ्या महाराष्ट्रातून त्यांच्याकडे सहानुभूतीची पत्रे व तारा येत होत्या व येत आहेत. त्याप्रमाणे सर्व पक्षातल्या लोकांनी त्यास भेटून सहानुभूती व्यक्त केली. यापैकी मुद्दाम नामनिर्देशपूर्वक येथे काही साह्यकर्त्यांची कामगिरी निवेदन केल्याशिवाय गत्यंतर नाही. श्री. नरीमन, श्री. बाळ गंगाधर खेर, सॉलिसिटर, श्री. वासु काका जोशी, श्री. श्रीधरपंत देशमुख (कॅ. डॉ. नानासाहेब देशमुखांचे चिरंजीव) ॲ.जी.एन. ठाकोर, बॅ. भुलाभाई देसाई, बॅ. पुरुषोत्तमदास त्रिकमदास, रा. भडकमकर वकील, श्री. दादासाहेब करंदीकर, गंगाधरराव देशपांडे वगैरे मंडळींनी पूर्ण आपुलकीच्या भावनेने जेवढे परिश्रम करणे व सहाय्य देणे शक्य होते तेवढे दिले. ज्युरीला आक्षेपित लेखांचे स्वरूप समजावून सांगताना बॅ. भुलाभाई यांनी आपल्या वक्तृत्वाची शिकस्त केली असे म्हटल्यास अतिशयोक्ती करण्याचे भय नाही. त्यांच्या आणि वर निर्देशिलेल्या इतरांच्या कामागिरीबद्दल जाहीर रीतीने मनःपूर्वक आभार मानणे अवश्य आहे. मानवी सामर्थ्याच्या दृष्टीने आजच्या परिस्थितीत खटला लढविण्याकरिता जे काय करणे शक्य होते तेवढे सर्व केले. तथापि रा. खाडिलकरांना शिक्षा झाली. सांप्रत सुरू झालेल्या दडपशाहीच्या परिस्थितीने त्यांचा बळी घेतलेला आहे. सांप्रतच्या राजकीय परिस्थितीमध्ये सार्वजनिक आयुष्यातली करण्यासारख्या संकटाची सुळावरली पोळी पत्करण्याचा प्रसंग केव्हा ना केव्हा यावयाचाच; परंतु ही संकटे व्यक्तिशः जनतेच्या हितासाठी प्रयत्न करणाऱ्यांना कितीही दुःसह असली तरी ती त्यांच्या कार्याचा ओघ थांबविण्याला समर्थ नसतात, हे तितकेच खरे आहे! जनतेच्या बुध्दीला योग्य वळण लावणारे वृत्तपत्रकार या नात्याने लो. टिळकांच्या मृत्यूनंतर रा. खाडिलकरांच्या आयुष्यात जी स्थित्यंतरे झाली, त्यामध्ये 'नमे भक्तः प्रणश्यति'

भगवद्‌वचनावरील त्यांच्या प्रबल व अढळ निष्ठेने त्यास प्रत्येक वेळी अधिकाधिक उज्ज्वल यश प्राप्त करून दिलेले आहे. याच्या प्रेरणेनेच त्यांनी 'नवाकाळ' हे स्वतःच्या संपूर्ण जबाबदारीचे वृत्तपत्र काढले. 'नवाकाळ'च्या सध्याच्या संकटाच्या वेळीच नव्हे तर यापूर्वीही त्यांच्या प्रस्तुत निष्ठेची सत्यता प्रत्ययास आली व त्यांच्या याच निष्ठेची पुण्याई आम्हाला आताच्या गंडांतरांतून तारील, असा भरवला आहे.''[१०]

काकासाहेबांनी स्वतःच्या जबाबदारीवर 'नवाकाळ' वृत्तपत्र काढले होते. वेळोवेळी त्यावर अनेक संकटे आली; परंतु 'कैद'सारखे संकट प्रथमच त्याच्यावर आले होते. परंतु काकासाहेबांची निष्ठा, सत्यता 'नवाकाळ' वृत्तपत्रावर गंडांतर येऊ देणार नाही, असा विश्वास आप्पासाहेब खाडिलकरांना होता.

### ५.४ 'नवाकाळ' वृत्तपत्राच्या श्री. दत्तात्रय छापखान्यावर 'प्रेस ऑर्डिनन्स'ची जामिनकी :–

प्रारंभी पि. कोड व रेग्युलेशनखाली राजद्रोहाचे खटले घालून वा हद्दपार करून सरकारने पुढारी पत्रकाराचा छळ केला. पुढे १९१० साली प्रेस ॲक्ट जन्माला आला. त्यावेळच्या राजकीय चळवळीत राष्ट्रीय पक्षाच्या सर्वच पक्षांना त्या कायद्याचा त्रास झाला. पुढे १९३०/३१ साली सरकारने काढलेल्या प्रेस ऑर्डिनन्समध्ये जामिनकीची रक्कम भरण्याचा हुकूम करण्याची नवी तरतूद झाली. यानंतर वृत्तपत्रे मेटाकुटीस आली. शेकडो वृत्तपत्रांकडून हजारो रुपयांच्या रकमेची जामिनकी मागण्यात आली व त्यामुळे नाईलाजाने कित्येक वर्तमानपत्रे बंद करावी लागली. त्याची झळ 'नवाकाळ' वृत्तपत्राससुध्दा लागली. श्री दत्तात्रय छापखान्याचा जामिन जप्त केला. छापखान्याचे डिक्लरेशन रद्द केले. त्याबाबत दि. २३ सप्टेंबर १९३० च्या ''नवाकाळ'च्या श्री दत्तात्रय प्रेसची जामिनकी जप्त' या लेखाद्वारे माहिती प्रकाशित केली.

''१३ व २० ऑगस्टच्या 'स्वाधीन भारत' पत्राच्या अंकात 'अबालवृध्द' आणि 'मध्यप्रांताची प्रगती' अशा मथळ्याची छापलेली बातमीपत्रे छापखान्याच्या ऑर्डिनन्समधील कलम ४ पौंड कलम १ (क) यामध्ये नमूद केलेल्या गुन्ह्यास अनुसरून आक्षेपार्ह वाटल्यामुळे मुंबईचे गव्हर्नर इन कौन्सिल यांनी इंडियन प्रेस ऑर्डिनन्सच्या कलम ४ प्रमाणे 'नवाकाळ' व 'स्वाधीन भारत' पत्र छापणाऱ्या श्री दत्तात्रय छापखान्याचे कीपर यशवंत कृष्ण खाडिलकर यांच्याकडून पूर्वी कीपर या नात्याने घेतलेला २५०० चा जामीन जप्त केला आहे.

हा जामीन जप्तीचा हुकूम काल सायंकाळी श्री. यशवंत कृष्ण खाडिलकर यांच्यावर घालण्यात आला असून दहा दिवसांच्या आत छापखान्याचे दुसरे नवे डिक्लरेशन न केल्यास पूर्वीचे डिक्लरेशन रद्द समजले जाईल असे सदर हुकूमात म्हटले आहे.

यापूर्वी ता. १० जुलै रोजी 'नवाकाळ'चे मुद्रक व प्रकाशक आणि श्री दत्तात्रय छापखान्याचे कीपर या नात्याने श्री. यशवंत कृष्ण खाडिलकर यांजवर प्रत्येकी २५०० च्या दोन जामिनकी भरण्याची नोटीस बजावण्यात आली होती व त्याप्रमाणे ता. १८ जुलै रोजी ५००० रुपयाची रक्कम चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटपुढे भरण्यात आली होती.''[११]

अशा प्रकारे सरकारच्या वृत्तपत्र दडपशाही धोरणामुळे वेळोवेळी इतर वृत्तपत्रांबरोबर 'नवाकाळ' वृत्तपत्रास दंड जामिनकी भरावा लागला.

### ५.५ अंदमान तुरुंगातील कैद्यांच्या जीवनविषयक लेखावरुन 'नवाकाळ'वर खटला :-

'नवाकाळ' वृत्तपत्रामधून यशवंत खाडिलकर यांनी अंदमानातील तुरुंगातील कैद्यांच्या होणाऱ्या हालअपेष्टा, तेथील परिस्थिती याबाबत 'पृथ्वीवरील नरक' हा लेख प्रकाशित केला. त्यामुळे ब्रिटिश सरकारविरोधी मत निर्माण झाले. तसेच अंदमानला 'पृथ्वीवरील नरक' असे म्हटल्याने सरकारविषयी अप्रीती उत्पन्न झाली. या कारणावरून 'नवाकाळ'वर खटला भरण्यात आला होता. त्याच्या निकालाबाबतची माहिती 'नवाकाळ'च्या जामिनजप्तीवरील निकाल – अपील काढून टाकण्यात आले' या लेखाद्वारे दिनांक ८ डिसेंबर १९३३ रोजी प्रकाशित करण्यात आली.

''श्री दत्तात्रय छापखान्याचे 'कीपर' व 'नवाकाळ' पत्राचे मुद्रक व प्रकाशक श्री. यशवंत कृष्ण खाडिलकर यांनी सहा हजार रुपयांच्या जामिनजप्तीविरुध्द दाखल केलेले अपील काल रोजी मुंबई हायकोर्टात सरन्यायाधीश सर ब्युमॉस्ट, न्या. वार्ली व न्या. दिवेटिया यांच्या फुल बेंचपुढे सुनावणीत निघाले. खटल्यातील लेख इंडियन प्रेस (इमर्जन्सी पॉवर्स) ॲक्ट १९३१ च्या ४ थ्या कलमातील पोटकलम १ क्लॉजेस बी व डी खाली येतात या मुद्यावर तिघाही न्यायमूर्तींनी अपील काढून टाकले.

कोर्टाला खटला समजावून देताना 'नवाकाळ'तर्फे ॲडव्होकेट जी.एन. ठाकूर यांनी अंदमान तुरुंगासंबंधीची १९२१ पासूनची हकीकत सांगितली. ते म्हणाले की, १९२१ मध्ये

नेमलेल्या जेल कमिटीच्या शिफारसींना अनुसरून अंदमानात राजकीय कैदी पाठविण्याचे बंद करण्यात आले होते. १९३२ साली अंदमानात राजकीय कैदी पाठविण्याचे सरकारने पुन्हा ठरविले. त्यावेळी लोकांत वरील खळबळ उडाली. आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ त्यांनी १९२१ व १९३२ साली झालेली अंदमानसंबंधी असेंब्लीमधील प्रश्नोत्तरे वाचून दाखविली. त्याच वेळी अंदमानात कैद्यांना भोगाव्या लागलेल्या हालांमुळे तेथील तुरुंगांना 'पृथ्वीवरील नरक' असे नाव लावून ते सदर प्रश्नोत्तरांच्या वेळी वापरण्यात आल्याचे ॲ. ठाकूर यांनी कोर्टाच्या नजरेस आणले.

यानंतर अंदमानात गेल्या मे मध्ये तीन राजकीय कैद्यांना अन्नत्यागामुळे मृत्यू आल्याची माहिती त्यांनी सांगितली. सदर तीन मृत्युंमुळे अंदमानात कैदी पाठविण्याच्या सरकारच्या धोरणाचा संबंध देशात निषेध करण्यात येऊ लागला व त्या परिस्थितीत खटल्यातील लेख लिहिण्यात आला.

'न्यायमूर्तींचा निर्णय'

ॲ. ठाकूर यांचे भाषण संपल्यावर सरकारची बाजू मांडण्यास ॲडव्होकेट जनरल यास न सांगता न्यायमूर्तीचा निर्णय सांगण्याला चीफ जस्टिस यांनी सुरुवात केली.

आपल्या निर्णयात न्यायमूर्तींनी खटल्याची थोडक्यात हकीकत दिली आणि म्हणाले की, अत्याचाराला उत्तेजन देण्याचा अथवा ज्यामुळे अत्याचाराकडे प्रवृत्ती होईल, असे लेख लिहिण्याचा अर्जदारावर गुन्हा लादण्यात आला. ४ बी खाली गुन्हा होण्यास सरकारविरुध्द द्वेषभावना उत्पन्न झाली असावयास पाहिजे.

नंतर खटल्यातील लेख कोणत्या परिस्थितीत लिहिण्यात आले. यांचा उल्लेख करून न्यायमूर्ती म्हणाले, अंदमानातील तुरुंगात जाणे म्हणजे दुर्धर हालअपेष्टा सोसणे होय. खटल्यातील लेखाचा अर्थ असा की, अंदमानातील हालअपेष्टांची सरकारला, त्यांनी नेमलेल्या कमिटीवरून पूर्ण जाणीव असता त्यांनी कैद्यांना अंदमानात कोंबले. सरकारने हे जाणून बुजून केले व त्याचा परिणाम असा झाला की, अत्याचारी कैद्यांनी त्या हालअपेष्टातून आपली सुटका करून घेण्यास आत्महत्या केली. वरील प्रकारचे लेख सरकारबद्दल अप्रीति व द्वेष उत्पन्न होणारे मला स्पष्टपणे दिसत आहे. आणि त्यामुळे सरकारविषयी अप्रीति उत्पन्न होते. लेखाचा विचार करताना संदर्भाशिवाय घेतलेल्या त्यातील एखाद्या वाक्याचा अर्थ

करावयाचा नसून सबंध लेख वाचून मनावर होणाऱ्या परिणामाचा विचार केला पाहिजे. आम्ही हा सबंध लेख काळजीपूर्वक वाचला व या संबंध लेखात एकच अर्थ भरलेला मला दिसतो. माझ्या मताप्रमाणे खटल्यातील लेख आक्षेपार्ह असून ज्यामुळे सरकारविषयी अप्रीति अथवा द्वेष उत्पन्न होईल.

'दुसरा मुद्दा वादग्रस्त'

यानंतर दुसऱ्या गुन्ह्याचा (अत्याचाराला उत्तेजन देणे वगैरे) निर्णय देताना न्यायमूर्ती म्हणाले की, या लेखात अत्याचाराच्या धोरणाबद्दल नापसंती व्यक्त करण्यात आली नाही. पण तो लेख अत्याचाराबद्दल पसंती व्यक्त करतो किंवा नाही हा मुद्दा वादग्रस्त आहे. पण पहिल्या मुद्यावर अपील करणारा दोषी ठरत असल्यामुळे या दुसऱ्या मुद्यावर मत व्यक्त करणे जरूर आहे, असे आम्हाला वाटत नाही. आम्ही हे अपील काढून टाकतो, या निकालातच वादीने प्रतिवादीचा खर्च द्यावा, असे न्यायमूर्तींनी सांगितले.''[१२]

थोडक्यात वृत्तपत्रात सत्य परिस्थितीबाबत माहिती मांडली की त्यावर ब्रिटिश सरकार आक्षेप घेणारच असे 'नवाकाळ' वृत्तपत्राबाबत दिसून येते. अंदमानातील तुरुंगात असणाऱ्या कैद्यांच्या हालअपेष्टांविषयक लेखावरून 'नवाकाळ'वर खटला भरला गेला. सदर लेखातून सरकारविषयी अप्रीति अथवा द्वेष निर्माण होतो, असे कारण न्यायालयाने सांगितले. या खटल्यात कोर्टाने अपील काढून वादीने प्रतिवादीचा खर्च देण्यास सांगितले.

'नवाकाळ' वृत्तपत्रावरील खटले(स्वातंत्र्योत्तर काळ)

## ५.६ कृष्णा देसाई खून खटल्यात 'नवाकाळ' वृत्तपत्रास कोर्टाचे समन्स व वृत्तपत्र नीतीचा प्रश्न :-

१९७० मधील कृष्णा देसाईंचा खून :-

''५ जून १९७० रोजी रात्री आठनंतर लालबाग-परळ भागातील कम्युनिस्ट पक्षाचा मसल पॉवर (MUSCLE POWER) कॉ. कृष्णा देसाई याचा ८ युवकांनी खून केला. हा कटच होता! कृष्णा देसाईच्या पोटात चाकू खुपसण्यात आला आणि पोटातच फिरविण्यात आला. यामुळे कृष्णाच्या पोटातील आतडी तुटली. तो पोटातील जखम धरून सहकाऱ्यांसमवेत

नजीकच्या के.ई.एम. हॉस्पिटलात गेला. पण दाखल होण्यापूर्वीच मरण पावला. 'नवाकाळ'मध्ये मी 'भ्याड हल्लेखोरांचा भेकड खुनी हल्ला' अशा आशयाचा मथळा दिला होता. यानंतर एक–दोन दिवसांतच मी प्रत्यक्ष खुनाच्या जागी पोचलो. तिथे भरपूर माहिती मिळविली आणि प्रदीर्घ रिपोर्ट लिहिला. माझ्या या रिपोर्टमुळेच कृष्णा देसाई खून खटल्यात मी ओढला गेलो. लालबागच्या नाक्यावरच तावरीपाडा आहे. या तावरीपाड्यातच कृष्णा देसाई राहायचा. त्याची संध्याकाळी व्यायामशाळेसासारखी शाखा चालायची. खुनाच्या दिवशीही शाखा संपवून तो तेथीलच त्याच्या ऑफिसात बसला होता. ऑफिसबाहेर एक दिवा होता. हा दिवा अतोनात महत्त्वाचा ठरला!

या खून प्रकरणाचा तपास सीआयडी क्राइम ब्रँचचे रमाकांत कुलकर्णी, सुरेश पेंडसे आणि विनायक वाकटकर या अत्यंत गाजलेल्या तिघांनी केला! मी त्यांच्याकडे सतत जात राहून तपासाच्या खास बातम्याही मिळविल्या! खुनाचा कट केल्याचा आरोप ठेवून दहा–बारा शिवसैनिकांना पकडण्यात आले. तिघा सीआयडींनी भरभक्कम पुरावा जमा केला. त्यांच्यावर खटला सुरू झाला. आरोपींच्या वतीने नामवंत ॲड. राम जेठमलानी यांनी हा खटला रोजच्या रोज चालविला. सरकारनेही ॲड. पी.आर. वकील यांच्यासारख्या नामवंत वकिलाला उभे केले होते.''[१३]

थोडक्यात 'नवाकाळ' संपादक नीळकंठ खाडिलकरांनी 'नवाकाळ' वृत्तपत्रामध्ये कृष्णा देसाईच्या खुनाची माहिती अग्रलेखातून प्रकाशित केली. तसेच सीआयडी, क्राइम ब्रँचकडे जाऊन खून तपासाच्या बातम्या मिळविल्या. यातूनच नीळकंठ खाडिलकरांना कृष्णा देसाई खून खटल्यात खेचण्यात आले.

''कृष्णा देसाई खून खटल्यात एक दिवस मी अचानकपणे खेचलो गेलो! याच जन्मीच्या कार्यातून निर्माण होणाऱ्या नियतीच्या या खेळात मी प्रसिध्द झालो आणि कायद्यात आणखीच तयार झालो. रामराव मला 'अर्धा वकील' म्हणायला लागले! अर्धा वकील, कारण 'डिग्री' नाही, असे ते हसत म्हणायचे!

ॲड. राम जेठमलानी यांची मला नोटीस आली. कृष्णा देसाई यांच्या खुनानंतर मी प्रत्यक्ष त्या जागी जाऊन नंतर लिहिलेल्या रिपोर्टचा 'नवाकाळ' घेऊन त्यांनी मला साक्षीसाठी

बोलविले होते. सेशन्स कोर्टात न्यायमूर्ती कुटिन्हो यांच्यासमोर खटला सुरू होता. खून होऊन अनेक महिने झाले होते! कोर्टाचे मला साक्षीसाठी समन्स आले. मला साक्षीसाठी कशाला बोलावले याचा मी विचार करू लागलो. माझ्या लक्षात आले की, 'अंधाराचा फायदा घेऊन खुनी हल्ला' हा माझा मथळाच होता! रिपोर्टचा पहिला परिच्छेद तोच होता. हल्लेखोर कसे भेकड होते यावर भर होता. कृष्णा देसाई त्यांची 'शाखा' चालवून कार्यालयात गेला. हल्लेखोर एका कारजवळ उभे होते. कॉ. कृष्णा देसाईने 'ते कोण आहेत ?' असे आपल्या कार्यकर्त्याला विचारलेही होते. तो तसा सावध होता. पूर्वी त्याच्यावर झालेल्या खुनी हल्ल्यातून निसटला होता. तो कार्यालयातून बाहेर येताच हल्लेखोर तरुण त्याच्याजवळ गेले. एकाने त्याच्या पोटात गुप्ती खोलवर भोसकली. गुप्ती पोटात फिरवीत बाहेर काढली. सर्वजण पळाले. कृष्णा जखम हातांनी दाबून धरत 'मला डॉ. रवी बापटांकडे न्या!' असे सांगत जवळच्याच केईएममध्ये गेला. तिथे तो मरण पावला.''[१४]

थोडक्यात 'नवाकाळ' वृत्तपत्रात कृष्णा देसाई खुनाची बातमी छापल्यामुळे नीळकंठ खाडिलकरांना कोर्टात साक्षीसाठी समन्स देण्यात आले.

''समन्सनंतर मला दोन-तीन टेलिफोन आले. जेव्हा खुनी हल्ला झाला तेव्हा कृष्णाच्या कार्यालयापासून मुख्य रस्त्यापर्यंत अंधार होता आणि कार्यालयात बसणाऱ्या कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनीच मला ही माहिती दिली, असे सांगण्याचा फोनवर मला आग्रह करण्यात आला. मला राग आला. मी सांगितले की, मी कुणाचे ऐकणार नाही. रात्री विचार करीत असता मी निर्धार केला की, कोणी आणि काय माहिती दिली ते सांगण्यास नकार द्यायचा! कारण असे सांगणे पत्रकारितेच्या धर्म व नीतीविरुध्द होते!''[१५]

थोडक्यात कृष्णा देसाई खून खटल्यादरम्यान वृत्तपत्रांच्या नीतीचा प्रश्न समोर आला.

या वृत्तपत्र नीती प्रश्नामुळे कोर्टात घटनात्मक वाद निर्माण झाला. याबाबतची माहिती 'नवाकाळ' वृत्तपत्रात नीळकंठ खाडिलकरांनी दिनांक २७ जुलै १९७१ च्या 'कृष्णा देसाई खटल्यात वृत्तपत्रीय नीतीचा प्रश्न गाजला! या लेखातून सांगितले.'

स्वतः खाडिलकर लिहितात ''बातमीदाराचे वा माहिती देणाऱ्याचे नाव सांगण्यास नकार दिल्याने घटनात्मक वाद – कृष्णा देसाई खून खटल्यात आज एकविसाव्या दिवशी ॲडिशनल सेशन्स जज्ज यांच्यासमोर वृत्तपत्र नीतीचा मूलभूत प्रश्न आला जी नीती लोकमान्य टिळकांनी आचरणात आणली ती नीती आज मांडली गेली!

'या खटल्यात 'नवाकाळ, महाराष्ट्र टाईम्स, मराठा व नवशक्ती' या वृत्तपत्रांना, संपादकांना ॲड. राम जेठमलानी–शामराव सामंत यांच्या बचाव पक्षातर्फे समन्स निघाले आहे की ज्यांनी या प्रकाराबाबत गेल्या वर्षी रिपोर्ट दिले. त्यांना साक्षीदार म्हणून उभे करा!'

''साक्षीसाठी उभे राहून 'नवाकाळ'चे संपादक श्री. नीळकंठ खाडिलकर यांनी सांगितले की, मी साक्ष देण्यास तयार आहे. संबंधित अंक मी सादर केले आहेत. पण वार्ताहरांची नावे किंवा माहिती देणाऱ्यांची नावे मी सांगू शकणार नाही! जी नीती जगभर मान्य आहे. आणि लोकमान्य टिळक आदी नामवंतांनी ज्या नीतीचे पालन केले, त्या नीतीनुसार मला नावे सांगता येणार नाहीत. तसा आमचा खास हक्क आहे!'

प्रारंभीच दिलेले निवेदन

साक्षीला उभे राहताच श्री. नीळकंठ खाडिलकर यांनी एक निवेदन सादर केले. वृत्तपत्राची प्रथा (कन्व्हेन्शन) नीती याबाबतचे हे निवेदन कोर्टासमोर सादर केले ते असे–

''वृत्तपत्रे जी बातमी छापतात ती बातमी लिहिण्याचे आणि देणाऱ्याचे नाव कधीच सांगितले जात नाही. कारण बातम्या मिळविण्याचा आधार 'विश्वास' हा असून जर हा 'विश्वासघात' केला तर नागरिक वृत्तपत्रांशी कधीच सहकार्य करणार नाहीत! यामुळे वृत्तपत्रांचे अस्तित्व, स्थान, प्रतिष्ठा आणि विकास धोक्यात येईल. वृत्तपत्रांना दिलेली माहिती ही 'संरक्षित माहिती' (प्रोव्हिलेज्ड कम्युनिकेशन) आहे आणि म्हणून नावे सांगू शकणार नाही, हे नम्रपणे सुचवू इच्छितो.

हा प्रश्न माझ्या वृत्तपत्राचाच नसून साऱ्या वृत्तपत्रसृष्टीचा आहे. खुद्द 'नवाकाळ'च्या पूर्वीच्या संपादकांनी वृत्तपत्रसृष्टीची नीती राखताना तुरुंगवासही भोगला आहे. या नीतीचे मी पालन करू इच्छितो. जी बातमी मिळवली जाते ती छापल्यानंतर कुणालाही त्याचा वापर करता

येतो. माझ्या वृत्तपत्राचे अंक मी स्वतः सादर केले आहेत आणि केव्हाही सादर करीन. त्याचप्रमाणे संपादक म्हणून सर्व जबाबदारी स्वीकारून साक्षीसाठी उभा आहे.'

नीळकंठ खाडिलकरांनी लोकमान्य टिळक व काकासाहेब खाडिलकर यांच्या तत्त्वाचे पालन करून वृत्तपत्रात बातमी देणाऱ्याचे नाव न सांगता संपादक म्हणून सर्व आरोप स्वतःवर घेऊन वृत्तपत्राच्या हक्कासाठी कोर्टात निवेदन सादर केले. ''[१६]

कृष्णा देसाई खून खटल्यातून जो वृत्तपत्र नीतीचा प्रश्न निर्माण झाला त्यावर निकाल देण्यात येणार याबाबतची माहिती दि. २८ जुलै १९७१ च्या ''वृत्तपत्र नीती प्रश्न : 'आज न्या कुटिन्हो निकाल देणार' – 'मंत्र्यावर छापा' ही बातमी देणाऱ्याचे नाव सांगावे लागले तर? – ॲड. आदिक यांचा सवाल'' या लेखाद्वारे 'नवाकाळ' वृत्तपत्राने प्रकाशित केली.

''मी बातमीदाराचे किंवा माहिती देणाऱ्याचे नाव सांगू शकत नाही. कारण ही वृत्तपत्र नीती आहे.' असे उत्तर 'नवाकाळ'चे संपादक श्री. नीळकंठ खाडिलकर यांनी काल सेशन्स कोर्टात दिले आणि आज त्यावर शंभर मिनिटे युक्तिवाद होऊन सेशन्स जज्ज एफ.एफ. कुटिन्हो यांनी उद्या दुपारी २.४५ पर्यंत आपला निर्णय राखून ठेवला.'

'नवाकाळ'तर्फे ॲड. रामदाव आदिक यांनी वृत्तपत्र नीती घटनेला धरून असल्याचा युक्तिवाद केला आणि या नीतीला मान्यता दिलेले ब्रिटनमधील न्यायालयीन निकाल कोर्टाला सादर केले. श्री. आदिक यांच्या सहाय्यार्थ ॲड. ए.जी. सबनीस, ॲड. वसंत रा. भांडारे, ॲड. जयसिंगराव शिंदे, ॲड. माधव मेहेर, ॲड. पाटील, ॲड. थोरात, ॲड. डी.एम. हुले हे नामवंत वकील उपस्थित होते.

ॲड. रामराव आदिक म्हणाले की, श्री. खाडिलकरांनी उपस्थित केलेला हक्काचा मुद्दा हा भारतीय वृत्तपत्रसृष्टीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून जरूर पडल्यास त्यासंबंधीचा दाद हायकोर्टापर्यंतच नव्हे तर सुप्रीम कोर्टातही मागावी लागेल!''[१७]

**नीळकंठ खाडिलकर वृत्तपत्रांच्या हक्कासाठी हायकोर्टात गेले.**

संपूर्ण भारतातील वृत्तपत्रसृष्टीला याचा फायदा होणार होता. या कामगिरीसाठी नीळकंठ खाडिलकर व वृत्तपत्र नीतीसाठी सर्व स्तरातून पाठिंबा मिळत गेला. त्याबाबत दि. ६

ऑगस्ट १९७१ च्या ‘वृत्तपत्रीय नीतीच्या भूमिकेला अमाप पाठिंबा’ या लेखातून पाठिंबा दिलेल्याचे लेख व मनोगत सांगितले आहे.

‘वार्ताहराचे वा माहिती देणाऱ्याचे नाव सांगता येणार नाही,’ अशी भूमिका ‘नवाकाळ’चे संपादक श्री. नीळकंठ खाडिलकर यांनी मांडली आणि या भूमिकेला सर्व पत्रकारांचाच नव्हे तर खासदारांपासून सामान्यांपर्यंत सर्वांचा उत्स्फूर्त अमाप पाठिंबा मिळाला. लोकमताचा कोर्टाने उत्स्फूर्त निकाला दिला आहे. मुंबई मराठी पत्रकार संघ, मराठी पत्रकार परिषद व बॉम्बे युनियन ऑफ जर्नालिस्ट यांनीही हार्दिक पाठिंबा दिला आहे.

काही नियतकालिकांची व वाचकांची प्रतिक्रिया पुढे दिली आहे–

‘हिंदुस्थान टाईम्स’चा अग्रलेख–

नवी दिल्ली येथील सर्वात मातब्बर इंग्रजी दैनिक ‘हिंदुस्थान टाईम्स’ने ता. २ ऑगस्टच्या अग्रलेखात म्हटले आहे की,

‘‘भारतात पहिल्या प्रथमच एक पत्रकाराने, माहिती देणाऱ्याचे नाव न सांगण्याचा वृत्तपत्रांना हक्क आहे, असा दावा कायद्याच्या कोर्टात केला आहे, असे दिसते. हे पत्रकार म्हणजे मुंबईच्या ‘नवाकाळ’ या मराठी दैनिकाचे संपादक श्री. नीळकंठ खाडिलकर होत. कृष्णा देसाई खुनाचे वृत्त इतरांप्रमाणेच ‘नवाकाळ’ने दिले होते आणि साक्षीदार म्हणून साक्ष देण्यास ते उभे होते. माहिती देणाऱ्याचे तसेच वार्ताहराचे नाव सांगा, अशा आशयाचा प्रश्न येताच संपादक श्री. नीळकंठ खाडिलकर म्हणाले, पत्रकाराला अशी माहिती विश्वासाने दिली जाते आणि वृत्तपत्र स्वातंत्र्याची हमी घटनेने दिली असल्याने कोर्टात देखील माहिती देणाऱ्याचे नाव न सांगण्याचा पत्रकाराला हक्क आहे. श्री. खाडिलकर यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, इंडियन इव्हीडन्स ॲक्टमध्ये पती–पत्नी किंवा वकील–अशील यांच्यातील माहितीची देवाणघेवाण ’प्रिव्हिलेण्ड’आहे आणि त्यामुळे कोर्टात ही माहिती नाकारता येते, पण पत्रकाराला किंवा माहिती देणाऱ्याला असा कोणताही हक्क दिलेला नाही. तथापि श्री. खाडिलकर यांनी घटनेच्या आधारे हा हक्क असल्याचे सांगून नाव सांगण्यास नकार दिला. त्यावर न्यायमूर्तींनी

एका हुकूमान्वये श्री. खाडिलकर यांना उत्तर देण्याचा किंवा परिणाम भोगण्याचा आदेश दिला. त्याच वेळी हायकोर्टाकडे अपील करता यावे, यासाठी हुकूमाचा अंमल दहा दिवस स्थगित ठेवला. सद्यस्थिती ही अशी आहे.

हाच प्रश्न अलीकडेच इंग्लंडमध्ये आला होता. पत्रकाराने माहिती देणाऱ्याचे नाव सांगितले नाही. तेव्हा तेथील वरिष्ठ न्यायालयाने असा निर्णय दिला की, पत्रकार व त्याला माहिती देणारा यांच्यातील माहितीची देवाणघेवाण संरक्षित नाही. अखेरीस संबंधित पत्रकाराने नाव सांगण्यापेक्षा तुरुंगात जाणे पसंत केले. या प्रश्नाची त्या वेळी सांगोपांग चर्चा झाली.

ही गोष्ट उघड आहे की, गौप्यस्फोटाचे कार्य वृत्तपत्रांना वाढते करावे लागणार आहे. पत्रकार आणि त्याचा माहीतगार किंवा डॉक्टर आणि त्याचा रुग्ण अशासारख्यांना 'प्रिव्हिलेण्ड कम्युनिकेशन'चा हक्क इंडियन इव्हिडन्स ॲक्टखाली द्यावा काय, याचा विचार करण्यासारखी परिस्थिती आहे. जेव्हा 'इव्हिडन्स रुल्स' प्रथम तयार झाले तो जुना जमाना संपला आहे. वृत्तपत्र स्वातंत्र्याला खराखुरा अर्थ येण्यासाठी पत्रकाराला याची निश्चिती हवी की, कोर्टातही आपल्याला नावे सांगावी लागणार नाहीत. तसे नसेल तर बातमीदार तितका कार्यक्षम व उत्साही राहणार नाही. याहून अनिष्ट म्हणजे पत्रकाराला असा हक्क कोर्टात नाही असे जर सर्वसामान्य लोकांना वाटले तर माहितीचा झराच आटेल! सुप्रीम कोर्टाने एके ठिकाणी म्हटले आहे की, वृत्तपत्रांना विविध आणि विरोधी गोटातून माहिती मिळवावी लागते. पण अशी माहिती जास्तीत जास्त सादर करण्याच्या वृत्तपत्रीय कर्तव्यालाच बाधा येईल!''[१८]

**बॅ. विठ्ठलराव गाडगीळ यांचे मनोगत :–**

'कृष्णा देसाई खटल्यात साक्ष देताना तुम्ही जी भूमिका स्वीकारली व धैर्य दाखविले त्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन. लोकमान्य टिळकांची तेजस्वी परंपरा तुम्ही राखलीत. त्याबद्दल लोकशाहीप्रेमी नागरिक तुमचे ऋणीच राहतील.'

– वि.न. गाडगीळ,

खासदार, राज्यसभा.

**कोणतीही किंमत दिली पाहिजे :–**

'नाव जाहीर करणार नाही, अशी जी खंबीर भूमिका आपण स्वीकारली त्याबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन! वृत्तपत्र परंपरा टिकविण्यासाठी केवढीही मोठी किंमत द्यावी लागली तरी ती ध्येयवादी पत्रकारांनी दिली पाहिजे. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीपासून 'नवाकाळ'चे एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान राहिलेले आहे. या स्थानास शोभेल अशीच भूमिका तुम्ही घेतलीत. याबद्दल पुन्हा एकवार अभिनंदन.'

–प्रा. मधु दंडवते,
प्र.स. खासदार.

**नैतिक धैर्याची भूमिका :–**

'कॉ. कृष्णा देसाई यांच्या खुनाच्या खटल्यात तुम्ही वार्ता कोणी दिली, हे सांगण्यास नकार देऊन व शेवटापर्यंत आपल्या हक्कांसाठी झगडण्याचे ठरवून त्याप्रमाणे वागलात याबद्दल तुमचे अभिनंदन करतो!

आरोपीच्या वकिलांनी तो प्रश्नच मागे घेतल्याने या प्रश्नाची कोर्टात तड लागेल की नाही, हे सांगता येत नाही. पण हायकोर्टात रिट पिटिशन करून ते साधण्याचा तुमचा प्रयत्न प्रशंसनीय आहे.

तुम्ही या प्रसंगी जे नैतिक धैर्य दाखविले त्याबद्दल तुमचे कौतुक करावे तितके थोडेच आहे. तुम्हाला तुमच्या प्रयत्नात यश येवो, हीच इच्छा!'

–शं.गो .गोखले (ज्ञानप्रकाश चे माजी
संपादक )
आमराई कॅम्प, पुणे.
४''१९

खुद्द न्यायमूर्ती कुटिन्हो यांनी कृष्णा देसाई खटल्याचा निकाल जाहीर केल्यानंतर त्याच दिवशी 'नवाकाळ'साठी प्रशंसोद्गार काढले. 'न्यायमूर्ती कुटिन्होकृत 'नवाकाळ'ची प्रशंसा' कृष्णा देसाई खून खटल्याच्या 'नवाकाळ'मधील वृत्ताबद्दल आज न्यायमूर्ती एफ.एफ. कुटिन्हो यांनी प्रशंसोद्गार काढले.

या खटल्याचे वृत्त टिपणाऱ्या वार्ताहरांनी आज न्यायमूर्तींची त्यांच्या चेंबरमध्ये भेट घेऊन न्यायमूर्तींनी व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.

यावेळी वार्ताहरांशी बोलताना न्यायमूर्ती म्हणाले की, 'नवाकाळ'ने खटल्याच्या सुरुवातीपासून खटल्याचे वृत्त मर्मग्राही तसेच विचारपूर्वक दिले!

ॲड. वकील यांनी नंतर 'नवाकाळ'च्या वार्ताहराला गुरुवारचा 'नवाकाळ' आपल्याला पाठविण्यास आवर्जून सांगितले. त्यासाठी त्यांनी आपला पत्ताही दिला. 'नवाकाळ'बद्दल ॲड. वकील यांनी पहिल्यापासूनच उत्सुकता दाखविली व अत्यंत अचूक रिपोर्टिंग, असे ते 'नवाकाळ'बद्दल म्हणाले.''[२०]

थोडक्यात 'नवाकाळ' वृत्तपत्रावर १९७१ मध्ये संपादक, नीळकंठ खाडिलकर यांनी बातमी देणाऱ्याचे नाव न सांगितल्यामुळे खटला चालविण्यात आला. 'नवाकाळ' वृत्तपत्राची ही जशी परंपराच असल्याचे दिसते. १९२९ मध्ये सुध्दा काकासाहेब खाडिलकरांनी 'नवाकाळ' वृत्तपत्रावर राजद्रोहाचा खटला आला, तेव्हासुध्दा लेख लिहिणाऱ्याचे नाव न सांगून सर्व आरोप स्वतःवर घेतले. कृष्णा देसाई खून खटल्यात 'मंत्र्यावर छापा' या बातमीमुळे 'नवाकाळ' वृत्तपत्राचे संपादक नीळकंठ खाडिलकर व इतर वृत्तपत्रांच्या संपादकास साक्षीसाठी बोलावून घेण्यात आले; परंतु नीळकंठ खाडिलकर यांनी बातमी देणाऱ्याचे नाव न सांगून वृत्तपत्राच्या हक्कासाठी हायकोर्टात रिट पिटिशन सादर केले. सेशन्स कोर्टात सुध्दा 'नाव सांगा?' हा प्रश्न बचाव पक्षाच्या वकिलाने मागे घेतला. अनेक लोकांचा वृत्तपत्र नीतीच्या हक्कासाठी पाठिंबा मिळाला. त्यामध्ये अनेक राजकीय, वृत्तपत्र संपादक इत्यादींचा पाठिंबा मिळाला. 'वृत्तपत्र हक्क' ही एक ऐतिहासिक घटना घडली त्यास 'नवाकाळ' वृत्तपत्राचे संपादक नीळकंठ खाडिलकर यांनी योग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्याचा फायदा भारतातील सर्व वृत्तपत्रसृष्टीस होणार होता.

## ५.७ श्रीकृष्ण आयोगावरून 'नवाकाळ' वृत्तपत्रावर खटला :-

मुंबईशहरातील दंगली व बॉम्बस्फोट –

''१९९२ च्या डिसेंबर महिन्यात,१९९३ च्या जानेवारी महिन्यात झालेल्या दंगलीने आणि मार्च १९९३ मध्ये घडवून आणलेल्या बॉम्बस्फोटांनी सगळं मुंबई शहर हादरून गेलं होतं. फाळणीनंतर या शहरात एकदाही एवढे अमानुष प्रकार झाले नव्हते. त्यामुळे सहा वर्षे उलटली तरी आजही संवेदनशील नागरिक या दंगल–बॉम्बस्फोटांची भीषणता विसरू शकलेले नाहीत.''[२१]

श्रीकृष्ण आयोगाची निर्मिती–

''डिसेंबर १९९२ आणि जानेवारी १९९३ मध्ये झालेल्या भीषण जातीय दंगली, मार्च ९३ मध्ये झालेले बॉम्बस्फोट या अनेक मुंबईकरांच्या आयुष्यातल्या न विसरता येण्याजोग्या घटना आहेत. या दोन्ही आघातांचे घाव अजून भरलेले नाहीत. गुन्हेगारांना शिक्षा झालेली नाही. दंगल आणि बॉम्बस्फोटाची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या न्या. बी.एन. श्रीकृष्ण यांच्या आयोगाने १६ फेब्रुवारी १९९८ रोजी आपला अहवाल महाराष्ट्र सरकारला सादर केला. ६ ऑगस्ट ९८ ला हा अहवाल सरकारने विधिमंडळाच्या पटलावर ठेवला.''[२२]

थोडक्यात या अहवालास श्रीकृष्ण अयोग्य संबोधण्यास आले.

श्रीकृष्ण आयोगावर ८ ऑगस्ट १९९८ पासून 'नवाकाळ'मध्ये पाच अग्रलेखांची मालिका नीळकंठ खाडिलकरांनी सादर केली. त्या अग्रलेखांच्या विरोधात मुंबई हायकोर्टाने 'नवाकाळ'च्या संपादक जयश्री खाडिलकर–पांडे यांच्यावर खटला दाखल केला होता. या खटल्याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे आणि महाराष्ट्र सरकारचे लक्ष लागले होते.

याबाबत 'नवाकाळ' वृत्तपत्रातून दि. ६ ऑक्टोबर १९९८ रोजी 'अखेर मुंबई हायकोर्टाने श्रीकृष्ण अहवालावरील पाच अग्रलेखांबद्दल 'नवाकाळ'वर खटला केला' या मथळ्याच्या बातमीद्वारे माहिती प्रकाशित केली.

''न्यायमूर्तींची प्रतिष्ठा कमी करणारे अग्रलेख त्याबाबत नोटीसमध्ये म्हटले आहे. या पाच अग्रलेखातून १) वेड लागले न्यायमूर्ती, अहवाल ही जहराची कुपी आहे. २) श्रीकृष्ण म्हणजे अज्ञान व अहंकार यांची धक्कादायक जोडी! ३) न्या. श्रीकृष्ण यांना तत्काळ अटक करा. दंगल भडकविणारा न्या. श्रीकृष्ण ४) न्या. श्रीकृष्ण सायनाईड आणि नागिणीपेक्षा

भयंकर विषारी ५) न्या. श्रीकृष्ण यांचा शिशुपाली (पापी) अहवाल. अशी विधाने म्हणजे मथळे आहेत.

नोटीसमध्ये पुढे म्हटले आहे की, या अग्रलेखांच्या मालिकेने विशेषतः न्यायमूर्तींची आणि सर्वसामान्यपणे न्याययंत्रणेची प्रतिष्ठा जनमानसात कमी होऊ शकते! यामुळे 'नवाकाळ'मध्ये प्रसिध्द झालेल्या या अग्रलेखांबद्दल कोर्टाच्या बदनामीचा कायदा 'कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट ॲक्ट, १९७१'(contempt of court Act, 1971) याखाली खटला चालविणे योग्य होईल! यामुळे सदर नोटीस देण्यात येत आहे!

या नोटीस समवेत अग्रलेख मालिकेतील पाचही अग्रलेखांचे इंग्रजी भाषांतर जोडलेले आहे. या पाचही अग्रलेखांचे इंग्रजीत भाषांतर मुंबई हायकोर्टाच्या प्रमुख भाषांतरकाराच्या ऑफिसने केले आहे. भाषांतर तयार झाल्याची तारीख १७ ऑगस्ट १९९८ ही आहे.''[२३]

''याबाबत जो स्यू मोटो (SUO MOTO) खटला दाखल केला आहे त्याची नोटीस संपादक सौ. जयश्री खाडिलकर–पांडे यांना अवघी चार दिवसांची मिळाली आहे! शुक्रवारी २ ऑक्टोबर रोजी दुपारी ही नोटीस मिळाली. ६ ऑक्टोबर रोजी हायकोर्टात सुनावणी सुरू होणार आहे! न्यायमूर्ती टिपणीस आणि न्यायमूर्ती पारकर यांच्या कोर्टात सुनावणीसाठी मुख्य न्यायाधीश एम.बी. शहा यांनी नोटीस जारी केली आहे! महाराष्ट्र सरकार प्रतिवादी क्र. २ आहे.''[२४]

या दाव्यात महाराष्ट्र सरकारलाही प्रतिवादी केल्यामुळे या खटल्याला किती तरी अधिक महत्त्व आपोआप आले आहे.

श्रीकृष्ण अहवालावरील पाच तुफानी अग्रलेखांबद्दल 'नवाकाळ'वर स्यू मोट(SUO MOTO) खटला दाखल झाला होता. या खटल्यात 'नवाकाळ'ची भूमिका मांडण्यासाठी स्वतः नीळकंठ खाडिलकर उभे राहणार होते. हायकोर्टाच्या ५० वर्षांच्या इतिहासातील हा पहिलाच प्रसंग होता.

याबाबत 'नवाकाळ' वृत्तपत्राने दिनांक २३ ऑक्टोबर १९९८ रोजीच्या आपल्या अंकात 'अग्रलेखांचा बादशहा स्वतःच हायकोर्टात उभा राहणार. हायकोर्टाच्या ५० वर्षांच्या इतिहासात पहिलाच नाट्यपूर्ण प्रसंग' या मथळ्याने बातमी प्रकाशित केली.

''अग्रलेखांचे बादशहा नीळकंठ खाडिलकर हे मुंबई हायकोर्टात स्वतःच उभे राहून मुंबई

हायकोर्टाने भरलेल्या (SUO MOTO) स्यू मोटो खटल्यात 'नवाकाळ'ची भूमिका मांडणार आहेत! ॲडव्होकेट तर्फे बाजू न मांडता अग्रलेख लिहिलेल्या संपादकानेच स्वतःची बाजू मुंबई हायकोर्टाच्या गेल्या ५० वर्षांच्या इतिहासात यापूर्वी कधीच घडला नव्हता!'

'एक पाय तुरुंगात आणि एक पाय जनसामान्यांच्या लढ्यात' अशी भूमिका 'नवाकाळ'च्या चार पिढ्यांच्या चौघा संपादकांची सदैव राहिली आहे! यामुळेच कधीही कुणापुढेही न वाकणारी 'नवाकाळ'ची निर्भीड, निःस्पृह पत्रकारिता संपूर्ण स्वतंत्रपणे सुरू आहे! झुंजार विख्यात पत्रकार नारायण आठवले ही माहिती कळताच अभिनंदनाचा फोन करून म्हणाले की, पत्रकारितेच्या इतिहासात गौरवाची आणि अभिमानाची नोंद होईल, असा हा निर्णय आहे!!

'नवाकाळ'मध्ये श्रीकृष्ण आयोगाच्या अहवालाच्या चिंधड्या करणारी पाच अग्रलेखांची मालिका अग्रलेखांच्या बादशहाने शनिवार, ८ ऑगस्ट ते बुधवार १२ ऑगस्ट या पाच दिवसांत सादर केली होती! या अग्रलेखांचे अतिप्रचंड स्वागत झाले होते! नेहमीप्रमाणे लोकमान्यता मिळालीच!

श्रीकृष्ण अहवालात असा निष्कर्ष काढला होता की, डिसेंबर १९९२ आणि जानेवारी १९९३ या काळातील दंगलीत मुस्लिम जमावाची प्रतिक्रिया उत्स्फूर्त होती! पण हिंदूची संघटित होती! शिवसेनाप्रमुख यांनी कसलेल्या सेनापतीप्रमाणे मुस्लिमांवर संघटित हल्ले करण्याच्या प्रत्याघाताच्या धोरणाने उघडउघड नेतृत्व केले.

'नवाकाळ'च्या पाच अग्रलेखात प्रभावी युक्तिवादाने या अहवालाच्या अक्षरशः चिंधड्या अग्रलेखांच्या बादशहाने केल्या. लोकांनी अपूर्व स्वागत केले. पण न्यायमूर्ती श्रीकृष्ण मात्र अतोनात अस्वस्थ झाले. अग्रलेखांनी घायाळ झाले. त्यांना प्रेस कौन्सिलकडे तक्रार करता आली असती. किंबहुना, हीच कायद्यानुसार अधिकृत पध्दती आहे! बदनामीचा खटला दाखल करता आला असता. पण स्वतःच्या अंगावर काहीच जबाबदारी न घेता त्यांनी परस्पर मुंबई हायकोर्टाचे मुख्य न्यायमूर्ती यांच्याकडे तक्रार सादर केली!

यानंतर विचारविनिमय होऊन मुंबई हायकोर्टाने 'नवाकाळ'च्या संपादक सौ. जयश्री खाडिलकर-पांडे यांना स्यू मोटो (SUO MOTO) नोटीस या पाच अग्रलेखांबद्दल दिली! अग्रलेख ८ ते १२ ऑगस्ट या ५ दिवसांत प्रसिध्द झाले. यानंतर अवघ्या एका महिन्यात

म्हणजे १४ सप्टेंबर १९९८ रोजी मुंबई हायकोर्टाची स्यू मोटो नोटीस जारी झाली!

मागोमाग २ ऑक्टोबर १९९८ रोजी शुक्रवारी दुपारच्या वेळी 'नवाकाळ' ऑफिसात नोटीस बजावण्यात आलीसुध्दा! या नोटीसमध्येच स्पष्ट म्हटले होते की, अवघ्या तीन दिवसानंतर म्हणजे मंगळवार ६ ऑक्टोबर रोजी या अत्यंत महत्त्वाच्या स्यू मोटो कन्टेम्प्ट पिटीशनची (SUO MOTO Contempt Petition) सुनावणी सुरू होईल! ३ ऑक्टोबर व ४ ऑक्टोबर हे कोर्ट हॉलीडे होते. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर फक्त एक दिवसाचा अवधी देऊन गंभीर खटला सुरू झाला!''[२५]

खुद्द अग्रलेखांचा बादशहाच श्रीकृष्ण आयोग अहवालावरील आपल्या तुफानी गाजलेल्या अग्रलेखांबद्दल समर्थनासाठी हायकोर्टासमोर उभे राहणार असल्यामुळे असा काही प्रश्नच निर्माण झाला नाही! या खटल्याचे खास राजकीय महत्त्व होते!

८ ते १२ ऑगस्ट १९९८ या पाच दिवशी 'नवाकाळ'मध्ये अग्रलेखांच्या बादशहाची श्रीकृष्ण कमिशनच्या अहवालावर पाच अग्रलेखांची मालिका प्रसिध्द झाली! यामुळे कोर्टाची बदनामी झाली, असे स्यू मोटो(suo moto) क्रिमिनल पिटिशन नं. ६ (१९९८) मुंबई हायकोर्टाने दाखल केले होते. त्याची सुनावणी १७ नोव्हेंबर १९९८ रोजी न्यायमूर्ती अशोक ए. देसाई आणि न्यायमूर्ती विष्णू सहाय यांच्या खंडपीठासमोर सुरू झाली होती.

याबाबत 'नवाकाळ' वृत्तपत्रातून 'श्रीकृष्ण आयोगाच्या रिपोर्टवरील अग्रलेखांची बदनामी होऊ शकते काय? कोर्टाचाच सवाल!' 'राजा नागडा आहे,' हे सांगणारा पत्रकार हवाच' या मथळ्याच्या बातमीद्वारे माहिती दिनांक १८ नोव्हेंबर १९९८ रोजी देण्यात आली.ती पुढीलप्रमाणे–

''या वेळी खुद्द दोघाही न्यायमूर्तींनी असा सवाल उपस्थित केला की, महाराष्ट्र राज्य सरकारची या प्रश्नावर भूमिका कोणती? कारण जर महाराष्ट्र सरकारची त्याच पाच अग्रलेखांनी कोर्टाची बदनामी झाली नाही, अशी भूमिका असेल तर स्यू मोटो(suo moto) पिटीशन मुळातच रद्द होते. कारण सरकारी वकिलानेच असे पीटिशन चालवायचे असते.'

दोघा न्यायमूर्तींनी असाही सवाल उपस्थित केला की, जर चौकशी कमिशनने अहवाल दिला तर तो बंधनकारक असतो काय? जर बंधनकारक नसेल तर कोर्टाच्या बदनामीचा सवाल येत नाही. या दोनही प्रश्नांबाबत सरकारी वकील ॲड. राजीव पाटील यांनी सांगितले

की, मला महाराष्ट्र सरकारच्या सूचना घ्याव्या लागतील! तुम्ही अगोदरच अशा सूचना कशा घेतल्या नाहीत? असे विचारले असता सरकारी वकील ॲड. पाटील म्हणाले की, न्यायमूर्ती हा प्रश्न विचारतील याची मला कल्पना नव्हती! यावर दोघा न्यायमूर्तींनी येत्या २४ नोव्हेंबरपर्यंत मुदत दिली. त्या दिवशी सुनावणी पुढे सुरु होईल!

अग्रलेखांच्या बादशहाला आपल्या अग्रलेखामागची भूमिका मांडण्यास घ्यायची काय? त्यांनाही नोटीस पाठवायची काय? याचा निर्णय दोघे न्यायमूर्ती नंतर घेणार आहेत. मात्र 'नवाकाळ'च्या संपादक सौ. जयश्री खाडिलकर-पांडे यांनी न्यायमूर्तींना अग्रलेखांच्या बादशहाचा लेखी युक्तिवाद स्वतःच्या सहीने सादर केला! तुम्ही वकील नेमावा, असा सल्ला न्यायमूर्तींनी त्यांना दिला!''[२६]

'नवाकाळ' वृत्तपत्राच्या पाच अग्रलेखांबद्दल 'नवाकाळ' वृत्तपत्रावर खटला भरला होता. त्यावर मराठी भाषेचा अर्थ लावणे कोर्टास कठीण वाटू लागले. त्यामुळे मराठी येणारे खंडपीठ हवे या कारणास्तव खंडपीठच बदलले.

याबाबत नवाकाळ वृत्तपत्तातून दिनांक २५ नोव्हेंबर १९९८ रोजी 'नवाकाळ'चे तुफानी ५ अग्रलेख! खंडपीठच बदलले!! सरकारला भूमिका मांडण्यास तीन महिन्यानंतरही वेळ हवा!!' या मथळ्याने बातमी प्रकाशित झाली.

''न्या. श्रीकृष्ण चौकशी आयोगाच्या अहवालावर अग्रलेखांचे बादशहा नीळकंठ खाडिलकर यांनी ८ ते १२ ऑगस्ट असे पाच तुफानी अग्रलेख लिहिले! ते अजूनही गाजत आहेत! आज न्या. अशोक देसाई आणि न्या. विष्णू सहाय यांच्या खंडपीठापुढे तिसऱ्यांदा सुनावणी झाली तेव्हा न्या. विष्णू सहाय म्हणाले की, या अग्रलेखांतील मराठी भाषेचे अर्थ लावण्याचे काम मला नको! मला मराठी येत नाही!! मराठी येणाऱ्यांचे खंडपीठ असू द्या! यानंतर खंडपीठच बदलण्याचा निर्णय झाला!!!'

आणखी एक नाट्यपूर्ण आणि आश्चर्यजनक घटना घडली! महाराष्ट्र सरकारची या अग्रलेखावरील भूमिका स्पष्ट करण्यासाठी १२ ऑगस्टपासून सव्वातीन महिन्यांनीही सरकारी वकिलाने आपली असमर्थता प्रगट केली व आणखी मुदतवाढ मागितली!! सरकारी वकील राजीव पाटील यांनी आज आणखी १५ दिवसांची मुदत मागितली तेव्हा न्यायमूर्तींनी नाराजी प्रगट केली! पण अखेर खंडपीठच बदलण्याचा निर्णय झाल्यावर न्यायमूर्ती अशोक देसाई

म्हणाले की, आता तुम्हाला भरपूर वेळ मिळणार आहे!!! ॲड. पाटील आणखी काही बोलले नाहीत!! 'वेड लागणे' म्हणजे नक्की काय? याबाबत आज बराच वेळ ऊहापोह झाला!! 'वेड लागणे' हा मराठीतील नेहमीच्या बोलण्यातील वाक्यप्रचार आहे! कुणाला संगीताचे वेड असते, तर कुणाला नाटकाचे वेड असते! महाराष्ट्र 'नाटक वेडा' आहे, असे म्हणतातच असा युक्तिवाद करण्यात येत होते! तसेच २७३० शब्दांच्या पाच मॅरेथॉन अग्रलेखांमधील संदर्भ लक्षात न घेता अग्रलेखांच्या हेडिंगातील जेमतेम १५ ते २० शब्दांचा अर्थ कसा लावता येईल? असाही प्रश्न उपस्थित करण्यात आला! तथापि न्यायमूर्ती अशोक देसाई म्हणाले की, एखाद्याने फक्त हेडिंगच वाचली तर त्याचा परिणाम काय होईल? या वेळी Amicus Curiae (ॲमिकस क्युरी अर्थात कोर्टाचे सल्लागार) शेखर नाफडे म्हणाले की, ही फार जोरदार प्रभावी मराठी भाषा आहे! यामुळे अग्रलेखांच्या हेडिंगचा निश्चित फार परिणाम होईल! यामुळे अखेर दोघेही मराठी भाषिक असतील अशा खंडपीठापुढे सदर गाजणारे Criminal Suo Moto Petition No.61998 सोपविण्याचे ठरले![२७]

पुढे 'अशी ही नियती! तिची लीला अगाध आहे!' या लेखात 'नवाकाळ'चे संपादक म्हणतात–

...आम्ही नेहमीच सांगतो की, या जन्मीच्या कर्मातून याच जन्मी नियती निर्माण होते आणि याच जन्मी याचि देही याचि डोळा कर्मानुसार फळ देते! या नियतीचा न्याय फार कठोर आहे. निर्दय आहे. ती लाच घेत नाही! तिच्याकडे वशिला चालत नाही. ज्याला न्याय म्हणतात तो न्याय हीच नियती याच जन्मात देते!

आमचा हा नवा शोध अर्थात नवा विचार शाबीत करण्यासाठी वर्षानुवर्षे चिंतन करून आम्ही 'संपूर्ण प्रॅक्टिकल सोशॅलिझम' हा ग्रंथ १९९६ साली प्रसिध्द केला. यापूर्वी लिहिलेला व १९८६ साली प्रसिध्द झालेला 'प्रॅक्टिकल सोशॅलिझम' हा ग्रंथ नव्या मांडणीनंतर रद्द झाला असेच आम्ही मानतो!...

ते पुढे लिहितात, ...यानुसार पुनर्जन्म नाही आणि पूर्वजन्म नाही! पुढचा जन्म नाही आणि मागचा जन्म नाही! हा पाया मान्य केल्यावरच हिंदू धर्म विजीगिषु म्हणजे विश्व जिंकण्यास समर्थ होईल! कारण या तत्त्वज्ञानामुळे हिंदू नशिबावर आणि देवपूजेवर अवलंबून न राहता स्वतःच्या पायावर उभे राहतील! विज्ञाननिष्ठ होतील! बलशाली आणि आव्हानवीर

होतील!...

असे विचार त्यांनी लेखात मांडले.

थोडक्यात 'नवाकाळ' वृत्तपत्रातून श्रीकृष्ण आयोगाचे विवेचन करणारे पाच अग्रलेख लिहिले गेले; परंतु कोर्टास ते आपल्या विरोधी वाटल्याने त्यांनी 'नवाकाळ' वृत्तपत्रावर खटला चालविला. पण नीळकंठ खाडिलकरांनी स्वतः कोर्टात उभे राहून 'नवाकाळ' वृत्तपत्राची भूमिका मांडली. तीन महिन्यांनंतर सुध्दा सरकारी वकिलांनी असमर्थता दर्शविली आणि मराठी भाषिक असणाऱ्या खंडपीठाकडे खटला सोपविण्याचे ठरविण्यात आले होते.

## ५.८ 'भ्रष्टाचार निर्मूलन' विषयक मुलाखतीवरून 'नवाकाळ' वृत्तपत्रावर खटला :-

''लोकनायक अण्णा हजारे हे एक महाराष्ट्रातील समाजसुधारक व गांधीवादी विचारसरणी नेते आहेत. त्यांनी अन्यायाविरुध्द, भ्रष्टाचाराविरुध्द अनेक उपोषणे व क्रांतिकारक चळवळी केल्या. मूळचे अहमदनगर जिल्ह्यातील राळेगणसिध्दी गावचे रहिवासी असणारे लोकनायक अण्णा हजारे. भारताच्या सैन्यदलापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास १९९५ पर्यंत अनेक जनहितार्थ कामे केली. १९९५ नंतर मात्र अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचाराविरुध्द आंदोलनाला प्रारंभ केला. त्यावेळी शिवसेना-भाजपाचे सरकार सत्तेवर होते. अण्णांनी त्यावेळी तीन नेत्यांविरुध्द आवाज उठवला आणि आंदोलन सुरू केले. त्यांच्या अनेक मुलाखती वृत्तपत्रातून १९९५ पासूनच येत होत्या. तसेच त्यांनी भ्रष्टाचाराविरुध्द आंदोलनाचा भाग म्हणून ते आमरण उपोषणही केले. नाईलाजास्तव सरकारला या मंत्र्यांविरुध्द कृती करणे भाग पडले. सरकारने महादेव शिवणकर तसेच शशीकांत सुतार, बबनराव घोलप यांना मंत्रिमंडळातून बाहेर काढले. परंतु बबनराव घोलप यांनी अण्णांविरुध्द अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला. कारण अण्णांनी त्यांचे मत 'नवाकाळ' वृत्तपत्रासमोर सादर केले. आणि 'नवाकाळ'च्या संपादिका सौ. जयश्री खाडिलकर-पांडे यांनी ती मुलाखत 'नवाकाळ'मध्ये प्रकाशित केली.'

'अण्णांची ठाम भूमिका बबनराव भ्रष्टाचारीच !'

'नवाकाळ'च्या संपादक सौ. जयश्री खाडिलकर-पांडे यांनी विख्यात समाजसेवक अण्णा हजारे यांची खास मुलाखत घेऊन प्रसिध्द केली होती! 'ही मुलाखत

तंतोतंत बरोबर आहे आणि आपल्याला पूर्णपणे मान्य आहे,' असे अण्णा हजारे यांनी आपल्या साक्षीत म्हटले होते. ते म्हणाले की, 'बबनराव घोलप भ्रष्टाचारी आहेत, असे मी आजही म्हणतो!''[२८]

'बबनराव घोलप हे भ्रष्टाचारी आहेत', अशी मुलाखत अण्णा हजारे यांनी 'नवाकाळ' वृत्तपत्राचे संपादक सौ. जयश्री खाडिलकर-पांडे यांना दिली. यावरून त्यांना तीन महिन्यांची शिक्षा झाली. तसेच मुलाखत घेणाऱ्या 'नवाकाळ' संपादक सौ. जयश्री खाडिलकर-पांडे यांना 'जबाबदारी मुलाखत घ्या' असा कोर्टाने इशारा देऊन निर्दोष मुक्तता केली. याबाबत दि. १० सप्टेंबर १९९८ ला 'लढवय्ये अण्णा हजारे तुरुंगात निघून गेले! मी भ्रष्टाचाराविरुध्द लढतच राहणार!' या लेखातून माहिती प्रकाशित केली आहे ती पुढीलप्रमाणे-

''लढवय्ये आणि भ्रष्टाचारी मंत्र्यांचे कर्दनकाळ अण्णा हजारे यांनी आज सूर्याच्या तेजाचे आणि महात्मा गांधी यांच्या ओजाचे दर्शन घडविले! ते सरळ तीन महिन्यांची साधी कैद भोगण्यासाठी तुरुंगात निघून गेले! त्यांनी 'दया' नाकारली! मी याच क्षणी तुरुंगातच जातो! मला न्या अशी गर्जना केली!''[२९]

'नवाकाळ'च्या संपादक सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे यांची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. यापुढे जबाबदारीने खास मुलाखती घ्या, असा न्यायमूर्ती होळंबे-पाटील यांनी इशाराही दिला! तेव्हा सौ. जयश्री खाडिलकर-पांडे यांनी या शेऱ्याला विरोध केला! 'नवाकाळ'च्या संपादकांचा एक पाय तुरुंगात आणि एक पाय जनसामान्यांच्या रणांगणात असतो! अशी भूमिका सांगणारे लेखी निवेदन स्वीकारण्यास आणि ऐकण्यासही न्यायमूर्तींनी नकार दिला! सौ. जयश्री खाडिलकर यांना त्यांची भूमिका मांडायला संधीही नाकारली! 'नवाकाळ'ची ही भूमिका मांडणारे निवेदन त्यांनी 'नवाकाळ'मध्ये अन्यत्र छापले आहे!''[३०]

**मुंबई न्यायालयातील वृत्तांत :-**

''आज न्यायालयात तुफान गर्दी झाली होती आणि तंग वातावरण होते! न्यायालयाबाहेरही गर्दी होती! निकाल ऐकताच प्रचंड खळबळ उडाली! लोक धावत झुंजार अण्णा हजारे आणि 'नवाकाळ'च्या संपादक यांच्याकडे आले!' मंत्री भ्रष्टाचारीच आहेत. तुम्ही असेच लढत रहा! जनतेची शक्ती तुमच्या पाठीशी आहे! असे सांगू लागले! लोक 'नवाकाळ'च्या संपादकांना आवर्जून म्हणाले की, नीळकंठ खाडिलकरांना आमचा निरोप

द्या! एक पाय तुरुंगात आणि एक पाय जनसामान्यांच्या रणांगणात असेच लढत राहा! आमचा तुम्हाला सदैव पाठिंबा आहे!

न्यायालयाबाहेर अण्णा हजारे व 'नवाकाळ' यांना पाठिंबा देणारा जमाव उभा होता! हा जमाव घोषणा करीत होता की, 'भ्रष्टाचारी मंत्र्यांचा विजय झाला! भ्रष्टाचाराचा विजय झाला!' या जमावाला नंतर पोलिसांनी ताब्यात घेतले! न्यायमूर्ती होळंबे-पाटील यांनी दुपारी २ वाजता आपला निकाल पूर्ण केला! अण्णांनी तत्काळ पकडून तुरुंगात नेण्याचा आग्रह केला तेव्हा न्यायमूर्ती होळंबे-पाटील म्हणाले की, 'कोर्टाचा स्टाफ जे करायचे करील! मी निघून जातो!' यानंतर ते निघून गेले! दुपारी ३ वाजता परत आले! कुणाला काहीही बोलू दिले नाही!

न्या. होळंबे-पाटील यांनी तीन महिन्यांच्या साध्या कैदेची सजा अण्णांना फर्माविलीच, पण त्याच वेळी सांगितले की, तुमचे वय, अनुभव व सेवा लक्षात घेऊन मी तुम्हाला व्यक्तिगत जातमुचलक्यावर मुक्त करण्यास तयार आहे! मात्र यापुढे तुम्ही मंत्र्याबाबत मुलाखती देता कामा नये! असा बॉण्ड लिहून द्या! जर तुम्ही मुलाखत द्याल तर त्याच दिवशी तुम्हाला तीन महिने तुरुंगवासाची सजा भोगावी लागेल!' पण हा निकाल ऐकताच अण्णा हजारे सात्विक संतापाने ताडकन म्हणाले, 'मला तुमचा हा व्यक्तिगत बॉण्ड साफ नामंजूर आहे! मंत्री भ्रष्टाचारीच आहेत! मी त्यांच्या भ्रष्टाचाराच्या मुलाखती देणारच! याच क्षणी मला अटक करा आणि तुरुंगात न्या!' अण्णांच्या या तेजाने न्यायालयात एकच खळबळ माजली! लोक अत्यंत आनंदित झाले!

अण्णा हजारे आज सिंह गर्जनाच करीत होते! ते न्या. होळंबे-पाटील यांना उद्देशून म्हणाले की, आम्ही स्वातंत्र्यासाठी लढलेलो आहोत! या स्वातंत्र्यलढ्यात अनेकांनी सजा भोगलेल्या आहेत! मला दया नको! मी कसलाही बॉण्ड देत नाही! स्वातंत्र्यलढ्यातील वीरांच्या परंपरेनुसार सरळ तुरुंगात जातो! अखेर दुपारी ३ नंतर त्यांना तुरुंगात नेण्यात आले.''[३१]

थोडक्यात बबनरावांविरुध्द भक्कम पुरावा अण्णांना कोर्टात सादर करता आला नाही. त्यामुळे कोर्टाने अण्णांना तीन महिन्यांची शिक्षा सुनावली. परंतु तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी त्यांना एका दिवसात तुरुंगातून मुक्त केले.

''सौ.जयश्री खाडिलकर-पांडे यांनी भ्रष्टाचार निर्मूलनाबाबत कोर्टास निवेदन सादर केले होते. ते निवेदन न्यायमूर्ती होळंबे-पाटील यांनी स्वीकारण्यास नकार दिला होता. पण

सदर निवेदन जनतेच्या माहितीसाठी 'नवाकाळ' वृत्तपत्र व सौ. जयश्री रमाकांत पांडे–खाडिलकर यांनी मांडलेली भूमिका पुढीलप्रमाणे–

१) भ्रष्टाचार निर्मूलन हे पत्रकाराचे कर्तव्य आहे! तीच आमची तळमळ आहे! या तळमळीने कर्तव्य करताना जर मंत्र्यांकडे त्याच्या वैध उत्पन्नापेक्षा शेकडो पटीने अधिक मालमत्ता असल्याचे दिसून आले तर ती भ्रष्टाचारी असल्याचे समाजाला सांगितलेच पाहिजे! या शुध्द बुध्दीने आणि उत्पन्नापेक्षा किती तरी अधिक मालमत्तेच्या रास्त संशयासाठी पुरेशा माहितीने मी अण्णा हजारे यांची मुलाखत जशीच्या तशी छापली.

२) जर रास्त संशयासाठी पुरेशा माहितीने भ्रष्टाचार उघडकीस आणणाऱ्याला सजा होणार असेल आणि जर भ्रष्टाचाराचा रास्त संशय असणाऱ्या व जनतेची तशी खात्री असलेल्या मंत्र्याची निर्दोष सुटका होणार असेल, तर समाजाला कोणता 'सिग्नल' मिळेल?'

३) 'नवाकाळ'ला न्यायालयाबद्दल संपूर्ण विश्वास आहे व सादर आहे! भ्रष्टाचाऱ्यांना आज सर्वात अधिक धाक न्यायालयाचाच आहे आणि न्यायालये हीसुध्दा वृत्तपत्रांप्रमाणे (Watchdog of Democracy) 'वॉचडॉग ऑफ डेमोक्रसी' झाली आहेत! सुप्रीम कोर्ट पोस्ट कार्डावरील पत्रालाही 'रिट पिटिशन' चा दर्जा देत आहे!

४) माझ्यावर दयाबुध्दी दाखविण्यासाठी आपणाकडे माझी कोणतीही प्रार्थना नाही. आपला निकाल कोणताही असला तरी आपल्याविषयी 'नवाकाळ'ला आणि मला सदैव विश्वास व आदर आहे. आपण 'रामशास्त्री' आहात हीच 'नवाकाळ'ची भूमिका कायम राहील.

५) माननीय न्यायमूर्ती महाशयांना माझी एक प्रार्थना आहे. आपण मुलाखतीतील एकच वाक्य सिध्द करण्याचा आग्रह करीत आहात! पण रिपोर्ट किंवा मुलाखत किंवा अग्रलेख यातील एकच वाक्याचा अर्थ कसा करता येईल? जर 'अमूक एक व्यक्ती फार शहाणी आहे!' असे वाक्य असेल तर त्याचा अर्थ संपूर्ण लिखाणावरूनच स्पष्ट होतो! 'सलाम, गोपीनाथजी, खाड् खाड् सलाम' असा अग्रलेख 'नवाकाळ'मध्ये आला! केवळ या मथळ्यावरून गोपीनाथजींना सलाम केला असे म्हणता येईल काय? प्रत्यक्षात हा अग्रलेख म्हणजे दाहक उपहास आहे! संपूर्ण अग्रलेखावरूनच अर्थ नक्की

होईल!

६) मी काही कायद्याची पदवीधर नाही! मी जे काही लिहिते व बोलते ते मुख्यतः समाजकल्याणाच्या तळमळीने आणि भ्रष्टाचाराबद्दल चिडीने पण जबाबदारीने लिहिते व बोलते! आपल्याबद्दल मला प्रचंड आदर व विश्वास आहे! आपण तथ्य ते घ्यावे व निरर्थक ते सोडावे! आपण 'दूध का दूध और पानी का पानी' करालच यात शंका नाही. पण 'नवाकाळ'ची व माझी ही तळमळ मला पूर्णपणे व्यक्त करू द्यावी व रेकॉर्डवर घ्यावी!

७) भ्रष्टाचाराविरोधी उभे ठाकलेले वंदनीय समाजसेवक अण्णा हजारे यांचा प्रत्येक शब्द छापणे हे पत्रकारितेचे कर्तव्य आहे! अण्णा हजारे लोकांकडून आलेल्या तक्रारीची व पुराव्यांची तज्ज्ञांकडून तपासणी करून घेऊन आरोप करतात! जनतेचा व 'नवाकाळ'चा त्यांच्यावर विश्वास आहे!

८) माननीय मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना व त्यांची खास मुलाखत घेतलेले नीळकंठ खाडिलकर यांना साक्षीसाठी बोलावण्याची मागणी मी केली होती. जर त्यांना साक्षीसाठी बोलावले तर आजही बबनराव खोटे बोलत आहेत आणि आमच्या संशयाला रास्त आधार आहे, असे मी सिध्द करीन. पण ही संधी नाकारली गेली.'

सन्माननीय कोर्टाची नम्र आज्ञाधारक
सौ. जयश्री खाडिलकर –पांडे
संपादक, नवाकाळ
बुधवार, ९ सप्टेंबर १९९८.''[३२]

अशा प्रकारे 'नवाकाळ' ने भ्रष्टचार विरोधी लढयाला वृत्तपत्रातून वाचा फोडली.

## स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय कार्य

### ५.९ 'असहकार–चळवळ' :–

महात्मा गांधींनी असहकार चळवळीचा ठराव तयार केला होता त्याचा वृत्तांत पुढील ड्ढ

असहकार चळवळ एक आत्मयज्ञ :-

'लोकमान्य' वृत्तपत्रातील लेखमालेमध्ये काकासाहेब खाडिलकरांनी लोकमान्य टिळकांच्या कर्तृत्वाचे तत्वे विस्ताराने प्रतिपादन केलेली होती. १९२३ मध्ये 'नवाकाळ' वृत्तपत्र सुरू केल्यानंतर टिळकाच्या कर्तबगारीतील आणखी एका अज्ञात किंवा झाकलेल्या मूल्यावर प्रकाश टाकणारा 'लो. टिळक आणि समूहाचा आत्मयज्ञ' हा अग्रलेख दिनांक २ ऑगस्ट १९२३ रोजी प्रकाशित केला. त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे

''न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज याचा संबंध सुटून लो. टिळक राजकारणात पुर्णपणे पडल्यानंतर त्याचे सर्व आयुष्य त्यांनी एकट्यानी केलेल्या आत्मयज्ञाची एक लांबलचक मालिकाच होऊन बसले. अखेर पर्यंत हे आत्मयज्ञाचे व्रत त्यांनी एकसारखे चालविले व फलाची अपेक्षा न करता कर्तव्यकर्म म्हणून सतत लढत राहण्याऱ्या व आत्मयज्ञातच सुख मानणाऱ्या तेजस्वी लढवय्याचे उदाहरण राष्ट्रास घालून दिले. विभूतीने स्वतःच्या एकट्याच्या बुध्दीने निश्चित केलेल्या कर्तव्याच्या जोरावर केलेल्या आत्मयज्ञापासून समुहाच्या आत्मयज्ञाला कोणत्याही राष्ट्रात प्रारंभ झाला पाहिजे. तेव्हा लो.टिळक यांचे चरित्र संपते न संपते तोच हिंदुस्थानात समूहाच्या आत्मयज्ञास प्रारंभ व्हावा. हे अगदी साहजिक आहे. महात्मा गांधी यांनी जी असहकारितेची चळवळ सुरू केली आहे. ती जंगी चळवळ म्हणजे समुहाचा आत्मयज्ञच होय. दक्षिण आफ्रिकेत असताना समुहाच्या आत्मयज्ञाची महती महात्मा गांधी यांच्या मनावर बिंबली होती. आणि हिंदुस्थानात ही खरी संधी येण्याबरोबर समूहाच्या आत्मयज्ञाच्या चळवळीस त्यांना प्रारंभ केला. व्यक्तीच्या आत्मयज्ञाचा मार्ग व समुहाच्या आत्मयज्ञाचा मार्ग हे दोनही एकाच स्वरूपाचे असतात. व्यक्तीला जी निंदा सोसावी लागते किंवा ज्या हालअपेष्टातून जावे लागते, तीच निंदा व त्याच हालअपेष्टा समुहाच्याही आत्मयज्ञाच्या कपाळी लिहिलेल्या असतात. व्यक्तीचा आत्मयज्ञ समुहाकरिता असतो आणि समुहाचा आत्मयज्ञ मागे पुढे हालत राहून अखेरीस यशाच्या पायरीला चढतो. समूहाच्या आत्मयज्ञास जन्म दिला म्हणजे व्यक्तीच्या आत्मयज्ञाचे कार्य संपते. ज्या विभूतीनी असल्या समूहाच्या आत्मयज्ञास जन्म दिलेला असतो, त्या विभुतीच्या चारित्राकडे पाहून समूहाचा आत्मयज्ञ नेहमी आपला मार्ग आक्रमीत असतो. समूहाच्या आत्मयज्ञास मार्गदर्शक होण्याकरिताच ऊर्फ लोकसंग्रह

करण्याकरिताच मुक्त झालेल्या पुरुषानीही कर्मे आचारली पाहिजेत, हे गीतारहस्यातील तत्व ध्यानात ठेविले असता लोकमान्य टिळक याच्यासारख्या विभूतीच्या चारित्राचा व सांप्रताच्या समुहाच्या आत्मयज्ञाचा कोणता संबंध आहे, हे तेव्हाच ध्यानात येते. १८९७ साली लो. टिळक तुरुंगात गेल्यानंतर लोकांकडून टाळ्या वाजवून घेण्याकरिता हा तुरुंगात गेला आहे. अशा प्रकारचे आरोप त्याच्यावर काय कमी झाले? यांप्रख्यात राष्ट्रीय निशाणाच्या चळवळीवर हेच आरोप सूरू आहेत. असहकारितेची चळवळ लोकप्रिय व्हावी म्हणून राष्ट्रीय निशाणाच्या समूहाचा आत्मयज्ञ करण्यात येत आहे. अशी निंदा आजकाल काय थोडी ऐकावयास मिळते? लो. टिळक यांनी या निंदेची पर्वा केली नाही, आणि त्याच्या आयुष्याचे अखेरीस त्याचे निंदकच स्तुतिपाठक होऊन बसले फलासंबंधाने अपेक्षा मनात न धरता आत्मयज्ञ करण्याचा लो. टिळक याचा स्वभाव पडल्यामुळे त्यांना अशा निंदेची पर्वा करण्याची जरूरी राहिली नाही. आज समूहाच्या आत्मयज्ञाच्या वेळी व्यक्तिशःनिंदा किंवा स्तुति जी होते ती पुढाऱ्यांची होते पण बाकीच्या लोकांना आपल्या कृतीत फलाविषयीची पूर्ण उदासीनताच ठेवावी लागते. आज ७५ लोक पकडले, काल सुरतचे ४० पकडले अशा प्रकारच्या बातम्या प्रसिध्द होण्यापलीकडे अधिक गवगवा समूहाच्या आत्मयज्ञाचा होऊच शकत नाही. तत्काळ स्तुति किंवा निंदा याची पर्वा न करता गंभीर व शांतवृत्तीने आत्मयस करण्यास तयार होणे, हा सद्गुण राष्ट्रात चोहोकडे पसरलेला असल्याशिवाय कोणतेही राष्ट्र वैभव संपन्न व सदाचाराचे माहेरघर होऊच शंकत नाही. आज अशा प्रकारच्या समूहाच्या आत्मयज्ञाची उदाहरणे हिंदुस्थानात एकसारखी दृष्टीस पडत आहेत, हे हिंदुस्थानचे सद्भाग्यच समजले पाहिजे. युवराजाच्या प्रवासाच्या वेळच्या आत्मयज्ञाची समाप्ती होते न होते तोच अकालीचा आत्मयज्ञ सुरू झाला. आणि अकालीचा आत्मयज्ञ संपतो तो राष्ट्रीय निशाणाचा आत्मयज्ञ पुढे आला. या सर्व आत्मयज्ञावर मुर्खासारखे काही तरी करीत आहेत, अशी टीका विरुध्द पक्षाकडून करण्यात येत आहे. हा मूर्खपणाचा छाप टिळकावर मारण्यास त्याच्या प्रतिस्पर्धांनी कोठे कमी केले?

लो. टिळक याच्या एकट्याच्या आत्मयज्ञाच्या चरित्रात जे अडथळे आले आणि त्या अडथळ्यांना दूर करण्याकरिता त्यांनी स्थिर बुध्दीने जे धोरण आखले, त्या अडथळ्यांचा व धोरणांचा नीट विचार करून, समूहाच्या आत्मयज्ञाकरिता लोकांना मार्गदर्शक असे नियम घालून देण्याकरिता जर कमिशन नेमण्यात आले तर सांप्रतच्या राष्ट्रीय निशाणाच्या चळवळीमध्ये

काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी जे नियम घालून दिले आहेत तेच नियम बरोबर आहेत असे म्हटल्यावाचून सदर कमिशनला गत्यंतर राहणार नाही. समूहाच्या आत्मयज्ञाचा कार्यक्रम कोणत्या नियमांना अनुसरून चालला पाहिजे हे ठरविण्याचे लोकसंग्रहाचे काम म्हणजे लो. टिळक यांचे राजकीय चरित्र होय. हे ध्यानी ठेवून व त्याच्या चरित्राचा वारंवार विचार करून सांप्रतच्या समूहाच्या आत्मयज्ञास निरनिराळ्या प्रकारे मदत करणे इष्ट आहे. असेच त्याची पुण्यतिथि त्याच्या सर्व अनुयायांना निक्षून सांगत आहे.''[३३]

'लोकमान्य' वृत्तपत्रातील लेखमालेमध्ये काकासाहेब खाडिलकरांनी लोकमान्य टिळकांच्या कर्तृत्वाचे तत्वे विस्ताराने प्रतिपादन केलेली आहे.

**राष्ट्रीय निशाण चळवळ :–**

''शिवराम महादेव परांजपे (संपादक 'काळ') व कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर (संपादक 'नवाकाळ') दोघेही टिळकांचे खरे अनुयायी होते. महाराष्ट्राच्या राष्ट्रीय चळवळीतील एका लढाऊ गटाचे प्रतिनिधित्व ते करीत होते परकीय सत्तेविरुध्द बंडाचे निशाण उभे करण्यासाठी जनतेला हा कार्यक्रम तयार करील (हा निर्दोष आहे म्हणून नव्हे) म्हणूनच त्याचा स्वीकार केला आहे अशी या गटाची धारणा होती.

१९२३ साली 'नवाकाळ' निघाल्यानंतर राष्ट्रीय निशाणाचा झगडा सुरू झाला. तो लोकांच्या स्वराज्यविषयक स्वाभिमानाचा दर्शक होता. नागपूरमध्ये राष्ट्रीय निशाणासाठी सत्याग्रह सुरू करण्याचा निर्णय झाला होता. त्याअगोदर राष्ट्रीयनिशाण मिरवणुकीसाठी बरेच स्वयंसेवक तुरुंगात गेले. राष्ट्रीय निशाणाची मिरवणूक म्हणजे एक प्रकारची स्वराज्याची चळवळ होय. दि १ मे १९२३ रोजी च्या 'नवाकाळ'मधील राष्ट्रीय निशाणाचा झगडा' अग्रलेखात काकासाहेब खाडिलकरांनी पुढील विवेचन केले.

''राष्ट्रीय निशाणाच्या अब्रुसाठी नागपूरचे देशभक्त आजपासून सत्याग्रहास सुरवात करणार आहेत. जबलपूर व नागपूर येथे आतापर्यंत राष्ट्रीय निशाणाच्या मिरवणुकीचे पायी बरेच स्वयंसेवक तुरुंगात गेले आहेत. राष्ट्रीय निशाण उभारणे किंवा राष्ट्रीय निशाणाची मिरवणूक काढणे या गोष्टी राजद्रोहाच्या ठरत नाहीत. राष्ट्रीय निशाण हे स्वराज्याच्या चळवळीचे चिन्ह

आहे. राष्ट्रीय निशाणाची मिरवणूक म्हणजे एक प्रकारची स्वराज्याची चळवळ होय. ह्या चळवळीमुळे एका ध्येयावर लोकाची दृष्टि एकवटली जाते. प्रत्यक्ष निशाण डोळ्यापुढे उभे असल्यामुळे चळवळ केवळ बुध्दीच्या टापूत न रहाता चळवळीला एक तऱ्हेचा प्रत्यक्षपणा येतो. मूर्तीची उपासना आणि ध्यान ह्याच्यामध्ये जे अंतर आहे तेच अंतर निशाणाची मिरवणूक आणि राजकीय परिस्थितीसंबंधीचे व्याख्यान यांच्यामध्ये आहे. राष्ट्रीय निशाणाने राजकीय चळवळ मूर्तिमंत होते. कोणतीही चळवळ देहधारी ऊर्फ ऑर्गनाईझ्ड होण्यास बाह्य स्वरूपाची जरूरी असते. राष्ट्रीय गीते, राष्ट्रीय सभागृहे, त्या त्या चळवळीत वाहिलेले सेक्रेटरी व अध्यक्ष याचे ठिकठिकाणचे जमाव व वक्तव्याची जुळणी, चळवळीच्या धोरणाने लोकमतास वळण देणारी वर्तमानपत्रे, ध्येयाचे उपासनेला उन्नति देणाऱ्या पुढाऱ्याची चित्रे आणि राष्ट्रीय निशाणासारखे सर्व चळवळीचे सार दाखविणारे एखादे प्रतीक, या सर्वाचा जेव्हा योग्य रीतीने मेळ बसतो तेव्हा चळवळ देहधारी होऊन प्रत्यक्षपणे लोकांना दिसू लागते. अशा दृष्टीने विचार केला असता राष्ट्रीय निशाणासंबंधाने जबलपूर व नागपूर येथील देशभक्तांनी राष्ट्रीय निशाणाच्या अब्रुकरिता सुरु केलेला सत्याग्रह केवढया मोठया योग्यतेचा आहे हे कोणाच्याही ध्यानी येईल. राष्ट्रीय निशाणाची चळवळ राजद्रोहाची नाही किंवा दंगाधोरण्याची ही नाही. असे असताही या चळवळीला जबलपूर व नागपूर येथील पोलिसने अडथळा केला, देशभक्तांना निर्दयपणाने मार दिला, आणि कित्येकांना तुरुंगात टाकले. मध्यप्राताच्या पोलिसांची ही कृती मुत्सद्दीपणास धरून बिलकूल झाली नाही. कारण स्वराज्याच्या चळवळीत अशारीतीने चळवळीच्या उत्पत्तीचे प्रारंभाचे तुर्त निर्दयपणे तोडून टाकण्याचे दिवस केव्हाच निघून गेले आहेत.''[३४]

'राष्ट्रीय निशाण' चळवळीसाठी कित्येक लोक तुरुंगात गेले. असहकार चळवळीच्या धर्तीवर असलेली ही राष्ट्रीय निशाण चळवळ यशस्वी होत चालली होती.

**काँग्रेसचा कौन्सिल प्रवेशावर बहिष्कार :–**

''गांधीनी तुरुंगात व बाहेर काँग्रेसच्या गोटात फूट अशा स्थितीत गांधीच्या राजकारणाविषयी लोकांची भक्ती टिकवून धरण्याचे काम अतिशय बिकट होते. परंतु ज्याकरिता काँग्रेसचे कित्येक पुढारी गांधीच्या राजकारणाशी फटकले तो मुख्य विषय कौन्सिलात जाण्याचा होता. १९२३ मध्ये कायदे मंडळातील खऱ्याखुऱ्या लोकमताला धाब्यावर

बसवून मिठाचा कर बिनदिक्कत वाढविल्यामुळे कायदेमंडळातील लढाईच्या परिणामकारकतेबद्दल लोकांचा विश्वास डळमळणे स्वाभाविक होते हा प्रसंग काकासाहेबांच्या नजरेतून सुटणे शक्य नसल्यामुळे त्यांनी गांधीच्या राजकारणासाठी त्याचा उपयोग करून घेतला.''[३५]

कॉंग्रेस पुढाऱ्याचा कौन्सिलातील प्रवेश तसेच त्याबाबत महात्माजीचे मत याबाबत 'नवाकाळ' वृत्तपत्रातून वेळोवेळी अग्रलेख प्रकाशित केले. दिनांक १७ मे १९२३ रोजी 'कौन्सिलांवर बहिष्कार का घातला?' हा अग्रलेख प्रकाशित झाला. त्याचे विवेचन पुढील प्रमाणे–

''अमृतसरच्या कॉंग्रेसच्या वेळी कौन्सिलात शिरून कौन्सिलाचा उपयोग करून घेण्याचा ठराव पास झाला असताना कलकत्याच्या स्पेशल कॉंग्रेसमध्ये व त्यानंतरच्या कॉंग्रेसच्या तीन बैठकीमध्ये तीन वर्षे कॉंग्रेसने बहिष्काराचा ठराव पास केला. आता हा ठराव अधारत्री ठेवण्याची सूचना पुढे येत आहे. कौन्सिलावर बहिष्कार ज्या कारणाकरिता घालण्यात आला ती कारणे नष्ट झाली आहेत का? पंजाब प्रकरण, स्वराज्य व खिलाफत या तीन प्रसंगी नोकरशाहीच्या धोरणाचा जो अनुभव आला, त्या अनुभवामुळे कौन्सिलवरील बहिष्काराचा मार्ग राष्ट्राच्या कल्याणाचा आहे असे कॉंग्रेसने ठरविले. नोकरशाही बेताल वागते आणि या बेताल वागण्यास आला घालण्याचे सामर्थ्य कौन्सिलाच्या अंगी नसल्यामुळे तेथे काम करून व्यर्थ वेळ दवडण्यापेक्षा ज्या योगाने नोकरशाहीस आळा बसू शकेल असले सामर्थ्य स्वार्थत्यागाच्या जोरावर राष्ट्रात उत्पन्न करण्याची चळवळ करता यावी हे ध्येय पुढे ठेवून कौन्सिलांवर बहिष्कार घालण्यात आला त्यानंतरच्या तीन वर्षाचा अनुभव आज राष्ट्रापुढे आहे.''[३६]

कौन्सिलवरील बहिष्काराचा मार्ग राष्ट्राच्या कल्याणाचा आहे असे कॉंग्रेसचे मत होते. महात्माजी तुरुंगातून सुटल्यानंतर कौन्सिलप्रवेशाचा वाद चांगलाच रंगला होता. काकासाहेब खाडिलकरांनी याबाबत दिनांक २४ मे १९२३ रोजीच्या 'नवाकाळ' वृत्तपत्रातून 'महात्माजीचे मत' हा अग्रलेख प्रकाशित केला. त्यात त्यांनी म्हटले की–

''कॉंग्रेसच्या अनुयायानी कौन्सिलात शिरावे किंवा कसे ह्या संबंधाचा वाद गेल्या वर्षी ज्यावेळी जोरात होता. त्यावेळी कौन्सिलवरील बहिष्कार कायम ठेवणाऱ्या पक्षाला असे

सांगण्यात येत होते की, आपल्या सहा वर्षाच्या शिक्षेनंतर महात्मा गांधी सुटून आल्यावर कौन्सिलवाल्या पक्षास आशीर्वाद दिल्यावाचून राहणार नाहीत. लाला लजपतराय, पं. मोतीलाल नेहरू, व देशबंधु दास हया तिघाची मते ज्याप्रमाणे असहकारितेच्या चळवळीतील एक दोन वर्षाच्या अनुभवाने बदलली, त्याप्रमाणे महात्मा गांधी हयाचेहि मत कैदेतून सुटल्यानंतर बदललेले दिसल्या वाचून राहणार नाही, असा कौन्सिलवाल्याचा कयास होता. पण ज्याप्रमाणे लोकमान्य टिळक १९१४ साली कैदेतून सुटून आल्यावर कारागृहवासाने किंवा त्याच्या पश्चात पसरलेल्या शिथिलतेमुळे आपल्या पूर्वीच्या मतात फेरबदल करण्यास तयार झाले नाहीत, त्याप्रमाणे महात्मा गांधी ह्यांनी देखील कारागृहवासानंतर आपले पूर्वीचे धोरण बदलेले नाही. जुहूच्या मुक्कामी महिना दोन महिने एक सारखा खल करून महात्मा गांधी ह्यांनी आपली पूर्वीची मते जशीच्या तशीच कायम आहेत, आणि आपण कौन्सिलात जाण्याविरुध्द पूर्वीप्रमाणे आताहि आहे! असे जाहीर केले आहे. महात्मा गांधी ह्याच्या वा जाहीरपत्रकाने कौन्सिलात शिरलेल्यावर काही परिणाम होईल अशातला भाग नाही, पण इतर लोकांना स्वतःची मते बनविताना या जाहीर पत्रकाराचा फार उपयोग झाल्यावाचून राहणार नाही, पूर्वीच्या सन्माननीय ग्रंथाचा आधार, पूर्वीच्या थोर ऋषीची व पुरुषाची मते व चरित्रे हल्लीच्या परिस्थितीचे पर्यालोचन, आणि हयात नामांकित पुढाऱ्याची मते व चरित्रे, या चार विभागाना अनुसरून स्वतःचे अतःकरण व स्वतःची बुध्दि ज्या मार्गाने ओढा घेत असेल, त्या मार्गाची मते प्रत्येकाने स्वीकारावयाची असतात. हयात थोर पुरुषांच्या मतांना, स्वतःची मने बनविताना, प्रत्येक व्यक्तीकडून विशेष मान देण्यात येतो. स्वतःची मते बनविण्याचाच हा प्रकार आहे. लहान थोर सर्व व्यक्तीना आपले स्वतःचे 'मनःपूत' कोणते हे ठरविताना, थोर पुढाऱ्याच्या मतावर एक चतुर्थाश इतके तरी अवलंबून राहणे भाग पडते. पूर्वीच्या ऋषीची मते विभिन्न दिसतात, शास्त्राधार निरनिराळे सापडतात, मतामताचा गलबला ऐकू येतो, स्वतःच्या भावना स्वतःची स्फूर्ति किंवा स्वतः कार्याविश हा विषयी स्वतःचीच बुध्दि साशक होऊन तर्क अप्रतिष्ठित होतो, अशा प्रसंगी मते बनवितांना माझ्यापेक्षा अधिक पूज्य मानल्या गेलेल्या व्यक्तीची भावना व स्फूर्ति विशेष आदणीय असली पाहिजे असा बुध्दीचा निश्चय करून, मतामताच्या गलबल्यातून बाहेर पडावे लागते. नेता आणि अनुयायी, गुरु आणि शिष्य, वगैरे प्रकारची नाती वरील कारणानेच उत्पन्न होत असतात. कौन्सिलसंबंधाच्या वादात दे.ब.दास व पं. मोतीलाल नेहरू

ह्याच्या स्वार्थत्यागाला व बुध्दिमत्तेला तोडीस तोड देणारा पुढारी बहिष्काराधीस धरून चालणाऱ्यामध्ये गेली दोन वर्षे प्रत्यक्षपणे वावरत नसल्यामुळे पुष्कळाचा निश्चय डळमळीत होऊ लागला होता. असहकारवाद्यातील ही न्यूनता महात्मा गांधी ह्याच्या जाहीरपत्रकाने आता भरून निघाली आहे. बहिष्काराची जरी प्रत्यक्षपणे विजयी झालेली दिसत नाही, तरी नोकरशाहीशी आलिप्तपणे वागण्याचा जो सामान्य क्रम बहुजनसमाजात उत्पन्न झाला आहे. त्याक्रमाकडे पाहिले असता असहकारवाद्याची तीन वर्षाची चळवळ निष्फळ झाली असे म्हणता येत नाही. लोकांच्या विचारसरणीतच तीन वर्षात मोठा फरक पडला आहे. हा फरक म्हणजे असहकारवाद्यांना मिळालेले मोठे यश होय. कौन्सिलांत प्रवेश केल्याने हेहि यश तुम्ही गमवाल आणि हजारो लोकांनी तुरुंगात जाऊन जी नवी विचारसरणी लोकांच्या अंगवळणी पडली आहे त्या विचारसरणीलाहि तुम्ही मातीत लोळवाल, अशी कौन्सिलवाल्याबद्दल सर्वांना साहजिकच भीती वाटत आहे.''[३७]

'कौन्सिल प्रवेश' हा असहकार चळवळी विरोधी असून तसेच कॉंग्रेसला कौन्सिल प्रवेशामुळे लोकांचा विश्वास डळमळत होता परंतु काकासाहेब खाडिलकरांनी गांधीजीच्या विचारांचा पुरस्कार करत असहकार चळवळ योग्य आहे हे आपल्या नवाकाळ वृत्तपत्रातील अग्रलेखातून ठामपणे मांडत गेले.

**परदेशी कापडावरील बहिष्कार :–**

गांधीच्या या असहकार कार्यक्रमातील परदेशी कापडावरील बहिष्काराबाबत सुध्दा 'नवाकाळ' वृत्तपत्राने वेळोवेळी माहिती प्रकाशित केली. दि. ४ सप्टेंबर १९२४ च्या 'नवाकाळ' वृत्तपत्रातील 'परदेशी कापडावरील बहिष्कार' या अग्रलेखात काकासाहेब खाडिलकर म्हणतात,

''बंगाल्यात दे. बं. दास ह्यांनी परदेशी कापडावरील बहिष्काराचे चळवळीला जोराने सुरुवात केली असून कलकत्ता शहरात ठिकठिकाणी सभा भरविण्यात आल्या आहेत. बंगालच्या इतर शहरातूनहि ह्या बहिष्कारासंबंधीची चळवळ बंगालच्या प्रांतिक कॉंग्रेस कमिटीने सुरू केली असून लोकांची मने ह्या सभाच्यामार्फत बहिष्काराकडे ओढून घेतल्यानंतर परदेशी कापडाच्या दुकानावर पिकेटिंग कर लादण्यात येईल असे दे. ब. दास ह्यांनी जाहिर केले आहे.

परदेशी कापडावरील बहिष्काराची आजची चळवळ १५ वर्षापूर्वीच्या चळवळीप्रमाणे सर्व बंगालभर पसरून बंगालच्या प्रत्येक घरात दोनचार आठवडयात चरखा सुरू होईल असा अंदाज आहे. कुटुंबातील प्रत्येक माणसाने जर रोज चरखा अर्धा तास चालविला तर दर महिन्याला प्रत्येक माणशी दोन हजार यार्ड सूत सहज निघून प्रत्येक कुटुंबाला आपली कपडयाची गरज बऱ्याच अंशाने भागविता येण्यासारखी आहे. सर्व राष्ट्र अशारितीने खडबडून जागे झाल्यावर ज्या शेतकऱ्यांना व ज्या शेतीच्या मजुरांना सर्व वेळ काम मिळत नाहि तेहि सुत काढण्यास झपाट्याने लागून परदेशी कापडास सर्व हिंदुस्थानातून बाहेर हाकून लावण्याइतका खादीचा पुरवठा वर्ष सहा महिन्याच्या चळवळीने सहज करता येण्यासारखा आहे.''[३८]

कलकत्ता येथील श्रध्दानंद पार्कवर महात्मा गांधीजीनी परदेशी कापडाची होळी पेटविली. त्याबाबतची माहिती सांगताना काकासाहेब खाडिलकरांनी'परदेशी कापडावर बहिष्कार' असा अग्रलेख दि. ८ मार्च १९२९ रोजी प्रकाशित केला.

''परदेशी कापडाचा व त्यातल्यात्यांत ब्रिटिश कापडाचा बहिष्कार जोराने अंमलात आणण्याविषयीचे कलम काँग्रेसच्या यंदाच्या कार्यक्रामत असल्यामुळे म. गांधीनी आपल्या दौऱ्यात बहिष्काराचा उपदेश जनतेला करीत आहेत आणि बहिष्काराची भावना जास्तजास्त लोकांमध्ये तीव्र व स्थिर होत चालली आहे. कलकत्यास ता. ४ मार्च रोजी बहिष्कारानिमित्त तेथील काँग्रेस कमिटीच्या चालकांनी श्रध्दानंद बागेत परदेशी कापडाची होळी करण्याचे योजिले. परंतु पोलिसाच्या स्थानिक कायद्यातील एका कलमाचा आधार घेऊन कलकत्याच्या पो. कमिशनर साहेबांनी काँग्रेस कमिटीचे चिटणीस श्री. किरणशंकर रॉय यांच्यावर या होळीविरूध्द हुकूम फर्माविला म. गांधीनी हा हुकूम मोडला आणि होळी पेटविली. हुकुमाची अंमलबजावणी करण्यासाठी पोलिसांच्या तुकडया होळीच्या जागी येऊन त्यांनी होळी विझविली आणि लोकांवर लाठया चालविल्या अशा प्रकारची हकीकत प्रसिध्द झालेली आहे. त्यानंतर मध्यरात्री म. गांधीजींना पोलिस कमिशनसाहेबांनी कैद केले, पुढे स्थानिक पुढाऱ्यांची सल्ला पडल्यावरून महात्माजीना जामीन दिला व ठरल्याप्रमाणे ब्रम्हदेशातील दौरा पुरा करण्यासाठी ते निघून गेले हा सारा वृत्तान्त आता आबालावृध्दांच्या परिचयाचा झालेला आहे.

कलकत्यास होऊ घातलेली परदेशी कापडाची होळी पोलिसांनी विझविली परंतु अशा होळ्यांना सर्व प्रथम आळा घालणे पोलिसांना कसे शक्य नाही याचे प्रत्यंतर कलकत्यास खाजगी जागेमध्ये झालेल्या ताज्या होळीवरून सर्वांच्या निदर्शनास आले आहे. परदेशी कापडाची होळी हे बहिष्काराच्या भावनेचे दृश्य गमक आहे. नोकरशाहीने चंग बांधल्यास हे दृश्य गमक तिला नामशेष करता येईल. परंतु बहिष्काराची बलवत्तर मूर्त भावना तिला नष्ट करता येणार नाही हे उघड आहे. ही भावना आजकालची नवी नाही.१९०६ सालापासून ती अस्तित्वात आहे तेव्हा दडपशाहीचा तिच्यावर प्रयोग झाला तरी ती सहीसलामत बाहेर पडली. वंगभंगामूळे तिचा जन्म झाला. वंगभंग रद्द झाला. तरी ही भावना जशीच्या जशी शाबूत राहिली.''[३९]

**प्रतियोगी सहकारिता पक्ष :–**

स्वराज्यपक्षाने अधिकार स्विकारायला नकार दिल्याने केळकर व जयकर यांनी कार्यकारी मंडळाचे राजीनामे दिले. लगेचच त्यांनी प्रतियोगी सहकारिता पक्षाची स्थापना केली. आणि स्वराज्य पक्षाचा मुंबई कौन्सिलमधील मोठा गट त्या पक्षाला मिळाला. 'अमृतसरकडे परत' यावर जोर दिला. 'प्रतियोगी सहकारिता' असा त्याचा ते अर्थ करीत. अमृतसर काँग्रेसमध्ये (१९१९) लोकामन्य टिळकांनी ही घोषणा केली होती.

१९२६ सालात 'प्रतियोगी सहकारिता' जो मतप्रचार टिळकांच्या नावावर सुरू झाला होता त्याला 'टिळक आणि प्रतियोगी सहकारिता' या 'नवाकाळ'वृत्तपत्रातील अग्रलेखातून काकासाहेब खाडिलकर यांनी उत्तर दिले आहे. ते पुढील प्रमाणे–

''देशोव्दारे प्रवीण टिळक–सुचरित
ध्यायते तद्वरेण्यम् ।
उद्दीप्त राष्ट्र भक्ता जनपद्हृदय
यस्य कारानिवासैः ।।
बध्दाकाक्षः स्वराज्ये परिणतवचस ।
भारतो यस्य जातः ।
दृश्यो गीतारहस्ये विमलयतु
गुरुर्नो धियी लोकमान्यः ।।

काँग्रेसच्याविरूध्द नोकरीवाल्या पक्षाने जे निशाण उभारले आहे त्या निशाणाच्या बुडाशी रिस्पॉन्सिव्ह कोऑपरेशन किंवा प्रतियोगी सहकारिता हे तत्व प्रमुख आहे. लो. टिळक ह्यांनी अमृतसरच्या काँग्रेसला जात असता वाटेत बादशहांना तार करून प्रतियोगी सहकारितेचे तत्व पुढे आणले आणि त्या तत्त्वाला धरूनच आजचा नोकरविल्याचा कार्यक्रम आखलेला आहे आणि लो. टिळक जर ह्यात असते तर त्यांनी हाच कार्यक्रम आज उचलला असता असे नोकरीवाल्या पक्षाचे म्हणणे आहे! लो. टिळक हयात असते तर काय झाले असते हा वाद घालीत बसण्यात हशील नाही. प्रसंगानुसार राजकीय परिस्थिती जसतशी बदलते. तसतसे राजकारणहि बदलत जाते. तथापि राजकारण बदलत असताना मुख्य तत्वाकडे दुर्लक्ष केल्याने मोठी हानि होते! लो. टिळक ह्याच्यासारख्या विभूतीच्या पुण्यतिथीच्या किंवा जयंतीच्या समारंभाचे वेळी प्रमुख राजकीय तत्वे त्याच्या चरित्रात कशी गोवलेली आहेत आणि त्यापासून प्रोत्साहन आपण कसे घ्यावे एवढेच त्याच्या अनुयायानी पहावयाचे असते. लो. टिळक ह्याच्या चरित्राकडे पाहिले असता महात्मा गांधी याच्या असहकारितेचाच मार्ग आजच्या घटकेसहि यांना पसंत पडला असता यात संशय रहात नाही. कारण आरंभापासून इतीपर्यंत त्याचे चरित्रच असहकारितेने भरलेले आहे. तथापि लो. टिळक आज म. गांधीच्या बाजूचे झाले असते. किंवा दे. केळकर ह्यांच्या बाजूचे झाले असते. हा वाद एका दृष्टीने आज गौण समजला जात आहे. तेव्हा तो वाद एका बाजूला ठेवून रिस्पॉनिव्ह कॉऑपरेशन उर्फ प्रतियोगी सहकारिता आणि काँग्रेसचे धोरण ह्यासंबंधाने त्याची मते इंग्लंडातून आल्यापासून म्हणजे डिसेंबर–जानेवारी १९१९–२० पासून जून १९२० अखरेपर्यंत कोणती होती हे केसरीमधील त्याच्याच लेखावरून व भाषणावरून त्याच्या जयंतीच्या व पुण्यातिथीच्या निमित्ताने वाचकापुढे ठेवण्याचे योजले आहे. अमृतसरच्या काँग्रेसहून परत आल्यानंतर लो. टिळक त्यांनी ता. १९ माहे. जानेवारी १९२० च्या केसरीचे आमात ''काँग्रेसचा तिहेरी लढा'' आणि ''बादशहास टिळकाची तार तिचे तारवटलेले टीकाकार'' असे दोन लेख प्रसिध्द केले आहेत. जून १९२० अखेरपर्यंत रा. खाडिलकर केसरीचे संपादक होते आणि त्यावेळी लो. टिळकांनी स्वतः रिस्पॉन्सिव्ह कॉऑपरेशन उर्फ प्रतियोगी सहकारिता आणि अमृतसरच्या काँग्रेसचे धोरण ह्यासंबंधाने स्वतः लेख लिहून व केसरीत प्रसिध्द झालेली भाषणे नीट तपासून लो. टिळक यांनी आपल्या मताचा उहापोह केलेला आहे. प्रतियोगी सहकारिता हा शब्द बॅ. बॅपाटिस्टा ह्यांनी प्रथम कसा सुचविला

व होमरूल स्पेशलमध्ये हजर असलेल्या बॅ. बॅपटिस्ट, दे. केळकर, रा. ब. चितामणराव वैद्य, दे. गंगाधरराव देशंपाडे वगैरे पुढाऱ्यानी बादशहास पाठविलेल्या तारेस संमती कशी दिली इत्यादि गोष्टी सांगून लो. टिळक ह्यानी रिस्पांन्सिव्ह कोऑपरेशन उर्फ प्रतियोगी सहकारिता ह्याचा अर्थ स्वतः येणेप्रमाणे दिला आहे. 'Responsive' (प्रतियोगी) हा शब्द सहकारितेला प्रायः लावीत नाहीत हे खरे, पण त्याच कारणामुळे प्रस्तुतच्या तारेतील ह्या शब्दाकडे टीकाकारचे विशेष लक्ष जावयास पाहिजे होते. बादशहाच्या जाहीरनाम्यात सहकारित्वाचा आदेश नोकरशाही आणि प्रजा या दोघासहि केला होता. टिळकाच्या मते प्रजेस हा उपदेश करणे जरूर नव्हते. कारण प्रजेच्या कल्याणाच्या गोष्टीत प्रजेने आपण होऊन कधी अडथळा आणला नाही किंबहुना आणणेहि शक्य नाही. आजपर्यंत जो अडथळा आणि विरोध झाला तो सर्व नोकरशाहीचा ही नोकरशाही जर सहकारिता करावयास तयार असेल व करील तर त्याला प्रतियागित्वाच्या नात्याने म्हणजे जबाबाला प्रतिजबाब म्हणून लोकहि सहकारिता दाखविण्यास तयार आहे असे बादशाहास आश्वासन द्या, असा टिळकाच्या ह्या तारेचा अर्थ होता. पण एवढया खोल पाण्यात शिरावे कोणी? आपल्याप्रमाणे टिळकहि अविचारी आणि घाईने काम करणारे असतील अशा समजुतीने टीकाकार टिळकावर तुटून पडले आहेत. पण मूळ पायाच जेथे खोटा तेथे टीका तरी कशी खरी ठरणार? सहकारिता नेहमीच दोहो बाजूंकडे सापेक्ष असते. त्यातून जी गोष्ट प्रजेच्या कल्याणाची तीत सहकारिता करा हे प्रजेस सांगावयासच नको स्वतःच्या कल्याणास आडकाठी घालणारा मनुष्य पशु समजला पाहिजे. म्हणून सहकारित्वाचा उपदेश प्रजेस करणे योग्य नव्हते. या कामात आजपर्यंत जर कोणी आडकाठी घातलेली असली तर ती नोकरशाहीने यासाठी बादशहाच्या आज्ञेवर हुकूम सहकारिता करण्याची नोकरशाहीची तयारी असल्यास लोकहि आपल्या बाजूने सहकारिता करण्यास तयार आहेतच, नसल्यास मात्र विरोध करावा लागेल. असा टिळकाच्या तारेचा खरा मथितार्थ आहे आणि ह्याच अर्थाने शब्द जर काँग्रेसच्या ठरावात पहिल्या पासूनच योजण्यात आले असते तर मग त्यास कोणी विरोध केला नसता. पण हे तत्व पंडितजीनी आपल्या भाषणात जरी कबुल केले होते तरी त्यांनी पुढे आणलेल्या ठरावात ''सहकारिता'' येवढाच नुसता शब्द वापरला असल्यामुळे वाद माजला. आणि अखेरीस–सहकारितेच्या स्वरूपाबद्दल काहीच न बोलता नव्या ॲक्टान्वये आपल्या उन्नतीसाठी काम करा (work) येवढयावरच अखेर तडजोड करण्यात आली. पण मुंबई अगर

पुणे येथे आपापल्या खोलीत सर्वज्ञत्वाच्या घमेडीत वावरणाऱ्या लोकांना ही गोष्ट कशी कळावी?'' नोकरशाहीने प्रथम सहकारिता केली पाहिजे आणि मग लोकांनी सहकारिता करावयाची असे लो. टिळक ह्याचे स्पष्ट मत होते, ह्याबद्दल वरील उतारे वाचणाराना बिलकूल संशय रहाणार नाही. बादशहानी आपल्या नोकरांना सहकारिता करण्यास उपदेश केला आणि राजकीय कैद्यांना सोडून दिले ह्या संबंधाची लो. टिळक ह्याची तार असून स्वराज्याच्या दृष्टीने मॉटेग्यू चेम्सफर्ड सुधारणाचा कायदा म्हणजे नोकरशाहीची सहकारिता असे. लो. टिळक बिलकूल मानीत नव्हते.''[४०]

## ५.१० पुर्ण स्वराज्याचा ठराव :-

### पुर्ण स्वराज्याचा ठराव :-

काँग्रेसने 'पुर्ण स्वराज्य' मागणीसाठी २६ जानेवारी १९३० हा दिवस निश्चित करून त्यादिवशी स्वातंत्र्य घोषित करण्याचे ठरविले त्यानुसार 'पुर्ण स्वराज्य दिन' कार्यक्रमाची तयारी सुरू केली. या विषयी विचार 'नवाकाळ'वृत्तपत्राने 'पुर्ण स्वराज्याचा ठराव' या अग्रलेखातून दिनांक १९ जानेवारी १९३० रोजी प्रकाशित केले त्याचे त्याचे विवेचन पुढील-

''काँग्रेसने लाहोरला जो सवातंत्र्याचा ठराव पास केला आहे. त्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करण्याकरिता येत्या २६ तारखेला ठिकठिकाणी प्रचंड सभा भरविण्यात येणार आहे. ह्या सभातून पास करण्याच्या ठरावाचा खर्डा नुकताच पं. जवाहरलाल नेहरू यांनी काँग्रेसच्या वर्किंग कमिटीच्या वतीने प्रसिध्द केला आहे. या ठरावाची भाषा वर्किंग कमिटीच्या वतीने प्रसिध्द केला आहे. या ठरावाची भाषा वर्किग कमिटीने तयार केलेली असून त्याच्या भाषांतराच्या प्रती चोहोकडे वाटण्यात याव्यांत आणि सभातून हा ठराव पास करून घेण्यात यावा अशी त्यांची सूचना आहे रविवार ता. २६ हा दिवस 'पुर्ण स्वराज्य-दिन' म्हणून पाळण्यात यावयाचा असून ह्या प्रसंगी आपले किरकोळ आणि विन म त अत्यंत उत्साहाने भाग घेईल यात संशय नाही. पुर्ण स्वराजयाची घोषणा करण्याची पाळी काहत्वाचे मतभेद गुंडाळून ठेवून ठिकठिकाणच्या काँग्रेस कमिट्यातर्फे सभा भरविण्यात येतील आणि जनता त्यॉग्रेसवर व्हाइसरॉयसाहेबाच्या ताठर वृत्तीमुळे आली असून लाहोर काँग्रेसच्यावेळी सन्मान्य समेटाच्या सर्व वाटा सरकारतर्फे

बंद झाल्याने शेवटी स्वातंत्र्याचा एकच सन्मान्य मार्ग शिल्लक राहिला आणि त्या मार्गाने कॉंग्रेस आज जात आहे.

स्वातंत्र्याच्या झगडयात मिळावयाच्या जनतेच्या पाठिंब्याचे बळ अजमावण्याचे साधन हा ठराव व त्यास निमित्त होणाऱ्या सभा होत ह्या लढयापाठीमागे जनतारूपी जनार्दन उभा असणे अवश्य आहे. हिंदी प्रजेच्या संमत्तीने हे परमेश्वरी अधिष्ठान ह्या स्वातंत्र्याच्या लढयाला आहे. हे येत्या २६ तारखेला पुर्ण स्वराज्य दिनाचे दिवशी सिध्द व्हावयाचे आहे. अशावेळी पुर्ण स्वराज्य-दिनाच्या सभांना हजर राहून आणि कॉंग्रेसच्या ठरावाला अतःकरणपूर्वक पाठिंबा देऊन स्वातंत्र्याच्या लढयाला नेट लावण्याचे पवित्र राजकीय कर्तव्य करण्यास कोण कसूर करणार?''[४१]

'मुंबईतील 'पुर्ण स्वराज्यदिना'चा महोत्सव' या 'नवाकाळ' वृत्तपत्रातील लेखात मिरवणुक व सभाचे वर्णन तसेच श्री काकासाहेब खाडिलकर यांचे 'स्वराज्य दिनविषयक भाषण' प्रकाशित केले आहे. गिरगाव येथील सकाळच्या सभेतील काकासाहेब खाडिलकरांचे भाषण पुढील प्रमाणे–

''प्रमिला बेन मेहता, आदीची भाषणे आल्यावर श्री. कृ.प्र. खाडिलकर बोलावयास उभे राहिले. त्यांनी सांगितले की 'हे राष्ट्रीय निशाण कायम आपल्या पूर्वजांनी आपली व पुढे येणाऱ्या पिढयांची अश्रू उज्वल करण्याचे कार्य स्विकारीत आहो व ते सतत चालविण्याची आपण खबरदारी घेतली पाहिजे. राष्ट्रीय निशाणाच्या रूपाने परमेश्वर तुमच्या आमच्यात आला आहे. व तोच परमेश्वर आपले कार्य न विसरण्याची बुध्दि देवो अशी प्रार्थना करून त्यांनी आपले भाषण पूर्ण केले.''[४२]

## ५.११ १९४२ ची 'चले जाव' चळवळ :–

ऑगस्ट १९४२ च्या पहिल्या आठवड्यात कॉंग्रेस कार्यकारिणीची सभा मुंबईस भरून तेथे 'Quit India' अथवा 'छोड़ो भारत'चा ठराव पास झाला. ठरावाचा मसुदा ठरविण्याच्या कामी मदत करायला गांधी हजर होतेच. तो ठराव नंतर अखिल भारतीय कॉंग्रेस समितीपुढे ठेवण्यात आला. आणि सर्वानुमते पास झाला.

वर्धा येथे १४ जुलै १९४२ रोजी राष्ट्रीय सभेच्या कार्यकारिणीने भारतातील ब्रिटिश

सत्ता ताबडतोब संपुष्टात आणून भारताला स्वातंत्र्य देण्याची मागणी करणारा ठराव संमत केला. ही मागणी मान्य झाल्यास राष्ट्रीय सभा भारताच्या स्वातंत्र्यासाठी अहिंसक चळवळ सुरू करेल, असा इशाराही देण्यात आला.

या चले जाव चळवळीची माहिती 'नवाकाळ' वृत्तपत्राने वेळोवेळी प्रकाशित केली.

दिनांक ६ ऑगस्ट १९४२ रोजी 'स्वातंत्र्य आणि यासाठी सामुदायिक लढा' या मथळ्याद्वारे 'चले जाव' चळवळीबाबत 'काँग्रेस वर्किंग कमिटीचा ठराव' याचा वृत्तांत 'नवाकाळ' वृत्तपत्राने प्रकाशित केला.

''सुमारे दहा तासांच्या काळजीपूर्वक व कसोशीच्या विचारविनिमयानंतर काँग्रेस वर्किंग कमिटीने ता.७ ऑगस्टला भरणाऱ्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीपुढे ठेवावयाच्या ठरावाचा मसुदा आज संध्याकाळी प्रसिध्दीकरिता वृत्तपत्र प्रतिनिधींच्या हाती दिला.

आजचे कमिटीचे काम संपल्यानंतर थोड्याच वेळात राष्ट्राध्यक्ष मौलाना कलाम आझाद हे बाहेर आले व त्यांनी प्रफुल्लित चेहऱ्याने सांगितले. वर्किंग कमिटीचा ठराव तयार असून दहा मिनिटांच्या आत वृत्तपत्रांना देण्यात येईल, असे जाहीर केले व या स्तरावर देखील सर्व सभासदांत पूर्ण मतैक्य आहे, असे  ठासून सांगितले.

ता. १४ जुलैचा वर्किंग कमिटीचा ठराव ऑ.इं.काँग्रेस कमिटीला पूर्णपणे मान्य असल्याचे या ठरावात जाहीर करण्यात आले असून पुढे असे मत व्यक्त करण्यात आले आहे की, वर्किंग कमिटीच्या वर्धा ठरावावर हिंदुस्थानात व परदेशात झालेली टीका लक्षात घेता हिंदुस्थानकरिता व संयुक्त राष्ट्राच्या तत्त्वाच्या विजयाकरिता हिंदुस्थानातील ब्रिटिशांचे राज्य लवकर अस्तंगत होणे जरूर आहे.

रशिया व चीन यामधील परिस्थिती अधिकाधिक खालावत आहे. याबद्दल ठरावात भय व्यक्त करण्यात आले आहे व या पराभवाचे कारण वसाहतींना आपल्या वर्चस्वाखाली ठेवण्याच्या व साम्राज्यशाहीची परंपरा सुरू ठेवण्याच्या धोरणात आहे, असे म्हटले आहे.

ब्रिटिश सत्ता हिंदुस्थानातून काढून घेतल्यानंतर जे तात्पुरते सरकार येईल, त्या सरकारचे पहिले कर्तव्य हिंदुस्थानचे शस्त्रास्त्रांनी व जनत्याचारी सामर्थ्याचे संरक्षण करणे हेच राहील, असे ठरावात जाहीर केले आहे.

हा लढा महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली चालावा म्हणून या लढ्याचे नेतृत्व स्वीकारण्यास

महात्माजींना विनंती केली आहे व शेवटी जनतेने या लढ्यात भाग घेऊन सर्व प्रकारच्या हालअपेष्टा सहन कराव्या, अशी विनंती केली आहे.

वर्किंग कमिटीचा हा ठराव सुमारे १८०० शब्दांचा आहे. आपल्या नवीन चळवळीला प्रारंभ करण्यापूर्वी महात्मा गांधी मुंबईत जाहीर सभेत भाषण करणार असल्याचे विश्वसनीयरित्या कळते.

वर्किंग कमिटीची सभा उद्या गुरुवार, सकाळी ८.३० वा. भरणार आहे.''[४३]

'चले जाव' चळवळीचा ८ ऑगस्ट १९४२ रोजी ठराव पास झाला. त्याबाबतची माहिती 'नवाकाळ' वृत्तपत्रामधून 'काँग्रेसच्या मागणीविषयीचे महात्माजींचे स्पष्टीकरण' या बातमीद्वारे स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी म. गांधींना सर्वाधिकार या मथळ्याखाली प्रकाशित करण्यात आली.

''ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची दुसऱ्या दिवसाची बैठक आज याच मुद्यावर चाललेल्या नंतर वर्किंग कमिटीकडून आलेला ठराव प्रचंड बहुमताने व टाळ्यांच्या प्रचंड गजरात मंजूर करण्यात आला. सुमारे २५० सभासदांपैकी फक्त १३ सभासदांनी विरुध्द मते दिली.

त्यानंतर महात्मा गांधी व्यासपीठावरून सव्वा दोन तासपर्यंत हिंदी–इंग्रजीमध्ये भाषण करून अनेक जिव्हाळ्याच्या प्रश्नावर त्यांनी आपले अंतःकरण उघड केले. विशेषतः हिंदू–मुस्लिम ऐक्याच्या प्रश्नांचे त्यांनी अत्यंत आत्मियतेने विवेचन केले. लढा सुरू करण्यापूर्वी भाषण व्हाइसरॉयना खलिता पाठविणार असल्याचे त्यांनी सांगितले व मध्यंतरीच्या सुमारे तीन आठवड्यांच्या काळात काय करावयाचे यासंबंधीची रूपरेषाही पुढे मांडली. रात्री १० वाजता अधिवेशनाचे काम समाप्त झाले.''[४४]

''आठ ऑगस्ट रोजी ठराव पास झाल्यावर दुसऱ्या दिवशी ९ ऑगस्टला परत बैठक भरणार होती व त्यात महात्मा गांधी बोलणार होते. सामुदायिक अहिंसात्मक चळवळ सुरू करण्याच्या अगोदर सरकारशी बोलणी कोणत्या तत्त्वावर होणार हे ते स्पष्ट करून सांगणार होते. पण त्याअगोदर मोठ्या पहाटेस ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सर्व सभासदांना अटक करण्यात आली.

याबाबतची माहिती दिनांक १० ऑगस्ट १९४२ रोजी 'नवाकाळ' वृत्तपत्रातून 'महात्मा गांधी व प्रमुख काँग्रेस पुढाऱ्यांना मुंबईत अटक' या मथळ्याने प्रकाशित केली. (मुंबई रविवार ता. ९) ''आज पहाटे सुमारे पाच वाजल्यापासून मुंबईतील काँग्रेस पुढाऱ्यांची सार्वत्रिक धरपकड

सुरू झाली असून सुमारे दोन तासांच्या अवधीत महात्मा गांधी व काँग्रेस वर्किंग कमिटीचे सर्व सभासद ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे कित्येक सभासद व येथील बरेच स्थानिक कार्यकर्ते यांना अटक करण्यात आली.

या सर्वांना बोरिबंदर स्टेशनवर नेले व तेथून एका स्पेशल गाडीने त्यांची बाहेर रवानगी करण्यात आली.

महात्मा गांधींना अटक –

पहाटे पाच वाजण्याच्या सुमाराला धरपकडीच्या कामाला सुरुवात झाली व डेप्युटी कमिशनर मि. बटलर, सुपरिटेंडेंट रा.ब. मोहनलाल देसाई हे बऱ्याच पोलीस अधिकाऱ्यांसह बिर्ला हाऊसमध्ये गेले व तेथे त्यांनी महात्मा गांधींना अटक केली. त्याच ठिकाणी त्यांनी मीराबेन वगैरेंनाही अटक केली.

मौ. अब्दुल कलाम आझाद यांना श्री. भुलाभाई देसाई यांचे घरी, पं. जवाहरलाल नेहरू यांना श्री. हथासिंग यांच्या घरी, सौ. सरोजिनी नायडू यांना मदाम लोहिया वाडिया यांच्या घरी, श्री. शंकरराव देव यांना प्रो. घारपुरे यांचे घरी, डॉ. पट्टाभि सीतारामय्या यांना गझदर पार्कमध्ये श्री. सी. नागेश्वरराव यांचे घरी अशी अटक करण्यात आली.''[४५]

''म. गांधी, महादेवभाई देसाई, मिराबेन यांना पुण्याच्या आगाखान पॅलेसमध्ये स्थानबध्द केले. काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सभासदांची अहमदनगरच्या तुरुंगात रवानगी केली.''[४६]

महात्मा गांधी व काँग्रेसच्या प्रमुख पुढाऱ्यांची बातमी देशभर वणव्यासारखी पसरली. जनतेचा संताप अनावर झाला. लोकांनी जागोजागी मिरवणुका काढल्या. पोलिसांनी आंदोलकांवर लाठीहल्ले आणि गोळीबार केला. तरी लोक घाबरले नाहीत. मिरवणुका सुरूच राहिल्या.

नवाकाळ वृत्तपत्राने सुध्दा दिनांक ११ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधी व काँग्रेसच्या पुढाऱ्यांच्या अटकेमुळे दुसऱ्या दिवशीचे मुंबईतील पडसाद आपल्या वृत्तपत्राद्वारे सांगितले.

'सोमवारी मुंबईत दहा वेळा गोळीबार – दादर–गिरगाव भागात माजलेली धामधूम – गोळीबारात एकूण १५ ठार १६९ जखमी' अशा मथळ्याने प्रकाशित केली.

''काल पहाटे मुंबईमध्ये सर्वात प्रमुख अशा काँग्रेस पुढाऱ्यांनी व स्थानिक कार्यकर्त्यांची धरपकड झाल्यानंतर त्याचे परिणाम शहरात सर्वत्र गेले दिवस दिसून येत आहेत.

शहरांचे काही भाग सोडून बाकी सर्वत्र सर्व व्यवहार आणि वाहनांची ये–जा वगैरे बंद पाडण्याचे प्रयत्न अध्ययावत सुरू होते. पोलिसांनी जमाव ठिकाणावरही अनेक वेळा गोळीबार केले असून त्यात जखमी झालेले आज दहा इसम मरण पावले आहेत. काल पोलिसांनी दादर शिवाजी पार्कमध्ये हजारो लोकांचे जमाव मोडण्यासाठी आणि लहानसहान जमावावर अश्रू धुराचा उपयोग केला ज्याप्रमाणे आज त्यांनी त्याच ठिकाणी गोळीबारही केले.

आज हरताळाचे वातावरण शाळा–कॉलेज आणि एरियामध्ये पसरलेले, बहुतेक शाळा–कॉलेजेस, काही गिरण्या बंद राहिल्या होत्या व काही कारखान्यांतून कामगारांची संख्या कमी झालेली होती.''[४७]

तसेच १२ ऑगस्ट १९४२ रोजी 'नवाकाळ' वृत्तपत्रातून 'हिंदुस्थानातील सर्व प्रमुख शहरात लाठीहल्ले व गोळीबार', 'मुंबईतील संप व हरताळाचा तिसरा दिवस', 'दिल्ली, लखनौ व पाटणा येथील गोळीबार – विद्यार्थ्यांच्या मिरवणुकींना बंदी' अशा विविध ठिकाणच्या बातम्या प्रकाशित होत होत्या.

अनेक ठिकाणी लोकांनी सरकारी कचेऱ्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. काही ठिकाणी ब्रिटिश सरकारच्या दडपशाहीचे प्रतीक असणारे तुरुंग, पोलीस ठाणी, रेल्वे स्टेशन्स या ठिकाणांवर लोकांनी हल्ले केले. पोलिसांनी लोकांवर गोळीबार केला. १९४२ च्या जनआंदोलनाचा वणवा देशभर पेटला होता. स्वातंत्र्यप्राप्तीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी लक्षावधी भारतीयांनी असीम त्याग केला. अनेकांनी आत्मबलिदान केले. आंदोलकांची संख्या इतकी प्रचंड होती की, त्यांना डांबून ठेवायला देशातील तुरुंगही अपुरे पडले. या राष्ट्रव्यापी आंदोलनाला 'ऑगस्ट क्रांती' असेही म्हटले जाते. 'नवाकाळ' वृत्तपत्रामधून वेळोवेळी याबाबत माहिती मिळत होती.

ब्रिटिश सरकारने या ऑगस्ट दंगल (क्रांती) बद्दल काँग्रेसला जबाबदार म्हटले. 'ऑगस्ट दंगलीबद्दलची काँग्रेसची जबाबदारी' या नावाने १९४३ या वर्षी हिंदुस्थान सरकारच्या वतीने प्रसिध्द करण्यात आलेल्या चोपड्याला महात्मा गांधींनी आगाखान वाड्यातून लिहिलेले उत्तर सरकारकडून पुस्तकरूपाने प्रसिध्द करण्यात आले. याबाबत दिनांक २६ जून १९४४

रोजी ‘नवाकाळ’ वृत्तपत्राने आपल्या अंकात ‘ऑगस्ट दंगलीच्या जबाबदारीबद्दल महात्मा गांधींचे उत्तर’ या मथळ्याद्वारे वृत्तांत लिहिला.

‘‘या उत्तरात महात्मा गांधींनी ८ ऑगस्ट १९४२ च्या ‘चले जाव’ घोषणेने नव्हे तर त्यानंतर सरकारने काँग्रेस पुढाऱ्यांची धरपकड सुरू केल्यामुळे देशात दंगल झाली व म्हणून त्यांची जबाबदारी सर्वस्वी सरकारवरच आहे, हे मुद्देसुदरीतीने दाखवून दिले असून त्या वेळी देशात हिंसा झाली असेल तर त्याचे कारण ‘लोकांच्या सहनशक्तीला मर्यादा असते’, हे सरकारने ओळखले नाही,’ हे आहे असे म्हटले आहे.

महात्मा गांधींचे हे ७८ पानांचे उत्तर व इतर पत्रव्यवहार मिळून ७२५ पानांचे पुस्तक सरकारने प्रसिध्द केले आहे. ‘गांधींबरोबरचा पत्रव्यवहार’ या नावाने ७२५ पानांचे एक पुस्तक हिंदुस्थान सरकारने प्रसिध्द केले असून त्यातील एका भागाच्या ७८ पानामध्ये ऑगस्ट १९४२ मधील ‘दंगलीबद्दलची काँग्रेसची जबाबदारी’ या सरकारी पत्रकाला महात्मा गांधींनी दिलेले उत्तर आहे. इतर भागामध्ये लॉर्ड लिनलिथगो, लॉर्ड वेव्हेल, लॉर्ड सॅम्युअल व होम डिपार्टमेंट यांच्याबरोबर ऑगस्ट १९४२ ते एप्रिल १९४४ पर्यंत महात्मा गांधींनी केलेला पत्रव्यवहार आहे.

‘धरपकड हेच कारण’

सरकारी चोपड्याला महात्मा गांधींनी लिहिलेले उत्तर ता. १५ जुलै १९४३ चे आहे. सुरुवातीला चोपड्यातील आरोपावर विस्तृत टीका करण्यात आली आहे.

पुढे महात्मा गांधी म्हणतात,

‘‘देशात झालेल्या दंगलीकडे पाहण्याची अगदी स्वाभाविक दृष्टी अशी की, पुढाऱ्यांच्या धरपकडीनंतर ही दंगल झाली व म्हणून धरपकड हे त्याचे कारण आहे. सरकारी आरोप पत्रकाच्या मथळ्यावरूनच स्पष्ट दिसते की, काँग्रेसवर जबाबदारी लादण्याच्या इराद्याने पत्रक तयार करण्यात आले आहे. या बाबतीतील सरकारचे म्हणणे पुढीलप्रमाणे दिसते. एप्रिल १९४२ मध्ये ब्रिटिशांनी सत्तात्याग करावा किंवा आता लोकप्रिय झालेली ‘चले जाव’ अशी घोषणा मी केली त्यावेळी प्रथम मी व नंतर काँग्रेसने सामुदायिक चळवळीची तयारी केली. सामुदायिक चळवळीचे अत्याचारामध्ये पर्यवसान होणे अपरिहार्य होते. मी आणि माझे नेतृत्व मान्य केलेले काँग्रेसजन यांचा इरादाच असा होता की, अत्याचार घडून यावा. पुढारी त्याप्रमाणे

उपदेश करीत होते व म्हणून काही झाले तरी दंगल होणे अपरिहार्य होते. सरकारने फक्त ही अपेक्षित अत्याचारी चळवळ सुरू होण्यापूर्वीच धरपकड करून ती चळवळ वेळीच मारून टाकली.

आरोपपत्रकातील विचारसरणीचा हा सारांश आहे.''[४८]

**१९४२ चळवळीतील भीषण अत्याचार :-**

ब्रिटिश सरकारने १९४२ साली चळवळ दडपण्यासाठी ठिकठिकाणी अन्याय-अत्याचार केले. या ब्रिटिश सरकारच्या अत्याचाराच्या वृत्ताची माहिती 'नवाकाळ' वृत्तपत्रामधून दिनांक २० नोव्हेंबर १९४५ रोजी '१९४२ मधील सरकारी अत्याचारांची भीषण कहानी' या मथळ्याने देण्यात आली. त्याचे विवेचन-

''मिदनापूर जिल्ह्यातील तामळूक सबडिव्हिजनमध्ये १९४२ साली सरकारने केलेल्या दडपशाहीचा आणि अत्याचारांचा अहवाल बंगाल प्रांत कॉंग्रेस कमिटीने असोसिएटेड ऑफ इंडियाकडे प्रसिध्दीसाठी पाठविला आहे. अ.भा.कॉं कमिटीच्या चिटणीसांच्या आज्ञेप्रमाणे तामलूक सबडिव्हिजनमधील परिस्थितीचा खालील अहवाल बंगाल प्रां.कॉं. कमिटीकडून सादर करण्यात आला आहे. या अहवालात सुतहरन नंदिग्राम, महिषादल, तामलूक, पंचकुश व मावळा या सहा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील प्रदेशांचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

'२२ ठिकाणी गोळीबार'

ऑगस्ट १९४२ ते ऑगस्ट १९४४ च्या दरम्यान पोलिसांनी या लष्कराने २२ ठिकाणी गोळीबार केला त्यात ४४ इसम ठार, १९९ जखमी व १४२ थोडेसे जखमी झाले.

'६३ स्त्रियांवर बलात्कार'

६३ स्त्रियांवर बलात्कार करण्यात आला. ३१ स्त्रियांवर बलात्काराचा प्रयत्न झाला. १५० स्त्रियांचा विनयभंग करण्यात येऊन त्यांना मारझोड करण्यात आली. एकंदर ४२२६ इसमांना मारझोड करण्यात आली. १८६८ लोकांना अटक करण्यात आली व ५०७६ जणांना बेकायदेशीररित्या डाबून ठेवण्यात आले.

एकंदर १२४ घरे जाळण्यात आली. त्यात एकंदर १,३९,५०० रुपयांचे नुकसान झाले. ४९ घरांची नासधूस झाली. त्यात ८०७५ रुपयांचे नुकसान झाले. १०४४ घरांतून २,१२,७१५ रुपयांची मालमत्ता लुटण्यात आली. १३७३० घरांची झडती घेण्यात आली व २७ घरांचा

सरकारी हस्तकांनी ताबा घेतला.

'१९ संस्था बेकायदेशीर'

५९ कुटुंबांची २५,३६५ रुपये किंमतीची मालमत्ता जप्त करण्यात आली. पाच युनियन्सवर १,९०,००० रुपयांचा सामुदायिक दंड बसविण्यात आला. १९ संस्था बेकायदेशीर ठरविण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले.

'पुराची व वादळाची बातमी दडपून टाकली'

१९४२ साली त्या भागात भयंकर वादळ झाले व त्यामुळे सर्व भागात हाहाःकार उडाला. पण त्यानंतर देखील सरकारच्या दडपशाहीत व अत्याचारात खंड पडला नाही. वादळाची बातमी देखील दडपून टाकण्यात आली. बातमी समजल्यावर सहाय्य देऊ इच्छिणाऱ्या बिनसरकारी संस्थांना तसे करण्यास बंदी करण्यात आली. सरकारी सहाय्यक समित्यांचा मोठा फायदा सरकारी नोकर, सरकारचे हेर व बगलबच्चे यांनीच घेतला. खऱ्या गरजुंना त्याचा मुळीच फायदा झाला नाही.

'राष्ट्रीय सरकारची स्थापना'

१९४२ च्या सप्टेंबर महिन्याच्या २८ तारखेस सहापैकी ४ पोलीस स्टेशनांच्या हद्दीत राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यात आले. या सरकारला ४०००० लोक येऊन मिळाले होते. या सरकारचे ३० पूल उद्ध्वस्त केले. २७ मैल लांबीची टेलिग्रामची तार कापली. १९४ तारेचे खांब पाडले व ४७ रस्ते झाडे आडवी टाकून बंद केले.

ज्या भागावर सत्ता कायम ठेवता आली नाही ते जाळून टाकण्यात आले. अशा प्रकारे पोलीस स्टेशन ६, दोन सबरजिस्ट्रेशन कचेऱ्या, १३ पोस्ट ऑफिसेस, एक खास महाल ऑफीस, १७ अबकारी दुकाने, १२ डाक बंगले जाळून टाकण्यात आले. १३ सरकारी अधिकाऱ्यांना अटक करून मागाहून सोडून देण्यात आले. सहा बंदुका व दोन तलवारी जप्त करण्यात आल्या व त्यांचा नाश करण्यात आला.

राष्ट्रीय सरकारासंबंधी काही माहिती दिल्यानंतर त्या अहवालात म्हटले आहे की, राष्ट्रीय सरकारच्या कोर्टात २९०७ खटले नोंदविण्यात आले होते. त्यापैकी ९६८१ खटल्यांची विल्हेवाट लावण्यात आली.[४९]

## १९४२ च्या चळवळीमुळे वृत्तपत्रावर दडपशाही :-

'नवाकाळ' वृत्तपत्राने सुध्दा 'वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यावर आक्रमण' हा अग्रलेख लिहून वृत्तपत्रविषयक ब्रिटिश सरकारच्या धोरणास विरोध दर्शविला.

''गेल्या शनिवारी कलकत्ता येथे ऑल इंडिया न्यूज पेपर एडिटर्स कॉन्फरन्सचे चौथे अधिवेशन बॉम्बे क्रॉनिकलचे संपादक श्री. एस.ए. ब्रेलवी यांच्या अध्यक्षतेखाली भरून प्रेस इमर्जन्सी, प्रिश्नसेस प्रोटेक्शन ॲक्ट आणि भारत संरक्षण नियम इत्यादी वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या कायद्याचा निषेध करण्यात आला. वृत्तपत्रकारांनी स्वतःच्या स्वातंत्र्यासाठी झगडावे हे योग्य आहे. परंतु हा देश असा आहे की, इकडील वृत्तपत्रांना साम्राज्यशाही, फॅसिझम, नासिझम इत्यादी. हुकूमशाहीचा नाश झाल्याशिवाय स्वातंत्र्य मिळणे शक्य नाही. ब्रिटन किंवा अमेरिका या देशासारखी परिस्थिती या देशात स्वातंत्र्यानंतर निर्माण होऊ शकेल. अमेरिका राज्यघटनेत वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य खास पुस्ती जोडून समाविष्ट करण्यात आले आहे. ब्रिटनमध्ये अशा प्रकारची कायदेशीर सनद वृत्तपत्रांना दिलेली नसली तरी ब्रिटिश कायदा जसा परंपरेने निर्माण झाला आहे. त्याचप्रमाणे वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याची परंपरा काही मर्यादेत ब्रिटनमध्येही निर्माण झाली आहे. परंतु हिंदुस्थानात अमेरिकेसारखी सनद नाही किंवा ब्रिटनसारखी वहीवाटीची संरक्षक तटबंदीही नाही म्हणून हिंदुस्थानातील वृत्तपत्रांचा, स्वातंत्र्याचा झगडा हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या पोटात आहे. त्या स्वातंत्र्याचा भाग आहे व त्यांनी देशाच्या स्वातंत्र्याचीच कैफियत मांडली पाहिजे असे मि. ब्रेलवी यांनी आपल्या भाषणात प्रतिपादन केले. आहे ते योग्यच आहे. अमेरिकन पत्रकारांच्या संघटनेने जागतिक वृत्तपत्रकारांची सनद आंतरराष्ट्रीय कायद्यात समाविष्ट केली जावी, अशी खटपट चालविली आहे. त्यांच्याबरोबर हिंदी पत्रकार जरूर ती सहकारिता करतील. परंतु या देशात राज्यसत्तेने पत्रकारांची जी मुस्कटदाबी चालविली आहे ती प्रथम बंद झाली पाहिजे. गेल्या वर्षात सरकारी आक्रमणाचे मि. ब्रेलवी यांनी कमीत कमी अकरा दाखले दिले आहेत. गुदस्ता जानेवारीत दिल्लीच्या ' नॅशनल कॉल ' व 'हिंदुस्थान टाइम्स' या पत्रांनी श्रीमती सरोजिनी नायडू यांची पत्रकारांना दिलेली मुलाखत इतर पत्रांप्रमाणे छापली. दिल्ली येथे सरकारबरोबर झालेल्या करारात युध्दकार्याला अडथळा आणू नये इतकीच मर्यादा वृत्तपत्रकारांवर घालण्यात आली आहे. सदर मुलाखतीने ही मर्यादा कोणत्याही प्रकारे ओलांडली नसता, दिल्लीच्या चीफ कमिशनरने वृत्तपत्रकारांच्या

सल्लागार समितीची सूचना धाब्यावर बसवून सदर पत्रावर बंदी घातली. त्याचप्रमाणे श्रीमती सरोजिनी नायडू यांच्यावरही वृत्तपत्रांसाठी कोणताही संदेश देण्याची किंबहुना, भाषण करण्याची बंदी घालण्यात आली. नंतर 'नागपूर टाइम्स' आणि 'हितवाद' यांच्या संपादकांवर सल्लागार समितीला न कळविता खटले भरण्यात आले. इतकेच नव्हे तर संपादकाला वृत्तपत्रांत येणाऱ्या मजकुराबद्दल जबाबदार धरण्याचा शिरस्ता मोडून सदर पत्रातील दुय्यम सहकाऱ्यावर खटले भरण्यात आले. १९४२ साली महात्माजींच्या अटकेनंतर हरिजन कार्यालय व नवजीवन छापखाना सरकारने ताब्यात घेतला आणि हरिजनांच्या जुन्या फायली व इतर जुने कागदपत्र यांचा सरकारी अधिकाऱ्याने नाशही करून टाकला. वृत्तपत्रांच्या कचेरीत असलेल्या या फायली म्हणजे जुना इतिहास होय. त्याचा नाश करण्यात सरकारने काय साधले? अलाहाबादच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटने तर कमालच केली. त्याने सल्लागार समितीला न पुसता ऑक्टोबरमध्ये असा हुकूम काढला की, लीडर पत्रात प्रसिध्द होणारा सर्व मजकूर पोलीस सबइन्स्पेक्टरकडे प्रसिध्द करण्यापूर्वी तपासण्यास व अनुमतीस पाठविला पाहिजे. दिल्लीच्या कराराचा भंग करून अशा प्रकारचा हुकूम काढण्यात आला. हा हुकूम म्हणजे पत्रबंदीचाच पर्याय होता. कारण पोलीस सबइन्स्पेक्टरच्या नजरेखालून सर्व मजकूर वेळच्या वेळी जाणे शक्य नव्हते. यासंबंधी तत्काळ सरकारकडे तक्रार करण्यात आल्यावर हा हुकूम मागे घेण्यात आला. परंतु आता विलक्षण हुकूम या देशात निघू शकतो, इतका हा देश परतंत्र आहे, याची जाणीव सत्ताधाऱ्यांनी करून दिली. अलाहाबादेत तसा प्रकार तर वर्ध्याच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटने स्थानिक तार ऑफिसवरच बंदीचा हुकूम काढून वृत्तपत्रीय तारा आपणाकडे संमतीसाठी पाठविल्या पाहिजेत, अशी सक्ती केली. काल हा तर वृत्तपत्रीय जगाचा आत्मा होय आणि मॅजिस्ट्रेटच्या सदर हुकूमाने वृत्तपत्रीय ताजेपणा नष्ट होण्याचा संभव आहे. गेल्या एप्रिल महिन्यात १४ तारखेस मुंबईस प्रचंड स्फोट झाला व सरकारने वृत्तपत्रांवर मजकूर प्रसिध्द करण्याची कडक बंदी घातली. याबद्दल निषेध व्यक्त करण्यासाठी मुंबईच्या सेंटिनल पत्राने वृत्तपत्रातील काही जागा कोरी ठेवली. इतरांना अनिष्ट लिखाण लिहिण्याबद्दल शिक्षा होते, तर सेंटिनल पत्राची त्या जागेत काहीच न लिहिल्याबद्दल गळचेपी करण्यात आली! लखनौ नॅशनल हेरल्ड पत्र स्वखुशीने १९४२ साली निषेध व्यक्त करण्यासाठी बंद करण्यात आले. आता सरकारने भारत संरक्षण नियमाखाली त्या पत्राचा पुनर्जन्मच होऊ द्यावयाचा नाही, असे ठरविले आहे! सुप्रसिध्द

अमेरिकन लेखक लुई फिशर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची कैफियत मांडतो, म्हणून त्यांच्या लिखाणाला हिंदुस्थानातील वृत्तपत्रात प्रसिध्दी मिळू नये असा निर्बंध सरकारने घातला आहे. त्याप्रमाणे वृत्तपत्रातील दडपशाहीची गेल्या वर्षातील काही ठळक उदाहरणे दिली आहेत. वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य सरकारला अनिष्ट वाटते. कारण सरकारचा अन्यायी कारभार चव्हाट्यावर मांडण्याचे कार्य या देशात पत्रकारांनी केले आहे. पत्रकारांनी आपली संघटना अधिक समर्थ केली तर तिचा प्रभाव पडल्याशिवाय राहणार नाही. प्रस्तुत कॉन्फरन्सचे स्वरूप जितके प्रातिनिधीक असावे तितके नाही. कारण या कॉन्फरन्सच्या स्टँडिंग कमिटीवर इंग्रज वृत्तपत्रकारांचीच बहुसंख्या आहे आणि देशी भाषेतील वृत्तपत्रांना जरूर तेवढे स्थान नाही. वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य ही सर्वांनाच जिव्हाळ्याची गोष्ट आहे. म्हणून सरकारवर परिणाम घडवून आणण्याच्या दृष्टीनेही आपली संघटना प्रातिनिधीक करणे संपादकीय परिषदेचे कर्तव्य नाही काय?''[५०]

ब्रिटिशांनी जे हे कायदे पास केले ते १९४२ ची 'चलेजाव' चळवळ दडपण्यासाठी वृत्तपत्राद्वारे सर्व हिंदुस्थानभर होणारा प्रचार व प्रसार रोखण्यासाठी त्यांनी असे कायदे पास केले हे दिसून येते.

## ५.१२ स्वातंत्र्याचा अरुणोदय :-

१५ ऑगस्ट १९४७ हा भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला गेलेला अनन्यसाधारण महत्त्वाचा मन्वंतराचा दिवस. या दिनी भारतातील शोषक व जाचक ब्रिटिश शासनाचा अंत झाला. सुमारे दोन शतकांच्या पारतंत्र्याचा अंधःकार नाहीसा झाला व स्वातंत्र्यसूर्याच्या किरणांनी भारत देश उजळून निघाला. परकीय राज्यकर्त्यांच्या दडपणाखाली वाकलेले भारतीय पुन्हा एकदा ताठ मानेने उभे झाले.

### स्वातंत्र्य दिन:-

''ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून भारताचं वसाहतीकरण साधण्यावर इ.स. १८५८ मध्ये भारतीय वसाहतीची सूत्रं अधिकृतपणे पूर्णतः इंग्लंडच्या राजाकडे सोपविली गेली होती. अखंड भारतावर साम्राज्यवादी सत्ता लादणाऱ्या ब्रिटिश सरकारने प्रदीर्घ अशा स्वातंत्र्य लढ्यानंतर आणि हजारो स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानानंतर अखेरीस १८ जुलै १९४७ रोजी ब्रिटिश पार्लमेंटमध्ये १४ ऑगस्ट १९४७ च्या मध्य रात्री भारताला स्वातंत्र्य बहाल केले जाईल,

अशी घोषणा केलेली होती. १५ ऑगस्ट १९४७ च्या पहाटे भारताला अधिकृतपणे स्वातंत्र्य प्राप्त झाले आणि अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात राजधानी दिल्ली व देशात सर्वत्र भारताचा तिरंगा ध्वज दिमाखाने फडकू लागला.

हिंदी जनता १५ ऑगस्ट १९४७ पासून स्वतंत्र झाली होती. 'नवाकाळ' वृत्तपत्राने स्वातंत्र्याला १५ ऑगस्ट १९४७ रोजी 'हिंदी जनता आजपासून स्वतंत्र – इतिहासातील अपूर्व प्रसंगी आलेले आनंदाचे भरते' या बातमीद्वारे वंदन केले.

''शुक्रवार, ता. १४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्रीचे १२ चे ठोके पडले व त्याबरोबर हिंदुस्थानच्या पारतंत्र्याचा शेवट झाला.

१५ ऑगस्ट १९४७ या तारखेपासून हिंदी लोक स्वतंत्र झाले आहेत. हिंदी लोक स्वतःच्या देशाचे मालक बनले आहेत. पारतंत्र्याची रात्र मागे टाकून हिंदी लोक १५ ऑगस्टच्या पहाटेस स्वतंत्र नागरिक या नात्याने जागे होत आहेत. पारतंत्र्याला कायमचा रामराम करून स्वातंत्र्याच्या प्रभातकालाला वाचकांबरोबर 'नवाकाळ' वंदन करीत आहे. दिल्लीत व मुंबईसह इतर प्रांताच्या मुख्य शहरी स्वातंत्र्याचा सत्कार कशा आनंदोत्सवाने करण्यात येत आहे, याची हकीकत वाचकास सादर करताना अत्यंत आनंद व अभिमान वाटत आहे.''[५१]

१५ ऑगस्ट १९४७ या दिवशी देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले. देश पारतंत्र्यातून मुक्त झाला. या दिवसाचा गौरव करण्यासाठी 'नवाकाळ' वृत्तपत्राने 'युगान्तराचा सुवर्ण दिन' हा अग्रलेख लिहिला.

''आज, शुक्रवार, ता. १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस हिंदुस्थान, आशिया आणि अखिल जग यांच्या इतिहासात सोन्याच्या कोंदणात रत्नांच्या अक्षरांनी लिहून ठेवला पाहिजे. या दिवसाची महती इतकी आहे की, भगवान व्यास किंवा वाल्मिकी ऋषी या भारताच्या आद्य व त्रिकोलश्रेष्ठ इतिहासकारांच्या लेखणीने या दिनाचे यशोगान केले पाहिजे. कारण आज भारताच्या व जगाच्या इतिहासातील एक युग संपून नव्या युगास प्रारंभ होत आहे. त्या प्रतिभासंपन्न कवींनी श्रीराम, श्रीकृष्ण यांच्या जन्माचे जसे वर्णन केले आहे, त्याप्रमाणे जगामध्ये आज एक स्वतंत्र राष्ट्र म्हणजे स्वातंत्र्याचा एक नवा अवतार प्रकट होत आहे. त्याचे वर्णन करणे अशक्य आहे. या स्वतंत्र नवराष्ट्रास आम्ही अंतःकरणपूर्वक अभिवादन करून

अर्ध्य प्रदान करीत आहोत!

कालची काळी मध्य रात्र उमटल्याबरोबर भारताच्या प्राचीन राजधानीत आणि आजच्या लोकधानीत प्रौढीत मिरवत असलेले ब्रिटिश निशाण खाली आले आणि भारताच्या निशाणाने त्याची जागा घेऊन २०० वर्षांचा पारतंत्र्याचा कलंक पुसून टाकला आहे. ब्रिटिश सत्तेबरोबर झगडण्यात भारताच्या ज्या थोर वीरांनी आपले प्राण पणास लावले, त्यांचे अतृप्त आत्मे आज दिल्लीच्या तिरंगी झेंड्याभोवती बेहोष होऊन संचारत असतील. राणी लक्ष्मीबाई, वासुदेव बळवंत फडके, भगतसिंग, सुभाषबाबू, लोकमान्य आणि असंख्य ज्ञात व अज्ञात देशभक्तांचे आत्मे या राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा जन्म पाहून संतुष्ट होतील व शांती पावतील. त्यांचे कार्य आज समाप्तीस नेणाऱ्या या पिढीस त्याचे कृतार्थ आत्मे धन्यवाद देत असतील.

त्याचप्रमाणे सबंध एशियाने आणि मानवजातीने या स्वतंत्र नवराष्ट्राचे स्वागत केले पाहिजे. एशियामध्ये स्वातंत्र्याची ही नवी शक्ती निर्माण झाली आहे. या राष्ट्राचा संबंध एशियाचा संबंध अनेक शतकांचा आहे. प्राचीनकाली हेच राष्ट्र एशियाच्या संस्कृतीचे केंद्र होते. मध्यंतरी जॅकची छाया या देशावर पडल्यामुळे हा देश इतर एशियाटिक देशापासून वेगळा काढला गेला. ब्रिटिशांनी घडवून आणलेल्या या वियोगाचा आणि ताटातुटीचा आता अंत होत आहे आणि आशियातील राष्टांना स्वतंत्र होण्याच्या कार्यात हिंदी राष्ट्राची मदत मिळणार आहे. जगाचे साम्राज्य गोऱ्यांच्याच हाती असले पाहिजे, ही विचारसरणी यापुढे दंतकथेच्या सदरात जमा होईल आणि गोऱ्यांच्या सत्तेचे आशियातून उच्चाटन होईल.

आणि अखिल मानवजातीनेही या स्वतंत्र राष्ट्राचे अभिवादन केले पाहिजे. जगात आसुरी शक्तीच्या आहारी ब्रिटन, अमेरिका, रशिया ही मोठी राष्ट्रे गेली असूना जगाच्या संहाराकडे त्यांची प्रवृत्ती आहे. तिसऱ्या युध्दाच्या जय्यत तयारीस ही राष्ट्रे लागली असून एकमेकांचा आणि जगाचा नाश त्यांच्या आसुरी प्रवृत्तीमुळे होण्याचा संभव आहे. मानवाला शक्तीचा लाभ त्यांच्या आसुरी लालसेमुळे मिळणार नाही. मानवाची शांतीची तहान शमविण्यास एकच राष्ट्र समर्थ होऊ शकेल व ते हिंदी राष्ट्र होय. या राष्ट्राला कोणावरही आक्रमण करण्याची इच्छा नाही. या राष्ट्राला अन्याय, विषमता, दडपशाही सहन होत नाही. आपणाप्रमाणे प्रत्येक राष्ट्र स्वतंत्र व्हावे, अशी स्वातंत्र्याची आस्था या राष्ट्राला आहे. या राष्ट्र ाने आपले स्वातंत्र्य थोर नीतिमत्तेने, स्वार्थत्यागाने आणि तपस्येने मिळविले आहे. या राष्ट्राचे

कालचे आणि आजचे नेते आपल्या उज्ज्वल चारित्र्याबद्दल जगाला वंदनीय होऊन राहिले आहेत. अशी दिव्य संपदा धारण करणारे राष्ट्रच मानवाला शांततेकडे नेऊ शकेल.

हिंदी राष्ट्राचे स्वातंत्र्य म्हणजे ४० कोटी लोकांचे स्वातंत्र्य हे एशियातील अर्ध्या मानव जातीची प्रेरणा व स्फूर्ती आणि अखिल मानवाची शांतीची व श्रेयाची आशा आहे. म्हणून हा दिवस त्रिवार धन्य होय!''[५२]

**काकासाहेबांचे तरुण पिढीला स्फूतिदायक विचार :–**

काकासाहेब खाडिलकरांनी स्वातंत्र्यदिनी तरुण पिढीला स्फूर्तिदायक विचार व्यक्त केले ते 'नवाकाळ' वृत्तपत्रातून मांडण्यात आले.

''भाग्यवान तरुण पिढी – राष्ट्राची उभारणी व घडवणूक करण्याची संपूर्ण संधी' अशा आशयाचे स्फूर्तिदायक विचार मांडले होते.

''सुमारे १० वर्षांपूर्वी श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे सांगली येथे विद्यार्थ्यांसमोर व्याख्यान झाले होते. त्या वेळी प्रांताप्रांतामध्ये कॉंग्रेसचे राज्य स्थापन झालेले होते. आणि त्यामुळे नव्या पिढीला भाग्यवान असे संबोधून देशाची बांधणी व उभारणी करण्याचे केवढे मोठे भाग्य तरुणांच्या वाट्यास आले आहे, याचे वर्णन या भाषणात सांगितले. सदर भाषण आजच्या स्वातंत्र्य दिनाच्या प्रसंगीही लागू होणारे असल्यमुळे त्या भाषणातील एतद्विपथक परिच्छेद पुढे दिलेले आहेत

'पराक्रमाचा भावी काळ'– तरुणांनो! तुमचा काळ तसा नाही. कित्येक वर्षांनंतर याच ठिकाणी पहिला फ्रिडम– फर्स्ट– गेस्ट म्हणून येण्याची जेव्हा मला संधी मिळेल त्या वेळी आपण छातीला हात लावून सांगाल की, माझ्या हाताने मी हा हक्क मिळविला आहे. मी देशाचा आधारस्तंभ आहे. अरे माझ्या हाता–पायांनी काम करून या देशाची उभारणी (Nation Building) केली आहे. असे त्या वेळी तुम्ही मोठ्या अभिमानाने सांगू शकाल. याचे कारण महात्मा गांधींच्या प्रेरणेने निर्माण झालेले कॉंग्रेसचे राज्य आज अस्तित्वात आले आहे. आमच्या वेळी तसे नव्हते. त्यामुळे आमची आंधळ्यासारखी स्थिती झाली होती. आता कॉंग्रेसचे स्वार्थत्यागी डोळस राज्य सुरू झाले असल्यामुळे आता आंधळ्यांच्या काठीची तुम्हाला गरज नाही. कॉंग्रेसचे राज्य आपणास चैन पडू देणार नाही. राष्ट्रसभेचे राज्य आत्मयज्ञ करावयास

आपणास शिकवील. तुम्हाला हाताला धरून, स्वार्थत्याग करावयास काँग्रेसचे लोक लावतील. आम्ही राष्ट्र उभे केले आहे. हलविले आहे. बनविले आहे, या अभिमानाची गोडी तुमच्यामध्ये उत्पन्न होईल. आमचे राष्ट्र आम्ही बनविले असे सांगू शकण्याइतकी तुमची कीर्ती होईल. हिंदुस्थानात नवी सृष्टी उत्पन्न करणारे, नवा हिंदुस्थान निर्माण करणारे अशी पदवी तुम्हाला मिळेल. 'ब्रह्मदेवाना पदवी कवींनामृषिर्विप्रणांमहिषो मृगाना' या मंत्रात सांगितल्याप्रमाणे तुमची कीर्ती होईल.''[५३]

## ५.१३ संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि 'नवाकाळ' :-

महाराष्ट्र राज्य आणि मुंबई हा एक राजकीय व भावनिक प्रश्न भारत स्वतंत्र होण्याच्या आधीपासूनच होता. स्वातंत्र्यानंतर तर त्यासाठी अनेक क्रांतिकारकांना आपल्या प्राणाची आहुती द्यावी लागली आणि त्यानंतर मुंबईसह महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.

### संयुक्त महाराष्ट्र आंदोलन :-

सर्व मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचे भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वावर एक राज्य स्थापन करण्यासाठी करण्यात आलेल्या आंदोलनाला संयुक्त महाराष्ट्र चळवळ स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच सुरू झाली आणि महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० साली झाल्यानंतर समाप्त झाली.

१९०५ साली राष्ट्रीय काँग्रेसने भाषावार प्रांतरानेच्या तत्त्वाचा स्वीकार केला होता. १९२० मध्ये नागपूर काँग्रेसच्या अधिवेशनात पक्षाची नवी घटना तयार करताना भाषिक तत्त्वावर काँग्रेस समित्या स्थापन करण्याचे मान्य केले. त्यानुसार काँग्रेसने भाषेच्या आधारावर प्रांतिक समित्या स्थापन केल्या. १९१७ च्या काँग्रेसच्या अधिवेशनात पट्टाभि सीतारमय्या यांनी तेलगू भाषेवर आधारित आंध्रप्रदेश हे स्वतंत्र राज्य निर्माण व्हावे असा ठराव मांडला. तेव्हा लोकमान्य टिळक वगळता सर्व पदाधिकाऱ्यांनी हा ठराव नाकारला. टिळकांनी मात्र या ठरावाला संमती दिली. त्यांचे मत असे होते की, सर्वसाधारण भारतीय अशिक्षित लोकांना आपल्या मातृभूमी किंवा स्वातंत्र्याविषयी महत्त्व पटवून देण्यासाठी किंवा शैक्षणिक शिक्षण मातृभाषेतून दिले तर ते अधिक परिणामकारक ठरेल. त्यांनी सर्व राज्यांची निर्मिती भाषेवर

आधारित व्हावी असा विचार मांडला. लोकमान्य टिळक हे भाषावार आधारित राज्यनिर्मितीच्या बाजूने होते.

### संयुक्त महाराष्ट्र संकल्पना :–

१ ऑक्टोबर १९३८ साली मध्य प्रांत वऱ्हाड असेंब्लीत रामराव देशमुख यांनी स्वतंत्र विदर्भाची मागणी करणारे विधेयक मांडले आणि १५ ऑक्टोबर १९३८ साली मुंबई येथे भरलेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी मराठी राज्यासाठी ठराव मांडला. पुढे रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली २८ जानेवारी १९४० रोजी संयुक्त महाराष्ट्र सभेची स्थापना झाली. त्यानंतर वऱ्हाड प्रांत महाराष्ट्रात सामील करण्यासाठी 'महाराष्ट्र एकीकरण परिषद' भरली. पण खऱ्या अर्थाने संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा प्रश्न उचलून धरला तो बेळगावच्या १९४६ च्या साहित्य संमेलनात. संमेलनाचे अध्यक्ष होते ग.त्र्यं.माडखोलकर. त्यांनी १२ मे १९४६ रोजी संयुक्त महाराष्ट्रासंबंधी एक ठराव मांडला व तो एकमताने संमत करण्यात आला.

### दार व जे.व्ही.पी. समिती :–

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला आणि स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भाषावार प्रांतरानेसाठी न्यायमूर्ती एस.के.दार यांचे कमिशन नियुक्त केले. आपल्या अहवालात या कमिशनने भाषावार प्रांतरचना देशाच्या एकात्मतेला घात करणारी आहे, असा अभिप्राय देऊन मूळ संकल्पनेलाच छेद दिला. पुढे एप्रिल १९४९ मध्ये नेहरू, सरदार पटेल व पट्टाभि सीतारामय्या यांची जे.व्ही.पी. समिती नेमण्यात आली. खरं तर मुंबई हा कळीचा मुद्दा होता. कारण त्या वेळेस मुंबईची औद्योगिक प्रगती वेगाने होत होती. म्हणूनच धनिक भांडवलदार वर्ग स्वतःच्या फायद्यासाठी या शहरावरील आपली पकड कायम ठेवू पाहत होता. पण सर्व बाजूने महाराष्ट्राच्या भूभागाला वेढलेले मुंबई शहर त्यांना महाराष्ट्रापासून वेगळे काढणे शक्य नव्हते. जे.व्ही.पी. समितीनेही पुढे मागे महाराष्ट्र स्वतंत्र झाला तरी त्यात मुंबईचा समावेश करता येणार नाही. म्हणजेच मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही, अशा पद्धतीने भांडवलदाराच्या बाजूने निकाल दिला.

दार कमिशनच्या अहवालावर टीका करताना 'नवाकाळ' वृत्तपत्राने दिनांक १४ डिसेंबर १९४८ रोजी 'दार कमिशनच्या शिफारसींचा वाफेचा रूळ' या अग्रलेखात विवेचन मांडले.

''भाषावार प्रांतरानेची मागणी ही राष्ट्रीयत्वाला विघातक आहे, हा मुद्दाच कमिशनच्या कक्षेत कसा येतो, हे कळणे कठीण आहे. ज्या वेळी महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र, तामीळनाडू यांच्या मागणीचा विचार कमिशन नेमून करण्याचे आश्वासन पं. नेहरुनी घटना परिषदेमध्ये दिले आणि डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी या चौकशीसाठी कमिशन नेमले. त्याच वेळी या मागणीचा तात्विक निर्दोषपणा सिध्द झाला आणि तपशिलापुरताच काय तो प्रश्न शिल्लक राहिला. वस्तुतः भाषावारीचा प्रश्न तत्त्वदृष्ट्या दूषित आहे किंवा कसे हा प्रश्न कमिशनच्या कक्षेत जसा येत नाही, त्याचप्रमाणे भाषावारीचा प्रश्न तूर्त घ्यावा की लांबणीवर टाकावा, हाही प्रश्न कमिशनच्या कक्षेत येत नाही. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र, तामीळनाडू हे चार भाषावार प्रांत करण्याच्या बाबतीत अनुकूल, प्रतिकूल तपशील तपासून त्या तपशिलाच्या दृष्टीने हे चार प्रांत व्हावेत किंवा नाही एवढाच कमिशनसमोर ठेवलेला प्रश्न होता. हे दोनही व्यापक प्रश्न घटना परिषदेतच येऊ शकतात. पण भाषावार प्रांतराना होऊच नये, असे म्हणताना भाषा विविधतेच्या मुद्यावर जोर देऊन मुंबई व मद्रास ही शहरे कोणत्याही एकभाषी प्रांतात जाऊ नयेत म्हणून कमिशनने शिफारस केली आहे, हे आश्चर्यच होय. पण भाषावार प्रांतरचना ही एकराष्ट्रीयत्वाला विघातक ठरेल अशा युक्तिवादाचा वाफेचा रूळ सोडून भाषावार प्रांतरचनेच्या मागण्या सरसकट कमिशनच्या शिफारसींनी दडपून टाकल्या आहेत, याचे आश्चर्य तसेच दुःख वाटल्यावाचून राहणार नाही.''[५४]

कमिशन अहवालसरणीसाठी पहिली म्हणजे या विचारसरणीचा वाफेचा रूळ भाषावार प्रांतरचनेच्या मागणीवरूनच फिरून न राहता उद्या प्रांतिक भाषा, इतिहास, संस्कृती यावर फिरणार की काय, अशी शंका मनात डोकावल्याशिवाय राहत नाही, असा विचार 'नवाकाळ' वृत्तपत्राने मांडला.

'संयुक्त महाराष्ट्राची संयमी व सनदशीर चळवळ' हा अग्रलेख 'नवाकाळ' वृत्तपत्राने दिनांक २२ एप्रिल १९४९ रोजी लिहिला. या लेखात जे.व्ही.पी. समितीच्या निर्णयाबद्दल व

चळवळीची मागणी काय आहे व मुंबई ही संयुक्त महाराष्ट्राची मुख्य मागणी आहे, याबाबत मुंबईबद्दलची मराठी भाषकांची मागणी न्याय्य आहे असे म्हटले आहे.

जे.व्ही.पी. समितीने आपल्या अहवालात म्हटले आहे की, मुंबई हे दुभाषी शहर असून येथील पूर्ण विकास हा गुजराती लोकांच्या भांडवलामुळे व कारखानदारीमुळे झाला आहे. गुजराती लोकांचा मुंबईवर हक्क आहे. त्यामुळे ती महाराष्ट्रात सामील होता कामा नये. मुंबईमध्ये ४३ टक्के मराठी भाषिक होते. सर्व गिरण्या व कारखान्यांमध्ये मराठी मजूर मोठ्या संख्येने होता. या समितीच्या निर्णयामुळे सर्व चिडले व पुढे सभा, निदर्शने होऊ लागली.

### संयुक्त महाराष्ट्र ठराव व निदर्शने :-

संयुक्त महाराष्ट्र निर्मिती व्हावी यासाठी 'नवाकाळ' वृत्तपत्राने अनुक्रमे २६ सप्टेंबर १९४९ आणि ८ नोव्हेंबर १९४९ रोजी 'संयुक्त महाराष्टाचा ठराव व निदर्शने' व 'संयुक्त महाराष्टाची श्रध्दा आणि मार्ग' या दोन लेखात संयुक्त महाराष्ट्र चळवळीबद्दल समाजात नवचैतन्य जागवले.

सन १९५० मध्ये मराठी पत्रकार परिषद भरली होती. त्याचे अध्यक्ष आचार्य अत्रे होते. त्यांनी संयुक्त महाराष्ट्र निर्मितीवर जोर दिला. दिनांक १३ फेब्रुवारी १९५० रोजी 'संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीची निश्चित तारीख जाहीर करा, असा आवाज मराठी पत्रकारांनी उठविला पाहिजे,' या मथळ्याने आचार्य अत्रे यांच्या भाषणाचा वृत्तांत प्रकाशित केला.

''धंद्याला धर्माचे स्वरूप द्यावे, पण धर्माचा मात्र धंदा करू नये.' पत्र व्यवसाय हा जरी धंदा असला तरी पत्रकाराची वृत्ती हा एक महान धर्म आहे. धंद्याला धर्माचे स्वरूप द्यावे. पण धर्माचा मात्र धंदा करू नये. जनता जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात क्रांती व्हावी म्हणून पत्रकारांच्या लेखणी लेखणीमधून क्रांतिरसाच्या चिळकांड्या उडाव्यात आणि वृत्तपत्रे ही क्रांतीची कारंजी उडवतील. जनता क्रांतीचा जयजयकार करणे हाच खरा पत्रकारांचा धर्म आहे, असे उद्गार बेळगाव येथे भरलेल्या मराठी पत्रकार परिषदेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. प्रल्हाद केशव अत्रे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात काढले.[५५]

१९५३ सालापर्यंत सेनापती बापट, आचार्य अत्रे यांच्या अनेक सभा निर्दर्शने भाषणे झाली.

शेकडो वर्षांपासूनच विदर्भ मराठी भाषिकांचा भाग असूनही विदर्भाची वेगळी अशी अस्मिता विकसन झालेली होती. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कार करणाऱ्या नेत्यांनी विदर्भातील नेत्यांशी चर्चा करून त्यांच्याबरोबर 'अकोला करार' केला. पुढे संयुक्त महाराष्ट्राला विदर्भाचा पाठिंबा मिळविण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र चळवळीद्वारे 'नागपूर करार' सन १९५३ मध्ये करण्यात आला.

### राज्य पुनर्रचना आयोग :-

डिसेंबर १९५३ मध्ये केंद्र सरकारने पुन्हा एकदा भाषावार प्रांतरचनेसाठी निवृत्त न्यायाधीश फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली कमिशन नेमले. (राज्य पुनर्रचना आयोग) नियुक्ती केली. पं. हृदयनाथ कुंझरू व सरदार पाणिवकर हे या आयोगाचे सभासद होते. संयुक्त महाराष्ट्र परिषदेने व इतरांनी आयोगासमोर संयुक्त महाराष्ट्राच्या राज्याची मागणी केली. या आयोगाने आपला अहवाल १० ऑक्टोबर १९५५ रोजी प्रसिध्द केला. महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यांना वगळून सर्व भाषिकांना त्यांची स्वतंत्र राज्य देण्यात आली. आयोगाने पंजाब, राजस्थान, मध्यप्रदेश, केरळ आणि कर्नाटक या राज्याच्या निर्मितीची शिफारस केली. हैदराबाद राज्य कायम ठेवावे व विदर्भाचे स्वतंत्र राज्य करावे, अशीही आयोगाची शिफारस होती. आयोगाच्या या शिफारसीमुळे महाराष्ट्रात संतापाचा ज्वालामुखी धगधगू लागला.

संयुक्त महाराष्ट्रासाठी लढा सुरू झाला. यासाठी श्री. शंकरराव देव व काकासाहेब गाडगीळ यांचे प्रयत्न सुरू झाले. 'नवाकाळ' वृत्तपत्राने 'संयुक्त महाराष्ट्रासाठी लढा' हा अग्रलेख प्रकाशित केला.

''राज्य पुनर्रचना कमिशनच्या शिफारसींनी महाराष्ट्रास केलेला अन्याय दूर करून घेणे हा मराठी भाषिकांचा महाराष्ट्र धर्म त्याचप्रमाणे भारत धर्मही आहे. महाराष्ट्र धर्म व भारत धर्म पाळण्यासाठी श्री. शंकरराव देवांनी आपली तपस्या, श्री. काकासाहेब गाडगीळ यांनी आपले कर्तृत्व व कार्यकर्त्यांनी आपली शक्ती पणाला लावली आहे. श्री. काकासाहेब गाडगीळ यांनी

आपल्या एका भाषणात म्हटल्याप्रमाणे, कमिशनच्या शिफारसी आल्या असत्या आणि काँग्रेस वर्किंग कमिटीने महाराष्टात अनुचित असा निर्णय ता. ८ व ९ रोजी घेतला असे गृहीत धरले तरी त्यानंतरच सप्तपदी व्हावयाची आहे. लोकसभा व राज्यसभा यात राज्य पुनर्रचना करणाऱ्या बिलाची प्रत्येकी तीन वाचने व शेवटी राष्ट्रपतींची सही अशी सात पावले राज्य पुनर्रचनेच्या बिलास टाकावी लागतील व प्रत्येक पावलागणीक महाराष्ट्रास अन्यायाविरुध्द झगडून ही सप्तपदी पुरी होणार नाही अशी शिकस्त करावी लागेल. या संयुक्त महाराष्ट्राची मागणी पुरी झाली नाही तर जी राज्यरचना महाराष्ट्रावर लादली जाईल त्याविरुध्द महाराष्ट्रास दीर्घ कालपर्यंत सतत झगडावे लागेल.''[५६]

या अवधीमध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळ अधिक आक्रमक बनली. मुख्य प्रश्न मुंबईचा होता. हे शहर महाराष्ट्रास देण्यास गुजराती भाषिकांचा विरोध होता. मराठी भाषकांचे बेळगाव–कारवारचा भाग आयोगाने कर्नाटकास दिला.

८ नोव्हेंबर १९५५ रोजी काँग्रेस वर्किंग कमिटीने आतून एक खेळी खेळत मुंबई महाराष्ट्र आणि गुजरात असा त्रिराज्याचा प्रस्ताव मांडून मराठी भाषकांवर अन्याय केला. महाराष्ट्रात विशेषतः मुंबईत लोकांचा असंतोष वाढू लागला.

या काळात 'नवाकाळ' वृत्तपत्राने आपल्या संपादकीय लेखनाद्वारे खूप मोठी कामगिरी केली. त्याचे अनेक अग्रलेख, बातम्या, चळवळीला प्रेरणादायक ठरल्या. 'सौराष्ट्र–उरांचा संयुक्त महाराष्ट्रास शह' मुंबई द्विभाषिक राज्याचा प्रयोग तसेच 'गुजरात–महाराष्ट्राचा राक्षस विवाह' हे लेख खूप प्रखर होते.

'जसे कर्नाटकला बेल्लारी तसे महाराष्ट्राला बेळगाव' या लेखात 'नवाकाळ' वृत्तपत्राने आपले विचार खूपच प्रखरपणे मांडले. ते म्हणतात–

''सोम्याचे काढून गोम्याला देणाऱ्या या उचलेगिरीचा परिणाम अखेर महाराष्ट्र संपूर्ण रीतीने नागविण्यात झाला आहे. कर्नाटकाचे समाधान करण्याकरिता बेळगाव–कारवारचा लचका महाराष्ट्रापासून काढून घेतला आहे. विदर्भ निराळा काढून महाराष्ट्राची फाळणी केली आहे आणि द्विभाषिक मुंबई राज्याच्या रथाला उरलेला महाराष्ट्र एखाद्या जिताप्रमाणे जखडून तो

फरफटत नेला जाईल, अशी तरतूद कमिशनने केली आहे. गुजराती भाषिकांना महागुजरात नाकारल्यामुळे नाराजी वाटता कामा नये. बेल्लारी गेल्यामुळे दुखावलेला कर्नाटक स्थिर झाला पाहिजे. मुंबईच्या हितसंबंधी धनपतींची भीती दूर झाली पाहिजे आणि हे सारे साधण्यासाठी विदर्भाचा लचका काढण्यास बेळगावचा तुकडा कर्नाटकास देण्यास आणि मुंबईसह महाराष्ट्राच्या मुसक्या बांधून त्यांची धिंड काढण्यास हरकत नाही, अशाच समजुतीने मराठी भाषिक मुलखाबद्दल कमिशनने आपला अहवाल तयार केला आहे. मराठी मुलखाबद्दलचा संताप आपण कोठेच सहन करणार नाही, असे आश्वासन देव–गाडगीळांनी दिले असून मराठी भाषिकांवरील अन्यायाच्या परिमार्जना बरोबरच कर्नाटकच्या दाढेत देण्यात आलेला बेलारी व कारवारही मुक्त होईल, यात संशय नाही.''[५७]

या लेखात 'नवाकाळ' वृत्तपत्राने आपल्या भावना अत्यंत प्रखरपणे मांडल्या. पुढे 'संयुक्त महाराष्ट्रासाठी सामोपचार व वनवास', 'मुंबई शहरराज्य म्हणजे महाराष्ट्रावर निखारे' अशा लेखांनी 'नवाकाळ' वृत्तपत्राने मुंबई व महाराष्ट्रात क्रांती निर्माण करण्याचे काम केले. 'संयुक्त महाराष्ट्रासाठी प्राणपणाने लढले', 'राज्य पुनर्रचनेचा अन्याय व मतैक्याचे स्तोम' या शीर्षकाखाली लेख लिहून समाजात या कमिशनच्या चुका व राजकीय षड्यंत्र समाजासमोर आपल्या अग्रलेखाद्वारे मांडले.

**त्रिराज्य विरोधी मोर्चा** :–

१९ नोव्हेंबर १९५५ रोजी चर्चगेट स्टेशनपासून ५०० च्या वर आंदोलनकर्त्यांनी मोर्चा त्वेषाने विधानसभेकडे गेला. या मोर्चाचे नेतृत्व सेनापती बापट करत होते. मोर्चा शांत मार्गाने व कसलाही दंगा न करता यशस्वी झाला. लोकांनी 'मुंबईसह महाराष्ट्र झालाच पाहिजे,' अशा घोषणा दिल्या. पण सेनापती बापट, आचार्य अत्रे इत्यादी नेत्यांना अटक झाली. एस.एम. जोशी, भाई वैद्य, पाटकर इत्यादी नेत्यांनी त्याला विरोध करण्यासाठी २१ नोव्हेंबर रोजी 'मुंबई बंद'ची घोषणा केली.

दुसऱ्या दिवशी म्हणजे २० नोव्हेंबर १९५५ रोजी मुख्यमंत्री मोरारजी देसाईंनी मुंबई चौपाटीवर सभा घेतली. मोरारजी देसाई आणि स.का. पाटील यांची सभा सुरू होती. मोरारजी

व स.का. पाटील यांच्या संयुक्त महाराष्ट्रविरोधी भूमिकेमुळे संतप्त जमावाने दगडगोळ्यांचा वर्षाव करून सभा उधळून लावली.

**२१ नोव्हेंबर १९५५ सार्वत्रिक संपाची हाक व विधानमंडळावर मोर्चा :–**

मुंबईत सार्वत्रिक संपाची हाक देण्यात आली होती. गिरण्या, कारखाने, गोदी, वर्कशॉप्स बंद ठेवत साडेचार लाख कामगारांनी यात भाग घेतला होता. त्रिराज्य योजना मोडून काढण्यासाठी विराट मोर्चा निघाला होता. मोर्चा फाऊंटनच्या दिशेने येताच पोलिसांनी चौफेर लाठीहल्ला सुरू केला व जमाव पांगत नाही हे पाहून त्यांच्यावर अश्रूधुरांच्या नळकांड्या फोडण्यात आल्या. बंदुकीच्या फैरी झाडण्यात आल्या. गोळीबारात १० ठार तर ३०० जखमी झाले. सारी मुंबई व महाराष्ट्र खवळून उठला. 'नवाकाळ' वृत्तपत्राने तर आपल्या लेखणीतून सरकारची लक्तरं वेशीला टांगली.

'मुंबईची दंगल आणि दिल्लीचे दुःख' या लेखात 'नवाकाळ' वृत्तपत्राने 'जबाबदारी कोणाची' असा प्रश्न उपस्थित करून ते म्हणतात–

''निदर्शनात जे अनिष्ट प्रकार झाले त्यांची जबाबदारी संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या नेत्यांवर आहे व त्यातून ते सुटू शकणार नाहीत, अशी धमकी येथील टाइम्स पत्राच्या दिल्लीच्या एका बातमीत आहे. जबाबदारीतून पळवाट पाहिजे आहे कोणाला? कोणी न सांगता सवरता संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष श्री. देव यांनी अनिष्ट प्रकारांच्या परिमार्जनार्थ पाच दिवस उपवास सुरू केला आहे आणि महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष श्री. देवगिरीकर व ना. हिरे यांनी तत्काळ मुख्यमंत्री ना. मोरारजीभाई देसाई यांच्याजवळ चौपाटीवरच्या प्रकाराबद्दल खेदही व्यक्त केला आहे. भल्याबुऱ्या गोष्टींची जबाबदारी टाळण्याची महाराष्ट्रीय नेत्यांची परंपराच नाही आणि बंगालमधील प्रकारांबाबतही जबाबदारी पत्करून लोकमान्य टिळकांनी मंडालेला सहा वर्षे कैदवास पत्करण्यास कमी केलेले नाही. जबाबदारी सोडावयाची म्हटले तरी सुटत नाही आणि तशी पळवाट कोणी काढताही कामा नये, हे महाराष्ट्रीय नेत्यांच्या बाबतीतच खरे आहे, असे मात्र नव्हे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला आजचे तीव्रतम रूप ज्याच्या कृतीमुळे व उक्तीमुळे आले आहे, त्यांनाही याबाबतीत आपली जबाबदारी चुकवता कामा नये.

मुंबई काँग्रेसच्या चौपाटीवरील सभेत महाराष्ट्राला पाच हजार वर्षे मुंबई मिळणार नाही, असे बजावण्यात आले व संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या नेत्यांची संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या नेत्यांची नालस्ती करण्यात आली. हे सर्व प्रकार ना. मोरारजीभाई यांच्या हजेरीत झाले. दिल्लीने या सर्व गोष्टी डोळे उघडून पाहिल्या व खुल्या मनाने समजावून घेतल्या तर मराठी भाषिक लोक इतक्या प्रक्षोभक वातावरणात इतका संयम पाळतात. यामुळेच दिल्ली थक्क होईल महाराष्ट्राला न्यायाची भूक आहे व ती भूक भागविणे हे दिल्लीचे कर्तव्य होय. तो कार्यभाग साधताच महाराष्ट्रा इतका सभ्य, एकनिष्ठ, त्यागी व शूर सहकारी नाही, अशी खात्री दिल्लीची पूर्ववत पुढेही कायम राहील.''[५८]

अशा प्रकारे मर्मभेदी लेख 'नवाकाळ' वृत्तपत्राने लिहिला. 'नवाकाळ' वृत्तपत्राने संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनास पाठिंबा देत अनेक अग्रलेख लिहिले. 'कडेकोट बंदोबस्तातील चौपाटीची सभा', 'लोकसभेत मुंबईसह महाराष्ट्राची मागणी', 'सामुदायिक आत्मयज्ञाचा श्रीदेवाचा मार्ग', 'मुंबईपुढे पाच वर्षांचा विषाचा पेला', 'मुंबईसह महाराष्ट्र आणि फलखतवाले', 'मुंबईची वेळ निघून गेली', 'मुंबईच्या वाटाघाटी सुळावर चढल्या' अशा एक ना अनेक अग्रलेखातून 'नवाकाळ'ने संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात आपल्या लेखनीच्या सहाय्याने समाजास आंदोलनाने साथ दिली.

### मुंबई केंद्रशासित :-

१५ जानेवारी १९५६ रोजी केंद्र सरकारने नभोवाणीवरून तीन राज्यांऐवजी दोन राज्ये, विदर्भासह महाराष्ट्र आणि गुजरात अशी दोन राज्य व मुंबई केंद्रशासित प्रदेश राहील, असा संदेश साऱ्या देशात दिला. संतप्त झालेली मुंबईची जनता निदर्शनासाठी रस्त्यावर उतरली. निदर्शकांवर कठोर कारवाईचे आदेश देण्यात आले होते. गोळीबारात एक निष्पाप विद्यार्थी ठार झाला. दुसऱ्या दिवशी जनतेने उत्स्फूर्त बंद पाळला. पहाटेपासूनच संयुक्त महाराष्ट्र नेत्यांची अटक सुरू झाली. कॉ. डांगे, सेनापती बापट आधीच गजाआड झाले होते. 'शूट टू किल'चा हुकूम देण्यात आला होता. मुंबईला लष्करी छावणीचे स्वरूप आले होते. १६ जानेवारी ते २३ जानेवारी १९५६ या एक आठवड्यात पोलिसांच्या गोळीबाराचे पाशवी थैमान सुरू होते. या सात दिवसांत ४४२ वेळा गोळीबार करण्यात आला. त्यात ९० मृत्यू तर ४०० हुन अधिक

जखमी झाले. मुंबई शांत होण्याची चिन्हे दिसत नव्हती. संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला होता. या आंदोलनाचे रौद्र रूप पाहून महाराष्ट्र कॉँग्रेसचे नेते हादरून गेले. विधानसभेत या गोळीबाराच्या चौकशीची मागणी सुध्दा हुकूमशहा मोरारजी देसाई सरकारने फेटाळून लावली. स्वातंत्र्य मिळवून अवघी ९ वर्षे होत नाहीत, तोच एवढे भयंकर क्रौर्य मराठी भूमीपुत्रांच्या वाट्याला आले.

२५ जानेवारी १९५६ च्या अग्रलेखात 'नवाकाळ' वृत्तपत्राने 'वर्किंग कमिटीचा आततायी ठराव' या शिर्षकाखाली अग्रलेख लिहिला.

'चौकशीशिवाय मुंबईला फाशी'

''कॉँग्रेस वर्किंग कमिटीने आपल्या मुंबई–महाराष्ट्रातील घटनांचा जहरी असा ठराव केला असून देशाचे स्वातंत्र्य अबाधित राखण्याचा आदेश दिला आहे. कॉँग्रेस व देशाचे स्वातंत्र्य धोक्यात असल्याचा डांगोरा या गोष्टी गृहीत धरून वर्किंग कमिटीने पिटला आहे. त्या गृहीत गोष्टीच एकांगी व पक्षपाती आहेत, असे निर्विकर दृष्टीच्या कोणी भातीयास वाटल्यावाचून राहणार नाही. मुंबईचे दंगे होऊन प्राणहानी व वित्तहानी झाली आणि महाराष्ट्र कॉँग्रेसने राजीनाम्याचा पवित्रा घेतला याबद्दल वर्किंग कमिटी अडकलेली असून शिक्षा जाहीर करण्यापूर्वी सर्वांगीण चौकशी करण्याचीही जरूरी वर्किंग कमिटीला वाटली नाही, असे म्हणणे भाग आहे.''[५९]

पुढे 'नवाकाळ' वृत्तपत्राने वर्किंग कमिटीने दंगलीत ठार झालेल्या आणि जखमी झालेल्या व तुरुंगात अटक असलेल्या जनतेची साधी सहानुभूतीपूर्वक दखलही घेतली नसल्याबद्दल खंत व्यक्त केली.

मुंबईत दंगल होऊन गोळीबारात १०५ लोक ठार झाले. त्या दंगलीची चौकशी सरकारने निःपक्षपाती करावी यासाठी मुंबईतील जनता वाटच पाहत होती.

'नवाकाळ' वृत्तपत्राने याबाबत 'शहीदनगरात महाराष्ट्र कॉँग्रेसची धिंड', 'संयुक्त महाराष्ट्रासाठी असहकार सत्याग्रह', 'मुंबईच्या जखमा भरून काढण्यासाठी जाहीर सत्याग्रह', 'संयुक्त महाराष्ट्राला एकमुखी नेतृत्व पाहिजे', 'राज्य पुनर्रचना न म्हणा धाकुली', 'पोलीस

डोले मुख्यमंत्री बोले!', 'सर्वामुखी मागणी चौकशीची', 'आधी प्रकारची चौकशी आणि द्या मुंबईला फाशी', अशा प्रकारी अग्रलेख मालिकाच 'नवाकाळ' वृत्तपत्राने फेब्रुवारी १९५६ सालच्या महिन्यात छापून काँग्रेस कमिटी व प्रशासनावर दबाव आणण्याचेच समाजामध्ये लोकशाहीच्या हक्कांची जाणीव करणारे लेख मांडून खऱ्या अर्थाने समाजात पुन्हा एकदा नवचैतन्य जागवले.

**संयुक्त महाराष्ट्र परिषद शंकरराव देवांची घोषणा :–**

ऐनवेळी परिषद बरखास्त करून शंकरराव देवांनी चळवळीतून माघार घेताच लढा पुढे चालू ठेवण्यासाठी एस.एम. जोशी यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त महाराष्ट्र समिती उदयास आली. मुंबईतल्या गोळीबाराचे पडसाद दिल्लीतही उमटले. अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख यांनी मुंबई केंद्रशासित करण्याच्या विरोधात आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. मातृभूमीच्या प्रेमापोटी मराठी माणसाच्या घटनेने दिलेल्या न्याय हक्कासाठी नागरी स्वातंत्र्याची गळचेपी करणारे प्रश्न लोकसभेत त्यांनी आपल्याच सरकारसमोर उपस्थित करून नेहरुंसह सर्व सभागृहाला त्यांनी अचंबित करून सोडलं. या प्रसंगाने लक्षावधी मराठी जनतेत क्रांतीचे स्फुल्लिंग चेतवले.

कम्युनिस्ट,समाजवादी,प्रजासमाजवादी,शेतकरी कामगार संघटना,सोशालिस्ट असे अनेक पक्ष आपापसातील भेद, पक्षीय प्रतिमा बाजूला ठेवून अखंड महाराष्ट्रासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या झेंड्याखाली एकत्र आले. या लढ्यात तरुणांनी आहुत्या दिल्याच परंतु अहिल्या रांगणेकर, विमल रणदिवे, गोदावरी परूळेकर अशा अनेक महिलांनी या लढ्याचं नेतृत्व केले. गोळी व तुरुंगवास यासारख्या कशाचीही तमा न बाळगता लढ्यात सक्रिय सहभाग घेतला. आचार्य अत्रे आपल्या घणाघाती भाषणात सरकारवर प्रहार करत होते.

'मुंबईला काळ्या पाण्याची सजा' या अग्रलेखात 'नवाकाळ' वृत्तपत्राने 'अंदमानच्या पंगतीला मुंबई' अशा मथळ्याद्वारे म्हणतात–

''मुंबई केंद्रशासित ठेवण्याची व्यवस्था म्हणजे मुंबईला काळ्या पाण्याची सजाच मानली जावी यात नवल नाही. मुंबईला कोणत्याच प्रादेशिक कायदेमंडळात स्थान नसल्यामुळे तेवढ्यापुरता मतदानाचा व आपले मत व्यक्त करण्याचा मुंबईचा हक्क त्यायोगे संपुष्टात येत

आहे आणि मुंबईचा लोकशाही हक्काचा त्या प्रमाणात संकोच होत आहे. लोकसभेत तीन व राज्यसभेत दोन प्रतिनिधी मुंबईत पाठवू शकेल. पण त्यांचा आवाज तेथे कुठल्या कुठे लुप्त होईल, ते सांगताही येणार नाही. मुंबई हे भारतातील अग्रगण्य शहर आणि मोठ्या राज्याच्या राजधानीची मोर्चेले या शहरावर ढाळली गेली आहेत. पण मुंबई महाराष्ट्रात जाऊ द्यावयाची नाही, या केवळ अट्टहासामुळे व त्यायोगे महाराष्ट्रावर व मुंबईवर अन्याय होत आहे, याची जाणीव भारत श्रेष्ठींनी प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने व्यक्त केलेली असतानाही मुंबईला केंद्रशासित व्यवस्थेची काळ्या पाण्याची शिक्षा या बिलात ठोठावण्यात आली आहे.''[६०]

## 'चलो दिल्ली' संयुक्त महाराष्ट्र समितीचा सत्याग्रह :–

संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे दिल्लीत सत्याग्रह करण्यात आला. दिनांक २२ एप्रिल १९५६ रोजी 'चलो दिल्ली पुकारीत महाराष्ट्रातून निघालेले सत्याग्रही' या मथळ्याने 'नवाकाळ' वृत्तपत्रामधून बातमी प्रकाशित झाली. विविध ठिकाणांहून या सत्याग्रहात सामील होण्यासाठी सत्याग्रही स्वयंसेवक जात होते. बोरीबंदर येथून दिल्लीला जाणाऱ्या सत्याग्रहींना निरोप देण्यात येणार याबाबतची माहिती देण्यात आली.

''मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र समितीचे चिटणीस मधु दंडवते यांनी दिल्ली येथे लोकसभेपुढे होणाऱ्या सत्याग्रहाबाबत पुढील पत्रक प्रसिध्द केले आहे. संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे दिल्ली येथे लोकसभेपुढे ता. २४ एप्रिल रोजी महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागातून येणाऱ्या सत्याग्रहीचा एक जथा सत्याग्रह करील. पुण्याहून दिल्लीच्या सत्याग्रहासाठी येणारी तुकडी उद्या सकाळी ११।। च्या गाडीने बोरीबंदर स्टेशनवर पोहोचेल. स्टेशनवर संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने सत्याग्रहींचे स्वागत करण्यात येईल.''[६१]

२२ एप्रिल १९५६ रोजी 'चलो दिल्ली'च्या घोषणा देत अनेक सत्याग्रही मुंबई, बेळगाव, नागपूर इत्यादी भागातून दिल्लीकडे सत्याग्रहासाठी निघाले. २७ जुलै १९५६ रोजी महाराष्ट्रातून आलेल्या सत्याग्रहींनी संसदेवर मोर्चा नेला. मुंबई ही पुढील पाच वर्ष केंद्रशासित राहील व जशी परिस्थिती निवळेल. त्यानंतर पुढे त्याचा निर्णय घेऊ अशी नेहरू व कॉंग्रेसचे मत होते. पण इतका कडवा प्रतिकार झाल्यावर केंद्र सरकारने ऑगस्ट १९५६ मध्ये मुंबई

केंद्रशासित करण्याचा निर्णय रद्द केला व १ नोव्हेंबर १९५६ रोजी मुंबई राज्य, गुजरात, कच्छ व सौराष्ट्र व विदर्भाचा समावेश करून द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना केली.

लोकसभेत बहुमताच्या जोरावर पुन्हा एकदा नेहरुनी महाराष्ट्राच्या वाट्याला मोठा प्रश्न निर्माण केला. त्या वेळी 'नवाकाळ' वृत्तपत्राने निवडणुकीच्या तोंडावर महाराष्ट्रात पुन्हा एकदा चळवळ उभी करण्यासाठी अनेक अग्रलेख प्रकाशित केले. लोकसभेतील बहुमताच्या जोरावर नेहरुनी द्विभाषिक राज्यनिर्मिती केली तेव्हा ते म्हणतात, 'द्विभाषिकासाठी उचल्यांनी कंबर कसली'. तसेच 'अशोक मेहतांचे द्विभाषिक राज्य' व 'राज्य पुनर्रचनेतील अदृश्य शक्ती व भुताटकी', 'जो गुण द्विभाषिक बाळा तो जन्मा काळा', या अशा विविध अग्रलेखातून जागृती निर्माण केली.

**गुजरातची दंगल :-**

'द्विभाषिक राज्यनिर्मिती' या निर्णयाविरुध्द गुजरातमध्येही असंतोष निर्माण झाला. तेथे हिंसक घटना घडल्या. दंगल झाली. काँग्रेसविरुध्द वातावरण निर्माण झाले. पोलीस कारवाईत गोळीबारात ७ ठार तर १०० जखमी झाले, असे 'नवाकाळ' वृत्तपत्रामध्ये 'द्विभाषिकपिकला अहमदाबाद येथे रक्ताभिषेक' या अग्रलेखात म्हटले होते.

''अहमदाबादच्या दंगलीमुळे गुजरात काँग्रेस नेत्यांच्या मुखावरचे हसणे करपून काळे ठिक्कर पडले आहे आणि गोळीबारामुळे संबंध भारताच्या अंगावर शहारे आल्याशिवाय राहणार नाहीत. अहमदाबादचा गोळीबार अतिरेकी स्वरूपाचा झाला की दंगलच तितकी भीषण होती व पोलीस अत्यंत संयमाने वागले? लोकांचा प्रमाद किती व अधिकाऱ्यांचा अतिरेक किती याची ताबडतोब चौकशी झाली पाहिजे, अशा सार्वत्रिक मागण्या आहेत. मुंबईचा गोळीबार पचविण्यात आला. आता अहमदाबादला तरी तात्काळ चौकशी झाली पाहिजे. विशेषतः द्विभाषिक जे येऊ घातले आहे, त्याच्या दृष्टीने अशी चौकशी ताबडतोब झाली पाहिजे व नवे द्विभाषिक म्हणजे जरा खुट्ट होताच मुडदे पाडणारा कत्तलखाना नव्हे एवढी तरी लोकांची खातरजमा झाली पाहिजे. द्विभाषिकांची घोषणा होताच या द्विभाषिकावर अहमदाबादला रक्ताभिषेक झाला आणि त्याबाबत किमान पक्षी तत्काळ चौकशी झाली...''[६२]

पुढे 'द्विभाषिकाविरुध्द गुजरातचा रुद्रावतार'

या अग्रलेखातून गुजरातमधील दंगली व गोळीबाराबद्दल 'नवाकाळ' वृत्तपत्राने लेख लिहिले.

तसेच 'द्विभाषिक मुंबई राज्याची कोलांटउडी' 'डळमळीत द्विभाषिक आणि महाराष्ट्र' व 'नागपूर वऱ्हाडच्या सवाष्णी सजल्या' अशा अनेक अग्रलेखातून 'नवाकाळ' वृत्तपत्राने द्विभाषिक मुंबई राज्य निर्मिती विरुध्द आवाज करून जनतेपर्यंत नेला.

'मुंबईच्या पैशाच्यविवाहाची तयारी' या लेखात त्यांनी मुंबई–महाराष्ट्र आणि गुजरात यांचे जबरदस्तीने तयार केलेले राज्य हे एका 'पैशाचा विवाह' असा जळजळीत मथळ्याखाली 'नवाकाळ' वृत्तपत्राने लेख लिहिला.

**महाराष्ट्र राज्याची स्थापना :–**

११ डिसेंबर १९५६ च्या 'नवाकाळ' वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर 'संयुक्त महाराष्ट्राची निष्ठा आज मतदानाने जाहीर करा' अशी बातमी वजा आव्हान मतदारांना केले. पुढे 'विरोधी पक्षांनी मिळून स्थापन केलेल्या 'संयुक्त महाराष्ट्र समिती' या आघाडीच्या प्रयत्नातून मार्च १९५७ च्या विधानसभेतील निवडणुकीत दणदणीत यश संपादन केले व संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी जनमत निर्माण केले. पुढे ३० नोव्हेंबर १९५७ रोजी नेहरू प्रतापगडावर शिवरायांच्या पुतळयाचे अनावरण सोहळ्यात आले असताना संयुक्त महाराष्ट्र समितीचे नेते अनेक सामाजिक, राजकीय नेत्यांनी, समाजाने त्यांना महाद्विभाषिक विरोधास काळे झेंडे दाखवून निषेध केला. या सर्व चळवळीत मोलाची कामगिरी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, क्रांतीसिंह नाना पाटील, आचार्य अत्रे, एस.एम. जोशी, कॉ. डांगे, सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे, कॉ. मिरजकर, दादासाहेब गायकवाड, गुलाबराव गुणाचार्य अशा अनेक नेत्यांनी आपले तनमनधन महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी अर्पण केले.

''विशाल द्विभाषिक राज्य' निर्मितीस मोठ्या प्रमाणात विरोध झाल्यावर अखेर मराठी–गुजराती भाषकांसाठी १९५६ मध्ये स्थापन केलेल्या एकाच विशाल द्विभाषिक मुंबई राज्याचे विभाजन केले गेले. त्यातून महाराष्ट्र व गुजरात राज्याची निर्मिती करण्यात आली. याबाबत

'नवाकाळ' वृत्तपत्राने दिनांक २१ एप्रिल १९६० रोजी 'द्विभाषिक राखेतून महाराष्ट्र गुजरात' हा अग्रलेख प्रकाशित केला. त्यामध्ये खाडिलकर म्हणतात,

'द्विभाषिक मुंबई राज्याचे पतन मंगळवार रोजी लोकसभेत होऊन नवे महाराष्ट्र व गुजरात राज्य अस्तित्वात आणणारे पुनर्रचना बिल जवळजवळ एकमताने मंजूर झाले आहे. द्विभाषिक मुंबई राज्याला कम्युनिस्टांखेरीज साऱ्या लोकसभेने मान्यता दिली होती आणि लो. अणे यांचा एकुलता एक अपवाद वगळला तर सर्वपक्षीय पाठिंब्याने महाराष्ट्र गुजरात राज्ये लोकसभेने पाळण्यात घातली आहेत. नवराज्य निर्मितीच्या या संस्काराच्या वेळी पं. पंत लोण्याहून मऊ व साखरेहून गोड होते. महाराष्ट्र व गुजरात ही नावे गोड आहेत, असे कौतुक त्यांनी केले. शिवजयंतीला महाराष्ट्र निर्माण होऊ शकला असता तर आवडले असते, असे त्यांनी सांगितले आणि ता. १ मे या दिनाचे आंतरराष्ट्रीय महात्म्य कॉ. डांगे यांनी जे सांगितले होते ते कॉ. डांगे यांच्या गळ्यात अडकवून ता. १ मे चा मुहूर्त त्यांनी कुरवाळला. पाठिंब्यास पुनर्रचना बिल पास झाले आहे, ही गोष्ट त्यांनी पुन:पुन्हा उगाळली. बिलातील काही गोष्टी दाहक असल्या तरी महाराष्ट्र–गुजरात निर्मिती डोळ्यांसमोर धरून मुंबई कायदेमंडळानी बिलास मान्यता दिली. तशीच अवघड व अशुध्द मनःस्थितीत लोकसभेतही कम्युनिस्टासकट सर्वोच्च अनुकूलतेने महाराष्ट्र–गुजरात राज्य निर्मितीस मान्यता मिळाली आहे.''[६३]

१ मे १९६० च्या पहाटे मुंबईच्या राजभवनात भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या उपस्थितीत शासकीय सोहळा आयोजित केला गेला व त्यात महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्याची अधिकृतपणे घोषणा केली गेली. याच दिवशी दुपारी मुंबईच्या नव्या सचिवालयाच्या आवारात मंत्रिमंडळाच्या शपथविधीचा कार्यक्रम झाला व यशवंतराव चव्हाण यांना तत्कालीन राज्यपाल श्री. प्रकाश यांच्याकरवी मुख्यमंत्रीपदाची शपथ देण्यात आली. या नवमहाराष्ट्र निर्मितीबाबत 'नवाकाळ' वृत्तपत्राने दि. १ मे १९६० च्या अंकात 'नवमहाराष्ट्राचा उदय व जय जय' या अग्रलेखातून आपले विचार मांडले,

''काल मध्यरात्री पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हातून महाराष्ट्र राज्याच्या नकाशावर प्रकाशझोत टाकण्यात येऊन महाराष्ट्राच्या भाग्यरेषा व या प्रकाश झोतात उजळल्या आणि आज दुपारी सचिवालयात राज्यपालांच्या हस्ते ध्वजारोहण व महाराष्ट्र राज्योत्सवाची

सांगता होत आहे. महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी' होऊन मुंबईसह महाराष्ट्र साकार होत आहे आणि मराठी भाषिक हा मराठी राज्याचा नागरिक बनत आहे, याचा आत्यंतिक आनंद आज सर्व मराठी भाषिकाप्रमाणेच आम्हाला होत आहे आणि मनोरथसिध्दीचे अतीव समाधान आम्हाला होत आहे. मुंबईसह आणि विदर्भासह महाराष्ट्र हा वाद कित्येक वर्षांचा आहे. या वादात पाट्या पालटल्या, भिडू बदलले. कित्येकदा दोन बुबळे तर कित्येकदा थिटे पडले, या वादात कोणी वाट पाहिली तशी पाठ दिली, कोणी उलटसुलट उड्या मारल्या. कोणी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा वेग व तेज असह्य होऊन सर्वदयाम पत्करला. तर कोणी वनवास, अज्ञातवास व तुरुंगवासही पार पाडला, कोणी गनिमी काव्याने द्विभाषिकाच्या पोटात शिरून त्याचा कोथळा बाहेर काढला आणि अखेर मुंबई विदर्भास महाराष्ट्र आज प्रत्यक्षात आला आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची कोणत्याही काळात व कितीही अल्पस्वरूप सेवा ज्यांनी आपापल्या पध्दतीने केली आणि असिधारा व्रताप्रमाणे या चळवळीशी जे अखेरपर्यंत एकनिष्ठ राहिले, त्या सर्वांना आजच्या नव्या महाराष्ट्र राज्याचे श्रेय आहे. मराठी माणूस या सर्वापुढे नतमस्तक आहे आणि या सर्वांचा ऋणी आहे.''[६४]

अशा प्रकारे १ मे १९६० रोजी मराठी भाषकांच्या मागणीनुसार राजधानी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. त्याच दिवशी स्वतंत्र गुजरात राज्यही अस्तित्वात आलं.

''१७ जानेवारीपासून तो २२ जानेवारीपर्यंत मुंबईमध्ये ज्या हिंस्र आणि अत्याचारी घटना झाल्या त्यांनी सारे भारतवर्षच नवे तर सारे जग हादरून गेले. इंग्लंड-अमेरिकेच्या वृत्तपत्रांमध्ये मोठमोठ्या मथळ्याखाली या दंग्यांच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या. आणि त्या 'अमानुष आणि राक्षसी' दंग्यांचे खापर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या पुढाऱ्यांवर आणि मुंबईतल्या सर्वसाधारण मराठी जनतेच्या डोक्यावर फोडण्यात आले. मुंबईमधल्या सर्व इंग्रजी आणि गुजराती वृत्तपत्रांनी या दंग्याच्या वाटेल तशा भडक, खऱ्या-खोट्या आणि अतिशोक्ती बातम्या छापून संयुक्त महाराष्ट्रवाद्यांना आणि मराठी जनतेला झोडपण्याचा नुसता सपाटाच चालविला. आणि त्यांच्याच छापील प्रचाराचे पडसाद भारतात आणि भारताबाहेर उमटू लागले. या प्रचाराचा प्रतिकार वस्तुतः मराठी वृत्तपत्रांनी करावयास हवा होता. पण मुंबईमधल्या 'नवाकाळ'खेरीज आणि पुण्यामधल्या 'प्रभात'खेरीज बहुतेक सर्व मराठी वृत्तपत्रांनी याबाबतीत

'अपराधी मनोवृत्ती'चे प्रदर्शन करून आपापल्या माना आणि शेपट्या खाली घातल्या.''[६५]

'कऱ्हेचे पाणी' या आत्मवृत्तात लेखक व संयुक्त महाराष्ट्राचे नायक, लोकनेते आचार्य अत्रे यांनी 'नवाकाळ' वृत्तपत्राबद्दल उल्लेख केला आहे. त्यात त्यांनी वरील मजकुर लिहिला आहे.

साप्ताहिक – नवयुग, वृत्तपत्र – मराठा

थोडक्यात सयुंक्त महाराष्ट्र आंदोलनात 'नवाकाळ ' वृत्तपत्राने  ने खूप मोठी भूमिका बजावली जनतेचा आक्रोश त्यांनी आपल्या लिखाणाच्या माध्यमातून सरकारपर्यंत पोहचवला आंदोलनात आंदोलनकर्त्यांचे मत समाजापर्यंत पोहचवून त्यांना जागृत करण्याचे काम केले.

## ५.१४ गोवा मुक्ती चळवळ :–

सुमारे ४५० वर्ष गोव्यावर पोर्तुगीजांचे राज्य होते. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही १४ वर्षें गोवा दीव, दमनचा भाग पोर्तुगीजांच्या ताब्यात होता. नंतर गोवा मुक्तीसाठी अनेक चळवळी होऊन नंतर भारत सरकारने सैनिकी कारवाईनंतर १९ डिसेंबर १९६१ रोजी गोवा पोर्तुगीजांपासून स्वतंत्र करून भारतात विलीन करण्यात आले. १९२८ सालापासूनच गोवा मुक्ती चळवळ आकार घेऊ लागली. मुंबई गोवा काँग्रेस समितीची स्थापना मुंबईत झाली. डॉ. टी.बी. कुन्हा यांच्या नेतृत्वाखाली गोव्यात भूमिगत कार्य सुरू झाले. इ.सन १९३९ ते १९४५ च्या दुसऱ्या महायुध्दाच्या काळात पोर्तुगीजसह सर्वच साम्राज्यवादी राष्ट्र सामर्थ्यक्षीण ठरू लागलं. १९४५ नंतर संपूर्ण जगाचीच पुनर्मांडणी होऊ लागली. त्यानंतरच्या काळात गोवा चळवळ अधिक तीव्र होऊ लागली. १९४६ ला स्वातंत्र्यलढा अंतिम टप्प्यात असताना काँग्रेसने गोवा स्वातंत्र्याविषयीचं धोरण स्पष्ट केलं आणि गोवा मुक्ती लढ्यात उघडपणे सहभाग सुरू केला.

### गोवा चळवळीला प्रारंभ :–

'गोव्यातील हिंदू बांधवास हिंदुस्थानात सामील होण्याची उत्कंठा' असा भाषणवजा लेख 'नवाकाळ' वृत्तपत्रामध्ये छापण्यात आला. बेळगाव नॅशनल काँग्रेसमध्ये अध्यक्ष स्वागताध्यक्षांची भाषणे. अध्यक्ष जी.एस.बी. डिसिल्वा पुढीलप्रमाणे वक्तव्य करतात.

''गोमांतकाच्या राजकीय चळवळीच्या इतिहासात १८ जून १९४६ हा मंगल दिन महत्वपूर्ण होय. या दिवशी डॉ. राममनोहर लोहियांनी भाषणबंदीचा कायदा मोडून जनतेत आत्मविश्वास निर्माण केला.

२२ मे १९२६ रोजी पोर्तुगीजांच्या राज्यकारभारात फॅसिझमचा प्रादुर्भाव झाला व हळूहळू गोमांतकातील मुद्रण स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य यासारख्या जनतेच्या मुलभूत हक्कांवर गद आली. अन्नधान्याच्या व वस्त्राच्या अव्यवस्थित व विषयवाटणीमुळे जनता अन्नान्न दिशेला पोचली होती. आणि सरकारच्या कुरमंडक वृत्तीच्या अन्यायामुळे गांजलेली होती. पोर्तुगीज राजवटीच्या दीर्घकालीन दास्यामुळे जनता हैराण झाली होती.

स्वातंत्र्यसंग्रामाची तयारी हळूहळू पण निष्ठेने सुरू होती. खादी प्रचार, हिंद शिक्षण, अस्पृश्यतानिवारण आणि विधायक कार्यक्रम गोमांतकाच्या भूमीत रूजत होते. परंतु पोर्तुगीजांच्या पाशवी सत्तेवर प्रहार करून जनतेत आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयोग डॉ. लोहिया यांनी भाषणबंदी कायदा मोडून केला  व पोर्तुगालचे साम्राज्यवादी चाळे जगापुढे आणले.

गोमांतक भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि इतर सर्वदृष्ट्या हिंदुस्थानचाच एक अविभाज्य भाग असताना केवळ राजकीयदृष्ट्या पोर्तुगीज सत्तेखाली असल्यावरून तो पोर्तुगालचाच भाग असल्याचा सरकारने कांगावा सुरू केला व डॉ. लोहिया व इतर हिंदी बांधवांना परके मानून त्यांच्यावर प्रवेशबंदीचा हुकूम बजावला.

क्रूर अधिकारी

पोर्तुगीज येण्यापूर्वी गोवा वैभवपूर्ण होते. पण आता तो दारिद्र्यावस्थेत पोचला आहे. आधुनिक रझाकारांनी ज्याच्यापासून क्रौर्याचे धडे घ्यावेत असे क्रूरकर्म पोर्तुगीजांनी गोमांतकात पाठवून संस्कृतीविच्छेदनाची मोहीम सुरू केली. स्त्रियांवर बलात्कार केले. शेकडो बालकांना जळत्या आगीत फेकून दिले. हजारो ग्रंथ भस्मसात केले. शेकडो देवळे जमीनदोस्त केली. पोर्तुगीज भागात न मानणाऱ्याचे सर्व हक्क काढून घेतले व त्यांना विवाह करण्यास बंदी केली.

पोर्तुगीज हिंदुस्थानातील इतिहास काळाकुट्ट, नीच, निंद्य कृत्यांचा मनोरथ होय. तो जाणून घेतला म्हणजे लाजेने मान खाली घातल्याशिवाय गत्यंतर उरत नाही.

५ ऑक्टोबर १९१० रोजी पोर्तुगालातील राजेशाही नष्ट होऊन रिपब्लिक स्थापन झाले व सन १९१७ पासून थोडाफार राजकीय हक्कही गोमांतकांना मिळाले. या काळात गोमांतकात सामाजिक चळवळीचा जन्म झाला व गोमांतकीय जनता संघटीत होऊ लागली; परंतु या कार्याला १० वर्षे होतात न होतात तोच पोर्तुगालात हुकूमशाही राजवट आरूढ झाली व गोमांतकाला किंचितकाळ लाभलेले हक्क सुध्दा हिरावून घेण्यात आले.

या सरकारने १९३३ साली नवीन कायदा पास करून गोरा, काळा व निमगोरा असे जनतेत भेद पाडले व बऱ्याच प्रकारच्या सरकारी नोकऱ्या व राज्यकारभाराची असे अंगे यामधून काळ्याबरोबरच निमगोऱ्यांचाही शिस्ताने हकालपट्टी केली.

**दडपशाहीस ऊत :–**

१८ जून १९४६ च्या आंदोलनानंतर पोर्तुगीजांच्या दडपशाहीस ऊत आला. भाषणबंदीचा अन्यायी कायदा मोडून भाषण करणाऱ्यांना ८/९ वर्षांची शिक्षा देऊन त्यांना पोर्तुगीजांच्या पेनीरा येथील किल्ल्यात ठेवण्यात आले. गांधी टोपी वापरण्याच्या अपराधाबद्दल मारपीट करण्यात येऊ लागली. 'जय हिद' म्हटल्याबद्दल कुलीन स्त्रिया व मुली यांच्यावर हात टाकण्यात आले. या साऱ्या जुलमाला संघटितरीत्या प्रतिकार करण्यासाठी दिनांक १८ ऑगस्ट १९४६ रोजी लोढा येथे गोमंतकीय कार्यकर्त्यांचा एक मेळावा जमला व तेथे 'नॅशनल काँग्रेस गोवा' या संस्थेचा जन्म झाला व सनदशीररीत्या सत्याग्रह करून मुलभूत नागरिक हक्क मिळवण्याचे ठरविण्यात आले.

तदनंतर जे आंदोलन झाले त्यामुळे दिनांक २ सप्टेंबर १९४६ रोजी पंडित नेहरुनी हंगामी मंत्रिमंडळ बनविल्यामुळे पोर्तुगालमध्ये पार्लमेंटमध्ये विचारविनिमय करून त्याच सालच्या डिसेंबर महिन्यात 'गोमंतक ही वसाहत नसून राज्य आहे', अशी घोषणा पोर्तुगीज वसाहतमंत्र्यांनी केली व त्याला आपली 'घटना' बनविण्याचा अधिकार आहे, असे जाहीर केले. कालांतराने पोर्तुगीज सरकारने आपल्या घटनेचे खरे स्वरूप बदलले व त्याला जुजबी

सुधारणांचा दर्जा दिला आणि खरोखरच गोवा पोर्तुगीजांचे व काळ्या अधिकाऱ्यांचे सैन्य गोमांतकात पाठवून दिले. हे सैन्य बेळगाव व पणजी यांना जोडणाऱ्या मार्गातील प्रमुख शहरात मोक्याच्या ठिकाणी ठेवण्यात आले.

नागरिक स्वातंत्र्यासाठी सत्याग्रह केले त्यांना सरकारने बंडखोर ठरवून ८–८ वर्षांच्या शिक्षा दिल्या. असे सरकारने ठरवील म्हणून गोमांतकाच्या हिंद साम्राज्यात अंतर्भाव करून घेणे हेच आपले ध्येय असल्याचे नॅशनल काँग्रेसला ठरवावे लागले.

पुढील भाषणात ते म्हणाले की, हिदुस्थानात सामील झाल्यानंतर गोमांतकाचे भौगोलिक, राजकीय, आर्थिक परिस्थिती राज्यकारभाराची सोय व सर्वांना अनुसरून गोमांतकीय जनतेची इच्छा लक्षात घेऊन हिद सरकारने ठरवायचे आहे. माझ्या दृष्टीने विचार केल्यास गोमांतकीय निश्चित स्थान संयुक्त महाराष्ट्रात आहे, हे स्वयंसिध्द आहे. गोमांतक हा संयुक्त महाराष्ट्राचा भाग आहे.

हिंदी संघराज्याच्या नवीन घटनेप्रमाणे सर्वांना समान नागरिकत्वाचे संपूर्ण हक्क आहेत. अखिल भारतभूमीच्या उत्कर्षातच गोमांतकाचा उत्कर्ष असल्याने आपण राजकीयदृष्ट्याही भारताचा विभाग होण्यासाठी निःसंदेहपणे राहिले पाहिजे. स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून स्वच्छेने, आनंदाने व स्वाभिमानाने त्यात प्रविष्ट व्हावे, अशी माझ्या गोमांतकीय बांधवांस मी विनंती करतो.''[६६]

अध्यक्ष, श्री. एस.बी. डिसिल्वा यांचे भाषण

या भाषणात पोर्तुगीजांची राजकीय व ऐतिहासिक पार्श्वभूमी व चळवळ याविषयी माहिती मिळते. 'नवाकाळ' वृत्तपत्र आपल्या लेखात चळवळीला व गोमांतक जनतेला म्हणतात, गोव्यातून पोर्तुगीज सत्ता बाहेर काढणे हे हिद सरकारचे काम आहे. तसेच हिद सरकार सगळे काही करील, अशा समजाने स्वस्थ बसावे अशा रीतीने स्वातंत्र्य मिळत नसते. स्वातंत्र्य काही आंदण किंवा वतन नव्हे ते नेहमीच घाम, रक्त आणि अश्रू यांचे मोल देऊन मिळवावे लागते. हाल आणि त्याग यांच्या मोबल्यातच स्वातंत्र्याची पात्रता मिळत असते. म्हणून आपण एकजूट केली पाहिजे, संघटना बळकट केली पाहिजे, विधायक कार्यक्रमांवर जोर लावून साऱ्या शक्ती

एका ध्येयाकडे केंद्रित केल्या पाहिजेत आणि हे साध्य होईपर्यंत घडतील ते कष्ट उपसायला आणि येतील ते हाल सोसायला सिद्ध झाले पाहिजे.''[६७]

## १९४६ पासून संघर्ष तीव्र व महाराष्ट्राचा सहभाग :–

१९४८ मध्ये डॉ. कुन्हा यांना ८ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झाली. नंतर शिक्षा कमी करून १९५३ साली सोडण्यात आले. तेव्हा त्यांनी 'आझाद गोवा', 'स्वतंत्र गोवा' ही वृत्तपत्र सुरू केली. या सर्व संघर्षात डॉ. कुन्हाची तब्येत खालावली व २६ सप्टेंबर १९५८ रोजी त्यांचे निधन झाले.

गोव्यातील स्थानिक नेते व कार्यकर्त्यांवर दडपशाहीचा बडगा उगारलेला असला तरी १९४६ ते १९६१ च्या दरम्यान गोव्यातील चळवळीसाठी गोव्याबाहेर अनेक समर्थ नेते व संघटना पुढे आलेली होती. राममनोहर लोहिया आणि त्याचप्रमाणे सांगलीचे वीर मोहन रानडे (मूळ नाव मनोहर आपटे) सत्याग्रहीच्या मोहिम आखण्यात अग्रेसर होते. रानडे यांनी 'आझाद गोमांतक दल' या स्थानिक संघटनेच्या साहाय्याने सशस्त्र हालचाली सुरू केल्या. एका पोलीस ठाण्यातील हल्ल्याच्या मोहिमेत ते जखमी झाले व १९६० पर्यंत त्यांना तुरुंगात राहावे लागले.

गोव्याबाहेर चळवळीची जी अनेक केंद्र निर्माण झाली त्यात मुंबई हे महत्वाचे केंद्र होते. गोवा मुक्ती चळवळ महाराष्ट्रातील चळवळीचा अविभाज्य घटक बनली होती. ना.ग. गोरे, शिरूभाऊ लिमये, सेनापती बापट, पीटर अल्वारिस, पंडित महादेवशास्त्री जोशी, सुधा जोशी, केशवराव जेधे, असे महाराष्ट्रातील अनेक नेते सत्याग्रहात उतरले. त्याकाळी महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र चळवळ सुरू होती. त्यामुळे गोवा मुक्ती आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीने सारा  महाराष्ट्रात सभा, चळवळी सुरू होत्या.

## फ्रेंच व पोर्तुगीज वसाहतीमध्ये सामील करण्याची चळवळ :–

मार्च १९५४ मध्ये गोव्यामध्ये डॉ. गायतोंडे यांना पोर्तुगीज सरकारने अटक केली. डॉ. गायतोंडे हे वंशाने हिंदी ऐतिहासिक परिस्थितीने पोर्तुगीज. पोर्तुगालमध्ये शिक्षण घेतलेले एका पोर्तुगाल महिलेशी विवाहबध्द असे आहेत. आपल्या मातृभूमीशी पुन्हा संयुक्त होण्याच्या दिशेने अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आपला लोकशाही हक्क बजावल्याबद्दल त्यांना पोर्तुगीज सरकारने

अटक करून त्यांना 'इंडिया' बोटीने पोर्तुगालकडे नेण्यात आले. त्यावरून भारतीय राजकारणात खूप मोठा असंतोष निर्माण झाला. पंडित नेहरुनी आपल्या निवेदनात 'सहनशीलता राखणे कठीण आहे,' असे म्हटले आहे तर 'नवाकाळ'ने आपल्या वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर 'भारतात गोव्यासारखा परकीय वसाहतींना स्थान नाही' व पुढील दुसऱ्या दिवशी 'गोव्याबद्दल राजकीय व हक्कांच्या गळचेपीमुळे भारतात चिंता,' अशी मुख्य बातमी छापून त्याविषयी सविस्तर घटनाच जनतेपुढे मांडून पोर्तुगीजांचा होणारा अत्याचार जगापुढे मांडला. लोकसभेतील एका प्रश्नाला उत्तर देताना पंडित नेहरुनी, 'सध्या गोव्यामध्ये जे प्रकार सुरू आहेत, त्यामुळे आजची सहनशीलता ढासळू लागली आहे,' असे म्हटले.[६८]

अॅड. गायतोंडे अटक प्रकरणी पोर्तुगालला नेहरू सरकारचा खरमरीत खलिता– या प्रकरणी भारत सरकारने निषेध केला असून गोवा जनतेस रीतसर लोकशाही व नागरी स्वातंत्र्य प्राप्त करून देणे आवश्यक आहे, याची जाणीव पोर्तुगीज अधिकाऱ्यांना होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. गोवा सरकारच्या वाढत्या दडपशाहीचे भारतात गंभीर परिणाम होतील, असा इशाराही या खलित्यात देण्यात आला.[६९]

गोवा : काही झाले तरी गोवा आम्ही सोडणार नाही. अॅग्लो पोर्तुगीज तहानुसार संरक्षणाची सर्व जबाबदारी ब्रिटनची आहे, असे पोर्तुगीज मि सालासार यांनी जाहीर केले होते. तर अॅग्लो–पोर्तुगीज किंवा बाहेरच्या राष्ट्रांनी गोवासंबंधाने केलेल्या ठरावांशी भारताचा काही संबंध नाही. भारतात यापुढे गोव्यासारखी कोणतीही परकीय वसाहत भारतात राहू देणे इष्ट नाही, असे नेहंरुचे मत होते.

**पाक–गोवे करार :–**

'नवाकाळ' वृत्तपत्राने आपल्या बातमीपत्रात पाक–गोवे कराराविषयी उल्लेख केला आहे. परस्परांना लष्करी मदतीसाठी पाक–गोवा तसेच तुर्की–पाक करार करण्यात आल्याचे म्हटले होते.[७०]

'नवाकाळ' वृत्तपत्राने 'गोमंतकातील परिस्थिती चिघळत चालली' या मथळ्याखाली लेख लिहून आपली चिंता व्यक्त केली. ते म्हणतात–

सहनशीलतेची कसोटी:-

''गोमंतकातील परिस्थिती ज्याप्रमाणे भारताच्या सहनशीलतेची कसोटी घेत आहे. त्याचप्रमाणे गोमंतकातील जनतेच्या सहनशीलतेची व तेथील सत्ताधाऱ्यांच्या शहाणपणाचीही कसोटी घेत आहे, असे म्हटले पाहिजे. गोमंतकात दडपशाही करावी लागते आहे. याचाच अर्थ तेथील जनता भारताशी एकजीव होण्याच्या उत्कंट इच्छेने दाटली आहे. भारतात परदेशी वसाहती असणे वस्तुस्थितीच विकृत आहे की कालच्या प्रवाहामुळे ती टिकून राहणे अशक्य आहे. आणि कोणतीही सत्ता ही लोकमत धुडकावून व दडपून आपले अस्तित्व फार काळ कायम ठेवू शकत नाही, असा इतिहासाचा धडा आहे.''[७१]

**१९५४ विलिनीकरणार्थ सामुदायिक उठाव :-**

गोव्यामध्ये सत्याग्रहींनी गोव्यातील निरनिराळ्या भागातून मिरवणूक काढल्या. सुमारे ४० ते ५० लोकांच्या दहा गटांनी पॉण्डेचेरी शहराच्या निरनिराळ्या भागातून फ्रेंचविरोधी घोषणा देत आणि भारताशी विलिनीकरणाची मागणी करत मिरवणुका काढल्या. 'जय हिंद'च्या घोषणा दिल्या. भारतीय ध्वजासहित निदर्शने केली. त्यात निदर्शकांना अटक करण्यात आली. तसेच परगण्याने पॉण्डेचेरीच्या पश्चिमेकडील २२ खेड्यांच्या मन्नादीपच्या फ्रेंच-भारत परगण्याचे एकांगी आपले स्वातंत्र्य जाहीर केले. कोणत्याही राजकीय पक्षाच्या व नेत्याच्या प्रत्यक्ष मदतीशिवाय फ्रेंचांची जुलमी राजवट झुगारून आपले स्वातंत्र्य जाहीर केलेला हा पहिलाच प्रदेश होता. वरील सत्याग्रहात ३५० सत्याग्रहींना फ्रेंच-भारत पोलिसांकडून अटक करण्यात आली. याविषयी 'नवाकाळ' वृत्तपत्राने फ्रेंच सत्तेची जुलमी वागणूक आपल्या बातमीद्वारे मांडली आहे. पुढे 'आततायी फ्रेंच-पोर्तुगीज सत्ताधारी' या अग्रलेखात फ्रेंच सत्ताधाऱ्या व अॅंग्लो पोर्तुगीज कराराविषयी तसेच ब्रिटिश राजकारणाविषयी लेख लिहिला.[७२]

**१८ जूनचा मुक्तिदिन :-**

''१८ जून मुक्तिदिन म्हणून मुंबई-पुण्यात साजरा करण्यात आला. मुक्ती दिनाच्या सभेत श्री. अशोक मेहता, काकासाहेब गाडगीळ, श्री. ना.ग.गोरे यांची भाषणे झाली. गोव्यात मुक्तिदिनाची पत्रके वाटण्यात आली. गोव्यात लहान-मोठ्या खेड्यात मुक्तिदिन गाजला. सुमारे

तीस कार्यकर्त्यांना पोलिसांनी पकडले ‘नवाकाळ’ने आपल्या ‘गोव्याची मुक्तिघटिका भरत आली’ अशा मथळ्याखाली अग्रलेख लिहिला. १८ जूनच्या मुक्तिदिनाने गोमांतकाला दडपशाही करू शकत नाही, असे दाखवून दिले असून मुंबई–पुण्यासारख्या शहरी व गोमांतकात मुक्तिदिनाचे जे ध्वनि, प्रतिध्वनी घुमले त्यावरून गोमांतक मुक्तीची घटिका भरत चालली असे दिसून येत आहे.’’[७३]

### दादरा नगरहवेली मुक्त :–

२९ जुलै १९५४ रोजी आझाद गोवा दलाच्या मुक्ती फौजांनी मुसळधार पावसात नहोलीवर कूच करून १० मिनिटात शहराचा ताबा घेतला. ४० स्वयंसेवकांनी त्यात भाग घेतला होता. पुढे २८ व २९ जुलै रोजी गोव्यात पीपल्स पार्टी व आझाद गोमांतक दल या गोव्यातील देशभक्तांच्या दोन संघटनांनी ठाणे जिल्ह्यातील नगर हवेलीच्या पोर्तुगीज अंमलाखालील प्रदेशाच्या मुक्ती रक्षणासाठी त्या प्रदेशावर चाल केली. ३ ऑगस्टपर्यंत आझाद गोमांतक दलाच्या स्वयंसेवकांनी सुमारे ८००० लोकवस्तीचा प्रदेश मुक्त केला.[७४]

ऑगस्ट १९५४ मध्ये गोव्यात परिस्थिती चिघळली. गोव्यात भरदिवसा गोळीबार करण्यात आला. त्यात आठ जणांना गोळी मारून गोवा सैनिकांनी ठार मारले. पोर्तुगीजांनी लढाऊ आरमारी जहाजे गोव्याकडे रवाना करण्यात आली. गोवा अधिकाऱ्यांनी गोवा उद्‌ध्वस्त करण्याची भाषा करत गोव्यातील लोकांत घबराटीचे वातावरण निर्माण केले. निग्रो सैनिकांनी अत्याचार केल्यामुळे अनेक गोवाकरांनी आपले गोवासोडून जाण्यास सुरुवात केली. गोव्यातील खेडी ओस पडू लागली. गोवा कारवार येथे सामुदायिक बैठक घेऊन तेथील चळवळीस संपूर्ण पाठिंबा देण्याचे ठरविण्यात आले. बेळगावलाही विद्यार्थ्यांनी जी सभा घडवून चळवळीला पाठिंबा देण्यात आला.[७५]

‘नवाकाळ’ वृत्तपत्राने ‘पोर्तुगीज वसाहतीला काळाची हाक’ या लेखात म्हटले–

‘‘भारतातील पोर्तुगीज वसाहती म्हणजे पोकळ डोलारा आहे. हे नगर हवेली व दादरा या वसाहतींनी दाखवून दिलेच आहे. डॉ. सालासार यांनी लिस्बन रेडिओवरून केलेल्या

भाषणाने पोर्तुगाल भौगोलिक व लष्करीदृष्ट्या गोमांतक राखण्यास असमर्थ आहे. अशी कबुलीच एक प्रकारे दिली आहे.''[७६]

आपल्या लेखात 'नवाकाळ'ने पोर्तुगीज राजकीय रणनीतीवर प्रखर प्रकाश टाकला. गोव्यात येणारा शस्त्रसाठा तसेच गोवा जाळून टाकण्याच्या रणनीतीवर जोरदार आक्षेप घेतला.

पुढे १९५४ च्या डिसेंबर महिन्यात पुण्यात केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखाली 'गोवा विमोचन सहाय्यक समिती'ची स्थापना झाली. ना.ग. गोरे व जयवंत टिळक त्याचे कार्यवाह होते. या समितीचे जाळं अल्पावधीतच महाराष्ट्रभर पसरले.[७७]

**गोवा चळवळ :–**

**देशभरातून सत्याग्रही गोव्यात प्रवेश**

१८ मे १९५५ रोजी नानासाहेब गोरे आणि सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रही गोव्यात गेले. पण त्यांना त्वरितच अटक करण्यात आली. तरीही त्यापाठोपाठ सत्याग्रहींच्या अनेक तुकड्यांचा ओघ सुरूच राहिला. पोर्तुगीज सरकारने सत्याग्रहींना मारहाण करणे, छळ करणे किंवा त्यांना मारून टाकणे, असे दमनचक्र सुरू केलं आणि त्यात अमीरचंद गुप्ता, नित्यानंद शहा, बापूराव थोरात आदी सत्याग्रही मृत्युमुखी पडले.

'गोवा चळवळीला दहशती वळण' या आपल्या लेखात पोर्तुगीजांची सत्ता व सत्याग्रहींचे झालेले छळ या लेखाद्वारे 'नवाकाळ'मध्ये मांडला.[७८]

९ ऑगस्ट १९५५ रोजी गोवा विमोचन समितीने काश्मीर ते कन्याकुमारी सर्व ठिकाणचे मिळून ५० हजार कार्यकर्ते १५ ऑगस्ट १९५५ रोजी गोव्यात प्रवेश करतील, अशी घोषणा केली.

या सत्याग्रहात जोश निर्माण करण्यासाठी 'नवाकाळ'ने आपल्या अग्रलेखात 'धर्मक्षेत्रे गोमांतक क्षेत्रे समावेला सत्याग्रहवीरा' या शीर्षकाखाली लेख लिहिला.

१५ ऑगस्ट १९५५ रोजी भाई विष्णूपंत चितळे यांच्या नेतृत्वाखालील ५०० सत्याग्रहींच्या पहिल्या तुकडीने गोव्यात प्रवेश केला. सत्याग्रहींना अमानुष मारहाण झाली. बेछूट

गोळीबार झाला. त्यात केशव गोरे, हिरवे गुरुजी, रमण त्यागीबाबा, कर्नलसिंग व त्याचप्रमाणे मंदा यालगी, कमला उपासनी, प्रभा साठे, शांता राव यांसह अनेक महिला सत्याग्रही धारातीर्थी पडल्या. या घटनेमुळे महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली. सर्वत्र हरताळ, मोर्चा काढण्यात सुरु झाले त्यात कऱ्हाडचे कम्युनिस्ट नेते राजाराम पाटील आणि त्यानंतर २९ सप्टेंबर १९५५ रोजी समाजवादी नेते ना.ग. गोरे यांना १० वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आल्यावर तर उद्रेकात भरच पडली. या काळात आचार्य अत्रे यांनी आपल्या दैनिक 'मराठा'तून जुलमी पोर्तुगीज सरकारविरुध्द आक्रमक पवित्रा घेतला होता. तसेच 'नवाकाळ'नेही या सत्याग्रहाच्या सर्व बातम्या व आपले लेख लिहून पोर्तुगीज सरकारविरुध्द लेख लिहिले.

१६ ऑगस्ट १९५५ सालच्या आपल्या बातमीपत्रात त्यांनी म्हटले–

'सत्याग्रहाच्या रक्ताने माखलेले गोमांतकीय पावन तीर्थ' या प्रमुख बातमीत संपूर्ण चळवळीचा वृत्तांत त्यांनी जनतेपुढे मांडला. पोर्तुगीज गोळीबारात २८ ठार, ८० जखमी तसेच गोव्यात झालेल्या चळवळी दडपण्यासाठी सत्याग्रहींवर कशा प्रकारे गोळीबार करण्यात आला व त्याचे सविस्तर चळवळीची माहिती त्यांनी आपल्या वृत्तात मांडली.[७९]

**गोवा स्वातंत्र्याचा लढा विलिनीकरणाने चालणार !**

सर्वपक्षीय गोवा–विमोचन समितीने एक मताने निर्णय घेतला. १९ ऑगस्टला १५०० सत्याग्रही गोव्यात प्रवेश करणार म्हणून 'नवाकाळ'ने बातमी छापली तसेच 'गोवा अत्याचाराची भारताला जखम' या लेखात संपादक म्हणतात, 'गोवा अत्याचाराबद्दल भारतात सर्वत्र संताप उसळावा व हुतात्म्यांच्या आदराने हृदय दाटून यावे हे अत्यंत स्वाभाविक आहे. पण पं. नेहरू म्हणतात त्याप्रमाणे पोर्तुगीज अत्याचारांनी भारताचा तोल जाता कामा नये व गोव्याबद्दलचा आपुलकीचा अत्यंतेचे वळण लागता कामा नये हे जितके ध्यानी बाळगावे तितके जरूरीचे आहे.' पुढे 'नवाकाळ'ने 'गोवा विमोचन होईपर्यंत सत्याग्रह' अग्रलेख लिहून सत्याग्रहात उत्साह निर्माण केला. पं. नेहरुनी सर्व पोर्तुगीज वकिलातीला भारत सरकारकडून बंदी जाहीर झाली. सत्याग्रहींना ठार मारण्यासाठीच पोर्तुगीज सरकारने गोळ्या घातल्या. भारत सरकारने पोर्तुगाल

सरकारला १५ ऑगस्ट १९५५ रोजी झालेल्या अमानुष धक्क्याविरुध्द खलिता पाठवला. डॉ. राजेंद्रप्रसादांनी आपल्या भाषणात गोवा लवकरच मुक्त होईल, अशी आशा व्यक्त केली.

गोवा भारतात व भारताचा एक भाग असून गोमांतकाची जीवनयात्रा सर्वतोपरी भारतावर अवलंबून आहे. भारताशी चाललेला चोरटा व खुला व्यापार–व्यवहार भारताशी खुली रहदारी आणि भारतात व्यापार–उद्योग करणाऱ्या गोमांतकात जाणारा पैसा यावर गोमांतकाचा योगक्षेम चाललेले आहे. पोर्तुगालने भारताशी गोव्याबाबत एकप्रकारे चढाईचे धोरण पत्करले आहे. आणि पाण्यात राहून माशाशी वैर करण्याच्या पोर्तुगीज घातकी धोरणाचे परिणाम निस्तरताना पोर्तुगीजांना पोर्तुगालही सावरू शकणार नाही, अशा प्रकारे 'नवाकाळ'ने वरील मजकूर आपल्या 'गोवा सत्तेभोवती भारताचा गळफास' या अग्रलेखात मांडला.[८०]

१८ फेब्रुवारी १९५५ रोजी 'नवाकाळ'ने गोमांतकीय तुरुंगातील कैद्याचे अमानुष हाल होत असल्याची १०० कैदी आहेत. अशा बातम्या छापून सरकारचे लक्ष वेधले. पुढे १९५८ रोजी च्या आपल्या अग्रलेखात 'गोव्याचा दुहेरी तुरुंग व हतबध्द भारत' या लेखात मांडली.[८१]

१९ डिसेंबर १९६१ रोजी गोवा पोर्तुगीजांच्या दास्यातून मुक्त झाला त्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी आपल्या जीवाची पर्वा न करता ह्या संग्रामात धडाडीने भाग घेतला महाराष्ट्रातील आंदोलकांचा सहभाग सर्वाधिक होता.

१८ डिसेंबर १९६१ च्या संध्याकाळी गोव्याच्या राजधानीला भारतीय सैन्याने वेढा दिला अवघ्या ४८ तासात गोव्याच्या जनरल ने शरणागती पत्करली या कारवाईत १५ सैनिक धारातीर्थी पडले.

थोडक्यात भारत स्वतंत्र होऊन हि गोवा मुक्त झाला नव्हता तेथे परकीय पोर्तुगीजांची जुलमी सत्ता होती गोव्यातील अनेक जनसमुदायाचे भारतात विलीन होण्यासाठी एकमत होते स्वातंत्र्यापूर्वीपासूनच तेथे गोवा स्वातंत्र्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी हालचाली सुरु केल्या होत्या संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या दरम्यानच्या काळातच गोवा मुक्त चळवळीने जोर धरला होता महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर गोव्यातील आंदोलनाची तीव्रता वाढत जाऊन भारत

सरकारला सैनिकी कारवाई करावी लागली व अखेर गोवा मुक्त झाले ह्या आंदोलनात महाराष्ट्र ातील अनेक क्रांतिकारकांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

गोवा मुक्त झाला. भारतात विलीन झाला. पण तो केंद्रशासित असावा की महाराष्ट्रात असावा, यावर पुन्हा एकदा रस्सीखेच सुरू झाली. ज्या गोव्यासाठी मराठी माणसांनी झुंज दिली, सत्याग्रह केले, तो गोवा महाराष्ट्राचे एक अंग आहे, असे महाराष्ट्रीय लोकांना वाटत होते. तसेच गोमांतकीयांनाही महाराष्ट्राविषयी आपुलकी होती; परंतु गोवा केंद्रशासित असावा, असे काही नेत्यांचे मत होते. पुढे जानेवारी १९६७ मध्ये या प्रश्नावर निवडणुका घेण्यात आल्या व महाराष्ट्राने गोवा गमावला. अखेर बहुमताने गोमांतकीयांनी गोवा महाराष्ट्रात विलीन न करता केंद्रशासित ठेवण्याचा निर्णय घेतला. 'नवाकाळ'ने आपल्या लेखात 'विलीनीकरण हे अखेर स्वप्न ठरले', या लेखाच्या आधारे गोवा महाराष्ट्रात आला असता तर महाराष्ट्र तसेच गोव्याची औद्योगिक प्रगती कशी झाली असती, यावर खूप मोठा अभ्यासू अग्रलेख लिहीत खंत व्यक्त केली.

## ५.१५ मुंबईतील गॅंगस्टरची दहशत :–

मुंबईच्या गुन्हेगारी जगताचा इतिहास रक्तरंजित आहे. १९८० सालाच्या आधीपासूनच मुंबईत संघटित गुन्हेगारी म्हणजे टोळ्या अस्तित्वात होत्या. दादागिरी, जुगाराचे अड्डे, दारूचे गुत्ते, हप्तावसुली, अपहरण, खून, खंडणी यांसारखे गुन्हे मुंबईत पूर्वीपासूनच चालत. पण १९८० नंतर मात्र खूप मोठ्या प्रमाणात यात वाढ झाली. मोठमोठ्या टोळ्या आपापसात आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करत होत्या. मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार होत होते. अनेक तरुणांचे भविष्य खराब होत होते. त्याला जबाबदार तेव्हाचे राजकीय व सामाजिक वातावरण होते. तसेच बंद झालेल्या कापड गिरण्यांमुळे बेकार झालेल्या कामगारांची मुले शिक्षण सोडून गुन्हेगारी विश्वाकडे वळले. सिनेमा, राजकीय पद, चाळ संस्कृती या सर्वांचा थोड्याफार प्रमाणात परिणाम किंवा प्रभाव तेव्हाच्या गुन्हेगारी जगतावर होता. तेव्हा मुंबईत हाजी मस्तान, युसूफ पटेल, करीम लाला या तष्करांपासून सुरू झालेला हा प्रवास वरदराजन, दाऊद, अरुण गवळी, छोटा राजन, गुरू साटम, बाबू रेशीम, अमर नाईक, मंचेकर इथपासून ते अगदी छोटा शकील, अबू सालेम इथपर्यंत कुप्रसिध्द आहे. प्रत्येक गुन्हेगारी टोळ्यांचे मुंबई

शहर, उपनगरात वर्चस्व होते. काही वाट चुकलेले तरुण योगायोगाने म्हणा वा भाई बनण्याच्या इर्षेने परिस्थितीमुळे बेरोजगारी, झटपट पैसा मिळविण्याच्या नादात तेव्हा गुन्हेगारी टोळ्यांमध्ये सामील झाले. अशा तरुणांचा उपयोग मारामारी, हप्ता गोळा करणे, जुगाराचा अड्डा तसेच अनेक छोटी–मोठी कामे देऊन त्याचा उपयोग करीत होती. मुंबई गोदीत स्मगलिंग करत व्यापारी व्यावसायिक यांच्याकडून हप्ता गोळा करीत तसेच मोठ्या उद्योजक, चित्रपटसृष्टीतील कलाकार, बिल्डर यांच्याकडून हप्ता गोळा करण्याची कामे या टोळ्या करत. त्यात त्यांच्यात नेहमी संघर्ष होत म्हणजे गँगवॉर १९८० ते १९९० या दशकात तर खूप मोठ्या प्रमाणात घडामोडी घडल्या.

गिरणी कामगारांचा ऐतिहासिक संप फोडण्यासाठी गुन्हेगारी टोळ्यांनी प्रयत्न केले. कामगारांना धमकावणे, कामगार पुढाऱ्यांचे खून करणे, कामगार युनियनमध्ये फूट पाडणे, अशा प्रकाराची कामे त्या टोळ्या करत. संप मोडून गिरण्या सुरू करण्याची गिरणी मालकांकडूनच अशा प्रकारे प्रयत्न केले जात होते. अखेर संप बारगळून कामगार देशोधडीला लागले व त्यांची मुले शेवटी गुन्हेगारी विश्वाकडे वळली.

**गँगस्टरच्या राजकारणातील हस्तक्षेपः–**

त्या काळात अनेक गुंड भाई झाले आणि आपसात हल्ले होऊन मारले गेले. १९८८ ते १९९० पर्यंत अनेक बडे गुंड गँगवॉरमध्ये ठार झाले. राजकीय स्वार्थासाठी या गुंडांचा उपयोग करण्यात आला. ‘नवाकाळ’ने एका अग्रलेखात म्हटले आहे, ‘निवडणूक नव्हे गँगवॉर!’ अशा आशयाचा मथळा देऊन ते म्हणतात,

‘‘महापालिकेची येणारी पुढील निवडणूक ही अविचारी निवडणूक आहे. राजकीय पक्ष म्हणजे विशिष्ट विचारांची संघटना अशी व्याख्या आहे. पण ही व्याख्या कुरतडत जात नाहीशी झाली. राजकीय पक्ष म्हणजे विशिष्ट हितसंबंधाची संघटना असे स्वरूप आले. यानंतर निवडणूक ही लक्षावधी रुपयांचा चुराडा, अशी स्थिती ओढवली. झपाट्याने विचार जाऊन प्रथम बिनविचार आला. आणखी अधोगती होत आता ‘अविचार’च सुरू झाला आहे. धाक दाखवून खंडण्या उकळणे, जमिनीवरील झोपडपट्टी धाकदपटशाने उद्ध्वस्त करणे, हातपाय तोडणे, खून करणे, स्मगलिंग, लुटमार अशा अत्यंत निंदनीय प्रकारात गुंतलेल्या

गँगस्टरांना या निवडणुकीत तिकिटे दिली आहेत. गँगस्टरला गँगस्टरने उत्तर हा प्रकार सुरू झाला आहे. गँगवॉर म्हणजे किडलेल्या व सडलेल्या राजकारणाचा परिपाक आहे. असे मत 'नवाकाळ'ने मांडले आहेत. राजकीय नेते, बडे उद्योगपती, नोकरशहा, गुंड, स्मगलर या १ टक्के वर्गाने आज ९९ टक्के वर्गाच्या महागाई, बेकारी, बंद गिरण्या व कारखाने, अराजक, गलिच्छ वस्त्या, भ्रष्टाचार असे चौफेर अनेक वार करून जायबंदी केले आहे. खरी लढाई १ टक्का धनदांडगा वर्ग विरुध्द ९९ टक्के वंचित पीडित वर्ग यांची आहे. पण निवडणुकीला हे स्वरूप येण्याऐवजी १ टक्का धनदांडग्या वर्गाला वाटपासाठी चाललेली गँगवॉर असेच स्वरूप आले आहे. ९९ टक्के लोकांचा ओढूनताणून मतदान करण्यापुरताच संबंध राहिला आहे.''[८२]

**मुंबईतील जातीय दंगली व बॉम्बस्फोट :–**

६ डिसेंबर १९९२ साली बाबरी मस्जिद पाडली आणि मुंबईसह देशभर जातीय दंगली पेटल्या. १९९२ च्या डिसेंबरमध्ये उसळलेली दंगल जानेवारी १९९३ पर्यंत शमली नव्हती. उलट जानेवारीच्या पहिल्या आठवड्यातच डोंगरी येथे दोन माथाडी कामगारांची निर्घृण हत्या व जोगेश्वरी येथील राधाबाई चाळीतील हिंदू स्त्री–पुरुष जिवंत जाळण्यात आल्यामुळे जातीय दंगलीने अधिकच उग्ररूप धारण केले. दंगलीत ५७१ जण ठार झाले. इतकी भीषण मनुष्यहानी यापूर्वी कोणत्याही जातीय दंगलीत झाली नव्हती. या दंगलीत मुसलमान बांधवांचे आतोनात नुकसान झाले. मनुष्य व वित्तहानी पराकोटीला गेली होती. परिस्थिती अस्थिर होती. या परिस्थितीत सूडाच्या भावनेने आय.एस.आय.चा पाकिस्तानी संघटनेच्या मदतीने दाऊदचा गँगस्टरने मुंबई १२ मार्च १९९३ व १३ मार्च १९९३ रोजी महासंहारक बॉम्बस्फोट घडवून आणले. त्यात २५७ निष्पाप ठार झाले. तर ७१३ जण जखमी झाले. या बॉम्बस्फोटानंतर मुंबईत पुन्हा जातीय दंगली घडतील असे आयएसआयला वाटले. पण तसे काही झाले नाही. बॉम्बस्फोटात हिंदू मोठ्या प्रमाणात मारले गेले. कोट्यवधींची वित्तहानी झाली. परंतु जातीय दंगली झाल्या नाहीत. या चार महिन्यांच्या काळात मुंबई शहर जळत होते. माणसे मरत होती. वित्तहानी होत होती. तरीही धीर सोडला नाही. पुन्हा नव्याने कामाला लागली. कारण 'नवाकाळ'सारखे वृत्तपत्र अनेक समाजप्रबोधनाचे काम करत होते. अनेक अग्रलेख लिहून लोकांना समाजाला धीर देत होते. खरी माहिती समाजापर्यंत पोहोचवत होते. अनेक गुन्हे पोलीस प्रशासनाच्या निदर्शनास आणत होते.

१२ मार्च १९९३ च्या बॉम्बस्फोटासाठी मुंबईतील गँगस्टरांनी हे महाकृत्ये केले. त्याबाबत दिनांक ११ एप्रिल १९९३ च्या 'दाऊद गँग सलामत का?' या अग्रलेखातून माहिती प्रकाशित केली.

''उद्या एक महिना पूर्ण होईल! गेल्या महिन्यात १२ मार्च रोजी मुंबापुरी भीषण भयावह बॉम्बस्फोटांनी हादरली. यानंतरच्या एका महिन्यात असे सिध्द झाले आहे की, १२ मार्चच्या उत्पातात अडीचशे किलो आरडीएक्स स्फोटकाचा वापर झाला असता तर मुंबई बेचिराख झाली असती. उद्ध्वस्त झाली असती. युध्दापेक्षाही भयानक संहार व विनाश झाला असता. नुसती कल्पना केली तरी थरकाप व्हावा असे हे षड्यंत्र होते.'

मुंबईच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासात अपूर्व अशी ही सर्वनाशाची आपत्ती ओढवली होती. स्मगलिंग आणि भ्रष्टाचार या दोन कारणांमुळे षडयंत्र शक्य झाले. स्मगलर दाऊद इब्राहिम दुबईत आहे. पण त्याची गँग मुंबईत राज्य करीत आहे. मुंबईहून आरामात माणसे दुबईला नेली जात होती. घातपाताचे शिक्षण घेऊन तितक्याच आरामात परत येत होती. मुंबईची पोलीस यंत्रणा जणू दाऊदच्या नोकरीतच होती! अख्खी मुंबई जाळून टाकण्याइतके दाऊदचे जाळे पसरले होते. आज १२ मार्चनंतर एक महिन्याने आम्ही महाराष्ट्र ाच्या मुख्यमंत्र्यांना आणि पोलीस आयुक्तांना सवाल विचारीत आहोत की, दाऊदचा मुंबईतील अंमल तुम्ही खणून काढला आहे का? दाऊद गँगचा निःपात केला आहे का? त्या दिशेने तुमची पावले पडत आहेत का?''[८३]

१२ मार्च १९९३ रोजीच्या बॉम्बस्फोट प्रकरणाची माहिती सांगत 'नवाकाळ' वृत्तपत्राने सरकारी व्यवस्थेवर टीका केली, याबाबत दिनांक ७ नोव्हेंबर १९९३ हा लेख प्रकाशित केला.

''...१२ मार्चचे भयावह, भीषण बॉम्बस्फोट झाले. मुंबईतील कायदा आणि सुव्यवस्था यंत्रणा वाळवीने घराचे वासे पोखरावेत त्याप्रमाणे लाचलुचपतीने पोखरलेली आहे, असे बॉम्बस्फोटांनी सिध्द केले. नाही तर बॉम्बस्फोटातील मुंबईचा सूत्रधार टायगर मेमन हा फरारी असूनही घरी राहत होत व स्मगलिंग करीत होता, ही गोष्ट शक्य झाली नसती. खुनासारखे गंभीर आरोप असलेल्या टायगर मेमनने दुबईला भेट दिली. बॉम्बस्फोट घडविण्याचा भयानक कट आखला. मुंबईत घरी राहूनच बॉम्बस्फोटांची व्यवस्था केली आणि ११ मार्चच्या रात्री सहकुटुंब विमानाने दुबईला पलायन केले! मुंबईचे पोलीस खाते लाचलुचपतीने निश्चेष्ट

झाल्याशिवाय असे घडू शकते काय? याच टायगर मेमनने मुंबईच्या इतिहासातील सर्वात प्रचंड बॉम्बस्फोट घडविले. ...

...संपूर्ण देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी करणे, प्रचंड घबराट माजविणे आणि जातीय दंगलीचा भडका उडविणे, हे भीषण बॉम्बस्फोटांचे भेसूर हेतू आहे. गँगस्टर टोळ्यांकडे सरकारने सतत दुर्लक्ष केल्यामुळेच दाऊद गँगतर्फे असा भयानक कट करता आला. ...''[८४]

असे अनेक अग्रलेख 'नवाकाळ' वृत्तपत्रामधून प्रकाशित झाले. त्याची दखल सर्वच राजकीय पक्षांना घ्यावी लागली.

## ५.१६ 'डॅशिंग खैरनार खळबळजनक जीवनकहानी' नवाकाळ वृत्तपत्रातून प्रकाशित मुलाखत

'नवाकाळ' वृत्तपत्राने अनेक नेत्यांच्या, चित्रपट अभिनेत्यांच्या मुलाखती घेतल्या. त्या गाजल्याही. पण एक मुलाखत खूप गाजली व लोकप्रिय झाली. ती म्हणजे महापालिका उपआयुक्त गो.रा. खैरनार यांची होय. खैरनार हे एक प्रामाणिक आणि निर्भय होते. त्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक मोठी धाडसाची कामे केली. महापालिकेच्या जागेतील अनेक अनाधिकृत बांधकामे त्यांनी तोडली. राजकीय तसेच युनियन लिडर डॉ. दत्ता सामंत यांचे तसेच गँगस्टर दाऊद तसेच वरदराजन यासारख्या गुंडांची अनेक बांधकामे तोडली. त्यांना ठार मारण्याच्या धमक्या येत होत्या. राजकीय दबाव येत होता. तसेच अमर नाईक गँगने समोरासमोर धमकी दिली. 'तुम्ही स्टॉलचे जितके तुकडे कराल तितके मी तुमचे तुकडे करीन!' यावेळी खैरनारांनी जो जवाब दिला तो सुवर्णाक्षरांनी कोरण्यासारखा आहे. खैरनार ठामपणे उत्तरले, 'प्रथम स्टॉलचे पडलेले तुकडे तरी मोजा!' खैरनारांनी स्टॉलचे तुकडे केले आणि बिनधास्त सुखरूप राहिले! एक दिवस अमर नाईकने खैरनारांना सांगितले, 'तुमचा मर्डर करण्यासाठी मला एक कोटी रुपयांची सुपारी सहज मिळेल!'

खैरनारांच्या कामगिरीच्या बातम्या, त्यांना येणाऱ्या धमक्या 'नवाकाळ' वृत्तपत्र प्रकाशित करीत होते. अनेक गुंडांशी दोन हात करून खैरनारांनी मुंबईतील अनेक गुंडांची अनाधिकृत बांधकामे तोडली. अनेक गुंडांचे दारूचे–जुगाराचे अड्डे ज्या ठिकाणी चालत ती पाडली. असे त्यांचे निर्भीड व्यक्तिमत्त्व होते.

जानेवारी १९९४ मध्ये या महापालिका उपआयुक्त गो.रा. खैरनार यांची 'डॅशिंग खैरनारांची खळबळजनक जीवनकहानी' या मथळ्याने 'नवाकाळ' वृत्तपत्रात मुलाखत प्रकाशित झाली. ती मुलाखत जवळजवळ आठ भागांत प्रकाशित झाली. मुलाखत रोहिणी खाडिलकर यांनी घेतली होती. या मुलाखतीचे संक्षिप्त विवेचन पुढील–

''महापालिका उपआयुक्त गो.रा. खैरनार यांच्या प्रामाणिकपणाचा आणि निधडेपणाचा जन्म ज्यांच्या बालपणीच झाला! संघर्षही बालपणीच सुरू झाला! पण त्याचे परिणाम त्याच्यापुरतेच होते आणि गंभीर नव्हते. ते मुंबईत येऊन महापालिकेत अधिकारी बनले. आता मात्र त्यांचा प्रामाणिकपणा आणि एक घाव दोन तुकडे, असा निधडेपणा म्हणजे झंझावातच ठरला! मुंबईत सगळीकडे अप्रामाणिकपणाची काचेची दुकाने आहेत. बैल काचेच्या दुकानात शिरावा तशी स्थिती खतरनाक खैरनारांमुळे होऊ लागली. मोठमोठ्या राजकीय नेत्यांचे फोन महापालिका उपआयुक्तांच्या ऑफिसात खणाणू लागले! वादळ घोंघावू लागले! प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियमसमोरील स्टॉल पाडले... नगरसेवकांपासून मंत्र्यांपर्यंत टेलिफोन! डॉ. दत्ता सामंतांच्या युनियनचा प्रतिकार केला... फोनवर फोन... फक्त पंतप्रधानांचाच फोन यायचा बाकी राहिला!''[८५]

खैरनार आपल्या मुलाखतीत म्हणतात, दोन कोटीऐवजी दोन टन सोने जरी दिले तरी दाऊदचे साम्राज्य उद्ध्वस्त करीन. कर्तव्यापासून हटणार नाही. 'नवाकाळ' वृत्तपत्रातून दाऊदविरोधी भूमिकेचे विवेचन.

''अंडरवर्ल्ड डॉन दाऊदचे बलाढ्य पापाचे साम्राज्य खैरनारांनी एकट्याने उधळले. ज्याचे नाव घेण्याचीही हिंमत बड्यांमध्ये नव्हती तिथे एकटे खैरनार उभे राहिले! कारण – दाऊदचे साम्राज्य उधळण्यास कर्तव्यनिष्ठ, साफ दिलाचा, अफाट छातीचा आणि निधड्या निर्धाराचा अधिकारी हवा होता! खैरनारांच्या रूपात असा अधिकारी उभा राहिला!''[८६]

दाऊदच्या इमारती पाडू नये म्हणून त्यांना दाऊदने त्यांच्या सहकाऱ्यांकडून लाच देऊ केली ती त्यांनी नाकारली.

महापालिका उपआयुक्त गो.रा. खैरनार यांना स्वतःची जीवनकहाणी सांगायची होती. त्यासाठी त्यांनी 'नवाकाळ' वृत्तपत्र का निवडले? त्याची कारणे सांगितली.

''खैरनार म्हणाले, मला माझी जीवनकहाणी सांगायची होती. अनेक पत्रकार त्यासाठी

तयार होते. पण मी 'नवाकाळ'लाच मुलाखत द्यायचा निश्चय केला. कारण दोन, १) मी जी जीवनकहाणी सांगेन ती छापण्याची हिंमत फक्त 'नवाकाळ'च्या संपादकांत आहे, हे मला अनुभवाने माहीत आहे. २) 'जसे घडले तसे दिले' ही बातमीची व्याख्या 'नवाकाळ'च्या संपादकांचीच आहे.''[८७]

## ५.१७ सारांश :-

'नवाकाळ' वृत्तपत्र सुरू झाले ते राजकीय विषय घेऊनच. विसावे शतक हे दोन कालखंडात विभागले गेले. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंड, असे दोन महान कालखंड 'नवाकाळ' वृत्तपत्राने अनुभवले आहे. काकासाहेब खाडिलकरांचे गुरू लोकमान्य टिळक यांचे निधन व महात्मा गांधी यांचा राजकारणातील प्रवेश, अशा दोन विरोधी टोकांना जोडून राजकारणाची पुढची धोरणे समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न काकासाहेबांनी केला. असहकार चळवळ, पूर्ण स्वराज्य ठराव, १९४२ ची चले जाव चळवळ, स्वातंत्र्य अरुणोदय अशा विविध घडामोडी, भारताचा इतिहास प्रत्यक्ष अनुभवला व आपल्या अग्रलेखातून त्याचे प्रत्यक्ष दर्शन घडविण्याचे काम 'नवाकाळ' वृत्तपत्राने केले.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील गोवा मुक्ती चळवळ, संयुक्त महाराष्ट्र चळवळ,मुंबईतील गँगस्टरची दहशत, डॅशिंग खैरनार यांची जीवनकहाणी, अशा महत्त्वपूर्ण घटना समाजासमोर 'नवाकाळ' वृत्तपत्राने मांडल्या. संयुक्त महाराष्ट्र चळवळीला प्रोत्साहन देण्याचे काम 'नवाकाळ' वृत्तपत्राने केले. असे धडाडीचे 'नवाकाळ' वृत्तपत्र विसाव्या शतकात खऱ्या अर्थाने गाजले.

# प्रकरण पाचवे

## तळटीपा:–

१) लेले रा.के., 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४, पृष्ठ – ६६९.

२) खाडिलकर, का.ह.,'देशभक्त कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांचे चरित्र', चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे २, १९४९, पृष्ठ– २४८, २४९.

३) लेले रा.के., 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४, पृष्ठ–६६९.

४) खाडिलकर, का.ह.,'देशभक्त कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांचे चरित्र', चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे २, १९४९, पृष्ठ –२५३.

५) कित्ता.पृष्ठ –२५६–२५७.

६) कित्ता.पृष्ठ– २५७–२५८.

७) नवाकाळ, २८ मार्च १९२९.

८) नवाकाळ, २८ मार्च १९२९.

९) नवाकाळ, ९ फेब्रुवारी १९२९.

१०) नवाकाळ, २८ मार्च १९२९.

११) नवाकाळ, २३ सप्टेंबर १९३०.

१२) नवाकाळ, ८ डिसेंबर १९३३.

१३) खाडिलकर नी.य., 'टॉवर्स', परचुरे प्रकाशन, मुंबई, १९९९, पृष्ठ – १४४, १४५.

१४) कित्ता.पृष्ठ –१४६.

१५) कित्ता.पृष्ठ– १४७.

१६) नवाकाळ, २७ जुलै १९७१.

१७) नवाकाळ, २८ जुलै १९७१.

१८) नवाकाळ, ऑगस्ट १९७१.

१९) नवाकाळ, ६ ऑगस्ट १९७१.

२०) नवाकाळ, २ सप्टेंबर १९७१.

२१) वागळे निखिल, ‘श्रीकृष्ण अहवाल– एक विश्लेषण’, अक्षर प्रकाशन, मुंबई, १९९८, पृष्ठ– ९.

२२) कित्ता, पृष्ठ– ५.

२३) नवाकाळ, ६ ऑक्टोबर १९९८.

२४) नवाकाळ, ६ ऑक्टोबर १९९८.

२५) नवाकाळ, २३ ऑक्टोबर १९९८.

२६) नवाकाळ, १८ नोव्हेंबर १९९८.

२७) नवाकाळ, २५ नोव्हेंबर १९९८.

२८) चौधरी देवप्रकाश, ’लोकनायक अण्णा हजारे जनलोकपाल विधेयक’, गोयल प्रकाशन, पुणे, ०२, २०११, पृष्ठ –५२.

२९) नवाकाळ, १० सप्टेंबर १९९८.

३०) नवाकाळ, १० सप्टेंबर १९९८.

३१) नवाकाळ, १० सप्टेंबर १९९८.

३२) नवाकाळ, १० सप्टेंबर १९९८.

३३) नवाकाळ,२ ऑगस्ट १९२३.

३४) नवाकाळ १ मे १९२३.

३५) खाडिलकर य.कृ., ‘खाडिलकरांचा लेखसंग्रह – भाग दुसरा’, श्री दत्तात्रय प्रिंटिंग प्रेस, मुंबई, १९४९, पृष्ठ– ७.

३६) नवाकाळ, १७ मे १९२३.

३७) नवाकाळ,२४ मे १९२३.

३८) नवाकाळ, ४ सप्टेंबर १९२४.

३९) नवाकाळ, ८ मार्च १९२९.

४०) नवाकाळ, ३१ जुलै १९२६.

४१) नवाकाळ, १९ जानेवारी १९३०.

४२) नवाकाळ, २८ जानेवारी १९३०.

४३) नवाकाळ, ६ ऑगस्ट १९४२.

४४)	नवाकाळ, ९ ऑगस्ट १९४२.

४५)	नवाकाळ, १० ऑगस्ट १९४२.

४६)	राजेघोरपडे बा.बा.'चलेजाव आंदोलन',महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई–३२,	१९८८, पृष्ठ–७.

४७)	नवाकाळ, ११ ऑगस्ट १९४२.

४८)	नवाकाळ, २६ जून १९४४.

४९)	नवाकाळ, २० नोव्हेंबर १९४५.

५०)	नवाकाळ, २७ जानेवारी १९४५.

५१)	नवाकाळ,१५ ऑगस्ट १९४७.

५२)	नवाकाळ,१५ ऑगस्ट १९४७.

५३)	नवाकाळ,१५ ऑगस्ट १९४७.

५४)	नवाकाळ, १४ डिसेंबर १९४८.

५५)	नवाकाळ, १३ फेब्रुवारी  १९५०.

५६)	नवाकाळ, २ नोव्हेंबर १९५५.

५७)	नवाकाळ, २२ ऑक्टोबर १९५५.

५८)	नवाकाळ, २३ नोव्हेंबर १९५५.

५९)	नवाकाळ, २५ जानेवारी १९५६.

६०)	नवाकाळ, १८ मार्च १९५६.

६१)	नवाकाळ, २२ एप्रिल १९५६.

६२)	नवाकाळ, १० ऑगस्ट १९५६.

६३)	नवाकाळ, २१ एप्रिल १९६०.

६४)	नवाकाळ, १ मे १९६०.

६५)	अत्रे प्र.के., 'कऱ्हेचे पाणी – आत्मचरित्र' (खंड पाचवा), परचुरे प्रकाशन, मुंबई, २००७,	पृष्ठ–१९५.

६६)	नवाकाळ १० जून १९४८

६७)	नवाकाळ १० जून १९४८.

६८) नवाकाळ, १७ मार्च १९५४.

६९) नवाकाळ, १८ मार्च १९५४.

७०) नवाकाळ, २५ मार्च १९५४.

७१) नवाकाळ, १९ मार्च १९५४.

७२) नवाकाळ, १२ एप्रिल १९५४, नवाकाळ, १५ एप्रिल १९५४.

७३) नवाकाळ २५ जून १९५४.

७४) नवाकाळ, ३० जुलै १९५४, नवाकाळ, ५ ऑगस्ट १९५४.

७५) नवाकाळ,८ ऑगस्ट १९५४, नवाकाळ,७ ऑगस्ट १९५४.

७६) नवाकाळ ,७ ऑगस्ट १९५४.

७७) नवाकाळ,७ ऑगस्ट १९५४.

७८) नवाकाळ, ८ जुलै १९५५.

७९) नवाकाळ, १६ ऑगस्ट १९५५.

८०) नवाकाळ, १८ ऑगस्ट १९५५.

८१) नवाकाळ, १८ फेब्रुवारी १९५५.

८२) नवाकाळ, २ फेब्रुवारी १९९२.

८३) नवाकाळ, ११ एप्रिल १९९३.

८४) नवाकाळ, ७ नोव्हेंबर १९९३.

८५) नवाकाळ, ९ जानेवारी १९९४.

८६) नवाकाळ, जानेवारी १९९४.

८७) नवाकाळ, जानेवारी १९९४.

## प्रकरण सहावे

# उपसंहार

### प्रस्तावना :–

इतिहासाची मांडणी करताना व्यक्ती, समाज, स्थळ आणि काळ हे चार घटक महत्त्वाचे मानले जातात. 'मानव' हाच इतिहासाचा अभ्यास विषय असतो. 'मानवाने केलेली प्रगती किंवा अधोगती यांचा लेखाजोखा सांगणारी कहाणी म्हणजेच इतिहास होय.'

थोडक्यात इतिहास म्हटले की गतकालीन समाज जीवन, राज्य, देश अथवा संपुर्ण जगामध्ये घडणाऱ्या घडामोडींचे त्या काळातील होऊन गेलेल्या घटना, जीवनमान आदींचे जणु चित्रण म्हणता येईल.

इतिहासात होऊन गेलेल्या संबंधित काळानुरुप समाजातील घटक म्हणजे व्यक्तीच्या जगण्यासाठी, समाजात योग्य स्थान प्राप्त करण्यासाठी सांस्कृतिक दृष्ट्या मनोरंजक करणे, राजकारणातून समाज एकरूप असा तयार करणे, अर्थव्यवस्थेद्वारे कुटुंब संपन्न बनविणे या विचारांचे माध्यम यातून आशाआकांक्षाचे घडामोडींचे व स्थितीचे प्रतिबिंब असते. वेगवेगळ्या काळात अनेक घटना घडत असतात. परंतु याच घडामोडी एका समाजापासून दुसऱ्या समाजापर्यंत पोहचविण्याचे काम प्रसारक म्हणून कोणास तरी करावे लागते. एका राज्यातून दुसऱ्या राज्यात, देशविदेशात घडणाऱ्या बाबी एकमेकांपर्यंत पोहचविण्याचे संदेश देणे पूर्वी व्यक्ती अथवा कागदपत्रे याद्वारे होत असे. पुढे याच गोष्टीचा विकास होत जाऊन वृत्तपत्र निर्मिती झाली. काळानुरूप विविध घटना घडून येतात त्या समाजासमोर आणण्याचे काम वृत्तपत्रांच्या माध्यमातून होऊ लागले. प्रसारमाध्यमांची आधुनिक साधने येण्यापूर्वी 'वृत्तपत्र' हेच प्रचारमाध्यमांचे महत्वपूर्ण साधन होते.

आजच्या आधुनिक इंटरनेट, मोबाइल, टेलिव्हिजन मीडियाच्या युगात वृत्तपत्राचे स्थान कमी झालेले दिसून येते. परंतु ज्या वेळी ही साधने नव्हती त्या वेळी 'वृत्तपत्र' हा समाजासाठी एकमेव असा प्रसारसाधक होता. ते विविध क्षेत्रात परिवर्तन आणण्याचा प्रयत्न करत असतात. संपुर्ण समाजाची उन्नती साधणे हे त्यांचे काम आहे. त्यांच्या कार्याचा संशोधनाच्या माध्यमातून समाजासमोर आणण्याचा छोटासा प्रयत्न प्रस्तुत शोधप्रबंधाद्वारे करण्यात आलेला आहे.

विसावे शतक म्हणजे पारतंत्र व स्वतंत्र भारत या काळात विभागले गेले होते. ब्रिटिश

राजवट त्यांच्या काळात देश परकियांच्या गुलामगिरीत होता. त्यांची हिंदुस्थानवरील सत्ता, अनेक थोर महापुरुषांचे देश मुक्ततेसाठी केलेले मोठ्या प्रमाणातील परिश्रम, देशासाठी आत्मबलिदान करणे अशी परिस्थिती भारतात होती. त्यावेळी या वृत्तपत्रांनी त्यासाठी प्रचाराचे महत्त्वाचे कार्य केल्याचे दिसून येते. त्यात समाजातील प्रसारमाध्यमांचे साधन असणारे वृत्तपत्र त्याची मुस्कटदाबी करणे हे सत्र ब्रिटिश अधिकारी करत. असे अनेक वृत्तपत्रे या कायद्यामुळे बंद पडत गेली. वृत्तपत्रांच्या संपादकावर ब्रिटिशविरोधी वृत्तपत्र कार्यामुळे कार्यवाही होत असे.

अशा परिस्थितीत या वृत्तपत्रांनी आपले स्वातंत्र्य लढ्याचे कर्तव्य थांबविले नाही. उलट परकीय सत्तेच्या दडपशाही धोरणाला समाजघातक त्याच्या घटना समाजासमोर मांडण्यासाठी वृत्तपत्रामधून माहिती छापून आणत.

मराठी पत्रकारितेला शंभर वर्षांचा वारसा आहे. हा वारसा जपण्याचे शिवधनुष्य अनेक धुरिणांनी लीलया पेललेले आहे. मराठी भाषेत जितकी दैनिके असतील, तितकी विविध प्रकारची दैनिके, आठवड्यातून एकदा प्रकाशित होणारे साप्ताहिक, पंधरा दिवसांतून येणारे पाक्षिके कदाचित एखाद् दुसऱ्या भाषेत असावीत. एवढा जिव्हाळा मराठी वाचक आणि मराठी वृत्तपत्रांमध्ये शेकडो वर्षांपासून जपला गेला आहे. 'दर्पणकार' बाळशास्त्री जांभेकरांनी मराठी वृत्तपत्राची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर टिळकांचा 'केसरी', प्र.के. अत्रे यांचा 'मराठा', ना. भि. परुळेकरांचा 'सकाळ' आदी दैनिकांनी त्या–त्या काळामध्ये पत्रकारितेचा ठसा समाजमनावर उमटवला. मराठी साहित्याबरोबरच वर्तमानपत्रांचे योगदान फार मोठे आहे. समाजप्रबोधनाचा वसा घेतलेल्या या दैनिकांची परंपरा आजतागायत सुरू आहे. इंटरनेटच्या जमान्यातही मराठी वृत्तपत्रांनी कात टाकून काळाबरोबर बदलही आत्मसात केले आहेत. त्यामुळे त्यांची झेप केवळ महाराष्ट्रापुरतीच न राहता ती आता ई–दैनिकांच्या माध्यमातून सातासमुद्रापार पोहोचली आहे.

महाराष्ट्रातील दैनिके हा खरे तर संशोधनाचा विषय आहे. एवढी दैनिके बाजारात उपलब्ध असूनही नित्यनेमाने नवनवीन दररोज निघणारी, सप्ताहातील, पंधरवड्यातील, महिन्यातून एकदा अशी वृत्तवार्ता देणारी वृत्तपत्रे बाजारात येतच आहेत. त्यामुळे वृत्तपत्रसृष्टीमध्ये जीवघेणी स्पर्धा सुरू झालेली दिसत आहे. अशा स्पर्धेमध्ये आजसुद्धा सुरू असलेले जे इंग्रज राजवटीत धामधुमीच्या काळात उदयास आलेले 'नवाकाळ' वृत्तपत्र होय. त्याची लवकरच शंभर वर्षे पूर्ण होणार आहेत.

'नवाकाळ' वृत्तपत्राचा उदय हा सन १९२३ मध्ये दिनांक ७ मार्च रोजी झाला. त्याची निर्मिती काकासाहेब खाडिलकर ऊर्फ कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी केली. ते सुरुवातीपासून प्रथम नाटककार म्हणजे नाटके स्वतः लिहीत असत. लिहिण्याची आवड असल्याने त्यांचे विविध लेख प्रकाशित होऊ लागले. त्यातून त्यांनी 'केसरी' वृत्तपत्रात सुद्धा लेखनाचे कार्य केले. स्वतःचे वृत्तपत्र सुरू केल्यावर त्याला यशस्वी करण्यासाठी त्यांनी कठीण परिश्रम घेतले. इंग्रज राजवटीच्या विरोधी लेखनमालिका अग्रलेखाद्वारे करू लागले. जनतेमध्ये परिवर्तन घडवून आणण्याचे प्रयत्न सुरूच ठेवले. इंग्रजांची नजर त्यांच्या वृत्तपत्रावर होतीच. त्यामुळे सन १९२९ साली राजद्रोहात्मक खटला होऊन एक वर्षाची शिक्षा भोगण्यासाठी संपादक म्हणून त्यांना तुरुंगात जावे लागले.

'नवाकाळ' वृत्तपत्राचे कामकाज पाहण्याकरिता आपले संपादक पद सोडून १९२९ सालातीलच मार्च महिन्यात त्यांचे मोठे चिरंजीव यशवंत ऊर्फ अप्पासाहेब खाडिलकर यांना संपादकपद बहाल केले. नाट्याचार्य काकासाहेब हे तुरुंगातून जानेवारी १९३० साली परत आले. तथापि ते पुन्हा संपादक झाले नाहीत. यावेळी नाट्याचार्य यांचे वय ५८ होते. पण त्यांनी वेळीच स्वयंस्फूर्तीने संपादकपद सोडले! त्यांना थांबायचे कुठे, याची उत्तम जाण होती. स्वतःहून संपादकपद सोडण्याची परंपरा खाडिलकर घराण्यात पाहावयास मिळते.

'नवाकाळ'चे दुसरे संपादक यशवंत खाडिलकर यांनी वय झाल्यामुळे म्हणजे वयाची ६४ वर्षे पूर्ण झाल्यावर १ ऑक्टोबर १९६९ मध्ये संपादक म्हणून आपला कार्यकाल थांबविला. त्यातून निवृत्त होऊन आपला मुलगा नीळकंठ यशवंत खाडिलकर यांच्यावर ही जबाबदारी सोपविली. त्यांचा जन्म ६ एप्रिल १९३४ रोजी झाला. त्यांचे विल्स कॉलेजात शिक्षण झाले असून अर्थशास्त्राची ऑनर्ससह पदवी प्राप्त, शाळा–कॉलेजांत स्कॉलर, विविध वक्तृत्व स्पर्धांत विजेते, बुद्धिबळाचा चॅम्पियन, 'सर्वोत्तम विद्यार्थी ॲवॉर्ड' आणि विल्सनमध्ये एक वर्ष फेलोशीप, असा त्यांचा शिक्षणाचा कार्यकाल असून तो नावाजलेला होता. पुढे पदवीनंतर १९५६ मध्ये 'नवाकाळ'मध्ये वृत्तपत्र व्यवसायात कार्यरत झाले. पारतंत्र्यात सुरू झालेल्या 'नवाकाळ'ला काकासाहेबांचे नातू नीळकंठनी १९६८ पासून तिसऱ्या पिढीचे संपादक म्हणून 'नवाकाळ'ची आर्थिक अरिष्टातून सुटका केली. त्यास स्वबळावर, स्वकर्तृत्वाने स्वतंत्र बाण्याच्या आणि स्वावलंबी, सुसज्ज वृत्तपत्रात रूपांतर केले. सर्वोत्कृष्ट वृत्तांताचे व्होरा

पारितोषिक, सभांचे वृत्त देण्याची आणि खास मुलाखतींची नवी शैली वृत्तपत्रसृष्टीला त्यांनी दिली.

'नवाकाळ' हे विविध विचारांचे व्यासपीठ तसेच सामान्य जनतेच्या व्यथांचे प्रतिबिंब केले. संपादकीय विशेष आकर्षण ठरले. वादातीत असा प्रामाणिकपणा आणि स्वतंत्र बाणा, जसे घडले तसे सांगितले, हे वृत्ताचे सूत्र आणि जे मनात तेच लेखनात हे संपादकीयाचे सूत्र यामुळे ध्येयवादी परंपरा कायम राखली. मुंबईतील मराठी पत्रकार संघ त्याचे माजी अध्यक्ष व सध्याचे विश्वस्त. भारतीय भाषिक वृत्तपत्रसंस्थेचे माजी सरचिटणीस म्हणून त्यांचा उल्लेख आहे.

वृत्तपत्र व्यवसायावरील पाच व्याख्याने आणि त्यानंतर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरमधील व पुण्यातील नाट्याचार्य खाडिलकर आधारित नाट्यकलांवर व्याख्यानमाला गाजली. त्यावरच त्यांचे पुस्तक लोकप्रिय झाले. व्यावहारिक समाजवाद अर्थात प्रॅक्टिकल सोशॅलिझमवर, एक टक्का विरुद्ध ९९ टक्के भांडवलशाहीविरोधी, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा सहसंबंध असलेले प्रॅक्टिकल सोशॅलिझम या संकल्पनेच्या आधारावर त्यांची तीनही पुस्तके अत्यंत प्रभावी ठरून एक वैचारिक आंदोलन निर्माण केले. त्यांनी आपल्या कार्यकालात मॅरेथॉन मुलाखती गाजविल्या. त्यामुळे जनतेने त्यांना 'अग्रलेखांचा बादशहा' ही पदवी बहाल केली. नाट्याचार्यांच्या परंपरेचे पालन नीळकंठ खाडिलकरांनी करत वयाच्या ६३ व्या वर्षी १९९७ साली मार्चमध्ये 'नवाकाळ'चे संपादकपद सोडले. त्यांची द्वितीय कन्या सौ. जयश्री रमाकांत पांडे यांच्याकडे कार्यभार सोपवून त्यांना संपादक म्हणून घोषित केले. असे हे 'नवाकाळ' वृत्तपत्र सन २०२३ मध्ये शतकपूर्ती करणार आहे.

या प्रकरणाच्या शेवटच्या टप्प्यात सदर शोधप्रबंधाचा अभ्यास करून मिळालेल्या निष्कर्षाचे विवेचन मुद्यांच्या स्वरूपात सादर केले आहे.

## निष्कर्ष :–

१) ‘नवाकाळ’ वृत्तपत्राचे  समाज, अर्थ राजकारण अशा विविध क्षेत्रातील कार्याचे योगदान निश्चित महान आहे.

२) ऐतिहासिक काळापासून मुंबईचा सर्वच क्षेत्रात वेगळेपण दिसून येतो.

३) काकासाहेब खाडिलकरांच्या ‘नवाकाळ’ वृत्तपत्रातील लेखांतून त्यांची उत्कट देशभक्ती, कठोर परिश्रम, निःस्वार्थी देशभक्ती दिसून येते. देश इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त व्हावा, ही त्यांची तळमळ होती.

४) काकासाहेब  खाडिलकरांवर लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांच्या विचारांचा प्रभाव होता.

५) खाडिलकर हे नाटककार, प्रबोधनकार होते. त्यांनी आपल्या प्रवचनांतून समाजास प्रबोधन केल्याचे दिसते. त्यांची नाटके, पत्रकारिता क्षेत्रातील कामगिरी अविस्मरणीय व आजही समाजोपयोगी आहे.

६) काकासाहेब खाडिलकर  यांच्या  नाटकांची सुरुवात विद्यार्थीदशेपासूनच दिसून येते. त्यांचे हे गुण समाजासाठी मार्गदर्शक ठरतील.

७) भारताचा ब्रिटिश सत्तेविरोधी लढा व स्वातंत्र्योत्तर भारत या दोन्ही कालखंडातील वृत्तपत्र विषयक  कार्य इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद करून ठेवण्यासारखे आहे.

८) ‘नवाकाळ’ वृत्तपत्राचे संपादकांचे जीवन, त्याग, सेवा, ज्वलंत राष्ट्रभक्ती यांनी परिपूर्ण दिसते. शेवटपर्यंत त्यांनी आपले आयुष्य वृत्तपत्राच्या माध्यमातून राष्ट्राला वाहून घेतले.

९) ’नवाकाळ’च्या संपादक पदावर आरूढ झालेले यशवंत कृष्णाजी खाडिलकराचे कार्य मोलाचे आहे.

१०) मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय व ‘नवाकाळ’ ऑफिस  यांनी ‘नवाकाळ’ वृत्तपत्र फायली उपलब्ध करून दिल्याने एकविसाव्या शतकातील नव्या पिढीला अधिकाधिक माहिती मिळाली.

११) तिसरे संपादक नीळकंठ खाडिलकरांना ‘अग्रलेखांचाबादशाह’ ही जनतेची पदवी असून त्यांचेही कर्तृत्व महान आहे.

१२) परकीय सत्तेचे धोरणे, काँग्रेस पक्षाचे योगदान  समाजासमोर मांडल्याचे दिसते.

१३) समाजात एकी निर्माण व्हावी,समाज राष्ट्रात एकात्मता स्थापन व्हावी  असे 'नवाकाळ' चे ध्येय होते. त्यासाठी सामाजिक चळवळी, आर्थिक घडामोडी, राजकीय घटना यावर निःस्वार्थपणे काम केल्याचे दिसून येते.

१४) अग्रलेख लिहिणे व त्यातून जनतेला उद्‌बोधन करणे व शेवट प्रश्नार्थक वाक्याने करणे ही नवी संकल्पना राबविल्याचे दिसून येते.

१५) राजकारणाला प्राधान्य दिले असले तरी समाजपरिवर्तन, जनजागृती करणे, जनतेचे मतपरिवर्तन करणे याला जास्त महत्त्व दिल्याचे दिसते.

१६) त्याची लेखणी अतिशय मार्मिक, साधी व सोपी अशा प्रकारची होती.

१७) 'नवाकाळ' वृत्तपत्रावरील ब्रिटिशकालीन व स्वतंत्र भारतातील खटले व त्यातील संपादकांची भूमिका ही स्वाभिमानाची आहे.

१८) पारतंत्र्य व स्वातंत्र्य या दोन्ही काळातील इतिहासाचा साक्षीदार हे 'नवाकाळ' वृत्तपत्र आहे.

१९) 'नवाकाळ' वृत्तपत्राचे योगदान आजच्या  वृत्तपत्रास व संपादकीय वर्गाला निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

२०) परकीय सत्तेविरोधी संघर्षकरत पारतंत्र्यातून स्वातंत्र्यात पदार्पण करत मोठया दिमाखाने कार्यरत असा या वृत्तपत्राचा गौरव आहे.

२१) पिढीपरंपरेने वृत्तपत्र  चालविणाऱ्या व्यक्तीची श्रेष्ठता ,त्याचे स्थान वेगळे आहे.

२२) सन २०२३ मध्ये शतकपूर्ण करणारे वृत्तपत्र म्हणून सर्व वृत्तपत्रांना, प्रसारमाध्यमांना एक आदर्श आहे.

२३) आजच्याकाळात सर्वच वर्गातील तरुणांना सर्वगुणसंपन्न नागरिक होण्याची प्रेरणाशक्ती प्राप्त होईल.

# संदर्भग्रंथ सूची

## १.अस्सल साधने

### अ) वृत्तपत्र फाईल्स :-

**'नवाकाळ' वृत्तपत्र मुळ फाईल्स-**

१) ७ मार्च १९२३ ते ३१ डिसेंबर १९९४ (मुंबई मराठी ग्रंथ संग्रालय संदर्भ विभाग दादर, मुंबई)

२) जानेवारी १९९५ ते डिसेंबर २००० (शासकीय विभागीय ग्रंथालय, विश्रामबागवाडा, पुणे )

(वृत्तपत्रांच्या फायली हेच या ग्रंथाचे प्रमुख साधन, पण मोजके अपवाद वगळता 'नवाकाळ' वृत्तपत्रांच्या संपूर्ण फायली उपलब्ध होणे अशक्यप्राय ठरले.)

### ब) पुस्तके :-

१) खाडिलकर कृ. प्र.,'पहिले महायुद्ध भाग १ ते ५', श्री दत्तात्रय प्रिंटिंग प्रेस प्रकाशन, मुंबई, १९४०.

२) खाडिलकर, का.ह., 'देशभक्त कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर यांचे चरित्र', चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे, १९४९.

३) खाडिलकर य.कृ., 'खाडिलकर-स्मरणी', श्री दत्तात्रय प्रिंटिंग प्रेस प्रकाशन, मुंबई, १९४९.

४) खाडिलकर य.कृ., 'खाडिलकरांचा लेखसंग्रह - भाग पहिला', श्री दत्तात्रय प्रिटिंग प्रेस, मुंबई, १९४९.

५) खाडिलकर य.कृ., 'खाडिलकरांचा लेखसंग्रह - भाग दुसरा', श्री दत्तात्रय प्रिंटिंग प्रेस, मुंबई, १९४९.

६) खाडिलकर य.कृ., 'खाडिलकरांच्या नाट्यकृती आणि प्रा. फडके', नवाकाळ ऑफीस प्रकाशन, मुंबई.

७) खाडिलकर नी.य., 'नाट्याचार्यांची नाट्यकला', नवाकाळ प्रेस प्रकाशन, मुंबई, १९७३.

८) खाडिलकर नी.य., 'लेखननामा', शलाका प्रकाशन, मुंबई, १९८६.

९) खाडिलकर नी.य., 'एक टक्का विरुद्ध ९९ टक्के' (प्रॅक्टिकल सोशॅलिझम-भाग २),

संबोधी प्रकाशन, मुंबई, १९८६.

१०) खाडिलकर नी.य., 'टॉवर्स', परचुरे प्रकाशन, मुंबई, १९९९.

११) खाडिलकर नीळकंठ, 'हिंदुत्व– नीळकंठी तत्वज्ञान', परचुरे प्रकाशन,मुंबई–४,

१२) फडके ना.सी, 'नाट्याचार्य खाडिलकर, चरित्र आणि कार्य', पंडित अनंत कुलकर्णी प्रकाशन, पुणे.

१३) फडके ना.सी., 'खाडिलकरांच्या नाट्यकृती', पंडित अनंत कुलकर्णी प्रकाशन, पुणे.

## क) इंग्रजी पुस्तके :–

1) Barns Margaria : 'The Indian Press', George Allen and Unwin, London, 1940.
2) Bhatt S.C., 'Indian Press Since 1933', New Delhi, 1997.
3) Government of India, 'Ministry of Information and Broadcasting', Pub. Mass Media in India, 1998-99, New Delhi, 1999
4) Madhya Pradesh Government of 'The History of Freedom Movement in Madhya Pradesh, Nagpur, 1956.
5) Nanda B.R. : 'Gokhale - The Indian Moderates and the British Raj', Oxford University Press, London, 1977.
6) Natarajan J., 'History of Indian Journalish' (being Part II of the Report of the Press Commission 1952-54), New Delhi, 1954
7) Natarajan S., 'A History of the Press in India', Asia Publishing House, Bombay, 1962.
8) Raje M. Chalapathi : 'The Press', National Book Trust, New Delhi, 1974.

## २. दुय्यम साधने

### अ) पुस्तके :-


१) अत्रे प्र.के., 'कऱ्हेचे पाणी – आत्मचरित्र' (खंड पाचवा), परचुरे प्रकाशन, मुंबई, २००७.

२) आडारकर नीरा, मेनन मीरा, 'कथा मुंबईच्या गिरणगावची', मौज प्रकाशन, मुंबई, २००७.

३) ॲण्ड्र्यूज डी.पी., 'खाडिलकरांच्या नाट्यकथा', ठोकळ प्रकाशन, पुणे.

४) करंदीकर ज.स., (संपा.), 'भोपटकर गुणगौरव ग्रंथ', केसरी–मराठा संस्था, पुणे, १९४२.

५) कानडे रा.गो.,'मराठी नियतकालिकांचा इतिहास'(१८३२ ते १९३७),मंगेश नारायण कुलकर्णी, मुंबई, १९३८.

६) कुलकर्णी वा.ल., 'नाटककार खाडिलकर – एक अभ्यास' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६५.

७) खैरमोडे चांगदेव भवानराव, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र', खंड तिसरा, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९०.

८) गोखले श्री. पु. (संपा.), 'भाल्याची फेक', केसरी प्रकाशन, पुणे, १९७८.

९) गोखले बा.दा. (संपा.), 'साहित्य आणि साहित्यिक', कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे.

१०) गांधी मो. क,'सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा–आत्मचरित्र',साकेत प्रकाशन,औरंगाबाद, २०१५.

११) जांभेकर ग.गं., 'पश्चिम भारतातील नवयुग प्रवर्तक आणि महाराष्ट्राचे जनक आचार्य बाळ गंगाधर शास्त्री (१८१२–१८४६) यांचे जीवनवृत्त व लेखसंग्रह' ग.गं. जांभेकर, पुणे, १९५०.

१२) घारपुरे वा.ह., 'श्री. कृ.प्र. खाडिलकर यांची नाट्यसृष्टी',घारपुरेश्री. वामन हरी प्रकाशन,पुणे, १९३०.

१३) चौधरी देवप्रकाश, 'लोकनायक अण्णा हजारे जनलोकपाल विधेयक',गोयल प्रकाशन पुणे ०२, २०११

१४) जोशी वि.कृ. आणि लेले रा.के.,'वृत्तपत्रांचा इतिहास' खंड एक, वासुदेव विष्णू भट, मुंबई, १९५१.

१५) देसाई व शां., 'खाडिलकरांची नाट्यसृष्टी', सोमय्या पब्लिकेशन्स, मुंबई.

१६) पाजणकर रू.पां., 'खाडिलकरांचे नाट्यगुण', मराठी नाट्य परिषद.

१७) फाटक न.र., 'नाट्याचार्य कृ.प्र. खाडिलकर', मौज प्रकाशनगृह, मुंबई, १९७३.

१८) परुळेकर ना.भि., 'निरोप घेता...' सकाळ पेपर्स, पुणे, १९७५.

१९) प्रधान वसंत, 'जळती मुंबई', प्राची प्रकाशन मुंबई–४.

२०) भावे शिवाजी , 'विनोबा–जीवन–दर्शन ', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई –१४, १९८८.

२१) म्हैसाळकर राम, 'अेक होता गंधर्व', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई– १४, २००२ .

२२) 'मराठी विश्वकोश १ ते २० खंड', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २५

२३) राजेघोरपडे बा.बा.'चलेजाव आंदोलन',महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई– ३२,१९८८.

२४) तुळपुळे बगाराम, 'कामगार संघटना', जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६३.

२५) नगर्सेकर सुरेश, 'स्वातंत्र्यवीर सावरकर आणि प्रॅक्टिकल सोशॅलिझम', (नीळकंठ खाडिलकर यांचे संपूर्ण भाषण), दैनिक नवाकाळ प्रकाशन, मुंबई.

२६) नगर्सेकर सुरेश, 'गिरणी कामगार आणि प्रॅक्टिकल सोशॅलिझम',दैनिक नवाकाळ प्रकाशन, मुंबई, १९८६.

२७) लेले रा.के., 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४.

२८) लेले पु.रा., 'नाटककार खाडिलकर', जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे.

२९) वागळे निखिल, 'श्रीकृष्ण अहवाल – एक विश्लेषण', अक्षर प्रकाशन, मुंबई, १९९८.

३०) भारतीय विचारसाधना, पुणे, १९८७.

३१) शेवडे सच्चिदानन्द, परुळकर दुर्गेश,'गोवा मुक्तीसंग्राम', नवचैतन्य प्रकाशन, मुंबई–९२, एप्रिल– २०१२

३२) शेषाद्री हो. वे. (अनु.), सुधीर जोगळेकर, 'फाळणीची शोकांतिका',

३३) सहस्त्रबुद्धे शं.ना., 'नाट्याचार्य खाडिलकर',सोशल क्लब नाट्य संशोधन मंडळ, पुणे.

ब) वृत्तपत्रे /साप्ताहिक /मासिक/विशेषांक :–

१) दैनिक केसरी

२) दैनिक काळ

३) दैनिक भाला

४) दैनिक राष्ट्रवीर

५) दैनिक तरुणभारत

६) दैनिक प्रहार

७) नवाकाळ दिवाळीअंक

क) इंटरनेट–वेबसाईट :–

**1)** **http://www.navakal.org**

**2)** **http://shodhganga.inflibnet.ac.in**

**3)** **https://www.wikipedia.org**

**4)** **https://ndl.iitkgp.ac.in**

**5)** **http://msblc.maharashtra.gov.in/download.html**

## परिशिष्टे :–

### १.१ काकासाहेब खाडिलकरांचा जीवनपट –

| वर्ष | नाटयाचार्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना (काकासाहेब खाडिलकर) |
|---|---|
| १८७२ | २३ नोव्हेंबरला सांगली जन्म, त्यापूर्वीच चार महिने वडिलांचा मृत्यू त्यामुळे आईचा राग |
| १८९२ | तत्वज्ञान विषय घेऊन बी.ए. |
| १८९३ | 'सवाई माधवरावाचा मृत्यू' चे लेखन |
| १८९६ | लोकमान्य टिळकांच्या 'केससरी'त प्रवेश |
| १८९८ | 'कांचनगडाची मोहना' प्रसिध्द केले लेखन १८९७साली |
| १९०१ | 'कांचनगडाची मोहना' नाटकाचा व्यावसायिक पहिला प्रयोग २४ डिसेंबरला शाहूनगरवासी नाटक मंडळीच्या रंगभूमीवर – प्रमुख भूमिका गणपतराव जोशी–प्रतापराव |
| १९०२ | नेपाळला प्रयाण– पिस्तुलांचा कारखाना काढण्यासाठी १९०४ च्या अखेरीस कट फसल्याने पुनरागमन |
| १९०४ | महाराष्ट्र नाटक मंडळीची 'कांचनगडची मोहना' च्या प्रयोगाने सुरुवात |
| १९०५ | पुण्यात सदाशिव पेठे भाऊसाहेब गोखले वाड्यात प्रथम बिऱ्हाड केले. |
| १९०६ | महाराष्ट्र नाटक मंडळीतर्फे 'सवाई माधवरावांचा मृत्यू'चा प्रयोग |
| १९०७ | 'कीचकवध' व 'बायकांचे बंड' रंगभूमीवर – तिसऱ्या नाटयसंमेलनाचे अध्यक्ष |
| १९०८ | लोकमान्य टिळकांना सहा वर्षे काळ्या पाण्याची सजा खाडिलकरांवर संपादकत्वाची जबाबदारी |
| १९०९ | 'भाऊबंदकी' रंगभूमीवर' |
| १९१० | केसरी'तून बाहेर पडावे लागले व १९१४ साली लोकमान्य परतल्यावर पुनः 'केसरी'त.<br>'कीचकवधा'वर १९१० साली बंदी व १९२६ साली मुक्तता |
| १९१० | 'प्रेमध्वज' रंगभूमीवर |
| १९११ | 'मानापमान'चा मुंबईत पहिला प्रवेश |
| १९१२ | पुण्यात नारायण पेठेत मुंजाबाच्या बोळात आळवणी यांच्या वाड्यात बिऱ्हाड हलवले. |
| १९१३ | 'विद्याहरणा' याचा पुण्यात पहिला प्रयोग |
| १९१४ | 'सत्त्व परीक्षा' याचा नागपुरात प्रथम प्रयोग |
| १९१६ | 'स्वयंवर' मुंबईत रंगभूमीवर आले. |
| १९१७ | पुण्यात नाटयसंमेलनाचे अध्यक्ष |

| | |
|---|---|
| १९१८ | लो. टिळक व केळकर विलायतेस गेल्यामुळे खाडिलकर 'केसरी'चे संपादक मार्च मध्ये झाले. |
| १९२० | लोकमान्यांचे १ ऑगस्ट रोजी निधन वडील बंधू हरिपंत यांचे तत्पूर्वी १५ जुलैला निधन. लोकमान्यांच्या निधनानंतर 'केसरी'तून कायमचे बाहेर पडावे लागले– १२ डिसेंबरला 'द्रौपदी'चा प्रथम प्रयोग– जून १९२० मध्ये 'द्रौपदी'च्या लेखनासाठी चार महिने रजा घेतली होती. |
| १९२१ | 'लोकमान्य' दैनिक मुंबईत निघाले त्याचे संपादक. तेथूनही १९२२ मध्ये बाहेर पडावे लागले. ८ जुलै१९२१ रोजी 'संयुक्त मानापमान'चा प्रयोग |
| १९२२ | 'लोकमान्य' सुरू झाल्यावर जानेवारीत त्यांची दुसरी मुलगी सौ. शांता करंदीकर हिचा मृत्यू |
| १९२३ | 'नवाकाळ' ची स्थापना सुरूवात ७ मार्च १९२३ (रंगपंचमी) यांत्रिक अडचणीमुळे पहिले अंक नीट निघाले नाहीत म्हणून १ एप्रिल १९२३ पासून पहिल्या वर्षाची सुरवात धरली. |
| १९२६ | 'मेनका रंगभूमीवर |
| १९२७ | 'सवती मत्सर' चा पहिला प्रयोग |
| १९२९ | राजद्रोह खटला 'नवाकाळ' मधील लेखाबद्दल एक वर्षाची सजा, यावेळी 'नवाकाळ' चे संपादक पद सोडले ते कायमचे. |
| १९३० | तुरुंगात 'सावित्री' लिहिले १९३३ साली रंगभूमीवर |
| १९३१ | नवाकाळ वाडीची खरेदी |
| १९३३ | सांगलीत दत्तमंदिर स्थापना |
| १९३३ | नागपूरला साहित्य संमेलनाचे अध्यक्ष २५ डिसेंबर |
| १९३५ | 'बायकांचे बंड' संगीत स्वरूपात |
| १९३६ | त्रिदंडी संन्यास' रंगभूमीवर |
| १९३८ | अर्धांगवायूचा झटका, त्यापूर्वी १९३३ पासून सांगलीत दरवर्षी उपनिषदांवर प्रवचने |
| १९४३ | मराठी रंगभूमीचा शताब्दी महोत्सव सांगलीत 'मी प्रथम नाटकी आहे मग पत्रकार' हा संदेश पाठविला. या महोत्सवात 'नाटयाचार्य खाडिलकर नाटयमंदिर' नाव देऊन गौरव. |
| १९४८ | २६ ऑगस्टला मृत्यु. १९४१ ते ४८ या सात वर्षात सहा आध्यात्मिक पुस्तकांचे प्रकाशन. १ ऑगस्टला आकाशवाणीवर लोकमान्य पुण्यतिथी निमित्त मुलाखत – प्रा. न. र. फाटक यांनी घेतलेली व अगोदर ध्वनि मुद्रित केलेली. |

## १.२ जीवनपट – यशवंत कृष्णाजी खाडिलकर (अप्पासाहेब खाडिलकर)

यशवंत कृष्णाजी खाडिलकरांच्या जीवन– कार्य माहितीसाठी खालील परिचयपट सादर केलाआहे.

| वर्ष | यशवंत कृष्णाजी खाडिलकर जीवनातील महत्त्वाच्या घटना |
|---|---|
| १९०६ | अप्पासाहेब खाडिलकरांचा जन्म |
| १९२९ | मार्च १९२९ 'नवाकाळ' वृत्तपत्राचे संपादक पद |
| १९३१ | 'संसारशकट' कादंबरीचे लेखन |
| १९३४ | 'सदानंद' कादंबरीचे लेखन |
| १९३६ | 'आजकाल' कादंबरीचे लेखन |
| १९४२–४३ | मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्षपद |
| १९४४ | कोल्हापूर पत्रकार परिषदेच्या चौथ्या अधिवेशनाचे अध्यक्षपद १९६९ |
| १९६९ | १ ऑक्टोबर १९६९ रोजी दसऱ्याच्या मुहूर्तावर 'नवाकाळ' संपादक पद सोडून आपला पुत्र नीळकंठ खाडिलकर यांच्याकडे संपादक पद स्वाधीन |
| १९७९ | ११ मार्च १९७९ रोजी अप्पासाहेब खाडिलकरांचे निधन |

## १.३ नीळकंठ खाडिलकरांचा जीवनपट :–

'नवाकाळ'चे तिसरे संपादक नीळकंठ खाडिलकर यांच्या कार्याची माहिती जाणून घेत असताना त्यांचा जीवनपट संक्षिप्त मांडला आहे तो पुढील –

❖ **नीळकंठ यशवंत खाडिलकर**

- **जन्म** :– ६ एप्रिल १९३४
- **शिक्षण** :– बी. ए. ऑनर्स (संपूर्ण अर्थशास्त्र)
- **संस्था** :–
    - मुंबई मराठी पत्रकार संघाचे पुनरुज्जीवन,
    - पत्रकार संघाचे दोनदा अध्यक्ष आणि विश्वस्त
    - भाषिक वृत्तपत्र संस्थेचे 'ILNA' चिटणीस.
- **पत्रकारिता**:– महाराष्ट्राचे अग्रगण्य दैनिक 'नवाकाळ'चे तिसऱ्या पिढीतील संपादक,पत्रकारितेतील विक्रमादित्य झाले. एक दंतकथा बनले. खास वृत्तांत,मथळे व मुलाखती गाजविल्या.
- **जीवनपट** :–

- **निवडक पदव्या व पारितोषिके** :–विविध क्षेत्रात चमकणारी मान्यता मिळवली. अनेक पारितोषिके व सन्मान देण्यात आले. निवडक असे –
- महात्मा गांधी, राजे शिवाजी, श्रीकृष्ण, रामायण, संत तुकाराम, मराठी व सत्यमेव जयते ही खिशात मावणारी व खिशाला परवडणारी सात पुस्तके सादर केली. राजे शिवाजी पुस्ताकांचा खप तीन लाख झाला आणि अन्य पुस्तकांचा किमान पाऊण लाख झाला. साहित्यात विक्रम झाला. भारतीय संस्कृतीचा झेंडा डौलत ठेवला. एकूण ३४ पुस्तके लिहिली.
- अग्रलेखांचे बादशहा :– जनतेने दिलेली पदवी.
- पद्मश्री : राष्ट्रपती संजीव रेड्डी यांच्या हस्ते १९९२ साली.
- महाराष्ट्र सरकार तर्फे पत्रकारितेसाठीचा पहिला लोकमान्य टिळक जीवनगौरव पुरस्कार सप्टेंबर २००८.
- 'चौफेर' कऱ्हाडतर्फे 'सुधारक'कार गोपाळ गणेश आगरकर पुरस्कार – ६ ऑगस्ट २०११.
- मराठी या विषयावरील खास पुस्तक सादर केले आणि भाषेच्या अग्रगण्य स्थानासाठी प्रभावी प्रयत्न केले.
- **सुवर्णपदक**: कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांचे 'नाटयाचार्याची नाटयकला' ग्रंथाबद्दल खास सुवर्णपदक
- ना. यशवंतराव चव्हाणांनी जाहीर सभेत केलेली प्रशंसा आजोबांचा(कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर) नातू शोभतो.

- आचार्य अत्रे ॲवॉर्ड : मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे 'सर्वोत्कुष्ट अग्रलेख'
- 'सर्वोत्कृष्ट अग्रलेख' मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे मुंबई मराठी ग्रंथालयातर्फे खास पारितोषिक.
- खपाचा विक्रम:– नवाकाळचा खप एक हजार होता. आगाऊ जाहीर करुन हा खप साडेतीन लाखांहून अधिक केला. एबीसी प्रमाणपत्रानुसार खपात व लोकप्रियतेत दोन रुपयांच्या पेनने भांडवलशाही वृत्तपत्रांवर सरळ मात केली. जास्तीत जास्त सात लाख खपाचा आजतागायत न मोडलेला विक्रम केला.
- व्होरा प्राईस:– सर्वोत्तम वृत्तांत लेखनाबद्दल.
- मुंबई विद्यापीठाचे बुध्दिबळ चॅम्पियन: स्वतःच्या तिघाही कन्यांना बुध्दिबळ शिकविले. तिघीही वयाच्या १३ व्या वर्षी नॅशनल चॅम्पियन जागतिक संघटनेने तिघींनी 'इंटरनॅशनल मास्टर' ही पदवी दिली. त्या खाडिलकर सिस्टर्स म्हणून देशात व जगात प्रसिध्द झाल्या. या तिघी बहिणीनीच जागतिक ऑलिम्पियाड मध्ये चार वेळा भारताचे प्रतिनिधीत्त्व केले. हा आजवर न मोडलेला जागतिक विक्रम आहे.
- पत्रकाराचा हक्क 'पत्रकाराला आपल्या माहितीचा उगम न सांगण्याचा हक्क आहे.' यासाठी १९७२ साली कृष्णा देसाई खटल्यात न्यायालयात अतिशय गाजलेली झुंज दिली. यावर वृत्तपत्र विद्या परिक्षेत प्रश्न येता.
- सुशीलकुमार शिंदे यांनी २० वर्षापूर्वी केलेली प्रशंसा : सुशीलकुमार जाहीर सभेत म्हणाले की, प्रॅक्टिकल (अंमलात आणणे शक्य असलेला) सोशॅलिझम सारखी स्वतःची राजकीय विचारसरणी अर्थात थिअरी आणि स्वतःचे नीळकंठ तत्त्वज्ञान मांडणारे एकमेव पत्रकार म्हणजे निळकंठ खाडिलकर
- हिंदुत्त्वः नीळकंठ तत्त्वज्ञानः 'हिंदुत्त्व' या ग्रंथात अभिनव प्रकाशात 'हिंदुत्त्व' स्वच्छ,स्पष्ट 'crystal cleare' स्पष्ट मांडले. त्याच वेळी व्यक्तीला व समाजाला समर्थ घडविणारे 'नीळकंठ तत्त्वज्ञान' सादर केले.
- निर्भीडः एका ही पुढाऱ्याकडून किंवा उद्योगपतीकडून कधी एक पैसाही घेतला नाही. आव्हान देऊन याप्रमाणे जाहीर केली. अर्थात लेखणी निस्पृह व तळागाळासाठी लढणारी!
- विद्यार्थी – चिकीत्सक समूहमधील शालेय जीवनात आंतर शालेय वक्तृत्व स्पर्धेत पहिला क्रमांक, विल्सन कॉलेजात दि. बेस्ट स्टुडंट प्राईस एक वर्ष फेलो म्हणून अर्थशास्त्र शिकविले.
- स्त्रियांचा हक्कः स्त्रियांना पुरुषांच्या राष्ट्रीय बुध्दिबळ स्पर्धेत आपल्या तीन कन्या रोहिणी, वासंती व जयश्री यांना बुध्दिबळ शिकविताना, खेळण्याचा हक्क न्यायालयात व जागतिक संघटनेकडे फेडे जाऊन मिळवूल दिला. तेव्हा एक प्रसिध्द विचारवंत म्हणाले की, ही महात्मा फुल यांची आठवण व्हावी अशी कामगिरी झाली. त्यामुळेच आज भारतातील राष्ट्रीय स्पर्धेत आणि जागतिक स्पर्धांतही पुरुषांबरोबर स्त्री बुध्दिबळपटू पटू खेळत आहेत.


- गिरगांव चेस सर्कल चालवून बुध्दिबळाचा प्रसार केला.
- प्रॅक्टिकल सोशॅलिझमतर्फे अडीच लाख गिरणी कामगारांचा लढा लढवून नऊ कोटी मिळवून दिले. त्याबद्दल कपर्दिकही घेतली नाही.
- 'नवाकाळ'चे २७ वर्षे संपादक – १ ऑक्टोबर दसरा १९६९ पासून १९९७ पर्यंत मॅरेथॉन मुलाखती गाजविल्या विषेशतः गोळवलकर गुरुजींची मुलाखत, कॉ. श्रीपाद डांगे, कॉ. बी. टी. रणदिवे, शरद पवार, सत्यसाईबाबा यांच्या मुलाखती.
- भांडवलशाही वृत्तपत्रे हा भांडवलदाराचा जनानखाना आहे. तर 'नवाकाळ' सामान्याचा तोफखाला केला.
- नाभिक, चर्मकार व धोबी यांचा प्रचंड मोर्चा मंत्रालयावर नेला. त्यांच्यासठी सवलती मिळवल्या.
- सामान्यजनांसाठी अनेक लढे लढविले. 'नवाकाळ'हा आजही सामान्यजनांचा व मराठी माणसांचा एकमेव आधार आहे.
- मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष व विश्वस्त.
- 'मुंबई मराठी पत्रकार संघ ' व 'मराठी पत्रकार परिषद' या संस्था बंद पडल्या होत्या. म. टा. चे श्री. दि. वी. उर्फ़ बंडोपंत गोखले यांच्यासह पत्रकार संघ व पत्राकर परिषद पुन्हा सुरु केल्या.
- अभिरुप विधान सभेचे कार्यक्रम पत्रकार संघातर्फे भागाभागात केले व मानधन इमारत निधीसाठी दिले.
- एक लाख रुपयांची मदत मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाला केली. मराठीला उत्तेजनासाठी अडीच लाख रुपयांची देणगी खालील पारितोषिकांसाठी दिली. दहावी परिक्षेत एस. एस. सी. मराठी प्रथम विषयात संपूर्ण महाराष्ट्रात सर्वाधिक गुण मिळवणारा विद्यार्थी/विद्यार्थीनी याला १० (दहा) हजार रुपयांचे नाटयचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर पारितोषिक आणि मराठी द्वितीय विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी यास दहा हजार रु. ची (५+३+३) निळकंठ खाडिलकर पारितोषिके.
- निधन : नीलकंठ खाडिलकर यांचे दुःखद निधन दिनांक . २२ नोव्हेंबर २०१९ रोजी झाले.

पुण्यांतील राष्ट्रीय पक्ष



खुर्चांवरः—१ श्री. शिवरामपंत परांजपे, २ श्री. तात्यासाहेब केळकर, ३ श्री. सीतारामपंत दामले, ४ लोकमान्य, ५ श्री. वासुकाका जोशी, ६ श्री. दत्तोपंत बेहेरे, ७ श्री. काकासाहेब खाडिलकर

## अथणी परिषद



मध्यभागीं अध्यक्षस्थानीं परिषदेचे अध्यक्ष दे. भ. काकासाहेब खाडिलकर असून त्यांचे उजवीकडे दे. भ. गंगाधरराव देशपांडे आहेत व डावे बाजूस लोकमान्य टिळक भाषण करीत आहेत.

सन १९१७


नागपूर-वऱ्हाडचा होमरुल दौरा



खुर्चीवर—१ डॉ. मुंजे, २ लोकमान्य, ४ काकासाहेब.

सन १९१८

## तेरावें नाट्यसंमेलन



गंधर्व नाटक मंडळीतर्फे किर्लोस्कर नाटकगृहांत ता. ४।५।१९१७ रोजीं रा. खाडिलकर यांच्या अध्यक्षतेखालीं



कारावासाच्या वाटेवर
( हातकड्यांसह )




कारावासांतून परत मुंबईत स्वागत
श्री. वासुकाका जोशी, नरीमन, डॉ. वेलकर, घारपुरे वगैरेसह

सन १९२९ साली काकासाहेब राजद्रोहाच्या खटल्यात अटक नंतर सन १९३० साली काकासाहेबांची करावासातून सुटका
न १९४५ साली  काकासाहेब खाडिलकरांच्या पत्नी गौरीकाकूचे निधन


**महात्माजींची काकासाहेबांस भेट**
**व सांत्वनपर संदेश**





अंबालिकाबाईने
तार दिया। इससे
पता चला। और
घर आ गई तो
मैंने कहा मैं
जाऊंगा। मैं मानता
हूं आपको कोई नहीं है।
तो आपको आधात
क्या है जाना? मैं तो
आपको देखने
को लिये आया।
आप तो इस दुःख को
हजम करनेवाले
होंगे।





काकासाहेबांचें हस्ताक्षर







खाडिलकर रस्ता.

मुंबई कॉर्पोरेशननें काकासाहेबांच्या प्रथम पुण्यतिथीच्या पूर्वीच जुन्या 'कांदेवाडी' या गिरगांव भागांतील महत्वाच्या रस्त्यास 'खाडिलकर' रस्ता असें नांव दिलें आहे.

# गिरावळ(नारिंग्रे)चे **खाडिलकर** यांचा वंशवृक्ष .





१९२३ ते २००० पर्यंत 'नवाकाळ' वृत्तपत्राचे टायटल



'नवाकाळ'वरील राजद्रोहाचा खटला

श्री. खाडिलकर ह्यांची तुरुंगांतून सुटका

'नवाकाळ' पत्रावरील अब्रुनुकसानीचा खटला

नवाकाळवरील अब्रुनुकसानीचा खटला

'नवाकाळ'वरील राजद्रोहाचा खटला

श्री. कृ. प्र. खाडिलकरांचा पुण्यांतला सन्मान

'नवाकाळ' पत्रावर प्रेस ऑर्डिनन्सची धा

श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

'नवाकाळ'च्या श्रीदत्तात्रय प्रेसची जामिनकी जप्त

हिंदी 'प्रतिनिधीं' वर बहिष्कार

१९२९ चा नवाकाळ वृत्तपत्रावरील राजद्रोहाचा खटला




१९४७ देश स्वतंत्र झाला




गांधीजींच्या दुःखद  निधनाची वार्ता 'नवाकाळ' वृत्त १९४८




संयुक्त महाराष्ट्र चळवळ १९५५–१९६० आणि महाराष्ट्र राज्याची निर्मिती १९६०




गोवा मुक्ती संग्राम १९५५–१९६१ 'नवाकाळ' वृत्त




१९८२ ऐतिहासिक गिरणी कामगार संप




कृष्णा देसाई खून खटला वृत्तपत्र नीतीचा प्रश्न गाजला १९७१, व श्रीकृष्ण आयोग खटला १९९८




१९९० च्या दशकातील 'नवाकाळ' वृत्तपत्र





१९८० ते १९९० दशकातील मुंबईतील गँगवॉर, पोलीस चकमकी झाल्या 'नवाकाळ' चे  बेधडक वृत्त




'नवाकाळ' दिवाळी अंक





लोकमान्य टिळक

महात्मा गांधी




‘नवाकाळ’चे संस्थापक संपादक कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर




नवाकाळ’चे दुसरे संपादक
यशवंत कृष्णाजी खाडिलकर



‘‘नवाकाळ’चे तिसरे व चौथे संपादक नीळकंठ
खाडिलकर व जयश्री खाडिलकर –पांडे



नवाकाळ

शुद्ध खादी

७ मार्च १९२३ 'नवाकाळ' वृत्तपत्राचा पहिला अंक